# श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांचीं भाषणें

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ५९८२.

REFBK-0005851

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थळ प्रत
क्र. निबंध ६३४
ता. २५।१२।३९
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रमांक ५८३८
ठाणे



**कै० श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड,**

सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., एल्एल्. डी. इत्यादि

श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड

यांचीं

# भाषणें

## तृतीय खंड

REFBK-0005851

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५१५९
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

प्रथमावृत्ति

१० मे १९३९ ]

[ किंमत २॥ रुपये

प्रकाशक :
यशवंत गोपाळ जोशी,
६२३/१५ सदाशिव, पुणें २.

मुद्रक :
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
'राजगुरु प्रेस', कॉमनवेल्थ कॉलनी,
४०५ नारायण, पुणें २.

# प्रस्तावना

कै० श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या भाषणांचा हा तिसरा खंड वास्तविक त्यांचे हयातींतच प्रसिद्ध व्हावयाचा, पण कांहीं अनपेक्षित कारणांमुळें प्रकाशकांत फेरबदल करावा लागल्यानें त्याचें छापकाम त्यांच्या मृत्यूपूर्वी पुरें होऊं शकलें नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते.

२. या खंडांत श्री. सयाजीराव महाराजांचीं ८३ भाषणें दिलीं आहेत. या पूर्वींच्या दोन खंडांत एकत्रित केलेलीं १४९ भाषणें धरतां श्रीमंतांच्या भाषणांची संख्या २३२ होते.

३. श्रीमंतांचा जन्म ता. ११ मार्च १८६३ रोजीं नाशिक जिल्ह्यांतील कवळाणें गांवीं झाला. ता. २७ मे १८७५ रोजीं त्यांचें दत्तविधान होऊन त्यांस बडोद्याची इतिहासप्रसिद्ध गादी मिळाली, व त्रेसष्ट वर्षें तिचा त्यांनीं उपभोग घेतल्यानंतर ता. ६ फेब्रुवारी १९३९ रोजीं रात्रौ पावणे नऊ वाजतां मुंबई मुक्कामीं जयमहाल राजवाड्यांत त्यांचें देहावसान झालें. श्रीमंतांच्या या दीर्घ कारकीर्दीच्या मानानें त्यांच्या भाषणांची संख्या फारच अल्प दिसते. तीवरून श्रीमंतांस फारसें बोलणें आवडत नसावें असा वाचकांचा ग्रह होण्याचा संभव आहे. पण वस्तुस्थिति निराळी होती, हें येथें नमूद करावेंसें वाटतें.

४. सन १८७५ ते १९३८ पर्यंतच्या काळांत सार्वजनिक समारंभप्रसंगीं बोलण्याचे श्रीमंतांस अनेक प्रसंग आले. यांपैकीं महत्त्वाच्या प्रसंगांशिवायच्या इतर वेळीं ते पूर्वतयारीशिवायच बोलत व त्यांचीं भाषणें पण समयास अनुरूप अशींच होत. कधीं कधीं ते आपल्या भाषणांत हेतुपुरस्सर पाल्हाळ किंवा विषयांतर करीत, व भाषणाच्या ओघांत ते तसें सांगतहि. अशा रीतीनें त्यांनीं ऐन वेळीं केलेलीं भाषणें ज्या त्या वेळीं समग्र किंवा साररूपानें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत असत, पण त्यांचीं कात्रणें ज्या त्या वेळीं संग्रहीत केलेलीं नसल्यामुळें तीं सर्व या संग्रहांत घालतां आलीं नाहींत. वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेलीं जेवढीं भाषणें आम्हांस शोधाअंतीं मिळालीं तेवढीं या संग्रहांत भाषांतर करून घातलीं आहेत. या खंडांत दिलेलीं भाषणें रा. चिं. ग. कर्वे, बी. ए. व रा. दि. वि. काळे एम्. ए., पुणें यांनीं अनुवादिलीं आहेत.

५. श्रीमंतांनीं पूर्वतयारी करून केलेलीं सर्व भाषणें दप्तरीं उपलब्ध असल्यानें तीं या संग्रहांत समाविष्ट केलीं आहेत. श्रीमंतांचें चरित्र जर वरवर चाळलें तर हीं भाषणें एके काळीं फार गाजल्याचें, सर्व हिंदुस्थानभर त्यांनीं विचारांचीं आंदोलनें

उत्पन्न केल्याचें वाचकांस आढळून येईल. श्रीमंतांचे विचार, उच्चार व आचार यांत एकरूपता असल्यामुळें त्यांचीं भाषणें नेहमीं परिणामकारक होत असत. यांपैकीं कांहीं भाषणांमुळें एक सुविद्य, सुस्वभावी, स्वदेशाभिमानी, समाजसुधारक व प्रजाहितदक्ष नृपति म्हणून श्रीमंतांचें नांव अखिल भरतखंडांत सर्वतोमुखीं झालें व कांहीं भाषणांनीं त्यांची कीर्ति त्रिखंडांत पसरविली.

६. हीं भाषणें कोणतीं हें, हे खंड चाळल्यास वाचकांस सहज कळून येईल. तीं तयार करण्यासाठीं श्रीमंतांनीं फार मेहनत घेतली असली पाहिजे, हें मी स्वानुभवानें सांगूं शकतों. प्रत्येक प्रश्नावर त्यांचें स्वतःचें असें मत असे. तें प्रकट करण्यापूर्वी त्याच्या योग्यायोग्यतेविषयीं श्रीमंत अनेकांशीं विचार विनिमय व वादविवाद करीत, आणि मगच तें आग्रहानें प्रतिपादित असत. 'बालादपि सुभाषितं ग्राह्यं' किंवा 'थोडाही गुण मिळता घ्यावा, सांठा त्याचा नित्य करावा' या उक्तीस अनुसरून त्यांचें वर्तन असल्यानें लहान माणसानें केलेल्या चांगल्या सूचनांचा ते आनंदानें स्वीकार करीत असत. एखाद्या बाबतीचा सर्व बाजूंनीं विचार करून आपला अभिप्राय निश्चित केल्यानंतर मात्र ते आपल्या मतास चिकटून राहात. दुसऱ्याचे सांगण्यावरून व आपल्या सदसद्विवेकबुद्धीशीं प्रतारणा करून ते त्यांत कधींहि फेरबदल करीत नसत. कोठलीहि गोष्ट उतावीळपणानें व पूर्ण विचार केल्याशिवाय करावयाची नाहीं आणि विचारपूर्वक एखादी गोष्ट केली म्हणजे कांहीं झालें तरी तींत माघार घ्यावयाची नाहीं असा त्यांचा बाणा असे.

७. त्यांनीं ऐनवेळीं केलेल्या भाषणांपैकीं बरींचशीं भाषणें बडोदें संस्थानांतच झालीं आहेत. तीं करण्यांत लोकशिक्षण हा त्यांचा प्रमुख हेतु होता. यामुळें ते अगदीं साधी, घराऊ भाषा वापरीत, सामान्य लोकांना पटतील अशीं उदाहरणें देत, व लोकांना सहज समजेल आणि त्यांच्या गळीं उतरेल असा कोटिक्रम करीत. त्यांच्या मनावर विकारांपेक्षां विचारांचा अधिक पगडा असल्यानें त्यांच्या भाषणांत वाचकांस भावनोद्दीपक असें फारसें कांहींच आढळणार नाहीं, विचारास खाद्य मात्र भरपूर मिळेल.

८. पूर्वतयारी करून करावयाचीं भाषणें बहुशा ते इंग्लिशमध्यें प्रथम लिहून काढीत व मग जरूरीप्रमाणें त्यांचा मराठी, गुजराती किंवा हिंदींत अनुवाद तयार करवीत. आपल्या भाषणांस सर्व हिंदुस्थानभर प्रसिद्धि मिळावी व विशेषेंकरून हिंदुस्थान सरकारच्या राजकीय खात्यास आपल्या मताचा विपर्यास करण्याची संधि मिळूं नये हा हेतु याच्या बुडाशीं असे. हीं भाषणें वाचकांस साधारण पंडिती थाटाची वाटतील. तीं सुशिक्षित लोकांसमोर करावयाचीं असल्यानें तीं लिहून काढतांना तर्कशुद्ध विचारसरणीबरोबरच भाषेच्या ठाकठिकीकडे पण श्री. महाराजसाहेब लक्ष पुरवीत असत. भाषणांत योग्य ठिकाणीं संस्कृतादि भाषेंतील सुभाषितें घालून तें सजविण्याची त्यांना मोठी

हौस असे. नवमतप्रदर्शनाबरोबरच ते प्राचीन ग्रंथांतील मतांचा परामर्श घेण्यास विसरत नसत. भाषण आपल्या पदवीस साजेसें व्हावे, त्यावरून आपला बहुश्रुतपणा श्रोत्यांच्या नजरेंत भरावा, आपले विचार त्यांना पटावें व ते त्यांनीं कृतींत उतरवावे, त्यांत दोष काढण्यास कोणास जागा मिळूं नये या गोष्टींवर त्यांचा विशेष कटाक्ष असे.

९ श्री. सयाजीराव महाराजसाहेबांच्या सर्व भाषणांत त्यांचा दुर्दम्य देशाभिमान, आपल्या प्राचीन संस्कृतीविषयीं योग्य आदर, समाजसुधारणेची आत्यंतिक तळमळ, शिक्षणप्रसाराची तीव्र लालसा, देशी भाषांतील वाङ्मयसमृद्ध करण्याची स्पृहणीय इच्छा, असामान्य धैर्य, विद्वत्ता, रसिकता वगैरे त्याच्या अंगचे अनेक सद्गुण वाचकांस दिसून येतील. उदाहरणार्थ, या खंडांतील दुसरें व शेवटचें भाषण पहा. यांपैकीं पहिल्या भाषणांत* (सन १८९२) त्यांनीं हिंदुस्थानास वसाहतींप्रमाणें स्वराज्य द्यावें अशी मागणी केली आहे, व दुसऱ्यांत (सन १९३८) हिंदुस्थानास शक्य तितक्या लवकर स्वातंत्र्य देण्याचा ब्रिटिश लोकांना सल्ला दिला आहे. हिंदुस्थानांतील दुसऱ्या एकाहि राजानें अशा रीतीनें निर्भयपणें स्वराज्याचा पाठपुरावा केल्याचें माझ्या पाहण्यांत किंवा ऐकिवांत नाहीं. सन १९३६ सालीं झालेल्या धर्मविषयक भाषणांतून हिंदु धर्माविषयीं त्यांच्या मनांत किती आदर वसत होता व अज्ञानामुळें त्यांत शिरलेलीं खुळें काढून टाकण्यासाठीं त्यांना कशी तळमळ लागली होती हें वाचकांस कळून येईल. मराठी साहित्य संमेलन, ग्रंथसंपादक मंडळीचा वाढदिवस, मुंबई येथील ग्रंथसंग्रहालयाचा कोनशिला समारंभ वगैरे प्रसंगीं त्यांनीं केलेलीं भाषणें देशी भाषांतील वाङ्मयाविषयीं त्यांना वाटणाऱ्या प्रेमाची द्योतक आहेत. ज्ञानप्रसारासाठीं त्यांनीं किती अविरत श्रम केले हें प्रसिद्धच आहे. तेव्हां त्याच्याविषयीं अधिक लिहिण्याची जरूरी नाहीं. त्यांच्या अनेक चरित्रकारांनीं व मी स्वतः अनेक प्रसंगीं त्यांच्या विचारांविषयीं सविस्तर विवेचन केलें असल्यानें त्याचें चर्वितचर्वण न करतां ही प्रस्तावना येथेंच पुरी करतों.

६५ बुधवार पेठ,<br>पुणें. } वि. पां. नेने.

---

* या भाषणास सम्राज्ञी व्हिक्टोरियाचे चिरंजीव, इंग्लंडचे त्या वेळचे मुख्य प्रधान वगैरे थोर मंडळी उपस्थित होती. हें पूर्वतयारी न करतां केलेलें भाषण असून लंडन टाइम्सनें तें साररूपानें प्रसिद्ध केलें होतें. या पत्रावरून तें येथें घेतलें आहे. दिवाण बहादुर समर्थ हे त्या वेळीं श्री. महाराजा बरोबर विलायतेस होते. श्रीमंतांचें हें भाषण मूळांत किती तरी पटींनीं चांगलें व स्पष्टोक्तिपूर्ण होतें असें त्यांनीं तेव्हां लिहिलेल्या आपल्या पत्रांत नमूद केलें आहे.

# मराठी भाषणांचा तिसरा खंड

## अनुक्रमणिका


| क्रमांक | तारीख | प्रसंग | पान |
|---|---|---|---|
| १ | ता. २४–१०–१८९२ | मॅन्शन हाउसमधील भोजन-समारंभ, लंडन. | १ |
| २ | ता. १०–११–१८९२ | गिल्डहॉलमधील लॉर्ड मेयर यांच्या मेजवानीचे वेळीं हिंदी आणि वसाहतींतील पाहुण्यांकरितां दिलेल्या टोस्टला उत्तर, लंडन. ... ... | २ |
| ३ | ता. ३०—३–१९०२ | श्रीमंत महाराजसाहेब यांच्या जन्मोत्सवाचा दरबार, बडोदें. ... ... ... | ४ |
| ४ | ता. ७—३–१९०४ | रंगपंचमी आणि श्रीमंत महाराजसाहेब यांच्या जन्मोत्सवाचा दरबार, बडोदें. ... ... | ६ |
| ५ | ता. ११—६–१९०४ | न्यू स्कूलला भेट, पुणें. ... ... | ९ |
| ६ | ता. २०—२–१९०७ | श्री महाराजा मिल्चा उद्घाटनसमारंभ, बडोदें. ... ... ... ... | १० |
| ७ | ता. ५—३–१९०७ | श्रीमंत महाराजसाहेब यांचा रौप्यमहोत्सव, बडोदें. ... ... ... ... | ११ |
| ८ | ता. २४–१०–१९०९ | मराठी साहित्य संमेलन, बडोदें. ... | १४ |
| ९ | ता. २९–१०–१९०९ | पोटजातींचें एकीकरण, बडोदें. ... ... | १५ |
| १० | ता. १७–१२–१९१० | मुंबई ग्रंथ-संपादक मंडळी व इंदुविजय कंपनी यांकडून मानपत्र देण्याचा समारंभ, मुंबई. ... | १८ |
| ११ | ता. १७–१२–१९१० | मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या नवीन इमारतीचा पाया घालण्याचा समारंभ, मुंबई. ... | २१ |
| १२ | ता. १८–१२–१९१० | मुंबई हिंदु क्लबाचें तिसरें वार्षिक संमेलन, मुंबई. | २२ |
| १३ | ता. २८–१२–१९१० | मराठा शिक्षण परिषदेची चवथी बैठक, बडोदें.... | २४ |
| १४ | ता. ३१–१२–१९१० | बडोद्यांतील ज्युबिली बागेंत बुद्धाच्या पुतळ्याचा अनावरण-समारंभ, बडोदें. ... ... | २८ |

| क्रमांक | तारीख | प्रसंग | पान |
|---|---|---|---|
| १५ | ता. ४—२–१९११ | अमरेळी काठी परिषद, अमरेळी. ... | ३० |
| १६ | ता. ५—२–१९११ | अमरेळी येथील शेतकी आणि उद्योगधंदे यांचें प्रदर्शन उघडण्याचा समारंभ, अमरेळी. ... | ३५ |
| १७ | ता. १३–१२–१९१२ | सार्वजनिक पुस्तकालयातर्फें मानपत्र समर्पण, बडोदें. | ३७ |
| १८ | ता. ४–१९१७ | भाद्रण कन्याशाळेचा उद्घाटन समारंभ, भाद्रण. | ३९ |
| १९ | ता. २३—२–१९२१ | मेहसाणा येथील वॉटर वर्क्सच्या पायाभरणीचा समारंभ, मेहसाणा. ... ... ... | ४० |
| २० | ता. २४—२—१९२१ | शेठ किलाचंद देवचंद यांच्या देणगींतून बांधलेलें 'श्री. ज्ञानबाई प्रसूतिगृह' उघडण्याचा समारंभ, पाटण. ... ... ... | ४३ |
| २१ | ता. २६–११–१९२१ | दहावें मराठी साहित्य संमेलन, बडोदें. ... | ४५ |
| २२ | ता. १२—१–१९२६ | लॉर्ड आणि लेडी रीडिंग यांस मेजवानी, बडोदें. | ४९ |
| २३ | ता. ९–१२–१९२६ | बडोदें राज्याच्या न्यायखात्याची परिषद, बडोदें. | ५३ |
| २४ | ता. १२–१२–१९२६ | बडोद्यांतील जुम्मादादा व्यायाममंदिरांत प्रो. भाटे यांचें न्यूमनची विद्यापीठविषयक कल्पना या विषयावरील झालेल्या भाषणाचा समारोप. ... | ५४ |
| २५ | ता. २९—१–१९२७ | कारेली बागेंतील शेठ बिरला बक्षिस-समारंभ, बडोदें. ... ... ... ... | ५६ |
| २६ | ता. २०—३–१९२८ | खानगी खात्यांतील कामाविषयीं उपदेशपर दोन शब्द, बडोदें. ... ... ... | ५८ |
| २७ | ता. २९–१२–१९२८ | बापूजी देसाई सायन्स लॅबोरेटरी हॉलचें उद्घाटन, नवसारी. ... ... ... | ६६ |
| २८ | ता. २४–१२–१९३२ | हिंद विजय जिमखान्यातर्फें झालेल्या १४ व्या अखिल भारतीय शारीरिक सामन्यांचा बक्षिस-समारंभ, बडोदें. ... ... ... | ६७ |
| २९ | ता. २५–१२–१९३२ | बडोदा कॉलेजचा सुवर्णमहोत्सव, बडोदें. ... | ६८ |
| ३० | ता. २५–१२–१९३२ | गृहशास्त्र-प्रदर्शनाचें उद्घाटन्, बडोदें. ... | ७५ |
| ३१ | ता. ११—२–१९३३ | अटलाद्रा-पाद्रा रस्त्याचें उद्घाटन, बडोदें. ... | ७९ |

| क्रमांक | तारीख | प्रसंग | पान |
|---|---|---|---|
| ३२ | ता. ३—३–१९३३ | श्री. चिमणाबाई स्त्री-समाजानें करविलेला संगीत जलसा, बडोदें.... ... ... | ८१ |
| ३३ | ता. ७—३–१९३३ | आर्यकन्या महाविद्यालयाचा समारंभ, बडोदें. | ८३ |
| ३४ | ता. ११—३–१९३३ | महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळेच्या विद्यार्थिनींचें पहिलें संमेलन, बडोदें. ... | ८४ |
| ३५ | ता. २४–१२–१९३३ | मॉडेल फार्ममधील सोयाबीन लावण्याचा समारंभ, बडोदें. ... ... ... | ८७ |
| ३६ | ता. २९–१२–१९३३ | न्यायमंदिरांत खाद्यपदार्थांचें भरलेलें प्रदर्शन, बडोदें. ... ... ... ... | ८७ |
| ३७ | ता. ३—३–१९३४ | मोतीबागेंतलें बालसंमेलन, बडोदें. ... | ९० |
| ३८ | ता. २२—३–१९३४ | फुलांच्या प्रदर्शनाचा उद्‌घाटन-समारंभ, बडोदें. | ९१ |
| ३९ | ता. २४—७–१९३४ | समर रिसेप्शन, ईस्ट इंडिया असोसिएशन, लंडन. ... ... ... ... | ९२ |
| ४० | ता. ७—८–१९३५ | यूनियन ऑफ वेस्ट ॲन्ड ईस्टची सभा, लंडन. | ९४ |
| ४१ | ता. २–१२–१९३५ | हिंदु धर्माची पुनर्घटना, लक्ष्मीविलास राजवाडा, बडोदें. ... ... ... ... | ९६ |
| ४२ | ता. ४–१२–१९३५ | बडोदें हायस्कूलचा वार्षिक बक्षिस-समारंभ, न्यायमंदिर, बडोदें. ... ... ... | ९९ |
| ४३ | ता. ५–१२–१९३५ | गुजराथेंतील आंतर विद्यालयीन सामन्यांचीं बक्षिसें वांटण्याचा समारंभ, बडोदें. ... | १०० |
| ४४ | ता. ९–१२–१९३५ | आर्यकन्या महाविद्यालयाच्या आफ्रिका छात्रावासाचा उद्‌घाटन्-समारंभ, बडोदें. ... | १०२ |
| ४५ | ता. ११–१२–१९३५ | महाराणी हायस्कूल फार गर्ल्स, वार्षिक बक्षिस-समारंभ, बडोदें. ... ... ... | १०३ |
| ४६ | ता. १३–१२–१९३५ | फ्रेण्ड्स को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटीनें बसविलेल्या नव्या पेठेचा नामकरण-समारंभ, बडोदें. ... ... ... ... | १०५ |

| क्रमांक | तारीख | प्रसंग | पान |
|---|---|---|---|
| ४७ | ता. १६–१२–१९३५ | श्री. कडवा पाटीदार छात्रालयाचा उद्घाटन-समारंभ, कारेली बाग, बडोदें. ... ... | १०७ |
| ४८ | ता. २३–१२–१९३५ | कै. श्री. खंडेराव महाराज यांच्या पुतळ्याचा अनावरण-समारंभ, बडोदें. ... ... | १०८ |
| ४९ | ता. २८–१२–१९३५ | हिंदु धर्माची उत्क्रांति, बडोदें. ... ... | ११२ |
| ५० | ता. १—१–१९३६ | ग्राम-जीवन प्रदर्शन, बडोदें ... ... | १२३ |
| ५१ | ता. १—१–१९३६ | सदर ... ... | १२७ |
| ५२ | ता. १—१–१९३६ | हीरकमहोत्सव-प्रसंगीं प्रजाजनांस दिलेला संदेश | १३० |
| ५३ | ता. ५—१–१९३६ | लॉर्ड व लेडी विलिंग्डन यांच्या सन्मानार्थ लक्ष्मीविलास राजवाड्यांत झालेलें भोजन, बडोदें. ... ... ... ... | १३३ |
| ५४ | ता. ५—१–१९३६ | हीरकमहोत्सवांत राज्यांतील स्त्रियांनीं दिलेलें मानपत्र, बडोदें. ... ... ... | १३७ |
| ५५ | ता. ६—१–१९३६ | ट्रॅन्सपोर्ट पेजन्ट, गोया गेट कॉलनी, बडोदें. | १३८ |
| ५६ | ता. ८—१–१९३६ | स्काउट रॅली, बडोदें. ... ... ... | १३८ |
| ५७ | ता. ८—१–१९३६ | पुस्तकालय-प्रदर्शन, बडोदें. ... ... | १३९ |
| ५८ | ता. ९—१–१९३६ | धारासभेच्या मानपत्राला उत्तर, बडोदें. ... | १३९ |
| ५९ | ता. ११—१–१९३६ | बडोदें मिल ॲसोसिएशननें दिलेलें मानपत्र, बडोदें. ... ... ... ... | १४१ |
| ६० | ता. १२—१–१९३६ | माजी बी. ए. पदवीधरांनीं दिलेलें भोजन, बडोदा कॉलेज. ... ... ... | १४१ |
| ६१ | ता. १६—१–१९३६ | जसदन समारंभ, नवसारी. ... ... | १४४ |
| ६२ | ता. १७—१–१९३६ | अंबिका नदीवरील पुलाचा उद्घाटन-समारंभ, गडद. ... ... ... | १४५ |
| ६३ | ता. ७—२–१९३६ | कीर्तिमंदिर उद्घाटन-समारंभ, बडोदें. ... | १५० |
| ६४ | ता. २७—२–१९३६ | आपणांला हवा असलेला धर्म, बडोदें. ... | १५६ |
| ६५ | ता. ३—७–१९३६ | वर्ल्ड फेलोशिप् ऑफ फेथ्सच्या दुसऱ्या अधिवेशनांतील प्रास्ताविक भाषण, लंडन. ... | १६३ |

| क्रमांक | तारीख | प्रसंग | पान |
|---|---|---|---|
| ६६ | ता. ४—५–१९३७ | इंडिया हाउसमध्यें "हिंदुस्थान आणि व्हिक्टोरिया राणी" या विषयावरील व्याख्यान-प्रसंगीं, लंडन. ... ... ... | १६८ |
| ६७ | ता. ११—५–१९३७ | बकिंगहॅम राजवाड्यांत सम्राटांना वाचून दाखविलेला अभिनंदनपर संदेश. ... | १७१ |
| ६८ | ता. १४—५–१९३७ | साम्राज्य परिषदेमधील भाषण, लंडन. ... | १७१ |
| ६९ | ता. २२—५–१९३७ | ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी, रॅले क्लबमधील भाषण, ऑक्सफोर्ड.... ... ... ... | १७३ |
| ७० | ता. २४—५–१९३७ | साम्राज्यदिन भोजन-प्रसंगीं केलेलें भाषण, लंडन. | १७५ |
| ७१ | ता. ११—६–१९३७ | ईस्ट इंडिया ॲसोशिएशनतर्फे हिंदी प्रतिनिधींचें स्वागत, लंडन. ... ... ... | १७६ |
| ७२ | ता. १५–१२–१९३७ | बडोदें म्युनिसिपालिटीनें महाराजांच्या सन्मानार्थ दिलेला उद्यानोपाहार, बडोदें. ... | १७७ |
| ७३ | ता. १६–१२–१९३७ | श्री. जयसिंहराव सार्वजनिक लायब्ररीचा हीरकमहोत्सव, बडोदें. ... ... | १८० |
| ७४ | ता. २३–१२–१९३७ | कलकत्ता संस्कृत कॉलेजनें 'भूपतिचक्रवर्ती' ही पदवी दिली त्या प्रसंगीं केलेलें भाषण, कलकत्ता. | १८४ |
| ७५ | ता. ३०–१२–१९३७ | बेंगॉल बुद्धिस्ट ॲसोशिएशनच्या स्वागतपर भाषणाला उत्तर, कलकत्ता. ... ... | १८६ |
| ७६ | ता. ३—१–१९३८ | कुचबिहार राजवाड्यांत महाराजसाहेबांच्या सन्मानार्थ झालेली भेजवानी, कुचबिहार. ... | १८८ |
| ७७ | ता. ४—१–१९३८ | साहित्य-सभेमार्फत स्वागत, कुचबिहार. ... | १८९ |
| ७८ | ता. ५—१–१९३८ | जितेन्द्रनारायण हॉस्पिटलमधील 'महाराजा गायकवाड एक्स रे वार्ड'च्या पायाचा कोनशिला-समारंभ, कुचबिहार. ... ... ... | १९० |
| ७९ | ता. २२–१—१९३८ | हिंदुस्थान, ब्रह्मदेश, सीलोन व अफगणिस्थान यांच्या पांचव्या रोटरी कॉन्फरन्सचें उद्घाटन, बडोदें. ... ... ... ... | १९१ |

| क्रमांक | तारीख | प्रसंग | पान |
|---|---|---|---|
| ८० | ता. १४-२—१९३८ | प्राची रोड-कोडिनार रेल्वेचें उद्‌घाटन, कोडिनार. ... ... ... | १९५ |
| ८१ | ता. २३-२—१९३८ | राजसेवकांचीं कर्तव्यें, बडोदें. ... ... | १९९ |
| ८२ | ता. ४—३-१९३८ | नवसारी कॉटन ॲण्ड सिल्क मिल्सचें उद्‌घाटन, नवसारी. ... ... ... | २२३ |
| ८३ | ता. ११--४-१९३८ | ‘हिंदुस्थान आणि फार ईस्टमधील प्रसंग’ ह्या विषयावर मि. हावर्ड यांचें ईस्ट इंडियन ॲसोसिएशनपुढें झालेलें व्याख्यान, लंडन. ... | २२५ |

८८३८

दा. क्र. ५८५९

निबंध ८३२
२५१७५३८



**स्थळ:**—लंडन.

**काळ:**—ता. २४ ऑक्टोबर १८९२.

**प्रसंग:**—मॅन्शन हाउसमधील भोजन-समारंभ. ( ट्रिनिटि हाउसचे 'एल्डर ब्रेद्रेन' यांना मेजवानी. )

युअर रॉयल हायनेस,* लॉर्ड मेयर, लॉर्डस् आणि सभ्य स्त्री-पुरुष हो !

आपल्या आजच्या यजमानांनीं मोहक शब्दांत जें माझें आरोग्यचिंतन केलें त्याला आपण प्रेमानें संमति दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. ड्यूक ऑफ एडिंबरो यांचा संबंध आहे अशा एका प्रसंगीं हजर असणें हा मी विशेष तऱ्हेचा मान समजतों; कारण हिंदुस्थानचे राजेरजवाडे आणि प्रजाजन यांना हिंदुस्थानच्या भूमीवर ज्यांचें स्वागत करावयाचा मान प्राप्त झाला असे, राजघराण्यांतील पुरुषांपैकीं, ते पहिलेच राजपुरुष होत. शिवाय, प्रस्तुत प्रसंग हा ट्रिनिटि हाउसच्या ब्रेद्रेनच्या सन्मानार्थ आहे. त्यांनीं ग्रेटब्रिटनच्या आरमारी वर्चस्वाच्या परिपोषार्थ महत्त्वाची कामगिरी केलेली आहे. तेव्हां अशा प्रसंगीं हजर राहून ज्या आरमारी वर्चस्वामुळें पूर्वेला पश्चिमेच्या जवळ आणतां येणें बहुतांशीं शक्य झालें त्या वर्चस्वाबद्दल माझा आदरभाव व्यक्त करावा असें मला वाटणें साहजिक आहे.

लॉर्ड मेयर यांनीं बडोदें संस्थान आणि तेथील कारभार सर्वमान्य तत्त्वाप्रमाणें चालविण्याविषयीं मी जे अल्प प्रयत्न करीत आहे त्यांचा उल्लेख केला आहे. हा विषय असा आहे कीं, त्यावर मला फार सावधगिरीनें बोललें पाहिजे. हिंदुस्थानांतील संस्थानांचा कारभार चालविणें ही गोष्ट फार कष्टाची आहे, हें आपल्याला मान्य होईल. तेथील अडचणी इकडील मंडळींना अज्ञातच आहेत. तेव्हां जर स्वतःविषयीं बोलतांना मीं, बडोद्याच्या राजकारभारांत प्रगतिपर कल्पना याव्या आणि त्या वाढीला लागाव्या असा प्रमुख उद्देश मजपुढें ठेविला आहे असें म्हटलें, तर त्याबद्दल आपण मला आत्मप्रौढीचा दोष लावणार नाहीं अशी आशा आहे.

---

*ड्यूक ऑफ एडिंबरो

देशामध्यें आगगाडीचे रस्ते असणें हें प्रगतीला पोषकच होतें; प्रगति व रेल्वे यांचें साहचर्य असल्यामुळें माझ्या संस्थानांत मीं कांहीं रेल्वे-रस्ते बांधविले आहेत व आणखीहि कित्येक बांधविण्याचा माझा विचार आहे. तसेच गाडी-रस्ते आणि दवाखाने यांचा प्रसार करून बडोदें शहराच्या लोकांना पिण्यासाठीं पुरेसें स्वच्छ पाणी मिळण्याचीहि मीं व्यवस्था केली आहे. न्यायदानाच्या कामीं महत्त्वाचा भाग घेण्याची संधिहि मीं माझ्या प्रजाजनांना दिली आहे. परंतु या सुधारणा चिरस्थायी व्हावयाच्या असतील तर संस्थानांतील प्रजेनें, त्यांचीं मूलतत्त्वें नीट समजून घेऊन तीं आत्मसात् केलीं पाहिजेत. याचसाठीं प्रजेमध्यें सर्वसाधारण शिक्षणाचा प्रसार करण्याच्याहि योजना मीं अमलांत आणल्या आहेत. जें माझ्या प्रजेचें कल्याण आणि सुख तेंच माझेंहि कल्याण आणि सुख होय अशी माझी दृढ भावना आहे, आणि म्हणून माझ्या प्रजेच्या हिताकरितां जें जें कांहीं करणें शक्य आहे तें तें आनंदानें करणें हें मी माझें कर्तव्य समजतों.

बडोदें संस्थानामध्यें माझ्या प्रजेच्या भौतिक किंवा बौद्धिक प्रगतीकरितां चालू असलेल्या प्रयत्नांची लांबलचक यादी सांगून आपल्याला कंटाळविण्याची माझी इच्छा नाहीं. आणि जीं कांहीं थोडीं उदाहरणें सांगितलीं तीं देखील हिंदुस्थानांतील संस्थानांत कोणत्या प्रकारचें कार्य करण्यांत येतें तें दर्शवावें आणि समर्थ अशा ब्रिटिश राष्ट्राचें अनुकरण करून आमच्या संस्थानामध्यें लोकहितकारक कार्य करण्याच्या कामीं हिंदुस्थानांतील आणि इंग्लंडमधीलहि जबाबदार मुत्सद्द्यांकडून मिळणारी संमति आणि उत्तेजन यांचा कृतज्ञतापूर्वक निर्देश करावा एवढ्याचसाठीं होत.

## २

**स्थळः**—लंडन.

**काळः**—१० नोव्हेंबर १८९२.

**प्रसंगः**—गिल्ड हॉलमधील लॉर्ड मेयर यांची मेजवानी ( हिंदी आणि वसाहतींतील पाहुण्यांकरितां दिलेल्या 'टोस्ट'ला उत्तर. )

युअर रॉयल हायनेस, लॉर्ड मेयर, लॉर्डस् आणि सभ्य स्त्री-पुरुष हो !

या देशांतील औद्योगिक शहरें पाहण्याकरितां मीं जो छोटा प्रवास केला ते दिवस माझे अत्यंत आनंदांत गेले. तेथील साधनांची व संपत्तीची विपुलता पाहून माझ्या मनावर फार परिणाम झाला. केवळ आपल्या देशांत असलेल्या धनोत्पादक

साधनांचा शोध लावूनच इंग्लंडांतील लोक थांबले नाहींत, तर त्यांनीं आपल्या अंगच्या शहाणपणाच्या व बुद्धिमत्तेच्या जोरावर आपल्याला अनुकूल असलेल्या संधीचा लोकोत्तर उपयोग केला आहे. माझ्या एका अल्प आणि घाईच्या सफरीच्या शेवटीं आलेली ही मेजवानी म्हणजे त्या सफरीचा मोठा योग्य समारोपच होय असें मी समजतों.

या विस्तृत देशाचें लंडन हें केन्द्र आहे. लंडनची अफाट लोकसंख्या, तेथील भव्य संस्था एवढ्यांमुळेंच केवळ नव्हे तर तेथील जगड्व्याळ व्यापार आणि जगांतील मोठमोठे मुलूख जिंकून संपत्तीचा ओघ मातृदेशांत वळविणारे कर्तृत्ववान् असे नर-पुंगव अशांच्या अस्तित्वामुळें लंडनचें हें स्थान अचल असें आहे.

एवढा मोठा व्याप असल्यामुळें इंग्लंडचा कारभार ही गोष्ट अत्यंत परिश्रमाची, कष्टाची आणि जबाबदारीची होऊन बसली आहे, आणि ती मोठी जबाबदारी संभाळण्याच्या कामीं महाराणींच्या प्रधानमंडळाला—त्यापैकीं कांहीं आज मजसमोर दिसत आहेत—यश येवो असें मी चिंतितों. इंग्लंडचा कारभार चालवितांना इतक्या हितसंबंधांची दखल घ्यावी लागते आणि इतके महत्त्वाचे प्रश्न उत्पन्न होतात कीं, एवढ्या मोठ्या जबाबदारीची धुरा खांद्यावर वाहणाऱ्या माणसांना, विस्तार, लोकसंख्या आणि संस्कृति या सर्वांनींहि अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झालेल्या साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांत जें त्वरेनें व मोठ्या प्रमाणावर बदल चालू आहेत त्यांवर लक्ष ठेवण्यास थोडीदेखील फुरसत मिळणें कठीण वाटतें. या साम्राज्यांत अनेक राष्ट्रें, अनेक धर्म आणि अनेक पंथ यांचा समावेश झाला आहे, त्यामुळें त्यावर राज्य चालविणें मोठें कठीण झालें आहे. निरनिराळ्या घटकांच्या सर्व गरजा समजावून घेऊन, प्रत्येकाच्या आकांक्षांचा योग्य तो परामर्ष घेणें हें अशा परिस्थितींत सोपें नाहीं. अशा परिस्थितींत ब्रिटिश साम्राज्यांतील वसाहती व आधिनाती (Dependencies) यांना यथायोग्य प्रातिनिधिक आणि स्वयंशासित कारभाराचा लाभ देणें इष्ट वाटतें. कारण ही गोष्ट ब्रिटिश राष्ट्राच्या सर्वविश्रुत, उदार आणि स्वातंत्र्यप्रवण स्वभावधोरणाला धरूनच आहे, आणि साम्राज्यघटकांना क्रमशः स्वातंत्र्य देण्यानें केवळ ब्रिटिश सरकारचें काम हलकें होईल आणि सर्वत्र विखुरलेल्या महाराणीच्या प्रजाजनांचें सुख व समाधान राखलें जाईल येवढेंच नव्हे, तर ते निरनिराळे घटक समतेच्या जाणिवेनें एकमेकांकडे अधिकाधिक ओढले जाऊन साम्राज्याला अभिलषणीय बळकटी येईल.

माझ्या स्वतःबद्दल आपण केलेले उल्लेख खरोखर आपल्या प्रेमळपणाचे द्योतक आहेत. माझ्या राज्यांत बँका, रेल्वे, दवाखाने, विश्रांतीसाठीं धर्मशाळा, पूल, सार्वजनिक कचेऱ्या, शाळा इत्यादि बांधवून आणि वाङ्मयप्रसार, सार्वजनिक ग्रंथालयें,

राज्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्यें निवडणुकीच्या तत्त्वाचा प्रारंभ, गांवपंचायती, पिण्याजोग्या पाण्याची सोय इत्यादि लोककल्याणाच्या अनेक गोष्टी करून जर मीं कांहीं केलें असेल तर माझ्या हातीं असलेल्या साधनांचा सदुपयोग केला एवढेंच होय. जें कांहीं थोडें मी करूं शकलों तें हिंदुस्थान सरकारच्या सहानुभूतीमुळें आणि साहाय्यामुळेंच होय, आणि महाराणीसाहेबांविषयींची दृढतम राजनिष्ठा आणि प्रगतिपर शासनसंस्था निर्माण करण्याच्या कामीं माझ्या सामर्थ्यानुसार हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकाराशीं सहकार्य करण्याची तीव्र इच्छा यामुळेंच मला माझा मार्ग स्पष्ट दिसतो. बडेजाव आणि देखावा करण्याचा काळ आतां पार निघून गेला असून आतां शासनपद्धतीच्या तत्त्वांच्या श्रेष्ठपणाला आणि चांगुलपणाला महत्त्व आलें आहे. मी आणि माझ्या दर्जाच्या इतर संस्थानिकांची यामुळें आतां एवढीच इच्छा असते कीं, उपयोगी पडण्याचें आमचें क्षेत्र आकुंचित न व्हावें आणि आम्हांला प्राप्त झालेल्या संधीचा यथार्थ उपयोग करण्याचें आम्हांला अधिकाधिक स्वातंत्र्य मिळावें; आणि आम्हीहि वैयक्तिक महत्त्वाकांक्षा किंवा सुखकल्पनांच्या मागें न लागतां आमचें श्रेष्ठ असें प्रजानुरंजनाचेंच काम करावें.

## ३

**स्थळ:**—बडोदें.

**काळ:**—ता. ३० माहे मार्च सन १९०२.

**प्रसंग:**—श्रीमंत महाराजसाहेब यांच्या जन्मोत्सवाचा दरबार.†

आजच्या या शुभ प्रसंगीं एक आनंददायक कार्य करण्याचा आमचा एक उद्देश आहे. श्रीमंत उखाजीराव‡ काकासाहेब यांचा आजपावेतों सत्कार झालाच आहे. तरी पण ते एक आमच्या कुटुंबांत वडील आणि वयोवृद्ध असल्यानें त्यांच्या सन्मानांत जी कांहीं थोडी न्यूनता होती ती त्यांना लवाजमा, चोपदार वगैरे देऊन आज पुरी करतांना मला फार संतोष वाटत आहे.

---

† असा दरबार दर वर्षी स्वारी बडोद्यास असल्यास राजमहालांत भरतो. या प्रसंगीं प्रजेपैकीं सन्मानार्ह व्यक्तींचा चांद वगैरे देऊन सन्मानहि करण्यांत येतो व श्रीमंत महाराजसाहेब समयानुसार भाषणहि करितात.

‡ श्री. उखाजीराव काकासाहेब गायकवाड मृत्यु—तारीख १७ नोव्हेंबर १९१६.

८८३५
निबंध ८३२
ता. २५।१२।३
ठाणें.



अशा रीतीनें बहुमान करण्याला योग्य असे दुसरे गृहस्थ आमचे जुने नोकर माधवराव रामचंद्र फडणीस* आहेत. यांच्या घराण्याचा राजघराण्यांशीं पूर्वापार संबंध आहे. यांनीं पूर्वीं राज्याची पुष्कळ नेकीची आणि विश्वासूपणाची नोकरी केली आहे. यांची पण नोकरी या राज्यांत फार जुनी असून त्यांचें सौजन्य, समंजसपणा, नीतीचें वर्तन, तसेंच वयोवृद्धपणा वगैरे गुणांप्रीत्यर्थ त्यांचें अभिनंदन करून त्यांना खडी ताजिम, प्रथम पदवीचा चांद, तसेंच **राज्यकार्यधुरंधर** हा किताब देण्यांत येत आहे. यांच्या चांगल्या उदाहरणांचें अनुकरण करून दुसरे पण अशा मानाला पात्र होतील अशी आम्हांस उमेद आहे.

तिसरे गृहस्थ सरदार फाकडे¶ हे आहेत. यांच्या पूर्वजांनीं या राज्यांत ज्या मोठमोठ्या कामगिऱ्या केल्या आहेत त्या लोकांस माहीतच आहेत. त्यांचे मरहूम वडील बंधूंचा पूर्वीं मानमरातब चालू होता. हल्लींचे फाकडे अज्ञान असल्यानें त्यांना मान दिला नव्हता. ते आतां सज्ञान झाल्यानें त्यांना कांहीं मान नाहीं हें जाणून, त्यांची योग्यता पाहून, त्यांस आज छत्री मशाल देण्यांत येत आहे. आणि आतां पुढें ते जसजशी लायकी दाखवितील तसतसा त्यांचेसंबंधीं उत्तरोत्तर विचार करतां येईल. सन्मान दोन प्रकारचे असतात. वंशपरंपरागत आणि स्वतःचे अंगत. त्यांच्यांत पुढील वर्गाचे मान एखादे वेळेस कमीजास्ती करण्यांत येतात. त्याचा उद्देश दुसरा कांहीं नसून, फक्त लायकीची खरी कदर करून आणि चांगल्या गोष्टीला उत्तेजन देणें हेंच होय. त्यापासून कांहीं असमाधानकारक स्थिति मानण्याचें कारण नाहीं.

आतां केलेल्या भाषणांत आनंदराव पवार यांना जे थोडेबहुत मान देण्यांत आले त्यांचा उल्लेख करण्याचें बाकी राहिलें. पवार यांच्या घराण्याचा पूर्वेतिहास पुष्कळ लोकांस माहीत आहे. पवारांचें घराणें मराठ्यांच्या उच्च कुळांत गणलें जातें. आतां मी तुम्हांला ऐतिहासिक किंवा ग्रंथाच्या गोष्टी सांगण्याचें धारीत नाहीं. पूर्वीं जे परमार रजपूत होते असें सांगतात त्यांना आतां पवार म्हणण्यांत येतें, हें तुम्ही जाणतच आहां. तरी त्यांचें मोठें कूळ आणि त्यांचा आमच्या घराण्याशीं संबंध या गोष्टी ध्यानांत घेऊन त्यांचा आज थोडाबहुत सत्कार करण्यांत आला आहे. या बहुमानाचें मुख्य कारण सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. आणि तें हें कीं, पवार यांची नोकरी आमच्या सन्निध झाली आहे. ते यजमानापाशीं राहून संतोषकारक सेवा करतात. हें काम वाटतें तितकें सोपें नसून फार कठीण आहे. नोकराच्या अंगांत चांगले गुण असतील तरच त्याचे हातून चांगलें काम होईल. जवळ राहणारा

---

* श्री. माधवराव रामचंद्र फडणीस मृत्यु–तारीख २४ मे १९०३ रविवार.

¶ मे. मुगुटराव जोत्याजीराव शिंदे फाकडे.

मनुष्य कर्तव्यदक्ष, हुशार, चलाख असाच असला पाहिजे. तसें असून तो स्वतःची नोकरी बरोबर आणि वक्तशीर करील तरच यजमानाला सुख होईल. यजमान जसे हुशार असतील अथवा त्यांच्यांत गुणदोष असतील त्याप्रमाणें जवळच्या नोकरीच्या नोकरींत थोडी अथवा पुष्कळ जोखमदारी भरलेली असते. तरी अशा रीतीनें आमच्या सुखाकरितां निरंतर काळजी घेऊन काम करणारे असे पवारच आम्हांला मिळाले आहेत. त्यांना छत्री मशालीचा मान देण्यांत येत आहे. वास्तविक रीतीनें हा मान विशेष आहे असें नाहीं. मानकरी हा जो किताब आहे तो फार महत्त्वाचा आहे. मानकरी याचा अर्थ पूर्वी लष्करी पेशाचा होता. आतां जे मानकरी आहेत त्यांच्या पूर्वजांनीं मोठीं शौर्याचीं कामें केलीं आहेत. आज प्रसंग असता तर त्यांनीं देखील तीं कामें केलीं असतीं. तसा प्रसंग जरी आज नाहीं तरी पण असलेल्या क्षेत्रांत जे लोक संतोषकारक रीतीनें सेवा करतात, त्यांचा बहुमान करावा हें बरोबर आहे. परंतु आमच्या दुर्दैवानें अथवा आमच्यामध्यें कांहीं दोष असल्यास म्हणा, या बहुमानाला पात्र अशीं मनुष्यें आम्हांला फारशीं मिळून येत नाहींत. योग्य नोकराचा बहुमान करण्याला आम्ही फार उत्सुक आहोंत. तरी सर्व नोकर मंडळींनीं ही आमची इच्छा ध्यानीं घेऊन उत्तरोत्तर पुष्कळ बहुमान मिळविण्याकरितां प्रयत्न करावा. तसें करून स्वतःच्या नोकरीचें चीज झालेलें पाहून त्यांच्याप्रमाणेंच आम्हांला पण संतोष होईल अशी आम्ही उमेद ठेवितों.

## ४

**स्थळः**—बडोदें.

**काळः**—ता. ७ माहे मार्च सन १९०४.

**प्रसंगः**—रंगपंचमी आणि श्रीमंत महाराजसाहेब यांच्या जन्मोत्सवाचा दरबार.

दिवाणसाहेब आणि सभ्य गृहस्थ हो !

आजच्या प्रसंगीं विशेष कांहीं बोललेंच पाहिजे असें नाहीं, तरी पण कित्येक मंडळींस बहुमान देण्याचा माझा इरादा असल्यामुळें त्यासाठीं चार शब्द मी बोलणार आहे. किताब वगैरे देण्याचा मुख्य हेतु काय आहे हें बहुतांस माहीत आहेच. तथापि सामान्य समाजांत ही बाबत बरोबर समजणारांचा अभाव दिसतो.

बहुमान अगर चांद ( Decoration ) वगैरे देण्याचा उद्देश असा आहे कीं, लोक निरनिराळ्या प्रसंगीं जीं चांगलीं कामें करितात त्यांना उत्तेजन दिलें पाहिजे म्हणजे त्यांची प्रवृत्ति निरंतर अशींच कामें करण्याकडेस साहजिकच वळते. यजमान स्वतःच्या नोकरीची बूज ठेवूं लागल्यास नोकरास संतोष होऊन तो आपल्या स्वतःच्या कर्तव्यास निरंतर जागेल हें साहजिकच आहे.

अशा रीतीनें यजमानानें नोकरांची बूज राखण्याचे अनेक प्रकार आहेत. लोकांची ज्ञानशक्ति कमी असल्यास त्याप्रमाणें मार्ग बदलणें भाग पडतें. राष्ट्र-स्थितीचा यावर कसा परिणाम होत आहे त्याचें वर्णन या ठिकाणीं करण्याची जरूरी दिसत नाहीं. यासंबंधीं मुख्य ध्यानांत ठेवण्याची गोष्ट ही आहे कीं, याप्रमाणें जो मान देण्यांत येतो त्याची योग्यता त्याच्या किमतीवर किंवा पैशावर समजावयाची नाहीं. पण मान देणाराच्या उद्देशाकडे पाहिलें पाहिजे. सध्यांच्या देशस्थितींत लोकांचें लक्ष आपल्या फायद्याकडे किंवा पैशाकडे विशेष आहे. हें जरी साहजिक आहे तरी पण केवळ स्वार्थाकडे लक्ष देणें, हें चांगलें नव्हे. व त्याचप्रमाणें प्रत्येक इसमानें आपल्या कामगिरीबद्दल आपली बूज झालीच पाहिजे, हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. कोणी विशेष प्रसंगीं विशेष काम केल्यास त्यास उत्तेजन मिळणें रास्त आहे. परंतु एखाद्या चांगल्या कामाची बूज वेळीं न झाल्यास त्याबद्दल खेद मानून नाराज होणें हेंहि बरोबर नाहीं. शिवाय हा बहुमान कालमानास अनुसरून होत असतो. पूर्वीं लोकांना जहागिरी मिळत असत. त्याप्रमाणें आज मिळत नाहींत. त्यामुळें कोणांस वाईट वाटणार नाहीं. कारण हा सर्व विचार समाजस्थितीप्रमाणें करावयाचा आहे. पूर्वीं मुसलमानी राज्यांत जे लोक विशेष शौर्य दाखवीत होते किंवा कांहीं महत्त्वाचीं कामें करीत होते, त्या वेळीं त्यांस जहागिरी, नेमणुका, गांव, हत्ती, घोडे, वगैरे बक्षीस देण्यांत येत होतें. नंतर मराठी राज्य झाल्यावरहि हा रिवाज बहुतेक चालू होता. परंतु तूर्त स्थिति बदलली आहे. त्यांत ज्या ठिकाणीं शांतता आहे त्या ठिकाणीं हा बहुमान देण्याच्या पद्धतींत स्वाभाविकपणें पुष्कळ फेरफार झालेला आहे. कारण प्रत्येक बाबतींत कालमानाप्रमाणें फेरफार व्हावयाचाच. आपल्या शरीराचें उदाहरण घ्या. त्यांत जर दर पांच मिनिटांस फरक होत आहे, तर इतर बाबतींत फरक होईल यांत आश्चर्य तें काय ?

आजच्या प्रसंगीं कांहीं चांद, हत्ती आणि पोषाख देण्याचे आहेत.

पहिलें बक्षीस संपतराव गायकवाड यांस देण्यांत येत आहे. संपतराव यांचा आणि आमचा संबंध सर्वांस माहीत आहेच. लहानपणापासून विद्येविषयीं त्यांची प्रीति, निःस्पृह स्वभाव, याचा विचार केला असतां असें वाटतें कीं, त्यांचे स्वतंत्र विचार, अनुभव आणि दृढनिश्चय हे जसजसे वाढत जातील, तसतसे ते लोकादरास

अत्यंत पात्र होतील. यांनीं लग्नसंबंधीं$ कामगिरी उत्तम रीतीनें पार पाडली व इतर मंडळींनींहि त्यांस योग्य मदत केली, हें त्यांस भूषण आहे. त्यांचीं नांवें संपतराव स्पष्ट रीतीनें आमच्यापुढें आणतीलच. सर्वांपासून योग्य कामें घेऊन, लग्नाची कामगिरी मोठया दक्षतेनें पार पाडली यासाठीं त्यांस एक हत्ती आणि एक चांद देण्यांत येत आहे.

दुसरें बक्षीस देण्याचें तें नरसिंगराव राजे घोरपडे यांस देण्याचें आहे. सर्वांना माहीत आहे कीं, या घोरपडे घराण्याशीं आमचा संबंध मोठे सयाजीराव महाराज† यांजपासून चालत आलेला आहे. नरसिंगराव यांनीं मजबरोबर इंग्लंडची मुशाफरी केल्यापासून, त्यांचा व माझा चांगला परिचय झालेला आहे. त्यांचा स्वभाव चांगला असून, वर्तणूक पोक्तपणाची आहे असें मला वाटतें. आणि वयाप्रमाणें त्यांचा अनुभव व समजूत जसजशी वाढत जाईल, तसतशी त्यांची योग्यता वाढून, ते आम्हांस योग्य मदत देतील अशी आशा आहे. कारण अशा सरदार मंडळींनीं स्वतः योग्य कर्तव्य करून यजमानाचें सौख्य वाढविण्यास लक्ष दिलें पाहिजे. राज्य शांततेनें चालावें, राज्यकर्त्यांचे हेतु चांगले रीतीनें पार पडावे आणि यजमानाच्या सुखाची वृद्धि व्हावी, या गोष्टी सरदार लोकांनीं लक्षांत ठेवण्याजोग्या आहते. या सृष्टीमध्यें प्रत्येकाच्या कामगिरीबद्दलचा मोबदला त्यास मिळत आहे, असें नाहीं. सत्कृत्य करावें हेंच त्याचें मुख्य बक्षीस आहे आणि मनुष्य प्राणी सर्वदा सत्कृत्य करण्यासच योग्य आहे. कित्येकांना आपल्या मेहनतीची बूज होत नाहीं असें वाटतें. मनुष्य चुकीस पात्र आहे, पण ईश्वर सर्वांना पाहात आहे. आणि त्याच्याजवळ सर्वांची कामगिरी हजर होत आहे, त्यांतच प्रत्येकानें सुख मानून घेतलें पाहिजे. पण असा विचार करणारे मनुष्य थोडेच निघतील. असो. घोरपडे यांस एक हत्ती आणि एक चांद देण्यांत येत आहे.

अवचितराव गायकवाड* यांचा प्रेमळ स्वभाव सर्वांस माहीत आहेच. यांस आज पोषाख देण्यांत येत आहे.

---

$ कै. श्री. युवराज फत्तेसिंगराव यांचा विवाह ता. ४ फेब्रुवारी सन १९०४.

† गायकवाड व घोरपडे यांचें शरीरसंबंधाचें नातें आहे.

* श्री. अवचितराव काकासाहेब, मृत्यु – ता. २ माहे मार्च सन १९२१

[library stamp]

## ५

**स्थळः—पुणें.**

**कालः—ता. ११ माहे जून सन १९०४.**

**प्रसंगः—न्यू स्कूलला भेट.**

मुलांनो ! विद्येचा महिमा मोठा आहे. पण नुसतें लिहितां वाचतां येणें म्हणजे विद्या नव्हे. तर जिनें कार्यकारणांचा योग्य संबंध कळतो, सामाजिक, राजकीय धार्मिक, औद्यागिक स्थितीची व आपली दुरवस्था कळून, ती अशी कां याचीं कारणें शोधून काढतां येतात, आणि सर्व विषयांचा न्यायानें व समतेनें विचार करण्याची पात्रता येते, तीच खरी विद्या. ही विद्या तुम्ही आपलीशी करा. तुमच्या शिक्षकांकडे पाहा. हे उत्तम विद्वान् आहेत. त्यांनीं स्वतःच्या सुखास लाथ मारून आणि पोटांस चिमटा घेऊन हें विद्यादानाचें पवित्र व्रत चालविलें आहे. त्यांचा कित्ता गिरवा.

आपण लोक फार स्वार्थी आहोंत. स्वार्थ टाकून परमार्थ साधावयास आपणांस अद्यापि शिकावयाचें आहे. त्यागाचा धडा आपणांस गिरवावयाचा आहे. आपण होतों कसे, आज आहोंत कसे, आणि तसे कां आहोंत, यास आपला आप्पलपोटेपणा, मत्सर व आपसांतील दुही कशी कारण झाली आहे, याचा विचार तुम्हीं केला पाहिजे. तो विद्येनें तुम्हांस करतां आला पाहिजे.

युरोपकडे पाहा. तेथील लोक जसे पुढें गेले, तसें आपणांस जावयाचें आहे. पण त्यासाठीं खरा कार्यकारणभाव समजावयास लागलें पाहिजे. ही विद्या एकाच व्यक्तीला किंवा वर्गाला, फार तर काय पण एकाच समाजालाहि मिळून फायदा नाहीं. ती सार्वत्रिक असली पाहिजे, तरच आपलें पाऊल पुढें पडणार आहे. हें लक्षांत वागवा. सर्व राष्ट्राचा उत्कर्ष पाहिजे आहे. तो एका वर्गानें किंवा एका समाजानें साधणार नाहीं. लहानापासून थोरापर्यंत सर्वच विद्या शिकलेले होतील, असें करण्यास तुम्हीं झटलें पाहिजे, तरच राष्ट्र पुढें जाईल.

जातिभेद देवकृत नाहीं, मनुष्यकृत आहे. तो परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणें गुण-कर्मावर खरोखरच असल्याचा अनुभव पाहिजे. नुसती बडबड नको. जन्मानेंच कोणी मोठा नाहीं, हें तुमच्या मनांत वागलें पाहिजे. खेड्यापाड्यांतून सुद्धां हें विद्या-प्रसाराचें काम अव्याहत व सुव्यवस्थित रीतीनें चाललें पाहिजे. आपल्या देशांत महारांपोरांपासून तों अगदीं वरच्या पायरीपर्यंत कार्यकारणभाव समजेल तर आपला

ऊर्जितकाळ जवळ आला आहे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. तुम्ही एकलकोंडेपणा किंवा आप्पलपोटेपणा मनांत ठेवूं नका. आपल्या स्वार्थत्यागी गुरूंचाच कित्ता वळवा. सर्व वर्गांचा, सर्व राष्ट्राचा, अभ्युदय कसा होईल या विचारास लागाल तरच तुम्हांस खरी विद्या प्राप्त झाली आहे, असें मी समजेन.

## ६

**स्थळ:**—बडोदें.

**काळ:**—ता. २० माहे फेब्रुवारी सन १९०७.

**प्रसंग:**—श्री. महाराजा मिलचा उद्‌घाटनसमारंभ.

श्री. लालशंकर, मिलचे भागीदार आणि सद्‌गृहस्थ !

आज येथें भाषण करण्याचा माझा विचार नव्हता; पण या प्रसंगीं जरूर म्हणून मी थोडक्यांत माझे विचार सांगणार आहें. प्रथम ही गिरणी सुरू केल्याबद्दल श्री. लालशंकर आणि श्री. हरगोविंददास यांचें मी अभिनंदन करतों व त्यांच्या प्रयत्नांना यश यावें असें इच्छितों. या कामीं शक्य ती मदत मी आनंदानें करीन, व सरकारला जी मदत करतां येईल ती तें नेहमीं तात्काल करीत जाईल, याची खात्री बाळगा. ही सरकारी मदत मिळविण्याची खटपट गिरणीचे हितचिंतक करतील अशी मला आशा आहे.

श्री. मगनलाल यांनीं आपल्या अहवालांत सरकारी मदतीसंबंधानें जो उल्लेख केला त्याची पुनरुक्ति करून आपला वेळ घेत नाहीं. व्यापार हें एक शास्त्र असून तें कोणत्या नियमांनीं चालतें यासंबंधीं पण वेळेच्या अभावीं बोलत नाहीं. दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं मी त्यावर बोलेन. हें व्यापारी शास्त्र आणि त्याचे सिद्धांत नुसतें समजून चालत नाहीं तर त्यांची अंमलबजावणी व्हावी लागते. या गिरणीचे व्यवस्थापक आणि चालक तिच्या व्यावहारिक प्रगतीकडे जास्त लक्ष देतील अशी मी आशा करतों.

या प्रसंगीं येथें स्थापन व्हावयाच्या बँकेसंबंधीं थोडें सांगितलें पाहिजे. या बँकेविषयीं आपण निःपक्षपातीपणानें विचार करून, तिच्या उत्कर्षासाठीं शेअर खरेदी करून व अन्य रीतीनें मदत कराल अशी मी आशा बाळगतों. ही बँक सरकारच्या फायद्यासाठीं नसून लोकांच्या फायद्यासाठीं आहे. या बँकेपासून सरकारला कर्ज

८८३५

मिळावें असा ती स्थापण्यांत हेतु नाहीं. कर्ज काढण्याइतकी सरकारची स्थिति आलेली नाहीं, याची खात्री बाळगा. सरकारी देखरेखीखालीं चालणारी संस्था चांगली चालत नाहीं म्हणून तर या बँकेची सगळी व्यवस्था तुमच्या हातीं देण्यांत येत आहे. बँकेपासून व्यापाराला पैसा मिळत जाऊन आपलें हित होईल, या बुद्धीनें आपण या बँकेच्या उत्कर्षाला मदत कराल अशी मला आशा आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
निबंध ६३७
ता. २-८-१९४३

## ७

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. ५ माहे मार्च सन १९०७.

**प्रसंग:**—श्रीमंत महाराजसाहेब यांचा रौप्य महोत्सव.

आजच्या या समारंभाच्या प्रसंगीं तुम्हीं जें माझें अभिनंदन केलें, त्याबद्दल तुमचे उपकार मानावे तितके थोडेच आहेत. तुमचे मानपत्रांत सरळ, शोभिवंत आणि गौरवपर भाषेंत जी प्रीति आणि मनाची भावना दर्शविली आहे, त्यामुळें माझें अंतःकरण भरून आलें आहे; आणि त्याचें उत्तर देण्याला पुरेसे शब्द माझे-जवळ नाहींत. तरी पण माझे थोडेबहुत विचार येथें मांडतों.

पंचवीस वर्षांपूर्वीं जें मीं सांगितलें होतें, तें बरोबर पाळलें गेलें, त्याविषयीं तुम्हीं उल्लेख केला. त्यासंबंधांत मला मात्र एवढेंच सांगावयाचें आहे कीं, तुमचे कल्याणाकरितां हरएक प्रयत्न करण्याचा माझा धर्म होता आणि तो बजाविण्या-करितां मी बनेल तेथपावेतों प्रयत्न करीत आहें, व त्याप्रमाणें आतां पुढें देखील मी करीन. सरकारी, त्याप्रमाणेंच प्रजेला लागणारें कांहीं एक कार्य करण्यापूर्वीं तें चांगलें किंवा वाईट याची खात्री करून घेणें मी माझें कर्तव्य समजतों. प्रजेचें कल्याण हेंच माझें कर्तव्य आणि तोच माझा मोक्ष हा माझा सिद्धांत आहे. आणि त्याला चिटकून राहण्यामध्येंच मला आनंद वाटतो. सध्यांच्या माझ्या कर्तव्यांत अजून पुष्कळ न्यूनता राहिली आहे. ती दूर करण्याकरितां अनुकूल प्रसंग मी शोधीत राहीन आणि ती न्यूनता दूर झालेली जेव्हां पाहीन, त्या वेळेसच मला संतोष वाटेल. माझ्या कामांत माझे अंमलदार तसेच प्रजाजन यांनीं मदत दिली आहे आणि ते पुढें भावी काळांत पण माझ्या बाजूला राहतील, अशी माझी खात्री आहे. राजा आणि प्रजा या दोघांचें कल्याण एकच आहे आणि तें एकमेकांपासून

निराळें समजणारे मोठी चूक करतात. प्रजेच्या कल्याणापेक्षां राजाचें कल्याण निराळें आहे अशा समजुतीनें दोघांचें अकल्याण होत असतें. परंतु त्या दोहोंला एक समजणारे दोहोंचें कल्याण करूं शकतात.

माझ्या राज्यकारभारांतील सुधारणेसंबंधीं जे जे उल्लेख तुम्हीं केले आहेत, त्यासंबंधांत मी जितकें बोलेन तितकें थोडेंच आहे. न्याय आणि अंमलबजावणी खातें निराळें पाडण्याचा उद्देश, प्रजेला न्याय मिळण्याची सोय वाढविण्याचा आहे. आणि या योजनेनें प्रजेची सोय व सुलभता वाढते, हें पाहून मला आनंद होतो. प्रजेचें हित शहाण्या लोकांच्या हातानें करविण्याच्या हेतूनें मीं ग्रामपंचायत, तालुकापंचायत आणि प्रांतपंचायत स्थापन केलेल्या आहेत. यामुळें लोक स्वतःची जबाबदारी अंगावर घेऊं शकतील आणि प्रजेस संतोष मिळेल. प्रजाकीय खात्यांत अजून सुधारणा व्हावी अशी माझी इच्छा आहे. माझ्या कामांत ज्या चुका तुमच्या दृष्टीस येतील त्याविषयीं तुमचा असा धर्म आहे, कीं त्या तुम्हीं मला दाखवाव्यात आणि त्यासंबंधीं सूचना कराव्यात. त्यांत मी प्रजेचा दुराग्रह किंवा खोटा हट्ट म्हणून समजणार नाहीं. तर अशा चांगल्या सूचनांबद्दल मी त्यांचे उपकारच मानीन.

रेल्वे आणि तलावाचीं बांधकामें कित्येक ठिकाणीं हातीं घेण्यांत आलीं आहेत. या बांधकामांपासून जर चांगले परिणाम झाले, तर तीं ह्यापुढें पुष्कळ वाढविण्याची माझी उमेद आहे. कारण कीं दुष्काळाच्या काळांत अशीं बांधकामें फार उपयोगी आणि अनुग्रहरूप होऊन राहतात. परदेशगमनासंबंधीं माझें असें सांगणें आहे कीं, तें विद्यावृद्धीप्रीत्यर्थ अति जरूरीचें आहे. आणि त्याशिवाय विद्येची वृद्धि बरोबर होऊं शकणार नाहीं. विद्येचा अर्थ मात्र वाचन किंवा पुस्तकी अभ्यास, असा करावयाचा नाहीं. त्याची संपूर्ण व्याख्या या प्रसंगीं देतां येणें शक्य नाहीं. परंतु त्यामध्यें परदेशगमन करणें, चांगल्या लोकांची ओळख करून घेणें आणि त्यांच्या चांगल्या वर्तनांचें अनुकरण करणें, यांचा समावेश झाला पाहिजे. या जगांत खरें सुख विद्येंतच आहे; आणि ती विद्या संपादन करण्याच्या कामीं जीं जीं साधनें मीं तुम्हांला दिलीं आहेत, त्यांचा लाभ तुम्हीं पुरता घ्यावा. जर तुम्ही हा लाभ घ्याल, तर तुम्ही या राज्याच्या फौजेपेक्षां देखील मजबूत असे राज्याचे आधारस्तंभ व्हाल.

सक्तीच्या शिक्षणाचें जें धोरण मीं आंखून दिलें आहे तें यशस्वी होण्यासाठीं व त्याप्रीत्यर्थ जो खर्च करण्याचें मीं ठरविलें आहे– त्याचा मोबदला मला दुसऱ्या कोणत्याहि कामांत मिळाला नाहीं तरी चालेल,– त्याचा मोबदला मला पूर्णपणें मिळण्यासाठीं प्रजेनें मला मदत केली पाहिजे. ती मदत अशी कीं, दरेक आई-बापांनीं आपल्या मुलांना सरकारनें भाग पाडल्याप्रमाणें फक्त तिसऱ्या इयत्तेपर्यंत न शिकवितां, निदान पांचव्या इयत्तेपर्यंत त्यांचा अभ्यास करवावा. जर याप्रमाणें होईल

तर माझ्या मेहनतीचें फळ मिळेल, नाहीं तर सर्व व्यर्थ जाण्याचा संभव आहे. तरी माझ्या हयातींत, तसेंच पश्चात् हें महान् कार्य चालविण्याचें प्रजेच्याच स्वाधीन आहे.

मुलींनीं देखील तितकाच अभ्यास करणें जरूर आहे. सांसारिक रीतिरिवाजांमुळें वाटेल त्या अडचणी येत असल्या तरी, त्या दूर करून, दरेक मुलीचा निदान पांचव्या इयत्तेपर्यंत अभ्यास पुरा करविण्याची तुम्हीं उघड हिंमत दाखवावी.

केवळ बडोद्यासाठीं नाहीं, परंतु सर्व हिंदुस्थानासाठीं जे विचार मी दर्शवितों त्यांतच बडोद्याच्या हिताचा समावेश झाला आहे. सर्व देशाच्या हितांत त्याचा देखील समावेश होतो. आपल्या कामामुळें लोकांचें नुकसान न होतां फायदा होईल, याविषयीं आपण काळजी ठेविली पाहिजे. आपलें राज्य जरी लहान आहे, तरी स्वतःचा गुण आणि शक्ति यांच्या मदतीनें लोकांवर अशी छाप बसविली पाहिजे, कीं त्यामुळें लोक आपल्या राज्याला एक आदर्शरूप समजतील. समाजाचा मोठेपणा त्याच्या विस्तारांत नाहीं, तर त्याचे गुण आणि नीति यांमध्यें आहे.

ग्रीस आणि अशीं दुसरीं राज्यें विस्तारानें बडोदें राज्यापेक्षां लहान असतांना देखील त्यांनीं स्वतःचे गुण व विवेकशाली वर्तन यामुळें सर्व दुनियेंत नांव काढलें. त्यांचा धडा गिरवून आपण आपले गुण आणि शक्ति यांचा उपयोग करून, दुसऱ्यावर छाप बसविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

माझ्या राज्यांत माझ्या कारकीर्दींत मी जें कांहीं करूं शकलों, त्याची वाहवा करण्यासाठीं हें संमेलन नाहीं. परंतु आपल्या पूर्वीच्या अमदानी सुधारून पुढें जास्त यशस्वी होण्याचा प्रयत्न करतां यावा, असा त्याचा अर्थ आहे.

यानंतर दुसरी बाबत अशी आहे कीं, जें कांहीं काम होऊं शकेल, त्याची कदर करण्याची शक्ति हिंदवासीयांत आहे, हें तुम्हीं आजच्या समारंभावरून दाखविलें आहे. त्यामुळें मला पूर्ण उत्तेजन मिळेल. शेवटीं मी परमेश्वराची अशी प्रार्थना करितों कीं, त्या परम कृपाळू परमेश्वरानें मला तुमचें जास्त हित करण्याची अशी शक्ति द्यावी, कीं ज्या योगें माझें कार्य पुढें चालूं शकेल.

८

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. २४ माहे ऑक्टोबर सन १९०९.

**प्रसंग:**—मराठी साहित्य-संमेलन.*

सभापति आणि सज्जन हो !

आजच्या प्रसंगीं भाषण करण्याचा माझा विचार नव्हता, परंतु आतांपर्यंत बोललेल्या अनेक वक्त्यांनीं जो माझ्या नांवाचा उल्लेख केला, व माझे आभार मानिले, त्यामुळें त्याला उत्तर दिल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. मी जी मराठीची अल्प सेवा करतों, ती प्रांतिक दृष्टीनें करीत नाहीं. भाषा ही मनुष्याच्या आणि समाजाच्या प्रगतीची तसबीर आहे. ती एक साधन आहे. नीतीचा, ज्ञानाचा व राष्ट्राचा उत्कर्ष होणें, हें तिचें साध्य आहे. कोणत्याहि राष्ट्राची स्थिति त्याच्या भाषेवरून व्यक्त होते. ती स्थिति जाणावयाची असेल, तर त्याची भाषा पाहावी लागते. भाषेचें शास्त्र फार उपयोगी असून मोठें विस्तृत आहे. भाषा हें केवळ साध्य समजून, नुसत्या शब्दपांडित्याला आपण भुलून जातां कामा नये. भाषा ही उदात्त विचार व उत्कृष्ट कल्पना यांचा प्रसार करण्याचें एक साधन आहे. आजच्या संमेलनासारखें समारंभ वरचेवर झाले पाहिजेत आणि भाषेच्या द्वारें देशाची उन्नति करण्याचें काम झालें पाहिजे. डॉक्टर रा. गो. भांडारकर व रा. ब. चिं. वि. वैद्य यांच्या भाषणांचा विचार करतां, असें दिसतें कीं, भाषेमध्यें कालानुरोधानें भेद झाला तरी चालेल; परंतु उद्दिष्ट अर्थ बरोबर व्यक्त करण्यास, ती समर्थ झाली पाहिजे. होतां होईतों भाषा व्याकरणशुद्ध राखावी, ही डॉ. भांडारकरांची सूचना फार महत्त्वाची आहे.

देशी भाषेचा प्रवेश विश्वविद्यालयांत व्हावा अशी रा. ब. वैद्य यांची सूचना आहे. माझेंहि मत तसेंच आहे. देशी भाषांच्या द्वारें शिक्षण देण्याचा उपक्रम युनिव्हर्सिटी कधीं करील ती करो; पण आम्हीं तशी सुरुवात केली पाहिजे. देशी भाषा सर्वांस समजतील अशा सुलभ आहेत. त्यांच्या द्वारें नीति व धर्म यांचे

---

* यापूर्वी या संमेलनास मराठी ग्रंथकारांचें संमेलन असें नांव होतें, तें बदलून बडोद्यासच मराठी साहित्य-संमेलन असें व्यापक नामाभिधान देण्यांत आलें. कर्नल कीर्तिकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते.

विचार प्रसृत केले पाहिजेत. तथापि एतद्देशीय भाषांचा प्रसार करण्यांत त्यांची जननी जी संस्कृत भाषा, तिला मात्र कमीपणा येऊं देतां कामा नये. आपल्या उन्नतीचा पाया संस्कृत ग्रंथांत आहे. संस्कृत भाषेचें सौंदर्य ज्यास कळलें आहे, तो त्या भाषेस वाङ्मयमालिकेंत दुसरें स्थान कधींहि देणार नाहीं. पण सध्यांच्या काळीं सर्वांस कळेल अशी भाषा आपणांस पाहिजे. देशी भाषा सर्वांस कळतात. निरनिराळ्या भाषांतील सुंदर विचार सर्वांस कळावे, म्हणूनच देशी भाषांची उन्नति केली पाहिजे. आणि त्यास आमचे विद्वद्वर्य डॉ. भांडारकर विरुद्ध असतील असें मला वाटत नाहीं. भाषेचा प्रश्न बिकट आहे. भाषेचा केवळ स्थानिक दृष्ट्या किंवा प्रांतिक दृष्ट्या विचार न करतां, तिच्या साहाय्यानें सर्व राष्ट्राचा कसा उत्कर्ष होईल, या दृष्टीनेंच विचार केला पाहिजे. भाषेचें महत्त्व लोकांत प्रेमाची वृद्धि करण्यासाठीं विशेष आहे. या मराठी भाषेच्या प्रसंगानें जी ही आपली सर्वांची भेट झाली, ती *शेवटची नसावी. डॉ. कीर्तिकरांसारखे विद्वान् अध्यक्ष व आपण लांबून येऊन, येथें दोन दिवस जी भाषेची सेवा केली, त्याबद्दल मी आपले आभार मानतों. असे विद्वान् येथें आल्यानें आम्हांस मोठा फायदा झाला आहे. पुढच्या वर्षी गुजराती साहित्य-संमेलन येथें बोलावण्याची माझी मनीषा आहे. त्या वेळीं आपणहि येथें यावें, अशी माझी इच्छा आहे. आपल्या देशाची ऊर्जित दशा कशी होईल, याचा विचार सदैव लक्षांत बाळगा. उद्यां येथें सर्व हिंदुस्थानची एकभाषा करण्यासंबंधानें विचार व्हावयाचा आहे, तोहि या बाबतींत महत्त्वाचा आहे. तेव्हां आपण सर्व या कामीं योग्य मदत कराल अशी इच्छा दर्शवून, आणि आपण माझ्याविषयीं जें प्रेम दाखविलें, त्याबद्दल पुन्हा एकदां सर्वांचे आभार मानून, मी आपलें भाषण पुरें करितों.

## ९

**स्थळ:**— बडोदें.

**काल:**—ता. २९ माहे ऑक्टोबर सन १९०९.

**प्रसंग:**—पोटजातींचें एकीकरण.

मी या विषयावर दोन शब्द बोलत आहें, ते त्याच्या सर्वव्यापीसंबंधानें नसून, केवळ त्याच्या उपायासंबंधानेंच बोलत आहें. हें मी राजा या नात्यानें येथें

*या इच्छेनुसार पुनः सन १९२१ सालीं बडोद्यास दहावें साहित्यसंमेलन भरविलें होतें.

बोलत नसून, माझे विचार काय आहेत, अथवा माझें मत या बाबतींत कसें आहे हें आपणांस समजावें, हाच येथें बोलण्याचा माझा हेतु आहे.

आजचा विषय मुख्य जाती एक करण्याचा नसून पोटजातींच्या एकीकरणाचा आहे हें एक प्रथम लक्षांत घेतलें पाहिजे. दुसरी गोष्ट ही कीं, सुधारणा लोकांचें मन वळवून झाली पाहिजे. ती मिलिटरीच्या साहाय्यानें किंवा पोलिसाच्या सक्तीनें होणें शक्य नसतें. सक्तीनें सुधारणा होईल, असें प्रतिपादणारांना जगाची माहिती नाहीं अथवा ओळख पटली नाहीं, असेंच म्हणावें लागेल. रा. ब. वैद्य यांचेंहि म्हणणें अशी सुधारणा जुलुमानें करावी असें नाहीं. जुलूम करून सामाजिक सुधारणा केल्याचीं उदाहरणें इतिहासांत आहेत; परंतु त्यापासून कायमचा फायदा झालेला नाहीं. रोमचा किंवा मुसलमान लोकांचा इतिहास वाचून पाहिला असतां, अशा प्रकारें जुलुमानें सुधारणा करण्याचा यत्न केल्यापासून किती नुकसान झालें, याचा आपणांस दाखला मिळणार आहे. अशा गोष्टी लोकांचें मन वळवून व खात्री पटवूनच (persuation & conviction) झाल्या पाहिजेत.

समाज (society) हा एक विशिष्ट रचनात्मक प्राणी (organism) आहे. त्याला वाढ आहे व त्यास मनुष्याप्रमाणें तीन स्थिति आहेत : बाल्यावस्था (infancy), तारुण्य (youthfulness) व वार्धक्यावस्था (old age). कोणतीहि सुधारणा सुरू करण्यास कोणते इलाज केले पाहिजेत हें समाजाच्या स्थितीवर व तिच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. लहान मुलांस दुरुस्त करणें असेल तर त्याच्या योग्यतेनुरूप इलाज योजिले पाहिजेत. वयोवृद्ध व समंजस मनुष्यास दुरुस्त करणें असेल, तर त्याच्या समजुतीप्रमाणें निराळे इलाज केले पाहिजेत. हेंच धोरण योग्य फेरफारानें समाजासहि लावावयाचें आहे.

शास्त्रीबुवा* असें बोलले कीं, सर्व लोकांचें एक मत करून सामाजिक सुधारणा कराव्यात. यासंबंधानें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, साधारणतः कोणत्याहि बाबतींत सर्वांचें एकमत होणें शक्य नाहीं. असा, सर्वांचें एकमत असणें हा, प्रकार प्राचीन अगर अर्वाचीन इतिहासांत सांपडणार नाहीं. असें असतें तर बुद्ध अगर शंकराचार्य अशा विभूतींची आवश्यकताच पडली नसती; व त्यांच्या कृत्यांबद्दल त्यांस दोष देण्याची किंवा त्यांची स्तुति करण्याची आवश्यकताच न राहती. शंकराचार्य व गौतम बुद्ध यांनीं ज्या सुधारणा केल्या, त्या ज्ञानसामर्थ्यानेंच केल्या. बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर या महापुरुषांनीं समाजावर आपलें वजन पाडलें व लोकमताचा ओघ आपल्याकडे वळवून घेऊन इष्ट ती क्रांति घडवून आणली. सर्वांचें एकमत होणें शक्य असतें तर आपण

---

* वे. मू. छोटूमहाराज हे एक विद्वान् नैयायिक बडोद्यास होऊन गेले.

ज्या इंग्लंड व जर्मनी वगैरे देशांच्या सुधारणांचें अनुकरण करीत आहोंत तेथील पार्लमेन्ट ( Parliament ) वगैरेसंबंधानें अल्पसंख्याक लोकांचें ( minority ) काय करावें, यासंबंधानें लोकांपुढें जो सध्यां प्रश्न आला आहे तो अस्तित्वांतच आला नसता.

कोणतीहि सुधारणा अमलांत आणण्यास कोणी तरी मार्गदर्शक होतो. मग तो एक व्यक्ति असो किंवा अनेक व्यक्ति असोत. पहिल्यानें जो मनुष्य पुढाकार घेतो त्यास दुःख, त्रास, लोकनिंदा वगैरे सहन कराव्या लागतात व हळूहळू तो बुद्धिबलानें लोकांस आपलेसे करून, स्वतःचे विचार समाजांत प्रचलित करतो. अशा पुढाऱ्याचें उदाहरण पाहून लोकहि त्याचा कित्ता गिरवूं लागतात.

कोणतीहि गोष्ट सिद्ध करून दाखविण्याचे दोन मार्ग आहेत : एक शास्त्राधारा-( authority ) वर विश्वास ठेवून व दुसरा युक्तिवाद (reasoning) करून. केवळ शास्त्राधारानेंच कार्य भागणार नाहीं. विचारानेंहि सुधारणेची आवश्यकता लक्षांत आली पाहिजे. असें झालें म्हणजे कोणतीहि सुधारणा करूं लागल्यास ती लवकर अमलांत येऊं शकते.

जपानांत मेकॅडोनें हुकूम केल्याबरोबर लोकांनीं आपले जुने आचार-विचार कसे सोडले—असें एक वक्ते बोलले. पण तें मेकॅडोच्या हुकुमानें झालें किंवा तसें करण्यास सर्व लोकच अगोदर प्रवृत्त झाले, हें सांगतां येत नाहीं. आमच्या लोकांत तशी शिस्त व आज्ञाधारकपणा (discipline & obedience) नाहीं. शंकराचार्यांनीं अगर दुसऱ्यानें एखादी आज्ञा केली व ती मर्जीविरुद्ध असली अगर सोइस्कर नसली तर तिचा अव्हेर करण्यास आमचे लोक मागेंपुढें पाहत नाहींत. ह्याच संवयीचा राजकीय कामांत कसा काय परिणाम झाला आहे तो मी येथें विस्तारभयास्तव दाखवीत नाहीं. याची कल्पना तुम्हीच करा.

आमच्या येथें लोक राज्यकारभार व म्युनिसिपालिटी वगैरेमध्यें भाग असावा, म्हणून पुष्कळ मागण्या करीत असतात; परंतु त्या मागण्या आपण सर्वांचें एकमत झाल्यावर करतों काय, तसेंच त्यांस आपण कितपत तयार झालों आहोंत, याचा कोणी विचार करतो काय ? म्युनिसिपालिटीस दिलेले अधिकार आपल्यापैकीं किती लोक नीतीनें, निःपक्षपातानें व सत्यास धरून वापरतात ? आपले हितास आपण जसें जपतों तद्वतच दुसऱ्यांच्या हिताकरितां व सुखाकरितां झटलें पाहिजे. आम्हांस कोणती गोष्ट पसंत नसली, तर ती दुसऱ्यासहि नापसंतच असली पाहिजे, ती करण्यास आपण कोणासहि भाग पाडूं नये. आपल्यामध्यें जातीच्या द्वारें आपण लोकांस किती त्रास देतों बरें ? एखादा मनुष्य परदेशास गेला असतां, त्यास आपण बहिष्कार घालतों. त्याचप्रमाणें माझे पाहण्यांत आहे कीं, एखादा सरकारी हुकूम नोकर

लोकांनीं बजाविला असतां त्याबद्दल लोक त्यांवर वक्रदृष्टि ठेवून, त्यांस त्रास देतात व जातीबाहेरहि टाकतात.* असें करणें समाजास शोभत नाहीं. एवढेंच नाहीं, तर अशी स्थिति असेल तेथें सुधारणा कधींहि व्हावयाची नाहीं. भेद हा ज्या समाजाचा पाया, त्या समाजाचें कल्याण होणें दुरापास्त आहे. सबब असें न करतां, समाजानें प्रगल्भ मन करून, लोकांस आचाराविचारांच्या नवीन दिशा पत्करूं दिल्या पाहिजेत.

माझ्या अल्प मतें, अशा सुधारणा अमलांत आणण्याचा योग्य मार्ग असा आहे कीं, ज्या लोकांना एखादी सुधारणा योग्य आहे असें वाटतें, त्यांना ती सुधारणा अमलांत आणण्याची मुभा राजाकडून असावी. मात्र या सुधारणेंत अनीतीचा (immoral) कोणताहि भाग असूं नये. समाजाच्या इतर लोकांकडून त्या लोकांस कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध होऊं नये. याप्रमाणें राजाकडून अनुमति आणि लोकांकडून सहिष्णुता (tolerance) असली, म्हणजे सुधारणा अमलांत येण्यास हरकत पडत नाहीं. अमुक सुधारणा इष्ट आहे, अशी लोकांची समजूत झाली पाहिजे, व तशी समजूत होण्याचें मुख्य साधन शिक्षण हेंच आहे. शिक्षणाचा जसजसा प्रसार होईल, तसतशी अमुक सुधारणा इष्ट आहे, हें समजूं लागेल. या विषया-संबंधानें मीं आपले विचार तुमच्यापुढें मांडले आहेत. त्यांचा तुम्ही शांतपणें विचार करा, एवढेंच माझें सांगणें आहे.

## १०

**स्थलः**—मुंबई.

**कालः**—ता. १७ माहे डिसेंबर सन १९१०.

**प्रसंगः**—मुंबई ग्रंथ-संपादक मंडळी व इंदुविजय कंपनी यांकडून मानपत्र देण्याचा समारंभ.

सर भालचंद्र व सभ्य गृहस्थ हो !

ग्रंथ-संपादक मंडळीसारखी ज्ञानवर्धक संस्था फार दिवसांपासून चालत असलेली पाहून, मला मोठें समाधान वाटतें. हिंदु लोकांनीं काढलेल्या संस्था क्वचितच चिरकालपर्यंत टिकतात असा एक सर्वसाधारण आरोप करण्यांत येत असतो. परंतु

* हे उद्गार वेदोक्त प्रकरणाबद्दल आहेत.

हा आरोप हिंदवासीयांच्याच माथीं लादतां येणार नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांच्या अंगीं खरोखरीच चिकाटी नसेल, तर त्यांनीं आपल्यांतील ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करावा. वर्तमानपत्रें काय किंवा पुस्तकें काय, यांना एकच कार्य करावयाचें असतें. तत्कालीन पुढाऱ्यांच्या विचारप्रसाराच्या कामीं वर्तमानपत्रांचा उपयोग होत असतो. याच दृष्टीनें ग्रंथहि उपयोगी आहेत; पण ते याहून कांहीं भिन्न आहेत. माझ्या संस्थानांत पूर्वीं वर्तमानपत्रें प्रसिद्ध करण्याची मनाई होती. वर्तमानपत्रें आपल्या संस्थानांत असूं नयेत, असें त्या वेळचें धोरण होतें. पण असें करणें योग्य नाहीं असें मला वाटल्यावरून वर्तमानपत्रांच्या मार्गांतील हा अडथळा मीं दूर केला. सध्यांच्या सुशिक्षित नागरिकांच्या ज्ञानसिद्ध्यर्थ निरोगी आणि स्वतंत्र मतांचीं वर्तमानपत्रें आवश्यक आहेत. मी माझ्या राज्यांत वर्तमानपत्रांना हरएक तऱ्हेनें उत्तेजन देत आलों आहें. पण हें उघड आहे कीं, चांगल्या वर्तमानपत्रांचें चिरस्थायित्व सरकारी मदतीवर फारसें अवलंबून नसून, पत्रचालकांच्या बुद्धीवर, चातुर्यावर, चोखपणावर व निश्चयावर अवलंबून असतें. संस्थानाला सवलती तेवढ्या देतां येतील, परंतु त्यांच्या प्रसारासाठीं वगैरे किंवा त्यांच्या उन्नतीसाठीं प्रयत्न करतां येणार नाहीं. वर्तमानपत्रांची खरी उपयुक्तता लोकांतूनच झाली पाहिजे. मला अशी आशा आहे कीं, माझ्या संस्थानांतील खऱ्या वर्तमानपत्राच्या वृत्तीचा उत्तरोत्तर अधिकाधिक अभ्युदय होईल.

माझ्या संस्थानांत आतांपर्यंत जीं पुस्तकें संस्थानच्या मदतीनें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांत दोष असतील हें मी कबूल करतों. यापेक्षां तीं पुस्तकें अधिक चांगलीं तयार करतां आलीं असतीं. यापुढें जे ग्रंथ प्रसिद्ध होतील, ते अधिक चांगले होण्याविषयीं खबरदारी घेण्यांत येईल. अमेरिकेंतून येतांना मजबरोबर ग्रंथसंग्रहालयाच्या कामांत निष्णात अशा एका गृहस्थास* मीं आणलें आहे, व त्याच्या मदतीनें माझ्या संस्थानांत मला कांहीं चांगलें काम करतां येईल, अशी आज मला उमेद वाटते आहे. त्या अमेरिकन तज्ज्ञ गृहस्थाच्या सल्ल्याचा व मसलतीचा फायदा केवळ माझ्याच रयतेस न मिळतां, हिंदुस्थानांतील इतर लोकहि करून घेतील अशी मला आशा आहे. माझ्या संस्थानांत मोफत व इतर लायब्ऱ्या स्थापन करण्याबद्दल, आज कित्येक वर्षें मी प्रयत्न करीत आहें व आतां जे अमेरिकन तज्ज्ञ गृहस्थ मीं आणले आहेत, त्यांच्या मदतीनें हें काम पद्धतशीर रीतीनें करण्याचें मीं योजिलें आहे. ह्या कार्याचा फायदा केवळ बडोद्याच्या लोकांसच मिळेल असें नसून, मुंबई व इतर ठिकाणच्या लोकांसहि अशीं कार्यें करण्यास त्यापासून

---

*मि. बोर्डन यांच्या मदतीनेंच बडोद्यांत ग्रंथसंग्रहालयाच्या प्रसारकार्याचा पाया घातला गेला. नंतर कै० रा. कुडाळकर व रा. वाकनीस यांना अमेरिकेस याच शिक्षणासाठीं सरकारी खर्चानें पाठविलें होतें.

प्रोत्साहन येईल. माझ्या या नवीन योजनेंत मला कितपत यश येईल, हें आजच मला सांगतां येत नाहीं व त्यावर मी अवलंबूनहि नाहीं. लोक या कार्यासंबंधानें जी आस्था कृतिरूपानें प्रकट करतील, त्यावरच अशा कार्यांतील फलप्राप्ति अवलंबून असते. लोकांनींच अशा कामीं आपली तत्परता व संघटनशक्ति प्रकट करणें या गोष्टींची आवश्यकता आहे. सरकार आपल्याकडून होईल तेवढ्या सवलती देऊं शकेल, पण कार्यांची उभारणी करणें हें लोकांच्या हातीं आहे. तृषिताला राजा पाणी देईल, पण तें त्याला प्यावयास लावण्याची शक्ति राजाच्या अंगीं नाहीं. बडोद्यास लायब्ररी स्थापन झाली म्हणजे मुंबईतील व इतर ठिकाणच्या लोकांस तिचा फार उपयोग होईल अशी मला फार आशा आहे. पण या गोष्टी लायब्ररी स्थापन झाल्यानंतरच्या आहेत. त्यासंबंधानें आज मी जास्त बोलूं इच्छीत नाहीं. एखादी गोष्ट करण्यापूर्वीं तिच्यासंबंधानें आधीं पुष्कळसें सांगावें किंवा शब्दावडंबर माजवावें असा माझा स्वभाव नाहीं. मीं आपल्या राज्यांत शिक्षणासाठीं वेगळी रक्कम काढून ठेविली होती. हल्लीं शिक्षणविषयक चळवळ फक्त शिक्षणखात्यांतूनच चालू असते. तथापि यापुढें जे लोक व ज्या संस्था माझ्या राज्यांत शिक्षणप्रसारार्थ जन्मभर सेवा बजाविण्यास तयार होतील त्यांच्या मदतीकरितां एक फंड काढून, शिक्षणविषयक चळवळ शिक्षण खात्याशिवाय इतरत्रहि चालू करण्याचा माझा विचार आहे. या फंडावर शिक्षण खात्याचा ताबा राहणार नसून, तो फंड स्वतंत्र संस्थेकडे राहणार आहे. या व इतर कित्येक उपायांनीं शिक्षणाचा प्रसार करून, प्रजेचा फायदा करण्याचें कार्य माझ्या हातून शेवटास जाईल, अशी मला आशा आहे. त्याचप्रमाणें मुंबई शहरांत एक मोठी राष्ट्रीय लायब्ररी स्थापन होईल व सर्व जातींचे लोक तिचे सभासद होतील आणि तिच्यांतील पुस्तकांचाच फक्त लाभ घेऊन स्वस्थ न राहतां, आपआपसांतील सामाजिक दळणवळण वाढविण्याचा फायदा ते करून घेतील, अशी मला आशा आहे.

पुष्कळ दिवसांच्या प्रवासाहून माझें सुखरूप आगमन झाल्याबद्दल, माझे मित्र सर भालचंद्र कृष्ण यांनीं आनंद प्रदर्शित केला व मलाहि याबद्दल आनंद वाटत आहे. एखाद्या मनुष्यानें जसजशी अधिक मेहनत करावी तसतशी त्यास विश्रांतीची अधिक जरूर असते. मी इतकें काम करतों, हें कित्येकांस पसंत नसेल, व कित्येकांस माझें काम असमंजसपणाचें आहे, असेंहि वाटत असेल. तथापि मी इतकें सांगतों कीं, माझें सर्व काम व माझे सर्व प्रयत्न जरी असमंजसपणाचे असले, तरी फक्त एकाच उद्देशानें प्रेरित होऊन, ते मीं चालविले आहेत व तो उद्देश म्हटला म्हणजे माझ्या प्रजाजनांचें हित करणें, हा होय.

## ११

**स्थल:—मुंबई.**

**काल:—ता. १७ माहे डिसेंबर सन १९१०.**

**प्रसंग:—मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या नवीन इमारतीचा पाया घालण्याचा समारंभ.**

सर भालचंद्र व सभ्य गृहस्थ हो !

वर्तमानपत्रें व पुस्तकें यांविषयीं थोड्याच वेळापूर्वीं मीं माझे विचार प्रदर्शित केले आहेत. तथापि त्याच विषयावर आणखी चार शब्द मला बोलावयाचे आहेत. भाषा आणि लेखनकला ह्या अति मौल्यवान देणग्या आहेत. ज्या देशांत लेखनकला नाहीं, त्या देशाचा इतिहास लिहून ठेवतां येत नाहीं व त्यामुळें पूर्वींचा अनुभव पुढील पिढीस मिळत नाहीं. लेखनकला ज्ञानवृद्धीस अत्यावश्यक आहे. ज्ञानभांडार पुष्कळ प्रकारचें असतें. ज्या प्रमाणानें भांडार मोठें असेल, तितकी स्थिति उत्तम समजावयाची. ज्ञान हें सर्व प्राणिमात्रास फार जरूर आहे. पण मनुष्यास तें अत्यावश्यक आहे. परमेश्वरानें मनुष्यास सारासारविचारशक्ति दिली आहे. त्या शक्तीच्या योगानें मनुष्यें ग्राह्याग्राह्याचा विचार करूं शकतात. मनुष्यानें चांगलें वाईट पाहून, चांगलें असेल तें ग्रहण केलें पाहिजे. शास्त्रें शिकला म्हणजे विद्वान् झाला, असें समजावयाचें नाहीं. प्रत्येकानें खरें ज्ञान संपादन केलें पाहिजे. ज्ञान हें अमृत आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. ज्ञानाच्या प्रसारानें अज्ञानरूपी रोग नाहींसा होतो, अशी माझी समज आहे. अज्ञानानें किती लोक मरतात, किती लोक आपलीं आयुष्यें दुःखांत घालवितात याचा आपण विचार करा व ज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं झटा. नुकसानकारक रूढि सोडण्यास भिऊं नका, चांगलें असेल तें ग्रहण करा. आपल्या देशांत, आपल्या राष्ट्रांत, जें नुकसानकारक असेल, तें टाकून द्या. हिंदुस्थान अज्ञानरूपी अंधःकारांत असल्यामुळें, चांगल्या गोष्टींचा त्यास फायदा करून घेतां येत नाहीं. पुस्तकालयांनीं हा अज्ञानरूपी रोग नाहींसा होईल. हें मराठी ग्रंथसंग्रहालय आज जरी लहान आहे, तरी पण मोठमोठीं कार्यें एकदम होत नसतात. लहानापासून मोठ्या गोष्टी होतात. या संग्रहालयास मी असा आशीर्वाद देतों कीं, ही संस्था चिरायु होऊन, लोक तिचा उत्तम उपयोग

करून घेवोत. माझी ही आशा सफळ झाली, म्हणजे आज जी मीं मेहनत घेतली तिचें चीज झालें, असें मी समजेन.¶

## १२

**स्थलः**—मुंबई.

**कालः**—ता. १८ माहे डिसेंबर सन १९१०.

**प्रसंगः**—मुंबई हिंदु क्लबाचें तिसरें वार्षिक संमेलन.

सर वुइल्यम वेडरबर्न*, सर नारायणराव चंदावरकर† व सभ्य स्त्री-पुरुष हो !

आज रोजीं येथील निरनिराळ्या मतांचे स्त्री-पुरुष या प्रसंगीं हजर असल्यामुळें आजच्या समारंभास विशेष प्रकारची शोभा आली आहे. व शिक्षणाच्या दृष्टीनें व समाजाच्या दृष्टीनें आपलें पाऊल किती पुढें पडलें आहे, त्याची आजचा समारंभ साक्ष पटवीत आहे. चर्मचक्षूंस दिसणाऱ्या वस्तूंशिवाय मानसिक दृष्टीनें व अंतःकरणानें जाणल्या जाणाऱ्या अशा अनेक गोष्टींचा सुपरिणाम होऊन, आजच्या प्रसंगीं जमलेल्या समुदायामुळें सर्व लोकांमध्यें एकविचार, एककल्पना व सामान्य मनोवृत्तीचें वास्तव्य आहे, असें सिद्ध होत आहे. नुसतें सर्व एके ठिकाणीं जमून, समाजाचा कोणत्याहि प्रकारें फायदा होणार नाहीं; परंतु मनोभावेंकरून, सर्वांनीं एकविचारानें मतभेद बाजूस सारून, समाजसुधारणेच्या कामीं सारखें झटलें पाहिजे. जुन्या चालीरीती व जातिबंधनें हीं नवीन दिशेच्या आड येणारीं विघ्नें आहेत. परंतु लोकमत सुधारणेच्या दिशेस अनुकूल असतांना जुन्या चालीरीतींस चिकटूनच राहावयाचें कीं काय, हा एक प्रश्न आहे. वाडवडिलार्जित वाईट चालीरीतींस धरून राहिल्यानें, कोणत्याहि प्रकारें तुमचा फायदा होणार नाहीं. मी नुकतांच मुशाफरीहून परत आलों आहें. माझ्या सफरींत मी जपान, अमेरिका, युरोप

---

¶ याप्रमाणें खरोखरीच ही संस्था आज मुंबईस मोठ्या भरभराटींत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे (सन १९३९).

* हे सिव्हिल सर्व्हंट होते. निवृत्तिवेतन घेतल्यावर, यांनीं हिंदुस्थानच्या हितार्थ पुष्कळ प्रयत्न केले. एका वेळीं ते राष्ट्रीय सभेचे अध्यक्षहि होते.

† हे मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश होते.

वगैरे ठिकाणीं गेलों होतों, त्यामुळें निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांच्या निरनिराळ्या चालीरीतींचें निरीक्षण करावयास मला मिळालें. प्रवास केल्यानें इतर लोकांच्या चालीरीति व आपल्या चालीरीति यांमधील भेद सहज कळतो. इतर लोकांच्या सुधारलेल्या चालीरीतींचें निरीक्षण करून, आपण आपली सुधारणा केली पाहिजे. आपल्या जुन्या चालीरीतींसच चिकटून राहिल्यानें, तुमची राजकीय व सामाजिक बाबतींत कधींहि सुधारणा होणार नाहीं. तेव्हां नवीन सुधारलेल्या चालीरीतींचा स्वीकार करा अशी, तुमच्या समाजांतील मी एक आहें असें मानून, मी तुम्हांस विनंति करितों. सर्वांनीं एकाच चालीरीतीचें अवलंबन केलें पाहिजे, व राष्ट्रोन्नति हेंच सर्वांचें ध्येय असलें पाहिजे.

पडद्याची पद्धति आपल्या इकडे काय कारणानें सुरू झाली, याबद्दल मला विशेष माहिती नाहीं. पण ती पद्धति मुसलमानी अंमलापासून आपल्या देशांत आली आहे, असें मला वाटतें. पडदापद्धति नाहींशी केली, तर तें कोणत्याहि प्रकारें सामाजिक सुधारणेच्या आड येणार नाहीं, असें मला वाटतें.

बायकांना शिक्षण दिलें पाहिजे, याबद्दल आतां कोठेंहि मतभेद आढळणार नाहीं. तें शिक्षण म्हणजे नुसत्या परीक्षा पास होणें नव्हे. बायकांना संसारविषयक शिक्षण मिळालें पाहिजे. त्यांना आपलीं मुलें कशीं वाढवावयाचीं, याचें ज्ञान मिळालें पाहिजे. आपल्या पतीस वाईट गोष्टींपासून कसें परावृत्त करावयाचें, हेंहि बायकांस शिकविलें पाहिजे. नुसतें भाषण करतां येऊन कांहीं एक उपयोग नाहीं. बोलण्यापेक्षां प्रत्येक गोष्ट कृतींत उतरली पाहिजे. बायकांस रसायनशास्त्र वगैरे शास्त्रांचें शिक्षणहि देणें जरूर आहे.

श्रीमंत सौ. महाराणीसाहेब या निरनिराळ्या गोष्टींचा विचार करून, आज येथें आल्या आहेत व त्यांनीं स्त्रीशिक्षणासंबंधानें व सामाजिक सुधारणेसंबंधानेंहि पुष्कळ विचार केलेला आहे. स्त्रीशिक्षण अगत्याचें आहे, असें त्यांनाहि वाटत आहे.

## १३

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. २८ माहे डिसेंबर सन १९१०.

**प्रसंग:**—मराठा शिक्षण-परिषदेची चवथी बैठक*.

सभापति व सज्जन हो !

आजच्या प्रसंगीं मीं येथें कांहीं बोलावें, असा माझा विचार नव्हता. परंतु काल रोजीं मी येथून उठून गेल्यानंतर कांहीं मंडळींनीं मजविषयीं जे निरनिराळे तर्क काढले ते पाहून व श्रीमंत संपतराव यांनीं कालच्या आपल्या भाषणांत मजबद्दल उल्लेख करून माझा बहुमान केला, तसेंच सभापतींनींहि मजविषयीं बरेंच गौरवपर भाषण केलें, व रा. नाईक यांनीं मी युरोपचा प्रवास करून, सहकुटुंब सुखरूप आल्याबद्दल आपल्या भाषणांत आनंद प्रदर्शित केला, इत्यादि कारणांवरून मीं आज कांहीं बोलावें, असें मला वाटलें.

आजचा प्रसंग खरोखर फार आनंदाचा आहे. मराठे लोकांचें विद्येंत पाऊल पुढें कसें पडेल, हें मी मागाहून सांगेन. माझे बंधु श्री. संपतराव यांनीं आपल्या भाषणांत माझी जी स्तुति केली आहे, ती मी त्यांचा वडील बंधु असल्यामुळें, त्या नात्यानें केली असली पाहिजे. मनुष्याचें लहानमोठेपण त्याच्या वयावर नसतें. अनुभवजन्य ज्ञानानें तयार झालेल्या माणसाला तो लहान असला, तरी मी कमी मान देतों असें नाहीं; ज्याची जशी योग्यता असेल, तसा त्यास मान देणें, हें मी न्यायाचें व नीतीचें आहे असें समजतों. रा. खाशेराव यांनीं काल अध्यक्षांच्या घराण्याची माहिती सांगितली, त्यावरून त्या काळच्या तेजस्वी पुरुषांची आपणांस आठवण होते. मराठ्यांच्या पुष्कळ घराण्यांचा इतिहास असाच आहे. समाज हा अनेक व्यक्तींमुळें बनलेला असतो. त्यांतील व्यक्ति जशा चांगल्या वाईट असतील, तसा समाज चांगला किंवा वाईट असतो. महाराष्ट्र देशाची रचना, त्याची अंतर्व्यवस्था, त्यांत उत्पन्न होणारे पदार्थ व आसपासची परिस्थिति यांचा त्यांत राहणाऱ्या लोकांच्या मनावर काय परिणाम होतो, हें पाहिलें पाहिजे. प्रत्येक व्यक्तीनें नैसर्गिक शक्तीचा (natural forces) फायदा करून घेतला पाहिजे. तुमच्या समाजांतील घराण्यांनीं शूरत्वाचीं कामें केलीं आहेत; तथापि आजची तुमच्या समाजाची स्थिति

---

* या बैठकीचे अध्यक्ष श्रीमंत सरदार शंभूसिंहराजे माळेगांवकर हे होते.

कींव करण्यासारखी आहे. तुमचेवर हा प्रसंग अज्ञानामुळें आला आहे असें माझें मत आहे. आपण आपल्या स्थितीची इतर लोकांशीं तुलना करा. इतर जाती कोणत्या उपायांनीं पुढें गेल्या आहेत त्याचा विचार करा व आपली स्थिति सुधारण्याच्या मार्गास लागा. चांगल्या गोष्टींचा व्यवहारांत उपयोग करा. तो न केला तर, ज्ञान ही निरर्थक गोष्ट आहे असें दिसून येईल. त्याविषयीं इतिहासांतील उदाहरणें सांगितलीं तर बराच वेळ लागेल. आजचा हा समाज विद्यावृद्धीसाठीं जमा झाला आहे. तुमच्यांत विद्यावृद्धि व्हावी, याबद्दल माझी पूर्ण सहानुभूति आहे. ज्ञानावांचून पुढील मार्ग सुचावयाचा नाहीं. ज्ञानाचा मार्ग आक्रमण करण्यास, तुम्हांस बऱ्याच अडचणी येतील. त्याप्रमाणें आपल्यांतील दुष्ट व घातुक रूढी सुधारल्या पाहिजेत. शिक्षण हें तुम्हांसच पाहिजे असें मानावयाचें नाहीं, तर त्याची रावापासून रंकापर्यंत सर्वांसच जरूरी आहे.

काल झालेल्या भाषणांत शिवाजीमहाराजांच्या नांवाचा उल्लेख करण्यांत आला होता. श्रीशिवाजीमहाराजांच्या इतिहासावरून पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. प्राचीन व अर्वाचीन गोष्टींचा विचार करतांना, इतिहासाचा अर्थ लक्षांत घेतला पाहिजे. शिवाजीमहाराज उत्पन्न होण्याच्या पूर्वीं या देशाची स्थिति कशी होती, कोणत्या कारणांनीं ते उदयास आले, त्या कारणांचा विचार केला पाहिजे. युरोपमध्यें मार्टिन लूथरच्या वेळीं धर्मसुधारणा ज्या कारणांनीं व ज्या प्रयत्नांनीं झाली, त्याच वेळीं व त्याच कारणांनीं आपल्याकडे एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादि पुरुषांनीं धर्मसुधारणा केली. त्यांचा इतिहास पहा. त्यांचे ईश्वरासंबंधीं विचार कसे होते त्याचा विचार करा. बाह्य वर्तनावर, तसेंच डामडौलावर विश्वास ठेवूं नका. आपली नीति व अंतःकरण हें चांगलें ठेवा, यांतच खरा ज्ञानाचा उपयोग आहे. श्रीशिवाजीमहाराजांचे व तत्कालीन साधुपुरुषांचे विचार आकुंचित नव्हते. त्यांनीं सर्व लोकांच्या उन्नतीकरितां प्रयत्न केले होते. त्याप्रमाणें तुम्हींहि आपल्या सर्व देशबांधवांच्या कल्याणाकरितां प्रयत्न करावेत. ते सर्व आपलेच बंधु आहेत असें मानावें व सर्वांवर दया करावी. मनुष्यमात्र एक आहे अशा प्रकारची भावना व्हावी. आपणांस दुसऱ्याविषयीं विसर पडतां कामा नये. निरनिराळ्या जाती हे एका शरीराचे अवयव आहेत. देशाची वाईट स्थिति सुधारावयाची असल्यास, त्यांतील लोकांची स्थिति कशी आहे, हें पाहिलें पाहिजे. फक्त ब्राह्मण व मराठे यांची स्थिति पाहतां कामा नये, तर देशांतील इतर लोकांच्या स्थितीचाहि विचार केला पाहिजे.

ज्ञातिरूपी विराट् शरीराच्या निरनिराळ्या अवयवांनीं आपापली उन्नति केली पाहिजे. आपण स्वतःस क्षत्रिय म्हणवितां. क्षत्रियाचें कर्तव्य सत्ता व अधिकार चालविणें हें आहे. प्रथम मनुष्यानें आपल्या मनावर राज्य चालवावयास शिकलें पाहिजे. जो विचार करीत नाहीं, त्याचा मनावर ताबा बसत नाहीं. त्यास मनुष्यस्वभाव

ओळखतां आला पाहिजे. त्याचप्रमाणें कालप्रमाणें युक्त्या योजिल्या पाहिजेत. क्षत्रियाचें काम करावयाचें असेल, तर तुम्हांस शास्त्रीय (scientific) ज्ञानाची माहिती पाहिजे. क्षात्रगुण अंगीं नसला, तर तुमच्या ज्ञानाचा उपयोग होणार नाहीं. आपल्या देशाची स्थिति पाहिली तर, शिवाजीमहाराजांच्या वेळेस एकाच जातीनें, परिस्थिति घडवून आणिली नव्हती. प्रथम साधुसंतांनीं अनुकूल भूमिका तयार केली. या साधुसंतांत, ब्राह्मण, मराठे, शिंपी, दर्जी, न्हावी, महार, चांभार वगैरे सर्व जातींचे लोक होते. सर्व जातींची स्थिति सुधारावी, असें त्यांस वाटत होतें. सर्व जातींनीं प्रयत्न केल्यास, आपणा सर्वांचा अंतिम हेतु साधणार आहे. तुमच्या मंडळींचा आपल्या समाजांतील विद्येसंबंधींचा हेतु शेवटास जावो, असें मी इच्छितों.

श्री. शिंदे सरकारचें पाठबळ तुमच्या कार्याला आहे हें ऐकून मला आनंद वाटतो. कारण सत्कार्यांत झिजणें, यांत पुण्य आहे व तशा रीतीनें जे झिजतात त्यांना मी मोठे समजतों. मी तुमच्याविषयीं पुष्कळ वर्षांपासून कळकळ बाळगीत आहें. वीस वर्षांपूर्वीं पुण्याचे कैलासवासी रा. म्हसके यांच्या सूचनेवरून मीं मराठे लोकांकरितां कांहीं शिष्यवृत्त्या पुण्यांत दिल्या आहेत व त्या बडोदें, पुणें व कोल्हापूर येथील कमिटीच्यामार्फत देण्यांत येतात. त्या वेळीं प्रथम आम्हांस उच्च प्रतीचें शिक्षण घेणारे विद्यार्थी मिळेनात, म्हणून त्या खालच्या प्रतीच्या शिक्षणासाठीं देणें जरूर पडलें. पुढें उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी थोडे थोडे मिळूं लागले. तुमच्यांतील लोक पुढें आले पाहिजेत. कारण आपण राजकीय पुरुषांचे वंशज असल्याकारणानें आपण राज्यकारभारांत पुढें आलें पाहिजे, ही भावना मनांत धरून, तुमच्यांतले लोक तयार करण्यासाठीं, मीं श्री. संपतराव* गायकवाड, श्री. गणपतराव† गायकवाड व श्री. खासेराव‡ जाधव, यांस प्रथम विलायतेस पाठविलें. त्या वेळीं त्यांच्या वडिलांस असें वाटलें कीं, आमचीं मुलें मारावयास नेत आहेत कीं काय. फार तर काय, त्या वेळीं ते माझे आभार न मानतां, मला दोषच देत होते.

---

* श्रीमंत महाराजसाहेबांचे लहान बंधु, हे पुढें बॅरिस्टर झाले.

† श्रीमंत महाराजसाहेबांचे पुतणे, हेहि बॅरिस्टर झाले. यांस दिवाणबहादुर ही पदवी मिळाली होती. हे ता. १७-१२-१९३० रोजीं निवर्तले.

‡ सेटलमेन्ट कमिशनर, सुभे इत्यादि हुद्दयापर्यंत चढून, पुढें यांनीं सेवान्त वेतन घेतलें व श्रीमंत महाराज प्रतापसिंह यांचे पालक म्हणून, यांची नेमणूक झाली होती. त्या कामावर असतांनाच ता. ६-१०-१९२४ रोजीं ते निवर्तले.

सद्गृहस्थ हो, कोणत्याहि गोष्टीस प्रथम सुरुवात केली असतां, लोक टीका करीत असतात. परंतु त्याचा परिणाम चांगला झाला असें नजरेस आलें म्हणजे न्यायी व विचारी लोक चांगलें म्हणूं लागतात. कोणीहि कोणताहि प्रयत्न करते-वेळेस टीकेकडे लक्ष देऊं नये. ही मंडळी विलायतेहून येऊन, आपापलीं कामें पाहूं लागल्यावर, त्यांस लोक बरे म्हणूं लागले व ते आपल्या ज्ञानाचा चांगला उपयोग करूं लागले, हें पाहून सर्वांस आनंद झाला. तुम्ही समंजसपणानें कामें कराल तर, यापेक्षां पुष्कळ काम कराल. रा. खासेराव सकाळीं मजकडे आले होते व ते मला म्हणाले, महाराज! आपण कांहीं तरी भाषण कराल अशी आशा आहे. मीं काय बोलावें? तरी आपली इच्छा असल्यास थोडेंसें बोलेन, असें मीं त्यांस सांगितलें होतें. असो, तुमचा समाज संपत्तीनें व बुद्धीनें हीन झालेला आहे. तुम्हांस शिक्षण घेण्यास पैसा पाहिजे. माझ्या मताप्रमाणें व्यवस्था होईल, तर तुमची जूट, निश्चय व जोर पाहून, सर्व लोक तुम्हांविषयीं सहानुभूति दाखवितील. तुम्ही सर्वजण एकजूट करून, स्वतःवर थोडा कर बसवून घ्याल, तर तुमच्या दारिद्र्यांतील अडचणी दूर होतील. झीज सोसल्यावांचून कांहीं होत नाहीं. प्रत्येक व्यक्तीनें झीज सोसली पाहिजे. सर्व लहानथोर माणसांनीं आपल्यावर एक प्रकारचा कर बसवून घेतला पाहिजे. हें समजण्याइतका आपला समाज समंजस आहे काय? आपल्यामध्यें जूट आहे? आपण आपल्या पाकिटांत प्रथम हात घातला पाहिजे. तुम्ही तुमच्या गांवांतील सर्व लोकांची मदत घेऊन, प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापन कराल, तर श्रीमंत लोक आपणांस उच्च प्रतीचें शिक्षण देतील. नाहीं तर राजेलोक कांहीं करूं शकणार नाहींत, हें माझें म्हणणें शक्य आहे कीं नाहीं याचा विचार करा. सर्वत्रांस सारखें शिक्षण द्या, त्यापासून तुमचा फार फायदा होईल. आजचे आपले अध्यक्ष यांचें भाषण मला फार आवडलें, तें वाखाणणी करण्यासारखेंच होतें. माझ्या तोंडून कांहीं कमीजास्त शब्द निघाले असतील, त्याची मला माफी कराल.

### ( मे. खासेराव जाधव यांचें भाषण झाल्यावर )

मीं थोड्या वेळापूर्वी जें भाषण केलें आहे त्यासंबंधानें मला एक दोन गोष्टींचा विशेष खुलासा करावयाचा आहे. म्हणून मी पुन्हा दोन शब्द बोलत आहे. समाज हा एक व्यक्तींचा समूह आहे. प्रत्येक व्यक्तीनें आपापल्यापरी काम केलें म्हणजे समाजाची उन्नति होत असते. मीं तुमच्यासाठीं सव्वा लाख रुपयांचा फंड काढला आहे. त्यांतून मुलांमुलींस शिष्यवृत्त्या देण्याची व्यवस्था केली आहे. त्यासंबंधाचे नियम वगैरे तयार होत आहेत. सर्वत्रांस मदत करणें मला अगत्याचें वाटतें. महार वगैरे जातींसहि मी मदत करीत असतों. हें मी माझा मोठेपणा दाखवावा म्हणून सांगत आहें असें समजूं नका. फक्त हें तुमच्या माहितीकरितांच सांगत

आहे. हिंदुस्थानास जर ऊर्जितकाळ यावयाचा असेल, तर तो एकी व विद्या यांवांचून कधींहि यावयाचा नाहीं. मीं आपल्या राज्यांत सक्तीचें शिक्षण सुरू केलें आहे त्याबद्दल लोकांस अडचणी येतात, असें लोकांचें म्हणणें आहे. परंतु अडचणी सहन केल्यावांचून फायदा व्हावयाचा नाहीं. अडचणी सोसून पुढें होणाऱ्या फायद्याकडे नजर दिल्यास, शेवटीं कल्याण होणार आहे. आपण मानसिक, व शारीरिक बलांकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. सुशिक्षित लोकांस शारीरिक शक्ति बरीच कमी असते. शिक्षणासंबंधीं विचार करतांना आपल्या शारीरिक संपत्तीकडे विशेष लक्ष द्यावें असें माझें मत आहे. आपल्याकडील लोकांचा शारीरिक संपत्तीचा ऱ्हास होत आहे कीं काय, हें मला कांहीं सांगतां येत नाहीं. तरी आपल्या लोकांस शारीरिक संपत्तीचीहि विशेष जरूरी आहे. यासाठीं आपण आपल्या मुलांमुलींच्या शारीरिक बलाकडे विशेष लक्ष देऊन यथाशक्ति आपलें कर्तव्य कराल, अशी मला आशा वाटत आहे.

## १४

**स्थल:**--बडोदें.

**काल:**--ता. ३१ माहे डिसेंबर सन १९१०.

**प्रसंग:**--बडोदें ज्युबिली बागेंत बुद्धाच्या पुतळ्याचा अनावरण-समारंभ.

आजचें माझें काम, महात्मा बुद्धाची मूर्ति या बागेंत खुली करण्याचें आहे; आणि त्यामुळें त्या मूर्तीसंबंधीं दोन शब्द बोलण्याची ह्या ठिकाणीं जरूर वाटत आहे. आजच्या समारंभाच्या वेळीं मोठें भाषण करण्याचा माझा विचार नव्हता, परंतु एवढें मोठें संमेलन पाहून, मला थोडें विशेष बोलण्याची इच्छा होत आहे. मी राजा आहें आणि तुम्ही प्रजा आहांत; आपण एकाच कुटुंबांतील आहोंत आणि तुमचें हित, तेंच माझें हित आहे. त्यामुळें मला असें वाटतें कीं, मला जें चांगलें वाटेल, तें मला तुमच्या समक्ष रुजू केलें पाहिजे. जर त्याच्यांत माझ्या हातून कांहीं चूक झाली, तर माझ्याविषयीं तुमच्या मनांत जी सद्भावना आहे, त्या योगें तुम्ही माझ्या विचारांकडे क्षमादृष्टीनें पहाल.

ही मूर्ति जपानहून मागविलेली आहे. मूर्ति आणण्याचा हेतु एवढाच कीं, महात्मा बुद्ध हिंदुस्थानांत जन्मले होते ह्या गोष्टीचें प्रजेला स्मरण असावें. तसेंच

धर्माच्या आणि आचाराच्या दृष्टीनें योग्य अशा सिद्धांताकडे आपल्या लोकांची दृष्टि जावी. तुम्हांला माहीत आहे कीं, जपानचे लोक हुन्नर-कलेमध्यें पुष्कळ पुढें गेलेले आणि निपुण आहेत. त्यांनीं बनविलेल्या हजारों वस्तु येथें आपल्या देशांत येतात आणि ती दरेक वस्तु पाहून, त्या लोकांची हुशारी दिसून येते. या रीतीनें ही मूर्ति जपानमधील लोकांच्या कारागिरीचा एक चांगला नमुना आहे. या महात्म्याच्या अशा मूर्तीपासून जपान वगैरे देशाच्या लोकांचें जीवन आणि आचार-विचार यांवर मोठी छाप पडते.

ह्या मूर्तीचा मूळपुरुष जो महात्मा गौतमबुद्ध त्यासंबंधीं कांहीं माहिती येथें देण्याची जरूर आहे. ते हिंदुस्थानांत हिमालयापाशीं नेपाळच्या तराईत एका राजकुटुंबांत लुम्बिनी गांवीं जन्मले होते. ते एक सुकुमार राजपुत्र असून, अनेक राजवैभवांत असतांना, तरुणपणांत त्यांना वैराग्य प्राप्त झालें आणि मनुष्याच्या विविध दुःखांनीं दयार्द्र होऊन, त्यांनीं जगाचा– संसाराचा त्याग केला, आणि परोपकारासाठीं जीवन अर्पिलें. त्यांनीं बौद्ध धर्माची स्थापना प्रथम आपल्या हिंदुस्थानामध्यें केली होती.

अशा महान् धर्मसंस्थापकांविषयीं आणि त्यांची धर्मनीति आणि धर्म-सिद्धांत याविषयीं जाणते लोक तुम्हांला विशेष माहिती देतील. परंतु बुद्धाचें जीवन काय शिकवितें याविषयीं थोडी माहिती मी देतों. महात्मा बुद्धाच्या उपदेशाचें सार एवढें होतें कीं, मनुष्याला चांगली स्थिति प्राप्त होणें, हें त्याचें नशीब किंवा दैवयोग यांवर नसून, खास त्याच्या पुरुषार्थावर अवलंबून आहे. आपण जसें कर्म करावें, जसा प्रयत्न करावा, त्याप्रमाणें लहानमोठे होऊं शकतों. बौद्धसिद्धांताप्रमाणें ब्राह्मण-क्षत्रियादिवर्ण, गुणकर्मावर समजला जातो; जन्मावरून नाहीं. आपल्या येथें वर्णांचें कारण जन्मावरून समजण्यांत येतें. परंतु असें न होऊं दिलें पाहिजे. मनुष्य गरीब असला किंवा खोट्या समजुतीनें केवळ जन्मावरून नीच मानण्यांत येणाऱ्या हलक्या वर्गांत जन्मला असला, तरी त्याचें वर्तन सदाचरणी आणि पवित्रतायुक्त असेल, तर त्यास मोठा आणि उत्तम वर्णाचाच समजलें पाहिजे. कोणी मनुष्य संध्यावंदनादि नित्यकर्म फार नेमस्त राहून करील, किंवा स्पर्शास्पर्शाचे विधि पाळून शुद्ध होण्याकरितां स्नानाची, शुचिर्भूत होण्याची संवय ठेवील, दुसऱ्याच्या हातचें शिजविलेलें अन्न खाण्याला. तसेंच त्याच्या हातचें पाणी पिण्याला विटाळ मानून, मर्यादा पाळील आणि सवड असली तर तो सरळ व्यवहार सोडून दुसऱ्यापासून वेगळा राहील, किंवा आम्ही उच्च आणि कुलवान आहोंत असें म्हणून, कन्या देण्याघेण्याच्या कामीं विनाकारण संकोच ठेवील, किंवा धर्मसंस्कारांचें मात्र चालत असलेल्या रूढीप्रमाणेंच आचरण करील, तर तेवढ्यावरूनच त्याला श्रेष्ठता मिळत नाहीं,

किंवा तो उत्तम वर्णाचा होऊं शकत नाहीं, हें चांगल्या रीतीनें लक्षांत ठेवा. मनुष्य चांगलीं कामें करील, तर तो नराचा नारायण होऊं शकतो या वचनावर श्रद्धा ठेवून, तुम्ही वर्तन करा. जपान, चीन, वगैरे बुद्धानुयायी प्रजेंत सद्गुण, नीति, आणि सत्कर्म यांना प्राधान्य देण्यांत येतें. अर्थात्, खरी श्रेष्ठता मिळण्यासाठीं या जन्माचेच गुणकर्म उच्च असावयास पाहिजेत. आपल्यामध्यें खोटया समजुतीनें उच्च आणि नीच म्हणविल्या जाणाऱ्या जातींमुळें भेद पाडण्यांत आलेले आहेत. हा केवळ अज्ञानाचा परिणाम आहे. कारण गुण आणि कर्म याच योगानें नक्की होणारे वर्णविभाग व्यावहारिक आणि फलदायी होतात.

बौद्ध धर्माची दुसरी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यायोग्य आहे कीं, त्याचा जन्म आपल्या देशांत झाल्यानंतर पाठीमागून कालचक्राच्या आधीन होऊन, अनेक क्रांतींच्या योगानें तो हल्लीं नामशेष झाला आहे. दुसऱ्या देशांत त्याचा चांगला प्रसार झाला आहे. कोटयवधि लोक बौद्ध धर्माचे अनुयायी झालेले आहेत. आणि चांगल्या कर्मांनीं चांगल्या महत्त्वाला पावले आहेत. आज येथें मोकळी ठेवलेली मूर्ति लहानपणांतून मोठेपणा कसा मिळवावा त्याचें आपल्याला प्रत्यक्ष उदाहरण देत आहे; सबब जेव्हां जेव्हां तुमची त्याजवर नजर जाईल, तेव्हां तेव्हां महात्मा बुद्धाचे उच्च गुण आणि विचार कसे होते, त्याचा चांगला विचार करा आणि त्यावरून मिळालेला बोध घेऊन सत्कर्म आचरा, म्हणजे तुम्ही पण महान् पुरुष व्हाल. इतकें सांगून, येथें हजर असलेल्या सर्व गृहस्थांचे मी आभार मानतों.

## १५

**स्थळः**—अमरोळी.

**कालः**—ता. ४ माहे फेब्रुवारी १९११.

**प्रसंगः**—अमरोळी काठी परिषद्.

काठी समाज हा हिंदु जनतेचा एक भाग आहे आणि म्हणून आज मीं सर्व-सामान्य दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे. त्यांतील मुद्दे आपणांला पण लागू पडतील. आपल्या संसारासंबंधीं जे विचार माझ्या मनांत आले आहेत ते आपणांपुढें ठेवतों.

मनुष्यमात्राची नेहमीं इच्छा असते कीं, संपूर्ण सुख—ऐहिक आणि पारमार्थिक मिळावें. सुख कशांत आहे किंवा सुख कशाला म्हणतात यासंबंधीं निरनिराळे विचार

निरनिराळ्या प्रसंगीं मीं व्यक्त केले आहेत. तेच थोड्या अवकाशांत प्रासंगिक फेरफार करून मांडतों. प्रथमावस्थेंत मनुष्य ज्या स्थितींत सुख मानीत होता, तींत आज त्याला सुख वाटत नाहीं हें आपण पाहतों. उच्च जीवन कंठण्यांत व स्वतःबरोबर अखिल जनसमाजाच्या हितासाठीं उपयोगी पडण्यांत खरें सुख आहे, एवढें निर्विवाद आहे. याप्रमाणें असेल तरच जीवनाचें साफल्य आहे असें समजावें.

सुख हें दोन प्रकारचें असतें. आत्मीय आणि परकीय. वास्तविक स्वतःला मानवेल तेंच सुख मिळविण्यांत खरी गोडी आणि आनंद आहे.

सुखप्राप्तीसंबंधीं विचार करतां असें समजून येईल कीं, चांगली वस्तु मिळविण्याच्या कामीं जे प्रयास पडतात व ज्या प्रयत्नांत अधिकाधिक आनंद होत जातो ते प्रयास आणि प्रयत्न सुखाच्या बाबतींतहि आवश्यक आहेत. खऱ्या सुखाची कसोटीच ती आहे.

सुखाच्या मार्गांतील अडचणी जशा प्रथम दूर कराव्या लागतात त्याचप्रमाणें सुखाचीं क्षेत्रेंहि वाढवावीं लागतात. तसेंच सुखप्राप्तीसाठीं कोणतीं साधनें योजावयाचीं त्याचा पण विचार झाला पाहिजे.

अडचणीचे दोन प्रकार असतात : १ नैसर्गिक व २ मनुष्यकृत. धरणीकंप, ज्वालामुखी, पूर, दुष्काळ इ. नैसर्गिक अडचणी होत. या दूर करण्याच्या कामीं पुष्कळदां मानवी प्रयत्न वायां जातात. पण प्राचीन काळापेक्षां आज शास्त्रीय शोधांमुळें— बिनतारी तारायंत्र, विमानें, धरणीकंपाची आगाऊ सूचना देणाऱ्या सिस्मोग्राफसारखीं शास्त्रीय साधनें निर्माण झाल्यानें कांहीं अंशीं तरी या दैवी आपत्तींवर मनुष्याचा इलाज चालूं शकतो. पण कांहीं आपत्ति, कीं ज्यांना आपण दैवी कोप म्हणतों त्या, मानवी प्रयत्नाच्या शास्त्रीय शोधांनाहि दाद देत नाहींत. तथापि भविष्यकाळांत माणूस या प्रसंगांना तोंड देण्याची आगाऊ सिद्धता करून ठेवील किंवा या आपत्तींपासून फारसा अनिष्ट परिणाम होणार नाहीं अशी मोठी दक्षता बाळगील, अशी मला खात्री वाटते. कारण या कमाल पुरुषप्रयत्नाच्या काळांत प्रसंगविशेषीं माणूस काय करील नि काय नाहीं, हें सांगवत नाहीं.

या वेळीं आणखी एक गोष्ट मला आपणांस सांगावीशी वाटते. आतांपावेतों आपण असें मानीत आलों आहोंत कीं, जन्म आणि मरण हीं परमेश्वराच्या आधीन असतात. परंतु आरोग्यशास्त्राच्या आश्रयानें मनुष्याचें आयुर्मान जास्त जास्त किती वाढवितां येईल यासंबंधीं प्रयत्न यूरोप-अमेरिकेंत चालून, मानवी आयुर्मर्यादा हळूहळू मॅसॅच्युसेटमध्यें ४५ वर्षांपर्यंत व स्वीडनमध्यें ५० वर्षांपर्यंत वाढविण्यांत आली आहे. ज्या आपल्या देशांत पूर्वीं शंभर शंभर वर्षें माणसें जगत होतीं असें

आपण ऐकत आलों आहों, त्या भरतभूमींत ती आयुर्मर्यादा २५ वर येऊन ठेपली आहे! विषमासारखे ताप आणि क्षयासारखे भयंकर रोग यांपासून रक्षण करणें मनुष्यशक्तीच्या बाहेर आहे असें आजपर्यंत मानण्यांत येत होतें; पण त्या व्याधींवर सुद्धां वैद्यकशास्त्रांतील शोधांमुळें इलाज चालतात, ही गोष्ट स्पष्ट आहे.

यावरून एवढी गोष्ट सिद्ध होते कीं, मनुष्य आपल्या बुद्धिसामर्थ्यानें दैवी-घटनेवर ताबा चालवून आपलें सामर्थ्य वाढवीत आहे. तें किती वाढवील हें सांगवत नाहीं.

मनुष्यकृत अडचणींत अज्ञान, वाईट चाली, हानिकारक अशा समजुती इत्यादि ओढवणाऱ्या आपत्तींचा समावेश होतो. या आपत्ति आपण स्वतःच ओढवून घेतलेल्या असतात; तेव्हां त्यांचें निवारणहि आपल्या प्रयत्नानें सहज होईल. तेव्हां अशा अडचणी तशाच चालू ठेवणें हें सुखकर होणार नाहीं हें उघड आहे. तरी या बाबतींत पुढारलेल्या इतर देशांचें अनुकरण करून आपण परिश्रमपूर्वक आपल्या अडचणींचें निवारण करणें आपलें कर्तव्य आहे.

वेळेच्या अभावीं वरील सर्व गोष्टींवर न बोलतां, फक्त आपल्या संसारांत काय काय सुधारणा करतां येतील व त्यांत येणाऱ्या मानवसिद्ध अडचणी कशा दूर करतां येतील, यासंबंधीं विचार करणें योग्य होईल.

आपली सांसारिक स्थिति लक्षांत घेतां, तींत सुधारणा घडवून आणण्याच्या आड पुढील गोष्टी येतात असें दिसून येईल.

१ विवाहविषयक :

(अ) बालविवाह,

(आ) विजोड किंवा अयोग्य विवाह,

(इ) स्त्रियांच्या पुनर्विवाहाला प्रतिबंध,

(ई) कन्याविक्रय.

२ खर्चासंबंधीं :

(अ) सीमंत अथवा डोहाळतुली,

(आ) जन्म,

(इ) लग्न,

(ई) उत्तरक्रिया.

३ कित्येक दृढमूल झालेल्या रूढि :

(अ) जातिभेद,

(आ) स्पर्शास्पर्श व विटाळ.

४ फूट.

५ स्त्रियांची निरक्षरता व संसारांत त्यांचें गौण स्थान.

६ सांसारिक बाबतींतहि पूर्ण स्वतंत्रता नसणें.

७ कित्येक दुर्गुण; उदा०— दारू, अफू, इ०

८ कला आणि उद्योगधंदे यांचें शिक्षण न मिळणें.

वर दाखविलेल्या अडचणींपैकीं कांहींचें थोडें विवेचन केलें तर तें अस्थानीं होणार नाहीं. संसारव्यवहारांत निरनिराळया प्रसंगीं कांहीं गोष्टी करण्याचें ठरविलेलें असतें; त्या परिस्थित्यनुरूप पुढें बदलतां पण येतात, हें समजणें मुळींच कठीण नाहीं. कित्येक व्यक्तींच्या बाबतींत अशा जुन्या चाली जुलमाच्या होऊन बसतात व एखाद्यापासून त्याची मालमत्ता बळजबरीनें हिसकावून घेणें जितकें निंद्य आणि दुष्ट वर्तन म्हणतां येईल तितकेंच या बाबतींत समाजांतील व्यक्तींवर होणाऱ्या रूढींच्या जुलमासंबंधीं म्हणतां येईल.

आतां जातिभेदावर दोन शब्द बोलतों. परमेश्वरानें कांहीं जाती निर्माण केल्या नाहींत, किंवा त्यांत भेदहि पाडले नाहींत. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।' असें गीतेंत सांगितलें आहे; म्हणजे जन्मानें जाती पडत नसून गुणानें पडतात.

माणसाची किंमत, त्याचा दर्जा हा त्याच्या सदाचारावर आणि सत्कर्मावर अवलंबून असतो. अमुक एका जातींत त्याचा जन्म झाला म्हणून त्याला मोठा दर्जा आपोआप प्राप्त झाला असें म्हणणें न्यायाला धरून होणार नाहीं.

व्यक्तीच्या सद्गुणाला आणि सद्वर्तनाला मान दिला पाहिजे व त्या बाबतींत त्याचें अनुकरण केलें पाहिजे. उच्च जातींतील माणसांचें अनुकरण अंधपणानें करण्याइतका मूर्खपणा दुसरा नाहीं. आपण आपली सुधारणा योग्य विचार करूनच केली पाहिजे. मी अशी आशा बाळगतों कीं, काठी समाजाची जी सुधारणा घडवून आणण्यासाठीं आजची परिषद भरली आहे ती सुधारणा योग्य विचार करूनच आंखली जाईल. आजच्या उच्च गणल्या गेलेल्या वर्गांत ती प्रचलित आहे म्हणून तिचा अवलंब केला जाणार नाहीं. कारण उच्च जातींतील कित्येक चाली संकुचित वृत्तीच्या द्योतक व हलक्या प्रतीच्या असतात. तेव्हां यासंबंधांत योग्य विचार केल्याखेरीज राहूं नये.

जातिभेदातीत दृष्टि ठेवून जेथें जेथें सद्गुण आणि सद्वर्तन हीं आढळून येतील तेथें तेथें त्यांची योग्य प्रकारें बूज करून तीं वाढीस लावण्याला उत्तेजन दिलें पाहिजे. असें करण्यांतच आपल्या समाजाचें कल्याण आहे.

स्पर्शास्पर्शाची चालहि किती कृत्रिम आहे हें सहज समजणार आहे. कुत्रा, मांजर वगैरे हलक्या प्राण्यांना शिवण्याचा कांहींहि दोष आपण मानीत नाहीं. पण एकाच ईश्वरानें निर्माण केलेल्या आपल्या अमुक जातींतल्या भाऊबंदाला शिवणें हा विटाळ मानतों, हा परमेश्वराच्या घरीं अन्याय होत नसेल का ? या दुष्ट चालीमुळें त्यांच्यासंबंधीं आपली जबाबदारी आपण पार पाडीत नाहीं इतकेंच नव्हे, तर परधर्मांत त्यांना आपल्या हातानें ढकलतों व आपली संख्या कमी कमी करून घेतों. हें कितपत हितावह आहे याचा विचार व्हावा. आपण ज्या जातींना अस्पृश्य मानतों त्यांच्यांत एवढाले थोर पुरुष होऊन गेले आहेत कीं, त्यांच्याविषयीं अखंड पूज्यबुद्धि वाटली पाहिजे. पण कांहीं सारासार विचार न करतां आपण मागली वहिवाट पुढें चालवितों व आपल्या मानवी बुद्धीचें हसें करून घेतों.

सांसारिक गोष्टींत धर्मबंधनांचा परिणाम आपल्या समाजांत चांगला झाला नसून याहि बाबतींत कांहीं प्रगतीचे उपाय आपण चालविले नाहींत.

खरें पाहतां जनतेच्या प्रगतीच्या इतिहासांत अशी एक वेळ येते कीं, ज्या वेळीं सर्व सांसारिक गोष्टींत धार्मिक तत्त्वें ओतप्रोत भरून गेलेलीं असतात. जनता जों जों या स्थितीमध्यें मुरूनच पुढें जाऊं लागते व तिचें ज्ञानभांडार वृद्धिंगत होऊं लागतें, तों तों हीं बंधनें शिथिल होऊन स्वतःच्या कर्तबगारीवर तिचा विश्वास अधिकाधिक बसत जातो; व धार्मिक, आर्थिक, नैतिक, सामाजिक, राजकीय इत्यादि निरनिराळ्या क्षेत्रांची निर्मिति होते. आपापल्या प्रवृत्तीप्रमाणें हीं वेगवेगळीं कार्यक्षेत्रें समृद्ध केलीं पाहिजेत. असें जोंपर्यंत आपण करणार नाहीं तोंपर्यंत आपली उन्नतीहि होणार नाहीं, हें आपल्याला सांगितलें पाहिजे.

काठी समाजाच्या उत्कर्षासाठीं शिक्षणाची वाढ वगैरे उपाय योजण्यासंबंधीं दरबार श्री. वाजसूरवालांनीं जे विचार आपणापुढें मांडले आहेत ते बहुतेक मला मान्य आहेत.

चांगली, बळकट आणि शूर अशी इतिहासप्रसिद्ध काठी जात अवनतीला पोंचावी हें केव्हांहि इष्ट नाहीं, व त्यासाठीं स्वतःची उन्नति करून घेण्यासंबंधीं जे जे प्रयत्न या जातीकडून होतील त्यांना माझी पूर्ण सहानुभूति आहे, याची खात्री पटवून देण्याचें कारण नाहीं.

## १६

**स्थल:—अमरेळी.**

**काल:—ता. ५ माहे फेब्रुवारी १९११.**

**प्रसंग:—अमरेळी येथील शेतकी आणि उद्योगधंदे यांचें प्रदर्शन उघडण्याचा समारंभ.**

सुभे माणिकलाल देसाई आणि सद्गृहस्थ,

शेतकरीवर्ग आणि लिमिटेड पेढी यांनीं जें मानपत्र आतां मला अर्पण केलें व त्याचप्रमाणें येथें जीं भाषणें झालीं त्यांना वेगवेगळीं उत्तरें देणें या प्रसंगीं अशक्य आहे. तेव्हां थोड्या गोष्टींसंबंधीं मला जें बोलावयाचें आहे तें बोलतों. शेतकऱ्यांच्या मागणीसंबंधीं निश्चयात्मक कांहीं सांगणें आज शक्य नाहीं. त्यांचा विचार योग्य प्रसंगीं होईलच. तरी आपणांस असें सांगूं इच्छितों कीं, सरकारनें आपणांस मदत देणें जरूर आहे, हें आपण ध्यानांत ठेवा. तरी पण प्रत्येकानें स्वतःच्या पायावर उभें राहणें फायद्याचें आहे. फाजील मदतीनेंच नुकसान पोंचतें, स्वावलंबीपणा येत नाहीं. ज्याप्रमाणें मुलाला चालण्याची सवय लाविली नाहीं तर त्याला मुळींच चालतां येत नाहीं, त्याप्रमाणें सरकारनें प्रजेला नेहमीं मदत करीत गेल्यास प्रजा दुबळी बनते व तिचें नुकसानच होतें. तेव्हां फाजील मदतीची अपेक्षा करूं नये. हें ऐकून आपण असें समजूं नका कीं, आपल्या अडचणींकडे मी लक्ष देणार नाहीं कीं कांहीं करणार नाहीं. माझें एवढेंच सांगणें आहे कीं, आपण आपल्या दुःखाचें परिमार्जन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

शेतकरी पेढी सध्यां निघालेली आहे. तीसंबंधीं आज मजजवळ कांहीं कागदपत्रें आलेलीं नाहींत; तीं मिळाल्यावर आपल्या तक्रारींचा जरूर विचार करीन. या पेढी-व्यवहाराचा पूर्ण अनुभव आपणांस मिळाला पाहिजे. आपल्या ज्या कांहीं अडचणी असतील त्या अधिकारीवर्ग दूर करील अशी मला खात्री वाटते. मे. काजी व रा. शितोळे यांचीं जीं विद्वत्ताप्रचुर भाषणें झालीं त्यांतील विचार मला बहुतेक पसंत आहेत. अलाहाबादचें प्रदर्शन मी पाहून आलों आहे. पाश्चात्य देशांतील प्रदर्शनेंहि मीं पाहिलीं आहेत. त्यांत व या प्रदर्शनांत अर्थात्च फार अंतर आहे. तथापि अशीं अनेक प्रदर्शनें भरविल्यानें लोकांचा फायदा होतो व विशेषतः कार्यकर्त्यांचा जास्त होतो.

आज आपण नुसता देखावा पाहण्यास आलां आहां असें समजूं नका. याचा आपण योग्य प्रकारें उपयोग करून घ्याल, अशी मी आशा करतों. ईश्वरानें पृथ्वीतलावर ज्या अनेक वस्तु, प्राणी इत्यादि निर्माण केले आहेत, त्यांमध्यें मनुष्यजात सर्वोत्तम आहे; कारण तिला विचारशक्ति दिली आहे; इतर प्राण्यांमध्यें ती नाहीं. तेव्हां माणूस स्वतःच्या अडचणी समजून त्या दूर करूं शकतो. जो स्वतःचें दुःख निवारण करण्याचा प्रयत्न करीत नाहीं त्याला माणूस कां म्हणावें हें समजत नाहीं. तेव्हां आपल्या दुःखाचें निवारण आपणच केलें पाहिजे. नुसता विचार करून न राहतां त्या विचारानुरोधानें दुःखमुक्त होण्याचीं साधनें उपयोजिलीं पाहिजेत. नाहीं तर काय फायदा? तेव्हां चांगला विचार करून कार्यप्रवृत्त व्हावें. सुधारलेली जनता कोणास म्हणतां येईल, याची व्याख्या करणें कठीण आहे. पण एवढें खरें कीं, ईश्वरानें दिलेल्या ज्ञानाचा जे उपयोग करतात तेच लोक सुधारलेले म्हणतां येतील. मनुष्य-प्राण्यानें प्रथमावस्थेंत जनावरें पाळून व नंतर शेतकी करून आपली अधिकाधिक उन्नति ज्ञानाच्या द्वारें करून घेतली आहे. ज्ञानाचा उपयोग केला नाहीं तर आपली स्थिति फार वाईट होईल. दुःस्थितीचीं कारणें अनेक असलीं तरी विद्येचा अभाव हें एक मोठें कारण आहेच. आपण याहिपुढें राजकीय आणि नैतिक गोष्टींत लक्ष घातलें पाहिजे अशी आजची स्थिति आहे. तेव्हां मी आपणांला कळकळीनें सांगतों कीं, आपण आपल्या ज्ञानाचा योग्य उपयोग करण्याबाबत प्रयत्न केला नाहीं तर आजच्यापेक्षांहि आपली स्थिति जास्त वाईट होईल. आपण ज्ञान संपादन केल्यास मलाच नाहीं, पण सर्वांनाच आनंद वाटणार आहे. एवढें सांगून सुभेसाहेबांनीं विनंति केल्याप्रमाणें प्रदर्शन खुलें करीत आहें.

रा. शितोळे यांनीं राज्यांतील शेतकीखात्याच्या कामकाजाविषयीं जें सांगितलें तें ऐकून मला फार संतोष झाला. शेतकी वगैरे खातीं रयतेच्या सुखासाठीं असतात. आपल्या देशाचा मुख्य धंदा म्हणजे शेती. शंभरांपैकीं ऐंशी माणसें शेतकी करतात. तेव्हां आपली सर्व मदार शेतीवर आहे. शेतकीखातें करीत असलेले प्रयत्न यशस्वी झालेले पाहून मला आनंद वाटतो; आणि हा आनंद आणखी जास्त वाढेल अशीहि मला अशा वाटते. शेतीची सुधारणा करण्यासंबंधीं माझे विचार आजकालचे नसून त्यांना पंधरावीस वर्षें झालीं. त्या वेळेपासून मी याविषयीं प्रयत्न करीत आहें. कडी प्रांतांत माझ्या अधिकाऱ्यांनीं कांहीं प्रयत्न केले होते, पण ते सफळ झाले नाहींत. या कामांत अंमलदार उत्साहानें भाग घेतात हें पाहून मला फार आनंद होतो. रयतेनें यांत सहकार्य केलेलें पाहण्यांत मला जास्त आनंद वाटेल. अंमलदार आणि रयत यांनीं परस्पर सहकार्य करून काम करणें जास्त चांगलें.

मानपत्रांत स्थानिक स्वराज्यादि ज्या गोष्टी आहेत त्यांसंबंधीं आपणांशीं जास्त खुलसेवार बोललें पाहिजे. माझ्या रयतेशीं प्रत्यक्ष बोलणें माझें कर्तव्यकर्म आहे.

स्थानिक स्वराज्याचे प्रयत्न सफळ होण्यासाठीं आपण फार परिश्रम घेतले पाहिजेत. यांतील सफलता आपल्याच हातीं आहे. आपल्या न्यायी आणि विवेकबुद्धीवर ती अवलंबून आहे. लोकांची जेवढी लायकी असेल तेवढेच हक्क त्यांना दिले पाहिजेत. योग्यता नसतां केलेलें काम कसें चांगलें होणार? ज्यांत थोड्यांनाच तोशीस लागून जास्तजणांचा फायदा होतो असें काम अवश्य केलें पाहिजे. या विचार-सरणीनें आपल्या अंगीं धैर्य उत्पन्न होऊन त्याचा उपयोग संसाराला पण चांगला होतो. सुखाची इच्छा प्रत्येकाला आहेच. ऐहिक आणि पारमार्थिक असे सुखाचे दोन प्रकार आहेत. पारमार्थिक सुखाचा विचार केल्यास आपली स्थिति फार शोचनीय आहे असें आढळेल. याचें मुख्य कारण आपल्या वाईट चालीरीती. त्या जर आपण टाकणार नाहीं तर आपली स्थिति जास्त वाईट होणार आहे.

## १७

**स्थलः**—वसो.

**कालः**—ता. १३ डिसेंबर सन १९१२.

**प्रसंगः**—सार्वजनिक पुस्तकालयातर्फे मानपत्र समर्पण.

रा. गोपाळदास व इतर सद्गृहस्थ!

या वेळीं २८ वर्षांनंतर येथें आलों व या लायब्ररींत येण्याचा सुयोग लाभला, याबद्दल मला फार आनंद होत आहे. या ठिकाणीं अनेक बैठकींवर जीं अनेक चित्रें, सुभाषितें आणि सूक्ति टांगलेल्या आहेत त्या पाहून मला अमेरिकेंतील वॉशिंग्टन शहराच्या मोठ्या लायब्ररीची आठवण होते. फरक इतकाच कीं, तेथें एकाच मोठ्या बैठकीवर त्या मांडल्या आहेत, तर येथें अनेक बैठका लागल्या; पण दोहोंची रचना सारखीच. ही तुमची मांडणी-पद्धत अशाच उत्साहानें पुढें चालू ठेवली पाहिजे. त्यापासून लायब्ररींत येणाऱ्या लोकांचा मोठा फायदा होणारा आहे. आपल्या प्रत्येक कामाच्या बैठकी वाटल्यास अधिक असू देत, पण कामाचा बनाव अत्युत्तम झाला पाहिजे. प्रजेच्या हितासाठीं सरकार लाखों रुपये खर्च करतें, पण या मोठ्या खर्चा-पासून पुरापूर फायदा घेणें लोकांच्या हातीं असतें. या कामीं लोक चुकले तर तो दोष त्यांचाच म्हटला पाहिजे. हें पुस्तकालय पाहून मला फार आनंद वाटला व गांवच्या

लोकांचा उत्साह दिसून आला. या कामांतहि आपण उत्साहानें भाग घेतां हें पाहून मला फार बरें वाटतें. या वेळीं आपणांस एक गोष्ट सुचवावीशी वाटते ती ही कीं, आपण आपला उत्साह शेवटपर्यंत प्रत्येक क्षणाला कायम राखावा. कांहीं वेळां जर आपणांस सरकारी अंमलदारांकडून चांगलें उत्तेजन मिळालें नाहीं तरीहि आपण निराश होतां कामा नये; तर उलट सरकारला दोष न देतां आपलें काम चालूच ठेविलें पाहिजे. कारण सरकारचीं प्रत्येक कामें अंमलदारांमार्फत होत असून, 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या न्यायानें या अंमलदारांचे स्वभाव पण निरनिराळे असतात. तेव्हां कांहीं अंमलदार चांगले असतील तर कांहीं नसतीलहि; कांहीं तुम्हांला तुमच्या कामांत मदत करतील तर कांहीं आडकाठ्या घालतील. पण म्हणून तुम्ही निराश होतां कामा नये; तर योग्य मार्ग पाहून अडचणींतून पार पडलें पाहिजे. पुन्हा मी आपणांस सांगतों कीं, नुसते आरंभशूर बनूं नका; आजचा उत्साह अगदीं शेवटपर्यंत टिकविलात तर तुम्ही आपला आणि भावी पिढीचा उत्कर्ष करूं शकाल. लोकांच्या ज्ञानांत भर घालून त्यांची जास्त सुधारणा करण्याचें ध्येय तुम्हीं ठेवलें पाहिजे. या लायब्ररीसारखी संस्था तुमचें ज्ञान वाढविणारें एक साधन समजा. झाडाचें उदाहरण घेऊन मी ही गोष्ट स्पष्ट करतों. लोकांच्या ठिकाणची ज्ञान मिळविण्याची इच्छा या झाडाच्या मुळ्या होत. या मुळ्यांवर जे निरनिराळे केस असतात त्या समाजांतील दरएक व्यक्तीच्या इच्छा म्हणून धरतां येतील व एकंदर मुळ्यांचा समूह म्हणजे एकंदर समाजाची ज्ञानलालसा. ही लालसा पुरी करण्यास सरकार जी मदत देतें व जनहितार्थ अन्य कार्यें करतें तो या झाडाचा बुंधा समजावा. जेव्हां झाडाला फांद्या फुटून तें शोभिवंत दिसतें, तेव्हांच तें जिवंत आहे असें समजलें पाहिजे; याचप्रमाणें अशा पुस्तकालयासारख्या संस्था समाजाचा जिवंतपणा दाखवितात. त्याशिवाय समाज मृतवत् होऊन पडेल. ही तुलना पुढें नेऊन असें म्हणतां येईल कीं, जनसमूहाचें शारीरिक, मानसिक आणि नैतिक सुख म्हणजेच झाडाचें फळ— अंतिम पूर्णावस्था होय. लोकांची ज्ञानलालसा आणि तिच्या सिद्धीसाठीं सरकारी मदत यांपासून या पुस्तकालयासारख्या संस्था वाढून त्यांना जनसुखाचीं फळें येतात एवढेंच तात्पर्य झाडाच्या दृष्टांतापासून घ्यावयाचें. झाडाचें साफल्य जसें फळांत, तसें राजा आणि प्रजा यांच्या कार्यांचें साफल्य जनसुखांत दृग्गोचर झालें पाहिजे. रा. गोपाळदास यांची या पुस्तकालयाच्या व्यवस्थेसाठीं जी एक हजार रुपयांची देणगी जाहीर करण्यांत आली ती ऐकून मला फार आनंद झाला. या उदार देणगीबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. इतरांकडून त्यांचें अनुकरण होईल अशी मला आशा आहे. शेवटीं पुन्हा एकदां ही लायब्ररी पाहून मला जो आनंद आणि संतोष झाला तो प्रदर्शित करून मी अशी आशा करतों कीं, लोककल्याणाची आपली सत्प्रवृत्ति अखंड टिकून त्या दृष्टीनें आपण प्रयत्न करीत राहाल.

१८

**स्थल:—भाद्रण.**

**काल:—एप्रिल १९१७.**

**प्रसंग:—भाद्रण कन्याशाळेचा समारंभ.**

ठाणे.

सद्गृहस्थ हो !

भाद्रणच्या लोकांची माझ्यावरची एवढी निष्ठा, प्रेम आणि भक्ति पाहून मला फार आनंद झाला आहे. भाद्रण गांवच्या सार्वजनिक संस्था उपयुक्त असून मोठ्या उत्साहानें चालविल्या आहेत, याचा मला आनंद आहे. त्यांपासून लोकांचें खरें कल्याण व्हावें असा मी मनःपूर्वक आशीर्वाद देतों.

भाद्रणमध्यें शिक्षणाचा एवढा प्रसार झाला याबद्दल आपलें अभिनंदन केलें पाहिजे. कन्याशाळेसाठीं नवीन इमारत रा. तुळसीभाईंनीं मोठ्या उदारपणें दिली ही फार संतोषाची गोष्ट आहे. मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न जितका गहन आहे तितकाच तो उपयोगी पण आहे. मोठ्या वयापर्यंत मुलींनीं आपला अभ्यास चालू ठेवला नाहीं, तर त्यांना भरीव शिक्षण देणें अशक्य होईल. तीनचार वर्षांच्या अभ्यासानें आयुष्यावर चांगला परिणाम होत नाहीं; तेव्हां अर्धवट शिक्षणाचा परिणाम कोठें वाईट दिसून आल्यास तो शिक्षणाचा दोष नाहीं. परंतु आपली रूढीच दोषी आहे. जुने रीतिरिवाज आणि वाईट रूढि यांची जोंपर्यंत आपल्यावर जबरदस्त छाप आहे तोंपर्यंत अज्ञान, बरसलेपणा आणि संकुचित विचार यांच्या तडाख्यांतून आपण कधीं सुटत नाहीं. तेव्हां त्यांपासून मुक्त होऊन आपल्या मुलींना मोठ्या वयापर्यंत शिकविलें पाहिजे. तेव्हां अशा लोककल्याणाच्या संस्थांवर होणाऱ्या मोठ्या खर्चाचें खरोखर सार्थक होणार आहे.

रा. तुळशीभाई यांच्या अनुकरणीय औदार्यामुळें आपल्या शहरांतील इंग्रजी शाळेला हायस्कूलचा दर्जा प्राप्त होत आहे, ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. पेटलाद तालुक्यांत याप्रमाणें हायस्कुलांची संख्या वाढती आहे. भरीव शिक्षण देण्यासाठीं थोड्याच ठिकाणीं चांगल्या नमुनेदार उच्च शिक्षणसंस्था, उत्तम शिक्षक आणि उत्कृष्ट शिक्षणसाहित्य हीं ठेवावींत, कीं अनेक ठिकाणीं अपुऱ्या शिक्षणाच्या शाळा चालवाव्यात, हा मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. 'विद्या बंधुजनो विदेशगमने' या न्यायानें आपल्या तालुक्यांतील परदेशगमन करणाऱ्या बहुसंख्याक

लोकांना इंग्रजीचें उत्तम ज्ञान देणाऱ्या तीन-चार संस्था तयार झाल्या तर तें इष्टच म्हणतां येईल.

भाद्रण गांव दरएक गोष्टींत पुढें आहे. उदाहरणार्थ, कन्याशाळा, हायस्कूल, स्वच्छ पिण्याच्या पाण्याचें तळें, ड्रेनेज, टाउन हॉल, सार्वजनिक बगीचा इत्यादि. ज्या शहरांत पाण्याची चांगली व्यवस्था केली आहे, तेथें सांडपाण्याची व्यवस्था नीट नसेल तर तें लोकांना अपायकारक होतें. आपण हें लक्षांत बाळगून राजधानी-बडोदें येथल्याप्रमाणें ड्रेनेजचें काम येथेंहि केलें आहे, हें आपणांस खरोखर भूषण आहे. पुन्हा लोकांच्या करमणुकीसाठीं बागहि केली आहे व पंचायतीच्या व्यवहारासाठीं एक चांगला टाउन हॉलहि बांधला आहे. या कामांत आपला जो उत्साह आणि योग्यता दिसून आली त्यांजबद्दल आपली वाहवा करणें जरूर आहे. भाद्रण तालुक्याची सतत वृद्धि व्हावी, लोकांचें आयुरारोग्य वाढून त्यांचा आर्थिक आणि मानसिक उत्कर्ष व्हावा व त्यांमध्यें राजभक्ति चांगली बाणावी, या सर्व बाबतींत दुसऱ्यांना उदाहरणादाखल हा तालुका व्हावा असा माझा आपल्याला खरा आशीर्वाद आहे. परमेश्वर आपणांला सुखी ठेवो.

## १९

**स्थलः**—मेहसाणा.

**कालः**—ता. २३ फेब्रुवारी १९२१.

**प्रसंगः**—मेहसाणा येथील वॉटर वर्क्सच्या पायाभरणीचा मुहूर्त.

शहरसुधराई खात्यांतील सद्गृहस्थ आणि नागरिक!

या प्रसंगीं दोन शब्द सांगण्यास मला आनंद वाटत आहे. प्रथम हें लोकोपयोगी व जबर खर्चाचें काम अंगावर घेतल्याबद्दल आपलें अभिनंदन करतों. मेहसाणा सुधराई खातें अद्याप बाल्यावस्थेंत आहे, तरी सुद्धां हिंमत धरून या शहराला पाणी देण्याची जी योजना आपण आंखली आहे, तीबद्दल आपली वाहवा करणें योग्य आहे.

लोकांना स्वच्छ पाणी मुबलक पुरविणें हें प्रत्येक सुधराईचें पहिलें कर्तव्यकर्म आहे. अस्वच्छ--घाण पाण्यापासून आरोग्याची केवढी हानि होते, हें या समाजाला तरी विशेष पटवून देण्याचें कारण नाहीं. वाईट पाण्यापासून शरीरांत नारूसारखे रोग होतात, हें आपणास चांगलें माहीतच आहे. पण त्याशिवाय कॉलरा,

विषम व इतर विषारी ताप आणि किती तरी भयंकर रोग पाणी बिघडल्यानें होत असतात; याची जाणीव आपणास असली पाहिजे. याचें उदाहरण म्हणून पाटनगर–बडोद्याचें देतों. १८९१ सालीं बडोद्यास श्री. सयाजी सरोवरांतून पाणी घेऊन नळ घातल्यापासून दरसाल उद्भवणारी भयंकर कॉलऱ्याची सांथ बंद झाली. आपल्या वस्तीला शुद्ध आणि निरोगी पाणी पुरविणें हें प्रत्येक सुधराईचें पवित्र कर्तव्य आहे. या कामीं तत्परता दाखविल्याबद्दल मला फार संतोष होतो.

आपल्या राज्यांत आतांपावेतों सात-आठ शहरांतून पाण्याची चांगली व्यवस्था झालेली आहे. बडोदें शहराशिवाय शिनोर, भाद्रण, पाटण, संखेडा, सोजीत्रा, कठोर व व्यारा या ठिकाणीं पाण्यासाठीं बांधकामें आहेत; व मेहसाणा, विसनगर सिद्धपूर, नवसारी, द्वारका व सोनगड या ठिकाणींहि अशींच कामें करण्यासंबंधीं इंजिनियर खात्याच्या योजना तयार झाल्या आहेत. पण गेल्या महायुद्धामुळें भयंकर महागाई बोकाळल्यानें नळ, पंप व इतर सामुग्री यांच्या किंमती पराकाष्ठेच्या चढल्या आहेत. यामुळें एकदम या सर्व गांवच्या योजना अंमलांत आणतां आल्या नाहींत. आजची मेहसाण्याची योजना सुरू करण्याचा हा समारंभ आनंदाचा आहे. यापुढें पेटलाद, डभोई, पादरा, कडी, अमरेळी यांच्या ज्या मागण्या आल्या आहेत त्याहि हळूहळू पुऱ्या होतील.

सुधराई खात्याच्या आरंभींच्या कामासाठीं जो खर्च लागतो तो पण आपण भागविण्यास तयार असलें पाहिजे. सुधराई आणि स्थानिक कारभार यांसंबंधीं हक्क व अधिकार मिळविल्यावर पाणीपुरवठा आणि ड्रेनेज यांची व्यवस्था करण्याची जबाबदारी आपोआप शिरावर येऊन पडतेच. ही जबाबदारी आपण पत्करल्याबद्दल आपणांस धन्यवाद दिले पाहिजेत. सुधराई खात्याला जेव्हां पैशाचा तुटवडा पडतो तेव्हां सरकार त्याला मदत करण्यास नेहमीं तयार असतेंच. पूर्वीं अशा पाण्याच्या बांधकामासाठीं सरकार $\frac{1}{4}$ रक्कम देणगी देत असे व उरलेली $\frac{3}{4}$ रक्कम, ४ टक्के व्याजानें कर्जाऊ देत असे. हल्लीं महागाई ओळखून $\frac{1}{2}$ रक्कम देणगी म्हणून व बाकीची $\frac{1}{2}$ रक्कम ४ टक्के व्याजानें कर्जाऊ देण्याचा सरकारी हुकूम झाला आहे. याहीपेक्षां अधिक मदत स्थानिक परिस्थिति पाहून देण्यास सरकार अक्षय तयार असतें. सोनगड आणि व्यारा या गांवांना सरकारी खर्चानें पाणी देण्याचा हुकूम केला आहे. यासंबंधांत एवढें लक्षांत ठेवावें कीं, आपली शक्ति केवढी आहे याचा निःपक्षपातीपणानें अदमास घेऊन मग तेवढीच सरकारी मदत मागावी. स्वावलंबन आणि स्वतंत्रता अंगीं बाणून घेतली पाहिजे. स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न केल्यावरच मुलाला चालतांपळतां येत असतें. आपल्याला ऐकून आनंद आणि आश्चर्य वाटेल कीं, वरीयाव आणि खोलवड यांसारख्या लहान गांवांतूनहि लाख-लाख रुपये देणारे उदार गृहस्थ पुढें आले आहेत.

हल्लीं असलीं पाण्याचीं बांधकामें करण्यास फार खर्च येतो, तेव्हां याला उपाय असा कीं, कमी खर्चाच्या योजना तयार कराव्या. सर्व शहरांतून घरोघर पाणी पुरविण्याची जरूरी नाहीं. लहान रस्त्यांतून थोडथोड्या अंतरावर पाण्याचे नळ बांधून काढल्यास लोकांची पाण्याची हाकाटी बरीचशी कमी होईल. मेहसाणा शहरांत पिण्याच्या पाण्याची टंचाई तर सुप्रसिद्धच आहे. यासाठीं ठिकठिकाणीं असे नळ घातल्यास खर्च आटोक्यांत येईल. ही नुसती सूचना आहे, यावर पूर्ण विचार झाला पाहिजे. थोड्या खर्चाची पाणीपुरवठ्याची योजना व सांडपाण्याची तरतूद, या-संबंधींचें महत्त्व आपणांस पटवून दिलेंच आहे. पाटण शहरांत घरोघर पाण्याचे नळ घेतल्यानें ओल आणि गारठा वाढला व डांसांचा उपद्रव सुरू झाला हें प्रसिद्धच आहे. गल्ल्यांतून जर असे रस्त्यांत उभे नळ घातले तर ड्रेनेजचा खर्च पण थोडा येतो. आपल्याकडील लहानसहान गांवांतून ड्रेनेज कोणत्या प्रकारांनीं करतां येईल याबाबत मुंबई सरकारचे तज्ज्ञ इंजिनियर मि. बोनबोक यांचा सल्ला घेतलेला आहे. ह्या प्रमाणें भाद्रण गांवचा विचार केला आहे व पाटणचाहि लवकरच विचार करण्यांत येईल. जमिनीच्या पोटांत गटारें बांधण्याची योजना फार खर्चाची असून, तीं साफ ठेवण्यासाठीं पुरेसें पाणी नसल्यास भयंकर रोग उद्भवण्याची धास्ती असते. उघडीं गटारें पण वरून घाण दिसतात व तींहि साफ ठेवण्याचा त्रास होतो. तेव्हां कमी खर्चांत कोणतें ड्रेनेज होईल याचा प्रथम विचार करून मग पाणीपुरवठ्याची योजना नक्की केली पाहिजे.

या सूचना लक्षांत घेऊन मग पाणीपुरवठ्याच्या बांधकामाची योजना तयार केल्यास व सरकारी मदतीची योग्य विनंति पाठविल्यास, तिचा सहानुभूतीनें स्वीकार करण्यास माझी नेहमीं तयारी असते. आपल्या निमंत्रणाबद्दल व गांवचा उत्साह पाहून आपणाला धन्यवाद देतों व परमेश्वर आपल्या शहराचा उत्कर्ष करो अशी इच्छा करतों.

## २०

**स्थलः**—पाटण.

**कालः**—ता. २४ माहे फेब्रुवारी सन १९२१.

**प्रसंगः**—शेठ किलाचंद देवचंद यांच्या देणगी-रकमेंतून बांधलेलें 'श्री. ज्ञानबाई प्रसूति-गृह' उघडण्याचा समारंभ.

सभ्य स्त्री-पुरुष हो !

आपणां सर्वांच्या समक्ष हें 'शेठ किलाचंद देवचंद प्रसूतिगृह' आज खुलें करण्यास मला फार आनंद होत आहे. मला एवढीच दिलगिरी वाटते कीं हें काम यापूर्वींच व्हावयास पाहिजे होतें. पण महायुद्धामुळें बांधकामाचें साहित्य मिळण्यास बरीच अडचण पडल्यामुळें विलंब लागला व [illegible]हाजिर[illegible]णगी देणाऱ्या सद्गृहस्थांची थोडी निराशा कशी झाली हें मी च[illegible] ओळखतों.

ज्यांनीं मोठ्या उत्साहानें दे[illegible]रून [illegible] समारं[illegible]चें कारण घडवून आणलें त्यांची मी मोठी प्रशंसा करतों व अशी इच्छा करतों कीं, या उत्साहाचें अनुकरण मोठ्या अहमहमिकेनें राज्यांत सर्वत्र व्हावें. अशा गोष्टीचा मला नेहमीं आनंद होत असतो. गेल्या दहा वर्षांत आपल्या वैद्यकीय संस्थांचा मोठा विकास झाला असून माझ्या लोकांच्या ठिकाणींहि वैद्यकीय इलाजांविषयीं मोठी जागृति झाली आहे, हें येथें सांगण्यास मला आनंद होत आहे. हा आनंद व्यक्त करण्यासाठीं, व डॉ. मेयर यांनीं जी मनापासून या प्रसूतिगृहाच्या कामांत काळजी घेतली त्याबद्दल त्यांची प्रशंसा करण्यासाठीं, या संधीचा मी फायदा घेतों. राज्यांत मोठमोठ्याच शहरांतून फक्त आधुनिक साधनांनीं सज्ज अशा वैद्यकीय संस्था असाव्यात असें नाहीं, तर प्रत्येक तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं अनुकूलतेप्रमाणें लहान दवाखाने व प्रसूतिगृहें असावींत व प्रत्येक मोठ्या गांवीं औषधालयें आणि शिकलेल्या सुईणी असाव्यात, अशी माझी इच्छा आहे.

खऱ्या राष्ट्रीयत्वाचा विकास आणि राष्ट्राचा उत्कर्ष जो दिसून येतो, तो मातृत्व आणि बालसंगोपन यांतच होय. पण हिंदुस्थानांत तर बालमृत्यूचें प्रमाण पाहून मोठा धक्काच बसेल. माता राष्ट्रबालकांना जन्म देतात तेव्हां त्यांच्या प्रसूति-वेदना कमी करणें आणि जन्मलेल्या मुलांची योग्य वाढ होईल अशी व्यवस्था ठेवणें हा आपला सर्वांचा पवित्र धर्म आहे. तेव्हां प्रत्येकानें आपल्या शक्तीप्रमाणें

हल्लीं असलीं पाण्याचीं बांधकामें करण्यास फार खर्च येतो, तेव्हां याला उपाय असा कीं, कमी खर्चाच्या योजना तयार कराव्या. सर्व शहरांतून घरोघर पाणी पुरविण्याची जरूरी नाहीं. लहान रस्त्यांतून थोडथोड्या अंतरावर पाण्याचे नळ बांधून काढल्यास लोकांची पाण्याची हाकाटी बरीचशी कमी होईल. मेहसाणा शहरांत पिण्याच्या पाण्याची टंचाई तर सुप्रसिद्धच आहे. यासाठीं ठिकठिकाणीं असे नळ घातल्यास खर्च आटोक्यांत येईल. ही नुसती सूचना आहे, यावर पूर्ण विचार झाला पाहिजे. थोड्या खर्चाची पाणीपुरवठ्याची योजना व सांडपाण्याची तरतूद, या-संबंधींचें महत्त्व आपणांस पटवून दिलेंच आहे. पाटण शहरांत घरोघर पाण्याचे नळ घेतल्यानें ओल आणि गारठा वाढला व डांसांचा उपद्रव सुरू झाला हें प्रसिद्धच आहे. गल्ल्यांतून जर असे रस्त्यांत उभे नळ घातले तर ड्रेनेजचा खर्च पण थोडा येतो. आपल्याकडील लहानसहान गांवांतून ड्रेनेज कोणत्या प्रकारांनीं करतां येईल याबाबत मुंबई सरकारचे तज्ज्ञ इंजिनियर मि. बोनबोक यांचा सल्ला घेतलेला आहे. ह्या प्रमाणें भाद्रण गांवचा विचार केला आहे व पाटणचाहि लवकरच विचार करण्यांत येईल. जमिनीच्या पोटांत गटारें बांधण्याची योजना फार खर्चाची असून, तीं साफ ठेवण्यासाठीं पुरेसें पाणी नसल्यास भयंकर रोग उद्भवण्याची धास्ती असते. उघडीं गटारें पण वरून घाण दिसतात व तींहि साफ ठेवण्याचा त्रास होतो. तेव्हां कमी खर्चांत कोणतें ड्रेनेज होईल याचा प्रथम विचार करून मग पाणीपुरवठ्याची योजना नक्की केली पाहिजे.

या सूचना लक्षांत घेऊन मग पाणीपुरवठ्याच्या बांधकामाची योजना तयार केल्यास व सरकारी मदतीची योग्य विनंति पाठविल्यास, तिचा सहानुभूतीनें स्वीकार करण्यास माझी नेहमीं तयारी असते. आपल्या निमंत्रणाबद्दल व गांवचा उत्साह पाहून आपणाला धन्यवाद देतों व परमेश्वर आपल्या शहराचा उत्कर्ष करो अशी इच्छा करतों.

## २०

**स्थल:—पाटण.**

**काल:—ता. २४ माहे फेब्रुवारी सन १९२१.**

**प्रसंग:—शेठ किलाचंद देवचंद यांच्या देणगी-रकमेंतून बांधलेलें 'श्री. ज्ञानबाई प्रसूति-गृह' उघडण्याचा समारंभ.**

सभ्य स्त्री-पुरुष हो !

आपणां सर्वांच्या समक्ष हें 'शेठ किलाचंद देवचंद प्रसूतिगृह' आज खुलें करण्यास मला फार आनंद होत आहे. मला एवढीच दिलगिरी वाटते कीं, हें काम यापूर्वीच व्हावयास पाहिजे होतें. पण महायुद्धामुळें बांधकामाचें साहित्य मिळण्यास बरीच अडचण पडल्यामुळें विलंब लागला व साहजिकच देणगी देणाऱ्या सद्गृहस्थांची थोडी निराशा कशी झाली, हें मी चांगलें ओळखतों.

ज्यांनीं मोठ्या उत्साहानें देणगी देऊन या समारंभाचें कारण घडवून आणलें त्यांची मी मोठी प्रशंसा करतों व अशी इच्छा करतों कीं, या उत्साहाचें अनुकरण मोठ्या अहमहमिकेनें राज्यांत सर्वत्र व्हावें. अशा गोष्टीचा मला नेहमीं आनंद होत असतो. गेल्या दहा वर्षांत आपल्या वैद्यकीय संस्थांचा मोठा विकास झाला असून माझ्या लोकांच्या ठिकाणींहि वैद्यकीय इलाजांविषयीं मोठी जागृति झाली आहे, हें येथें सांगण्यास मला आनंद होत आहे. हा आनंद व्यक्त करण्यासाठीं, व डॉ. मेयर यांनीं जी मनापासून या प्रसूतिगृहाच्या कामांत काळजी घेतली त्याबद्दल त्यांची प्रशंसा करण्यासाठीं, या संधीचा मी फायदा घेतों. राज्यांत मोठमोठ्याच शहरांतून फक्त आधुनिक साधनांनीं सज्ज अशा वैद्यकीय संस्था असाव्यात असें नाहीं, तर प्रत्येक तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं अनुकूलतेप्रमाणें लहान दवाखाने व प्रसूतिगृहें असावींत व प्रत्येक मोठ्या गांवीं औषधालयें आणि शिकलेल्या सुईणी असाव्यात, अशी माझी इच्छा आहे.

खऱ्या राष्ट्रीयत्वाचा विकास आणि राष्ट्राचा उत्कर्ष जो दिसून येतो, तो मातृत्व आणि बालसंगोपन यांतच होय. पण हिंदुस्थानांत तर बालमृत्यूचें प्रमाण पाहून मोठा धक्काच बसेल. माता राष्ट्रबालकांना जन्म देतात तेव्हां त्यांच्या प्रसूति-वेदना कमी करणें आणि जन्मलेल्या मुलांची योग्य वाढ होईल अशी व्यवस्था ठेवणें हा आपला सर्वांचा पवित्र धर्म आहे. तेव्हां प्रत्येकानें आपल्या शक्तीप्रमाणें

या कामीं साहाय्य केलें पाहिजे. भावी प्रजेचें आपण रक्षक आहों तेव्हां त्याबाबत आपली जबाबदारी आपण नीट ओळखली पाहिजे.

माझें हें पाटण शहर फार भाग्यशाली म्हटलें पाहिजे. कारण या ठिकाणीं शेठ किलाचंद देवचंद, शेठ न्याहालचंद लल्लूचंद, उजमशी पितांबर, विठ्ठलदास चतुर्भुज यांसारखे प्रसिद्ध दाते आहेत. पुन्हा जेव्हां मी येईन त्या वेळीं 'शेठ न्याहालचंद लल्लूचंद पाटण जनरल हॉस्पिटल' उघडण्याची संधि मला मिळेल अशी मी आशा करतों. त्याच्या पायाभरणीचा समारंभ याच भेटींत योजलेला आहे, याबद्दल मला आनंद वाटतो. या इस्पितळाचें बांधकाम लवकर करण्याविषयीं सरकारी बांधकाम खात्याला माझी विशेष सूचना आहे. या वेळीं येथल्या उदार दात्यांना माझी अशी मुद्दाम सांगणी आहे कीं, चांगली जागा मिळेपर्यंत वाट पाहावी, दाट वस्तींत वाईट जागीं ही इमारत बांधण्याचा आग्रह धरूं नये. अशा इमारतीचें काम करतांना भविष्यकाळावरहि नजर दिली पाहिजे. नुसता आजच्याच अडचणींचा विचार करून भागणार नाहीं. शहरचा भावी विस्तार, स्वच्छता आणि सुधारणा या बाबतींतील भावी काळच्या गरजा व आरोग्याला आवश्यक असणारी मोकळी जागा इत्यादींचा विचार ही इमारतीची जागा ठरवितांना केला पाहिजे.

मला अशी पण आशा आहे कीं, लोक अशा संस्थांचा पुरापूर फायदा घेतील, आरोग्य मंडळी स्थापतील, स्त्री-समित्या उघडतील व आमच्या वैद्यकीय व्यवस्थेच्या कार्यांत आम्हांला साहाय्य देतील. आमचें वैद्यकीय खातें पण उत्तम व मेहनती डॉक्टर—स्त्री-पुरुष तयार करील व अशा संस्थांना लागणारीं चांगलीं, दयाळु आणि कर्तबगार माणसें मिळवून देईल. यांखेरीज लोकांचा विश्वास अशा नवीन पद्धतीवर बसणार नाहीं. तेव्हां सर्वांचें सहकार्य पाहिजे. शेवटीं 'शेठ किलाचंद प्रसूतिगृह' रीतसर खुलें झाल्याचें जाहीर करतों.

२१

**स्थलः—बडोदें.**

**कालः—ता. २६ माहे नोव्हेंबर सन १९२१.**

**प्रसंगः—दहावें मराठी साहित्य-संमेलन***.

श्रीमत् शंकराचार्य महाराज व सभ्य जनहो!

आज सर्व आपण येथें साहित्यासारख्या उच्च विषयाचा विचार करण्याकरितां जमलां आहां, हें पाहून मला फार संतोष होतो, आणि आपणांस या उद्योगांत चांगलें यश येवो, असें चिंतितों. या प्रसंगास मीं हजर राहावें म्हणून संमेलनाची वेळ आपण माझ्या सोयीची ठरविल्याबद्दल मी आपला फार आभारी आहे. या विषयाबद्दल मला किती प्रेम व कळकळ वाटते, हें मीं पुनरपि सांगण्याचें प्रयोजन नाहीं. आज चाळीस वर्षें यासंबंधानें माझें थोडेबहुत प्रयत्न चालू आहेत, आणि माझे विचारहि पूर्वी पुष्कळदां प्रकट झालेले आहेत. लोकशिक्षण हेंच उन्नतीचें मुख्य साधन असून, त्यासंबंधानें मी बडोदें राज्यांत नाना प्रकारचे प्रयत्न करीत आलों आहें. अनेक भाषांच्या अडचणीमुळें हा फैलाव व्हावा तसा होत नाहीं, म्हणून एक हिंदी अगर जितक्या कमी भाषा सामान्य व्यवहाराच्या होतील तितक्या करणें जरूर वाटलें; आणि बडोद्यांतील शाळांत हिंदी भाषा सुरू करण्यांत आली. सक्तीचें शिक्षण देण्याचा उपक्रम कैक वर्षें चालला आहे. त्याप्रमाणें पुस्तकालयांची स्थापना होऊन राज्यांतील बहुतेक मोठ्या गावीं हल्लीं पुस्तकालयें आहेत. परंतु हे सर्व प्रयत्न भाषेंत चांगले ग्रंथ नसल्यामुळें विफल होतात. अर्थात् निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर पुस्तकें तयार झाल्याशिवाय शिक्षणाचें कार्य सिद्धीस जाणार नाहीं. भाषेंत जर चागले ग्रंथ निपजले नाहींत, तर लोकशिक्षणाचे सर्व प्रयत्न लंगडे पडतात, इतकेंच नव्हे, तर चांगलीं पुस्तकें समाजास न मिळाल्यानें लोकांची प्रवृत्ति सदोष पुस्तकें वाचण्याकडे होते. मनुष्यामध्यें तृषा उत्पन्न करावी आणि ती भागविण्याचें साधन देऊं नये तशांतला हा प्रकार आहे. अर्थात् उपयुक्त ग्रंथ उत्पन्न करण्याची निकड केवढी आहे, हें आपल्या निदर्शनास येईल.

---

* या संमेलनाचे अध्यक्ष रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए. एल्एल्. बी. हे होते.

देशी भाषेंत चांगले ग्रंथ तयार करण्यासंबंधानें माझे प्रयत्न फार वर्षांपासून चालू आहेत, हें आपणांस महशूर आहेच.† अनेक प्रकारें उत्तेजन देऊन व पुष्कळ खर्च करून मी या दिशेनें होईल तितका प्रयत्न करीत आलों आहे. सन १९०९ सालीं हें आपलें संमेलन बडोद्यास भरलें, आणि लगेच पुढें गुजराथी संमेलन झालें, तेव्हां ग्रंथप्रसाराकरितां दोन लाख रुपयांची रक्कम मीं निराळी काढून ठेविली आणि त्याच्या व्याजामधून चांगले ग्रंथ तयार करण्याची स्वतंत्र योजना आमच्या शाळाखात्यांत करण्यांत आली. ह्या योजनेनें आजपावेतों जरी सुमारें ७५ लहान मोठे ग्रंथ गुजराथींत व मराठींत मिळून तयार झाले आहेत, तरी या प्रयत्नास चांगलें यश येत नाहीं हें पाहून मनास अत्यंत उद्वेग होतो. हा प्रयत्न सिद्धीस न जाण्याचीं कारणें कांहींहि असोत, परंतु लोकांनीं थोडाबहुत तरी स्वार्थत्याग करून या कामांत भाग घेतल्याशिवाय नुसत्या एकांगीं सरकारी प्रयत्नानें हें कार्य सिद्धीस जाईल असें मला वाटत नाहीं. पहिल्या प्रतीच्या विद्वानांस भरपूर वेतन देऊन ग्रंथ लिहविण्याजोगी आज आपली सांपत्तिक स्थिति नाहीं. असे विद्वान् गृहस्थ चांगले ग्रंथ केवळ परोपकारार्थ लिहितील तरच कांहीं तरी उपयोग होईल. पृथ्वीवर जे चिरकालीन योग्यतेचे उत्कृष्ट ग्रंथ विद्यमान आहेत ते **द्रव्याच्या क्षुद्र लोभानें निर्माण झाले नाहींत,** हें मीं आपणांस सांगावेंसें नाहीं.

हल्लीं छापण्याच्या किंमती वाढल्यामुळें चांगले ग्रंथ बाहेर पडूं शकत नाहींत. मला असें कळतें कीं, आमच्या शाळाखात्यांत आज सुमारें २५० ग्रंथ छापण्यास साधन नसल्यामुळें पडून आहेत. अशाहि अडचणींतून मोठ्या खर्चानें ते छापून काढल्यास, त्यांची किंमत भारी होऊन, त्यांचा प्रसार होत नाहीं; त्यामुळें ते छापले न छापले सारखेच असा परिणाम होतो. धनिकांजवळ द्रव्य आहे, विद्वानांजवळ ज्ञान व ग्रंथसामुग्री आहे, लोकांची वाचनाची आस्था पाहिजे तेवढी नसली तरी वाढत्या प्रमाणावर आहे, लहान-मोठ्या छापखान्यांजवळ छापण्याचीं साधनेंहि कमी-अधिक आहेत; परंतु अशा सर्व विस्कळित साहित्यास संहत स्वरूप देऊन सर्वांचा मिळून एकभावनेचा प्रयत्न झाल्याशिवाय नुसत्या शाब्दिक चर्चेनें फलप्राप्ति होणें शक्य नाहीं. ग्रंथकार व व्यवहार जाणणारे धंदेवाले लोक यांचें या कामीं संगनमत झालें तरच चांगले ग्रंथ लोकांस स्वस्त किंमतींत मिळूं शकतील. वेळ मोठी आणी बाणीची आहे, जीवनकलह अत्यंत तीव्र झाला आहे, लोकांत ज्ञानतृष्णा वाढत आहे. पृथ्वीवरील समर्थ राष्ट्रें आपलें बुद्धिसर्वस्व आपापल्या स्वार्थाकरितां उपयोजित आहेत.

---

† महाराष्ट्र ग्रंथमाला, सयाजी-ज्ञानमंजूषा, सयाजी साहित्यमाला, सयाजी बालज्ञानमाला, इत्यादि अनेक मालांतून श्री. महाराजसाहेबांनीं हजारों रुपये खर्च करून, शेंकडों ग्रंथ लिहिविले आहेत.

अशा संधीस आपणहि आपलें सामर्थ्य जोरानें एकवटून उद्योग केला पाहिजे. विद्वानांनीं, विचारवंतांनीं, धनिकांनीं, सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्थांनीं एकमतानें हें कार्य सत्वर तडीस न नेलें तर आपला निभाव लागणें कठीण. **मी आशावादी आहे,** परंतु विस्कळित स्थिति पाहून, कोणाचीहि हिंमत खचल्याशिवाय राहणार नाहीं.

वस्तुस्थितीहि आपणांस फारशी अनुकूल नाहीं. आमच्यासारख्या व्यक्तींच्या हातांत जें काय सामर्थ्य असतें तें दोन किंवा तीन भाषांत विभागलें गेल्यामुळें दृश्यकार्य फारच अल्प होतें. एका भाषेंत जें काम व्हावें तें दोन भाषांत विभागलें जातें आणि राष्ट्रीय भावना कायम ठेवण्याकरितां हिंदी भाषेस स्थळ देणें भाग पडतें. म्हणून निरनिराळ्या भाषांच्या अभिमान्यांनीं आपापल्यापुरता मुख्य प्रयत्न करून, शिवाय इतर प्रमुख भाषांशीं स्नेहभावानें देवघेव केली पाहिजे. प्रत्येक भाषेची साहित्यपरिषद् विस्तृत व भक्कम असावी आणि अशा प्रांतिक परिषदांनीं सहकार्य करून एकमेकांच्या उद्योगाची विनिमय करण्याची सोय आपल्या उद्योगांत अवश्य करावी.

आपापल्या मातृभाषेंतून शिक्षण देण्याची आवश्यकता अलीकडे सर्वत्र पटत चालली आहे, ही संतोषाची गोष्ट आहे. यासंबंधानें माझें लक्ष फार वर्षांपासून होतें. कलाभवनांत सर्व शिक्षण स्वभाषेंतच दिलें जातें, परंतु मुख्य अडचण भरपूर ग्रंथसंग्रहाची आहे. आज जर सर्व अभ्यासक्रम मराठींतून किंवा गुजराथींतून चालवूं म्हटलें तर अनेक विषयांत तें अशक्य होईल. सबब निरनिराळ्या शिक्षकांनीं, अध्यापकांनीं व तज्ज्ञ गृहस्थांनीं आपापल्या विषयांवर सोपे व परिपूर्ण ग्रंथ लिहून परभाषेवर अवलंबून राहण्याची जरूर दूर केली पाहिजे. विद्यापीठांतील परीक्षकांकरितांच नवीन ग्रंथ करून भागणार नाहीं, तर त्याहींपेक्षां श्रेष्ठ दर्जाचें सर्वसामान्य वाङ्मय स्वभाषेंत तयार करणें अवश्य आहे. इतिहास, चरित्रें, प्रवासवर्णनें, विशिष्ट शास्त्रें, इत्यादि अनेक विषयांत स्वतंत्र ग्रंथरचना करून, अगर जरूर तेथें तर्जुमे करून भाषेंतील ज्ञानभांडार वाढविण्याची मोठीच आवश्यकता आहे. यासाठीं विद्वान् लेखक, सचोटीचे मुद्रक व प्रकाशक, आणि विद्याप्रसाराची कळकळ बाळगणारे धनिक व संस्थानिक या सर्वांचा तात्कालिक उपयोग एक भावनेनें करून घेतां येईल अशी कांहीं तरी विशिष्ट व सुसंघटित योजना (organisation) आपण आजच्या या बैठकींत सर्वांनीं एकत्र विचारानें अमलांत आणली नाहीं, तर आजपर्यंतचा आपला अनुभव आणि संमेलन भरविण्याचे आपले श्रम फुकट गेले, असें मी समजेन. सर्वांनीं परिस्थितीची जबाबदारी ओळखून कांहीं तरी जोराचा उद्योग करावा, एवढेंच मी सर्वांना सांगतों. साहित्यप्रसाराचा हा विषय इतका शुद्ध व सर्वव्यापी आहे कीं, त्यांत जातिपक्षादि मतभेदांस बिलकुल अवकाश नाहीं.

प्रकृतीच्या कारणानें मला आपल्यापासून दूर राहण्याचे प्रसंग येत आहेत, हें खरें; परंतु कैक वर्षें सारखे श्रम केल्यावर, श्रमांच्या मानानें, विश्रांतीची जरूर इतरांप्रमाणें मलाहि लागणारच; आणि अंगावरची जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडण्याकरितां स्वतःची प्रकृति संभाळणें, हेंहि अत्यंत अवश्य आहे. परंतु मी कोठेंहि असलों तरी माझें सर्व लक्ष व उद्योग देशसेवेकरितांच असतो; हें आपण जाणतच आहां. माझ्या हातून आपल्या या महत्त्वाच्या उद्योगांत काय भाग घेतां येईल, हें माझें मी ठरविण्यापेक्षां आपणच कदाचित् जास्त चांगलें सांगूं शकाल. या कामांतील मुख्य अडचणी कोणत्या व काय स्वरूपाच्या आहेत हें माझ्यापेक्षां आपणांस चांगलें कळत असेल. ग्रंथप्रसाराकरितां दोन लाखाची रक्कम निराळी काढून ठेविलेली असून तिचें व्याज पुरत नसल्यास रकमेचा अपव्यय होत नाहीं अशी कांहीं तरी सचोटीची योजना आपण सर्वांनीं विचार करून ठरवीली तर तिचा मजकडून अवश्य योग्य विचार होईल. याशिवाय साहित्य विषयांत सर्व बुद्धिवानांस आपआपली करामत पूर्णपणें करून दाखविण्यास, विशिष्ट भाषा किंवा प्रांत यांचा भेद मनांत न आणतां, कांहीं तरी प्रोत्साहन देण्याचे विचारहि माझ्या मनांत घोळत आहेत. रोकड रकमांचीं पारितोषिकें, साहित्यसेवेचीं चीज करणारीं पदकें किंवा पूर्वींच्या श्रावणमासदक्षिणेच्या धर्तीवर विशिष्ट विद्वानांस तहाहयात वेतनें वगैरे देणें, असे अनेक प्रोत्साहनाचे प्रकार असून, त्या दिशेनें माझे विचार चालले आहेत, आणि या बाबतींत आपणहि विचार करून मला योग्य सल्ला द्याल अशी आशा आहे.*

या संमेलनास तिन्ही दिवस हजर राहण्याची मला सवड नाहीं, याबद्दल खेद वाटतो. तत्राप, मनानें मी आपल्या सन्निध आहेच; आणि आपण चर्चा करून जी योजना ठरवाल तिचा योग्य विचार मजकडून अवश्य होईल. आपण सर्वांनीं येथें येऊन भेटीचा लाभ दिला त्याबद्दल आम्ही आपले आभार मानतों, आणि आपल्या उद्योगांत संपूर्ण यश यावें असें मनःपूर्वक चिंतन करून श्रीसमर्थ रामदासांच्या शब्दांत आपणांस विनंति करतों कीं,

> जितुकें कांहीं आपणांस ठावें । तितुकें हळूहळू शिकवावें ॥
> शहाणे करून सोडावे सकल जन ॥

---

* याप्रमाणें योजना हल्लीं अंमलांत आली असून, कलकत्त्याचे विद्वान् गृहस्थ श्री. राधा कुमुद मुकर्जी यांचा गौरव केलेला आहे. शिल्पकार श्री. फणींद्रनाथ, श्री. चिंतामणराव वैद्य, श्री. नटराजन इत्यादिकांचा पदकें वगैरे देऊन, सन्मान करण्यांत आला आहे.

## २२

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. १२ जानेवारी १९२६.

**प्रसंग:**—लॉर्ड आणि लेडी रीडिंग यांस मेजवानी.

**युवर एक्सलन्सीज,*** आणि सभ्य स्त्रीपुरुषहो !

आपल्या सम्राटांचें आरोग्यचिंतन करण्यासाठीं मी उभा आहें. हा टोस्ट आपल्यापुढें सुचवितांना त्याच्या पुष्ट्यर्थ मोठें भाषण करण्याची किंवा इंग्लंडच्या राजघराण्यानें ज्या अनेक गोष्टींमुळें हिंदी प्रजेचें प्रेम संपादन केलें आहे त्यांचा उच्चार करण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. सम्राटांचें चारित्र्य आणि वर्तन म्हणजे ब्रिटिश साम्राज्याला लाभलेलें श्रेष्ठतम निधान आहे, एवढेंच सांगितलें म्हणजे पुरे.

माझ्या स्वत:बद्दल बोलावयाचें तर सम्राटांनीं वैयक्तिक मित्रत्व दाखवून जो माझा गौरव केला त्याचें कृतज्ञतापूर्वक मला स्मरण होत आहे, आणि मी ती गोष्ट कधींहि विसरणार नाहीं.

(मुख्य पाहुण्यांकरितां ' टोस्ट ')

सभ्य स्त्री-पुरुषहो, मजवर आलेलें कर्तव्य कृतज्ञतेनें करण्याकरितां मी पुन्हा उभा राहिलों आहें. या वेळीं नामदार लॉर्ड आणि लेडी रीडिंग, आजचे आपले नामांकित पाहुणे यांचें आरोग्यचिंतन मी करणार आहें.

एखाद्या हिंदी संस्थानाला व्हाइसरॉयांची भेट म्हणजे तो तेथील राजघराण्याला आणि प्रजाजनांनाहि मोठा संस्मरणीय प्रसंग वाटतो. लॉर्ड रीडिंग यांच्यासारख्या श्रेष्ठ दर्जाच्या व्हाइसरॉयांचें स्वागत करण्याचा प्रसंग आम्हां बडोदेंवासियांना क्वचितच लाभतो. आजच्या काळांतील सर्वोत्तम राजकारणी पुरुषांमध्यें त्यांची गणना आहे. आज पांच वर्षें हिंदुस्थानचा राज्यकारभार चालवून विश्रांति घेण्याकरितां आतां ते स्वगृहीं जावयास निघाले असतांना माझ्या संस्थानांत त्यांचें स्वागत करण्याचा मान मला मिळत आहे.

ते हिंदुस्थानांत आले तें राजकारणांत कांहीं नवखे नव्हते; सम्राटांच्या सेवेचा अनेक वर्षें अनुभव घेऊन ते वृद्ध झालेले होते. त्यांनीं व्हाइसरॉय पदाची जबाबदारी

---

* नामदार लॉर्ड रीडिंग व लेडी रीडिंग

अंगावर घेतली तेव्हां संशय आणि कटु भावनांचे ढग जमा झालेले होते, ते दूर करण्याच्या कामीं त्यांनीं उत्तम धैर्य, चिकाटी आणि शहाणपणा दाखविला. देशांत आज जें शांततेचें वातावरण पसरलें आहे आणि हिंदुस्थानची आर्थिक स्थिति स्थिरावली आहे, त्यावरून त्यांच्या यशाचें अनुमान करतां येतें. या सुपरिणामाबद्दल सर्व हिंदुस्थान त्यांचें ऋणी आहे. तेव्हां आपण त्यांचा प्रवास सुखाचा होवो आणि त्यांचें भावी आयुष्य अत्यंत सुखाचें आणि हल्लींच्याहूनहि अधिक कीर्तियुक्त होवो, अशी इच्छा करूं या.

सभ्य स्त्री-पुरुषहो, अशा प्रसंगीं ब्रिटिश साम्राज्यविषयक संस्थानी निष्ठेचा पुनरुच्चार करण्याचा प्रघात आहे. माझें संस्थान आणि प्रजाजन यांच्या बाबतींत तरी तसें करण्याची आवश्यकता असेल, असें मला वाटत नाहीं. ब्रिटिशांशीं संबंध जुळून आल्याला आज जवळ जवळ सवाशें वर्षें झालीं. त्या काळांत माझ्या संस्थानाची निष्ठा अविचलित राहिली आहे. युद्धाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं त्याच्या निष्ठेची वारंवार कसोटी लागली आहे; आणि शांततेच्या काळांतील प्रश्नहि सोडविण्याकरितां त्यानें जें साहाय्य दिलें आहे त्यानें त्या निष्ठेचा भरीवपणाहि सिद्ध झाला आहे.

माझ्या कारकीर्दीमध्यें माझ्या प्रजाजनांच्या कल्याणाला जागरूक राहून आधुनिक आदर्श संस्थानाबद्दलच्या माझ्या कल्पना माझ्या सामर्थ्यानुसार अमलांत आणण्याचा मीं प्रयत्न केला आहे. माझ्या प्रिय प्रजाजनांना शांतता आणि सुव्यवस्थित सरकार यांचा लाभ करून दिला आहे. माझ्या राज्यामध्यें केवळ थोड्याशा हक्कदार लोकांनाच नव्हे, तर प्रजाजनांपैकीं गरिबांत गरीब असेल त्यालाहि शिक्षण मिळावें अशी तजवीज केली आहे. आणि आजपर्यंत सामाजिक दोषांची निष्कृति करण्याच्या कामीं यद्यपि वारंवार निराशाच पदरांत पडली आहे, तथापि शिक्षणाच्या या प्रसारामुळें कालांतरानें तरी माझे एतद्विषयक प्रयत्न यशस्वी होतील अशी मला आशा आहे. औद्योगिक प्रयत्नांना सढळ हातानें मदत देण्याचेंहि धोरण पतकरलें असल्यामुळें त्याहि बाबतींत अनेक गिरण्या व कारखाने यांचा उदय होऊन ( त्यांत तोटा होत नाहीं असें नाहीं ) माझ्या संस्थानाची प्रगतिच होत आहे.

नामदारसाहेब, बडोद्याच्या राज्यकारभाराची धुरा माझ्या अंगावर परमेश्वरकृपेनें येऊन पडल्याला आतां पन्नासाच्यावर वर्षें झालीं आहेत; आणि या आशादायक आणि कृतिसिद्धतेच्या अर्ध्या शतकाच्या दीर्घकालाचें सिंहावलोकन केलें असतां मला असें वाटतें कीं, जरी अजून पुष्कळ करतां येण्याजोगें राहिलें असलें तरी हिंदी साम्राज्यांत माझ्या संस्थानाचें स्थान केव्हांहि मानाचेंच समजलें जाईल.

दा. क्र. ५८५१

वर्तमानकालसंबंधीं मला जें म्हणतां येण्यासारखें आहे तें हेंच आहे; पण भविष्यकालाचें काय ?

आमचा हा खंडप्राय देश त्याच्या घटनेच्या पुनर्रचनेच्या धामधुमीनें अंतर्बाह्य खळबळून गेलेला आहे. हिंदुस्थानच्या संस्थानी विभागांतील आम्ही लोक ब्रिटिश हिंदुस्थानची स्वराज्याच्या मार्गावरील क्रमाक्रमानें होणारी प्रगति लक्षपूर्वक पाहत आहों आणि आगामी पुनर्घटनेमध्यें हिंदी संस्थानांच्या हक्कांच्या प्रश्नांची विस्मृति होऊं नये अशी माझी तीव्र इच्छा आहे. आपण आजपर्यंत अनुभवलेले हक्क व मान इत्यादींचा पुन्हा निर्णय करण्याची जेव्हां वेळ येईल तेव्हां आपल्याला उदारपणें वागविण्यांत यावें अशीच हिंदी संस्थानिकांची भावना आहे.

नव्या युगांत आपल्याला आतां सूर्यप्रकाशांत स्थान मिळावें अशी हिंदी संस्थानांची मागणी आहे, आणि त्यांचा इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर विश्वास असल्यामुळें आपले प्राचीन हक्क आणि वैभव फिरून आपल्याला मिळेल अशी त्यांना आशा वाटत आहे.

माझ्या संस्थानाबद्दल बोलावयाचें झालें तर ह्याचा मूळचा स्वायत्त दर्जा त्याला पुन्हा देण्यांत येईल अशी मला आशा वाटणें अगदीं साहजिक आहे. सुमारें शंभर वर्षांपूर्वी माझे पूर्वज आणि त्यांचे मांडलिक यांच्यामध्यें ब्रिटिश सरकारनें मध्यस्थी करण्याचें ठरविलें, आणि खंडणीच्या वसुलीसाठीं म्हणून तात्पुरते ते मांडलिक ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन करण्यांत आले. ब्रिटिश सरकारनें आमच्या मार्फतीनें हें खंडणी वसूल करण्याचें काम कोणत्याहि प्रकारें मेहेनताना न घेतां करण्याचें पत्करलें. हें काम म्हणजे त्यांच्यावर विश्वासानें सोपविलेली पवित्र जबाबदारी होती. ब्रिटिशांच्या अमदानीखालीं त्यानंतर शांततेचीं आणि प्रगतीचीं अशीं शंभर वर्षें गेलीं आहेत तेव्हां सरकार अधिक कार्यक्षम व्हावें म्हणून आणि साम्राज्याच्या कल्याणाबद्दल जी मला आस्था वाटते त्यामुळें, ब्रिटिश सरकारला मला अशी सूचना करावीशी वाटते कीं, त्यांनीं आपल्या पूर्वीच्या मित्रांचे आणि दोस्तांचे सर्व पूर्वापारचे हक्क संपूर्णपणें फिरून बहाल करावे. कारण जर आपलीं हिंदी संस्थानें हीं साम्राज्याचे खरेखुरे आधारस्तंभ व्हावयाचीं असतील तर त्यांना आपण ब्रिटिश सरकारचे खरे-खुरे दोस्त आहों आणि आपल्याला साम्राज्याच्या राज्यघटक मंडळामध्यें खरी-खुरी भागीदारी प्राप्त झालेली आहे, असें मनापासून वाटलें पाहिजे.

सभ्य स्त्री-पुरुषहो, ह्या प्रश्नानंतर मी आतां लेडी रीडिंग यांचें स्वागत करण्या-कडे वळतों. मी हिंदुस्थानांत परत आल्यानंतर त्यांची प्रकृति झपाट्यानें सुधारत असल्याचें ऐकून मला समाधान वाटलें. परंतु माझ्या राजधानीपर्यंतच्या प्रवासाची दगदग सहन होण्याइतकी त्यांची प्रकृति सुधारेल अशी मला आशा वाटत नव्हती.

अंगावर घेतली तेव्हां संशय आणि कटु भावनांचे ढग जमा झालेले होते, ते दूर करण्याच्या कामीं त्यांनीं उत्तम धैर्य, चिकाटी आणि शहाणपणा दाखविला. देशांत आज जें शांततेचें वातावरण पसरलें आहे आणि हिंदुस्थानची आर्थिक स्थिति स्थिरावली आहे, त्यावरून त्यांच्या यशाचें अनुमान करतां येतें. या सुपरिणामाबद्दल सर्व हिंदुस्थान त्यांचें ऋणी आहे. तेव्हां आपण त्यांचा प्रवास सुखाचा होवो आणि त्यांचें भावी आयुष्य अत्यंत सुखाचें आणि हल्लींच्याहूनहि अधिक कीर्तियुक्त होवो, अशी इच्छा करूं या.

सभ्य स्त्री-पुरुषहो, अशा प्रसंगीं ब्रिटिश साम्राज्यविषयक संस्थानी निष्ठेचा पुनरुच्चार करण्याचा प्रघात आहे. माझें संस्थान आणि प्रजाजन यांच्या बाबतींत तरी तसें करण्याची आवश्यकता असेल, असें मला वाटत नाहीं. ब्रिटिशांशीं संबंध जुळून आल्याला आज जवळ जवळ सवाशें वर्षें झालीं. त्या काळांत माझ्या संस्थानाची निष्ठा अविचलित राहिली आहे. युद्धाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं त्याच्या निष्ठेची वारंवार कसोटी लागली आहे; आणि शांततेच्या काळांतील प्रश्नहि सोडविण्याकरितां त्यानें जें साहाय्य दिलें आहे त्यानें त्या निष्ठेचा भरीवपणाहि सिद्ध झाला आहे.

माझ्या कारकीर्दीमध्यें माझ्या प्रजाजनांच्या कल्याणाला जागरूक राहून आधुनिक आदर्श संस्थानाबद्दलच्या माझ्या कल्पना माझ्या सामर्थ्यानुसार अमलांत आणण्याचा मीं प्रयत्न केला आहे. माझ्या प्रिय प्रजाजनांना शांतता आणि सुव्यवस्थित सरकार यांचा लाभ करून दिला आहे. माझ्या राज्यामध्यें केवळ थोड्याशा हक्कदार लोकांनाच नव्हे, तर प्रजाजनांपैकीं गरिबांत गरीब असेल त्यालाहि शिक्षण मिळावें अशी तजवीज केली आहे. आणि आजपर्यंत सामाजिक दोषांची निष्कृति करण्याच्या कामीं यद्यपि वारंवार निराशाच पदरांत पडली आहे, तथापि शिक्षणाच्या या प्रसारामुळें कालांतरानें तरी माझे एतद्विषयक प्रयत्न यशस्वी होतील अशी मला आशा आहे. औद्योगिक प्रयत्नांना सढळ हातानें मदत देण्याचेंहि धोरण पतकरलें असल्यामुळें त्याहि बाबतींत अनेक गिरण्या व कारखाने यांचा उदय होऊन (त्यांत तोटा होत नाहीं असें नाहीं) माझ्या संस्थानाची प्रगतिच होत आहे.

नामदारसाहेब, बडोद्याच्या राज्यकारभाराची धुरा माझ्या अंगावर परमेश्वरकृपेनें येऊन पडल्याला आतां पन्नासाच्यावर वर्षें झालीं आहेत; आणि या आशादायक आणि कृतिसिद्धतेच्या अर्ध्या शतकाच्या दीर्घकालाचें सिंहावलोकन केलें असतां मला असें वाटतें कीं, जरी अजून पुष्कळ करतां येण्याजोगें राहिलें असलें तरी हिंदी साम्राज्यांत माझ्या संस्थानाचें स्थान केव्हांहि मानाचेंच समजलें जाईल.

दा. क. ५८५१

वर्तमानकालासंबंधीं मला जें म्हणतां येण्यासारखें आहे तें हेंच आहे; पण भविष्यकालाचें काय ?

आमचा हा खंडप्राय देश त्याच्या घटनेच्या पुनर्रचनेच्या धामधुमीनें अंतर्बाह्य खळबळून गेलेला आहे. हिंदुस्थानच्या संस्थानी विभागांतील आम्ही लोक ब्रिटिश हिंदुस्थानची स्वराज्याच्या मार्गावरील क्रमाक्रमानें होणारी प्रगति लक्षपूर्वक पाहत आहों आणि आगामी पुनर्घटनेमध्यें हिंदी संस्थानांच्या हक्कांच्या प्रश्नांची विस्मृति होऊं नये अशी माझी तीव्र इच्छा आहे. आपण आजपर्यंत अनुभवलेले हक्क व मान इत्यादींचा पुन्हा निर्णय करण्याची जेव्हां वेळ येईल तेव्हां आपल्याला उदारपणें वागविण्यांत यावें अशीच हिंदी संस्थानिकांची भावना आहे.

नव्या युगांत आपल्याला आतां सूर्यप्रकाशांत स्थान मिळावें अशी हिंदी संस्थानांची मागणी आहे, आणि त्यांचा इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर विश्वास असल्यामुळें आपले प्राचीन हक्क आणि वैभव फिरून आपल्याला मिळेल अशी त्यांना आशा वाटत आहे.

माझ्या संस्थानाबद्दल बोलावयाचें झालें तर ह्याचा मूळचा स्वायत्त दर्जा त्याला पुन्हा देण्यांत येईल अशी मला आशा वाटणें अगदीं साहजिक आहे. सुमारें शंभर वर्षांपूर्वी माझे पूर्वज आणि त्यांचे मांडलिक यांच्यामध्यें ब्रिटिश सरकारनें मध्यस्थी करण्याचें ठरविलें, आणि खंडणीच्या वसुलीसाठीं म्हणून तात्पुरते ते मांडलिक ब्रिटिश सरकारच्या स्वाधीन करण्यांत आले. ब्रिटिश सरकारनें आमच्या मार्फतीनें हें खंडणी वसूल करण्याचें काम कोणत्याहि प्रकारें मेहेनताना न घेतां करण्याचें पत्करलें. हें काम म्हणजे त्यांच्यावर विश्वासानें सोपविलेली पवित्र जबाबदारी होती. ब्रिटिशांच्या अमदानीखालीं त्यानंतर शांततेचीं आणि प्रगतीचीं अशीं शंभर वर्षें गेलीं आहेत तेव्हां सरकार अधिक कार्यक्षम व्हावें म्हणून आणि साम्राज्याच्या कल्याणाबद्दल जी मला आस्था वाटते त्यामुळें, ब्रिटिश सरकारला मला अशी सूचना करावीशी वाटते कीं, त्यांनीं आपल्या पूर्वीच्या मित्रांचे आणि दोस्तांचे सर्व पूर्वापारचे हक्क संपूर्णपणें फिरून बहाल करावे. कारण जर आपलीं हिंदी संस्थानें हीं साम्राज्याचे खरेखुरे आधारस्तंभ व्हावयाचीं असतील तर त्यांना आपण ब्रिटिश सरकारचे खरे-खुरे दोस्त आहों आणि आपल्याला साम्राज्याच्या राज्यघटक मंडळामध्यें खरी-खुरी भागीदारी प्राप्त झालेली आहे, असें मनापासून वाटलें पाहिजे.

सभ्य स्त्री-पुरुषहो, ह्या प्रश्नानंतर मी आतां लेडी रीडिंग यांचें स्वागत करण्याकडे वळतों. मी हिंदुस्थानांत परत आल्यानंतर त्यांची प्रकृति झपाट्यानें सुधारत असल्याचें ऐकून मला समाधान वाटलें. परंतु माझ्या राजधानीपर्यंतच्या प्रवासाची दगदग सहन होण्याइतकी त्यांची प्रकृति सुधारेल अशी मला आशा वाटत नव्हती.

अशा परिस्थितींत त्या येथें येऊं शकल्या यामुळें श्री. सौ. महाराणींना आणि मला विशेष आनंद वाटला असल्यास नवल नाहीं. त्यांची प्रकृति उत्तम नसतांना देखील लेडी रीडिंग ह्या मोठ्या धैर्यानें आपल्या नामांकित पतीच्या समवेत पांच वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत आल्या. आणि तेव्हांपासून व्हिझेरीन या नात्यानें करावें लागणारें कर्तव्य उत्तम रीतीनें पार पाडतांना त्यांना मी पाहत आलों आहें. महारोगाविरुद्ध मोहीम पुकारण्यासारख्या भूतदयायुक्त चळवळीमध्यें त्यांनीं व्हाइसरॉयांच्या प्रयत्नांना चांगलीच साथ केली. आणि सर्व देशभर बालसंगोपनसंघटनेचें जाळें पसरून त्या कार्याला त्यांनीं ज्या उदारबुद्धीच्या नेतृत्वाची जोड दिली तीमुळें तर हिंदी लोकांच्या अंतःकरणांत प्रेमादरयुक्त असें कायमचें स्थान मिळविण्याची सुवर्णाची किल्लीच आपल्याजवळ आहे अशी त्यांनीं खात्री पटवून दिली आहे.

सभ्य स्त्री-पुरुषहो, श्री. सौ. महाराणींच्या आणि माझ्या स्वतःच्या वतीनें, व्हाइसरॉयसाहेब आणि व्हिझेरीन या उभयतांचें हार्दिक स्वागत करण्यामध्यें आणि या भूतलावर शक्य कोटींतील प्रत्येक सुख त्यांना प्राप्त व्हावें अशी सदिच्छा प्रदर्शित करण्यामध्यें आपण सर्वांनीं सहभागी व्हावें अशी माझी इच्छा आहे.

नामदार लॉर्ड आणि लेडी रीडिंग, आजचे आमचे सुविख्यात अभ्यागत, यांच्या आरोग्यचिंतनार्थ आपण आतां पेयपान करावें अशी मी विनंति करतों.

(व्हाइसरॉयांच्या भाषणावर श्री. महाराजांचें उत्तर)

नामदारसाहेब, आणि सभ्य स्त्री-पुरुषहो, ना. व्हाइसरॉयसाहेबांनीं माझ्या आरोग्यचिंतनार्थ जो अत्यंत प्रेमानें टोस्ट सुचविला त्याबद्दल त्यांचे आणि त्या सूचनेचा आपण जो आपलेपणानें स्वीकार केला त्याबद्दल आपले, श्री. सौ. महाराणी आणि मी स्वतः यांच्या वतीनें, योग्य तऱ्हेनें आभार मानणें फार कठीण वाटतें.

मला असें वाटतें कीं, माझ्या आयुष्यामध्यें जें कांहीं करण्याचा मीं प्रयत्न केला तें सर्व शेक्सपियरच्या खालील शब्दांत संकलित झालेलें आहेः—

"Let all the ends thou aimest at be thy country's, thy God's and Truth's."

शेवटीं आम्ही तुम्हां सर्वांचे अत्यंत मनापासून आभार मानतों.

## २३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

**स्थलः—बडोदें.**

**कालः—९ डिसेंबर १९२६.**

**प्रसंगः—बडोदें राज्याच्या न्यायखात्याची परिषद्.**

श्री. दांडेकर आणि इतर सद्गृहस्थहो !

आज आपल्या संमेलनाला येण्याविषयीं मोठ्या भक्तिभावानें जें निमंत्रण केलेंत त्याबद्दल मला आनंद वाटतो. मी आलों यावरूनच न्यायाचें काम मी केवढें महत्त्वाचें मानतों हें दिसून येईल. कायदा करण्याइतकेंच तो अमलांत आणण्याचें काम महत्त्वाचें आहे. याविषयीं सविस्तर मी सांगत बसत नाहीं. या राज्यांत जे जे कायदे अंमलांत आहेत त्या साऱ्यांचा इतिहास मला चांगला अवगत आहे व फुरसत मिळाल्यास त्यांचा चांगला अंमल कसा होईल व त्यांत काय जास्त सुधारणा पाहिजेत हें मी आपणापुढें मांडीनहि. आजकाल जगांत सर्वच बाबतींत परिवर्तन आणि प्रगति सुरू आहे. आज जो कायदा चांगला वाटतो तो उद्यां कदाचित् निकामी ठरेल. तेव्हां राज्यांतील अधिकारी आणि न्यायाधीश यांनीं भोंवतालच्या जगाकडे लक्ष देऊन वागलें पाहिजे. जगांत होणाऱ्या सुधारणांचा अभ्यास ठेवला पाहिजे. एरवीं आपण मागें पडूं.

आपण जें न्यायदानाचें काम करतां तें फार पवित्र व जबाबदारीचें आहे. समाजव्यवस्थेचें तें एक उपयुक्त अंग आहे असें समजा. तेव्हां न्याय करतांना व्यावहारिक दृष्टिहि वापरावी. केवळ न्यायसिद्धांतांना तंतोतंत चिकटून चालावयाचें नाहीं. तथापि त्यांना अजीबात फाटाहि पण देतां कामा नये. भोंवतालचें वातावरण समजून घेतलें पाहिजे. माझ्या प्रजेचें हित मनांत वागवून माझ्या अंमलदारांनीं व सर्वांनींच न्यायाचा कारभार केला पाहिजे. संकुचित दृष्टि ठेवूं नये; कर्तव्यनिष्ठा सोडूं नये; असें न केल्यास आपण निकामी होऊन जाल. भोंवतालीं काय चाललें आहे याकडे सारखी नजर पाहिजे, त्याचा अभ्यास केला पाहिजे व आपली प्रगति करून घेतली पाहिजे. माझ्या प्रजेचें हित कशांत आहे याबद्दलच्या सूचना माझ्या प्रत्येक अंमलदारानें व लोकांनींहि मजकडे पाठवाव्या. मी आपल्याकडून एवढीच अपेक्षा करतों कीं, आपण याप्रमाणें वागून न्यायदानाचें काम उत्तम रीतीनें उरकावें. आज सर्वांनीं एकत्र येऊन आपल्या कामासंबंधीं विचार करण्याचें ठरविलें आहे याबद्दल मला फार आनंद होत आहे. आपल्या संमेलनाला यश चिंतितों.

## २४

**स्थलः**—बडोदें.

**कालः**—ता. १२ माहे डिसेंबर सन १९२६.

**प्रसंगः**—जुम्मादादा व्यायाममंदिरांत प्रोफेसर भाटे यांचें विश्व-विद्यालयाच्या संबंधांत भाषण झालें त्या वेळचा.

सद्‌गृहस्थहो !

ज्या विषयावर आतां भाषण झालें, तो विषय मोठा गहन आहे, विशाल आहे. त्याच्यावरती पुष्कळ विचार करण्याची जरूर आहे. मला शंका आहे कीं, जे लोक आज एकत्र झाले आहेत, ते लहान असोत किंवा थोर असोत, त्यांना या विषयाची गहनता समजली आहे किंवा कसें. मीं बरेंचसें पाहिलें आहे आणि वाचलें आहे आणि त्यामुळें मी तुमच्यापेक्षां जास्त समजतों म्हणून याप्रमाणें बोलतों, असें समजू नका. हा विषयच इतका विशाल आहे कीं, तो सर्वांच्या आकलनशक्तींत एकसारखा व एकदम येऊं शकणार नाहीं. तो समजण्यास अधिकार पाहिजे, लायकी पाहिजे, योग्यता पाहिजे. सर्वांच्याच मध्यें ही लायकी नसते आणि म्हणूनच अशा विषयाची चर्चा त्यासंबंधानें अधिकार असणाऱ्यांच्या समोरच होणें यथार्थ होय. कोणतेंहि कार्य सुरू करण्याच्या पूर्वी समाजाची तत्परता आणि जनतेची ग्राहकता पाहिली पाहिजे. आजूबाजूच्या परिस्थितीचा विचार केला पाहिजे. भूतकाळांत काय होतें, वर्तमानकाळांत काय आहे आणि भविष्यकाळांत काय होणें इष्ट आहे, या तिन्ही काळांचा विचार केला पाहिजे. भूत, वर्तमान आणि भविष्य हे आजोबा, पुत्र, पौत्र याप्रमाणें संकलित झाले आहेत असें समजून, योजना केली पाहिजे. यावरून तुम्ही असें समजूं नका कीं, मी तुमच्याविरुद्ध आहें. माझें एवढेंच सुचविणें आहे कीं, तुम्ही एकदम निर्णयावर येऊं नका. युरोपांतल्या आणि येथल्या स्थितींत फार फरक आहे. तेथें धनाढ्यता आहे व आपल्या येथें दरिद्रता आहे. आपण पायापासून सुरुवात केली पाहिजे. आपला मजूरवर्ग आणि अंत्यजवर्ग गरीब आहे. याविषयीं आपण विचार केला पाहिजे. ज्ञानार्जनासाठीं ज्ञानाच्या गोष्टी करणें ठीक आहे. परंतु अगोदर पोटाचा विचार केला पाहिजे. सर्व उपाधि पोटामुळेंच आहेत. सध्यांच्या काळांत केवळ ज्ञानी लोकांचीच किंमत होईल, असें नाहीं. ते व्यवहारज्ञ असतील तरच त्यांचा जीवनचरितार्थ चालेल. म्हणून पोटाची सवड प्रथम झाली पाहिजे. सांगण्याचा उद्देश एवढाच कीं, अगोदर पोट, नंतर ज्ञान आणि त्यानंतर सर्व बाकी वस्तूंचा विचार व्हावा.

गायकवाड सरकार पूर्वी श्रावणमास दक्षिणा देत होतें, खिचडी देत होतें. परंतु त्याचा उपयोग चांगला न झाल्यानें त्या पैशाचा उपयोग दुसऱ्या चांगल्या मार्गानें करण्यास सुरुवात झाली. आपण आपली मनोवृत्ति बदलली पाहिजे. मी लहान, तूं मोठा, अमक्याला स्पर्श करतां येईल किंवा नाहीं, अमक्याला शिक्षणाचा अधिकार आहे व अमक्याला नाहीं, अशी संकुचितता काढून टाकिली पाहिजे. आपल्या प्रेमाचा विस्तार केला पाहिजे. आपल्या समाजभावनेंत सुधारणा केली पाहिजे. ती उदार आणि विशाल असली पाहिजे. आपल्यामधील धेड आणि ब्राह्मण यांमधील तफावत आणि त्याचा परिणाम याबद्दल विचार केला पाहिजे. शिवाय आपल्याला एक-भाषेची जरूर आहे. एक-भाषा नसल्यानें पुष्कळ अडचणी उभ्या राहतात. एकमेकांचे विचार स्वतंत्रपणें समजूं शकत नाहींत. आपल्या राज्यांत मराठी, उर्दू, गुजराथी शाळांचे निरनिराळे खर्च भागवावे लागतात. एक-भाषा असेल, तर मेहनत व पैसा यांची पुष्कळ बचत होईल. मी पुनः सांगतों कीं, विलायतेंतील आणि आपल्या येथील परिस्थितींत फार फरक आहे. आपण आपल्या शिक्षणाच्या योजनेंत, देश, काल आणि आपल्या खास जरूरी यांच्या योग्य प्रमाणांत सुधारणा केल्या पाहिजेत. सध्यां फ्याशनेबल 'फॅडस्' फार चालून राहिले आहेत. आपल्या आजच्या शाळा, हायस्कुलें, कॉलेजें आणि युनिव्हर्सिट्या या विसाव्या शतकाच्या अशा फ्याशनेबल 'फॅडस्' म्हणजे अजब दंभ वाढवून राहिल्या आहेत, तो बंद करणें जरूर आहे. सूक्ष्म दृष्टीनें विचार केला म्हणजे नवी उपकारक योजना घडवून आणण्याची जरूर आहे. अशा परिस्थितींत प्रिन्सिपाल भाटे यांनीं जी विचारसरणी मांडली आहे, ज्या कल्पना आपल्यासमोर ठेविल्या आहेत, त्यांचा पुष्कळ आणि खोल विचार करण्यांत येईल, अशी मला आशा आहे.

आपणाला स्वाश्रयी आणि उदात्त, दृढ आणि महत्त्वाकांक्षी नागरिक बनवील आणि आपल्या देशाला उन्नत करील अशी योजना केली जाईल, असें मी इच्छितों.

## २५

**स्थल:—बडोदें.**

**काल:—ता. २९ जानेवारी १९२७.**

**प्रसंग:—कारेली बागेंतील शेठ बिरला बक्षीस-समारंभ.**

श्री. सौ. महाराणीसाहेब, सभ्य स्त्री-पुरुषहो !

आपल्या अशा संमेलनाला येण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग नाहीं. मीं अशा अनेक संमेलनांत भाग घेतलेला आहे. पण आजच्या संमेलनाचा विशेष असा आहे कीं, यांत श्री. सौ. महाराणीसाहेब व इतर पुष्कळ चांगल्या स्त्रिया दिसत आहेत. ही फार आनंदाची गोष्ट आहे, यांत शंका नाहीं. हिंदु समाजांत आज असा एक वर्ग आहे कीं, तो स्त्रिया आणि अत्यंज सारखेच मानतो. उच्च ब्राह्मणवर्णाच्या स्त्रियांचा दर्जाहि त्यांच्या दृष्टीनें खालचाच आहे. पण धर्माच्या आणि नीतिशास्त्राच्या दृष्टीनें पाहिल्यास ही चूक आहे. कोणीहि माणूस जन्मतः उच्च किंवा नीच नसतो. गुणकर्माप्रमाणें तो तसा होतो. मोठें काम किंवा हलकें काम परिस्थितीप्रमाणें माणसाला मिळत असतें. तेव्हां हलकें काम करणाऱ्याकडे क्षुद्रपणानें कोणी पाहूं नये. खरा मनुष्यधर्म हाच आहे. पण देशाचें दुर्दैव असें आहे कीं, आपल्या समाजाची धार्मिक आणि नैतिक स्थिति खालावली असून समाजाला दुर्दशा भोगावी लागत आहे. तेव्हां जोंपर्यंत आपली सामाजिक नीति सुधारणार नाहीं व आपण जन्मावरूनच उच्चनीचपणा ठरवूं पाहणार, तोंपर्यंत आपली उन्नति होणार नाहीं.

तेव्हां ही स्थिति पालटण्यासाठीं हीं व यासारखीं अनेक कामें किती तरी वेळा प्रयत्न करून केलीं पाहिजेत. त्याचें फळ मिळणें ईश्वराधीन आहे खरें; पण आपण संघटना करून आपलें बळ वाढविलें पाहिजे. सद्धेतु असून सहकार नसल्यास फळ मिळत नाहीं. तेव्हां सहकार अवश्य पाहिजे. मीं जे प्रयत्न केले आहेत व योजना आंखल्या आहेत त्या कांहीं माझ्या स्वतःसाठीं नाहींत. सर्व समाजाच्या हितासाठीं आहेत. राजाचे प्रयत्न प्रजेच्या सहकार्याशिवाय निष्फळ होतात. त्याला स्वामिनिष्ठ सेवक न मिळाल्यास त्याच्या कार्याला यश येत नाहीं. कुटुंबांत सुद्धां सर्वांनीं सहकार्यानें वागलें नाहीं तर कुटुंबाचा उत्कर्ष होत नाहीं. समाजाचेंहि असेंच आहे. एक व्यक्ति वाटेल तितका चांगला प्रयत्न करील, एक राजा वाटेल तेवढा चांगला कायदा करील, पण त्याची अंमलबजावणी करण्यास चांगलीं माणसें

मिळालीं नाहींत तर त्याचा परिणाम चांगला होत नाहीं. सर्व प्रयत्न वायां जातात. तेव्हां अशा प्रयत्नांच्या सफलतेसाठीं राजा आणि प्रजा यांमध्यें सहकार पाहिजे.

आत्माराम मास्तरांचीं तीन मुलें या अंत्यजोद्धाराच्या कामांत पडलीं आहेत ही विशेष आनंदाची गोष्ट आहे. मीं जेव्हां पहिल्याप्रथम हें काम हातीं घेतलें तेव्हां सर्व हिंदूंना या कामांत पडण्यास सांगितलें, पण मोठमोठ्या लोकांनीं देखील माघार घेतली तेव्हां प्रथम मुसलमानांकडून कामें करून घ्यावीं लागलीं. अखेर शोध करतां पंजाबमधील एक विद्वान् व कळकळीचा हिंदु माणूस मला मिळाला व त्याच्यावर हें अंत्यजोद्धाराचें काम मीं सोपविलें. तो माणूस म्हणजे आत्माराम मास्तर. त्यांनीं अतिशय उत्साहानें जें चांगलें काम केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानतों. आज त्यांचीं मुलें त्यांच्याप्रमाणें वागत आहेत म्हणून त्यांची स्तुति केली पाहिजे, यांत शंका नाहीं. आपलें काम पाहून मला फार संतोष झाला. माझी विद्वत्ताप्रचुर उपमा-अलंकारयुक्त स्तुति जी श्री. आपटे यांनीं केली तिला मी पात्र नाहीं. मीं विशेष तें काय केलें? समाजाचें कल्याण करणें हा मी माझा धर्म समजतों. 'ईश्वर नाहीं' असें म्हणण्याचें धाडस मी करीत नाहीं. त्याच्या कृपेमुळेंच सर्व चाललें आहे. पण सर्व कामांत आपला प्रयत्न हा पाहिजेच. लोककल्याण हाच माझा धर्म व जोंपर्यंत मला बुद्धि आणि बळ आहे तोंपर्यंत तो मी आचरणार. अशा धर्मदृष्टीनें मीं जे प्रयत्न केले त्यांना फळ आलें आहे. तें चांगलें पक्व आहे कीं नाहीं याबद्दल मलाच शंका आहे. पण आज जें फळ अर्धेंकच्चें आहे तें योग्य निगा राखल्यास चांगलें पक्व व गोड होईल. मीं लोककल्याणासाठीं मला शक्य झाले ते प्रयत्न केले आहेत, बरेच श्रम घेतले आहेत व खर्चहि पण पुष्कळ केला आहे. या अंत्यजोद्धाराच्या कामांतहि हाच हेतु आहे. तुमच्या हिता-साठीं मी जे प्रयत्न करतों त्यांचें चीज व्हावें व हें कार्य अक्षयी चालण्यासाठीं माझा असा विचार आहे कीं, राज्यकारभाराला लायक असे एकदोन अंत्यज विद्यार्थी उच्च अभ्यासासाठीं विलायतेला पाठवावे. मात्र त्यांनीं परत आल्यावर या अंत्यजोद्धाराच्या कामीं सध्यां जे फुटकळ प्रयत्न चालले आहेत ते संकलित करण्याची जबाबदारी पत्करली पाहिजे. अशी जबाबदारी घेण्यास तयार असतील त्यांना मी विलायतेला अवश्य धाडीन.

## २६

**स्थलः--बडोदें.**

**कालः---ता. २० माहे मार्च सन १९२८.**

**प्रसंगः---खानगीखात्यांतील कामाविषयीं उपदेशपर दोन शब्द.**

मला तुम्हां सर्वांस खुल्या दिलानें कांहीं सांगावयाचें आहे त्याचा हेतु एवढा-च कीं, तुमच्या कामांत उत्तरोत्तर सुधारणा व्हाव्या व सेवक आणि यजमानामध्यें गैरसमजूत होण्याचे प्रसंग कमी यावे, आणि परस्परांच्या अडचणी व मनोदय एक-मेकांस कळाव्या. खानगीखात्यांतील नोकरांचा इतरांपेक्षां निकट संबंध माझ्याशीं येतो, त्यामुळें मला तुमच्याविषयीं एक प्रकारचें विशेष ममत्व वाटतें; म्हणून तुमचें उत्तरोत्तर कल्याण व्हावें हें मला इष्ट आहे. ह्या सदिच्छेनें मी तुम्हांला आज उपदेश करीत आहें.

आज मी तुम्हांला जें कांहीं सांगणार आहें तें पुढील गोष्टीविषयीं. आपणां सर्वांचें अंतिम साध्य कोणतें, तें साधणारा साधकवर्ग कोणता, त्यांना लागणारीं साधनें कोणतीं, आपणांपैकीं उत्तम काम केल्यानें कोण सिद्ध या पदवीस पोंहोचतात व त्या योगानें उत्तम कर्म केल्याचा मोक्षतुल्य आनंद कोण अनुभवितात याविषयीं मी विवेचन करणार आहें.

तुम्हीं खानगीखात्यांतील नोकर आहांत, तुम्हीं प्रथम आपल्या कामाचें महत्त्व लक्षांत घेतलें पाहिजे. खानगीखातें हें राज्यकारभारांतील एक मुख्य अंग आहे, व तें महाराजांच्या व राजकुटुंबाच्या सुखसोयी व महत्त्व संभाळण्यासाठीं आहे. महा-राजांच्या सुखसोयीची व्यवस्था नीट लागली व महाराजांना सदोदित उल्हासांत, आनंदांत व पूर्ण आरोग्यांत ठेवलें, तरच महाराजांना राज्याचें काम चांगलें करतां येईल. उलट तुमच्या हलगर्जीपणामुळें जर महाराजांच्या आनंदी वृत्तींत व आरोग्यांत अनिष्ट फरक झाला, तर त्याचा परिणाम राज्यकारभारावर झाल्याशिवाय राहणार नाहीं. सबब सर्व राज्ययंत्र सुरळीत चालावें, हें तुमच्या कामावर कांहीं अंशीं अवलंबून आहे. म्हणून तुम्हीं आपल्या कामाचें महत्त्व प्रथम जाणावें व चांगलें काम करण्यास शिकावें.

कोणतें काम करावयाचें तें शास्त्र व कला या दोन दृष्टींनीं करावयाचें असतें. मागील अनुभवावरूनहि करावयाचें असतें. हा अनुभव स्वतःचा किंवा दुसऱ्याचा

असूं शकेल. कामाची पद्धति, कामाचीं साधनें व कामाचें महत्त्व वगैरे गोष्टींची संपूर्ण माहिती करून घेणें यास शास्त्र म्हणतां येईल.

कामामध्यें उत्साह नसणें किंवा त्यामध्यें आपली सर्व बुद्धि खर्च न करणें, या गोष्टीनें कामाला कलेचें स्वरूप येत नाहीं व मनुष्यें केवळ 'मजूर' या संज्ञेस प्राप्त होतात. उत्तम कलाभिज्ञ आपल्या कामाकडे कलेचा विषय म्हणून पाहत असतो. काम करतांना बिदागीकडे त्याचें लक्ष नसतें. काम सुंदर झालें या योगानें त्याला जितका आनंद होतो तितका दुसरा कशांत होत नाहीं. उत्तम मूर्तिकाराला मूर्ति चांगली घडविली गेली या विचारानें प्रथम आनंद होतो व तीच चांगली घडविली गेली नाहीं, यानें झालेला खेद कितीहि पैसे मिळाले तरी कमी होत नाहीं. तशा प्रकारची तुमची दृष्टि काम करतांना असली पाहिजे. म्हणून तुम्हांला माझें इतकें सांगणें आहे कीं, तुम्ही आपल्या कामामध्यें केवळ मजूर न बनतां शास्त्रज्ञ व कलाभिज्ञ असे व्हा.

प्रत्येक कामदारास साधारण असें वाटत असतें कीं, मागें ज्याप्रमाणें काम झालें त्याप्रमाणें आपलें काम केलें म्हणजे आपलें कर्तव्य संपलें; परंतु अशी संकुचित वृत्ति ठेवूं नये. प्रत्येकानें आपल्या कामासंबंधीं अहर्निश विचार केला पाहिजे व प्रत्येक वेळीं काय अडचणी आल्या त्यांची नोंद करून त्या अडचणी कशा दूर करतां येतील व त्या अडचणी, कामाची पद्धति चुकीची असल्यामुळें येतात कीं काय, याचा विचार केला पाहिजे. कित्येक वेळां काम बाह्यतः चांगलें झालें असें वाटलें, तरी तें अधिक चांगलें कसें करतां येईल व वेळेची, पैशाची व मेहनतीची समंजसपणें बचत कशी होईल, या गोष्टीविषयीं सतत विचार केला पाहिजे. सारांश, कामदार कितीहि अनुभवी असला तरी त्यानें आपल्या कामाविषयीं 'आस्थेवाईक विद्यार्थी' या नात्याची वृत्ति ठेविली पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी कीं, ज्या गोष्टीची आपल्या स्वतःस माहिती आहे त्याचा दुसऱ्यास उपयोग व्हावा एतदर्थ आपलें ज्ञान लिहून ठेवावें, व हाताखालील नोकरांस तें समजावून सांगावें. "जें जें कांहीं आपणांस ठावें। तें तें दुसऱ्यासी सांगावें। शहाणे करून सोडावे। सकळिक॥" अशा वृत्तीनें हाताखालील माणसें चांगलीं तयार होतात व त्या कारखान्याचें काम चांगलें होतें. अशीं माणसें शिकवून तयार न करणें व नंतर त्यांच्यावर कामाची माहिती नाहीं असा आरोप करणें हें कोत्या बुद्धीच्या अंमलदाराचें लक्षण होय. आपलें ज्ञान दुसऱ्यांना सांगत गेल्यानें स्वतःचेंहि ज्ञान दृढतर होतें. याचा दुहेरी फायदा असा होतो कीं, आपण स्वतः अधिक वाकबगार बनून हाताखालील नोकरास वाकबगार करतां येतें. 'विद्या देतां दुणावें' हें तत्त्व अंमलदारांनीं लक्षांत ठेवावें.

काम चांगल्या रीतीनें होत नाहीं याचें दुसरें कारण असें कीं, निरनिराळया खात्यांमध्यें किंवा कारखान्यांमध्यें सहकार्याचा अभाव. प्रत्येक खातें किंवा कारखाना हे एकाच शरीराचे निरनिराळे अवयव आहेत, हें कारखानदार विसरतात व जो तो आपल्यापुरताच विचार करतो. सर्व खात्यांमध्यें जर सहकारित्व असेल व आपण एकाच शरीराचे अवयव आहोंत या जाणीवेनें एकमेकांस मदत करतील, तर राज्यकारभार उत्तम प्रकारें चालूं शकेल.

आपण एकाच शरीराचे अवयव आहोंत ही विसर आपल्या निरनिराळया जातींमध्यें पडली नसती तर आज उच्चनीचत्वाविषयीं जे वाद सुरू आहेत, ते उत्पन्न झाले नसते व त्यामुळें आपल्या समाजाला कदाचित् गौणत्व प्राप्त झालें नसतें. परस्परांस एकमेकांची सारखीच आवश्यकता आहे, हें विसरतां कामा नये.

तुमच्यापैकीं वरच्या प्रतीच्या अंमलदारांत एक विशेष गुण अवश्य आहे तो सहसंघटना हा होय. सहसंघटना ( Co-ordination ) हा सहकार्यापासून निराळा गुण आहे. एकाच शरीराच्या निरनिराळया अवयवांनीं एकमेकांस मदत करणें यास सहकार्य म्हणतां येईल. परंतु निरनिराळया अवयवांमध्यें कामाची वांटणी अशा तऱ्हेनें करून द्यावयाची, कीं जेणेंकरून शरीराचा सर्व व्यवहार सुरळीत चालेल. यास सहसंघटना म्हणतां येईल. एखादे वेळेस एकच काम दुबार निरनिराळया शाखांकडून होतें किंवा एखादें काम ज्या शाखेकडून घेण्यांत येतें त्या शाखेकडून न घेतां दुसऱ्या शाखेकडून घेण्यांत आलें तर एकंदर काम अधिक चांगलें होणें शक्य असतें. तसेंच निरनिराळया शाखांमध्यें परस्परव्यवहार चालते वेळीं कांहीं विशिष्ट अडचणी असतात त्या दूर कराव्या लागतात. इत्यादि गोष्टींचा योग्य विचार करून जो अंमलदार काम करतो तो उत्तम सहसंघटना जाणतो. निरनिराळया भागांचा कारभार व्यवस्थित, अल्प श्रमांत व बिनधोक चालविणें, हें सहसंघटना करण्याची माहिती असल्याशिवाय शक्य नाहीं.

दुसरा एक दोष मला नेहमीं दिसून येतो तो असा कीं, कामदारांस जेव्हां दुसऱ्याच्या ज्ञानाची किंवा माहितीची मदत पाहिजे असते तेव्हां अशी मदत मागितल्यानें आपणांस कमीपणा येईल या खोट्या भीतीनें ते तशी मदत मागत नाहींत. त्यामुळें कामाचा बिघाड होतो. प्रत्येकास सर्वच गोष्टी माहीत असतात असें नाहीं व जगांत आपल्या एकट्याच्याच सामर्थ्यावर कोणताहि व्यवहार चालणें शक्य नाहीं; म्हणून माहीतगार माणसाजवळून माहिती करून घेण्यास लाजूं नये. मग तो मनुष्य कोणत्याहि दर्जाचा असो. 'बालादपि सुभाषितम् ग्राह्यम्' या न्यायानें माहिती वाटेल त्या मनुष्याजवळून करून घेतली पाहिजे.

प्रत्येक मोठ्या कामामध्यें अनेक क्षुल्लक गोष्टी असतात. कामाच्या ठोकळ स्वरूपाचा विचार करावयाचा व क्षुल्लक गोष्टींकडे दुर्लक्ष करावयाचें अशा प्रकारचा स्वभाव बऱ्याचजणांचा असतो. पण यंत्राचा एखादा खिळा नसल्यानें जसें यंत्र बंद पडण्याचा संभव असतो तसा परिणाम या क्षुल्लक गोष्टींकडे दुर्लक्ष करण्यानें होतो. अनेक क्षुल्लक चुकांमुळें कामाला अव्यवस्थेचें स्वरूप येतें व एकंदर कामदार मंडळींनाहि गैरशिस्तीचें वळण लागतें; म्हणून मला स्वतःला या क्षुल्लक गोष्टींकडे अनेक वेळां पाहावें लागतें. या क्षुल्लक गोष्टींकडे मला पाहण्याची जरूर पडूं नये व माझ्या वेळेचा व श्रमाचा अधिक महत्त्वाच्या कामीं उपयोग व्हावा अशी जर तुमची इच्छा असेल, तर तुम्हांला अधिक लक्ष पुरवावयास नको काय? बारीकसारीक गोष्टींकडे दुर्लक्ष करणें हा एक प्रकारचा कामचुकारपणा आहे. तुम्ही आपल्या कामामध्यें लहान-सहान गोष्टींत लक्ष द्याल व कामचुकार म्हणजे अप्रामाणिक होणार नाहीं अशी अपेक्षा मी बाळगतों.

अंमलदारांमध्यें एक खोटी इभ्रतीची कल्पना अशी असते कीं, लहानसहान गोष्टींकडे लक्ष देण्यानें आपल्या दर्जाला कमीपणा येतो. या समजुतीचा असा परिणाम होतो कीं, अंमलदारांच्या ज्ञानाचा लाभ त्या कामांत मिळत नाहीं व कामें अल्प बुद्धिच्या अशिक्षित माणसास जशीं सुचतील तशीं, म्हणजे हीन स्वरूपाचीं होतात.

खरी स्थिति अशी असली पाहिजे कीं, लहानसहान कामें करणारीं माणसें आपलीं लहान कामें करण्यांत इतकीं प्रवीण असावींत कीं, त्यांचेवर देखरेख ठेवण्याची आवश्यकता राहूं नये. अशा प्रकारें वरच्यानें हाताखालील माणसें तयार केल्यास त्यांस आनंद होऊन, त्यांचे श्रम वांचतात याचें त्यांस भूषण वाटणेंहि गैरशिस्त नव्हे.

लहानसहान कामें किती महत्त्वाचीं असतात याविषयीं मी तुम्हांस एक उदाहरण सांगतों. वीट तयार करणें हें काम आपल्याला सोपें व क्षुल्लक वाटतें; पण ती तयार करण्यास चांगली माती, विटाळें, माफक उष्णता इत्यादि अल्पस्वल्प गोष्टींकडे नीट लक्ष पुरविलें, तरच ती चांगली होऊन तिनें मोठमोठ्या इमारती टिकाऊ होऊं शकतात. जसें विटा तयार करण्याकडे दुर्लक्ष केलें तर इमारती बिघडण्याचा संभव असतो, तसेंच लहानसहान कामें नीट करण्यांत हलगर्जीपणा केला, तर मोठमोठीं कामें देखील चांगलीं व्हावयाचीं नाहींत. म्हणून लहान-सहान कामें करणारांनीं देखील आपल्या कामांत वाकबगार बनलें पाहिजे.

विटेंतील मातीचे कण एकमेकांशीं एकजीव झाले नसले, तर वीट ज्या-प्रमाणें मजबूत होत नाहीं त्याप्रमाणें आपल्या समाजांतील दरेक लहान देखील व्यक्ति तशी सुधारलेली नसेल, तर समाजाचा व्यवहार सुरळीत व चांगला चालणें शक्य नाहीं. म्हणून प्रत्येक वर्गांतील व्यक्तीची सुधारणा होणें अवश्य आहे.

हल्लीं कारखानदार वगैरे पदवीधरांच्या वर्गांतून नेमण्यांत येतात. त्यांनीं आपल्या विद्येचा प्रभाव प्रत्येक कामांत दाखविण्याचा यत्न केला पाहिजे. केवळ आलेल्या कागदावर त्यांनीं सही केली तर त्यांना पदवीधर म्हणून जें नेमण्यांत आलें आहे, त्या गोष्टीचा कांहीं उपयोग होत नाहीं.

जर तुम्हांला नमुनेदार अंमलदार व्हावयाचें असेल, तर आपल्या हाताखालील होणारीं अल्पस्वल्प कामें देखील स्वतः करण्याची व तीं नीट कशीं करावीं हें खालच्या नोकरांना शिकविण्यासाठीं स्वतः करून दाखविण्याची तयारी पाहिजे. उत्तम सेनापति साधारण पाइकाचें काम करण्यास व त्याच्या अडचणी जाणून तें नीट करून दाखविण्यास केव्हांहि समर्थ असतो, तेव्हांच त्याचा सेनापति या नात्यानें सैन्यावर चांगला बोज पडतो. म्हणून तुम्ही उपरी अंमलदार असला तरी लहान कामें स्वतः करण्यास व करून दाखविण्यास लाजूं नका.

अंमलदारांनीं आपलें काम निःपक्षपातानें करावें व हाताखालील नोकर ज्या प्रकारें काम करतात त्या प्रमाणानें त्यांना कमीअधिक लेखावें. एखादा मनुष्य त्या अंमलदाराच्या नाकाचा बाल आहे अशी समजूत होऊं देऊं नये. कारण अशा गोष्टीनें विशेषतः अज्ञ समाजांत– अंमलदार अमक्याच्या ओंजळीनें पाणी पितो अशी समजूत होऊन वशिल्याच्या खटपटी सुरू होतात व काम चांगलें होत नाहीं.

एखादें काम आपल्या दर्जास व जातीस शोभणारें नाहीं अशी खोटी कल्पना मनांत बाळगूं नये. एका इंग्रज कवीनें म्हटलें आहे कीं,

“ Honour and shame, in no condition rise,
Act well your part and there the honour lies.”

मान किंवा अपमान हे मनुष्याच्या दर्जावर अवलंबून नसतात. स्वतःवर पडलेलें काम, मग तें कोणत्याहि प्रकारचें असो, उत्तम रीतीनें पार पाडणें यांतच मनुष्याचा खरा सन्मान आहे. पूर्वीचा इतिहास पाहिला तर कुलीन माणसें जें काम पडेल, तें करण्यास मागेंपुढें पाहत नसत. या गुणामुळें अनेक लहान कुटुंबें भरभराटीस आलीं. परंतु हल्लीं पाश्चात्यांच्या संसर्गांमुळें आपला जीवनक्रम निर्जीव झाल्यामुळें आपल्या जुन्या चालीरीतींतील गुणदोष जाणण्यास आपण असमर्थ झालों व हें काम आपल्या दर्जास शोभेल व हें शोभणार नाहीं इत्यादि खोट्या कल्पना जास्त उद्भवल्या.

आपल्या वर्तनामध्यें मनुष्यानें नेहमीं सभ्यपणाचें आचरण ठेवावें. कामें करून घेण्यांत सभ्यतेचा अतिशय उपयोग होतो व सभ्यतेच्या वर्तनानें काम होईल तें पैशानें देखील होणार नाहीं. तशीच आपली रीतभात ( Etiquette ) व

इंग्रजी रीतभात या दोहोंचा परिचय तुम्हांला पाहिजे. आपल्यामध्यें उत्तम प्रकारची रीतभात असे व ती ल्हानपणापासून मुलांस शिकविणें हें आपलें कर्तव्य आहे, अशी प्रत्येक आईबापाची समजूत असे. पण हल्लीं या अवश्य कर्तव्यापासून आईबाप पराङ्मुख झालेले आहेत, त्यामुळें या पिढीमध्यें धड इंग्रजी रीतभात माहीत नाहीं व धड देशी रीतभात माहीत नाहीं असेच लोक आढळतात, त्यामुळें आपल्या समाजाला बकाली व अव्यवस्थित स्वरूप प्राप्त होत आहे.

हीच टीका वस्त्रालंकारासहि लागू करतां येईल. पूर्वींचे आपले कांहीं सुंदर नीटनेटके पोषाक आतां पाहण्यांत देखील येत नाहींत. "एकनूर आदमी दसनूर कपडा" ही म्हण लक्षांत ठेवावी. वास्तव तुमचे कपडे मौल्यवान् नसले तरी नीटनेटके व स्वच्छ असून योग्य रीतीनें तयार करून घालण्यांत येतात, याकडे लक्ष असावें.

आपल्या समाजाची ही स्थिति सुधारावी म्हणून प्रत्येकानें रीतीभातीचा इतका परिचय करून घ्यावा कीं, तो अंगवळणीं पडल्यामुळें आपणांस त्याविषयीं विचार करण्याचीहि जरूर पडूं नये. रीतभात चांगली असणें हें सुशिक्षणाचें व कुलीनतेचें द्योतक आहे. एवढेंच नव्हे तर त्या गुणामुळें दुनियेचा व्यवहार देखील जास्त सुरळीत व सुखावह होतो. यजमानांच्या वतीनें तुम्हांला एखाद्या प्रसंगीं काम करावें लागतें, अशा वेळीं तुमचें वर्तन शिष्टाचारास सोडून असेल तर यजमानाला त्यानें गौणत्व येण्याचा संभव आहे. म्हणून योग्य शिष्टाचार पाळण्याची जबाबदारी तुम्हांवर विशेष आहे. चांगल्या रीतीभातींचा उगम विशेषतः राजदरबारांत होतो व त्याची नक्कल इतरत्र समाजांत होत असते. म्हणून खानगीखात्याच्या नोकरांनीं या बाबतींत दुसऱ्यांनीं कित्ता घ्यावा अशी रीतभात ठेविली पाहिजे.

वरच्या अंमलदारांनीं हाताखालील नोकरांस सभ्यतेनें व मोकळ्या मनानें सूचना करण्यास उत्तेजन द्यावें व हाताखालील नोकरांनीं अशा सूचना करणें आपलें अवश्य कर्तव्य आहे असें समजावें, कारण दरेकानें कामास मदत केल्याशिवाय श्रमाची बचत होणें शक्य नाहीं. बहुतेक सुधारणांचा हेतु श्रम वांचविणें हाच असतो.

अंमलदारांनीं केवळ सांगकामे न बनतां स्वयंस्फूर्तीनें, विवेकानें, जबाबदारीनें व बनल्यास पूर्वाकलन ( Anticipation ) करून काम करण्यास शिकलें पाहिजे. प्रत्येक कामाचें धोरण व उद्देश समजून घेतले पाहिजेत म्हणजे तें कां, कसें कशाकरितां, कोणी, केव्हां केलें पाहिजे याची जाणीव पाहिजे, व कामांत चुका कमी होतात. धोरण माहीत नसल्यानें कामांत दोष उत्पन्न होतात व हे दोष प्रमाणापेक्षां अधिक कडकपणा दाखविण्यांत आला म्हणजे होतांहोईतों काम करण्याचें व

जबाबदारी घेण्याचें अंमलदार टाळतात. सबब, प्रथम कामांतील धोरणांचें ज्ञान असावें म्हणजे जबाबदारी घेण्यास तुम्हांस जड जाणार नाहीं.

कामांत अडचणी काय येतील किंवा नवीन गरजा काय उपस्थित होतील, याचा अंदाज प्रसंग पडण्यापूर्वीच बांधून त्याची समंजसपणें तरतूद लावण्यांतच अंमलदार आपली विचारी बुद्धि प्रदर्शित करीत असतात. उलटपक्षीं तहान लागल्यावर विहीर खोदण्याची तयारी केल्यानें आपल्या व्यवहारांत बरेंच नुकसान झालें आहे व होत आहे.

क्षुल्लक कामासाठीं यजमानाच्या हुकमाची अपेक्षा न ठेवतां स्वतः होऊन कामें पार पाडलीं पाहिजेत. खरोखर महत्त्वाच्या कामाशिवाय यजमान किंवा वरचे अधिकारी यांस तकलीफ न देणें यांतच नोकरांचा खरा पुरुषार्थ आहे. तसेंच भानगडीचीं कामें उपस्थित झाल्यास त्या कामांतील अडचणी लक्षांत घेऊन त्यांचें नीट निरीक्षण करून पुन्हा अशीं कामें आल्यास भानगड राहूं नये येवढ्यासाठीं धोरणाविषयीं विचार करून असें बंधारण घालून द्यावें कीं, साधारण बुद्धीच्या मनुष्याला तें काम करण्यास सुलभ जावें. असें बंधारण घालण्यांतच खरा मुत्सद्दीपणा आहे.

यजमानाचें अहित न होतां किंवा काम न बिघडतां कोणत्याहि गोष्टीचें नियमन करणें, मार्ग दाखविणें, सावधगिरी ठेवण्यास सुचविणें, आठवण देणें व निर्णय करणें इत्यादि गोष्टींत यजमानास जितकी कमी तसदी देतां येईल तितकी दिल्यानें नोकरास तें भूषणावह होऊन त्यानें सेवाधर्म उत्तम रीतीनें बजावला असें श्रेय मिळतें.

सर्वांत महत्त्वाचा गुण तुमच्यामध्यें असावयास पाहिजे, तो राजभक्ति हा होय. हा गुण पूर्वीच्या लोकांमध्यें उत्तम प्रकारें दिसून येत असे; परंतु अलीकडे स्थित्यंतरामुळें त्याचें तितकें महत्त्व वाटेनासें झालें आहे, हें एक प्रकारें गौण आहे. राजभक्ति हा गुण पूर्वीप्रमाणें हल्लींहि अवश्य उपयोगी आहे. राजा हा शासनपद्धतीचा केंद्र असल्यानें राजाच्या मनाची सुस्थिति, शरीराचें आरोग्य, लौकिक, वैभव आणि इभ्रत हीं कायम ठेवणें, हें शासनपद्धतीस केव्हांहि हितकारक असतें. म्हणून प्रत्येक कामदारानें काम करतेवेळीं असा विचार केला पाहिजे कीं, माझें काम इतकें चांगलें झालें पाहिजे कीं, जेणेंकरून महाराजांचें मनःस्वास्थ्य, आरोग्य किंवा लौकिक या गोष्टींपैकीं एकाहि गोष्टीस उणीव येतां कामा नये. कारण या गोष्टींवर सर्व राज्यकारभार अवलंबून आहे, अशा उच्च भावनेनें काम करणें, हें राजनिष्ठेचें निदर्शक होय. तसेंच महाराजांचा वेळ बहुमोल आहे व व्यक्तिश्रमास इयत्ता आहे, हा विचार करून महाराजांना जितकी कमी तकलीफ पडेल, तितकी देण्याचा प्रत्येक स्वामिभक्तानें प्रयत्न करावा, हें सांगावयास नको.

या ज्या सूचना मीं केल्या आहेत, त्यांचा आपण योग्य विचार कराल आणि त्याप्रमाणें आपण वर्तन ठेवाल, तर आपण नमुनेदार कार्यकर्ते व्हाल, व त्या योगानें आपण राज्याची व समाजाची इभ्रत वाढवाल. राजाचें योग्य महत्त्व ठेवणें, हें बरेंचसें नोकरवर्गावर अवलंबून असतें. एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे कीं,

भृत्यैर्विना स्वयं राजा लोकानुग्रहकार्यपि ।
मयुखैरिव दीप्तांशुस्तेजस्यपि न शोभते ॥

लोकांचें कल्याण करण्याची राजाच्या मनांत कितीहि इच्छा असली, तरी ती इच्छा नोकर लोकांच्या मदतीशिवाय सफल होणार नाहीं. म्हणून सर्व जनतेचें कल्याण व्हावें, अशी जर आपली इच्छा असेल तर आपलें काम योग्य रीतीनें पार पाडण्याविषयीं झटा. जनतेचें कल्याण हें आपणा सर्वांचें अंतिम साध्य आहे. हें साध्य प्राप्त करून घेण्यास जो साधकवर्ग लागतो त्या वर्गांमध्यें मलाहि तुमच्याप्रमाणें काम करावें लागतें. मात्र आपलें कर्तव्यक्षेत्र भिन्न आहे. अंतिम साध्य साधण्यास तुमच्यावर जें कर्तव्य सोपविलें आहे तें राजाचें सौख्य संपादणें हें होय. हें अवश्य काम तुम्हीं चांगल्या तऱ्हेनें बजाविलें नाहीं, तर आपल्या सर्वांच्या अंतिम साध्यावर त्याचा अनिष्ट परिणाम होईल. साधकवर्गांमध्यें श्रमविभागाच्या तत्त्वाप्रमाणें जरी श्रमाची वांटणी केली आहे व त्या योगानें कामाची मेहनत कमी होते, तरी काम करणाऱ्यांना आपण एका संघटनेचे अवयव आहोंत व आपलें काम बिघडलें तर एकंदर संघटनेच्या कार्यावर म्हणजे अंतिम साध्यावर त्याचा परिणाम होतो, ही भावना नेहमीं जाग्रत ठेविली पाहिजे; म्हणजे त्यांना आपल्या कामाचें महत्त्व व आपलेपणा वाटूं लागेल. आपलेपणा वाटूं लागणें म्हणजे, काम जिव्हाळ्याचें आहे व आपण तें योग्य रीतीनें बजाविलें नाहीं, तर आपण आपला धर्म आचरिला नाहीं व आपण सर्व जनतेचें, तसेंच आपलें स्वतःचें नुकसान केलें असें वाटणें. सारांश, सेवा हा एक उच्चतम धर्म होय, अशी समजूत तुमची झाली म्हणजे तुम्हांला उत्तम तऱ्हेनें काम करतां येईल. जगांत आज वैभवाच्या शिखरावर जीं राष्ट्रें पोंहोचलीं आहेत, तेथें असेंच काम करणारे लोक आढळून येतील. साधकवर्गानें उच्च भावनेनें आपलें काम करणें ही राष्ट्राची खरी संपत्ति होय व अशा राष्ट्रांना जीवनकलहामध्यें कधींहि निराश होण्याचें कारण नाहीं. आपलें काम उत्तम तऱ्हेनें बजावलें गेलें व त्याला उत्तम फळ मिळालें, हें जाणल्यामुळें खऱ्या कर्मवीराला जो आनंद होतो, त्यापुढें स्वर्गीय आनंद देखील तुच्छ आहे. काम करण्याची पद्धति कितीहि निर्दोष असली तरी समंजस कामदाराशिवाय ती यशस्वी होणें शक्य नाहीं. उलट कामदारमंडळी समंजस असली तर सदोष पद्धति देखील तितकी अयशस्वी होणार नाहीं. कारण पद्धतींतील दोष योग्य वेळीं सुचविण्यांत येऊन, ते दूर करण्यांत येतात.

म्हणून तुम्हीं आपलें काम समंजसपणें करून तें आदर्शभूत कराल अशी आशा बाळगून, मी आपलें बोलणें पुरें करतों.

खानगी खातें हें निमित्त करून मीं जो उपदेश केला आहे, तो फौजखात्यास व इतरांसहि लागू पडण्यासारखा आहे. या उपदेशाचें मनन करून, त्याप्रमाणें आचरण ठेवाल अशी मी अपेक्षा बाळगतों.

कांहीं दिवसांपूर्वी मीं खानगीची व फौजखात्याच्या कारखान्याची तांत्रिक तपासणी केली. त्यावरून पूर्वीपेक्षां काम नीट व पद्धतशीर होतें असें मला वाटलें, हें मला सांगण्यास आनंद वाटत आहे.

## २७

**स्थल:**—नवसारी.

**काल:**—तारीख २९ डिसेंबर १९२८.

**प्रसंग:**—बापूजी देसाई सायन्स लॅबोरेटरी हॉलचें उद्घाटन.

सभ्य स्त्रीपुरुषहो!

आपल्या हायस्कुलांतून अभ्यासाकरितां नेमलेल्या विषयांमध्यें शास्त्रीय विषय (सायन्स) हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. तो विद्यार्थ्यांना आकर्षक वाटावयाचा असेल आणि बोधप्रद व्हावयाचा असेल तर त्याच्यासाठीं चांगल्या साधनांनीं समृद्ध अशी प्रयोगशाला अवश्य पाहिजे. सर कावसजी जहांगीर रेडीमनी या वणिक्श्रेष्ठाचें नांव नवसारींतल्या या सर्वांत मोठ्या हायस्कूलशीं संबद्ध असतांना आजपर्यंत या हायस्कूलची ही महत्त्वाची गरज तशीच भागल्याशिवाय राहिली होती. आतां आपल्या देसाई बंधूंच्या उदार देणगीमुळें ही अडचण दूर होत आहे याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. त्यांच्या देणगींतून त्यांच्या पूज्य वडिलांच्या स्मरणार्थ एक मोठा हॉल प्रयोगशाळेकरितां बांधणें शक्य झालें आहे. त्यांचे वडील कै. बापूजी देसाई हे नवसारींतील एक प्रमुख आणि सन्मान्य नागरिक होते. श्री. देसाई बंधु यांच्या देणगीमुळें प्रयोगशाळेची केवळ बाह्य इमारत उभी राहिली. ती यथार्थ सजविण्यासाठीं मद्रेसाच्या समितीनें प्रयोगाचीं उपकरणें आणि इतर आवश्यक सामुग्री दिली त्यामुळें त्यांचेहि आभार मानणें अवश्य आहे. एवढें या प्रसंगीं बोलून ही बापूजी देसाई प्रयोगशाला उघडल्याचें जाहीर करण्याला मला फार आनंद होत आहे.

## २८

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. २४-१२-१९३२.

**प्रसंग:**—हिंदविजय जिमखान्यानें भरविलेल्या १४ व्या आखिल भारतीय शारीरिक सामन्यांचा बक्षिस-समारंभ.

श्री. सुधाळकर आणि विद्यार्थिगणहो !

मी येथें येतांना कांहीं एक ठरवून भाषण करण्याच्या उद्देशानें आलों नाहीं. तुम्हांला आतां शारीरिक शिक्षणाचें महत्त्व चांगलेंच समजावयाला लागलेलें आहे, तेव्हां तुम्हीं जीं विविध बक्षिसें मिळविलीं आहेत त्याबद्दल तुमचें प्रथम अभिनंदन करतों. हिंदुस्थान देशाच्या निरनिराळ्या भागांत आणि विशेषतः गुजराथेंतहि मर्दांनी खेळांबद्दल आणि निरनिराळ्या प्रकारच्या व्यायामांबद्दल आवड पसरत आहे, याचा मला आनंद वाटतो, आणि ही आवड दिवसेंदिवस वृद्धिंगत होईल अशी मला आशा आहे.

राष्ट्रीय जीवनांत शारीरिक सुदृढतेचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे; आणि आपली नवी पिढी शरीरसामर्थ्यांत आणि चालचालणुकींत आधींच सुधारणेच्या मार्गाला लागलेली पाहून मला फार आनंद वाटत आहे. खेळांचें युग सुरू झाल्यापासून एका नव्याच पिढीचा प्रारंभ झाल्यासारखें वाटतें आणि हें नवें खेळाडूपणाचें वारें एकसारखें वाढत राहील यांत शंका नाहीं. भविष्यकाळाचीं आरोग्यपूर्ण आणि प्रसादयुक्त अशीं चिन्हें मला दिसूं लागलीं आहेत. तुम्हीं चांगले खेळ करून दाखविले याबद्दल मी तुमचें अभिनंदन करतों. यापुढें तुम्ही क्रिकेट, हॉकी अशासारखे युरोपिअन खेळ अधिक खेळावे. त्यांमध्यें कौशल्य, शिस्त, आज्ञाधारकपणा व सद्यःकर्तृत्व शिकण्याला ( आपल्या देशी खेळांपेक्षां ) अधिक अवसर मिळतो. मी तुमचे खेळ पाहून खूष झालों आहें. तेव्हां निरनिराळ्या खेळांत प्रावीण्य दाखवून तुम्हीं जीं बक्षिसें मिळविलीं त्याबद्दल तुमचें फिरून एकदां मी सकौतुक अभिनंदन करतों, आणि माझें भाषण संपवितों.

## २९

**स्थल:—बडोदें.**

**काल:—तारीख २५ डिसेंबर १९३२.**

**प्रसंग:—बडोदा कॉलेजचा सुवर्णमहोत्सव.**

प्रि. बरो, बडोदा कॉलेजांतील प्राध्यापक, विद्यार्थि आणि उपस्थित सभ्य स्त्री-पुरुषहो !

आजच्या या प्रसंगीं तुम्हीं जें माझें मनापासून आणि प्रेमपूर्वक स्वागत केलें त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. आपल्या या हार्दिक स्वागतामुळें आणि आज जो ऐतिहासिक महत्त्वाचा दिवस साजरा करण्याकरितां आपण जमलों आहों त्याच्या अनुषंगानें उत्पन्न झालेल्या विविध भावनोद्रेकांनीं माझें अंतःकरण उचंबळून आलें आहे.

गतकालच्या अंधुक मार्गानें कल्पनेनें मागें जाऊन जेव्हां मी सिंहावलोकन करूं लागलों तेव्हां माझ्या मनामध्यें गतस्मृतींची नुसती खळबळ उडून गेली. आजच्या या समारंभाशीं संबद्ध असा, माझ्या कारकीर्दीतील आरंभीं-आरंभींच्या सार्वजनिक कार्यांपैकीं एक प्रसंग म्हणून, पन्नास वर्षांपूर्वीं जेव्हां मीं या कॉलेजाच्या पायाचा दगड घातला तो प्रसंग मला आठवला; आणि त्या प्रसंगाच्या निमित्तानें अनेक पूर्वस्मृति जागृत होऊन माझ्या मनामध्यें अनेक हृदयस्पर्शी आणि चिरकाल अंतःकरणांत घर करून राहिलेले असे विचार उभे राहिले. त्या वेळीं मजभोंवतीं आणि या पायाच्या समारंभाच्या प्रसंगीं जे लोक हजर होते त्यांपैकीं, आज फक्त मी एकटाच उरलों आहें. कॉलेज हें एक माझ्या राज्यांतील शिक्षणप्रसाराचें प्रतीक आहे; परंतु माझ्या राज्यांत शिक्षण-प्रसाराचें काम यशस्वी करण्याच्या कामीं, अनेकांचे श्रम कारणीभूत झालेलें असून, या प्रसंगानें त्या सर्व कार्यकर्त्यांच्या आशा, आशंका, अपेक्षा, आसक्ति आणि परिश्रम या सर्वांचा चित्रपट माझ्या नजरेसमोर उभा राहतो. आणि या स्मृतिचित्रांनीं माझें चित्त क्षणभर भरून न आलें, तर मी अतिमानुषच ठरेन ! जवळ जवळ चोपन्न वर्षें झालीं. जानेवारी महिन्यांतील एका प्रशान्त सायंकाळीं करणी घेऊन मीं तो पायाचा दगड बसविला. त्या वेळचा तो देखावा— तें धुळीनें भरलेलें मैदान, ठिकठिकाणीं खणलेलें खोल चर, चुना आणि विटा यांचे अस्ताव्यस्त ढीग, अजूनहि आठवतात. त्यांतूनच आतांचे सुव्यवस्थित मार्ग, रुंद रस्ते आणि हिरवळीचीं मैदानें ही प्रतिसृष्टि निर्माण झाली. ही भव्य इमारत, तीवरील डौलदार घुमट, आणि तिच्या छत्राखालीं सर्व प्रकारचें शैक्षणिक संगोपन प्राप्त झालेल्या आणि तें प्रत्यहीं प्राप्त करून घेणाऱ्या

ठा. ता. नं. नं.



असंख्य आणि आनंदी विद्यार्थ्यांचे समूह— पन्नास वर्षांपूर्वीचें तें दृश्य आणि आजचें हें दृश्य यांमध्यें मनानें प्रवास करतांना माझें हृदय साहजिकच एक प्रकारच्या आनंदानें आणि अभिमानानें भरून जावें हें योग्यच नाहीं काय?

माझे अगदीं आरंभीचे, राज्याधिकार प्राप्त झाल्यानंतरचे जे मला आज स्मरतात ते, विचार म्हणजे माझ्या प्रजाजनामध्यें शिक्षणाचा फैलाव कसा करावा यासंबंधाचेच होते. आपला देश आणि आपले लोक कित्येक शतकांच्या निष्क्रियतेच्या भारानें जणूं दडपून गेल्यासारखे झाले होते. त्यांच्यांत कांहीं हालचाल उत्पन्न करावयाची असेल तर ती फक्त या शिक्षणाच्याच साधनाचा उपयोग केल्यानें शक्य आहे, याची जाणीव मला तेव्हांपासून होती. १८७९ मध्यें माझ्या हस्तें बडोदा कॉलेज स्थापन झालें तेव्हां मी केवळ मूल होतों. त्या वेळीं उच्च शिक्षणाबद्दल सर्वत्र कुतूहल होतें आणि तेव्हां पेरलेलें हें बीं बळकट आणि जोरदार वृक्षाचें स्वरूप खास धारण करील अशी आशा वाटत होती. त्या आशा आणि आकांक्षा आतां फळास आल्या असून त्याच वृक्षाच्या इतस्ततः पसरलेल्या आणि भविष्यकाळच्या सफल आकांक्षांच्या मोहरानें लहडलेल्या विस्तृत शाखांच्या छायेखालीं आज आपण जमलों आहों! अर्थात् ज्या महाभागांनीं स्पष्ट ध्येयानें आणि दूरदृष्टीनें त्यासाठीं जमीन तयार केली, त्या वाढत्या रोपट्याची निगा मोठ्या विचारपूर्वक केली, आपल्या निढळाच्या घामाचें त्याला जीवन दिलें आणि आपल्या आत्मीयतेच्या सावेश निःश्वासानें त्याच्यांत प्राण भरला त्या सर्वांचें या प्रसंगाला सादर व कृतज्ञतापूर्वक स्मरण करणें हें आपलें खास कर्तव्य आहे.

माझ्या संस्थानांतील या सर्वोच्च शिक्षणसंस्थेच्या पायाचा ज्या दिवशीं मीं दगड बसविला, अगदीं त्या दिवसापासून मी या संस्थेची वाढ सहानुभूतीनें आणि कौतुकानें पाहत आलों आहें. माझ्या राजाच्या नेत्रस्थानीं मी तिला समजत आलों आहे. त्याहूनहि जरा अधिक उचित उपमा द्यावयाची तर मी तिला दीपगृह असें म्हणेन; कारण याच दीपगृहापासून माझ्या राज्यांतील कोनाकोपऱ्यापर्यंत पोंचणारे, विचार आणि स्फूर्ति यांना चैतन्य देणारे प्रकाशकिरण निघावयाचे आहेत, अशी मला आशा होती. माझ्या संस्थानचा कारभार लायकीनें आणि काटकसरीनें चालविण्यासाठीं आणि सर्वसामान्य प्रजाजनांचें नैतिक आणि आध्यात्मिक कल्याण होण्याच्या दृष्टीनें सर्व समाजावर उपकारक वजन ठेवण्यासाठीं अवश्य असणाऱ्या सुशिक्षित आणि शीलवंत माणसांचा या संस्थेपासून अव्याहत पुरवठा व्हावा अशी माझी अपेक्षा होती. उच्च शिक्षणाबद्दल जरी मला नेहमींच आस्था वाटत असते, तथापि शिक्षणाकडे मुख्यतः मी सर्वसामान्य जनतेमध्यें प्रगतिपर भावनांचें बीजारोपण करण्याचें एक महत्त्वाचें साधन म्हणून नेहमींच पाहत आलों आहें, हें आपल्याला चांगलेंच माहीत आहे. ह्या कॉलेजासारख्या संस्थांतून मिळणाऱ्या शिक्षणाचा

## २९

**स्थलः**—बडोदें.

**कालः**—तारीख २५ डिसेंबर १९३२.

**प्रसंगः**—बडोदा कॉलेजचा सुवर्णमहोत्सव.

प्रि. बरो, बडोदा कॉलेजांतील प्राध्यापक, विद्यार्थि आणि उपस्थित सभ्य स्त्री-पुरुषहो !

आजच्या या प्रसंगीं तुम्हीं जें माझें मनापासून आणि प्रेमपूर्वक स्वागत केलें त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. आपल्या या हार्दिक स्वागतामुळें आणि आज जो ऐतिहासिक महत्त्वाचा दिवस साजरा करण्याकरितां आपण जमलों आहों त्याच्या अनुषंगानें उत्पन्न झालेल्या विविध भावनोद्रेकांनीं माझें अंतःकरण उचंबळून आलें आहे.

गतकालाच्या अंधुक मार्गांनें कल्पनेनें मागें जाऊन जेव्हां मी सिंहावलोकन करूं लागलों तेव्हां माझ्या मनामध्यें गतस्मृतींची नुसती खळबळ उडून गेली. आजच्या या समारंभाशीं संबद्ध असा, माझ्या कारकीर्दीतील आरंभीं-आरंभींच्या सार्वजनिक कार्यांपैकीं एक प्रसंग म्हणून, पन्नास वर्षांपूर्वीं जेव्हां मीं या कॉलेजाच्या पायाचा दगड घातला तो प्रसंग मला आठवला; आणि त्या प्रसंगाच्या निमित्तानें अनेक पूर्वस्मृति जागृत होऊन माझ्या मनामध्यें अनेक हृदयस्पर्शी आणि चिरकाल अंतःकरणांत घर करून राहिलेले असे विचार उभे राहिले. त्या वेळीं मजभोंवतीं आणि या पायाच्या समारंभाच्या प्रसंगीं जे लोक हजर होते त्यांपैकीं, आज फक्त मी एकटाच उरलों आहें. कॉलेज हें एक माझ्या राज्यांतील शिक्षणप्रसाराचें प्रतीक आहे; परंतु माझ्या राज्यांत शिक्षण-प्रसाराचें काम यशस्वी करण्याच्या कामीं, अनेकांचे श्रम कारणीभूत झालेलें असून, या प्रसंगानें त्या सर्व कार्यकर्त्यांच्या आशा, आशंका, अपेक्षा, आसक्ति आणि परिश्रम या सर्वांचा चित्रपट माझ्या नजरेसमोर उभा राहतो. आणि या स्मृतिचित्रांनीं माझें चित्त क्षणभर भरून न आलें, तर मी अतिमानुषच ठरेन ! जवळ जवळ चोपन्न वर्षें झालीं. जानेवारी महिन्यांतील एका प्रशान्त सायंकाळीं करणी घेऊन मीं तो पायाचा दगड बसविला. त्या वेळचा तो देखावा— तें धुळीनें भरलेलें मैदान, ठिकठिकाणीं खणलेलें खोल चर, चुना आणि विटा यांचे अस्ताव्यस्त ढीग, अजूनहि आठवतात. त्यांतूनच आतांचे सुव्यवस्थित मार्ग, रुंद रस्ते आणि हिरवळीचीं मैदानें ही प्रतिसृष्टि निर्माण झाली. ही भव्य इमारत, तीवरील डौलदार घुमट, आणि तिच्या छत्राखालीं सर्व प्रकारचें शैक्षणिक संगोपन प्राप्त झालेल्या आणि तें प्रत्यहीं प्राप्त करून घेणाऱ्या

असंख्य आणि आनंदी विद्यार्थ्यांचे समूह— पन्नास वर्षांपूर्वीचें तें दृश्य आणि आजचें हें दृश्य यांमध्यें मनानें प्रवास करतांना माझें हृदय साहजिकच एक प्रकारच्या आनंदानें आणि अभिमानानें भरून जावें हें योग्यच नाहीं काय ?

माझे अगदीं आरंभीचे, राज्याधिकार प्राप्त झाल्यानंतरचे जे मला आज स्मरतात ते, विचार म्हणजे माझ्या प्रजाजनामध्यें शिक्षणाचा फैलाव कसा करावा यासंबंधाचेच होते. आपला देश आणि आपले लोक कित्येक शतकांच्या निष्क्रियतेच्या भारानें जणूं दडपून गेल्यासारखे झाले होते. त्यांच्यांत कांहीं हालचाल उत्पन्न करावयाची असेल तर ती फक्त या शिक्षणाच्याच साधनाचा उपयोग केल्यानें शक्य आहे, याची जाणीव मला तेव्हांपासून होती. १८७९ मध्यें माझ्या हस्तें बडोदा कॉलेज स्थापन झालें तेव्हां मी केवळ मूल होतों. त्या वेळीं उच्च शिक्षणाबद्दल सर्वत्र कुतूहल होतें आणि तेव्हां पेरलेलें हें बीं बळकट आणि जोरदार वृक्षाचें स्वरूप खास धारण करील अशी आशा वाटत होती. त्या आशा आणि आकांक्षा आतां फळास आल्या असून त्याच वृक्षाच्या इतस्ततः पसरलेल्या आणि भविष्यकाळच्या सफल आकांक्षांच्या मोहरानें लहडलेल्या विस्तृत शाखांच्या छायेखालीं आज आपण जमलों आहों ! अर्थात् ज्या महाभागांनीं स्पष्ट ध्येयानें आणि दूरदृष्टीनें त्यासाठीं जमीन तयार केली, त्या वाढत्या रोपट्याची निगा मोठ्या विचारपूर्वक केली, आपल्या निढळाच्या घामाचें त्याला जीवन दिलें आणि आपल्या आत्मीयतेच्या सावेश निःश्वासानें त्याच्यांत प्राण भरला त्या सर्वांचें या प्रसंगाला सादर व कृतज्ञतापूर्वक स्मरण करणें हें आपलें खास कर्तव्य आहे.

माझ्या संस्थानांतील या सर्वोच्च शिक्षणसंस्थेच्या पायाचा ज्या दिवशीं मीं दगड बसविला, अगदीं त्या दिवसापासून मी या संस्थेची वाढ सहानुभूतीनें आणि कौतुकानें पाहत आलों आहें. माझ्या राजाच्या नेत्रस्थानीं मी तिला समजत आलों आहे. त्याहूनहि जरा अधिक उचित उपमा द्यावयाची तर मी तिला दीपगृह असें म्हणेन; कारण याच दीपगृहापासून माझ्या राज्यांतील कोनाकोपऱ्यापर्यंत पोंचणारे, विचार आणि स्फूर्ति यांना चैतन्य देणारे प्रकाशकिरण निघावयाचे आहेत, अशी मला आशा होती. माझ्या संस्थानचा कारभार लायकीनें आणि काटकसरीनें चालविण्यासाठीं आणि सर्वसामान्य प्रजाजनांचें नैतिक आणि आध्यात्मिक कल्याण होण्याच्या दृष्टीनें सर्व समाजावर उपकारक वजन ठेवण्यासाठीं अवश्य असणाऱ्या सुशिक्षित आणि शीलवंत माणसांचा या संस्थेपासून अव्याहत पुरवठा व्हावा अशी माझी अपेक्षा होती. उच्च शिक्षणाबद्दल जरी मला नेहमींच आस्था वाटत असते, तथापि शिक्षणाकडे मुख्यतः मी सर्वसामान्य जनतेमध्यें प्रगतिपर भावनांचें बीजारोपण करण्याचें एक महत्त्वाचें साधन म्हणून नेहमींच पाहत आलों आहें, हें आपल्याला चांगलेंच माहीत आहे. ह्या कॉलेजासारख्या संस्थांतून मिळणाऱ्या शिक्षणाचा

फायदा सर्वांच्याच नशिबांत असतो असें नाहीं. हें ध्यानांत घेऊनच, माझ्या राज्यांतील प्रजामात्राला शिक्षणाचा कांहीं ना कांहीं तरी लाभ व्हावा म्हणून मीं संस्थानांत सक्तीचें शिक्षण चालू केलें. या कॉलेजचा त्या धोरणाशीं अगदीं निकटचा संबंध आहे असें मला वाटतें आणि या कॉलेजांत शिक्षण घेणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं तें धोरण यशस्वी करून दाखविलें पाहिजे अशीच माझी अपेक्षा आहे.

या वरील अपेक्षा सिद्ध व्हाव्या यासाठीं लागणारा खर्च किंवा परिश्रम यांबद्दल मीं मुळींच कुरकूर केलेली नाहीं. माझ्या प्रजाजनांचें कल्याण व्हावें आणि त्यांची नैतिक व भौतिक दृष्टयाहि प्रगति व्हावी हा एकच एक उद्देश मनांत धरून, त्यांच्या गरजांप्रमाणें आणि प्रवृत्तीप्रमाणें त्यांना सर्व आवश्यक शिक्षणाची प्राप्ति व्हावी म्हणून या कॉलेजमध्यें सुरुवातीला केवळ वाङ्मयिक शिक्षणाची सोय होती. तींत शास्त्रीय विषय, शेतकी, कायदा, तौलनिक धर्म अशा एकामागून एक शाखांची मीं भर घातली. आणि ज्या संस्थेवर माझ्या आयुष्याच्या वसंतांतच मीं इतका विचार केला आणि आस्था दाखविली ती अगदीं पहिलीच संस्था आतां इतकी फलवती झालेली पाहून मला अत्यंत समाधान होत आहे. तिची वाढ आणि विस्तार पाहून मला परमावधीचें समाधान तर होत आहेच; पण त्याबरोबरच आजपर्यंत तिनें मिळविलेलें यश हें याहूनहि मोठ्या यशाचें आणि कर्तृत्वाचें प्रसादचिन्ह आहे असें मला वाटतें. सन १८८२ मध्यें हें कॉलेज सुरू होतांना त्यांत फक्त तीस विद्यार्थि होते, ती संख्या आतां मुळांतील संख्येच्या तीसपटीऱ्या वर झालेली आहे असें आपल्याला आतांच सांगितलें गेलें. वाङ्मयिक आणि शास्त्रीय शाखांतून पदवी घेऊन गेलेल्या विद्यार्थ्यांची संख्या जवळ जवळ २५०० आहे. कोणाहि संस्थेला एवढ्या कामाबद्दल अभिमानच वाटावा. परंतु मला केवळ संख्येचें महत्त्व वाटत नाहीं. मला जें महत्त्व वाटतें तें या संस्थेंत शिकविलेल्या आणि विद्यार्थ्यांनीं आपआपल्या व्यापक कार्यक्षेत्रांत आपल्याबरोबर नेलेल्या धैर्य, शिस्त, सेवा आणि मनुष्यमात्रांतील बंधुभावासंबंधीं गाढ विश्वास, इत्यादि ध्येयांबद्दल. या ध्येयांच्या सामर्थ्यावर, या संस्थेंतून बाहेर पडलेले तरुण स्त्री-पुरुष हे आपल्या देशबांधवांच्या जीवनामध्यें चैतन्य उत्पन्न करणारीं आणि जाति व पंथ आदिकरून आकुंचित दृष्टीचे निर्बंध झुगारून देणारीं प्रभावीं साधनें झालेलीं असलीं पाहिजेत अशी जी मला खात्रीची आशा वाटते, तिचाच माझ्या मनावर या घटकेला विशेष पगडा आहे.

जेव्हां मीं या कॉलेजचा पाया घातला तो काळ आणि गेल्या वीस वर्षांत एकदम बदललेला काळ यांत फरक होता. त्या वेळीं एका नव्या अनुकूल वातावरणांत जग प्रवेश करीत होतें. तो काळ 'पांढरपेशा' कलांना पोषक होता आणि सर्व जगांतच ज्याचा बोलबाला होता तें मानव केंद्र आणि बहुतांशीं वाङ्मयिक विषय बहुसंख्य

विद्यार्थ्यांचें लक्ष वेधीत. पण गेल्या वीस वर्षांत हा जमाना बदलला आहे. उत्पादन आणि वाहतूक या दोन क्षेत्रांत सर्व जगांतच, आणि विशेषतः युरोप आणि अमेरिका या दोन खंडांत शास्त्राच्या प्रगतीमुळें विलक्षण बदल झाले आहेत. भूगोलाच्या प्रत्येक भूखंडांत नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक विभागांत त्याचा परिणाम भासमान होतो. या अफाट क्रान्तीची स्फूर्ति म्हणा अगर धुंदी म्हणा, आपल्या देशबांधवांना मिळून त्यांनाहि आजकालच्या शास्त्रीय प्रगतीमध्यें भाग घेण्याची इच्छा उत्पन्न झाली, आणि आधुनिक शिक्षणामध्यें शास्त्रीय विषयांना योग्य तें स्थान देणें अवश्य आहे याची खात्री पटली. यामुळें शास्त्रीय शिक्षणाची अधिक सोय झाली पाहिजे अशी ओरड सर्वत्र ऐकूं येतें. काळाप्रमाणें वागण्याच्या या इच्छेबद्दल अर्थातच मला सहानुभूति वाटली. आणि कालचक्राबरोबर जीवनक्रमांतील प्रत्येक इतर बाबी-प्रमाणें शिक्षणांतहि प्रगति झालीच पाहिजे, या अगदीं सर्वमान्य सिद्धांताला अनु-सरून मींहि अत्यंत सदिच्छेनें 'सायन्स इन्स्टिटयूट' बांधण्याला परवानगी दिली. त्याचें बांधकाम पुरें होत आलेलें आपल्यासमोर आहेच. म्हणजे मीं लावलेलें बडोदा कॉलेजरूपी ज्ञानाचें रोपटें आपल्या पन्नास वर्षांच्या जोमदार वाढीनें आपल्या सर्वांच्या कौतुकाचा विषय होऊन बसलें आहे तोंच त्याच्या एका प्रभावी आणि जोमाच्या शाखेचेंहि आपल्याला दर्शन होत आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. मूळ वृक्षाप्रमाणेंच ही शाखा देखील या संस्थानच्या आणि प्रजाजनांच्या कल्याणाला कारणीभूत होईल अशी मला आशा वाटते.

हल्लींच्या पिढीच्या मतें शिक्षणक्षेत्रांतील शास्त्रांचें स्थान अत्यंत महत्त्वाचें आहे; आणि निसर्गशास्त्राच्या कोठल्याहि शाखेच्या अभ्यासाच्या योगानें नवीन नवीन सत्याचा बोध होतो हें खरेंच आहे. फिजिक्स, केमिस्ट्री, बायॉलॉजी, नॅचरल हिस्टरी—कोणतेंहि शास्त्र घ्या, त्याच्या अभ्यासकाला ज्ञानाचें क्षेत्र वाढविण्याची खास सुलभता असते. आणि यामुळेंच शास्त्रीय विषयांचा अभ्यास आकर्षक वाटतो. जगांत चिरंतन काय आहे आणि सत्य कोणतें याचाच शोध महत्त्वाचा आहे. त्या दृष्टीनें या देशांतल्या लोकांना शास्त्राभ्यासाचें महत्त्व किती आहे याची अति-शयोक्ति करणें अशक्य आहे. आपल्या देशांत पारलौकिक विषयावर शतकानुशतकें दीर्घकाल व्यासंग केला गेल्यानें जनतेची एकंदर मनःप्रवृत्तिच सत्यान्वेषणाला—सत्यशोधनाला सहजच पराङ्मुख आहे. अशाश्वत 'नेति नेति'च्या पाठीमागें ती सदा लागली आहे. ज्ञानाच्या खऱ्या शोधाला असली प्रवृत्ति अत्यंत हानिप्रद आहे हें मीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. आपण वस्तुस्थितीला तोंड देणें अवश्य आहे; आणि तसें करण्यासाठीं मनाची शास्त्रीय वृत्ति बनविली पाहिजे. केवळ शुद्ध शास्त्रीय अभ्यासांतच या वृत्तीचा उपयोग आहे असें नाहीं. पदार्थविज्ञान, रसायन, अशा भौतिक शास्त्रांप्रमाणेंच इतिहास आणि तत्त्वज्ञान अशांसारख्या ज्ञानक्षेत्रांतहि

खऱ्याखुऱ्या गोष्टींवरच आपला अभ्यास आधारला पाहिजे. तेव्हां आपल्या सर्व सामर्थ्याचा उपयोग करून आपण प्रथम निरर्थक अशीं शिथिल चिंतनपृथक्करणादि मनांतलीं कोळिष्टकें झाडून झटकून टाका आणि अखिल ज्ञानक्षेत्रांचें शास्त्रीय निरीक्षण आणि सुव्यवस्थापन करा, असेंच मी आग्रहानें सांगेन. पण याबरोबरच आपण स्वतः 'मनुष्याचा' आपल्या विचारावर पहिला हक्क आहे हें विसरतां कामा नये. त्याच्या आशा, आशंका, गरजा, महत्त्वाकांक्षा– एका शब्दांत सांगावयाचें तर त्याच्या आंतर व वैयक्तिक जीवनावर ज्याच्या ज्याच्या योगानें म्हणून प्रकाश पडेल तें सर्व विचारांत घेतलें पाहिजे. इतिहास, तत्त्वज्ञान आणि कल्पनाप्रधान वाङ्मय यांचें हेंच क्षेत्र असल्यामुळें आपल्या अभ्यासाच्या योजनेमध्यें यांना अवश्य स्थान दिलें पाहिजे. केवळ धंद्यांत यश मिळविण्याला लायक असणारा मनुष्य निर्माण करणें एवढेंच शिक्षणाचें काम नाहीं. प्रायोगिक शास्त्रांचा अभ्यास करण्यामध्यें आज अत्यंत उत्साह दाखविण्यांत येत असला तरी त्यामुळें शिक्षणाचें खरें कार्य यापेक्षां पुष्कळच असतें, या गोष्टीकडे कानाडोळा करून चालणार नाहीं.

आज उपदेशपर कांहीं बोलावें असा माझा उद्देश नव्हता; आणि आजच्या भाषणांत जर वरील द्विविध कार्यांचा मीं येथें उल्लेख केला असला तर तो केवळ या ज्ञानाच्या दोन शाखांनीं परस्पर-सान्निध्यानें आणि साहचर्यानें कोणत्याहि शाखेच्या एकांगी अवलंबनापासून येणारें वैगुण्य आणि एककल्लीपणा सुधारून घ्यावा याच आशेनें होय. या उभय ज्ञान-विज्ञानांपासून मी दोन गोष्टींची अपेक्षा करतों. एक, त्यांच्या योगानें समाजाला लाभ झाला पाहिजे; आणि दुसरी, ज्यांच्या वर्तनक्रमाचा परिणाम त्यांच्या देशबांधवांच्या जीवनक्रमावर उठून दिसेल अशा प्रभावी आदर्श माणसांची निर्मिति झाली पाहिजे.

ज्ञानाची खरी किंमत आपण त्याचा जो उपयोग करतों त्यावर अवलंबून आहे, आणि जर केवळ स्वार्थाकरितां किंवा हीन उद्देशासाठींच तें वापरावयाचें असेल तर तें नसलेलेंच पुरवलें. शिक्षणानें प्राप्त होणारे उच्च दर्जाचे आणि अभिजात असे बौद्धिक शीलविषयक सद्गुण हे कोणत्याहि एका वंशाला किंवा देशाला एकट्यालाच वारशानें मिळतात असें नाहीं. आणि ते प्राप्त झाल्यानंतर आपण ते केवळ आपल्या स्वतःच्याच फायद्याकरितां किंवा त्यांचीच निरपेक्ष वाढ करण्याकरितां उपयोजावे हें केव्हांहि योग्य नाहीं, तर त्यांची शक्यतों जोपासना करून गरीब-श्रीमंत, सर्वच देशबांधवांच्या हितार्थ आपण त्यांचा उपयोग करणें अवश्य आहे. हें सत्य एकदां का नीट समजलें म्हणजे मग लोकशाहीला पायाभूत असणाऱ्या योग्य भावनेच्या तत्त्वाचीहि जाणीव होईल.

आपण सतत ज्याच्या सिद्ध्यर्थ झटावें असें हें मोठें कमनीय ध्येय आहे. आजपर्यंत मिळविलेल्या यशावरच आपण केवळ संतुष्ट राहतां कामा नये. विधायक

कार्यक्रमापेक्षां विघातक टीका करणें हें किती तरी पटींनीं अधिक सोपें असतें हें मी जाणतों; आणि आपल्या येथें प्रचलित असलेल्या उच्च शिक्षणापासून होणाऱ्या कित्येक लाभांची मला जाणीव नाहीं असें आपण समजूं नये. पण त्याबरोबरच मला त्या पद्धतींतील कांहीं दोषहि दिसत आहेत; मला वाटतें आपल्यालाहि ते दिसत असतील. आणि आपल्या पाठीमागून येणाऱ्या पिढीला आपल्यापेक्षांहि त्या पद्धतीपासून अधिक लाभ व्हावा या दृष्टीनें तिच्यांत शक्य त्या मार्गानें पूर्णत्व आणण्यास झटणें हेंच आपलें ध्येय असलें पाहिजे.

जगाच्या फार मोठ्या भागावर अलीकडे लोकशाहीचीं स्तुतिस्तोत्रें मोठ्यानें गाइलीं जात आहेत; तोच प्रकार आपल्या देशांतहि चालू आहे. पण हा प्रकार केवळ ओष्ठनिष्ठेचाच असावा असें म्हणावयाचा मला मोह उत्पन्न होतो !

अशा परिस्थितींत खरी लोकशाही म्हणजे काय आहे, हें जगाला दाखवून देण्याची जबाबदारी शिक्षणाचा लाभ घेणाऱ्या तरुणांवरच येऊन पडते. एखाद्या राज्यांतील प्रत्येक पुरुष, स्त्री आणि मूल ज्या वेळीं आपला समाज अधिक प्रगत, बळकट आणि स्वतंत्र करण्यासाठीं अत्यंत परिश्रम करण्याच्या अनिवार्य आकांक्षेनें भारून जाईल त्या वेळीं तेथें खऱ्या लोकशाहीचा उदय होईल. आणि हें ध्येय जनता सुशिक्षित झाल्याशिवाय साध्य होणार नाहीं. येथें सुशिक्षित या शब्दानें केवळ साक्षरतेचा बोध घ्यावयाचा नाहीं, तर 'समाज-सेवा' या सामासिक शब्दामध्यें जीं गंभीर आणि नैतिक मूल्यें समाविष्ट होतात त्यांचा लाभ झाला आहे तोच खरा सुशिक्षित होय.

बडोदा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनो, उच्च शिक्षणांतून बाहेर पडलेले नागरिक म्हणून समाजांतील आपला दर्जा मोठा आणि अर्थात् त्यामुळें आपल्या नागरिक बांधवांवरील आपलें वजनहि मोठें आहे, हें मला आपल्या ध्यानांत आणून द्यावयाचें आहे. आजच मोठें असलेलें आपलें हें वर्चस्व दिवसेंदिवस वाढीसच लागणारें आहे. म्हणून तुमच्यापैकीं प्रत्येकानें, मनुष्यस्वभावाप्रमाणें केवळ आपल्या स्वतःच्याच हिताकरितां नव्हे तर ज्या बृहत्समाजाचे तुम्ही घटक आहां त्या समाजाच्याहि कारणीं आपलें उत्तम बुद्धिसामर्थ्य आणि पराकाष्ठेचे परिश्रम लावण्याचा निश्चय केला पाहिजे. आपल्या देशांत एकी नाहीं. तीच आपल्या समाजाची एक मोठी आणि महत्त्वाची उणीव आहे. ती दूर करावयाला हाच एक खात्रीचा उपाय आहे. दुसरीहि एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे– लोकशाही देशांमध्यें सर्वसामान्य जनतेचा दर्जा त्यांच्या सामर्थ्याप्रमाणें वर चढविणें किंवा ज्ञानार्जनाचे मार्ग ज्यांच्या त्यांच्या सामर्थ्यानुसार हळूहळू चालून चोखाळण्याइतके रुंद आणि सहज आटोक्यांत येतील असें करणें, एवढेंच करून आपल्याला थांबतां येणार नाहीं; तर याहून जे

अधिक सामर्थ्यवान् लोक त्यावरून मोटार किंवा विमान अशासारख्या द्रुतगतीच्या वाहनांतून आक्रमण करूं इच्छितील त्यांच्याहि प्रगतीला आपण अडथळा करतां कामा नये.

ह्या संस्थेनें आजपर्यंतच्या आपल्या हयातींत पुष्कळच कार्य केलें आहे हें खरें असलें, तथापि तेवढ्या यशानेंच आपण थबकतां कामा नये. आजच्या जगामध्यें बौद्धिक कार्य आणि समाजसेवा अशा दोन्ही तऱ्हेच्या कर्तृत्वाला वाढता अवसर मिळत आहे. देशाच्या वाढत्या गरजांकडे आपल्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं दुर्लक्ष करून चालणार नाहीं अशी माझी खात्री आहे. आपल्या देशाची आर्थिक दुःस्थिति हीच आपल्या शैक्षणिक ध्येयांच्या यशाच्या आड येत आहे. तेव्हां सर्वसाधारण लोकांचें दारिद्र्य, अभ्यासाला अनुकूल परिस्थितीची वाण आणि तज्जन्य अशी शिक्षणाबद्दल सर्वत्र दिसून येणारी अनास्था हीं आपल्या सामाजिक परिस्थितींतील वैगुण्यें दूर करण्यासाठीं आपण सर्वांनींच अंतःकरणपूर्वक परिश्रम केले पाहिजेत. आपल्या या मायदेशाचें विशुद्ध नांव आणि सन्मान अकलंकित राखण्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या अशा या कार्याला बुद्धिपुरःसर साहाय्य करण्याची एवढी मोठी संधि आपल्याला सुदैवानें लाभली आहे. आपण त्यासाठीं अवश्य तो वेळ देण्याला कंटाळा करणार नाहीं, अशी मला खात्री वाटते.

आणि आतां भाषण संपवून खालीं बसण्यापूर्वीं मला तुम्हां बडोदा कॉलेजच्या विद्यार्थ्यांना एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची आहे, आणि ती ही कीं, तुमच्या दैवयोगानें तुम्ही कोठेंहि नियुक्त झालां असला तरी तुमच्या या कॉलेज विद्यामातेबद्दल आपल्या अंतःकरणांत प्रेमाचा एक कोपरा राखून ठेवा. तुमच्या बालपणीं आणि तारुण्यांत तुमचें संगोपन करून तुम्हांला मार्ग दाखविणाऱ्या तुमच्या मातापित्यांबद्दल तुम्हांला प्रेमादर वाटावा हें मानवी स्वभावाला धरूनच आहे. पण तुमचें मन व बुद्धि यांचा विकास करून तुमचें शील तयार करणारें शिक्षण तुम्हांला देण्यासाठीं ज्या संस्थेनें आणि तिच्यांतील ज्या कार्यकर्त्यांनीं अव्याहत काळजी घेतली त्याबद्दलहि तुम्हीं तसल्याच प्रकारची कृतज्ञताबुद्धि बाळगावी हें देखील कमी नैसर्गिक नाहीं. ही सर्व फलनिष्पत्ति ज्या झाडापासून झाली आहे तें झाड त्यांना परमावधीचे श्रम आणि त्याग करूनच वाढवावें लागलें आणि तें आतां संरक्षण करून त्याच्या वाढीला निवारा प्राप्त करून देणें, हें तुमचें क्रमप्राप्त कर्तव्यच आहे. म्हणून त्याची अधिकाधिक भरभराट होवो अशी सप्रेम आशा ठेवा, आणि पदवी घेतल्यावरहि मागें वळून पाहून सार्वजनिक संस्थांमध्यें कॉलेजचें स्थान नेहमीं चढतें वाढतें राहील, अशाबद्दल सतत लक्ष ठेवा. आणि परमेश्वर तुम्हांला आयुष्यक्रमामध्यें कोठलेंहि स्थान देवो तेथें तुमच्या आचरणानें आणि चारित्र्यानें

तुम्ही बडोदा कॉलेजचे सत्पुत्र आणि सत्कन्या होण्यास लायक आहां, असेंच लोकांच्या प्रत्ययाला आणून द्या.

आणि सरतेशेवटीं, जे या विद्यादानाच्या महत्कार्यामध्यें मजबरोबर सहभागी आहेत आणि ज्यांनीं माझें शैक्षणिक ध्येय यशस्वी करण्याच्या कामीं निरपेक्ष बुद्धीनें आपलें सर्वस्व वाहून ती जबाबदारी आनंदानें अंगिकारिली आहे अशा प्रिन्सिपल बरो आणि त्यांचे प्राध्यापक सहकारी यांजबद्दल दोन शब्द: तुम्हीं अंगीकारलेलें हें कार्य असेंच धीरगंभीरपणें पुढें चालविण्यासाठीं लागणारें धैर्य, आपण घालून दिलेली सुवर्णपरंपरा तशीच अबाधित राखण्यासाठीं लागणारें सामर्थ्य, आपल्या विद्यार्थ्यांना स्फूर्ति आणि उत्तेजन देण्यासाठीं अवश्य असणारा आत्मविश्वास, शीलसंवर्धन आणि ज्ञानदानाला अवश्य असा प्रसाद इत्यादि सद्गुणपरंपरा तुम्हांला तुमच्या कार्यनिष्ठे-मुळें लाभो आणि तुमच्या अप्रतिम निष्ठा, सहृदयता आणि त्याग इत्यादि श्रेष्ठ गुणांमुळें तुमचीं नांवें तुमच्या विद्यार्थ्यांच्या अंतःकरण फलकांवर आणि संस्थानच्याहि स्मृतिपटावर अविस्मार्यपणें खोदलीं जावोत !

## ३०

**स्थल:—बडोदें.**

**काल:—तारीख २५ डिसेंबर १९३२.**

**प्रसंग:—गृहशास्त्र-प्रदर्शनाचें उद्घाटन.**

सभ्य स्त्री-पुरुषहो,

या प्रसंगाला अनुलक्षून मोठें भाषण करावें असा माझा इरादा नाहीं. बडोद्यांत आल्यापासून मला निकडीचीं अशीं इतर बरींच कामें उरकावयाचीं असल्यामुळें मला माझे विचार सुसूत्र लावण्यास देखील वेळ मिळाला नाहीं. परंतु गृहशास्त्राच्या या विषयाबद्दल मला मनापासून आस्था वाटत असल्यामुळें मला सुचतात तसे चार शब्द बोलतों. त्यांत कोणत्याहि प्रकारचें तर्काचें सूत्र आपल्यांला आढळणार नाहीं— माझ्या मताचें फक्त दिग्दर्शन होईल.

मी युरोपांत असतांनाच असें एक प्रदर्शन भरविण्याबद्दल मीं आज्ञा दिली. आणि इतक्या थोड्या वेळांत आणि अशा प्रदर्शनाला उपयोगी साधन-सामग्री जमविणें जेथें अत्यंत कठीण आहे अशा गुजराथेंत, असल्या प्रदर्शनाची रचना करणें हें खरोखरच कठीण होतें.

घरगुती अर्थशास्त्र किंवा गृहशास्त्र म्हणजे तरी काय? गृहशास्त्रविषयक प्रदर्शनांत कोणत्या तऱ्हेच्या वस्तु मांडाव्या? मी युरोपांत असतांना, आमच्या राजवाड्याची आरास करणारे कामगार ( इंटीरियर डेकोरेटर ) मि. कॅनॉफ्स्की यांना या सर्व प्रश्नांचा विचार करावयास आणि त्यांनीं युरोपांतून मिळविलेल्या गृहशास्त्र-विषयक ज्ञानाचा आणि अनुभवाचा उपयोग करून गृहशास्त्रविषयक आणि सौंदर्य-शास्त्रविषयक अर्थशास्त्र म्हणजे काय याचें प्रत्यंतर दाखविण्यासाठीं ह्या प्रदर्शनाची रचना करावयास मीं सांगितलें. खरें पाहिलें तर गृहविज्ञान हा विषय मोठा उपयुक्त असून अत्यंत उत्तेजनार्ह आहे. मि. कॅनॉफ्स्की यांनीं सर्व प्रकारच्या वस्तूंची कला-युक्त मांडणी केलेली दिसत आहे आणि त्यामध्यें आपल्या देशांतील मोठमोठ्या कंपन्यांनीं तयार केलेले उत्तमोत्तम जिन्नसहि मांडलेले आहेत. या कंपन्यांनीं उपयोजिलेलीं साधनें व हत्यारें यांचा अभ्यास करण्यासारखा आहे. युरोप, अमेरिका आणि इतर देशांतील जिनसांशीं येथील जिनसांची तुलना करून हल्लींची परिस्थिति सुधारण्याच्या दृष्टीनें काय करावें हें आतां तुम्हीं दाखविलें पाहिजे; आणि कसोशीचे प्रयत्न करून अशा पदार्थांबद्दल मागणी कशी वाढेल याची चिंता वाहिली पाहिजे; कारण मागणी वाढेल तरच कारखानदारांना आपल्या उत्पादनाचा दर्जा वाढविण्यास आणि फिरून तशा प्रकारची मागणी वाढविण्यास संधि मिळणार आहे. तसें म्हटलें तर गेलीं कित्येक वर्षें आपण एकसारखे या कल्पनेच्या मागें आहोंच. असलें प्रदर्शन भरविण्याला आज पुष्कळच दिवस झाले असें श्री. तळवळकर म्हणाले; परंतु माझ्या स्मरणाप्रमाणें १९२३ त आपण भरविलेलें औद्योगिक प्रदर्शन यापेक्षांहि विस्तृत प्रमाणावरचें असून तेंच या स्वरूपाचें पहिलें प्रदर्शन होतें.

लोकशिक्षणाच्या दृष्टीनें अशा प्रदर्शनांचें कार्य फार महत्त्वाचें आहे. हीं प्रदर्शनें दरसाल भरवावीं, आणि तें शक्य नच होईल तर निदान दर तीन वर्षांनीं तरी भरवावीं अशी मला आवड आहे. यापुढें दर तीन वर्षांनीं प्रदर्शनें भरवून आपण प्रगति करीत आहोंत का आपली परागति होत आहे याची दखलगिरी त्या मुदतीपुरती घेतां येईल अशी मला आशा आहे. या गोष्टींविषयीं मला व्यक्तिशः आस्था वाटते, आणि गृहविज्ञानाचा मुख्यतः संबंध गृहजीवनाशीं असल्यानें अनेक शाखांमध्यें त्या ज्ञानाचा उपयोग करतां येण्यासारखा आहे असें मला वाटतें. सर्व साधनसामुग्रीचा राजा म्हटला म्हणजे आदिम आणि मूलभूत अशी सर्वांनाच भासणारी गरज जें अन्न तें होय. हवाशुद्धि, आरोग्यविज्ञान, अनुकूल परिस्थिति इत्यादि अनेक गोष्टी त्याच्या मागोमाग विचारांत घ्याव्याच लागतील.

पुष्कळ वर्षांमागें, बालवयांत, या सर्व गोष्टी मला अज्ञात होत्या. राजवाड्यांत काय चाललें आहे, निरनिराळे अधिकारी आपलीं कामें कशीं करीत आहेत इत्यादि

पाहण्याचा मीं प्रयत्न केला, त्यांचे विचार व मतें हीं ध्यानांत घेतलीं आणि त्यांपासून जे धडे मी घेऊं शकलों ते आचारांत आणण्याचा मीं प्रयत्न केला.

एकंदरीनें विचार करतां एंजिनाला जसा कोळसा, तसें आपल्या शरीराला अन्न हें पहिल्या प्रतीच्या महत्त्वाचें आहे. अन्न आरोग्यकारक, चांगलें, भरपूर आणि शुद्ध तऱ्हेनें तयार केलेलें असलें पाहिजे. मीं या सर्व गोष्टींना एक प्रकारची शिस्त लावून मूलभूत व्यावहारिक तत्त्वांचीं पुस्तकें तयार करविलीं आहेत. आमच्या राजवाड्यांत, भोजनकचेरींत तीं तुम्हांस पाहावयास मिळतील. तीं टिपणवजाच आहेत, पण तुम्हांला त्यावरील सर्व तपशील मोठ्या विश्वकोशांत खास आढळेल. हल्लीं अन्न-सिद्धीची कला अक्षरशत्रु आणि आरोग्यशास्त्राची व स्वच्छतेची कल्पनाहि नसलेल्या अडाणी लोकांच्या हातांत आहे. यासाठीं कोणीहि चांगलें स्नान केल्याशिवाय स्वयं-पाकघरांत येऊं नये, किंबहुना नीट छाननी केल्याशिवाय कोणतीहि वस्तु तेथें स्वतः-बरोबर नेऊं नये असे मीं नियम केले आहेत; आणि अर्थात् अशा शुद्ध स्वयंपाक-घरांत निष्पन्न झालेलें अन्न सहजच आरोग्यदृष्ट्या समाधानकारक असतें.

सामान्यतः पाकक्रिया ही इतरांच्या अनुकरणानें आणि केवळ सवयीच्या जोरावर केली जाते. परंतु त्यांत दर्जा आणि प्रमाण यांबद्दल काळजी न घेतल्यामुळें नेहमींच उत्तम चव येते असें घडत नाहीं; एवढेंच नव्हे तर, कित्येक वेळां निष्कारण वस्तूंचा अपव्यय होऊन त्यांत उधळपट्टीहि होते. पुरेसें मार्गदर्शन आणि देखरेख नसली आणि स्वयंपाकघरांतले लोक जाणते व निष्ठावंत नसले, तर अन्नसिद्धीचें खरें ध्येय केव्हांहि साधणार नाहीं.

केवळ सांगून ह्या गोष्टी जमत नाहींत, त्या कृतींत उतरल्या पाहिजेत. कांहीं एक दंडक ठरवून त्याप्रमाणें होणार नाहींत त्या गोष्टी, चालूं देतां कामा नये. मीं यावरहि खास पुस्तकें तयार करविलीं आहेत. मी केवळ हुकूम करून थांबत नाहीं तर त्यांनीं सांगितल्याप्रमाणें सर्व केलें आहे किंवा नाहीं हें तपासून त्याचे परिणामहि नमूद करून ठेवतों. याचा परिणाम असा झाला आहे कीं, अनेक प्रकाराच्या नोंदी आतां तयार झाल्या असून, निदान माझ्या राजवाड्याच्या स्वयंपाकगृहांतील पाक-सिद्धिकलेंत फारच फरक झाला आहे. दुसराहि एक या पद्धतीमुळें महत्त्वाचा परिणाम झाला आहे. निरनिराळ्या सिद्धान्नांच्या पद्धति, साधनें, प्रमाण आणि वापरावयाच्या पदार्थांच्या जाती वगैरेबद्दल पद्धतशीर वाङ्मय आतां माझ्या पद्धतीनें तयार झालें आहे. यावरून मी पाकशास्त्राचा तज्ज्ञ आहे अगर मला त्यांतलें फारसें ज्ञान किंवा अनुभव आहे, असें समजूं नका. पण मी जें सांगतों आणि माझ्या राजवाड्यांत अंमलांत आणतों तेंच माझ्या लोकांनीं अंमलांत आणावें अशी माझी त्यांना सूचना आहे, असें केल्यास मी त्यांचा आभारी होईन. कोणाला यांत लक्ष घालावेंसें वाटलें तर त्यांत

सहज त्याचें चित्त वेधेल आणि त्यानें प्रयत्न केलाच तर काटकसरीनें निर्माण केलेलीं नाना तऱ्हेचीं सिद्धान्नें जगांतील निरनिराळ्या भागांत विक्रीकरितां पाठवून त्याला धनलाभहि होईल. बुद्धि, स्फूर्ति, कार्यक्षमता, संघटनाचातुर्य ज्याला आहे अशा कोणाहि माणसाला धनसंपादनाचें हें क्षेत्र मोकळें आहे. तें फार विस्तृत आहे, तसेंच आकर्षकहि आहे. आपण सहकार्य केलें तर हिंदी पक्वान्नांकरितां केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर जगाच्या इतर अनेक भागांतहि वाटेल तेवढी मागणी आहे.

पाकसिद्धींतील जिनसांप्रमाणेंच लाकूडसामानाच्याहि प्रकारांत शिस्त निर्माण करण्याचें काम करावें लागलें. त्यासाठीं प्रथम मी फ्रान्स आदिकरून युरोपियन देशांत सामानसुमानाचें शिक्षण घेण्यासाठीं माणसें पाठविलीं आणि तीं परत आल्यावर त्यांच्या साहाय्यानें सरकारी कारखान्यांत कित्येक महत्त्वाचे फेरबदल मीं करविले.

मी अगदीं लहान होतों तेव्हां शहरच्या मध्यवस्तींतील जुन्या राजवाड्यांत आणि नंतर मकरपुऱ्यामध्यें माझी राहणी कशा प्रकारची असे, याची तुम्हां कोणालाहि कल्पना नाहीं! पैशाची कमतरता होती किंवा माझ्या हातीं हुकमत नव्हती यांतला प्रकार नव्हता. मला स्वतःला त्या बाबतींत ज्ञान नव्हतें आणि माझे अधिकारी तर मजहूनहि अधिक अडाणी असल्यामुळें सुखसोई म्हणजे काय, यासंबंधीं अधिक चांगल्या कल्पना ते मला देऊंच शकले नाहींत. त्या गोष्टीला आतां बराच काळ लोटला आहे आणि विचारांची वाढहि फारच झाली आहे. आतां राहणीचें मान किती तरी सुधारलें आहे; म्हणून त्या मागच्या काळाचें स्मरण झालें म्हणजे मला दुःख होतें किंवा खेद वाटतो, असें मुळींच नाहीं. उलट मला त्या परिस्थितीपेक्षां आपण आतां किती तरी प्रगति केली आहे, या जाणीवेनें उत्तेजन येतें आणि गृहशास्त्रामध्यें प्रस्तुत प्रदर्शनासारखी आपण आघाडी मारूं शकलों, याबद्दल आपलें अभिनंदन करावेंसें वाटतें. एक राजा जी प्रगति करूं शकला तीच आपल्या सर्वांच्या नित्याच्या जीवनांत कां होऊं नये? आपल्या राहणीमध्यें सुखसोई कशा आणाव्या याबद्दलच्या प्रगतिपर आणि व्यापक कल्पना बाळगून मजप्रमाणेंच आपण त्या अमलांत आणण्यास झटाल अशी मला उमेद आहे.

आपापल्या क्षेत्रांत सुखी व्हावें आणि निरर्थकपणें निराशावादी होऊं नये, हा खरा जीवनाचा हेतु आहे. आपण असमाधानांत दिवस कंठावे असा परमेश्वराचा उद्देश असणेंच अशक्य आहे. स्वतः सुखांत राहावें आणि इतरांनाहि सुखी करावें, असाच त्याचा संदेश असला पाहिजे.

इतर कलांबद्दल बोलावयाचें तर मी लहान असतांना कलेची व माझी कोणीच ओळख करून न दिल्यामुळें माझें शिक्षण अत्यंत आकुंचित राहिलें, त्याला व्यापक-

पणा आला नाहीं. त्यामुळें मला स्वतःच्या प्रयत्नांनीं पुढें पुष्कळच गोष्टी शिकाव्या लागल्या. येथें देखील मला बुद्धि नव्हती अशी वस्तुस्थिति नव्हती; तर त्या वेळीं असल्या कल्पना, या प्रकारचें शिक्षण आणि प्रगल्भ विचार यांचेंच सर्वत्र दुर्भिक्ष होतें !

आपल्या सर्वच्या सर्व राष्ट्राला कला म्हणजे काय याची जाणीव होऊं शकेल काय ? लोकांच्या सामान्य जीवनांत कलेचा अंतर्भाव होणें इष्ट नाहीं काय ? हिंदुस्थान दरिद्री आहे. त्याची ही आर्थिक दुःस्थिति सुधारेपर्यंत त्याच्या लोकांच्या जीवनोद्देशांत इष्ट फरक करून घेतां येणें अशक्यच वाटतें. म्हणून प्रथम ह्या परिस्थितींत सुधारणा करण्याच्या दृष्टीनें आणि हा अडथळा दूर करण्याच्या दृष्टीनें वस्तुस्थितीचें पृथक्करण केलें पाहिजे. ही गोष्ट ध्यानांत बाळगून आधीं कल्पना निश्चित बनवाव्या लागतील आणि मग पूर्णपणें ध्येयाप्रत पोंचतां येईल. जगांतील इतर कोणत्याहि लोकांपेक्षां हिंदी लोक निराळे किंवा अधिक हीन दर्जाचे खास नाहींत. त्यांनाहि सुख व स्वास्थ्य यांची आवड आहे. चैनीचीहि त्यांना थोडीबहुत अपेक्षा आहे; पण तें सुख आणि चैन हीं मिळावीं कशीं ?

आपण अर्थात् प्रथम आपली आर्थिक दुःस्थिति सुधारली पाहिजे, आणि रिकामपणच्या वेळाचा योग्य उपयोग करण्यास शिकलें पाहिजे. आणि तसें झालें म्हणजे मग सुखस्वास्थ्य आणि आल्हादकर गोष्टी यांचा आपल्या जीवनांत आपल्याला लाभ होईल, आपलीं ध्येयें उच्चतर होतील व आपल्या कर्तृत्वाचीहि दिशा आणि सिद्धि यांत इष्ट प्रगति होईल. इतकें प्रस्तुत प्रश्नावर विवेचन करून आतां मी माझ्या अधिकाऱ्यांच्या विनंतीप्रमाणें प्रदर्शनाचें उद्घाटन करतों.

## ३१

**स्थलः**—बडोदें.

**कालः**—ता. ११ फेब्रुवारी १९३३.

**प्रसंगः**—अटलाद्रा-पाद्रा रस्त्याचें उद्घाटन.

मि. मॉर्सिअर आणि सभ्य गृहस्थहो,

मला नेमून दिलेलें कार्य सुखानें आणि आरामांत पुरें करून झाल्यावर आतां दोन शब्द बोलतों. मि. मॉर्सिअर यांनीं मोठ्या आपुलकीनें जे अभिनंदनपर आणि कुतूहलपूर्ण उद्गार काढले ते वगळावे अशी माझी इच्छा नाहीं. फक्त आपल्या सर्वांच्या

मनांत प्रामुख्यानें वावरत असणारा विषय म्हणजे रेल्वे— त्याबद्दल मी थोडेंसें बोलणार आहें. माझ्या संस्थानाच्या निरनिराळ्या भागांतून मीं रेल्वे बांधविण्यास सुरुवात केली त्याला थोडीं थोडकीं वर्षें झालीं नाहींत, आणि तें काम मीं सुरू करविलें हा केवळ यदृच्छेचा योगायोग नव्हता. त्याबद्दल पुरेपूर विचार करून आणि काळजीपूर्वक हिशेब करून तें धोरण मुद्दाम स्वीकारलें होतें. आतां सरकारी कामाचा तो भाग पुरा होत आला आहे. लोकांच्या आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीला म्हटलें तर मर्यादाच घालतां येणें शक्य नाहीं. तेव्हां तेवढ्यानें इष्टपूर्ति झाली आहे असें म्हणायचा माझा उद्देश नाहीं. रेल्वेबरोबरच गाडीरस्त्यांचाहि विचार झाला पाहिजे. त्यांच्या वाढीचा रेल्वेवरील वाहतुकीला अर्थातच फायदा होतो आणि त्याच उद्देशानें हें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. मि. मॉर्सिअर यांचा उत्साह आणि हातांत घेतलेलें काम पुरें करण्याची चिकाटी या दोहोंना प्रस्तुत यशाचें श्रेय दिलें पाहिजे. ते तरुण आहेत आणि आपल्या कामांत अनुभविक आहेत. आणि म्हणूनच त्यांच्या अव्याहत परिश्रमांचा असल्या कामीं लाभ घ्यावा म्हणून मीं त्यांना ठेवून घेतलें आहे. मीं सुरू केलेलें धोरण पुरें होईपर्यंत ते आपल्याला लाभतील अशी मी आशा बाळगतों.

हे रस्ते म्हणजे राज्यांतील ठिकठिकाणच्या रेल्वेंना जीवनरस पुरविणाऱ्या धमन्यांसारखे उपयोगी पडतील. लोकांनीं त्यांचा भरपूर फायदा घेऊन आपलें सुख, आराम आणि संरक्षण यांत वाढ करून घ्यावी अशी माझी इच्छा आहे. कालांतरानें या सर्व योजना पुऱ्या व्हाव्या आणि लोकांना पुष्कळ तऱ्हांनीं त्यांचा शक्य तेवढा उपयोग व्हावा, यांत मला अत्यंत आनंद होणार आहे.

या आणि दुसऱ्या अनेक प्रगतिपर योजनांचें पुढें काय होणार आहे असा प्रश्न बरेच वेळां माझ्या मित्रांकडून विचारण्यांत आला आहे. सभ्य गृहस्थहो, कारभाराच्या असल्या बाबींचें संरक्षण करण्याचें काम हें कायदा किंवा कागदी घटना यांच्या बळानें होत नसतें. लोकांच्या भावना, उत्साह आणि आस्था यांनींच तें होतें. लोकांचा शहाणपणा आणि निष्ठा यांवरच शेवटीं आम्हीं हातीं घेतलेल्या आणि एवढा मोठा खर्च करून चालविलेल्या प्रगतिपर योजनांचें संरक्षण आणि संगोपन-संवर्धन अवलंबून आहे. तेव्हां भावी राज्यकर्ते आणि अधिकारी वर्ग यापुढें हें काम इतक्या अक्कलहुशारीनें करतील आणि निरनिराळ्या योजना सुस्थितींत राहण्याच्या दृष्टीनें योग्य वेळीं साहाय्य देतील कीं, लोकांचे त्यांना नेहमीं धन्यवादच मिळत राहतील अशी मला आशा आहे. आणि अशा प्रगतीला मुख्यत्वेंकरून लोकांचेच आशीर्वाद मिळतील, एवढेंच नव्हे तर जे अधिकारी प्रगतिपर योजना सुस्थितींत राखण्याकरितां झटतील त्यांच्याहि सदिच्छेचा त्यांच्या चिरस्थायीपणावर अनुकूल परिणाम होईल याची मला खात्री आहे.

शेवटीं मि. डी. मॉर्सिअर यांनीं मजबद्दल माझी लायकी नसतांना ज धन्योद्गार काढले त्यांबद्दल मी त्यांचे आभार मानतों. माझ्या प्रजाजनांनीं चालविलेल्या प्रगतिपर योजनांचा लाभ घेऊन आपल्या जीवनांत सुख निर्माण करावें आणि आपल्या पुत्र-पौत्रांच्या भावी जीवनाचें आशामय चित्र रेखाटून त्याचाहि आनंद मनसोक्त लुटावा, एवढेंच मला समारोपादाखल म्हणावयाचें आहे.

## ३२

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. ३ मार्च १९३३.

**प्रसंग:**—श्री. चिमणाबाई स्त्री-समाजानें करविलेला संगीत जलसा.

सभ्य स्त्रीपुरुषहो !

आज येथें बोलण्याचा माझा विचार नव्हता; पण या मोठ्या समारंभांत इतक्या समाजापुढें या बालिकांनीं जीं सुंदर कामें करून दाखविलीं त्यामुळें मला फार बरें वाटलें. या मुलींनीं जे उत्तम रीतीनें प्रयोग करून दाखविले त्यांवरून त्यांच्या ठिकाणीं किती बुद्धि आणि समजूत आली आहे, याची आपणांस कल्पना येते. आपल्या स्त्रियांना स्वातंत्र्य आणि सुसंधि मिळाल्यास त्या कशीं चांगलीं कामें करतात, हें यावरून दिसून येतें.

आपल्या देशांत गेल्या कित्येक वर्षांत निरनिराळ्या क्षेत्रांत जी प्रगति आणि सुधारणा घडून आली आहे ती पाहून मला फार समाधान वाटतें. आज मुलींनीं दाखविलेला सर्व कार्यक्रम पाहून माझ्या मनावर चांगला परिणाम झाला आहे. मला खात्री वाटूं लागली आहे कीं, आपला भविष्यकाळ उज्ज्वल आहे. आपला संसार समृद्ध आणि सुखाचा होईल अशीं चिन्हें मला दिसतात.

मी राज्यांत आणि परप्रांतांत जेव्हां प्रवास करतों, निरनिराळ्या संस्था पाहतों व ठिकठिकाणीं स्त्रियांमध्यें दिसून येणारी निर्भय वृत्ति आणि जागृति अवलोकन करतों तेव्हां मला फार फार आनंद होतो. ही क्रांति म्हणजे खरोखर शुभचिन्ह आहे.

पण एका गोष्टीचा मला नेहमीं खेद होतो. गुजराथ व महाराष्ट्र हे प्रांत शेजारीं शेजारीं असून त्यांची राहणी, संस्कृति, जीवन वगैरेहि अगदीं सारखीं आहेत. तरीहि त्यांच्यांत परस्पर एकी नसून दोघे अलग राहतात, ही गोष्ट अगदीं अनिष्ट आहे. याप्रमाणें जर शेजारीं असणारे प्रांत वेगवेगळे राहूं लागले तर हिंदुस्थान हें एकराष्ट्र करण्यास फार कठीण जाईल. असल्या दुर्भेद्य भिंती आपणांमध्यें ठेवतां कामा नये; तर उलट परस्परांत मिसळत जाऊन परस्परांचा स्वभाव ओळखला पाहिजे व वस्तुस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. परस्परांना नीट ओळखून पटवून घेतलें पाहिजे. दुसऱ्याचें जें कांहीं चांगलें असेल तें उचललें पाहिजे.

थोड्या दिवसांमागें श्री. जुम्मादादा व्यायामशाळेंत वक्तृत्वोत्तेजक समारंभ झाला. त्यांत दक्षिणी बायका होत्या; गुजराथी नांवालाहि नव्हत्या. तसेंच या समारंभांत गुजराथी मुलींचाच मोठा भरणा दिसतो. एकच काय ती दक्षिणी दिसते, असें असूं नये. एकमेकांच्या समारंभांत उत्साहानें भाग घेतला पाहिजे व सहकार्य प्रत्येक चांगल्या गोष्टींत दिलें पाहिजे.

या बाबतींत पारशी लोकांचे गुण घेतले पाहिजेत. या समाजाची स्वतःची संस्कृति, शिक्षण, स्वभाव वगैरे आहेत; पण देशाच्या औद्योगिक उन्नतींत व इतर चळवळींत हा समाज प्रामुख्यानें भाग घेतो. या समारंभांतहि पारशी भगिनींनीं चांगला भाग घेतला आहे हें पाहून मला आनंद वाटला. पारशी लोकांचा हा गुण निःसंशय प्रशंसनीय व अनुकरणीय आहे. आमच्या दक्षिणी महिला पण आपल्या गुजराथी भगिनींच्या समारंभांत मोठ्या प्रमाणांत भाग घेऊं लागतील अशी आशा मी करतों.

असा सुंदर कार्यक्रम पाहण्याची संधि मला प्राप्त करून दिल्याबद्दल, मी सौ. समजुबा देसाई व इतर कार्यकर्ते यांचे मनःपूर्वक आभार मानतों. तसेंच या मुलींनीं धंदेवाईक नटांप्रमाणें कामें करून जे सुंदर प्रयोग करून दाखविले त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करतों. मुलींनीं पुरुषांचीं कामेंहि हुबेहुब वठविण्यांत जी कुशलता आणि हुशारी दाखविली, त्याकरितां त्यांना खास शाबासकी देत आहें.

आपलें जीवन आनंदी आणि संसार सुखाचा होण्यासाठीं आपणांस बराच खर्च करावा लागतो, व हा खर्च भागविण्यासाठीं आपण आपली आर्थिक स्थिति सुधारणें अत्यवश्य आहे, या गोष्टीकडे आपलें लक्ष वेधूं इच्छितों. अशी आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं आपल्या उत्पन्नाचीं साधनें म्हणजे आपले उद्योगधंदे वाढविले पाहिजेत, व या कामीं स्त्रियांनीं पुरुषांशीं चांगलें सहकार्य केलें पाहिजे. तेव्हां स्त्री आणि पुरुष यांच्या उन्नतीचे मार्ग भिन्नभिन्न आहेत असें न मानतां, एकजुटीनें राहून दोघांनीं

आपली प्रगति करून घेतली पाहिजे. असें झालें तरच आपलें आणि देशाचें कल्याण होणार आहे.

जें कांहीं चांगलें असेल तें स्वीकारलें पाहिजे व आपल्यांत जे दोष असतील ते घालविले पाहिजेत. यासाठीं कायदेकानू आणि नियम यांची जरूरी लक्षांत घेतली पाहिजे. त्यामुळेंच आपली उन्नति होईल.

या समाजाला मदत करण्याविषयीं लेडी धनवंत यांनीं विनंति केलेली आहे. आपल्या स्त्रिया स्वतंत्र आणि स्वावलंबी बनलेल्या पाहून मला आनंदच होणार आहे. तेव्हां या संस्थेच्या गरजा भागविण्यास मला जें करतां येईल तें करीनच. मला अशी आशा आहे कीं, थोड्याच दिवसांत या समाजाच्या मालकीचें एक चांगलें मंदिर पण होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

## ३३

**स्थलः—बडोदें.**

**कालः—ता. ७ मार्च १९३३.**

**प्रसंगः—आर्यकन्या महाविद्यालयाचा समारंभ.**

पंडितजी,

विद्यालयाचें कार्य पाहून मला फार संतोष वाटला. या संस्थेची सर्वांगीण उन्नति होईल असा मला भरंवसा वाटतो. संस्थेंत कार्य करणाऱ्यांचें पण मी अभिनंदन करतों. या वेळीं मोठें लांबलचक भाषण करावेंसें वाटत नाहीं, पण मुलींनीं जे येथें चांगले मनोरंजक प्रयोग करून दाखविले त्यांबद्दल मी त्यांना शाबासकी देतों व त्यांना सर्वत्र यश मिळावें, असें पण इच्छितों. संस्थेच्या ज्या गरजा आहेत त्यांचा मी सहानुभूतिपूर्वक विचार करीन.

## ३४

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. ११ मार्च १९३३.

**प्रसंग:**—महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळेच्या विद्यार्थिनींचें पहिलें संमेलन.

श्री. मटुभाई कांटावाला व सभ्य स्त्री-पुरुषहो,

या संस्थेच्या संस्थापिकाच केवळ नव्हेत तर जीवनदात्या आणि स्फूर्तिदात्याहि श्री. सौ. महाराणीसाहेबच आहेत, हें ऐकून मनाला विश्वास उत्पन्न होतो. अशा प्रकारचें जीवन आणि स्फूर्ति यांच्या अभावीं ही संस्था उजेडाशिवाय दिवा असावा तशी झाली असती. तुमचें कार्य मीं मोठ्या आस्थेनें आणि आनंदानें पाहिलें आहे आणि त्यापासून पुष्कळच शिकण्यासारखें आहे, असा माझा ग्रह झाला आहे. प्रत्यहीं घडणाऱ्या अशा अनेक गोष्टी आहेत कीं, ज्यांचें मला प्रत्यक्ष ज्ञान नसल्यामुळें त्यांबद्दल मला पूर्ण माहितीनें व अचूक असें बोलतां येणार नाहीं. आपल्या या संस्थेबद्दलच म्हणाल तर मला तीबद्दल फारच अंधुक आणि अस्पष्ट कल्पना आहे. इतर संस्थांप्रमाणेंच हीहि संस्था केवळ सरकारी मदतीवर अवलंबून नसून तिला उदार वर्गणीदार आणि धनिक दात्यांचेंहि साहाय्य आहे. या सर्व बाबींची मला संपूर्ण माहिती नाहीं आणि त्यामुळें कांहीं अतिव्याप्त किंवा अव्याप्त विधानें मजकडून केलीं जाण्याचा संभव आहे.

स्त्रियांसाठीं असोत किंवा पुरुषांसाठीं असोत हल्लींच्या ज्या शिक्षणपद्धति आहेत त्या पूर्ण किंवा उत्तम आहेत असें नाहीं. तेव्हां आपलें उद्दिष्ट सिद्ध करण्याच्या दृष्टीनें इतर देशांशीं तुलना करून पाहून उच्चतम ध्येयाच्या सिद्ध्यर्थ अवश्य अशीं साधनें नव्यानें शोधून काढलीं पाहिजेत. ब्रिटिश इंडिया आणि संस्थानें या दोहोंमधील शिक्षणपद्धति परदेशांतील शिक्षणपद्धतीच्या मानानें किती तरी दोषपूर्ण आहेत, यांत शंका नाहीं. परंतु हे दोष दूर करण्यासाठीं प्रथम हिंदी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून तदनुषंगानें शिक्षणपद्धतीची पुनर्रचना केली पाहिजे. केवळ नोकरीमध्यें दाखल होण्याकरितांच माणसें तयार करणें हें ध्येय ठेवून उपयोगाचें नाहीं. अशा व्यापक दृष्टीनें विचार केला असतां हल्लींच्यापेक्षां लोकांच्या प्रगतीला अधिक उपयोगी अशा नव्या पायावर सोईच्या संस्था स्थापन करणें अशक्य नाहीं. संस्थेला

उपलब्ध असलेल्या द्रव्यबळाच्या मानानें या मार्गानें येथें कमीअधिक प्रगति करण्याचे प्रयत्न झालेले असून त्यांना कांहीं प्रमाणांत यश आलेलें दिसतच आहे. इंग्लिश ही एक केवळ दुय्यम अभ्यासाची भाषा ठेवून सर्व शिक्षण मातृभाषेतून देणारें कॉलेज काढावें, असें माझ्या मनांत होतें. या प्रश्नाबद्दल चर्चा पुष्कळ झाली, परंतु त्या कल्पनेला पुरेसें उत्तेजन मिळालें नाहीं आणि ती सोडून द्यावी लागली. ती कल्पना खरोखर चांगली होती. पण हिंदुस्थानांतल्या बहुतेकांना सरकारी नोकरी हेंच मायपोट वाटतें आणि म्हणून सरकारी नोकरीला अवश्य असणारें तेवढेंच शिक्षण घेण्याच्या इराद्यानें आपले लोक शाळेंत जातात. आणि एवढ्यावरच संतुष्ट होणारे आपले लोक असल्यामुळें त्यांना अधिक उच्च दर्जाचें शिक्षण अगर अभ्यासक्रम यांचें महत्त्व वाटत नाहीं आणि शिक्षणाचें खरें ध्येय साध्य होत नाहीं. लोक खरोखरच बुद्धिमान्, तेजस्वी आणि त्याग-वृत्तीचे असले तरच नोकरीच्या क्षुद्र ध्येयापासून परावृत्त होतील आणि आपल्याला सरकारी अभ्यासक्रमाच्या चाकोरींतून बाहेर पडतां येईल. परंतु ज्या देशांत, लोक रोज मिळवतील तर खातील अशा दारिद्र्यांत राहतात, अत्यंत अज्ञानांत रुतलेले आहेत आणि जगाच्या इतर भागांतून काय चाललें आहे याबद्दल कांहींच कल्पना नसल्यामुळें कोणत्याहि प्रकारच्या ध्येयाला पारखे झाले आहेत, अशा आपल्या देशांत ही गोष्ट अत्यंत दुरापास्त आहे.

आज अशी परिस्थिति आहे कीं, नित्याचा एक चाकोरीचा अभ्यासक्रम सोडण्याचें धैर्य दाखविलें, तर प्रगति मापण्याला स्वतंत्र असा दुसरा मानदंडच देशांत अस्तित्वांत नाहीं; पण इष्ट अशा गुणांनीं युक्त असे शिकणारे मिळतील तर त्यांच्यासाठीं आपल्या गरजा, हवामान आणि ध्येयें यांना जुळणाऱ्या अशा संस्था काढावयाला पुरेसे लोक खास उभे राहतील! हल्लीं अभूतपूर्व अशी उधळपट्टी चालली आहे. देशभक्तांचें खरें ध्येय साध्य होण्यापूर्वी आपण आतां यापुढें ती किती दिवस चालूं देणार आहों? ज्यांना कांहींच करावयाचें नाहीं तें त्यांच्या सवयीप्रमाणें अव्यवहार्य आणि अंधुक कल्पनांचें अवडंबर माजवितात. परंतु आपण योग्य मार्गानें विचार केला तर आपल्याला योग्य तत्त्वदृष्टीचा अवलंब सहज करतां येईल. तेथें तत्त्वज्ञान किंवा तत्त्वदृष्टि याचा अर्थ केवळ ध्येयात्मक चिंतन असा करावयाचा नसून व्यवहारोपयोगी विचारविमर्षांचा निष्कर्ष असाच केला पाहिजे. विचाराचें कृतींत अवतरण होणें इष्ट आहे. तेव्हां आपण काय करूं शकाल याचा स्वतः विचार करून पहा. आणि आपण आपल्या बांधवांशीं सहकार्य करूं शकलां तर आपल्या काळाला योग्य आणि आपल्या उद्दिष्टाची सिद्धि अधिक चांगल्या आणि व्यावहारिक रीतीनें करणारी नवी संस्था अधिक उपयुक्त पायावर आपण खास उभारूं शकाल. यापेक्षां मला अधिक सांगण्याची आवश्यकता दिसत नाहीं. इतर सर्व गोष्टी देखील लोकांनींच केल्या पाहिजेत.

सरकारतर्फे विचार केला तर सरकारला आपलें द्रव्य कोणत्याहि एका विवक्षित उद्देशाला वाहून चालत नाहीं. सामान्य माणसाला आपलें उत्पन्न संसारांतील अनेक बाबींवर वांटून द्यावें लागतें, तसाच सरकारलाहि निरनिराळ्या खात्यांचा परामर्श घ्यावा लागतो. व्यापाराची वाढ, उद्योगधंदे, लोकोपयोगी आरोग्यादि खातीं आणि निरनिराळ्या संस्थांना उत्तेजन, अशा अनेक बाबी सरकारच्या मदतीची अपेक्षा करून असतात. सरकारच्या द्रव्य-सामर्थ्याला केव्हांहि मर्यादा असते आणि म्हणून आपण सर्वांनीं सरकारला मदत दिली तरच उपकारक संस्थांची वाढ होऊं शकेल. आपल्या या संस्थेला उत्तेजन मिळण्याबद्दलच्या ज्या कल्पना आहेत त्यांवर विरजण घालण्याच्या दृष्टीनें मी हें बोलत नाहीं. गुजराथेंतील व्यवहारबुद्धि आणि व्यापारी दौलत यांचें या संस्थेला पाठबळ मिळून या संस्थेचे उद्देश सिद्धीस जातील अशी मला पुरी खात्री वाटते.

शेवटीं या संस्थेच्या संस्थापनेमध्यें ज्यांनीं आजपर्यंत लक्ष घातलें आहे त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानणें हें माझें कर्तव्यच आहे. यापेक्षां तपशीलवार मला माहिती नसल्यामुळें जबाबदार व्यक्ति या दृष्टीनें अधिक खुलाशानें या वेळीं मला बोलतां येत नाहीं. संस्थेचा इतिहास, तिची प्रगति आणि इतर अवांतर माहिती असली तरच कित्येक प्रश्नांचा परामर्श घेऊन ते सोडविणें शक्य होतें. श्री.सौ. महाराणी-साहेब अगदीं लहान वयापासून या संस्थेंत लक्ष घालतात आणि संस्थेच्या प्रगतीला त्यांनीं आपणास वाहून घेतलें आहे याचा मला आनंद होत आहे. आपण भिन्नलिंगी असलों तरी देखील आपल्याला प्रगतीचा आणि कल्याणाचा विचार करण्यासाठीं सहकार्य करणें अवश्य आहे, हें ध्यानांत बाळगा. आणि आपल्या परिश्रमाची पराकाष्ठा करून आपलीं मुलेंबाळें आणि भावी पिढ्या यांची सेवा करण्याला आपण समर्थ व्हावें म्हणून आपणा सर्वांच्या असमर्थतेचें वैगुण्य परमेश्वराला समबुद्धीनेंच भरून काढावें लागेल, असा विश्वास धरा.

आपण सर्वांनीं माझें अंतःकरणपूर्वक स्वागत केलें त्याबद्दल आणि आपल्या सर्व कार्यक्रमांत जी मला सर्वत्र प्रगति दिसून आली तीबद्दल मी आपले आभार मानतों.

## ३५

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. २४ डिसेंबर १९३३.

**प्रसंग:**—मॉडेल फार्ममधील सोयाबीन लावण्याचा समारंभ.

सभ्यगृहस्थहो !

या प्रयोगांत आपल्याला असें दिसून येईल कीं, शेतकी खात्याचे अंमलदार रा. साने हे या धान्याची निर्मिति करणारे असून येथचे पदवीधर पण विलायतेहून पाकशास्त्र शिकून आलेले रा. काळे हे सोयाबीनचा उपयोग कसा करावा हें जाणणारे आहेत. कोणत्या खाण्यामुळें किती प्रकृति बरी राहते [illegible] का[illegible] जाणतात व ते जरी फार बोलके नसले तरी आपल्या वि[illegible]य [illegible] ते [illegible] आहेत. माझ्या राजवाड्यांत आहारासंबंधीं ज्या सुधारणा दिसती[illegible] सर्वांत त्यां[illegible] हात आहे. तरी अद्याप आहारांत सुधारणा करण्यासंबंधींचे [illegible] माझ्य मनांत सार[illegible] घोळत आहेत व थोड्याच दिवसांत खाद्य वस्तूंचें प्र[illegible] भरलेलें आपण पहाल व त्यापासून आपणांस बोध घेतां येईल. निसर्गदत्त वस्तूंपासून जास्तींत जास्त चांगला उपयोग कसा करून घेतां येईल तें आपणाला अशा प्रदर्शनापासून समजून येईल. मला अशी आशा आहे कीं, आपण सर्वजण तें पाहाल व रा. काळे हे पुष्कळ नवीन स्वादिष्ट खाद्यपदार्थ तुम्हांला देतील. या सुधारणेचें सर्व श्रेय रा. काळे यांना मिळणें योग्य होईल.

## ३६

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. २९ डिसेंबर १९३३.

**प्रसंग:**—न्यायमंदिरांत खाद्यपदार्थांचें भरलेलें प्रदर्शन.

प्राच्य विद्यापरिषदेकरितां आलेल्या अनेक विद्वानांबरोबर विचारविनिमय करावा लागल्यामुळें, या प्रदर्शनासंबंधीं विचार करण्यास मला वेळ झाला नाहीं; पण या कार्यांतील जनहिताची जबाबदारी ओळखून मी येथें उपस्थित झालों आहें व दोन

सरकारतर्फे विचार केला तर सरकारला आपलें द्रव्य कोणत्याहि एका विवक्षित उद्देशाला वाहून चालत नाहीं. सामान्य माणसाला आपलें उत्पन्न संसारांतील अनेक बाबींवर वांटून द्यावें लागतें, तसाच सरकारलाहि निरनिराळ्या खात्यांचा परामर्श घ्यावा लागतो. व्यापाराची वाढ, उद्योगधंदे, लोकोपयोगी आरोग्यादि खातीं आणि निरनिराळ्या संस्थांना उत्तेजन, अशा अनेक बाबी सरकारच्या मदतीची अपेक्षा करून असतात. सरकारच्या द्रव्य-सामर्थ्याला केव्हांहि मर्यादा असते आणि म्हणून आपण सर्वांनीं सरकारला मदत दिली तरच उपकारक संस्थांची वाढ होऊं शकेल. आपल्या या संस्थेला उत्तेजन मिळण्याबद्दलच्या ज्या कल्पना आहेत त्यांवर विरजण घालण्याच्या दृष्टीनें मी हें बोलत नाहीं. गुजराथेंतील व्यवहारबुद्धि आणि व्यापारी दौलत यांचें या संस्थेला पाठबळ मिळून या संस्थेचे उद्देश सिद्धीस जातील अशी मला पुरी खात्री वाटते.

शेवटीं या संस्थेच्या संस्थापनेमध्यें ज्यांनीं आजपर्यंत लक्ष घातलें आहे त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानणें हें माझें कर्तव्यच आहे. यापेक्षां तपशीलवार मला माहिती नसल्यामुळें जबाबदार व्यक्ति या दृष्टीनें अधिक खुलाशानें या वेळीं मला बोलतां येत नाहीं. संस्थेचा इतिहास, तिची प्रगति आणि इतर अवांतर माहिती असली तरच कित्येक प्रश्नांचा परामर्श घेऊन ते सोडविणें शक्य होतें. श्री.सौ. महाराणी-साहेब अगदीं लहान वयापासून या संस्थेंत लक्ष घालतात आणि संस्थेच्या प्रगतीला त्यांनीं आपणास वाहून घेतलें आहे याचा मला आनंद होत आहे. आपण भिन्नलिंगी असलों तरी देखील आपल्याला प्रगतीचा आणि कल्याणाचा विचार करण्यासाठीं सहकार्य करणें अवश्य आहे, हें ध्यानांत बाळगा. आणि आपल्या परिश्रमाची पराकाष्ठा करून आपलीं मुलेंबाळें आणि भावी पिढ्या यांची सेवा करण्याला आपण समर्थ व्हावें म्हणून आपणा सर्वांच्या असमर्थतेचें वैगुण्य परमेश्वराला समबुद्धीनेंच भरून काढावें लागेल, असा विश्वास धरा.

आपण सर्वांनीं माझें अंतःकरणपूर्वक स्वागत केलें त्याबद्दल आणि आपल्या सर्व कार्यक्रमांत जी मला सर्वत्र प्रगति दिसून आली तीबद्दल मी आपले आभार मानतों.

## ३५

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. २४ डिसेंबर १९३३.

**प्रसंग:**—मॉडेल फार्ममधील सोयाबीन लावण्याचा समारंभ.

सभ्यगृहस्थहो !

या प्रयोगांत आपल्याला असें दिसून येईल कीं, शेतकी खात्याचे अंमलदार रा. साने हे या धान्याची निर्मिति करणारे असून येथचे पदवीधर पण विलायतेहून पाकशास्त्र शिकून आलेले रा. काळे हे सोयाबीनचा उपयोग कसा करावा हें जाणणारे आहेत. कोणत्या खाण्यामुळें किती प्रकृति बरी राहते हें रा. काळे जाणतात व ते जरी फार बोलके नसले तरी आपल्या विषयांत ते तज्ज्ञ आहेत. माझ्या राजवाड्यांत आहारासंबंधीं ज्या सुधारणा दिसतील त्या सर्वांत त्यांचा हात आहे. तरी अद्याप आहारांत सुधारणा करण्यासंबंधींचे विचार माझ्या मनांत सारखे घोळत आहेत व थोड्याच दिवसांत खाद्य वस्तूंचें प्रदर्शन भरलेलें आपण पहाल व त्यापासून आपणांस बोध घेतां येईल. निसर्गदत्त वस्तूंपासून जास्तींत जास्त चांगला उपयोग कसा करून घेतां येईल तें आपणाला अशा प्रदर्शनापासून समजून येईल. मला अशी आशा आहे कीं, आपण सर्वजण तें पाहाल व रा. काळे हे पुष्कळ नवीन स्वादिष्ट खाद्यपदार्थ तुम्हांला देतील. या सुधारणेचें सर्व श्रेय रा. काळे यांना मिळणें योग्य होईल.

## ३६

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. २९ डिसेंबर १९३३.

**प्रसंग:**—न्यायमंदिरांत खाद्यपदार्थांचें भरलेलें प्रदर्शन.

प्राच्य विद्यापरिषदेकरितां आलेल्या अनेक विद्वानांबरोबर विचारविनिमय करावा लागल्यामुळें, या प्रदर्शनासंबंधीं विचार करण्यास मला वेळ झाला नाहीं; पण या कार्यांतील जनहिताची जबाबदारी ओळखून मी येथें उपस्थित झालों आहें व दोन

शब्द बोलणार आहे. आहारशास्त्राची चांगली आवड रा. काळे यांना असून त्यांत त्यांची गतिहि आहे. ते मुंबई विद्यापीठाचे पदवीधर आहेत. माझ्याजवळ नोकरींत असतांना त्यांची लायकी, उत्साह आणि चिकाटी माझ्या नजरेस येऊन मीं त्यांना आहार शास्त्रांतील उच्च ज्ञान मिळविण्यासाठीं युरोप-अमेरिकेस पाठविलें. तिकडून यश मिळवून आल्यानंतर त्यांनीं आपल्या ज्ञानाचा फार चांगला उपयोग केला आहे. नुसत्या पदवीसाठीं ते पदवीधर झाले नाहींत तर संशोधन आणि विचार करून त्यांनीं आपल्या आहाराच्या विषयांत उत्तम सुधारणा करून दाखविली आहे. अशा रीतीनें अभ्यास आणि काम करणारे पदवीधर आपल्या देशांत थोडेच आहेत. मागें चाललें तसें पुढें चालविणारे पण मुळाला हात न घालणारे जे असतात त्यांची कांहीं किंमत नाहीं. आपल्या पदवीधरांनीं चाकोरींतून बाहेर पडून, जास्त व्यापक धोरण ठेवून आणि खोल शोधविचार करून कामें केलीं पाहिजेत. असें केलें तरच सुपरिणाम होईल. मला वाटतें कीं, मी प्रस्तुत विषय सोडून बोलत आहें. मला जें आपणांस पटवून द्यावयाचें आहे तें हें कीं, दुसऱ्या महत्त्वाच्या विषयांप्रमाणेंच हा आहारविषय महत्त्वाचा मानून त्याचा मोठ्या परिश्रमपूर्वक अभ्यास आपण करावा व त्याबाबत आवश्यक त्या सुधारणा घडवून आणाव्या. हा हेतु मनांत धरूनच मीं ज्या तिघांना विलायतेस पाठविलें त्यांपैकीं रा. काळे हे एक आहेत.

त्यांनीं माझे विचार आणि हेतु नीट ओळखून अभ्यास केला. आपल्या विषयांत चांगलें संशोधन केलें व नव्या प्रयोगांत यश मिळविलें. या विषयांत त्यांनीं ग्रंथरचना पण केली. अशीं कामें झाल्यास किती तरी सुधारणा होत जाईल. मला आठवण आहे कीं, मी लहान असतांना माझी आई माझ्या खाण्यापिण्याची फार काळजी घेत असे. मी गादीवर बसल्यापासून राजे सर टी. माधवराव माझा राज्य-कारभार पाहत, तसेंच माझ्या शिक्षणाकडे आणि सुखाकडे लक्ष देत; पण कोठी आणि स्वयंपाकघर यांकडे बघण्यास दुसऱ्या मोठ्या माधवरावांची जरूरी होती. या खात्याकडे बघण्यास जो अंमलदार ठेविला होता तो माझ्यापेक्षां वयानें फार मोठा होता. इतर बाबतींत जसें मी मन घालीत असे तसेंच या आहाराच्या बाबतींतहि घाली. प्रत्येक गोष्ट स्वतः पाहत गेल्यामुळें या खाण्यापिण्यांतील गुणदोष आणि तत्त्वें मला समजूं लागलीं. तेव्हां मी ज्या सूचना देई त्यांपासून परिणामहि समाधानकारक होत असे; हें पाहून तो अंमलदार म्हणे, " यांत काय ? असें केल्यामुळें असें होणारच ! " पण या प्रयोगांत कांहीं नुकसान किंवा चूक झाली तर तो उत्तर देई कीं, " याला मीं काय करावें ? महाराजांचा जसा हुकूम तसें आम्हीं केलें ! " याप्रमाणें चांगल्याचें यश तो घेई व वाइटाचें खापर माझ्या डोक्यावर फोडी. तरीसुद्धां मी कधीं निराश झालों नाहीं. माझे प्रयत्न चालूच होते व त्यांचा परिणाम थोड्याच वर्षांत मनाजोगा दिसल्यावर मी माझ्या स्वयंपाकांत सुधारणा घडवून आणली. ही

सारी कथा सविस्तर सांगून आपणास कंटाळा आणण्याची माझी इच्छा नाहीं. पण एवढेंच सांगतों कीं, यापासून माझ्या सुखसोयी वाढल्या, मला आरोग्य लाभलें व प्रत्येक गोष्टींत येणारा मोठा खर्च कमी झाला. खाण्यापिण्यांतील दर एक वस्तूचें प्रमाण प्रथम मीं ठरविलें व त्यावर पुस्तकें तयार केलीं. तेव्हांपासून माझ्या कोठीची आणि स्वयंपाकघराची, तसेंच अन्न शिजविण्या-वाढण्याची व्यवस्था चांगली झाली आहे. विचारपूर्वक काम केल्यानें एक धोरण राखून विविधताहि पण आणतां येते असा माझा अनुभव आहे. राष्ट्रीय हितबुद्धीनें उपयुक्तता आणि विविधता यांचा विचार करून एक चांगलें धोरण आपण आंखलें पाहिजे.

कांहीं वर्षांपूर्वी लोकांना गृहविज्ञानाचें आणि पाकशास्त्राचें शिक्षण देण्यासाठीं अमेरिकेहून मिसेस स्ट्रॅंग नांवाची एक तज्ज्ञ विदुषी बोलावून एक वर्गहि काढला होता. पण त्याचा फायदा कोणीहि न घेतल्यानें हा वर्ग बंद करावा लागला, ही मोठी खेदाची गोष्ट आहे.

या ठिकाणीं अनेक विदुषी जमल्या आहेत. त्यांना उद्देशून मी सांगतों कीं, गृहव्यवस्था आणि पाकशास्त्र हे आपलेच खास विषय आहेत. अमेरिकेंत गृहिणी स्वयंपाक करतात, धुणेंपाणी करतात, घरचा जमाखर्च ठेवतात, टाईप करून देण्याचीं कामें करतात व इतर कित्येक प्रकारांनीं नवऱ्यांना मदत करतात. अशीं घरकामें तुम्ही करूं लागलात म्हणजे तुमचें कुटुंब आणि तुमचा समाज सुखी होईल. मुंबईत कित्येक स्त्रिया पाकशास्त्रांत हुशार आहेत व त्या संसारांत चांगली भर घालीत आहेत. तुम्हीहि त्यांच्याप्रमाणें वागून आपल्या कुटुंबाचें सुख आणि स्वास्थ्य वाढवाल या आशेनें मी हें विस्तारानें सांगत आहें.

या प्रदर्शनाचा हेतु पण असाच आहे कीं, त्यांतील वेगवेगळे नमुने पाहून आपल्या पाकशास्त्रांत काय सुधारणा करतां येतील हें तुम्हांला समजावें. बाहेर दुनिया किती पुढें गेली आहे हें तुम्हीं प्रत्यक्ष पाहून आचरणांत आणलेंत तर तुमचेंहि जीवन सुखाचें होईल. यापेक्षां या वेळीं जास्त न बोलतां आरोग्य आणि आर्थिक दृष्टया हा विषय किती महत्त्वाचा आहे याकडे आपलें लक्ष वेधून हें प्रदर्शन खुलें झाल्याचें जाहीर करतों.

## ३७

**स्थलः**—बडोदें.

**कालः**—ता. ३ मार्च १९३४.

**प्रसंगः**—मोतीबागेंतलें बालसंमेलन.

सभ्यगृहस्थ व मुलांनो,

महाराजांनीं दरवेळेस भाषण केलेंच पाहिजे असें नाहीं. तर ज्या वेळीं जरूर असेल त्याच वेळीं त्यांना बोलावणें श्रेयस्कर होईल. प्रथम मला असें सांगितलें पाहिजे कीं, कोणताहि कार्यक्रम ठेवतांना त्याच्या औचित्याकडे पाहणें जरूर आहे. असले संवाद मुलांकडून करवून घेण्यांत त्यांची परीक्षा घेण्याचा हेतु नसतो तर मुलें ही भावी प्रजा असून तीकडे राजाचें सारखें लक्ष असतें. कारण राजा हा राज्यपिताच आहे. मुलांमध्यें स्वाभिमान आणि राजनिष्ठा या भावना जागृत झाल्यास तीं पुढें चांगलीं नागरिक बनतील अशा हेतूनें कार्यक्रमाची आंखणी केलेली असते. मला वाटतें कीं, मुलांना या कामांत रिकामा त्रास होतो. भाषणें, गाणीं इ. पाठ करण्याचे त्यांना फार श्रम पडतात व वेळहि वायां जातो. तेव्हां फक्त उपयुक्त आणि प्रसंगाला उचित असाच कार्यक्रम आंखण्याकडे लक्ष देणें योग्य होईल. लांबलचक कार्यक्रम ठेवण्यांत अधिकाऱ्यांचा हेतु वाईट असतो असा याचा अर्थ नव्हे; त्यापासून आनंद आणि करमणूक होते ही गोष्टहि खोटी नाहीं; पण उचित आणि प्रासंगिक कार्यक्रम निवडण्याकडे जास्त दृष्टि ठेवावी एवढीच गोष्ट मला पटवून द्यावयाची आहे.

मुलांच्या शरीरावर, मनावर आणि विचारावरहि काळाचा परिणाम होत असतो हें विसरून चालवयाचें नाहीं. आपल्या चालीरीतींचें ग्रहण त्यांनीं केलें पाहिजे, चांगल्या गोष्टी त्यांनीं सोडतां कामा नये व वाईट चालू ठेवतां कामा नये, यांकडे शिक्षकांनीं लक्ष दिलें पाहिजे. ज्या चाली व सवयी हितकारक असतील त्या अंगीं आणण्यास प्रत्येक विद्यार्थ्यांनें तयार असलें पाहिजे; अंगीं बाणल्यावर त्या कधीं टाकतांहि कामा नये. शिक्षकाचें काम फार महत्त्वाचें आणि जबाबदारीचें असतें. बाहेर जगांत चोहोंकडे काय चाललें आहे तें पाहून विद्यार्थ्यांनाहि समजाविलें पाहिजे. लहानसहान शिष्टाचाराच्या बाबीहि त्यांना शिकविल्या पाहिजेत. आल्यावर सलाम, नमस्कार वगैरे करण्याचें सभ्य वर्तन त्यांनीं ठेवलें पाहिजे. चांगलें सोडून मन मानेल तसें करणें योग्य नव्हे. सर्वच जुने रिवाज वाईट नसतात; त्यांपैकीं चांगले असतात ते तसे ठेवावेत. नमस्कार, जयजयकार करणें, यांसारखे रिवाज जुन्या काळापासून चालत आलेले आहेत; पण आज त्यांचा उपयोग कमी होतो हें बरें नाहीं.

त्यांचा स्वीकार करण्यांत स्वाभिमान आहे व वडील माणसांबद्दल आदरभावनाहि आहे. या बाबतींत मीं जे अनेक हुकूम सोडले आहेत ते माझ्या स्वतःच्या मोठेपणाकरितां नाहींत. तर राजाच्या गौरवांत तुमचाहि गौरव होतो व तुमच्या कल्याणांत राजाचेंसुद्धां कल्याण येतें, अशी परस्परभावना निर्माण करण्याचा माझा हेतु त्यांत आहे.

मुलांना असल्या शिष्टाचाराचेंहि शिक्षण मिळालें पाहिजे. माझ्या सांगण्याचा मतलब एवढाच कीं, जे चांगले आचार-विचार असतील ते घ्यावेत पण त्याबरोबरच आपले जे चांगले रिवाज ते सोडतां कामा नयेत. या प्रसंगीं मी मुलांना असा आशीर्वाद देतों कीं, तुम्ही चांगले मोठे आणि स्वाभिमानी नागरिक बना व दुसऱ्याचें कल्याण होईल अशी सेवा तुम्ही करा. तुमचें कल्याण होवो!

## ३८

**स्थल:—बडोदें.**

**काल:—ता. २२ मार्च १९३४.**

**प्रसंग:—फुलांच्या प्रदर्शनाचा उद्घाटन-समारंभ.**

मि टी. ई. द मोरसीये यांनीं अंतःकरणपूर्वक केलेल्या ओजस्वी आणि सुंदर भाषणाशीं स्पर्धा करणें शक्य नाहीं. मि. मोरसीये हे आमचे चीफ इंजिनियर आहेत. ते जन्मानें आणि वृत्तीनें फ्रेंच असले तरी अत्यंत कार्यतत्पर व उद्योगी अधिकारी असून शिक्षणानें इंग्लिश आहेत. त्यामुळें त्यांचें वक्तृत्व आणि सुंदर शैली साधण्याचा आम्हांला प्रयत्न तरी करतां येईल.

आयुष्यांतील प्रत्येक गोष्ट तुलनात्मक असते. बडोदें ही पुष्पनगरी असूं शकेल, परंतु आपणाला हिंदुस्थानाशीं बडोद्याची तुलना करावयाची आहे. युरोपांतील परिस्थिति हिंदुस्थानांतील परिस्थितीहून अत्यंत भिन्न आहे. निसर्गानें दिलेल्या देणगीचा फायदा घेण्याकरितां शक्य तितका प्रयत्न करणें एवढेंच आपल्या हातचें आहे. पश्चिमेकडील हिरवीं पटांगणें आणि हिरव्यागार दऱ्या आपणाकडे नसतील. संस्कृतीच्या उपयुक्ततेचें माप, एखादें राष्ट्र नैसर्गिक देणग्यांचा किती प्रमाणांत उपयोग करून घेतें यावर अवलंबून असतें. याचमुळें हिंदुस्थानांत अन्यत्र आढळणाऱ्या रूक्ष जमिनी आणि दगडधोंडे यांजकडे पाहून, निसर्ग आणि निसर्गाचे सुंदर देखावे यांजबद्दल अनादर असूं नये.

गुजरात प्रांत पीकपाण्यांत समृद्ध आहे. संस्थानानें या बाबतींत सुरू केलेल्या कामांत आम्हीं आमच्या पूर्वजांच्या अनुभवांचा फायदा घेऊन प्रगति करण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रीष्म ऋतूंत तसेंच अडचणीच्या वेळीं प्रवाशाला निसर्गाच्या सुखकर कोपऱ्याचा आश्रय घेतां येतो हें जाणून आम्ही आमच्या संस्थानांत वृक्षारापणे व वृक्षवर्धन हीं कामें सुरू ठेविलीं आहेत.

आमचे चीफ इंजिनियर यांनीं भाषणांत व्यक्त केलेल्या भावनांशीं मी सहमत आहे. त्यांच्या ठिकाणीं वसत असलेली आदर्श कर्तव्यदक्षता आणि कार्याची विविधता यांबद्दल त्यांचे आभार मानून हें वटोदर-पुष्प-प्रदर्शन मी खुलें करतों.

## ३९

**स्थलः—ग्रोव्हनॉर हाउस, लंडन.**

**कालः—तारीख २४ जुलै १९३४.**

**प्रसंगः—समर रिसेप्शन, ईस्ट इंडिया असोसिएशन.**

आजच्या या सभेंत हजर राहण्याविषयीं मला जेव्हां सांगण्यांत आलें, त्या वेळीं येथें मला कांहीं बोलावें लागेल याची मला अंधुकहि कल्पना नव्हती. परंतु आमच्या मित्रांच्या विनंतीस मला मान दिला पाहिजे.

माझ्यापूर्वी दोन वक्त्यांचीं भाषणें झालीं असून त्यांत त्यांनीं इतके उच्च आणि नवे विचार प्रदर्शित केले आहेत कीं, त्यांची पुनरुक्ति माझ्या तोंडून होण्याची जरूरी नाहीं. आम्ही इतकेंच सांगतों कीं, त्यांनीं उल्लेखिलेल्या पुष्कळ समंजस विचारांशीं आम्ही सहमत आहोंत.

आपण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, पूर्वीच्या परिस्थितींत आणि आजच्या परिस्थितींत फार मोठा फरक पडला आहे. खरें पाहिलें असतां आपण वेगवेगळ्या देशांत अगर खंडांत राहात नसून, ज्यांत सर्वांचे हितसंबंध सारखे असून ते सहानुभूतिपूर्वक विचारले जातात अशा एका अविभक्त जगांत वावरत आहोंत. जे पूर्वी खंड होते त्यांचें रूपांतर देशांत, आणि जे देश होते त्यांचें परगण्यांत झालें आहे. अशा तऱ्हेनें आपले नैतिक आणि आर्थिक संबंध अविभाज्य रीतीनें एकत्रित झाले आहेत. व्यवहारांत आणि राष्ट्रांच्या कारभारांत या गोष्टीचें महत्त्व न जाणणें अदूरदर्शीपणाचें ठरेल.

हें जोंपर्यंत झालें नाहीं तोंपर्यंत, लहान किंवा मोठ्या प्रमाणावरील आर्थिक प्रगतीकरितां झगडा, करांविरुद्ध झगडा, हीं चालू राहतील; आणि यांपासून मानवजातीचें कल्याण होणें शक्य नाहीं. असल्या उपायांपासून कांहीं थोडा काळ, कांहीं थोड्या जातिसमुदायांना, फायदा होईल; परंतु सर्व जगाच्या दृष्टीनें विचार केल्यास, आपणांजवळ उच्चतर दृष्टि, उच्चतर सहानुभूति, लहानसहान जातीकरितां नव्हे तर अखिल मानवजातीकरितां प्रेमभाव, यांची जरूरी आहे. हीं नसतील तोंवर परस्पर द्वेषभाव, परस्पर झगडे हे नेहमीं चालू राहतील. साम्राज्याच्या कारभारांत आमच्या-सारख्यांचा कोणत्याहि प्रकारचा हात नसल्यानें, आम्हांला नुसते विचार प्रदर्शित करतां येतात.

आम्हांला आशा आहे कीं, हिंदुस्थानच्या राज्यघटनेंत अपेक्षिलेले बदल हे इतक्या चांगल्या तऱ्हेनें घडवून आणले जातील, आणि हिंदी लोकांना दिलेले अधिकार हे इतके सामर्थ्यवान् असतील कीं, साम्राज्याच्या आणि मानवजातीच्या प्रगतीकरितां नुसती भावनामय नव्हे तर खरीखुरी मदत हिंदी लोकांना करतां येईल.

इतकें सांगून, आमच्या मित्रांना, आणि विशेषतः पुष्कळ वर्षांपासून परिचित असलेल्या माझ्या जुन्या मित्रांना लॉर्ड लॅमिंगटन व लॉर्ड लिनलिथगो यांना— भेटण्याची आमच्या अनेक स्नेह्यांनीं जी संधि दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. परस्परांच्या निकट सहवासांत येण्याजोगे कांहीं असले प्रसंग पाहून सर्व हिंदी लोकांना आनंदच वाटतो. असले प्रसंग जास्त येऊन परस्परांच्या विचार-विनिमयाला आणि सामाजिक करमणुकीला अधिक अवसर मिळेल अशी आम्हांला आशा आहे.

शेवटीं, हे प्रासंगिक विचार प्रदर्शित करण्याची आपण जी आम्हांला संधि दिलीत त्याबद्दल पुन्हा एकदां आम्ही आपले आभार मानतों.

४०

**स्थल:**—कॅक्स्टन हॉल.

**काल:**—ता. ७ ऑगस्ट १९३५.

**प्रसंग:**—यूनियन ऑफ वेस्ट अँड ईस्टची सभा.

श्री. दत्त यांनीं स्थापन केलेल्या 'व्रतचारी' चळवळीसंबंधानें आम्हांला विशेष आस्था वाटते. या चळवळीपासून हिंदुस्थानांतील लोकांना पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे. हिंदी लोकांच्या पुनर्जीवनाचा विचार केल्यास या व्रतचारी चळवळीनें सर्व प्रश्न सुटतील असें अर्थात्च नाहीं.

हिंदुस्थान हा एक असा देश आहे कीं, ज्यांत पूर्वी गुप्त आणि मौर्य यांची साम्राज्यें होऊन गेलीं. मध्य आफ्रिकेमध्यें असणाऱ्या कांहीं लोकांप्रमाणें पूर्वींहि कधीं आम्ही रानटी नव्हतों व आजहि नाहीं.

आमच्या पूर्वकालीन जुन्या वाङ्मयावरून विचार केला असतां, आमच्या स्त्रियांना गीत आणि नृत्य हीं शिकणें अवश्य समजलें जाई. आमच्या जुन्या राहणी-प्रमाणें तुमच्याइकडील सध्यांची राहणी दिसते.

एखाद्या जातीचें रूपांतर राष्ट्रांत व्हावयाला सामान्य कायदा, सामान्य धर्म, सामान्य रूढि, सामान्य भावना, सामान्य आचारविचार, सामान्य आकांक्षा यांची जरूरी असते. यांपैकीं कोणतीहि एक कसोटी लाविली असतां, तिला हिंदी राष्ट्र टिकूं शकतें, असें आढळेल.

याचमुळें हिंदुस्थानाला विविधवंश किंवा जाती यांची खिचडी, असें न म्हणतां एक राष्ट्र म्हणणें शोभेल.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतून येणारे हिंदी लोक आणि युरोपियन लोक यांच्याबरोबर आम्हीं काम केलेलें आहे. त्या प्रसंगीं परस्परांचें म्हणणें परस्परांना समजलें नाहीं असें कधींहि झालेलें नाहीं. आमचे बहुतेक आचारविचार सारखेच आहेत. फरक असलाच तर सारखेपणांतील रूक्षता घालविण्यापुरताच.

आमच्या जुन्या रूढि नाहींशा होत असून, त्यांच्या जागीं नव्या प्रस्थापित करून आनंद उपभोगण्याइतका नव्या रूढींशीं आमचा परिचय नाहीं. तरी पण सुधारणा घडवून आणण्याचा आम्हीं प्रयत्न केला पाहिजे. अर्थात् शरीरसामर्थ्या-

निबंध ६३४
२८।१२।३४
ठाणे.



वांचून कांहींहि मिळवितां येणें शक्य नाहीं. आम्हांला अधिक शारीरिक सामर्थ्य आणि अधिक आनंद यांची जरूरी आहे. देशांत थोडेंअधिक स्वातंत्र्य आम्हांला हवें आहे.

एखाद्या राष्ट्राचें पुनरुज्जीवन तेव्हांच होऊं शकेल कीं, जेव्हां त्यांत राज्यघटने-संबंधानें विचार करणाऱ्या स्वतंत्र संस्था अस्तित्वांत येतील. या बाबतींत महत्त्वाची प्रगति सध्यां होऊन राहिली आहे.

शारीरिक खेळ, कसरती, संगीत वगैरेची आवड हिंदी लोकांना आहे. पूर्वींच्या काळीं, आमच्या लहानपणीं, व्यायाम घेतल्यावांचून लोक घराच्या बाहेरहि पडत नसत. कुस्ती, अश्वारोहण, वगैरेसारखे व्यायाम ते आपल्या योग्यतेनुसार घेत.

ज्याप्रमाणें तुमच्या इकडे चहा, भोजन वगैरे प्रसंगीं त्यांच्या जोडीला संगीत असतें, त्याचप्रमाणें आमच्यांतहि असतें. संगीतावांचून कोणताहि समारंभ साजरा केला जात नसे. कित्येक देवतांच्याप्रीत्यर्थ आमच्याकडे गरबे खेळले जातात; आणि या गरब्यांत सर्व दर्जांच्या स्त्रिया– राजकन्या देखील– भाग घेत असत. वाघेर आणि आणि भिल्ल या जातींत देखील नाच असून, त्यापैकीं कांहीं फार मनोरंजक आहेत.

बडोद्यांत आम्हीं संगीतशास्त्रज्ञ, गाणारे, नृत्य करणारे, पोवाडे म्हणणारे शाहीर आणि तमासगीर– या सर्वांना बक्षिसें वांटीत असतों. सध्यांच्या काळाला साजेल असा फरक या बक्षिसांत करण्यांत आलेला आहे.

हिंदुस्थानांतील शिक्षणपद्धति व सुशिक्षित लोकांचा जीवनक्रम यांचा, आणि देशांतील सामाजिक, धार्मिक, संस्कृतिविषयक चालीरीति यांचा, निकट संबंध येणें फार अगत्याचें आहे. आणि याच दृष्टीनें श्री. दत्त यांनीं स्थापन केलेल्या चळवळीची उपयुक्तता फार मोठी आहे.

व्रतचारी चळवळ ज्या गोष्टींवर भर देते, त्यापैकीं नृत्य आणि संगीत, या दोन क्षेत्रांत स्थानिक कला जिवंत ठेवण्याची उपयुक्तता आम्हांला नेहमीं पटलेली आहे. बडोद्यांतील स्त्रियांत गरब्याची प्रथा रूढ करण्याचा बाबतींत आम्हीं उत्तेजन दिलेलें आहे. तसेंच भारतीय संगीताचा पिढीजात गवयी लोकांकडून उत्कर्ष करण्या-च्या बाबतींत आणि लोकगीतांचा संग्रह करण्याच्या बाबतींत आम्हीं मदत केलेली आहे. जुने नाच आणि जुने पोवाडे हे सुशिक्षित लोकांच्या दुर्लक्षामुळें मरत चाललेले आहेत हें माल या बाबतींतील आमचे प्रयत्न लक्षांत घेऊनहि आमच्या नजरेंत आलें आहे. आमच्या संस्थानाप्रमाणें हिंदुस्थानच्या इतरहि भागांत हीच स्थिति आढळेल.

जेव्हां आम्ही या जुन्या संस्थांचा विचार करून त्यांना जरा तर्कशुद्ध पायावर बसवूं लागलों, तेव्हां त्या नीट समजून त्यांत आढळणारे दोष घालविणारे लोक मिळविणें, ही मोठी अडचण भासूं लागली.

याच दृष्टीनें श्री. दत्त सुरुवातीचें जें महत्त्वाचें कार्य करीत आहेत त्याची किंमत फार मोठी आहे. जुन्या नृत्यांचें आणि लोकगीतांचें त्यांनीं नुसतें संशोधन चालविलें नसून ते स्वतः नृत्य आणि लोकगीत याचें शिक्षण घेऊन सुशिक्षित लोकांत त्यांचा प्रसार करण्याचें कार्य करीत आहेत. आमचा सुशिक्षित वर्ग आणि आमच्या युनिव्हर्सिट्या यांच्या डोळ्यांत तें एक प्रकारें अंजनच घालीत आहेत.

आमच्या मतें श्री. दत्त हे अशा प्रकारचें कार्य करीत आहेत कीं, ज्याचें महत्त्व आतां जरी लोकांना पटलें नाहीं तरी पाऊणशें किंवा शंभर वर्षांनीं पटेलच पटेल. ते अखिल हिंदुस्थानाकरतां मोठें राष्ट्रीय कार्य करीत आहेत. या कार्याचें रूपांतर मोठ्या राष्ट्रीय चळवळींत होऊन हिंदुस्थानच्या इतिहासांत श्री. दत्त यांचें नांव त्यामुळें अमर बनेल. आजपर्यंत तग धरून राहिलेल्या स्थानिक संस्कृतीला ही चळवळ विनाशापासून थांबवील आणि राष्ट्रीय जीवन जोम व आनंद यांनीं ती भरून काढील.

जी गोष्ट जुन्या नृत्याची आणि लोकगीतांची तीच तऱ्हा देशी खेळांची. या खेळांचें पुनरुज्जीवन आपणांला करतां येईल. पुस्तकरूपानें असल्या खेळांचा संग्रह आम्हीं प्रसिद्ध केला असून, त्यांत महत्त्वाची माहिती पुष्कळ एकत्रित केली आहे. सबंध हिंदुस्थानाकरितां अशा प्रकारचा संग्रह प्रसिद्ध झाल्यास, त्यापासून लोकांना फायदा होऊन पुष्कळ जागृतीच्या दिशा कळतील.

श्री. दत्त यांच्या व्रतचारी चळवळीचा आमच्यावर इतका मोठा परिणाम झाला आहे कीं, आम्हीं त्यांना लवकर बडोद्याला येऊन तेथें ही चळवळ सुरू करण्याची विनंति केली आहे. आपल्या लोकांत नवा उत्साह आणि आनंद या चळवळीनें निर्माण होईल.

## ४१

**स्थल:**—लक्ष्मीविलास राजवाडा.

**काल:**—ता. २ डिसेंबर १९३५.

**प्रसंग:**--हिंदु धर्माची पुनर्घटना या विषयावरील प्रो. सोमण यांचें व्याख्यान.

सद्गृहस्थहो, आपणांला चार शब्द सांगण्याची याच क्षणाला आम्हांला इच्छा झाल्यानें आमच्या विचारांत विस्कळितपणा आढळल्यास, आम्हांला क्षमा असावी.

प्रथमतः आम्ही एक खुलासा करूं इच्छितों तो हा कीं, प्रस्तुत विषयावर आम्ही महाराज या नात्यानें बोलत नसून एक व्यक्ति या नात्यानें बोलत आहोंत.

प्रो. सोमण यांचें आतां आपण जें चांगलें भाषण ऐकलें त्याबद्दल त्यांचें अभिनंदन केल्यावांचून आपणाला राहवत नाहीं. पुष्कळ बाबतींत त्यांचे विचार चांगले भरीव आहेत. कित्येक बाबतींत त्यांचा आणि आमचा विरोध आहे. उदाहरणार्थ, सांस्कृतिक ऐक्यावर ते इतका भर कां देतात हें आम्हांला कळत नाहीं. आपण आपल्या लोकांना शक्य तितक्या चांगल्या प्रकारचें शिक्षण देऊन, लग्नाची गोष्ट त्यांच्या आवडीवर आणि बुद्धीवर सोपविली पाहिजे.

आपल्या सुधारणा स्थूल स्वरूपाच्या असल्यावांचून सहकारित्वानें आपणाला कार्य करतां येणार नाहीं. असा एक काळ होता कीं, ज्या वेळीं हिंदुस्थान हा अगदीं अलग राहूं शकला होता. कांहीं काळानंतर इराण, अरबस्थान आणि युरोप या देशांतील लोक येथें आल्यानें हिंदु संस्कृतीवर त्याचा परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. विचारांत यामुळें थोडीशी उदारता आली, पण भ्रातृभाव राखण्याचा धडा अजून आपण शिकलेलों नाहीं. वर्ग, जाती, धर्म, देश—यांव्यतिरिक्त विश्वधर्म—विश्वविचार—यांचें चिंतन व्हावयाला हवें. परस्परांच्या धर्मांचा आणि चालीरीतींचा अभ्यास केल्यानेंच खरोखर आपल्या विचारांत आणि इतर गोष्टींत सुधारणा होऊं शकते.

या विषयावर आम्हीं पुष्कळ वर्षें विचार केला असून, आमच्या प्रत्येक प्रगतीच्या पावलानें कांहीं कांहीं उद्दिष्ट साध्य केलें आहे. प्रथमतः कसली जरूरी असेल तर ती सुधारणा घडवून आणण्याच्या इच्छेची. ही प्रथम आपण उत्पन्न केली पाहिजे. जुन्या-नव्याचें पृथक्करण करून त्यांची तुलना करावयाला लोकांनीं शिकलें पाहिजे. आणि याकरितां शिक्षण दिलें पाहिजे.

शिक्षण याचा अर्थ पुस्तकी शिक्षण असा आम्ही मुळींच समजत नाहीं. शिक्षणाचे इतरहि प्रकार असून ते आपणाला माहीत असल्यानें आम्ही त्याविषयीं सांगण्याची आवश्यकता नाहीं. ज्ञानमंदिराचा शिक्षण हा एक भाग असून तो जातिधर्मांच्या निर्बंधांवांचून सर्वांना वापरतां आला पाहिजे. हें चांगल्या प्रकारें सिद्ध झाल्यावर, आपणाला मानवी प्रगति किती झाली हें सांगतां येईल.

सामाजिक सुधारणांचा विचार केला असतां आम्ही जो कायदा करतों त्यामुळें विशिष्ट वर्गाला फायदा होतो. अर्थात् ही नुसती सुरुवात असून, अजून पुष्कळच करण्याजोगें आहे. आम्ही किंवा आमचें संस्थान या बाबतींत काय आणखी करूं शकतील हें आम्हांला सांगतां येणार नाहीं; परंतु आपणाला जें शक्य

असेल तें आपण व्यक्तिशः आणि जातिशः करून, आपले विचार फैलावण्याच्या कामीं मनःपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.

तुम्हांला आपले धार्मिक विचार बदलावयाचे नसल्यास तो तुमचा वैयक्तिक प्रश्न आहे. हिंदु धर्म हा केवळ जुना धर्म आहे, एवढ्या सबबीवर तुम्हीं त्याच्यापासून दूर जातां कामा नये. आमच्या कल्पनेहूनहि जास्त अज्ञान सुधारणांच्या बाबतींत हिंदुस्थानांत असलेलें आम्हांला आढळलें. अशा परिस्थितींत धर्मांचा उत्कर्ष होणें शक्य नाहीं. आमच्या मुसलमान आणि ख्रिस्ती मित्रांनीं या बाबतींत योग्य धडा गिरविला आहे.

उत्तम विचारांची सामुग्री बरोबर घेऊन आपण यश मिळविण्याचे मार्ग वाढविले पाहिजेत. निरनिराळ्या धर्मांत असलेल्या सामान्य तत्त्वांचा विचार बहुजनसमाजांत प्रसृत करून, आपण शीलसंवर्धन करावयाला शिकलें पाहिजे. अनेक प्रकारांनीं ज्याची व्याख्या करतां येईल असा धर्म हा एक शब्द आहे. खरें पाहिलें असतां ती एक वैयक्तिक भावना आहे; आणि ती प्रत्येक व्यक्तीनें आपल्या आवडीप्रमाणें आणि कुवतीप्रमाणें प्रदर्शित करावी.

पण याच व्याख्येनुरूप, सर्वांना अनुसरतां येईल अशा प्रकारचें सामान्य नैतिक निर्बंध असायाला हवेत. परस्पर प्रेम आणि परस्पर साहाय्य करून अंतःकरणांत एक ध्येय आपण ठेवूं या. यांतच हिंदुस्थानाचा मोक्ष सामावलेला आहे. असें न केल्यास विपत्तीशीं आपणाला झगडावें लागेल. ख्रिस्ती धर्म, महंमदी धर्म, बौद्ध धर्म आणि हिंदु धर्म यांत इतकीं उज्ज्वल तत्त्वें आहेत कीं तीं एकत्र करून आपणाला एक सर्वमान्य होणारा विधिसंग्रह किंवा 'कोड' निर्माण करतां येईल. पण या बाबतींत आम्हांला प्रत्यक्ष फळ फारसें सध्यां दिसत नाहीं. हळूहळू कार्य करण्यांतच व्यावहारिक ध्येयवाद सामावलेला असतो. त्याप्रमाणें देशप्रेम आणि परस्पर साहाय्य करण्याचें ध्येय तूर्त आपणासमोर असायला हवें.

## ४२

**स्थल:**—न्यायमंदिराचा दिवाणखाना, बडोदें.

**काल:**—ता. ४ डिसेंबर १९३५.

**प्रसंग:**—बडोदें हायस्कूलचा वार्षिक बक्षिस-समारंभ.

माझी प्रकृति बरी नसल्यानें आपल्या समारंभाला येतां येईल कीं नाहीं याची मला काळजी वाटत होती. पण आपला समारंभ राजमहालाजवळच होता व माझ्या आगमनानें शिक्षक आणि विद्यार्थि यांना प्रोत्साहन मिळणार होतें तेव्हां थोडा त्रास पतकरूनहि मी आनंदानें हजर राहिलों आहें.

येण्यापासून मला फार आनंद वाटत आहे. कारण आमच्या सत्कारासाठीं आणि आमची करमणूक होण्यासाठीं आपण जो कार्यक्रम आंखला होता तो फार सुंदर आणि मनोरंजक होता. गाणीं, संवाद, भाषणें इत्यादि सर्व चांगलीं आणि बोधप्रद झालीं. तुम्हां तरुण विद्यार्थ्यांना मला असें सांगावयाचें आहे कीं, यांतील ज्ञान आणि सुविचार आपल्या प्रत्येक व्यवहारांत आणि वागण्यांत उतरले पाहिजेत. असें झालें तरच त्यांचें सार्थक समजावयाचें. तुम्हीं परकी भाषेंत उत्तम भाषणें केलींत, वक्तृत्व गाजविलेंत, हें सर्व ठीक झालें. पण याचप्रमाणें आपल्या भाषेवरहि प्रभुत्व मिळवावयास पाहिजे. तुमचे हेडमास्तर श्री. गुप्ते यांच्या भाषणांत तुमची प्रगति आणि आकांक्षा यांची माहिती होऊन आनंद वाटला. त्यांचें निवेदन स्पष्ट आणि सुंदर भाषेंत लिहिलेलें होतें. थोडक्यांत सर्व मुद्दे त्यांनीं आणले होते. शाळेच्या प्रगतीबद्दल त्यांचें व त्यांच्या मदतनीस शिक्षकांचें अभिनंदन करतों; तसेंच सुंदर कामें केल्याबद्दल विद्यार्थ्यांना पण शाबासकी देतों. शेवटीं तुम्हीं विद्यार्थ्यांनीं अभ्यासांत प्रगति करून यश मिळवावें व भरीव शिक्षण देऊन चांगले हुशार आणि सदाचारी विद्यार्थि या हायस्कूलनें तयार करावे अशी शुभेच्छा प्रदर्शित करतों.

## ४३

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. ५ डिसेंबर १९३५.

**प्रसंग:**—गुजराथेंतील आंतर कॉलेजीय खेळांच्या सामन्याचीं बक्षिसें वाटण्याचा समारंभ

प्रि. बरो, प्रोफेसर व छात्रगणहो,

आज या सायंकाळीं कांहीं बोलण्याचा माझा हेतु नव्हता. तथापि येथें आल्यापासून माझ्या दृष्टीस पडलेल्या मर्दानी सामर्थ्याच्या आणि कौशल्याच्या खेळांच्या दर्शनानें मला इतका आनंद झाला आहे कीं, आतां चार शब्द बोलल्याशिवाय मला राहवत नाहीं.

असल्या कॉलेजांतील खेळांना साहजिकच मी यापूर्वीं अनेक वेळां आलों आहें, आणि त्या काळीं विद्यार्थ्यांचे फिकट गाल आणि खोल गेलेले डोळे पाहिलेले मला अजून स्मरतात. त्यांच्यांत सामर्थ्य आणि उत्साह या दोन्ही गोष्टींची कमतरता होती. त्या वेळच्या आणि तुमच्या आतांच्या पराक्रमांची तुलना करून पाहिली म्हणजे आतां दिसून येणाऱ्या सुधारणेमुळें मला अर्थातच खरोखर आनंद वाटतो.

हे आंतर कॉलेजीय खेळ सुरू केल्याबद्दल आपल्या विद्यापीठाचे आभार मानावे असें मला वाटतें. कारण विद्यार्थ्यांच्या आजच्या पिढीला त्यांपासून फार मोठा फायदा होणार आहे. 'एकसारखें काम करून खेळाला मुलींच वेळ काढतां आला नाहीं तर माणूस मठ्ठ होतो', अशा अर्थाची जी इंग्रजी म्हण आहे त्याचें मी तुम्हांला स्मरण देतों. केवळ पुस्तकांत गढून गेलेले आणि खेळांत भाग घेण्याचे टाळणारे विद्यार्थि साहस आणि उत्साह यांना पारखे असतात असें नेहमींच प्रत्ययास येतें. आरोग्ययुक्त आणि सामर्थ्यवान् होणें हें प्रत्येक तरुणाचें कर्तव्य आहे. आरोग्य आणि सामर्थ्य यांची साथ न मिळेल तर जीवनमार्गावर पदोपदीं उपस्थित होणाऱ्या अनेक अडचणींना तुम्हांला धीटपणानें तोंड देतां येणार नाहीं आणि अखेरील तुम्ही कोणत्याहि उद्योगांत पडला तरी पराजय आणि निराशा हींच तुमच्या वाट्याला येतील!

दिवसाचा कांहीं भाग तरी तुम्हीं मर्दानी व्यायामाकरितां काढून ठेवावा आणि खेळ व करमणूक यांची तुमच्या अभ्यासक्रमांतच तरतूद व्हावी, या गोष्टी

मला अगदीं आवश्यक वाटतात, विद्यापीठाच्या अधिकारीवर्गाला याची जाणीव होऊन त्याची अंशतः योजना करण्याच्या उद्देशानेंच त्यांनीं हे आंतरमहाविद्यालयीन सामने चालू केलेले पाहून मला फार आनंद होत आहे. त्यांच्या योगानें तुमची प्रकृति सुधारते, एवढेंच नव्हे तर अन्य पाठशालांच्या विद्यार्थ्यांशीं संघटन वाढून तुमच्यामध्यें बंधुभाव आणि सौमनस्य उत्पन्न होतें. जसजशी तुमची अभ्यासांत प्रगति होईल आणि जगाचा अधिक अनुभव येईल तसतसें हा गुजराथी आहे, हा काठियावाडी आहे आणि तो दक्षिणी आहे, अशा तऱ्हेनें माणसामाणसांतच भेद करणें हें केवळ निरर्थकच नव्हे तर हानिप्रद आहे, हें तुम्हांला समजेल. त्या प्रवृत्तींच्या आणि तज्जन्य विकृत विचारांच्या मुळाशीं केवळ आपलें अज्ञानच आहे. आपसांत तुमचा अधिकाधिक सहवास घडूं लागला तर आपली सर्वांची संस्कृति, विचार आणि चालीरीति किंवा आचार एकाच प्रकारचे आहेत, याचें तुम्हांला प्रत्यंतर येईल. शरीराचें निरनिराळे अवयव असावे तशासारखेच आपण निकट संबद्ध असून आपले सर्वांचे हितसंबंध अगदीं एकरूप असेंच आहेत. तेव्हां आपलें आरोग्य सुधारण्याकरितां बंधुभाव आणि खिलाडू वृत्तीची वाढ करण्याकरितां अशा दुहेरी उद्देशानें तुम्हीं या चळवळीमध्यें अधिकाधिक भाग घ्यावा, अशी माझी तीव्र इच्छा आहे.

चढाओढींत यशस्वी होऊन ज्यांनीं बक्षिसें मिळविलीं आहेत अशा विद्यार्थ्यांचें मी अभिनंदन करतों. सर्वांनाच बक्षिसें मिळतात असें नाहीं. तथापि ज्यांना बक्षिसें मिळूं शकलीं नाहींत त्यांनीं जी यत्नशलिता दाखविली तीहि अभिनंदनीय आहे. अशांनीं निराश न होतां पुढच्या प्रसंगीं यश मिळविण्यासाठीं आणखी नेटानें प्रयत्न करावा असेंच मी त्यांना सांगेन. शेवटीं आपल्यामध्यें येऊन, आजची संध्याकाळ मोठ्या आनंदांत घालविण्याची तुम्हीं जी मला संधि दिली तिजबद्दल आपल्या सर्वांचे मी आभार मानतों.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५(५)
शाखा

## ४४

**स्थल:**—आर्यकन्या महाविद्यालय, कारेली बाग, बडोदें.

**काल:**—ता. ९ डिसेंबर १९३५.

**प्रसंग:**—विद्यालयाच्या 'आफ्रिका छात्रावासाचा' उद्घाटन-समारंभ.

कर्नल वेअर, शेठ नानजीभाई व सभ्य स्त्री-पुरुषहो !

माझा घसा बरोबर नसल्यानें मी आज फार बोलणार नाहीं; पण आजच्या समारंभांत जीं अनेक संभाषणें ऐकलीं व प्रयोग पाहिले त्यांमुळें मला फार आनंद झाला आहे.

हें सारें चांगलें कार्य पाहून एक गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे कीं, या सर्व प्रवृत्तीचा प्रेरक कोण? आपण जाणतांच कीं, हा प्रेरक म्हणजे खुद्द स्वामी दयानंदजी. त्यांनीं उपदेशिलेल्या विचारांप्रमाणें आचरण केल्यानें समाजाला ही उच्च स्थिति प्राप्त झाली आहे. तेव्हां त्यांचें स्मरण या प्रसंगीं करणें योग्य होईल. त्यांचे विचार आणि कार्य यांचा परिणाम होऊन समाजाची जी सुधारणा झाली आहे, तीबद्दल आपणांस स्वामीजींचा अभिमान वाटला पाहिजे.

हिंदुस्थानांत जे अनेक धर्मपंथ आहेत त्यांपैकीं हिंदु धर्म हा एक आहे. ही धर्मसंस्था फार जुनी आहे. तेव्हां तिच्यांत साहजिकच अनेक वाईट गोष्टी शिरल्या आहेत. उदा०—अस्पृश्यता. अस्पृश्यतेचा विषय फार विचार करण्यासारखा आहे. असल्या वाईट चालीरीती जोंपर्यंत नाहींशा होत नाहींत तोंपर्यंत समाजाच्या उन्नतीची आशा नाहीं. तेव्हां आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून त्याचा नायनाट करण्याच्या मार्गाला लागलें पाहिजे; यांतच आपलें कल्याण आहे.

शेठ नानजीभाईनीं जें सुंदर भाषण केलें व त्यांत जे विविध विचार प्रदर्शित केले ते खरोखरच मननीय होते; पण त्यासंबंधीं मी आतां बोलत नाहीं. अशा सुधारणेच्या आणि शिक्षणाच्या कामाला माझी नेहमीं सहानुभूति असते असें समजा.

## ४५

[stamp]

**स्थल:**—महाराणी हायस्कूल फॉर गर्ल्स, बडोदें.

**काल:**—ता. ११ डिसेंबर १९३५.

**प्रसंग:**—वार्षिक बक्षिससमारंभ.

मिसेस वेयर, सभ्य स्त्री-पुरुष, मिस नीडहॅम, शिक्षक, आणि महाराणी हायस्कूल-मधील माजी आणि सध्यांच्या विद्यार्थिनींनो,

आज येथें हजर राहण्यांत आणि येथें दाखविले गेलेले खेळ पाहण्यांत आम्हांला खरोखर फार आनंद होत आहे. विशेषत: गरबा आणि धीरगंभीर अशा जपानी कवायतीचें अनुकरण हीं पाहून आमच्या मनावर विशेष परिणाम झाला. घरांतील बहुविध प्रकारची कामगिरी चांगल्या तऱ्हेनें करतां यावी म्हणून, शाळा सोडण्यापूर्वी जपानमधील स्त्रियांना असली कवाईत शिकविली जाते. जपानमधील तरुण स्त्रियांप्रमाणें आपल्या इकडील कांहीं स्त्रियांना ही कवाईत फायदेशीर वाटेल अशी मला आशा आहे. जेव्हां तुमचा विवाह होईल त्या वेळीं उत्तम गृहिणीचीं कर्तव्यें शांतपणें पार पाडण्याचें शिक्षण या कवायतीपासून तुम्हांला मिळेल.

तुमचें वार्षिक निवेदन ऐकूनहि आम्हांला समाधान वाटलें. कदाचित् दुसरेंहि हायस्कूल काढावें लागेल, इतकी मुलींची संख्या वाढलेली पाहून आम्हांला आनंद वाटतो. ही अपेक्षा लवकरच पूर्ण होईल अशी मला आशा आहे.

पाश्चात्य संस्कृतीचें केवळ अनुकरण करणारें शिक्षण येथें दिलें जात नाहीं. पूर्वीच्या काळीं आपल्या घरांतील स्त्रिया पुरुषांइतक्याच चांगल्या शिकलेल्या असत. समाजकार्य आणि वेदांतविषयक चर्चा यांतहि महत्त्वाचा भाग घेण्याइतकें शिक्षण पूर्वी स्त्रियांना दिलें जाई. अर्थात् सध्यांच्या पिढींतील तुम्हां स्त्रियांना देखील आलेल्या संधीचा फायदा न घेण्याचें कांहींच कारण दिसत नाहीं. पुरुषांप्रमाणें तुम्हांलाहि साहित्य, तसेंच इतर क्षेत्रांत हळूहळू काम करून, स्वत:चें स्वत्व प्रस्थापित करतां कां येऊं नये ?

द्वेषभावनेनें आपले प्रयत्न फुकट जाऊं न देण्याची खबरदारी तुम्हीं घेतली पाहिजे. यापेक्षां चांगल्या प्रकारच्या चढाओढीची वृत्ति वाढविली पाहिजे. या वृत्ती-पासून नेहमीं सर्वांना फायदा होतो. परस्परसाहाय्य, परस्परकल्याण, परस्परउत्कर्ष

यांचें ध्येय तुमच्यासमोर असावयाला हवें. दुसऱ्याचें नुकसान करून न घेतां स्वतःच्या कर्तबगारीनें व प्रयत्नानें आपला उत्कर्ष करून आपला फायदा करून घ्यावा. आपल्या प्रयत्नांची आणि कर्तबगारीची शिकस्त करून, सद्धयेयानें तुम्ही प्रेरित व्हाल अशी मला आशा आहे.

स्त्री आणि पुरुष हे कांहीं परस्परांचे शत्रु नाहींत; एकमेकांना एकमेकांची जरूरी आहे. आयुष्यांतील परमोच्च ध्येय जें गृहसौख्य तें साधून, जगाच्या आणि मानवजातीच्या कल्याणाकरितां, उभयतांनीं सहकार्य करीत पुढें गेलें पाहिजे. असें जोंपर्यंत झालें नाहीं तोंपर्यंत शिक्षणाचा हेतु सफळ झाला असें म्हणतां येणार नाहीं. मिस नीडहॅम यांच्या कुशल नेतृत्वाखालीं हें ध्येय साध्य होईल अशी आम्हांला आशा वाटते. त्या येथें बरींच वर्षें असून पुढेंहि राहतील असा आम्हांला भरंवसा वाटतो. आणि यथावकाश, त्यांचे अनुयायी त्यांचीच कामगिरी पुढें चालवून तुमच्या आणि या संस्थेच्या हितसंबंधाकडे लक्ष देवोत.

स्त्री-स्वातंत्र्याविषयीं हल्लीं आपण पुष्कळ ऐकतों; पण स्वातंत्र्याचें रूपांतर स्वैरतेच्या परवान्यांत होणार नाहीं, याची खात्री आपण दिली पाहिजे. तर्कशुद्ध किंवा उचित स्वातंत्र्याच्या दिशेनें तुम्हीं शक्य तोंवर आपली प्रगति करून घेतली पाहिजे. अशा प्रकारचें ध्येय समोर ठेवून, आपण स्त्रियांना शक्य तितकें स्वातंत्र्य दिलें पाहिजे. या कामीं अर्थातच शिक्षणाची, विचाराची आणि उद्योगप्रियतेची जरूरी आहे.

हिंदी नागरिक या नात्यानें समानदर्जा मिळविण्याचा विचार कांहीं स्त्रिया करीत असून, या कामीं त्यांना कांहीं कायदेपंडितांचें साहाय्य मिळत आहे, ही गोष्ट सर्वस्वी मला पसंत नाहीं. दुसऱ्याच्या मनांत आपल्याविषयीं आदर उत्पन्न करावयाचा असल्यास, आपण योग्य दिशेनें गेलें पाहिजे. तुमचें स्वातंत्र्य बुद्धीला पटणारें असूं द्या, कीं जेणेंकरून तुमच्या पुढील पिढीला तें सुलभतेनें वारसा म्हणून देतां येईल.

आपणाला फार वेळ थांबवून ठेवण्याची आमची इच्छा नसल्यानें आम्ही आमचें भाषण पुरें करतों. मिस नीडहॅम यांना मदत केल्याबद्दल तुम्हां शिक्षकांचे मी आभार मानतों. तुम्हां सर्वांना आयुष्यांत सुख आणि यश आम्ही चिंतितों. मनोरंजक कार्यक्रम जुळवून आपण जी आमची करमणूक आज केलीत त्याबद्दल आम्ही आपले आभार मानतों.

## ४६

**स्थलः—रेसकोर्स रोड, बडोदें.**

**कालः—ता. १३ डिसेंबर १९३५.**

**प्रसंगः—फ्रेंड्स को-ऑपरेटिव्ह सोसायटीचा नामकरण-समारंभ.**

सभ्य स्त्रीपुरुषहो,

आपण आमच्याविषयीं जें सुंदर भाषण केलेंत त्याला उद्देशून चार शब्द आम्हांला सांगावेसे वाटतात. सुप्रकाशित अशा या सुंदर घरांना पाहत असतांना, नगर-वृद्धी-करणाची योजना पुढें ठेवून वाढलेल्या बर्लिन, पॅरिस, लंडन, केरो या दूरच्या मोठ्या शहरांची मला आठवण होते. हिंदुस्थानांतहि नगरवाढीची चळवळ प्रत्येक दिवशीं वाढत असलेली आढळेल; परंतु इतर देशांचा विचार केला असतांना मुंबई, बडोदें, वगैरे ठिकाणीं चालविलेल्या चळवळींची प्रगति अत्यंत थोडी असल्याचें कळतें.

परंतु येवढ्यामुळें निराश होण्याचें कारण नाहीं. कारण इतर ठिकाणच्यापेक्षां आपल्या शहरांत हें काम झपाट्यानें चाललें आहे. या बाबतींत ज्यानीं पुढाकार घेतला असेल ते अभिनंदनास पात्र आहेत. या नगरवाढीच्या बाबतींत आमच्या येथें तसेंच हिंदुस्थानांत पुष्कळ प्रयत्न केले आहेत; परंतु लोकांकडून समाधानकारक जबाब मिळत नाहीं. अर्थात् याबद्दल लोकांना दोष देण्यांत कांहींच अर्थ नाहीं. मुख्य कारण आहे तें आर्थिक स्वरूपाचें आहे. हिंदुस्थानचें दारिद्र्य हें म्हण होऊन बसलें आहे. आणि आर्थिक परिस्थितींत बदल झाल्यावांचून आपली भरभराट होणें शक्य नाहीं असें आम्हांला वाटतें.

खरोखर कशांत जर बदल घडवून आणणें इष्ट असेल तर तो आर्थिक परि-स्थितींत. हा प्रश्न आम्हांला सोडवितां येत नाहीं. तो आम्ही अधिक बुद्धिवान्, अधिक अनुभवी लोकांवर सोंपवितों. घरें आणि विश्रांतिस्थानें हींच केवळ आयुष्या-च्या उपयोगी आहेत असें नाहीं. इतरहि गोष्टींची आयुष्याला जरूरी असून, त्या पुरविण्याची आम्ही आमच्याकडून खटपट करीत आहोंत.

ही सुंदर योजना आपण आनंदानें बडोद्यांत पाहत आहोंत, तिचें अनुकरण राज्यांत इतरत्र करण्याजोगें आहे. या बाबतींत होणाऱ्या प्रगतीला सरकारकडून नेहमीं साहाय्य होईल असें आम्ही सांगूं इच्छितों. सरकारच्या गंगाजळींतून पुष्कळसा पैसा या कामीं वापरला गेला आहे. आणि आतां आपण आपलें लक्ष गरिबांच्या

आणि विपन्नावस्थेंत असलेल्यांच्या गरजांकडे वळविलें पाहिजे. गेलीं साठ वर्षें झालीं या राजधानीप्रीत्यर्थ फार पैसा खर्च झालेला आहे. आतां आपण खेड्यांकडे लक्ष घातलें पाहिजे. याकरितां प्रत्येक प्रांतासाठीं सरकारनें विशिष्ट रक्कम ठरविली असून, त्यांत पुढें वाढ होण्याचाहि संभव आहे. त्याचप्रमाणें पाण्याची योजना व इतर सोयी करणाऱ्या गांवांकरितांहि सरकारनें कांहीं रक्कम मंजूर केलेली आहे. आपण काय केलें आहे याची जाणीव आपल्या दप्तरावरून होईल. आणि तीं पाहिलीं असतांना आपणाला सकारण समाधान वाटेल. अर्थात्, झालें एवढ्यानें संतुष्ट न होतां आपण अधिक मिळविण्याची खटपट केली पाहिजे.

हिंदुस्थानांतील इतर भागांचा विचार केला असतांना गुजराथ हा समृद्ध स्थितींत आढळेल. परंतु राहणीचा विचार केला असतांना ती वरच्या दर्जाची आढळत नाहीं. शिवाय जगांतील इतर देशांचा विचार केला असतांना गुजराथ समृद्ध आहे असें म्हणवणार नाहीं. आमची अशी इच्छा आहे कीं, आपण संतुष्ट न राहतां अधिक चांगल्या वस्तु चांगल्या मिळविण्याची धडपड केली पाहिजे. समृद्धि, ऐश्वर्य, सुख हीं तुम्हांला मिळालेलीं पाहून, तसेंच तुमच्या गरजा ताबडतोब पुऱ्या होऊन तुम्हांला घरगुती सोयी प्राप्त झालेल्या पाहून, आम्हांला खरा आनंद होईल.

सुराज्यापासून मिळावयाचे फायदे आपणांपैकीं सर्वांनाच हवे असतात. पण सुराज्यांत फक्त राज्याचाच अंतर्भाव होत नसून, सबंध राज्यतंत्राचाहि होत असतो. म्हणजे असें कीं, शरीरांत ज्याप्रमाणें एखाद्या भागाला बरें नसलें कीं, बाकीच्या भागांनाहि तें दुःख सहन करावें लागतें; त्याचप्रमाणें राजकीय शरीराचें आहे. यामुळें सर्व भागांची सारखी जोपासना करणें आवश्यक असतें. यासंबंधीं आपण पुस्तकें वाचाल तर आपल्या लक्षांत येईल कीं, या बाबतींत विशिष्ट योजनाच पूर्वी काढलेली असे. राजा हा प्रजेचा पिता समजला जाऊन प्रजेची प्रगति होत आहे किंवा नाहीं हें पाहणें त्याचें कर्तव्य समजलें जाई. पण पित्याला देखील आपल्या मुलांच्या मदतीची अपेक्षा असते. मुलांवर देखील जबाबदाऱ्या असतात.

आपणाला आपल्या कार्यांत यश हवें असल्यास, आपल्या समाजाच्या प्रगतीकरितां आपण सहकार्य केलें पाहिजे. सर्वांच्या कल्याणाकरितां आपण सर्वजण एकाच शरीराचे अवयव आहोंत, ही भावना आपण मनाशीं वागविली पाहिजे. जाती, पक्ष यांचा विचार न करतां, सर्वांना सुख मिळेल अशा रीतीनें आपण पुढें पाऊल टाकलें पाहिजे.

तुमच्या अंगीकृत कार्यांत आम्ही सुयश चिंतितों. प्रगति पाहून आमच्याइतका क्वचित् कोणाला आनंद होत असेल. उत्तम घरें बांधल्याबद्दल या सोसायटीचें आम्ही अभिनंदन करतों. आपलें अनुकरण इतर सोसायट्या करतील अशी

आम्हांला आशा आहे. बडोद्याची वाढ होते आहे, आणि आणखी वाढ होण्याकरितां आम्ही सोयी निर्माण करीत आहोंत. प्रांतांतहि ही चळवळ चालू आहे. आम्ही इंग्लंडमध्यें असतांना वेगवेगळ्या म्युनिसिपालिट्यांना त्यांच्या हद्दींत दाटी आहे काय आणि असल्यास ती घालवावयाला त्यांनीं काय प्रयत्न केले आहेत—यासंबंधीं लिहून विचारलें होतें. त्यांच्या उत्तरांची आम्ही वाट पाहत आहोंत. आम्हांला आशा आहे कीं, लवकरच असा काळ येईल, कीं ज्या वेळीं या गोष्टी कमी चर्चा आणि कमी पत्रव्यवहार यांनीं सिद्ध होतील.

आमच्याबद्दल प्रकट केलेल्या सद्भावाबद्दल पुनः एकदां आभार मानून आम्ही आपणा सर्वांना सुख आणि ऐश्वर्य इच्छितों.

## ४७

**स्थलः**—कडवा पाटीदार छात्रालय, कारेली बाग, बडोदें.

**कालः**—ता. १६ डिसेंबर १९३५.

**प्रसंगः**—छात्रालयाचा उद्‌घाटन-समारंभ.

राजेश्री स्वामीनारायण, मंत्रि आणि सद्‌गृहस्थहो !

आज मला फारसें बोलावयाचें नाहीं. अशा संस्थेसंबंधींचे माझे सामान्य विचार मी दुसऱ्या एखाद्या वेळेस सांगेन. या प्रसंगीं फक्त दोन शब्द बोलतों. कांहीं वर्षांमागें कडी प्रांतांत फिरत असतांना मी आपल्या ज्ञातीचें छात्रालय पाहिलें; तेव्हां श्री. स्वामीनारायण यांनीं ती संस्था दाखविली. तिचें कार्य पाहून मला फार आनंद झाला. ती संस्था आज एवढी वाढली व चांगली चालली आहे, हें पाहून मला जास्तच आनंद वाटत आहे. कारण त्या वेळीं ज्या गोष्टी संभाव्य नव्हत्या त्या आज आहेत. असंभवनीय तें संभवनीय झालेलें पाहून अत्यानंद होणें स्वाभाविक आहे. आपण इतकें चांगलें कार्य केलें आहे कीं, त्यापासून पुढील काळांत आपल्या मुलांचें आणि ज्ञातीचें कल्याणच होणार आहे.

आपल्या कडवा पाटीदार ज्ञातीची वस्ती या राज्यांत मोठी आहे. आपण लोक या राज्याचे आधार आहां, आपला या राज्याला उपयोग आहे. तेव्हां जास्त शिकून चांगले व्हा, म्हणजे राज्याचें हित पाहाल. माझी हीच इच्छा आहे.

ही चांगली इमारत पाहून मला आनंद होतो. मोकळी हवा, स्वच्छ पाणी व व्यायाम या योगें आरोग्य वाढतें. तेव्हां यासंबंधीं येथील व्यवस्था चांगली आहे. 'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी', असें जें म्हणतात तें खरें आहे.

त्याप्रमाणें पाहतां आपला धंदा उत्तम आहे. पण आज शेतीची स्थिति पहिल्याप्रमाणें चांगली नाहीं. नैसर्गिक आपत्ति, पिकांच्या भावांत अगदीं मंदी, यांसारख्या गोष्टी नाहींशा करून शेतकी-सुधारणा करणें जरूर आहे. राज्यांत ८० टक्के वस्ती शेतकऱ्यांची असल्यानें त्यांची सुधारणा करण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे; त्याचा नेहमीं विचार केला पाहिजे व शक्य तो प्रयत्न केला पाहिजे. आपल्यांतील पोटजातींचें एकीकरण करणें अवश्य आहे. सर्वांच्या हिताचा प्रश्न एकच आहे. तुमचा उत्कर्ष झाला कीं, सर्व समाजाचा झाला असें समजा. आपला उत्कर्ष करण्यास झटणाऱ्या या संस्थेला यश यावें, असें मी इच्छितों. वारंवार ही संस्था व आपली प्रगतिहि मी पाहत राहीन, व आपली स्थिति सुधारण्याबाबत सूचना करीत जाईन व शक्य ती मदतहि पण आनंदानें देईन.

## ४८

**स्थल:—श्री. खंडेराव मार्केट, बडोदें.**

**काल:—सोमवार, ता. २३ डिसेंबर १९३५.**

**प्रसंग:—कै. श्री. खंडेराव महाराज यांच्या पुतळ्याचा अनावरण-समारंभ.**

सभ्य स्त्रीपुरुषहो,

कैलासवासी तीर्थरूप श्रीमंत खंडेराव महाराज यांच्या या पुतळ्याचें अनावरण करण्यास आम्हांस आज अत्यंत आनंद होत आहे.

हा पुतळा सुप्रसिद्ध शिल्पकार श्री. करमरकर यांनीं केला असून, तो त्यांच्या आजवरील लौकिकांत भर घालील असा आम्हांस भरंवसा वाटतो.

श्रीमंत खंडेराव महाराजांच्या कारकीर्दीस आज उणींपुरीं ७० वर्षें झालीं असलीं तरी त्यांची स्मृति आपणांस अद्याप ताजी आहे.

**शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्।** हें त्यांचें ब्रीदवाक्य होतें. व्यायामाची त्यांना फार आवड होती व कसरतीचीं ते अचाट कामें करीत असत. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ व उदार होता व त्यामुळें त्यांच्या दानधर्मास सीमा नसे. तो करतांना धर्माचा किंवा जातगोताचा ते मुळींच विचार करीत नसत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

**वज्रापेक्षांहि कठीण, पुष्पाहूनि मृदू बहू ॥**

ही भवभूतीची उक्ति त्यांना यथार्थतेनें लावतां येईल.

आपल्या प्रजेवर त्यांचें निरतिशय प्रेम होतें. त्यांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीसच सन १८५७ सालच्या बंडाचा वणवा पेटून, त्यांच्या अंगच्या गुणांची पारख होण्याची वेळ आली. या कसोटींस ते कसे उतरले व त्याचें राज्यास काय फळ मिळालें, तें सर्व तुम्ही जाणतच आहांत.

(१) डभोई–मियागाम रेल्वेचा फाटा बांधणें,
(२) ब्रिटिश हिंदुस्थानांतील पद्धतीप्रमाणें आपल्या राज्यांत
 (अ) सारावसुलीची, आणि
 (आ) जमिनीची मापणी व प्रतबंदी करण्याची रीत चालू करणें,
(३) बडोदें शहरासाठीं नर्मदेचें पाणी आणण्याची कल्पना,
(४) कांहीं लोकोपयोगी कायदे करणें,
(५) न्यायकोर्टाची स्थापना,
(६) कवायती फौजेची वृद्धि, व
(७) पेढ्यांची स्थापना,

इत्यादि स्पृहणीय गोष्टी श्रीमंत खंडेराव महाराजांनीं आपल्या कारकीर्दीत केल्याचें प्रसिद्ध आहे. विशेष तपशिलांत न शिरतां या गोष्टींचा आम्हीं आज नुसता नामनिर्देशच केला आहे. आपल्यांत हमेशा चालणाऱ्या गृहकलहामुळें त्यांना काय अडचणी आल्या असतील व भाऊ शिंदे यांच्यासारख्या दिवाणामुळें त्यांना किती मानसिक त्रास झाला असेल, याची इतरांस कल्पनाहि करतां येणार नाहीं.

**जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे,**

अशी म्हण आहे ती कांहीं खोटी नाहीं. या अडचणी व त्रास सोसून अवघ्या चवदा वर्षांच्या आपल्या कारकीर्दीत त्यांनीं इतकें केलें, हेंच अधिक होय.

श्रीमंत खंडेराव महाराजांच्या यशस्वी कारकीर्दीचें वरवर सिंहावलोकन करणारास त्यांनीं आर्थिक व सामाजिक सुधारणा करून सुराज्याचा पाया घातला, असें कबूल करावें लागेल. या त्यांच्या महनीय कामगिरीबद्दल, आमचें एक कर्तव्य

म्हणून आमचा आदर व कृतज्ञताबुद्धि व्यक्त करण्यासाठींच आम्ही आज त्यांच्या पुतळ्याचें अनावरण करीत आहों.

थोर विभूतींचे व मृत पितरांचे पुतळे उभारण्याची ही प्रथा जुनीच आहे. भास (इ. स. पूर्व ४ थें शतक) कवीच्या प्रतिमा नामक नाटकांत व शूद्रक (इ. स. चें २ रें शतक) कविकृत मृच्छकटिकांत देवकुळांचा उल्लेख आहे. हीं देवकुळें म्हणजेच मृतांच्या पुतळ्यांचीं संग्रहस्थानें होत. शैशुनागाच्या (इ. स. पूर्व ६४२ ते ४१३) मोठमोठ्या दगडी पुतळ्यांचे अलिकडे सापडलेले अवशेष तत्कालीनाची स्मारकप्रियता व पितरांविषयींचा आदर दर्शवितात.

पितरांच्या पश्चात् त्यांचें श्राद्ध करण्याची कल्पना याहून फार जुनी आहे. ऋग्वेदकालीं मृतास सद्गति मिळावी व मागें राहिलेल्यांस आरोग्य, संतति, संपत्ति, ज्ञान व कीर्ति हीं मिळावीं म्हणून यम-इंद्रादि देवांची स्तुति करीत असत. कालांतरानें या कल्पनेंत बदल होऊन तिला हल्लींचें विकृत स्वरूप प्राप्त झालें आहे.

**प्रेतं पितॄंश्च निर्दिश्य भोज्यं यत् प्रियमात्मनः ।**
**श्रद्धया दीयते यत्र तत् श्राद्धं परिकीर्तितम् ॥**

म्हणजे श्रद्धेनें अर्थात् पूज्यबुद्धीनें पितरांना आपण ज्या भोज्य वस्तु देतों, त्यास हल्लीं हिंदु लोक श्राद्ध असें म्हणतात.

या वस्तु मृताच्या आत्म्यास पोंहोचतात किंवा नाहीं, हें कोणासच कळत नाहीं. चार्वाकानें याविषयीं संशय प्रगट केला आहे. तो म्हणतो–

**मृतानामपि जन्तूनां श्राद्धं चेत् तृप्तिकारणम् ।**
**गच्छतामिह जन्तूनां व्यर्थं पाथेयकल्पनम् ॥**
**स्वर्गस्थिता यदा तृप्तिं गच्छेयुः तत्र दानतः ।**
**प्रासादस्योपरिस्थानां अत्र कस्मात् न दीयते ॥**

मेलेल्या प्राण्यास जर श्राद्धानें तृप्ति मिळत असेल तर प्रवासास जात असलेल्या मनुष्यास शिदोरी बांधून देणें व्यर्थ नव्हे काय? येथें अन्नादिकांचें दान दिल्यानें स्वर्गांत असलेल्या पितरांना जर तृप्ति मिळते तर येथें जवळच एखाद्या वाड्याच्या माडीवर बसलेल्या लोकांच्या तृप्तीकरितां अन्नादि कां दिलें जात नाहीं? असें जरी असलें, तरी वाडवडिलांचें स्मरण करून त्यांच्याविषयींचा आपला आदर दाखविण्याची पद्धति बहुतेक लोकांत दिसून येते. मुसलमानांची बर्शी, पारशांचा डोसला, रोमन कॅथालिक पंथीय ख्रिश्चनांचे मासेस, चीन-जपानांतील शिंतो व जैनांची आराधना, हे पितृसंस्मरणाचेच प्रकार होत. त्यांच्या तपशिलांत शिरण्याचें येथें अर्थातच प्रयोजन नाहीं.

पितृपूजेचे दोन प्रकार आहेत : एक व्यक्त ( सगुण ) व दुसरा अव्यक्त ( निर्गुण ). यांत अव्यक्त पितृपूजाच बरी दिसते. पितरांच्या आत्म्यास खरी शांति व समाधान लाभण्याचा यदाकदाचित् संभव असेल तर तो याच मार्गानें. ऋण काढून सण करून पिंडप्रदान करीत बसण्यानें किंवा फाजील विधींचें स्तोम माजविण्यानें हें साधणार नाहीं.

आपल्या पितरांचीं सुचरितें आत्मसात् करणें, त्यांच्या हयातींत त्यांना सुख देणें व त्यांच्या पश्चात् त्यांनीं आरंभिलेले सदुद्योग पुरे करणें ही अव्यक्त पितृपूजा होय.

**यानि अस्माकं सुचरितानि,**
**तानि त्वया उपास्यानि,**
**नो इतराणि ।**

आमच्या सत्कृत्यांचें अनुकरण करा, इतरांचें करूं नका, हें उपनिषदांतील सुंदर वचन हेंच दर्शवितें.

( १ ) पितरांच्या प्रतिमांस अभिवादणें,
( २ ) त्यांच्या नांवानें सत्कृत्यें करणें,
( ३ ) त्यांच्याविषयींचा आपला आदर जाहीर रीतीनें व्यक्त करणें,

हा पितृसंस्मरणाचाच दुसरा एक प्रकार होय.

मनुष्यप्राणी हा नाम आणि रूप या दोहोंनीं युक्त असतो. त्याच्या नांवाप्रमाणेंच त्याचें रूप जाणण्याची पुष्कळांस उत्सुकता असते व ती चित्रकार पूर्ण करूं शकतो. कोणत्याहि पुरुषाची प्रतिमा नजरेपुढें असल्यास त्याच्याविषयीं परिचय वाढूं लागतो. म्हणूनच चरित्र किंवा इतिहास ग्रंथांत वर्ण्य व्यक्तींचीं चित्रें देण्याचा प्रघात आहे. रामदासांनीं संभाजीस केलेल्या उपदेशांत म्हटलें आहे कीं,

**शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।**
**शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥**

या ओवींत पूर्वजाविषयींची स्मृति कशी जाग्रत ठेवावी, हें थोडक्यांत सांगितलें आहे. त्यांतल्या त्यांत ज्या पुरुषांचा रुबाब, कमावलेली शरीरयष्टि कैलासवासी श्रीमंत खंडेराव महाराजांसारखी असेल अशा पूर्वजांचें रूप तर अवश्यच आठवत असावें. सुंदर रूप ही निसर्गाची देणगी आहे, परंतु शरीर कमाविणें तर ज्याच्या त्याच्या हातीं आहे ना ? निसर्गानें ज्यांच्यावर कृपा केली नसेल त्यांनीं शरीर बांधेसूद करण्याचा तरी प्रयत्न करावा. अशा आदर्श शरीरांतील मनहि खंबीर आणि कसदार बनतें. म्हणून असले आदर्श नेहमीं डोळ्यांसमोर येत असले

पाहिजेत. या उद्देशानेंच श्रीमंत खंडेराव महाराजांचा हा पुतळा व ही इमारत येथें उभारली आहे.

ही भव्य व सुंदर इमारत वास्तुशास्त्रांत ज्यास 'इंडो-आर्यन' पद्धति म्हणतात तिला अनुसरून बांधली असून, तिच्या रचनेंत प्रमाणसौष्ठव व सुसंबद्धता—ज्यांची आपल्या नित्यव्यहारांत फार आवश्यकता असते त्यांचा सुंदर मिलाफ झाला आहे. सोळंकी वंशीय राजा सिद्धराज व तदनंतरचा राजा विशालदेव यांच्या कारकीर्दीत या पद्धतीचा परमोत्कर्ष झाला होता. त्या काळीं बांधलेलीं मंदिरें, प्राकार, जलाशय वगैरे गोष्टी आज बडोदें संस्थानांत डभोई, पाटण, सिद्धपूर वगैरे ठिकाणीं पाहावयास मिळतात. मंडईच्या इमारतीच्या मध्यभागीं असलेलें तोरण डभोई येथील हिराभागोळची आठवण करून देतें. तोरणावरील घुमट, त्याचें सायवान, त्याच्या दोहों बाजूंस असलेलीं उंच शिखरें, शिखरांच्या दोहों-बाजूंचीं विस्तृत व सुरम्य पाखीं, मंडईचें प्रमाणबद्ध आवार, त्याच्या समोरील तयार होऊं घातलेलें रमणीय उद्यान, यांनीं श्रीमंत खंडेराव महाराजांच्या या पुतळ्याची पार्श्वभूमि सजविली आहे.

असो, या महापुरुषाच्या नित्य दर्शनानें जनतेचीं मनें त्यांच्यासारखीं मोकळीं, निर्भय, खंबीर आणि शरीरें तेजस्वी होवोत.

## ४९

**स्थलः—बडोदें.**

**कालः—ता. २८ डिसेंबर १९३५.**

**विषयः—हिंदु धर्माची उत्क्रांति.**

सभ्य स्त्री-पुरुषहो,

गेल्या वर्षी आम्हांला अमेरिकेंत जागतिक धर्मपरिषदेंत अध्यक्षत्वाचा मान व आनंद हीं मिळालीं. आमच्या आयुष्यांतील अतिशय मनोवेधक अनुभवांपैकीं तो एक होता. कारण, त्या वेळीं एकाच छत्राखालीं सर्व धर्मांचे व संप्रदायांचे विद्वान जमा झाले होते.

जेथें आम्ही आमचें ज्ञान, श्रद्धा, अनुभव हीं पडताळून पाहण्याकरितां जमलों होतों, असें तें एक धर्मांचें पार्लमेंट होतें. आम्हांला आशा होती कीं, आमच्या

वादविवादांतून आम्ही खरींखुरीं धर्मतत्त्वें शोधून काढून, वैयक्तिक तसेंच सामुदायिक प्रश्नांचा निर्णय धर्माला कसा करतां येतो तें पाहूं शकूं.

संस्मरणीय असें तें संमेलन होतें आणि वैयक्तिक दृष्टीनें आमच्यावर परिणाम झाला तो असा कीं, सर्व धर्मांची मुख्य तत्त्वांच्या बाबतींत ऐक्यता आणि सतत अभ्यास व निर्भीड चर्चा यांची उपयुक्तता, या बाबतींत असलेलें आमचें मत दृढ झालें.

त्यानंतरच्या आमच्या प्रवासांत आणि अलीकडे हिंदुस्थान तसेच इतर देश यांत आढळणाऱ्या धर्मप्रवाहांचा अभ्यास करण्यात आम्हीं पुष्कळ काळ घालविला आहे. बुद्धिमान आणि अनुभवी विद्वानांना एकत्र करून, त्यांच्यापासून त्यांचे अनुभव आणि मतें हीं जाणून घेण्याचा, आम्हीं वेळोवेळीं प्रयत्न केलेला आहे.

आपल्या ज्ञानांत भर टाकण्याच्या हेतूनें, आपल्या समजुतीला दिशा लावण्याच्या इराद्यानें, अभ्यास करण्याच्या आपल्या वृत्तीला मदत करण्याच्या विचारानें आमच्या मनांतील आधुनिक विचारप्रवाह आणि त्यांवरील आमचे निष्कर्ष दर्शविणारी एक छोटीशी प्रवचनमाला आम्हीं तयार केली आहे.

यांपैकीं पहिल्या प्रवचनाचें नांव 'हिंदु धर्माची उत्क्रांति' असें आम्हीं पसंत केलें आहे. ज्या ज्या सद्‌गृहस्थांचा सल्ला आम्हीं घेतला त्यांचे, तसेंच प्रो. के. जे. सॉंडर्स, कीं जे आपल्या विद्वत्तेबद्दल तसेंच सहानुभूतीबद्दल प्रसिद्ध आहेत, यांनीं प्रवचनांत केलेल्या दुरुस्त्यांबद्दल त्यांचे आम्ही आभार मानतों.

हिंदु धर्म आणि त्याची उत्क्रांति यांकडे आम्ही आतां वळतों.

## गीता

सर्व संप्रदाय आणि सर्व पक्ष धर्मग्रंथ या नात्यानें भगवद्गीतेचा स्वीकार करतात. सर्व प्रकारचा उपदेश आणि आचार हीं अधिकारवाणीनें गीतेंतील श्लोकांतून सांगितलीं आहेत असें त्यांना वाटतें. गीता सर्वसंग्राहक आहे. तें एक उपनिषद् आहे. विशेषतः सामान्य जनांच्या उपयोगी पडणारें असें ज्ञान आहे. गेलीं दोन हजार वर्षें गीतेनें लक्षावधि लोकांना स्फूर्ति आणि समाधान हीं प्राप्त करून दिलीं आहेत. कर्मयोग, भक्तियोग आणि ज्ञानयोग, या तीन मार्गांचें विशदीकरण फार स्पष्टपणें आणि आकर्षकपणें तींत करण्यांत आलें आहे. पूर्वीच्या उपनिषदांतून आणि धार्मिक आचारांतून या सर्वांचा समावेश झालेला होता. तसेंच, बुद्धि-वासना-भावनांनीं निगडित अशा संपूर्ण जीवनाकरितां त्यांची जरूरी असलेली आढळेल. त्याचप्रमाणें धर्म, निःसंगता, निःस्पृहता, भक्ति यासंबंधींचा महत्त्वाचा उपदेश या ग्रंथांत

आहे. बहुजनसमाजाचें गीता हें उपनिषद् असून त्यांत संन्यस्त आयुष्यापेक्षां कर्तव्यमय आयुष्याला, संन्यासापेक्षां धर्माला, प्राधान्य दिलेलें आहे.

या महाग्रंथाचें पृथक्करण केलें असतांना असें आढळतें कीं, त्यांत अठरा अध्याय असून ते कर्म, भक्ति आणि ज्ञान अशा तीन विभागांत वर्गीकृत आहेत. अठराहि अध्यायांत स्थूलमानानें या तिन्ही गोष्टींचा विचार केला असला तरी पहिल्या सहा अध्यायांत कर्मावर, नंतरच्या सहा अध्यायांत भक्तीवर, आणि शेवटल्या सहा अध्यायांत ज्ञानावर भर दिलेला आहे. पहिल्या विभागांत श्रीकृष्णानें ' आसक्तीवांचून तुमचें कर्तव्यकर्म करा ' असें सांगितलें आहे :

**तस्माद् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर। अ. ३. १९**

दुसऱ्या विभागांत 'माझ्याबद्दलच्या सप्रेम भक्तीनें कर्म करा' असें सांगितलें आहे :

**सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः। अ. १८. ५६**

तिसऱ्या विभागांत 'ज्ञान हें भक्ति आणि कर्म याचें फळ होय' असें सांगितलें आहे :

**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः। अ. १८. ४६**

ज्यांनीं हें उच्च तत्त्व ओळखलें तेच संत होत.

सोळाव्या अध्यायांतील नैतिक उपदेश उल्लेखनीय आहे. खालील अवतरणें नमुन्यालायक आहेतः—

**अभयं सत्त्वसंशुद्धिः ज्ञानयोगव्यवस्थिति।**
**दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम्॥ अ. १६. १**

निर्भयता, मानसिक शुद्धि, अचलता, सत्यज्ञान, दान, इंद्रियदमन, धर्मग्रंथांचें पठन, तप आणि मनाची सरळता या गुणांचें वर्णन यांत आहे.

**अहिंसा सत्यमक्रोधः त्यागः शांतिरपैशुनम्।**
**दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम्॥ अ. १६. २**

अहिंसा, सत्य, शांति, त्याग, क्रोधाचा अभाव, निंदेचा अभाव, सर्व भूतांच्या ठिकाणीं दया, तृष्णेचा अभाव, नम्रता, आणि अहंकाराचा अभाव– याहि गुणांचा उल्लेख त्यांत आहे.

**तेजःक्षमा धृतिःशौचं अद्रोहः नातिमानिता।**
**भवन्ति संपदं दैवीं अभिजातस्य भारत॥ अ. १६. ३**

मनःसामर्थ्य, क्षमा, धीरता, शुद्धता, स्वार्थत्याग या गुणांनीं हे भारता, दैवी वृत्ति प्राप्त होते, असें या श्लोकांत सांगितलें आहे.

## मोक्षाचे तीन मार्ग

पुढील अवतरणें मोक्षाच्या तीन मार्गांचे दाखले होत. सामान्य माणसांकरितां गीतेमध्यें एक प्रकारची मोक्षाची शिडी निर्माण झालेली आहे. मनुष्याच्या आत्मीयत्वाचा संपूर्ण विकास करणाऱ्या धर्मशिक्षणाचा अभ्यासक्रमच जणूं काय शाळांकरितां यांत दर्शविला आहे. उच्च प्रतीच्या वैयक्तिक देवतेच्या भक्तीनें हें साध्य होईल. पण त्याकरितां भक्तीला आपण कर्माची जोड दिली पाहिजे.

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन । अ. २. ४७**

तुझें कर्तव्य कर्मांच्या ठिकाणीं आहे. फलाशीं तुला कांहीं करावयाचें नाहीं.

**नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।**
**शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ अ. ३. ८**

तुझें नेमलेलें कर्म कर. कर्मशून्यतेपेक्षां तें फार चांगलें. तुझ्या शरीराला आणि आत्म्याला त्याची जरूरी आहे.

**अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।**
**स संन्यासी च योगी च.........॥ अ. ६. १.**

फलाची अपेक्षा न करतां जो कोणी कर्म करतो, तोच खरा संन्यासी, तोच खरा योगी...

अशा तऱ्हेनें इच्छा किंवा वासना यांचा निरास केल्यावर, कर्मांची स्फूर्ति भक्तींत आढळेल:

**मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।**
**नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥ अ. ८. १५**

कर्तव्यकर्मांचा विचार तूं करूं नकोस. माझीच उपासना कर, आणि पापापासून मोक्ष मिळव. महात्मे मला प्राप्त करून घेतात, आणि जन्मापासून मुक्ति मिळवतात.

**ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् । अ. ९. २९**
**अपि चेत् सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मन्तव्यः............... अ. ९. ३०.**

जे माझी भक्तिपूर्वक सेवा करतात ते माझ्यांत समाविष्ट झालेले असून, मी त्यांच्यांत सामावलेलें आहें. अत्यंत दुराचारी मनुष्य देखील माझी सेवा करीत असेल, तर तो साधु आहे असेंच समजावें.

कर्म आणि भक्ति यांच्या या मार्गांनींच मनुष्याला ज्ञान प्राप्त होतें.

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् । अ. १३. ११**

परब्रह्माच्या चिंतनानेंच खरें ज्ञान आणि तत्त्वदर्शन होतें.

**परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।**
**यद् ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितोगताः ॥ अ. १४. १**

ज्यामुळें मुनिजनांना मोक्ष मिळाला तें सर्वोत्तम ज्ञान मी पुनः एकवार सांगेन.

दुसरे सुप्रसिद्ध उतारे खालीलप्रमाणें होत :

## कर्म

**नहि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ।**
**यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥ अ. १८. ११**

देहधारी जीवाला कर्मांचा सर्वस्वी त्याग करणें अशक्य आहे. जो कर्मापासून मिळावयाच्या फळांची अपेक्षा करीत नाहीं त्यानें कर्मत्याग केला, असें म्हणण्यांत येतें.

**अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम्**
**विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ॥ अ. १८. १४**

हातीं घेतलेल्या कामांत पांच गोष्टींमुळें यश मिळतें: अधिष्ठान किंवा जागा, कर्ता, साधन, कर्माची विविधता आणि पांचवें दैव.

## भक्ति

**सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ अ. १८. ६६**

ज्याला तूं धर्म समजतोस त्या सर्वांचा त्याग करून मला शरण ये. सर्व पापांपासून मी तुला सोडवीन. शोक करूं नकोस.

## ज्ञान

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।**
**तत् स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ॥ अ. ४. ३८**

ठाणें.



या जगांत ज्ञानासारखें पवित्र कांहीं नाहीं. ज्यांचीं कर्में शुद्ध आणि परिपूर्ण झालीं त्यांना यथावकाश ज्ञान प्राप्त होतें.

गीतेला आपण मुख्य ग्रंथ समजूं या. शब्दांनीं बांधलें न जातां त्यांत सांगितलेल्या तत्त्वांचा शोध लावूं या. शब्द आणि तत्त्व यांचा परस्पर विचार करून एकंदर आपल्या मनावर होणाऱ्या परिणामानें, एखाद्या ठिकाणीं चुकीचा भर दिला असल्यास तो सुधारून घेऊं.

उदाहरणार्थ, जरी श्रीकृष्णानें एके ठिकाणीं असें सांगितलें असलें कीं, मानव-प्राणी हे केवळ ईश्वराच्या हातचीं खेळणीं होत, तरी कर्मांवर जो भर गीतेंत दिला आहे त्यामुळें आणि सुखदुःखाबद्दल मनुष्याला जबाबदार धरल्यामुळें, तें म्हणणें खरें समजतां येत नाहीं.

दुसरें, वेदांती म्हणतात त्याप्रमाणें मायेचा अर्थ वस्तुमात्राची नश्वरता असा असल्यास, गीतेंत अशीं पुष्कळ स्थळें आहेत कीं, जेथें पदार्थाला शाश्वत समजलें असून जीवनाला अमृत मानलें आहे. खरें पाहिलें असतां जग हें मिथ्या नाहीं. परमात्म्याचा विचार करीत असतांना तसें वाटलें तरी या आत्म्यामुळेंच सर्वांना शाश्वततेचा अंश प्राप्त होतो; कारण तो सर्वांत आहे आणि वस्तुमात्राचा तो आत्मा आहे, जीव आहे. असें मानल्यानें मनुष्याला मोक्ष मिळतो.

गीता सर्वव्यापक आहे, याचा अर्थच वेगवेगळ्या संप्रदायांनीं वेगवेगळ्या तत्त्वांचा एकपक्षीय पुरस्कार केला किंवा कित्येक वेळां तीं तत्त्वें विकृत बनविलीं. उदाहरणार्थ, जातिसंस्था अभेद्य बनली; भक्ति वैषयिक ठरली; मायेनें जगाचें अस्तित्व नाकबूल केलें; ज्ञानी लोकांनीं ज्ञानावर भर देऊन अद्वैत पुढें ढकललें. सर्वांना देव बनविण्याचें अद्वैतांत भय असतें. उदाहरणार्थ, सर्वच देव बनल्यावर नैतिक बरेवाईटपणा शिल्लक राहात नाहीं. बहुजनसमाजाकरितां परमात्मा आणि आत्मा यांचें द्वैत दर्शविणारी भक्ति यांत आहे. भक्तींत एकाद्या विशिष्ट लहान देवतेलाच प्राधान्य मिळण्याचें भय असतें. भिक्षुकांनीं किंवा धर्मगुरूंनीं कर्मांला प्राधान्य दिल्यानें, कर्मकांड वाढून भिक्षुकशाही निर्माण झाली. क्षत्रियांना वीरकर्मांची चटक लागून त्याचा परिणाम इतरांबद्दलच्या तुच्छतेंत झाला.

चैतन्यासारख्या भक्तांनीं आणि इतर सामान्य मंडळींनीं भक्तीवर पाहिजे त्यापेक्षां जास्त भर दिला. अयोग्य देवतांच्या भक्तींत याचें रूपांतर होऊन, गीतें-तील श्रीकृष्णाचें पुराणांतील श्रीकृष्णांत, किंवा यज्ञानें कलीला प्रसन्न करण्याची वृत्ति वाढून अहिंसेला विसरण्यांत, या सर्वांचें रूपांतर झालें. देवरतीचें रूपांतर साध्या रतींत झाल्यावर त्याचा भलताच परिणाम होऊन, कांहीं चिन्हांचा शब्दशः अर्थ करण्यांत येऊं लागला. देवदासींचा वर्ग अशाच तऱ्हेनें निर्माण झाला. उपेक्षा या

सद्‌गुणाचाहि विपरीत अर्थ केला जाऊन, खून करतांना क्रांतिकारक लोक श्रीकृष्णाचा आधार दाखवूं लागले. धार्मिक प्रवृत्तीच्या सत्‌शिक्षकांवांचून, अशाच तऱ्हेनें भलत्याच गोष्टींवर भर दिला जाण्याचा नेहमीं संभव राहणार. काव्याचा गद्यासारखा अर्थ लावला जाणार.

हीच धर्माची दुःखान्त असलेली गोष्ट. निसर्ग आणि मानव यांच्या शक्तीं-पुढें अयशस्वी बनलेल्या हिंदी लोकांनीं संन्यासांत, किंवा देवांच्या काल्पनिक जगाच्या अद्‌भुत स्वप्नांत, मोक्ष मानला. याचेंच नांव अद्‌भुतवाद. आपणाला वास्तववाद हवा आहे. गीतेंत हे दोन्ही मार्ग आहेत. गीता म्हणते अदृश्य हें सत्य आहे. या बाबतींत प्लेटो आणि सेंट पॉल यांचें ऐक्यमत्य आहे. पण त्यांच्याचप्रमाणें गीता म्हणते कीं, जगांतील पाप हेंहि सत्य आहे, आणि मनुष्यानें अनंतत्वाचा विचार करून आजचीं कर्में करावींत.

ही शिकवण आज जवळजवळ विसरल्यासारखी झाली आहे. एकीकडे आहे वेदांतांतील अद्वैतावर आणि कूटतेवर भर, आणि दुसरीकडे कृष्णभक्तीवर. आपणाला मधल्या मार्गाची जरूरी आहे. आपणाला अशा ईश्वराची जरूरी आहे कीं, जो आपण निर्माण केलेल्या जगांत राहून, त्याला खरेंखुरें बनवितो; परंतु त्या जगामुळें श्रान्त बनत नाहीं. गीतेंत अशा ईश्वराचा उल्लेख असून, तो जेव्हां जेव्हां असत्याचा विजय होऊन सत्य सामर्थ्यहीन बनतें, तेव्हां तेव्हां अवतार धारण करतो.

गीतेंत एकाच वेळीं सांख्य, वेदांत आणि एकेश्वरवाद हीं आहेत. सर्व खरीं असणें शक्य नाहीं. एक खरें असल्यास, दुसरें खरें असणें शक्य नाहीं. एक ईश्वर असल्यास दुसरें एखादें शाश्वत तत्त्व असणें किंवा पुरुष व प्रकृति अशीं दोन अनंत तत्त्वें असणें शक्य नाहीं. परंतु गीतेंत हे सर्व पर्याय असून, अर्थ लावणाऱ्यांनीं काव्यमय गद्यांत त्यांचें रूपांतर केलें आहे.

या वेदान्त मतांपैकीं एकेश्वर अवतारवाद हा सर्वांत अधिक टिकण्याजोगा आहे. मनुष्याला मनुष्यत्वावरच भर दिलेला पटून तोच आवडणार.

मानवी जीवन आणि त्याच्या गरजा यांवर अधिक भर देण्याची हिंदुस्थानांत आवश्यकता आहे. जीवन ही चांगली वस्तु आहे. मनुष्यानें ध्येयपूर्वक संपूर्ण आयुष्य जगलें पाहिजे. आपल्या बंधूंना मदत करण्यांत मनुष्य ईश्वराचीच सेवा करीत असतो; देव हा सर्वांचा पिता असून, त्याच्या विशेष आवडींतलें असें कोणी नाहीं. मनुष्यांनीं परस्परांशीं भ्रातृभावानें वागलें पाहिजे. या व अशा प्रकारच्या तत्त्वांचा प्रसार होऊन तीं आचरण्यांत आणलीं गेलीं पाहिजेत. अशा तऱ्हेनें भक्ति आणि कर्म हीं ज्ञान किंवा यथार्थतत्त्वज्ञान यांची प्राप्ति करून देतील.

बुद्धापासून दयानंद सरस्वतीपर्यंत हिंदी धर्म सुधारक हे विशिष्ट तत्त्वांवर भर देण्यांत गुंतलेले आढळतात. सध्यां आपणाला अशा सुधारकांची जरूरी आहे कीं जो मध्यम मार्ग प्रकाशित करील. हा मध्यम मार्ग खालील तत्त्वांमधला असेलः—

( अ ) संशयवाद आणि अंधश्रद्धा

( आ ) धर्मप्रवणता आणि पाखंड

( इ ) परलोकवाद आणि इहलोकवाद

( ई ) रूक्षपद्धतीचा धर्म आणि क्रांतिकारक असा अधर्म

( उ ) पारलौकिक आकांक्षा अशा अर्थानें माया आणि आयुष्याची अयथार्थता दर्शविणारी माया.

या नव्या प्रकारच्या सुधारणेंत मानवी मूल्यांचा पुनरुच्चार करून ईश्वराच्या खऱ्या स्वरूपाला—सच्चित् आनंदाला प्रस्थापित केलें पाहिजे. परमेश्वर त्यानें निर्माण केलेलें जग खरेंखुरें बनवीत आहे असें समजलें पाहिजे; आणि मूर्तीमध्यें चांगले भाव दर्शविणाऱ्या, उदाहरणार्थ श्रीकृष्ण आणि त्याची मुरली यासारख्या मूर्ति, आणि वाईट भाव दर्शविणाऱ्या, उदाहरणार्थ लिंगासारख्या मूर्ति, कीं ज्यांत इंद्रियांवर अधिक भर दिलेला असतो, यांच्यांत भेद केला पाहिजे. आयुष्याचा चांगूलपणा आणि त्यांतील आनंद हीं धैर्यानें प्रस्थापित केलीं पाहिजेत.

**असतो मा सद्गमय ।**
**तमसो मा ज्योतिर्गमय ।**
**मृत्योर्माऽमृतं गमय ॥** —बृहदारण्यकोपनिषद्

( असत्यापासून सत्याकडे, अंधःकारापासून प्रकाशाकडे, मृत्यूपासून अमृताकडे. )

या प्रार्थनेचा चांगला अर्थ स्पष्टपणें समजाविला पाहिजे; व सत्य, ज्ञान, अमृत यांचा नैतिक दृष्टीनें अर्थ लावून त्यांचा आधुनिक जीवनाशीं संबंध जोडला पाहिजे.

उपनिषदांत सांगितलेला परमसत्य आणि परब्रह्म ह्यांचा उपदेश हा साध्या नैतिक तत्त्वांशीं निगडित आहे. परंतु आपणामध्यें व्यक्तिश्रेणी आणि व्यक्तीचीं मूल्यें यांचा अभाव आहे. जुनी परिस्थिति बदलत आहे, आणि जसा आपला देश नव्या आणि संकीर्ण स्वरूपाच्या आधुनिक जीवनांत प्रवेश करील, त्याप्रमाणें नव्या सामाजिक आणि वैयक्तिक नीतीची उद्घोषणा करणें आवश्यक आहे. जीवन हें सत्य आहे, मायिक नाहीं; चांगलें आहे, पापमय नाहीं. मनुष्यानें जगांत राहून

त्यांतील असत्य मोहापासून दूर राहिलें पाहिजे. उपनिषदांतील मर्म ओळखून तें आधुनिक गरजांना लावून पाहिलें पाहिजे. उदाहरणार्थ, मोक्ष याचा अर्थ ऐक्यमय आणि उपयुक्त जीवन असा लावला पाहिजे.

निःस्पृहपणें सत्याचा शोध लावला पाहिजे; निव्वळ गूढ अनुभवांचा शोध लावण्यांत फायदा नाहीं. चार आश्रमांत साठविलेलें सापेक्ष नीतितत्त्व हें चांगलें आहे, परंतु तें जातीच्या पोलादी चौकटींतून सोडविलें पाहिजे. उपनिषद् काळांतील स्त्रियांची बुद्धिमत्ता आणि स्वातंत्र्य, तसेंच मिश्रविवाहांना मिळालेली मान्यता, हीं आजच्या बदललेल्या जगांतहि आदर्शवत् आहेत. परंतु शहाणपणाची सुरुवात आणि शेवट त्यांतच आहे, असें समजून त्यांचा उपयोग करणें हें शहाणपणाचें ठरणार नाहीं. आणि खुद्द गीतेचाहि नवा अर्थ लावण्याची, आणि तिची नवी मांडणी करण्याची जरूरी आहे. आपल्या कित्येक प्रश्नांचा त्यांत उलगडा नाहीं; तसेंच ज्यांच्या शिक्षणाची आणि उन्नतीची आपणाला काळजी वाहावी लागते त्या स्त्रियांना गीतेंत पुरेसें स्थान नाहीं. भांडकुदळपणा आणि देशाभिमान यांचा आधुनिक कुरुक्षेत्रावर झगडा चालला आहे.

## २

## बुद्धाची शिकवण

दुसरीकडे पाहिलें असतां, बुद्धाच्या शिकवणुकींत शहाणपणा आणि नेमस्तपणा यांचा मध्यम मार्ग आढळतो. उपनिषदांत मूळ असलेल्या गीतेप्रमाणेंच शाक्यमुनीच्या मध्यममार्गांत धर्मप्रवणता व संशयग्रस्तता, ऐहिकता व तपश्चर्या, निर्बंधपरता व क्रांतिकारकता—हीं अंतिम टोकें वर्ज्य केलेलीं आहेत.

### दुहेरी मार्ग : ( अ ) सामान्यांकरितां

त्यांत दोन मार्ग सांगितलें आहेत—एक साध्या नीतीचा, व्यवहारांत पडलेल्या माणसांकरितां,— "सत्कर्म करा, पापापासून दूर राहा, मानसिक विचार शुद्ध करा." सत्कर्मानें दुष्कर्मांचा जोर कमी करावयाचा आणि मधून मधून तपश्चर्या करून सामान्य माणसांनीं आपली इच्छाशक्ति प्रज्वलित करून बुद्धाबद्दल आणि धर्माबद्दल प्रेम वाढवावयाचें.

एका जुन्या धर्मग्रंथांत सांगितलें आहे, "जो कोणी प्रेम आणि श्रद्धा यांनीं माझी भक्ति करील, तो स्वर्गांत जाईल."

हाच तो मार्ग, आणि सामान्य लोकांकरितां हेंच ध्येय असे. हा संस्थापक, यानें निर्माण केलेला धर्म आणि तयार केलेला संघ—यांबद्दल कृतज्ञताबुद्धि वागविणें यालाच बुद्ध धर्मांतील तीन रत्नें म्हणतात.

## (आ) भिक्षुकांकरितां

परंतु जगाला कंटाळलेल्या, जग मिथ्या समजणाऱ्या लोकांकरितां मोठें ध्येय असून तें खडतर मार्गानें प्राप्त करावयाचें असतें. "ज्याला निर्वाणाची–पुनर्जन्म व पाप यांपासून मुक्तीची– स्पृहा असेल, त्यानें आठ आर्य मार्गांचा अवलंब करावा." योगी लोकांकरितां ही शिडी होय; हिची सुरुवात सद्विचारांत झालेली असते व शेवट परमानंदांत झालेला असतो. पूर्वीच्या कोरीव लेण्यांतून शाक्यमुनि हा मोठा योगी किंवा ऋषि म्हणून दाखविला आहे. निर्वात जागीं असणाऱ्या दीपज्योती-प्रमाणें, तो डोळे मिटलेला व हात जोडलेला दाखविला आहे. दुसऱ्या कित्येक लेण्यांतून तो श्रीकृष्णाप्रमाणें उपदेश व उत्तेजन देणाऱ्या शिक्षकाप्रमाणें दाखविला आहे.

श्रीकृष्ण आणि शाक्यमुनि हे दोघेहि क्षत्रिय होते. आणि दोघांनींहि इंद्रियांच्या द्वारें, विचारशक्तीला विनविलें. अशा तऱ्हेनें बोधी किंवा ज्ञान याची प्राप्ति होते.

बौद्ध धर्मापासून हिंदु धर्मानें पुष्कळ गोष्टींचा स्वीकार केला आहे. अहिंसा उपेक्षा, संन्यास यांवर असलेला भर; तृष्णा हा मोठा शत्रु आहे, अशी जाणीव; आणि गुरुभक्ति; हीं बौद्ध धर्मांतून हिंदु धर्मांत आलीं आहेत. वस्तुतः बौद्ध धर्म हा उपनिषदें आणि गीता यांच्यामध्यें उभा असलेला आढळेल. उपनिषदांतून त्यानें यौगिक अनुभवाची कल्पना घेतली हेंच खरें सत्य होय. यांत मनुष्य आत्म्याशीं एकजीव होतो. नीतियुक्त आचरण आणि तपश्चर्या यांनीं हें प्राप्त करून घेतां येतें.

परंतु बुद्धानें दुसऱ्यापेक्षां पहिल्याच मार्गावर विशेष भर दिला. अशा तऱ्हेनें ब्राह्मणग्रंथांतून मिळणाऱ्या धड्यांपासून त्यानें उपनिषदांना मुक्त केलें. यज्ञानें नव्हे तर आत्मशुद्धीनें परमतत्त्व मिळवितां येतें.

### दोन मुख्य ग्रंथ

मठाधिष्ठित बौद्ध धर्माचा अभ्यास धम्मपदावरून करतां येतो. सिगालोवादसुत्त आणि इतर जातकें हीं सामान्य लोकांकरितां चांगलीं आहेत. या दोन मार्गांतील मुख्य तत्त्वें कोणतीं आहेत? हिंदु धर्मांतील गृहस्थांच्या कर्तव्यांप्रमाणेंच सामान्य माणसांचीं बौद्ध धर्मांतील कर्तव्यें आहेत. अशोकच्या शासनांतून यांचा उपयुक्त सारांश पहावयास सापडतो. उदाहरणार्थ, मातापितरांबद्दल प्रेम, गुरुजनांबद्दल आदर, सत्य-प्रीति, कर्तव्यतत्परता, परमतसहिष्णुता, आणि अहिंसा—या त्यांतील मुख्य गोष्टी होत.

भिक्षुकाला याव्यतिरिक्त आपल्या धंद्याप्रमाणें इतर कामें असत. उदाहरणार्थ, उपवास व तपश्चर्या करणें आणि उपदेश करणें, हीं त्याचीं मुख्य कामें असत.

व्यवहारांत बौद्ध धर्माचा अर्थ कामाची विभागणी असा करतां येईल. "भिक्षूनें उपदेश करावयाचा व सामान्य माणसानें त्याला कपडालत्ता देऊन खाऊं घालवयाचें." यांत अर्थातच अतिशयोक्ति आहे. सर्वांबद्दल दया आणि कोणाबद्दलच आसक्ति नसणें, ही जी बौद्ध धर्मातील मूलभूत भावना, तिचा सत्कर्मे करून चांगला पुनर्जन्म मिळवून देणाऱ्या पुण्याच्या कल्पनेनें, खून पाडल्यासारखें होतें. अतिशयोक्तीचा दुसरा प्रकार म्हणजे ब्रह्मचर्याच्या पावित्र्यावर जास्त भर देणें, आत्मशुद्धीस्तव मस्तक जाळून घेणें. निर्वाणाच्या मार्गातील या आत्मघातक गोष्टी होत.

निर्वाणाच्या कल्पनेंतील नीतीचा भाग नाहींसा होऊन त्याचा अर्थ केवळ जीवनाची संपुष्टता एवढा करण्यांत येऊं लागला. उत्तरेकडील संप्रदायाच्या स्वर्ग-कल्पनेप्रमाणेंच ही एक मानसिक विकृति होय. शाक्यमुनीनें दोन्ही टोकें वर्ज्य केलीं. हिंदु धर्माप्रमाणेंच बौद्ध धर्मानेंहि गांभीर्ययुक्त व प्रज्ञायुक्त अशा भविष्यकालविषयींच्या संशयाकुलवृत्तीचा स्वीकार केला. असें सुश्रद्धेकडे परत फिरलें पाहिजे. कार्यकारणभावानें चाललेल्या जगांत न्यायतत्त्वें या धर्मानें प्रसृत केलें. त्यानें कांहीं तत्त्वें प्रस्थापित केलीं. पाप आणि पुण्य यांचीं सारखींच फळें येत नाहींत. जसें पेरावें तसें पीक येतें. "एकच गोष्ट मी तुम्हांला शिकवितों– दुखःनिवृत्ति ज्याला कु-देवता किंवा कु-दानव त्रास देऊं शकत नाहीं, तोच सुखी मनुष्य होय. आपला मोक्ष आपणच मिळविला पाहिजे"—या शिकवणींत बौद्ध धर्माचें सार आहे.

मुळांत ज्या वाईट गोष्टींविरुद्ध शाक्यमुनीनें तक्रार केली त्याच आज बौद्ध धर्मात आढळतात. आणि आज एक तर रूक्ष पद्धतीचा बौद्धिकवाद किंवा ग्रंथरक्षण व अनेकदेवतावाद हीं बौद्ध धर्माचीं स्वरूपें होऊन बसलीं आहेत.

पण आजहि बुद्धाची शांत, पवित्र, अधिकारयुक्त, दयाशील मूर्ति आपणा-समोर आहेच. आणि बुद्ध व त्याचा मार्ग हीं आजहि आपणाला त्याच्या धर्मग्रंथांच्या रानांतून शोधून काढतां येतील. बुद्ध स्वतःला लोकांचा मोठा बंधु– लोकस्स सेट्ठो जेट्ठो–म्हणवीत असे. त्यानंतरच्या काळानें त्याला देवाधिदेव बनविला. थोर अनुभव असलेला तो एक योगी होऊन गेला; परंतु पंडितांनीं त्याला बुद्धिवादी बनविला, ज्याप्रमाणें त्यानें बुद्धीची आराधना केली, त्याचप्रमाणें श्रद्धेचीहि केली. आणि इच्छाशक्तीला आव्हान देत असतांना, त्यानें भावनांचा कधींच तिरस्कार केला नाहीं. बुद्ध ही एक मोठी विभूति होऊन गेली. व्यक्तित्वाचा विकास त्यानें खूप केल्यानें बौद्धधर्मीय संतहि चारित्र्यानें थोर निघाले. अहंकारावर हल्ला करीत असतांना, बुद्धानें व्यक्तिमत्वाचा नाश केला असा आरोप त्याच्यावर करण्यांत आलेला आहे. धर्म पाखंडांविरुद्ध बंड पुकारीत असतांना, त्याला नास्तिक ठर-विण्यांत आलें होतें. परंतु स्वतः बुद्धाची वृत्ति धर्मप्रवण होती. न्यायी जगावर

त्याचप्रमाणें शहाणपणानें व नेमस्तपणानें चालणाऱ्या मानवी शक्तीवर त्याचा विश्वास असे. हिंदुस्थानचा तो एक थोर पुत्र व आशिया खंडाचा तो एक पाठीराखा होऊन गेला. पाश्चात्य देशांनीं प्राच्य देशांना समजून घेण्याची गुरुकिल्लीच त्याच्या ठिकाणीं आहे.

## ५०

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. १ जानेवारी १९३६.

**प्रसंग:**—ग्राम-जीवन प्रदर्शन.

अध्यक्ष, प्रदर्शन-समितीचे सदस्य आणि सभ्य स्त्री-पुरुषहो,

आमच्या हीरकमहोत्सवाच्या समारंभाबरोबर ग्राम-जीवन प्रदर्शन भरविण्याच्या कल्पनेइतका दुसरा आनंदाचा विचार आमच्या मनांत आला नसता. यापूर्वी उद्योग, शेतकी, घरगुती काटकसर, यांसंबंधींचीं प्रदर्शनें भरलीं असलीं, तरी बडोदें संस्थानच्या सर्व प्रश्नांचा विचार व्यक्त करणारें हें पहिलेंच प्रदर्शन होय. ही अगदीं योग्य आणि स्वाभाविक अशी परिणति असून, ज्या उत्तम तऱ्हेनें संस्थापकांनीं आपल्या मनांतील आक्रमणशील विचारांना मूर्त स्वरूप दिलें त्याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतों.

आमच्या सर्व कारकीर्दीत आम्हीं खेड्यांतील प्रश्न आणि शेतकरी, यांचा विचार कधींहि मनांतून काढलेला नाहीं. या बाबतींत आम्हीं पुनर्घटना व प्रगति करण्याकरितां उत्तम साधनांचा अवलंब केला आहे. आपल्या सामाजिक, नैतिक व आर्थिक परिस्थितींत कोणत्या सुधारणा घडवून आणणें शक्य आहे, हें लोकांना पटवून देणें आणि स्वतःच्या प्रगतीकरितां त्यांच्या मनांत इच्छा उत्पन्न करणें, हें आमचें स्थूलमानानें या बाबतींत धोरण आहे. मूळ स्फूर्ति आणि पैसा हा सरकारकडूनच आला पाहिजे हें खरें असलें तरी, आपला उत्कर्ष करून घेण्याऱ्या व्यक्तीच्या निश्चयावरच सर्व यश अवलंबून असतें.

आम्हीं जेव्हां जीवितकार्याला सुरुवात केली त्या वेळीं आशाजनक परिस्थिति मुळींच नव्हती. आमच्या बाल्यावस्थेंत आर्थिक बाबतींत कांहीं सुधारणा घडवून आणण्यांत आल्या होत्या, परंतु मुख्य प्रश्न तसेच राहून गेले होते. शिक्षण

ही वतनदारांची व श्रीमंतांची ठेव समजली जाई, आणि बहुजनसमाज उपेक्षावृत्ति आणि अज्ञान यांत खितपत पडलेला असे. नगरस्वच्छतेच्या कल्पना लोकांना नव्हत्या. आणि पाण्याचा तुटवडा होता. लोकांची राहणी अगदीं खालच्या प्रतीची असून, कर अव्यवस्थित व अयोग्य असत. रोगराई आणि सावकार यांचा उत्कर्ष होऊन, शेतकी आणि ग्रामोद्योग हे रसातळाला गेले होते.

आमच्या राज्यांत साठ वर्षांपूर्वी काय परिस्थिति होती त्याचें आम्हीं खेदजनक चित्र रेखाटलें असलें तरी, दारिद्रय आणि उदासीन वृत्ति या बाबतींत आम्हीं मुळींच अतिशयोक्ति केलेली नाहीं. त्या वेळीं अडचण होती ती कोठून सुरुवात करावी याची. कारण पहिलेंच पाऊल फार महत्त्वाचें होतें. सामाजिक आणि आर्थिक पुनर्घटना करण्याकरितां शिक्षणाचा खडक आम्हीं पसंत केला. किती करावयाचें बाकी उरलें आहे, याची कल्पना आमच्याइतकी क्वचित् कोणाला असेल. परंतु शिक्षण मिळविणें हा गरीबांतील गरीबाचा हक्क आहे. या बाबतींत केलेल्या आमच्या निश्चयाबद्दल आम्हांला कधींहि वाईट वाटलेलें नाहीं. या निश्चयाबरोबरच, खेडेगांवांतून जाऊन खऱ्याखुऱ्या परिस्थितीची स्वतःकरितां माहिती मिळविण्याचा, दुसरा निश्चय आम्हीं केला.

भूतकालांतील पीछेहाटीसंबंधानें किंवा प्रगतिशून्यतेसंबंधानें कारणें शोधून काढण्याची गरज नाहीं. तसेंच सुदृढ शरीर आणि सुदृढ मन, सहकार वृत्तीवर उभारलेलें सामुदायिक जीवन, इत्यादि ध्येयें गांठण्यासाठीं उपयोजावयाच्या गोष्टी सांगायला आमच्याजवळ वेळ नाहीं. असले प्रयत्न सर्व ठिकाणीं जरी यशस्वी झाले नाहींत, तरी त्यामुळें आम्ही थबकलों नाहीं. अडचणी या उल्लंघावयाच्याच असतात आणि ध्येयप्रसाधन करीत असतांना सामान्य धक्के हे क्षुद्र वाटतात.

अज्ञान, पूर्वग्रह, उपेक्षावृत्ति यांच्या एकत्रित शक्तीसमोर शिक्षणाच्या साहाय्यानें आपण बऱ्यापैकीं प्रगति करूं शकलों. परंतु शिक्षण केवळ पुरेसें नव्हतें. आपण आणि आपली परिस्थिति सुधारावयाची इच्छा आर्थिक बंधनांनीं बांधलेल्या मनुष्याच्या मनांत उत्पन्न करणें, हें निरुपयोगी होय. आणि बडोदें संस्थानांत त्याच-प्रमाणें इतरत्र मुख्य प्रश्न आहेत ते आर्थिक स्वरूपाचे आहेत. आपण निर्माण केलेला माल न्यावयाला वाहतुकीचीं साधनें नसतील, त्याला चांगली किंमत येत नसेल, किंवा चांगली किंमत येऊनहि मधलाच मनुष्य किंवा सावकार त्यामुळें गबर होत असेल, तर चांगला माल निर्माण करण्यापासून मनुष्याला फायदा काय? रोगराई आणि दुष्काळ हीं आपल्या श्रमाचीं फळें नाहींशी करणार आहेत असें कळल्यावर, चांगलें पीक काढण्याकरितां शेतकऱ्यानें कां श्रमी व्हावें?

वर उल्लेखिलेले प्रश्न हे खरे व सयुक्तिक असून, आम्हांला त्यांचीं उत्तरें

द्यावयाचीं होतीं. पाणीपुरवठ्याचा आणि वाहतुकीच्या साधनांचा आम्हीं प्रथम विचार करून, संस्थानांत रेल्वेचें जाळें पसरलें आणि अखंड पाणी मिळण्याची व्यवस्था ठिकठिकाणीं केली. कालइतक्याच पुरातन शेतकीच्या पद्धतींत आधुनिक सुधारणा उपयोजणें दुर्घट होतें. चालत आलेल्या रूढींचा ज्याप्रमाणें यांत विचार कर्तव्य होता, त्याचप्रमाणें शेतकऱ्याला नवीन उपकरणें खरेदी करतां येतील कीं काय, याचाहि विचार करणें प्राप्त होतें. विकतां आल्यावांचून मनुष्याला विकत घेतां येत नाहीं. आयुष्यांतील मुख्य मुख्य जरूरीच्या वस्तूंना चांगली किंमत आल्यावांचून, उत्तम राहणी आणि आजची सुधारलेली शेतकी, यांचा मनुष्याला आग्रह करतां येत नाहीं.

कर्ज देणें, तगावी देणें, जमिनीचे बारीक तुकडे होण्याचें थांबविणें, सहकारी पतपेढ्या काढणें—या व अशा मार्गांनीं आम्हीं शेतकऱ्याला कर्ज-बंधनांतून तसेंच दुष्काळ आणि पीक-नासाडी यांच्या भीतीपासून मुक्त करायला सुरुवात केली, आणि प्राथमिक शिक्षणानेंहि बळावणाऱ्या सुरक्षिततेच्या भावनेनें आणि विशाल दृष्टीनें आत्मविश्वासाचीं आणि स्वतःच्या हिमतीवर कार्य करण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं. करकर होत असली तरी चक्रें फिरूं लागलीं होतीं.

परंतु सुबत्तेच्या काळांतहि हिंदुस्थानांत शेतीचीं फळें अपुरींच असतात. लोकांच्या उत्पन्नांत भर घालण्याच्या इराद्यानें, रिकामपणच्या वेळांत उद्योगाचे मार्ग शोधून काढणें आणि वाढलेल्या प्रजेकरितां कांहीं सोयी शोधणें जरूरीचें होतें. शेतकी आणि औद्योगिक पद्धतींशीं संलग्न अशा प्रकारची आमची शिक्षण-पद्धति आम्हीं बनविली. खेड्यांतून आम्हीं जुनें हुन्नर पुनरुज्जीवित करून नवीं कार्य-क्षेत्रें निर्माण केलीं, धंदेशिक्षण सर्वांना मिळेल अशी व्यवस्था केली, शिक्षणाचीं केंद्रें आणि फिरते शिक्षक यांच्या साहाय्यानें तसेंच द्रव्याच्या मदतीनें विणणें, कातणें, छाप पाडणें, रंगविणें, चासडीं कमविणें, लाकूडकाम, मातीकाम, धातुकाम, विणकाम आणि इतर साहाय्यभूत कला इत्यादीविषयीं लोकांच्या मनांत आवड उत्पन्न केली.

पुनर्घटनेची व प्रगतीची स्थूल स्वरूपाची योजना ही खरोखरीच यशस्वी असून तिच्याकडे सतत लक्ष पुरविलें पाहिजे. आपल्या इच्छेप्रमाणें पूर्वीच्या काळीं, रस्ते बांधणें शक्य नव्हतें. परंतु आपल्या संस्थानांत रेल्वेच्या जोडीलाच रस्ते बांधणी-चें काम चाललें असून तें परस्परपूरक झाल्यास आपणाला, तसेंच जवळच्या हद्दींना उपयोगी पडेल. ग्रामीण कर्जांचा बोजा कमी व्हावा म्हणून गेल्याच आठवड्यांत आम्हीं एक योजना ठाम केली. आम्हांला आशा आहे कीं, आपल्या अवघड प्रश्नांचा निकाल या रीतीनें होऊं शकेल. दुसऱ्या आमच्या योजनेप्रमाणें संस्थानभर शारीरिक शिक्षण व खेळ यांचें वातावरण पसरेल. प्रगतीचीं आणि चांगल्या परिणामाचीं सुचिन्हें आधींच दिसूं लागलीं आहेत. परंतु सुदृढ शरीराला आणि मनाला

फायदेशीर करमणुकीचीहि जरूरी असते. दुसऱ्या ज्या एका गोष्टीकडे आम्हांला लक्ष द्यावेंसें वाटतें ती म्हणजे रेडियो. मनोरंजन आणि शिक्षणाच्या बरोबरच शीलसंवर्धन व विचारप्रवर्तन या योजनेनें होईल.

आमच्या मनांत सदैव असणाऱ्या प्रगतीच्या या उपयुक्त उदाहरणावरून, विशिष्ट प्रकारच्या ध्येयाची वर्षांनुवर्षें प्रयत्नपूर्वक जोपासना करण्याची कशी आवश्यकता असते हें दिसेल. प्रत्येक पाऊल उपयोगी असते आणि आजपर्यंत प्रगति चांगली झाली, त्याचें बाह्य चिन्ह म्हणून या प्रदर्शनाकडे आम्ही पाहतों. तें इतकें मनोरंजक आहे कीं, ज्यांना त्यापासून खरा फायदा होऊं शकेल अशांपैकीं फक्त फारच थोडे तें बघूं शकतील हें पाहून वाईट वाटतें. परंतु पिकाच्या हंगामाच्या वेळीं, तसेंच सणवारांच्या दिवशीं, प्रांतांत प्रमुख ठिकाणीं असलीं प्रदर्शनें लहान प्रमाणावर वारंवार कां होऊं नयेत, याचें कारण आम्हांला समजत नाहीं. फळें, फुलें, शेतकी यांचीं प्रदर्शनें इतर देशांत नेहमीं भरविलीं जातात. बडोदें संस्थानांतहि हा वार्षिक कार्यक्रम कां होऊं नये तें आम्हांला समजत नाहीं.

असल्या हितकारक चळवळी येथेंच थांबवाव्यात असें आम्हांला वाटत नाहीं. प्रत्येक प्रांतांत वर्षभर सतत फिरणारें असें प्रदर्शन असावें. इतर देशांत असलेल्या परसांतील बगीचांची गोष्ट आपल्या नजरेसमोर आम्ही आणूं इच्छितों. रिकामपणाच्या वेळांत असल्या बगीचांतून चांगलें काम होऊन, त्यानें घराच्या शोभेबरोबरच उत्पन्नाचीहि वाढ होते. याचप्रमाणें कोंबड्या पाळण्याचा धंदाहि खेड्यांतून करण्याजोगा आहे. माल खपविणें ही अडचणीची गोष्ट आहे, हें आम्ही जाणतों. याकरितां आम्हीं दोन अधिकारी अभ्यास करून या प्रश्नांचा उलगडा करण्यास्तव नेमले आहेत. परंतु बिनसरकारी लोकांच्या प्रयत्नानें व सहकारानेंहि पुष्कळ करतां येण्याजोगें आहे.

असल्या चळवळी या प्रामुख्यानें बिनसरकारी असावयाला हव्यात. आमच्या, मतें असल्या चळवळींत सुधारणा करावयाला पुष्कळ अवसर असतो. आदर्श स्फूर्ति व आर्थिक मदत—या दृष्टींनीं सरकारला पुष्कळ करतां येण्याजोगें आहे. आम्हांला योग्य रीतीनें असें म्हणतां येईल कीं, आमच्या सरकारनें प्रजेच्या उन्नती करितां आणि उत्कर्षाकरितां शक्य तितके प्रयत्न केले आहेत. आमचें सर्व आयुष्य आम्हीं या ध्येयप्राप्तीकरितां खर्चिलें आहे. परंतु जोंपर्यंत स्वावलंबनाची खरी आवड उत्पन्न होऊन सरकारच्या प्रयत्नांना वैयक्तिक व बिनसरकारी प्रयत्नांची मदत मिळत नाहीं तोंपर्यंत सर्व फुकट जाण्याचा संभव आहे.

जे स्वतः प्रयत्न करतात, त्यांनाच परमेश्वर पावतो, हें म्हणणें शहाणपणाचें आहे. बडोद्यांत, तसेंच हिंदुस्थानांत स्वार्थत्यागपूर्वक सेवाधर्म लोकांना पटून

अडचणींतून पार होण्याचा निश्चय लोकांच्या ठिकाणीं आढळत आहे. एका प्रांतांत ग्राम-पुनर्घटना मंडळ असून तें सर्वस्वीं बिनसरकारी आहे. प्रत्येक प्रांतांत असलीं मंडळें असायला हवीं. अधिकारांबरोबर जबाबदाऱ्या येतात, आणि त्या उचलल्या पाहिजेत असें असूनहि, शहर-सुधराई, रस्ते बांधणें, पाणी-पुरवठा यांसारख्या उपयुक्त गोष्टींकरितांहि कर बसविण्याची पाळी आली असतांना ते देण्याची नाखुषीच लोकांत आढळते.

सरकारच्या प्रयत्नांना नेहमीं मर्यादा असणारच; परंतु आमची अशी खात्री आहे कीं, जेथें सुदृढ, स्वावलंबी, आत्मप्रत्ययी प्रजा आपल्या कल्याणाकरितां निश्चय करून सरकारला मदत करायला तयार असेल तेथें शांतता, प्रगति, उत्कर्ष यांना सीमा घालतां येणें शक्य नाहीं. अशा तऱ्हेनें सामाजिक पुनर्घटना आणि ग्रामोन्नति हीं परस्पर सहकार्यानें प्राप्त होण्याजोगीं आहेत. आपल्या ध्येयांत आणि आपणांत ऐक्यता असेल तर आपणाला कोणाचीहि भीति बाळगण्याचें कारण नाहीं.

आमच्या हीरकमहोत्सवाच्या बरोबर भरविण्यांत आलेल्या या ग्राम-जीवन-प्रदर्शनाकडे पाहून आणि याच बाबतींत आज कित्येक वर्षांचे आमचे विचार आणि योजना यासंबंधीं चार शब्द बोलायला मिळाल्याबद्दल आम्हांला फार आनंद वाटतो. प्रदर्शनाच्या उद्दिष्टाशीं आणि ध्येयाशीं आम्ही पूर्णपणें एकजीव आहोंत. लोकांच्या गरजा, त्यांचीं कार्यें, त्यांना मिळणाऱ्या संधि, त्यांच्या रोजच्या आयुष्या विषयींचें सुंदर चित्र, हीं इतक्या प्रयत्नपूर्वक या प्रदर्शनांत दाखविण्यांत आलीं त्याबद्दल चालकांचे आम्ही अंतःकरणपूर्वक आभार मानतों. आम्ही मोठ्या अभिमानानें आणि आनंदानें हें प्रदर्शन खुलें केल्याचें जाहीर करतों.

## ५१

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—तारीख १ जानेवारी १९३६.

**प्रसंग: —ग्राम-जीवन प्रदर्शन.***

अध्यक्ष, कर्नल आणि मिसेस् विअर, औंधचे चीफसाहेब आणि मित्रहो,

श्री. नानावटी यांनीं या प्रदर्शनासंबंधीं सर्व बाबी चांगल्या समजावून सांगितल्या. हें प्रदर्शन यशस्वी करून दाखविण्याच्या कामीं जी पुष्कळ मेहनत व्यवस्थापकांनीं घेतली तिच्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतों.

* अंक ५० च्या छापील भाषणाउपरान्त ऐनवेळीं दिलेलें व्याख्यान.

या संध्याकाळीं आम्ही मोठें भाषण आपणावर लादणार नाहीं. तसेंच आमचें सबंध छापील भाषण वाचून आपणाला येथें फार वेळ थांबविण्याचीहि आमची इच्छा नाहीं. संस्थानचे एक कर्तबगार अधिकारी श्री. नानावटी यांनीं उल्लेखिलेल्या एक-दोन मुद्द्यांविषयींच आम्ही थोडेसें सांगूं. युरोप आणि अमेरिकेमध्यें अर्थशास्त्र आणि पेढीशास्त्र ( बँकिंग ) शिकण्याकरितां पाठविलेल्या तरुण अधिकाऱ्यांपैकीं ते एक आहेत. हिंदुस्थानांत आल्यापासून त्यांनीं संस्थानाकरितां चांगली कामगिरी केली आहे. लोकांच्या आर्थिक प्रगतीकरितां त्यांनीं घेतलेल्या श्रमाबद्दल आनंद व्यक्त करण्याची ही संधि आम्ही घेतों.

राष्ट्राची प्रगति एखाद्या वेळीं द्रुतगतीनें तर एखाद्या वेळीं हळू अशी होत असते. परंतु हिंदुस्थानांत ती सदैव हळूच असते. व्यावहारिक जीवनांत आपण बोलण्यापेक्षां व्यवहाराकडे, अनुभवाकडे विशेष पाहिलें पाहिजे. आपलीं ध्येयें साध्य करण्याकरितां हिंदुस्थानांतील लोकांना सहानुभूतीची, ज्ञानाची आणि सतत उत्तेजनाची जरूरी आहे. आहे त्या परिस्थितींत असें दिसतें कीं, पुस्तकी ज्ञानाचा बुजबुजाट असून प्रत्यक्ष वस्तुस्थितीशीं सामना देण्याची तयारी नाहीं. उदाहरणार्थ, मला अशा प्रकारचे सामाजिक कायदे पास करावे लागले कीं ज्यांचा सुधारलेल्या राष्ट्रांत विचारहि करण्याची आवश्यकता नाहीं.

आर्थिक प्रश्नांच्या बाबतींत आम्हीं शक्य तितके प्रयत्न केले असून, आम्हांला मिळालेलें फळ निरुत्साहजनक नाहीं. बडोदें संस्थान हें निरनिराळ्या ठिकाणीं पसरलेलें असल्यामुळें आणि त्याच्या सीमा परकीय संस्थानांच्या सीमांना भिडल्यामुळें, बडोद्याच्या अडचणी कांहीं विशिष्ट स्वरूपाच्या आहेत. अशी परिस्थिति नसती तर निराळाच परिणाम दिसला असता.

आपण सर्वजण एक गोष्ट कबूल कराल कीं, सर्व गोष्टी एकाच व्यक्तीच्या आयुष्यांत किंवा लहानशा कालमर्यादेंत होऊं शकत नाहींत. त्याकरितां शेंकडों वर्षांची जरूरी असते. परंतु आपण सावकाशपणें अनेक वर्षें काम केल्यास, आपल्या प्रयत्नांचें स्वरूप आणि दिशा, हीं इतर लोकांनाहि प्राप्त होतात. लोक पुरेसे बुद्धिमान् असल्यास त्यांना काम करण्याची खरी किंमत कळते. गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत स्थूल स्वरूपाचें शिक्षण सर्वांना मिळालेलें आहे. रेडिओ, टेलिफोन, वृत्तपत्रें या व इतर आधुनिक साधनांच्या द्वारें आपला इतर प्रागतिक देशांशीं संबंध जोडला गेला आहे. आपणांला पुरेसें उत्तेजन मिळालें असूनहि आपणाला जर अडचणी दूर करतां येत नसतील तर आपण जगांत टिकूंच शकणार नाहीं. यांत तुमचेंच दुर्दैव आहे, आणि त्याचा दोष तुमच्यावरच आहे.

आम्हांला आमच्या एका मित्रानें नुकतेंच विचारलें कीं, सध्यांचे महाराज

जेव्हां नसतील त्या वेळीं बडोदें संस्थानचें काय होईल? त्या प्रश्नाला आमचें उत्तर असें कीं, लोकांच्या इच्छा आणि राज्यकर्त्यांचा शहाणपणा यांवर सर्व कांहीं अवलंबून राहील. जर पाया चांगल्या प्रकारचा तयार झाला असेल तर भीतीजोगें कांहींच उरणार नाहीं आणि प्रगति चालू राहील.

दुर्दैवानें, आम्हीं सांगितल्याप्रमाणें कार्य करण्याऐवजीं सिद्धांतप्रतिपादन करण्याकडे लोकांचा अधिक कल आहे. लोकांच्या उन्नतीकरितां ज्यांच्याकडे जबाबदारीचीं कामें सोपविलेलीं असतात, ते महत्त्वाच्या गोष्टी सोडून दिखाऊ गोष्टींकडे लक्ष पुरवितात. कागदी राज्यघटना या कागदावरच शोभतात. आपल्या सोयीप्रमाणें शब्दांचा छल करणाऱ्या वकिलांचा त्यामुळें फायदा होतो. आपल्या उणीवांबद्दल कित्येक धर्माला दोष देतात. या लोकांचा युक्तिवाद आम्हांला माहीत आहे. या बाबतींत आमचें उत्तर असें कीं, हिंदु धर्मांत जर कांहीं दोष असतील, तर त्याचबरोबर त्यांत कांहीं गुणहि आहेत. आपल्या धर्मांत शिकविलेल्या कित्येक साध्या तत्त्वांचा आपण पुनरुद्धार करूं शकलों, तर असल्या युक्तिवादाची कांहीं जरूरी पडणार नाहीं.

दुसरा एक मुद्दा अपुरा समजला जातो तो हा कीं, राजा आणि प्रजा हे एक आहेत. त्यांचे हितसंबंध एक आणि अविभाज्य आहेत. राजा आणि प्रजा यांच्यांतील संबंध बिघडविण्याचा प्रयत्न कित्येक कुविचारी आणि स्वार्थी लोक खुशाल करोत. परंतु साधी गोष्ट ही आहे कीं, उत्कर्षांत आणि अपकर्षांत त्यांचे हितसंबंध एकच असतात. गैरसमज आणि अयोग्य सांगणी हीं आमच्या मतें शिक्षणानेंच नाहींशीं होतील. निरोगी मनाबरोबर निरोगी शरीराची आणि हळूहळू येणाऱ्या नागरिक वृत्तीची वाढ होईल.

सभ्य स्त्री-पुरुषहो, आज आपण येथें हजर राहिल्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोंत. आपल्या सहनशक्तीची अधिक परीक्षा पाहण्याची आम्हांला इच्छा नाहीं. त्यामुळें आमच्या छापील भाषणांत, आम्हांला प्रिय असलेल्या ग्रामपुनर्घटनेसंबंधानें जे विचार प्रदर्शित करण्यांत आले आहेत, त्यांवर आपल्या विश्रांतीच्या वेळांत विचार करण्याविषयीं आम्ही विनंति करतों.

दुर्दैवानें, आम्ही आज चालूं शकत नसल्यामुळें प्रदर्शनांत फिरण्याचें काम आम्हांला पुढें ढकलावें लागत आहे. परंतु आपण तें कराल, आणि आपणाला तें मनोरंजक व सर्वव्यापी वाटेल अशी आम्हांला आशा आहे. आपण दाखविलेल्या सहनशक्तीबद्दल आपले आणि हें प्रदर्शन इतकें चांगलें भरविल्याबद्दल कार्यकर्ते व प्रदर्शक यांचे आम्ही पुनः एकदां आभार मानतों.

## ५२

**स्थल:—बडोदें.**

**काल:—ता. १ जानेवारी १९३६.**

**प्रसंग:—श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज यांच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव. महाराजांचा संदेश.**

आमच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव सर्व संस्थानभर साजरा होत असतांना, या आनंददायी प्रसंगाच्या स्मरणार्थ, एक कोटि रुपयाचा निधि 'हीरकमहोत्सव ट्रस्ट' या नांवानें दूर काढून ठेवून, त्याच्या व्याजांतून लोकांची परिस्थिति सुधारण्याचीं कामें, विशेषत: गरीब आणि दलित वर्गांची स्थिति सुधारण्याचीं कामें, सरकारी अंदाजपत्रकांत या कामीं असलेल्या व असणाऱ्या रकमेव्यतिरिक्त केलीं जातील, हें आम्ही जाहीर करतों.

२. आपणाला माहीत असेलच कीं, पंचावन्न वर्षांहून अधिक कालपर्यंत ग्रामीण प्रगतीच्या कामाप्रीत्यर्थ आम्हीं पुष्कळ प्रयत्न केले आहेत. वस्तुत: या कार्याहून आमच्या अन्त:करणाला प्रिय असें दुसरें कार्य नाहीं. ग्रामजीवनाच्या सर्व बाजू सुधारण्याचें आमचें ध्येय आहे. आमच्या प्रजेंत उच्च जीवन कंठण्याची इच्छा, उच्च जीवनाची मनीषा—आणि स्वावलंबन व स्वाश्रय, वाढविण्याची आमची इच्छा आहे. ग्रामजीवन सुखद बनविण्याची व शेतकी हें उद्योगधंद्याचें उत्तम साधन—कीं ज्याचीं फळें धाडसी शेतकऱ्यांनाहि आनंद देतील, असें करण्याची आमची मनापासून इच्छा आहे. या योजनेंत आम्हीं ठरविलेले मुख्य मार्ग आपणाला विदितच आहेत. परंतु अत्यंत साध्या भाषेंत आम्ही ते सांगतों.

३. (१) प्रथम, सर्वांना सक्तीचें शिक्षण दिलें जातें. सर्व प्रगतीच्या मुळाशीं हें आहे. १८९३ सालीं प्रथम अमरेळीमध्यें सुरू केलेली ही योजना, गेल्या कित्येक वर्षांपासून सर्व संस्थानभर मुलांमुलींकरितां चालू ठेवण्यांत आली आहे. आज संस्थानांत ६,५०० वर शिक्षक लोकांना शिक्षित बनवीत आहेत; प्राथमिक शिक्षणाला 'शेतकीचें' अंग असेल असे प्रयत्न चालू आहेत. हेतु हा कीं, शहराकडील 'धांव' कमी करावी. खेड्यांतील जीवनांत शिक्षकानेंहि भाग घ्यावा, असें आमचें उद्दिष्ट आहे. या कल्पनेनुसार, शिक्षणानुभव—पाठशाळेंत ग्रामीण प्रश्नांविषयीं शिक्षण दिलें जातें.

( २ ) शेतकऱ्यांच्या साक्षरतेचें रूपांतर पुढें निरक्षरतेंत होऊं नये म्हणून संस्थानभर प्रौढ लोकांना ज्ञान देण्याकरितां ग्राम-पुस्तकालयांचें जाळें विणलें आहे.

४. दुसरें, ग्राम-पंचायती स्थापन करणें. हें माझ्या सुरुवातीच्या कामांपैकीं होतें. संस्थानांतील प्रत्येक खेडें पंचायतीच्या देखरेखीखालीं आहे. पंचायतीच्या उत्पन्नाच्या बाबी स्वतंत्र असून, तिचें कार्य ग्रामजीवन सुधारण्याचें असतें. कायम स्वरूपाच्या उपयुक्त गोष्टीप्रीत्यर्थ ग्राम-पंचायतींच्या निधींचा उपयोग केला पाहिजे.

५. खेड्यांतील जमिनींच्या गरजा प्रांत-पंचायतींनीं प्रामुख्यानें लक्षांत ठेवाव्यात अशाबद्दल विशेष भर नेहमीं दिला आहे. आम्ही येथें फक्त कार्यक्रमाची रेषा मांडतों:--

( १ ) रेल्वेला मदत करणारे रस्ते,
( २ ) विहिरी बांधणें, आणि
( ३ ) जमिनींत पाण्यासाठीं पोखरणी करणें--

हीं कामें ग्राम-पंचायतींकडून मोठ्या खर्चांनें केलीं जातात.

६. तिसरें, शेतकऱ्यांना सोडवाव्या लागणाऱ्या आर्थिक प्रश्नांचा विचार करणारीं उद्योगधंद्याचीं खातीं आम्हीं सुरू केलीं आहेत.

( अ ) शेतकी खात्यांत कोणतीं पिकें लावावींत, बीं कसें निवडावें, वनस्पति-रोगांचा कसा नाश करावा हें शिकविलें जातें.

( आ ) पशुरोग चिकित्सालय खात्याचें काम पशूंची निगा राखण्याचें असतें.

( इ ) सहकारी चळवळ ही शेतकऱ्यांना माफक दरानें कर्ज देवविते आणि शेतकऱ्यांना हवें असलेलें विकत घेण्याच्या कामीं आणि त्यांचीं पिकें विकून देण्याच्या कामीं मदत करते.

( ई ) फुरसतीच्या वेळीं आणि जेव्हां शेतीचें काम नसेल त्या वेळांत त्यांना सोइस्कर अशा हुन्नर उद्योगाचें शिक्षण हुन्नरउद्योगखातें देतें.

( उ ) ग्रामीण स्वच्छता, पाणी-पुरवठा वगैरे प्रश्नांचा उलगडा आरोग्य खातें करतें.

७. शेवटीं, खालील रूढींसारख्या दुष्ट सामाजिक रूढींचा विध्वंस करणाऱ्या कायद्यांचा आम्ही उल्लेख करतों:--

( १ ) निसर्ग आणि जीवनशास्त्र याविरुद्ध असणारे बालविवाह,
( २ ) जातीचा जुलूम, आणि
( ३ ) सामाजिक न्यायतत्त्वाविरुद्ध असलेली अस्पृश्यता.

८. अस्पृश्यतेसंबंधानें संयमपूर्वक बोलणें कठीण आहे. ज्यांना आपण आपले बंधु-भगिनी समजलें पाहिजे त्यांच्यावर अस्पृश्यतेचें लांच्छन लादणें म्हणजे सामान्य मानवतेच्या कल्पनेविरुद्ध आहे. आमच्या आणि आमच्या सरकारच्या दृष्टीनें मनुष्या-मनुष्यांत कांहींहि भेद नाहीं. स्वाभिमान आणि उत्कर्ष यांना लक्षावधि लोक पारखे करणाऱ्या उच्चवर्गीयांची नैतिक अवनति होणें ही क्रमप्राप्त गोष्ट आहे.

९. वर उल्लेखिलेल्या सर्व योजनांचे पुरेपूर परिणाम होऊन आमच्या अपेक्षेप्रमाणें सर्व कांहीं घडलें आहे असें नाहीं. आम्हीं आमच्यासमोर ठेवलेलें ध्येय फार उच्च स्वरूपाचें असून, आम्ही स्वतःला नेहमीं असें बजावीत असतों कीं, शतकांपासून आलेला थिल्लरपणा हा चुटकीसारखा नाहींसा होऊं शकत नाहीं आणि अनेक युगांची देवताविषयक अंधश्रद्धा ही एका दशकांत जात नाहीं.

१०. पंचावन्न वर्षांपूर्वी सुरू केलेल्या चळवळीला आणखी प्रोत्साहन देण्याची आमची इच्छा आहे. याच हेतूनें प्रेरित होऊन आम्हीं हा निधि तयार केला आहे. याच्या उत्पन्नांतून गांवांतील गर्दी कमी करण्याकरितां 'गामठाण' वाढविण्याच्या योजनेला, खेड्यांत पाणीपुरवठा करण्याच्या योजनेला, शिक्षणाच्या योजनेला व अशाच योजनांना मदत दिली जाईल. मागील काळांत बहुतेक उपेक्षिलेल्या गरीब वर्गांना, तसेंच राणीपरज, अंत्यज, ठाकरडे, रबारी इत्यादि मागसलेल्या जातींना खास पसंती दिली जाईल. आम्हीं सांगितल्याप्रमाणें, नेहमींच्या सरकारी खर्चा-व्यतिरिक्त– कीं जो संस्थानच्या उत्पन्नाप्रमाणें वाढत राहील– हा खर्च केला जाईल. परिस्थिति बदलली आणि सरकारला यापुढें तशी जरूरी वाटली तर इतर उपयोगी कामांकरितां या निधीचें उत्पन्न वापरण्यांत येईल.

११. या आमच्या कृत्यानें आमच्या प्रजेचें सुख वाढून उच्च प्रकारचें जीवन कंठण्याबद्दल त्यांना प्रोत्साहन मिळेल, अशी आम्हांला मोठी आशा आहे. या महत्त्वाकांक्षेतील अल्पांश देखील सफळ झाला तरी आम्हांला आमच्या प्रजेच्या कल्याणार्थ वेंचलेल्या आयुष्याचा पुष्कळ मोबदला मिळाला असें वाटेल.

१२. शेवटीं एकच गोष्ट आपणाला सांगावीशी वाटते. आपण जर महान् सत्यें समजावून घेऊन तीं तर्क बुद्धीनें आपल्या व्यावहारिक आयुष्याला लाविलीं, तर आपण खात्रीनें सुखी व्हाल. आम्ही आमच्या समस्त प्रजेचें सप्रेम अभिनंदन करतों. आणि अशी प्रार्थना करतों कीं, त्यांना दीर्घायुष्य, सुख आणि समृद्धि हीं प्राप्त होवोत.

## ५३

**स्थलः**—बडोदें.

**कालः**—ता. ५ जानेवारी १९३६.

**प्रसंगः**—ना. लॉर्ड व लेडी विलिंग्डन यांच्या सन्मानार्थ लक्ष्मीविलास राजवाड्यांत झालेलें भोजन.

लॉर्ड आणि लेडी विलिंग्डन व इतर सभ्य स्त्री-पुरुषहो,

आजचे आपले सन्मान्य पाहुणे लॉर्ड आणि लेडी विलिंग्डन यांना आयुरारोग्य चिंतण्याचें आनंददायक काम करण्याकरितां आम्ही उभे राहिलों आहों.

त्यांच्या मैत्रीचा लाभ फार वर्षें आम्हीं उपभोगिला आहे. सम्राटांच्या हिंदुस्थानांतील प्रतिनिधींचें आमच्या संस्थानांत स्वागत करण्यांत सन्मान असला तरी, आमच्या राज्यारोहणाच्या हीरकमहोत्सवप्रसंगीं जुन्या मित्रांची उपस्थिति पाहून त्या सन्मानांत आनंदाची भर पडली आहे. साम्राज्यांतील आपलें दुसरें घर म्हणून ज्या हिंदुस्थानचा लॉर्ड विलिंग्डन उल्लेख करतात, आणि जेथें त्यांनीं अनेक वर्षें नोकरी केली आहे, त्याला ते लवकरच सोडून जाणार असल्यामुळें आमच्या स्वागतांत थोडासा कधीपणा आला आहे.

महायुद्धाच्या सुरुवातीला लॉर्ड विलिंग्डन मुंबईस आले. या महायुद्धानें इतर जगाप्रमाणें हिंदुस्थानांतहि पुष्कळ बदल घडवून आणला. हिंदुस्थान हें स्वामिभक्तीनें बांधलें गेलें असलें तरी, इतर जगांत स्वराज्य आणि स्वयंनिर्णय यांचा विचार चालला असतांना, हिंदुस्थानांतहि राष्ट्रीय वृत्तीचें बीजारोपण न होणें अशक्य होतें. राष्ट्रीय वृत्ति आणि राज्यघटनाविषयक महत्त्वाकांक्षा यांची लाट उसळणें अपरिहार्य आहे, असें लॉर्ड विलिंग्डन यांनीं ओळखलें. तसेंच हिंदुस्थानला जबाबदार स्वराज्याचा उदार हप्ता देण्याच्या लॉर्डसाहेबांच्या निश्चयाचीहि जाणीव इंग्लंडमधील सरकारला झाली.

अशा तऱ्हेनें मॉंटेग्यु चेल्म्सफोर्ड सुधारणांची मुहूर्तमेढ रोवणें लॉर्ड विलिंग्डन यांच्याकडे यावें, हें सर्वथैव उचित होतें. संयुक्त आणि वाढत्या जबाबदारीचा नाश करणाऱ्या द्विदल राज्यपद्धतीला, परिस्थितीचा मोर्चा ओळखून, लॉर्ड विलिंग्डन यांनीं विरोध केला. जेव्हां त्यांनीं मद्रास सोडलें त्या वेळीं ते अधिक उच्चासनावर परत येतील अशी आशा प्रदर्शित करण्यांत आली होती. सुदैवानें ही आशा, मॉंटेग्यु-चेल्म्सफोर्ड सुधारणांना एक पाऊल पुढें नेऊन वसाहतीच्या स्वराज्याचा दर्जा

देण्याच्या विचारांत दोन्ही देशांतील विद्वान् मंडळी गुंतली असतांना, पांच वर्षांपूर्वी पूर्ण झाली. प्रगतीचें घसघशीत पाऊल टाकण्याच्या कामीं त्यांच्या व्यक्तिमत्वाचा फार मोठा परिणाम झाला. आणि त्यांनीं आपणाला कळविल्याप्रमाणें, कायदेशीर आणि व्यवहारशीर, असे हिंदुस्थानचे पहिले सदनशीर गव्हर्नर-जनरल होण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. लॉर्ड विलिंग्डन हे खरोखर एक थोर सेवक आणि हिंदुस्थानचे सच्चे मित्र आहेत.

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यांत असा एक काळ येतो कीं, ज्या वेळीं त्याला आपल्यावर सोंपविलेल्या जबाबदारीचा, स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीपुरता का होईना, हिशोब रुजू करावा लागतो. आम्हीं आमच्या दीर्घ आयुष्याचें, त्यांतील सुखदुःखाचें यशापयशाचें, आज सिंहावलोकन करणें स्वाभाविक आहे. साठ वर्षांपूर्वी आम्हांला आमचें जीवितकार्य करण्यासाठीं येथें बोलाविण्यांत आलें होतें. महाराणीसाहेबांच्या प्रतिनिधींचें स्वागत आमच्या संस्थानांत करण्याचा लाभ पन्नास वर्षांपासून आम्हांला मिळालेला आहे. आमच्या संस्थानाचा आणि साम्राज्य सरकारचा मित्रभाव दीडशें वर्षांचा जुना आहे हें पाहून आम्हांला अभिमान वाटतो. तसेंच या सर्व काळांत हा मित्रभाव संभाळण्यांत येत असलेला पाहून, अधिकच अभिमान वाटतो.

आमच्या मनांत आजपर्यंत उत्पन्न झालेल्या सर्व गोष्टी व्यक्त करणें अशक्य आहे. तेव्हां आजच्या प्रसंगाला उचित असेच कांहीं विचार आम्ही प्रदर्शित करतों. आमच्या संस्थानासंबंधीं तसेंच आमच्या जीवितकार्यासंबंधीं बोलण्यासाठीं या संधीचा आम्ही उपयोग करून घेणार आहों. कांहीं बाबतींत प्रगति संथपणें चालली असली, कित्येक ठिकाणीं निराशाजनक परिस्थिति असली, तरी सर्वसाधारणपणें पुष्कळ बाजूंनीं भौतिक प्रगतीच झाली आहे. किती करावयाचें बाकी उरलें आहे, याचसंबंधींचा प्रामुख्यानें विचार आमच्या मनांत येत असतो. राज्यशासनाचीं ध्येयें हीं इतकीं थोर आहेत कीं, निसर्ग, मानवी थिल्लरपणा आणि पूर्वग्रह यांच्या एकत्रित सत्तेसमोर आयुष्यभर सतत प्रयत्न केले तरी ते अपुरे पडतील. तरी पण आमच्या संस्थानाकरितां हिंदी साम्राज्यांत सन्मानाची जागा आम्ही मिळवूं शकतों, असें आम्हांला वाटतें. आमच्या प्रजेचें कल्याण हाच आमचा नेहमीं मुख्य विचार असतो आणि आम्हांला आनंद वाटतो कीं, आम्ही त्यांना शांतता आणि सुव्यवस्थित राज्यपद्धति देऊं शकलों आहोंत; तसेंच सामाजिक अन्याय आणि आर्थिक अडचणी ह्या कमी करूं शकलों आहोंत. प्रत्येक वर्षी आमची खात्री दृढावत आहे कीं, अगदीं गरीबांतल्या गरीब मनुष्याला शिक्षण दिल्यानेंच भक्कम पाया तयार होऊं शकेल. प्रत्येक प्रयत्न उपयुक्त ठरला आहे. आणि जसा काळ जाईल तशी आम्हांला आशा वाटते आणि आम्ही प्रार्थना करतों कीं, आम्हीं योजिलेली आणि चालू ठेवलेली कल्पना सफळ होईल.

आमच्या आयुष्यांत हिंदुस्थान पार बदलून गेला आहे. विशेषतः राज्यघटना-

त्मक बाबतींत. या परिवर्तनाचें आम्ही स्वागत करतों. असंख्य आशा आणि हित-संबंध यांची तडजोड म्हणजेच नवीन राज्यघटना होय. परंतु त्यांतील मध्यवर्ती कल्पना ही आम्हांला विशेष महत्वाची वाटते. गेलीं कित्येक वर्षें आम्ही प्रगतीच्या दृष्टीनें संयुक्त राज्यघटनेचा किंवा फेडरेशनचा विचार करीत आलों आहोंत. आणि असल्या-च भक्कम पायावर राजकीय प्रगतीची इमारत बांधण्याचा इरादा हा शहाण-पणाचा समजला पाहिजे. अखिल भारतीय फेडरेशनमध्यें ब्रिटिश हिंदुस्थान आणि संस्थानें हीं परस्परांच्या कल्याणाकरितां समाइक भागीदार या नात्यानें ज्यांत झटत आहेत–अशांत संस्थानांना फारच महत्त्वाची कामगिरी करावयाची आहे. जेव्हां वेळ येईल तेव्हां–आणि याला फार विलंब चालणार नाहीं–आम्हांला आशा आहे कीं, संस्थानें आपल्यावरील नवी जबाबदारी पार पाडतील, आणि ज्या कार्या-करितां आपण सर्वजण झटत आहोंत त्यांत आनंदानें हातभार लावतील.

हा हातभार त्यांना अत्यंत फायदेशीर रीतीनें लावतां यावा म्हणून त्यांचा अभिमानास्पद इतिहास आणि परंपरानुरूप कित्येक महत्त्वाच्या गोष्टी यांचा विचार करण्याचा त्यांना अधिकार आहे. एकजात सर्वसारख्या अशा मुशींत त्यांना घालण्या-चा प्रयत्न केल्यास, धाडस आणि व्यक्तिमत्व यांचा नाश होईल; आणि अभिनव भारताला विविध स्वरूपाच्या राजकीय आणि शासनविषयक अनुभवाला पारखें केल्यासारखें होईल. संयुक्तघटनेच्या बाहेरील सर्व बाबतींत संस्थानांना अनियंत्रित अशी सत्ता असावयाला हवी, आणि परिस्थिति बदलल्यामुळें पूर्वींचीं नियंत्रणें काढून घेतलीं पाहिजेत. तरच संस्थानांना भक्कम आणि जबाबदार घटक म्हणून स्वतःची स्वाभाविकपणें आणि फायदेशीर रीतीनें प्रगति करणें सुलभ जाऊन, सुराज्याच्या विविध कर्तव्यांना लायक बनून, तीं भारताची सेवा करूं शकतील. आम्हांला समाधान वाटतें कीं, असल्या प्रश्नांकडे, विशेषतः रेल्वेवरील सत्ता परत देण्याकडे लक्ष दिलें जात आहे.

जेव्हां आम्ही भविष्यकाळाविषयीं विचार करूं लागतों त्या वेळीं अलीकडे वाढलेल्या कित्येक दुःखकारक बनावांनीं आमचें मन फार उद्विग्न होतें. वर्तमान कालाला कटु बनविणाऱ्या व भविष्य कालाला विरोध करणाऱ्या आणि देशभर पसरणाऱ्या जातिनिष्ठतेच्या शापाविषयीं आम्ही बोलत आहोंत. त्यांत एकहि चांगला गुण नाहीं. तसेंच तें न्याय्यहि नाहीं आणि वाईटावांचून दुसरें कांहींहि त्याच्यांतून निष्पन्न होणें शक्य नाहीं. आम्ही सर्व पक्षांच्या आणि पंथांच्या पुढाऱ्यां-ना विनंति करतों कीं, त्यांनीं या दुष्ट गोष्टीला धैर्यानें तोंड द्यावें आणि आपल्या अनुयायांनाहि तेंच करावयाला सांगावें. उदार नेतृत्वाची आणि विश्व-सहिष्णुतेची सध्यां जरूरी आहे आणि चांगलें उत्तर मिळविण्याच्या हेतूनें आम्ही ही विनंति करीत आहोंत.

सर्वसाधारणपणें आम्ही आतांपर्यंत हिंदुस्थानाविषयीं बोललों. आतां आम्ही

आमच्या संस्थानच्या प्रश्नांविषयीं, तसेंच मांडलिक संस्थानें व जहागिरी यांच्याविषयीं बोलतों. सुमारें दीडशें वर्षांपूर्वी ब्रिटिश सरकारनें आमचें संस्थान आणि आमचे मांडलिक यांच्यामध्यें मध्यस्थी करण्याचें पसंत केलें. आतां परिस्थिति फारच बदलली असल्यानें दीडशें वर्षांपूर्वींच्या धोरणांत नवीन सुधारणा करायला हव्या आहेत. हे संबंध नीट राहण्याकरितां आम्हीं एक योजना तयार केली आहे. ती तयार करीत असतांना आम्हीं दोन गोष्टी लक्षांत ठेवल्या आहेत. पहिली ही कीं, या संस्थानचे अधिकार आणि हक्क हे कोणत्याहि सबबीवर कमी करावयाचे तर नाहींतच; पण उलट कोणत्याहि तर्क पद्धतीवर न आधारलेली खंडणी नाहींशी करून त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारणें. दुसरी गोष्ट ही कीं, आर्थिक प्रगति आणि सुराज्याच्या कल्पना या संस्थानांतून प्रसृत करणें. ही योजना मान्य होऊन नवीन पद्धति लवकरच सुरू होईल, अशी आशा प्रदर्शित करण्याचें आम्ही धाडस करतों.

लेडी विलिंग्डन या उपस्थित नसल्यामुळें आपणां सर्वांना किती वाईट वाटत आहे हें आम्हीं सांगण्याची कांहीं जरूरी नाहीं. त्यांचें अभिनंदन करीत असतांना त्यांना लवकर बरें वाटावें अशी आशा आम्ही प्रदर्शित करतों. सार्वजनिक कामांतील त्यांची कळकळ आणि दानाच्या, तसेंच भूतदयेच्या बाबतींतील त्यांचे प्रयत्न स्फूर्तिदायक व आदर्शवत् आहेत. शिक्षणानें जें करतां येईल तें आम्ही करीत आहोंत. स्त्रियांच्या अधिकारासंबंधींचे त्रासदायक निर्बंध काढणें, शिशुसंगोपनाला मदत करणें, समाजांत हक्काची जागा मिळविण्याच्या कामीं स्त्रियांना साहाय्य करणें, इत्यादि कामें आम्ही करीत आहोंत. आम्हांला तसेंच आमच्या महाराणीसाहेबांना हें कार्य फार प्रिय आहे. लेडी विलिंग्डनसारख्या जुन्या मित्रांचें– कीं ज्यांच्या मार्ग-दर्शकत्वाचा या चळवळींना फायदा झाला आहे, स्वागत करीत असतांना सुख होत असलें तरी आज रात्रीं त्या हजर नसल्यानें त्यांची अनुपस्थिति आम्हांला फार जाणवते.

सभ्य स्त्री-पुरुषहो, आजच्या सन्मान्य पाहुण्यांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करण्यांत आमचे भागीदार होण्याविषयीं आम्ही आपणाला विनवितों, आणि त्यांना पुष्कळ वर्षें सुख लाभो, असें इच्छितों.

लॉर्ड आणि लेडी विलिंग्डन यांना आयुरारोग्य चिंतण्याकरितां आपण आपलीं पेयपात्रें उचलावींत असें आम्ही सुचवितों.

## ५४

**स्थलः—न्यायमंदिर, बडोदें.**

**कालः—ता. ५ जानेवारी १९३६.**

**प्रसंगः—हीरकमहोत्सवांत राज्यांतील स्त्रियांनीं महाराजसाहेबांना दिलेलें मानपत्र.**

सभ्य स्त्रीजनहो !

आपण या राज्यांतील सर्व स्त्री-समाजातर्फे माझ्या राज्यारोहणाच्या हीरक-महोत्सवप्रसंगीं माझा आणि श्री. सौ. महाराणीसाहेबांचा जो भक्तिपूर्वक सत्कार केलात, त्याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानतों. आज स्त्रियांच्या मानपत्राचा स्वीकार करण्यांत मला अधिकांत अधिक आनंद होत आहे. कारण स्त्रियांच्या हितासाठीं आणि उन्नतीसाठीं मीं केलेल्या अनेक सुधारणा त्यांना पटल्या असून, त्यांची बूज त्या राखीत आहेत असें जें आपण या मानपत्रांत कळकळीनें सांगितलें आहे, तें ऐकून मला फार संतोष वाटला. स्त्रियांच्या उन्नतीसाठीं मीं ज्या सुधारणा केल्या व कायदे बनविले तें सारें कर्तव्य म्हणूनच केलें. मला समजूं लागल्यापासून व गादीवर बसल्यापासून मीं मनाशीं अशी खूणगांठ बांधली कीं, ज्ञान आणि शिक्षण यांखेरीज प्रजेचा उत्कर्ष होणें नाहीं. तेव्हां प्राथमिक शिक्षणाला सर्वत्र आरंभ केला, व त्याचा फायदा स्त्रियांनीं पण योग्य प्रमाणांत घेतला, हें आज आपल्या मानपत्रावरून दिसून आलें व मला आनंद झाला. रथाचीं दोन्ही चाकें चांगलीं असलीं तरच रथ बरोबर चालेल; याचप्रमाणें समाजाच्या प्रगतीसाठीं स्त्री आणि पुरुष हीं दोन्ही अंगें सारखीं सुधारलेलीं असलीं पाहिजेत. त्याशिवाय समाजाचा उत्कर्ष होणार नाहीं. स्त्रियांचीं किती तरी विविध कार्यक्षेत्रें पडलीं आहेत व त्यांच्यावर जबाबदारी पण केवढी मोठी आहे, हें त्यांनीं ओळखिलें पाहिजे व शिक्षणांत प्रगति करून घेतली पाहिजे. याबरोबरच शारीरिक शिक्षणाकडेहि लक्ष दिलें पाहिजे. संसार सुखाचा होण्यास आरोग्यशास्त्राचें ज्ञान अवश्य असलें पाहिजे. याप्रमाणें उच्च शिक्षण घेऊन आपण देशाच्या प्रगतीला चांगला हातभार लावाल, अशी मला खात्री वाटते.

आपण जे प्रयोग करून दाखविलेत त्यांची निवड चांगलीच आहे. त्यांत दर्शविलेले विचार आणि भावना आपण व्यवहारांत उतरवून दाखवाल तर आपलें आणि त्याबरोबर समाजाचेंहि जीवन सुखाचें होईल. आपल्या या सुंदर प्रयोगांबद्दल आपलें व ज्यांनीं या प्रयोगांची योजना केली त्या कार्यकर्त्यांचेंहि पण अभिनंदन

करतों. कारण या कार्यक्रमामुळें मला फार आनंद वाटला. तेव्हां मी आपलें त्याबद्दल आभार मानतों व आपणां सर्वांचें कल्याण व्हावें असें इच्छितों.

## ५५

**स्थल:**—गोयागेट कॉलनी, बडोदें.

**काल:**—ता. ६ जानेवारी १९३६.

**प्रसंग:**—ट्रान्सपोर्ट पेजंट ( रेल्वेचा उत्सव ).

श्री. महाराजसाहेबांनीं या प्रसंगीं लहानसेंच भाषण केलें. त्यांत त्यांनीं समारंभ पाहून आपणांस आनंद झाल्याचें सांगून, चांगल्या मनोरंजक प्रयोगांबद्दल कार्यकर्त्यांची वाहवा केली. प्रारंभींच्या दिवसांत सुखसोयीच्या वाहनांच्या अभावीं प्रवासांत कोण अडचणी येत त्यांचें वर्णन करून, आज दळणवळणाच्या साधनांत केवढी प्रगति झाली आहे याबद्दल महाराजांनीं संतोष व्यक्त केला. आज किती तरी माहिती मिळाली आहे, तेव्हां या मनोरंजक कार्यक्रमाबद्दल रेल्वे मॅनेजर श्री. रामकिसन वगैरेचें अभिनंदन केलें पाहिजे, असें सांगून महाराजांनीं बक्षिसें मिळविलेल्या मंडळींना शाबासकी दिली.

## ५६

**स्थल:**—कामाठी बाग, बडोदें.

**काल:**—ता. ८ जानेवारी १९३६.

**प्रसंग:**—स्काउट रॅली.

स्काऊट कमिशनरनीं वाचलेला अहवाल ऐकून, मला फार आनंद झाला. स्काउटिंगपासून फार मोठा फायदा आहे असें जें मला वाटत होतें, त्याची सत्यता आजचा कार्यक्रम प्रत्यक्ष पाहून पटली आहे. यापेक्षां जास्त जर या गोष्टीचा प्रचार झाला तर लोकांचा अधिक फायदा होणार आहे, व म्हणून त्यासाठीं विशेष प्रयत्न करावयास पाहिजेत. आजच्या खेळांपासून मला फार आनंद वाटला, हें पुन्हा सांगतों.

## ५७

**स्थल:**—सेंट्रल लायब्ररी, बडोदें.

**काल:**—ता. ८ जानेवारी १९३६.

**प्रसंग:**—पुस्तकालय-प्रदर्शन.

आजच्या प्रसंगीं मला विशेष बोलण्याचें कारण दिसत नाहीं; कारण रा. वाकनीस यांनीं पुस्तकालय खात्याची स्थापना व त्यासंबंधीं प्रगति यांची सर्व माहिती दिलेलीच आहे. आज समाजाची प्रगति जसजशी वाढते आहे तसतसे मानवी-जीवनासंबंधीं प्रश्न जास्त गुंतागुंतीचे होत चालले आहेत. तेव्हां त्यांचा उलगडा होण्यासाठीं जास्त ज्ञानप्रसार झाला पाहिजे व त्यासाठींच मीं या खात्याची मोठी योजना केली आहे. ज्ञानप्रसाराच्या कामीं पुस्तकालयांचा फार मोठा उपयोग आहे व या बाबतींत बडोदें राज्यांत जास्त साधनें तयार आहेत, ही मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. पुस्तकालयासंबंधीं लोकांमध्यें जास्त आवड उत्पन्न करण्याचें काम फार मोठें व कठीण आहे व त्याची पूर्ण जाणीव आपले पुस्तकालयाचे निष्णात अधिकारी रा. वाकनीस यांना आहेच. पुस्तकालय-प्रचाराच्या कामीं माझें फार लक्ष आहे व त्यांत यश यावें असें मी इच्छितों. या प्रचाराच्या कामीं आपण जेवढें कार्य करून दाखवाल तेवढी मदत मी यथाशक्ति करीन, एवढें सांगून प्रदर्शन खुलें झाल्याचें जाहीर करतों.

## ५८

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. ९ जानेवारी १९३६.

**प्रसंग:**—धारासभेच्या मानपत्राला उत्तर.

धारासभेचे सद्गृहस्थहो,

आपण दिलेलें मानपत्र मोठ्या आनंदानें आणि आवडीनें आम्हीं स्वीकारलें असून, त्यांतील मुद्द्यांची जाणीव करून घेतली आहे. हे मुद्दे आम्हांला माहीत नसलेले किंवा आमच्या कक्षेबाहेरचे नसून, ते सदैव आमच्या मनांत असतात.

धारासभेची स्थापना केल्यापासून तिचें कार्य आम्ही सूक्ष्मपणें पाहत आहोंत. प्रस्तुत प्रसंगीं आम्ही जास्त कांहीं सांगत नाहीं. आणखी केव्हां तरी आम्ही आमचे विचार आपणाला कळवूं, आणि आपण ज्या परिस्थितींत आहोंत त्यांत विविध विषयांचें कसें आकलन करावें, तेंहि सांगूं.

या जगांत कांहींच कायम टिकणारें नाहीं, जग बदलत आहे आणि बदलत्या जगाच्या गरजांप्रमाणें धारासभेची घटना बदलली आहे व बदलली जाईल. आपलें ध्येय साध्य करण्याकरितां आपण सावधगिरीनें पुढें पाऊल टाकलें पाहिजे. दिखाऊ गोष्टींनीं किंवा फॅशननीं आपण भुललों जातां कामा नये. आपण आपलें घटनात्मक शरीर बलिष्ठ केलें पाहिजे, ऐक्य मिळविलें पाहिजे, सहकार आणि विश्वास वाढविला पाहिजे, आणि योग्य तें स्वातंत्र्य दिलें पाहिजे.

रयत आणि अधिकारी हे माझ्या प्रजेपैकींच आहेत. या दोघांत ऐक्य नसल्यास, गोष्टी सुरळीतपणें चालूं शकणार नाहींत. आपणांत आणि आमच्या अधिकाऱ्यांत सद्भाव आणि सहकार वसत असलेला पाहून आम्हांला आनंद वाटतो.

बडोद्याच्या मागील इतिहासाकडे पाहिल्यास त्यांत आढळणाऱ्या दोषांपासून पुष्कळच बोध घेतां येण्याजोगा आहे. तुम्हांला त्यापासून पुष्कळ धडे घेतां येतील. तिकडे तुम्हांला दुर्लक्ष करून चालणार नाहीं. त्याच चुका तुम्ही करूं नका. आपला उत्कर्ष आणि लोकांचें सौख्य वाढविण्याकरितां उच्च ध्येयांचा अवलंब करा. आपण सदैव एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, सेवेमध्यें त्यागवृत्ति ठेवल्यानें आपलीं ध्येयें उच्चतर बनत जातात. आणि या ध्येयांचा अवलंब केल्यानें अधिक फायदा मिळतो. प्रथम त्याग आणि नंतर उच्च ध्येयें— असें केल्यानें आपण परस्परांचे हितसंबंध वाढवूं शकूं.

इतकें सांगून, आपण जो अंतःकरणपूर्वक आमचा सन्मान केलात त्याबद्दल आम्हीं पुनः आपले आभार मानतों.

## ५९

**स्थलः**—नजरबाग राजवाडा, बडोदें.

**कालः**—ता. ११ जानेवारी १९३६.

**प्रसंगः**—बडोदें मिल ॲसोसिएशननें दिलेलें मानपत्र.

या प्रसंगीं जास्त बोलण्याची जरूरी दिसत नाहीं. आपण आपल्या मानपत्रांत आणि भाषणांतून जें सांगितलें तें ऐकून आनंद वाटला. आपल्यासारख्या औद्योगिक क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांचें राज्याला मोठें महत्त्व आहे. राज्याची औद्योगिक प्रगति आणि उत्कर्ष या कामीं आपल्या वर्गाची जी आवश्यकता असते तीहि माझ्या पूर्ण ध्यानांत आहे. तेव्हां आपल्या कामांत मी यथाशक्ति मदत देत जाईन. उद्योग-धंद्यांत आपलें पाऊल पुढें पडत जाईल, अशी मला आशा वाटते. या बाबतींत माझे सर्व विचार मी येथें बोलून दाखवीत नाहीं. पुढें केव्हां तरी सांगेन. या वेळीं जुन्या गोष्टींवर टीका न करणेंच चांगलें. आपण यशस्वी आणि सुखी व्हावें असें मी इच्छितों.

## ६०

**स्थलः**—बडोदें कॉलेज.

**कालः**—१२ जानेवारी १९३६.

**प्रसंगः**—माजी बी. ए. पदवीधरांनीं दिलेलें भोजन.

सभ्य स्त्री-पुरुषहो,

आपण ज्या हृदयस्पर्शी शब्दांनीं आमचें स्वागत केलेंत त्याबद्दल आम्ही आपले आभार मानतों.

आमचे मित्र रा. मुनशी यांच्यासारखे, खऱ्या गोष्टी खोट्या आणि खोट्या गोष्टी खऱ्या ठरविणारे, आम्ही कुशल वकील नाहीं. बडोदा कॉलेजच्या इमारतीचा पाया बसविणें, हें आमच्या कारकीर्दीतील अगदीं पहिल्या कार्यांपैकीं असून, त्या गोष्टीला आतां अर्धशतक लोटलें आहे. त्यामागील वर्षांकडे पाहत असतांना अनेक चित्रें आमच्या मनांत उभीं राहातात. संस्मरणीय भूतकालांतील महत्त्वाच्या घटनांचीं शब्दचित्रें काढण्याचें रा. मुनशींचें सामर्थ्य आमच्या ठिकाणीं असतें तर

बरें झालें असतें. त्याचप्रमाणें त्यांनीं आमच्याविषयीं सांगितलेल्या चांगल्या गोष्टी आमच्या ठिकाणीं असाव्यात, असें आम्ही इच्छितों.

आयुष्याच्या अल्पावधींत आपल्या प्रयत्नांना फळें आलेलीं पाहणें फारच थोड्यांच्या भाग्यांत असतें; विशेषतः शासनविषयक प्रयत्नांत. एखाद्या राज्यकर्त्यांच्या मृत्यूनंतर पन्नास वर्षांनीं, जेव्हां त्याचे मित्र-शत्रु दोन्हीहि नाहींसे झालेले असतील, तेव्हां त्याच्याविषयीं खरा निर्णय देतां येणें शक्य असतें. त्याच्या राज्याचीं बरीवाईट फळें कालावधीनें दिसूं लागतात, आणि मगच निःपक्षपातीपणानें त्याच्याविषयीं बोलणें शक्य असतें.

समर्थ, आणि प्रगतिप्रिय राज्यकर्त्यानें आमच्या मतें, भूतकालाचा अभ्यास केला पाहिजे, वर्तमानकालीन परिस्थिति नीट अवलोकन केली पाहिजे, आणि भविष्यकालाकडे नजर फिरविली पाहिजे. आपल्या देशांतील लोक जगांतील इतर देशांतील लोकांच्या दृष्टीनें मुळींच कमी नसल्याची आमची खात्री झाली आहे, आणि तरी आपली प्रगति इतक्या हळू होत आहे.

सामाजिक अन्याय आणि अंधश्रद्धा हीं लोकांच्या प्रगतीच्या आणि उत्कर्षाच्या आड मुख्यतः येतात, असें आम्हांला पूर्वी वाटत असे. राज्यकर्ता या नात्यानें बसलेली घडी न विस्कटतां, वैयक्तिक प्रगति शक्य आणि व्यवहार्य बनविणें हें आमचें कर्तव्य होतें. असें केल्यावांचून सुधारणा शक्यच नव्हती. तेव्हां या हेतूनें आम्हीं शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार, व जरूर तेथें त्या कामीं कायद्याचा उपयोग करण्याचें ठरविलें.

यानंतरची आमची इच्छा सामाजिक अन्यायामुळें निर्माण झालेलीं बंधनें नाहींशीं करून व्यक्तीचा विकास होण्याला मदत करण्याची होती. हें साधण्याकरितां कायद्यांची एक मालिकाच तयार करावी लागली. पण ती लोकमत शिक्षणानें तयार करण्यापूर्वी करण्यांत आली नव्हती. राज्यकारभारविषयक आमच्या योजनांचा आम्हीं घाईघाईनें कधीं विचार केला नाहीं, कीं कधीं त्यांची तशी अंमलबजावणी केली नाहीं. सामाजिक स्थिरस्थावरपणा येण्याकरितां पुरेसा काळ नेहमीं जाऊं दिला जात असे. हें कार्य अजूनहि संपलेलें नाहीं. सावधानता आणि निश्चय यांच्या मदतीनें या मार्गानें अधिक प्रयत्न करणें, हें आमचें कर्तव्य आहे.

सामाजिक अन्यायापासून मुक्त होण्याची तीव्र इच्छा असलेल्या, आणि त्याकरितां सतत प्रयत्न करीत असलेल्या लोकांना स्वतःला मोकळें करून घेण्याकरितां वस्तुतः आम्हीं मदत केली आहे. आमच्या साठ वर्षांच्या कारकीर्दींत आम्हीं जो प्रवास केला आणि इतर देशांच्या प्रगतीच्या कारणांचा अभ्यास केला, त्यांवरून

आमच्या लोकाकरितां काय हितकारक आहे, काय अनहितकारक आहे, काय शक्य आहे, इत्यादि गोष्टी आम्हीं सतत ध्यानांत घेतल्या आहेत.

बडोदा युनिव्हर्सिटीविषयीं बोलावयाचें तर, आमचे मित्र रा. मुनशी व येथें उपस्थित असलेले इतर लोक या सर्वांना आम्हीं आश्वासन देतों कीं, युनिव्हर्सिटीची कल्पना आमच्या विचारांत असून कधींच ती आमच्या मनांतून दूर होत नाहीं. बडोद्यासारख्या लहान संस्थानानें या बाबतींत कोणताहि निश्चय करण्यापूर्वींच आर्थिक बोजा आपणाला उचलवेल किंवा नाहीं याचा विचार काळजीपूर्वक केला पाहजे. जेव्हां संस्थान आर्थिक मंदीच्या अडचणींत असतें आणि नोकरवर्ग व अधिकारीवर्ग यांना वेळच्या वेळीं पगार देतां येत नसतो त्या वेळीं कशा प्रकारच्या अडचणी उत्पन्न होतात, हें रा. मुनशी व आपण सर्वजण यांच्या लक्षांत असेलच. त्याचे परिणाम खरोखर फारच दुःखदायक असतात, आणि बडोद्यांत असली कठीण परिस्थिति उत्पन्न व्हावी, अशी रा. मुनशी व इतर मंडळी यांची खात्रीनें इच्छा नसणार.

या कॉलेजची व इतर अशाच संस्थांची वाढ झालेली पाहण्याची आम्हांला फार इच्छा आहे. आमच्या शेतकरी प्रजेची स्थिति सुधरविण्याची व ग्रामीण प्रगतीचीं कामें सपाट्यानें करण्याची आमची तीव्र इच्छा आहे. सामाजिक पुनर्घटनेच्या बाबतींत अजून जें पुष्कळ करावयाचें बाकी उरलें आहे तें करण्याची आमची इच्छा आहे. या सर्वांकडे मनापासून लक्ष देण्याची व पुरेशा पैशाची जरूरी आहे. कांहींहि पूर्णपणें आणि चांगल्या रीतीनें करावयाचें असल्यास पुढें येणाऱ्या गोष्टींचें आकलन केल्यावांचून घाईघाईनें तें करूं नये. या गोष्टीवर पुनः आम्ही भर देतों.

सामायिक कुटुंबपद्धति सुधारण्यासंबंधांत आणि व्यक्तीच्या वाढीला खुंटविणाऱ्या सामाजिक अन्यायांना दूर करण्यासंबंधांत आम्हीं केलेल्या प्रयत्नांचा रा. मुनशी यांनीं उल्लेख केला आहे. या बाबतींत आम्हांला एक गोष्ट सांगितली पाहिजे कीं, जोंवर लोकमत पुरेसें स्पष्ट होऊन लोक अनुकूल बनले नाहींत तोंवर असले कायदे आम्हीं कधींच हातांत घेतले नाहींत किंवा दुसऱ्यांना घेऊं दिले नाहींत.

जोंपर्यंत वेळ आली नसेल तोंपर्यंत तिची वाट पाहण्याचा आमचा सतत प्रयत्न चाललेला असतो. आणि जेव्हां वेळ आली असें आम्हांला वाटतें त्याच वेळीं कायदे करून, सामाजिक अन्यायांपासून, त्यांतून सुटका करून घेणाऱ्या आमच्या प्रजेला आम्ही कायद्यांची अंमलबजावणी करून मोकळे करतों. तुमच्या अपेक्षेप्रमाणें कित्येक वेळीं परिणाम झाले नसल्यास, आमच्या ठिकाणीं सद्धेतु नसल्यामुळें तसें झालें असें नाहीं.

एक मनुष्य या नात्यानें आमच्यांत जो कांहीं उणेपणा असेल तो लक्षांत घेऊनहि आम्ही आपणांला एक आश्वासन देऊं इच्छितों कीं, आमचें प्रत्येक उद्दिष्ट आमच्या प्रजेच्या कल्याणार्थ नेहमीं असतें. आमच्याविषयीं मत देतांना आपण परिणामापेक्षां ज्या हेतूंनीं आम्हीं प्रेरित होतों तें लक्ष्यांत घ्या. लोकांपासून संपूर्ण सहकार्य मिळविण्याची आमची नेहमीं इच्छा असते. या कॉलेजचे पदवीधर आणि बुद्धिमान् गृहस्थ या नात्यानें तुम्ही आम्हांला आणि सरकारला, वेळोवेळीं उत्पन्न होणाऱ्या प्रसंगीं मदत करून, आजपर्यंत आम्ही करूं शकलों त्यापेक्षां अधिक करून दाखविण्याच्या कामीं हातभार लावाल अशी आशा आहे.

आपण प्रदर्शित केलेल्या सद्भावाबद्दल आणि सदिच्छांबद्दल पुनः एकदां आम्ही आपले आभार मानतों. आम्हांला आमच्या प्रजेकरितां आणि भावी पिढ्यांकरितां अजून जें पुष्कळ करावयाचें आहे त्यांत तुमच्या मदतीची आणि सहकार्याची आम्हांला प्राप्ति होईल, अशी आशा आज रात्रीं आपण येथून जाण्यापूर्वी आम्ही प्रदर्शित करतों.

## ६१

**स्थलः**—नवसरी.

**कालः**—तारीख १६ जानेवारी १९३६.

**प्रसंगः**—जसदन समारंभ.

सर फिरोज सेठना आणि सभ्य स्त्री–पुरुषहो,

आज आम्हांला भयंकर सर्दी झाली असून, आपणाला आम्ही काय बोलतों तें ऐकतांना श्रम पडतील, अशी आम्हांला भीति वाटते.

आपण आमचा जो सत्कार केलात त्याबद्दल प्रथमच आम्ही आपले आभार मानतों. कित्येक वक्त्यांनीं आमच्याविषयीं जें सांगितलें त्याचा आमच्या मनावर फार परिणाम झाला. आमच्या प्रजेच्या हिताचें जें कांहीं होतें तें आम्हीं प्रेमभावानें प्रेरित होऊन कर्तव्य म्हणून केलें आहे.

पारशी जात ही संख्येनें लहान असली तरी तिनें हिंदुस्थानच्या इतिहासांत महत्त्वाची कामगिरी केली आहे. शहाणपणा, धैर्य व समजूतदारपणा या गुणांनीं

पारशांनीं नुसतें आपलें अस्तित्व टिकविलें नसून, ते इतरांना आदर्शभूत होऊन राहिले आहेत. जर पारशी आमच्यांतून जातील, तर आम्ही गरीब बनूं.

आपल्यांपैकीं कित्येकांनीं पूर्वीच्या आमच्या नवसरी येथील आगमनांचा उल्लेख केला आहे. त्या भेटींची स्मृति सुखदायक असून, अजूनहि आमच्या मनांत ती ताज्या स्वरूपांत आहे. लहानपणीं या गांवाला दिलेली पहिली भेट आम्हांला आठवते. कारण त्या वेळीं मनावर उठलेले ठसे अजून कायम आहेत.

हिंदु आणि पारशी यांच्या धर्मांत पुष्कळच सामान्य असें आहे. परंतु एका बाबतींत पारशांना निःसंशय फायदा आहे. समाजकार्य आणि लोकोपयोगी कार्य या बाबतींत शाब्दिक सहानुभूतीपेक्षां किंवा कोरड्या वचनांपेक्षां प्रत्यक्ष मदत करणें पारशी योग्य समजतात. त्यांची दानशूरता म्हण म्हणून प्रसिद्ध आहे. राष्ट्रजीवनाच्या सर्वच भागांत ते प्रमुखपणें वावरतात. इतकेंच नाहीं तर, आम्हीं सांगितलें त्याप्रमाणें, आपल्या इतिहासांतहि त्यांनीं महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. संस्थानांत ज्या उत्तम तऱ्हेनें त्यांनीं हुद्दयाच्या जागा टिकविल्या आहेत, त्यांवरूनहि त्यांच्या विविध स्वरूपाच्या महत्त्वाच्या कार्यांची खात्री पटेल.

इतर जातींप्रमाणेंच, पारशी जात आम्हांला नेहमीं आदरणीय वाटते, आणि तिच्या कल्याणार्थ आम्ही आमच्या प्रयत्नांची शिकस्त करूं; इतकें सांगून आपण आमचा जो बहुमान केलांत आणि आमच्याविषयीं प्रेमळ उद्गार काढलेत, त्यांबद्दल आम्ही आपले पुनः एकदां आभार मानतों.

## ६२

**स्थलः**—अंबिकानदी पूल, गडद.

**कालः**—ता. १७ जानेवारी १९३६.

**विषयः**—अंबिका नदीवरील पुलाचा उद्घाटन-समारंभ.

मि. अडालजा आणि सभ्य स्त्री—पुरुषहो,

सुमारें एक वर्षापूर्वी आम्हीं या पुलाच्या पायाचा दगड बसविला होता. या योजनेच्या त्या वेळीं सांगितलेल्या इतिहासाची लांबलचक पुनरावृत्ति करण्याची जरूरी नाहीं. तो लवकर तयार होण्याविषयींची आमची आशा पूर्ण झालेली पाहून आम्हांला आनंद होतो. गणदेवी तालुका आणि प्रांताचें मुख्य ठिकाण

नवसरी यांमध्यें सतत आणि सुलभ वाहतूक नव्हती, ही पुष्कळ दिवसांची उणीव या पुलानें भरून निघाली. नदीच्या उत्तरेकडे असलेल्या आणि बडोद्याच्या हद्दी-बाहेरील जलालपूर तालुक्याच्या खेड्यांच्या दृष्टीनेंहि हा पूल फार महत्त्वाचा आहे.

चीफ इंजिनियर यांनीं दर्शविल्याप्रमाणें उत्तरेकडील पुलाचा रस्ता अजून तयार न झाल्याकारणानें, व्यापाराकरितां किंवा वाहतुकीकरितां या बाजूनें हा पूल वापरतां येण्याजोगा नाहीं, ही गोष्ट आमच्या लक्षांत आहे. उलट आम्हांला असेंहि आश्वासन देण्यांत आलें आहे कीं, ब्रिटिश हद्दींत होणार असलेलें हें प्रवेशद्वार, थोड्याच आठवड्यांत पूर्ण होईल. पायीं चालणारे लोक आणि हलकी वाहतूक यांकरितां आजहि पूल वापरतां येतो. आणि यंदा थंडीच्या दिवसांत आम्ही परत नवसरीला येण्याचा संभव नसल्यानें, उद्‌घाटन-समारंभ उरकून घेण्याची ही आजची संधि आम्हीं पसंत केली.

अगदीं जवळच्या प्रदेशांना त्याची उपयुक्तता अधिक वाटण्याचा संभव असला तरी, वस्तुतः हा पूल फक्त बडोदें संस्थानांतील वाहतुकीच्या साधनांतील महत्त्वाचा दुवाच केवळ नाहीं. मुंबई, बडोदें आणि उत्तरेकडील देश यांना सांधणारा एकमेव भागच या पुलानें तयार झाल्यानें त्याला भारतीय महत्त्व प्राप्त होईल. अशा तऱ्हेनें आमच्या संस्थानाबाहेरील देशांना आणि लोकांना त्याचा फायदा मिळून, वाहतुकीच्या साधनांच्याकडे ताबडतोब लक्ष देण्याची किती आवश्यकता आहे, हें त्यामुळें सिद्ध होईल असा आम्हांला भरंवसा आहे.

आपणाला माहीतच आहे कीं, शिक्षण ही आपल्या प्रमुख गरजांपैकीं होय. ही आमची श्रद्धा अचल असली, तत्रापि उपयुक्ततेच्या दृष्टीनें शिक्षणाच्या खालोखाल आम्ही देशादेशांत संबंध जुळविण्याला महत्त्व देतों. कारण असल्या दुव्यांवांचून शिक्षणानें चांगली प्रगति होऊं शकत नाहीं. वाहतुकीच्या साधनांत रस्ते हे प्रथम मनुष्याला माहीत झाले, आणि अजूनहि ते महत्त्वाचेच राहिले आहेत. जगाच्या महत्त्वाच्या रस्त्यांलगतच सुधारणेचा विस्तार झाला, हें सांगणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

दोन हजार वर्षांपूर्वीं रोमन लोकांनीं जेव्हां लांब लांब रस्ते बांधले त्या वेळेपासून त्यांना त्यांचें महत्त्व वाटूं लागलें होतें. गॉल आणि ब्रिटनच्या जुन्या भागांत आजहि हे रस्ते अस्तित्वांत आहेत. तत्कालीन लेखांवरून असें दिसतें कीं, महान् राज्यकर्ते हे नेहमींच महान् रस्ते बांधणारे होते.

खरोखर आम्हांला असें वाटतें कीं, या रस्ते बांधण्याच्या बाबतींत हिंदुस्थाननें जगापुढें आदर्श ठेवला होता. अशोकाच्या आज्ञापत्रांतून दगडीरस्त्यांचाच उल्लेख नसून, धर्मशाळा, विहिरी, झाडें वगैरे रस्त्यावर असण्याचें महत्त्व वर्णिलें आहे.

**पंथेसू कूपाच खानापिता व्रछाच रोपापिता परिभोगाय पसुमनुसानं ।**
**—गिरनार शिलालेख २.**

बौद्धकालीन भारतांत दगडी पृष्ठभाग असलेले लांब रस्ते असल्याविषयीं निःसंदिग्धपणें जुन्या पाली हस्तलिखितांवरून समजतें. चौसष्ट कला— कीं ज्या आजहि आपणाला पुष्कळ शिकवूं शकतात—यांचे विवरणांत रस्ते बांधणें व तत्सदृश कार्य यांचें महत्त्व वर्णिलें आहे.

हिंदुस्थानाइतके फारच थोड्या देशांना रस्त्यांचें सौंदर्य पटेल. जगांतील दोन मोठे रस्ते हिंदुस्थानांत आहेत. एक जुना हिमाल्यावरून चीनमध्यें जाणारा व्यापारी लोकांचा रस्ता, आणि दुसरा ब्रिटिश अमदानींत तयार झालेला ग्रँड-ट्रंक रस्ता. एका दृष्टीनें जगांतील सर्वांत जुना रस्ता हिंदुस्थानांतच आहे. प्रागेतिहास-कालीन मनुष्यानें सिंधु नदीच्या किनाऱ्यावरूनच पलीकडच्या प्रदेशांत पाऊल टाकलें असलें पाहिजे. इतर देशांच्या जोडीला आज हिंदुस्थानहि रस्ते बांधीत असून त्यांचें काम झपाट्यानें चाललें आहे.

आमच्या आयुष्यांत वाहतुकीचीं साधनें वाढलीं असून, बिनतारी तारायंत्र आणि विमानें यांमुळें नवीनच प्रदेश खुले केले गेले आहेत. रस्ते आणि रेल्वे यांवर यामुळें संकट उत्पन्न होऊन ते कांहीं काळ मागें पडल्यासारखे दिसले तरी, आपण आपल्या रस्त्यांकडे, कीं ज्या धमन्यांतून जीवन आणि उत्कर्ष हीं वाहत असतात त्यांकडे नेहमींच परत आलेलों आहोंत. आणि शैक्षणिक परिणामाच्या दृष्टीनें त्यांच्यामुळें ज्ञानलालसा, आत्म-प्रगति आणि उच्च जीवन कंठण्याची इच्छा हीं वाढतील.

राष्ट्रीय चेतना, उत्कर्ष, प्रगति हीं रस्ते बांधण्याच्या कामागीरीबरोबर आलीं असल्याचें इतिहास आपणाला शिकवितो. आपण रोमकडे फिरकलों काय किंवा नेपोलियनच्या फ्रान्सकडे गेलों काय, अथवा पांच खंडांपैकीं कोठेंहि गेलों काय, याचा पुरावा भरपूर सापडतो. उलट रस्त्यांकडे दुर्लक्ष केल्यानें चांगल्या गोष्टींतील प्रगति थांबल्याचें इतिहासच सांगतो. मानवी प्रगतीच्या सुरुवातीपासून महत्त्वाचे असलेले रस्ते हे रेल्वे आल्यामुळें मागें पडले, हें आपल्यापैकीं पुष्कळांना माहीत असेल. पण ते मागें पडले असले तरी नाहींसे झालेले नाहींत. रस्ते बांधण्याचें काम पुनः सुरू झालें असून, मोटारी आल्यामुळें या बाबतींत जगानें पूर्वी कधींहि न पाहिलेली प्रगति आणि वाढ हीं दिसत आहेत.

हिंदुस्थानांत, कीं जेथील प्रश्नांसारखे प्रश्न इतरत्र नाहींत तेथें, इतर उपयुक्त धाडसांमुळें रस्ते बांधणें हें कित्येक वेळां मागें पडलें आहे. आम्हांला

कित्येक वेळां वाटतें कीं, शिक्षणाच्या सतत ओरडीमुळें वाहतुकीचीं साधनें वाढविण्याकडे दुर्लक्ष झालेलें आहे. वास्तविक हीं परस्परांना पूरक असून, बरोबर जायला हवींत. अर्थात् काय झालें असतें हें आम्ही सांगत बसत नाहीं. हिंदुस्थानांत सांप्रत जो निश्चयपूर्वक प्रयत्न केला जात आहे तो सर्वस्वीं आमच्या इच्छेला धरून असून, त्यामुळें असें अमर्यादित आर्थिक क्षेत्र निर्माण होईल, कीं ज्याला चीनखेरीज तुलनेला दुसरा देश नाहीं. ही इच्छा आणि ही जरूरी कालप्रवाहाप्रमाणें पुरी केली जात असून, लोकांच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें रस्ते बांधणें तसेंच इतर वाहतुकीचीं साधनें वाढविणें हें अगत्याचें आहे.

हिंदुस्थानांत जर विशिष्ट अडचणी असल्या तर त्या आमच्या संस्थानांत किती तरी पटींनीं अधिक आहेत. इतक्या कीं आमच्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षांत आम्हांला वाहतुकीच्या साधनांची वाढ करतांना रस्त्यांच्या अगोदर रेल्वे हातीं घ्यावी लागली. रस्त्याला लागणारा दगड हा बडोद्यांत नसल्यानें रस्ते बांधणें आर्थिक असमाधानकारक स्थितींत जवळ जवळ अशक्य होतें. आणि अजूनहि ही अडचण भासते. तसेंच रेताड व विखुरलेल्या प्रांतामुळें आणि मध्यें येणाऱ्या इतर हद्दींमुळें रस्ते बांधण्याच्या योजनेंत अधिक अडचणी निर्माण होतात. परंतु या अडचणी एकदां रस्ते बांधले गेले कीं, त्यांना अधिक महत्त्वाचे बनवितील आणि त्या अडचणी चातुर्यानें दूर केल्यानें आमच्या अभिमानांत भर पडेल.

बडोद्यांतील रस्ते आणि रेल्वे हीं लोकसेवेकरितां परस्परांना पूरक करण्याविषयींची आमची इच्छा कांहीं गुपित नाहीं. भूतकालांत जर आम्हीं रस्त्यांपेक्षां रेल्वेकडे जास्त लक्ष दिलें असेल तर तें आतांच सांगितलेल्या--व अजूनहि चालू असलेल्या--कारणांमुळें. परंतु तूर्त रेल्वेची प्रगति बंद दिसली तरी, आम्ही अशा स्थितीपर्यंत आलों आहोंत कीं, जेव्हां दृढीकरणाचा किंवा सुधारणा करण्याचा कार्यक्रम, इतर भर टाकण्यापेक्षां, हातीं घेणें अधिक व्यावहारिक ठरेल.

अशा तऱ्हेनें रस्ते बांधण्याच्या कार्यक्रमाकडे आम्हांला लक्ष देतां येतें. आणि जेथें पूर्ण रस्ते बांधणें शक्य नसतें तेथें पूल आणि नाले बांधून, खेडीं आणि प्रांत यांच्यांतील वाहतूक पावसाळ्यांतहि चालू ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शेवटीं या योजनेनें रेल्वेचाच फायदा होईल याविषयीं आम्हांला शंका नाहीं. एका दृष्टीनें हें परस्पर मदतीचें चिन्ह आहे. कारण रेल्वेनें सोप्या बनविलेल्या वाहतुकीमुळेंच रस्ते बांधणें सोइस्कर आणि स्वस्त पडतें.

एक धोक्याची सूचना देणें आम्ही अगत्याचें समजतों. रस्ते, पूल, नाले हीं जोंपर्यंत आपणाला चांगल्या स्थितींत ठेवतां येत नाहींत, तोंपर्यंत तीं बांधणें निरर्थक आहे; आणि म्हणूनच आपण सावधपणें चाललें पाहिजे. आमच्या रस्ते

बांधण्याच्या योजनेंत, रस्ते चांगल्या स्थितींत कसे ठेवतां येतात, तसेंच त्यांकरितां पैसे कसे जमवावे वगैरे गोष्टींचें जें विवेचन आहे तें आपण अभ्यासावें अशी आमची इच्छा आहे. या रस्त्यांचा अर्थ काय आणि त्यांपासून तुमचा फायदा काय, वगैरे बाबींचा विचार रस्ते वापरणाऱ्या तुम्हां लोकांवर येऊन पडतो. प्रगतीच्या नव्या योजनेबरोबर उत्पन्न होणाऱ्या जबाबदाऱ्यांचा अभ्यास करणें, आणि यापुढील योजना तुम्ही तयार करून तडीस नण्याचा निश्चय करणें हें तुमच्या स्वतःच्या तसेंच पुढील पिढ्यांच्या दृष्टीनें तुमचें कर्तव्य आहे. या सर्व बाबतींत आमची तुम्हांला मदत व सहानुभूति मिळेल, हें सांगण्याची कांहीं जरूरी नाहीं.

कामाच्या पूर्ततेमुळें आपण एकत्रित झालों याचा आम्हांला आतां उल्लेख करूं द्या. आपणां सर्वांमध्यें पुनः उपस्थित झाल्याबद्दल आम्हांला आनंद वाटतो. मि. द मोरसीए हे आज हजर राहूं शकले असते तर बरें झालें असतें. कारण या योजनेची त्यांना खूप आवड असे, आणि त्यामुळें ती पूर्ण झालेली पाहून त्यांना अभिमान वाटला असता. मि. अडालजा व इतर मंडळी यांनीं या गायकवाडांच्या मोठ्या रस्त्यावरील खुणेचा दगड तयार करण्याच्या कामीं, प्रगतीचें हें चिन्ह निर्माण करण्याच्या कामीं, जे थोडे फार श्रम घेतले त्याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतों. पुलाचा साधेपणा आणि सुदृढपणा हा आमच्याप्रमाणेंच तुम्हांला स्फूर्तिदायक होवो.

आम्हांला असें सांगण्यांत आलें आहे कीं, हीरकमहोत्सवाबरोबर पूर्णतेला पावलेल्या या महत्त्वाच्या पुलाला, त्याच आनंददायक शुभ महोत्सवाचा कायमचा स्मृतिरूप होऊन राहील अशा प्रकारचें नांव दिलें जावें. आपल्या या प्रेमळ विचारामागें असलेली सन्मानवृत्ति पाहून आम्हांला आनंद वाटतो आणि त्याचें नांव 'श्री सयाजी हीरकोत्सव सेतु' असें ठेवण्याची सूचना आम्हांला पसंत आहे.

आतां आम्ही हा पूल खुला केल्याचें जाहीर करून, लोकसेवेकरितां तो समर्पण करतों.

ठाणे.

# ६३

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—ता. ७ फेब्रुवारी १९३६.

**विषय:**—कीर्तिमंदिर उद्घाटन-समारंभ.

सभ्य स्त्री-पुरुषहो,

आज आपण एका उज्ज्वल इमारतीच्या उद्घाटनसमारंभाकरितां जमलों आहोंत. दुसरें कांहींहि नसलें तरी या इमारतींत उच्च प्रकारचा साधेपणा आहे. कीर्तिमान् पुरुषांची स्तुति करून, पुढील पिढ्यांकरितां त्यांचा आदर्श पुढें ठेवण्यासाठीं आपण जमलें आहोंत. परंतु जोंपर्यंत आपण आणि आपले वंशज अमर कीर्ति कशावर आधारलेली असते याचा अभ्यास करीत नाहीं, तोंपर्यंत आपण जो प्रसिद्ध पुरुषांचा सन्मान करूं इच्छितों तो केला जाणार नाहीं. सत्याचा शोध करून आपण आपलें आयुष्य असें घडविलें पाहिजे कीं, मानवभ्रातृभाव, पृथ्वीवरील स्वर्ग, यांचें जें सर्वोत्तम ध्येय तें साधण्यांत आपलीहि मदत व्हावी.

जाति, संप्रदाय, पक्ष यांचा विचार न करतां जे जे कोणी आमच्या संस्थानचे उपकारकर्ते असतील त्यांचें हें कीर्तिमंदिर स्मृति-मंदिर व्हावें, अशी योजना आहे. संस्थानचे राज्यकर्ते, आणि दुसरे— कीं ज्यांनीं संस्थानची भवितव्यता घडविण्यांत श्रम घेतले आहेत— त्यांचें स्मरण यामुळें होऊन, मनुष्यांतील महत्त्वाच्या गुणांचा त्यामुळें सन्मान होईल. स्मारकें नष्ट झालीं तरी, सत्य हें अनंत असतें. अनंतकाळपर्यंत टिकणारी कीर्ति ही सत्याच्या सतत शोधावर आणि धार्मिक एकतानतेवर अवलंबून असते. सर्व धर्मांच्या आणि संप्रदायांच्या लोकांना प्रेमानें एकत्रित होऊन आणि सत्य शोधून काढून मानवजातीची सेवा करतां येईल अशा प्रकारची जागा तयार करण्याखेरीज सुप्रसिद्ध माणसांचा दुसऱ्या कोणत्याहि तऱ्हेनें अधिक सन्मान करतां येईल, असें आम्हांला वाटत नाहीं.

आपण अशा काळांत राहत आहोंत कीं, ज्यांत धर्म याचा अर्थ कट, भांडण आणि लूटमार असा समजला जातो. शांतता आणि ऐक्य, समाधान आणि सुख, हीं मिळवून देण्याऐवजीं धर्म आज दुःख आणि असहिष्णुता हीं निर्माण करीत आहे. धर्मांचें पवित्र कार्य आणि उच्च तत्त्वें विसरलीं जाऊन आज धर्माला राजकीय आणि आर्थिक वर्चस्वाच्या चढाओढींतील शस्त्र समजण्यांत येत आहे. तत्त्व आणि व्यवहार यांत भयंकर अंतर असल्याचा दुर्लौकिक नाहींसा करणें कठीण आहे.

मुख्य प्रश्न हा आहे कीं, भौतिकवादाच्या मगरमिठींतून आणि आतां सांगितलेल्या धर्मांत पडलेल्या फरकांतून आपण आपला बचाव कसा करणार ? सर्व धर्मांतील प्रमुख तत्त्वांवर आधारलेल्या विश्वधर्मांच्या स्वप्नानें ? कित्येक लोक दुसऱ्या टोकाला जाऊन भूतकालाला न समजतां आणि भविष्यकालाचा विचार न करतां, धर्मांचीं बाह्य स्वरूपेंच निर्दयपणें नाहींशीं करायला निघालेले असतात. त्यांना फक्त वर्तमानकालाचीच पर्वा असते. त्यांना हें कळत नाहीं कीं, भूत, वर्तमान व भविष्य हीं फक्त मनुष्यानें कालाला लाविलेलीं रूपें असून, वास्तविक काल हा अनंतत्वाच्या गुणानें नटलेला व अविभाज्य असा आहे.

अधार्मिकता ही स्वतःबद्दल आणि मानवजातीबद्दल, निसर्गाबद्दल आणि वस्तुजाताबद्दल जबाबदारीचा अभाव दर्शविते. ती निरुपयोगी असून सर्वस्वीं वांझोटी आहे. उलट खरा धर्म हा समाजाचा पाया असून, जेव्हां त्याला द्वेषबुद्धीनें डिवचलें जातें, तेव्हां सबंध इमारत अस्थिर बनते.

कायद्याच्या क्षेत्रांत तीन कायदे जगावर अंमल चालवीत असलेले आढळतात. राज्यशास्त्र, नीतिशास्त्र आणि धर्मशास्त्र यांशीं अनुक्रमें संबंध असलेले सरकारी कायदा, नैतिक कायदा आणि धार्मिक कायदा हे ते कायदे होत. आपण धर्माला प्रतिबंध केल्यानें धार्मिक कायदा किंवा ईश्वरी कायदा यांचा संचारच नामंजूर केल्यासारखें होतें. सरकारी कायदे हे स्वभावतःच मर्यादित असून त्यांचा अंमल लहानशा क्षेत्रावर चालतो. निरनिराळ्या धर्मांचीं तत्त्वें आणि व्यवहार हीं परस्परविरोधी असतांना आपण मनुष्यांना चांगलें आणि सत्त्वशील कसे बनविणार ? आपण जग राहण्याजोगें आणि उपयुक्त कसें बनवूं शकणार ?

कित्येक देवाचें अस्तित्व मानतात, तर कित्येक मानीत नाहींत. कित्येक सिसेरोप्रमाणें असें मानतातः—“ कांहींहि तें असो– जें विचार करतें, जें समजतें, जें इच्छा करूं शकतें, जें कार्य करतें, तें कांहीं तरी दैविक असलें पाहिजे, आणि म्हणूनच ईश्वरी असलें पाहिजे.” त्यांना “ आत्मा हा पृथ्वीवरील अमर अतिथि वाटतो. निसर्गाच्या शक्तीनें वर जाणारी ती एक तेजशलाका आहे. मूळ प्रवाहापासून निघालेला तो एक नदीचा ओघ आहे.” दुसऱ्या कित्येकांना जें डोळ्यांना दिसूं शकत नाहीं किंवा इंद्रियांना समजूं शकत नाहीं त्याच्याशीं कांहींहि कर्तव्य नसतें. आत्म्याच्या भ्रमणावर कित्येकांचा विश्वास आहे, तर दुसऱ्या कित्येकांना या तत्त्वाचें कांहींच वाटत नाहीं. कित्येकांच्या मतें धार्मिक शहाणपण वेदांत साठविलें आहे. कित्येक बायबल, कुराण व इतर ग्रंथ यांचा उल्लेख करतात. खुद्द हिंदु धर्माच्या कक्षेंतहि महाभारत कालापासून मतांची विविधता आढळते. महाभारतांत म्हटलें आहेः —

**तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्नाः ।**
**नैको मुनिः यस्य वचः प्रमाणम् ॥**

( तर्क हा अस्थिर आहे, श्रुति पुष्कळ आहेत, आणि असा एकहि ऋषि नाहीं कीं ज्याचें मत प्रमाण मानतां येईल. )

आधुनिक कालांत तुलनात्मक धर्मांच्या अभ्यासानें निरनिराळ्या धर्मतत्त्वांत असलेली विविधता आणि विरोध, कीं जीं तीं धर्मतत्त्वें सर्वत्र वापरण्याच्या बाबतींत तसेंच त्यांच्या सर्वत्र सत्यतेविषयीं, त्यांत कितीहि ऐक्य असलें तरी संशय प्रदर्शित करतात तीं, उघड केलीं आहेत.

परंतु, आपण जेव्हां धर्मांची नैतिक बाजू तपासूं लागतों, त्या वेळीं सर्व धर्मांत पुष्कळ ऐक्य आढळतें. मनुष्य कोठेंहि राहो, आणि त्याची कोणतीहि जात असो, त्याच्या गरजा बहुशः सारख्या असतात. त्याला आपल्या आयुष्याच्या जरूरीच्या वस्तु मिळून त्याला इतरांबरोबर सुखानें राहतां येण्याकरितां अशा एका विधिसंग्रहाची जरूरी आहे कीं, ज्याला सर्वांची मान्यता मिळाली असेल. आणि मनुष्याच्या गरजा सारख्या असल्यानें, या कायद्यांचा सांगाडा सर्वत्र सारखाच असणार. अर्थात् मनुष्याच्या नैतिक गरजा निश्चित करून त्यांना विशिष्ट रूप देणें आपल्या शक्तीबाहेर वाटूं नये. यांत केवळ नीतिशास्त्र आणि धर्म हीं परस्परांपासून वेगळीं करावीं लागतील हें खरें; परंतु असला प्रयत्न कितीहि वर्धिष्णु वाटला तरी त्याची आज जरूरी असून, तो करणें आपलें कर्तव्य आहे.

ज्याला जगांत मान्यता मिळेल अशा प्रकारचें नीतितंत्र आमूलाग्र शोधून काढण्याचा प्रयत्न करण्याची आज आमची इच्छा नाहीं. परंतु त्याच्या महत्त्वाकडे लक्ष देऊन, अविरोधात्मक अशी एक लहानशी योजना या बाबतींत आम्ही सुचवितों. लहानपणीं मूल हें आपल्या मातापितरांच्या प्रेमळ शुश्रूषेवर, आणि ज्या समाजांत तें जन्मलें असेल त्या समाजाच्या काळजीवर सर्वस्वीं अवलंबून असतें. मिळविलेल्या फायद्यांची फेड तें त्या वयांत करूं शकत नाहीं. हळूहळू त्याच्या शक्ति वाढून, त्याचें मानसिक क्षेत्र विस्तृत बनतें. आजूबाजूच्या परिस्थितीचा, आयुष्याच्या विविध स्वरूपांचा, समाजाचा आणि सरकारचा मोठा होणाऱ्या मनुष्यावर परिणाम होतो. त्याला फायदे मिळतच असतात, पण आतां तो त्याची फेड करतो; तो आपलें कर्तव्य बजावतो आणि दुसऱ्यांच्या जबाबदाऱ्या दूर करतो. त्याच्या शक्तीच्या चांगल्या अगर वाईट वाढी-प्रमाणें तो समाजाचा उपकारकर्ता किंवा त्याला भारभूत होऊन राहतो. मनुष्यांत चांगलें काय आणि वाईट काय याची दिशा दाखवून, नीतिशास्त्र अनुभवानें आणि युक्तिवादानें सत्याचा विजय कसा होतो हें सांगतें.

सत्यासत्य हीं परस्परांपासून नीट वेगळीं करण्यापूर्वी, मनुष्य आपल्या हातीं असलेल्या साधनांचा कसा उपयोग करतो, यावर त्याची नीट परीक्षा झाली पाहिजे. या दृष्टीनें त्याचीं तीन प्रमुख साधनें मन, वाचा आणि कार्य हीं होत. त्याचें शरीर हें दशेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें, यांनीं घडणाऱ्या सर्व कृत्यांना जबाबदार असतें. वाचेनें तो आपल्या मनांतील भाव व्यक्त करतो आणि मनानें विचार करतो. वाईट किंवा चांगल्या गोष्टींचा अपरंपार संभव असलेली हीच त्याची साधनसामुग्री होय.

कृत्याच्या मर्यादित स्वरूपावरून काया हें अबल शस्त्र ठरतें. परंतु आपल्या साधनसामुग्रीचें तें निवासस्थान असल्यानें, तो एक पवित्र ठेवा आहे आणि पुष्कळ वेळां ठेवण्यांत येतें तसल्या बेजबाबदार व वाईट स्थितींत तिला न ठेवतां निरोगी व चांगल्या स्थितींत ठेवणें, हें आपणाला अधिक शोभतें. म्हणून शरीराची उत्तम निगा ठेवून तें सत्कार्यीं लावणें हें आपल्या विश्व-नीति-तंत्राचें पहिलें तत्त्व असूं द्या. सुख किंवा दुःख, वाईट किंवा चांगलें, यांकरितां वाचा हें सामर्थ्यवान् साधन आहे. वाचा मानवी भावनांना क्षुब्ध करते, आणि मानवी कृत्यांना नियंत्रित करते. तिला साहित्याचें स्वरूप दिल्यास, ती लाखों लोकांना हलवूं शकते. अर्थात्, आपलें दुसरें तत्त्व हें कीं, वाचा ही विचारी आणि पवित्र असावी.

सर्वांत मन हें अधिक प्रभावी असतें. तें शरीरावर नियंत्रण ठेवून ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांच्या व्यापारांना अंकुशांत ठेवतें. हा अंकुश कधी नियंत्रक असल्यास, विनाश ठेवलेला. जर विचार वाईट असतील तर मन, वाचा आणि कार्य यांत ऐक्य क्वचितच निर्माण होईल. ज्याचें मन, वाचा, आणि कार्य हीं एका सुरांत असतील तो कशाहि स्थितींत असला तरी उज्ज्वल शीलाचा समजला जातो. मनावरील ताब्यामुळेंच मनुष्याला आपल्या ठिकाणीं असलेल्या अनंत शक्तींचा उपयोग, वाचेनें आणि कृत्यानें, दुसऱ्याच्या कल्याणाकरितां करतां येतो. म्हणून उज्ज्वल आणि पवित्र मन हें विश्वनीतीचें तिसरें तत्त्व ठरतें.

मनुष्याच्या नियंत्रणशक्तीचा जेथें उपयोग होऊं शकतो असे मनुष्याच्या आयुष्याचे चार प्रकार आहेत. यांपैकीं प्रत्येकांत त्याला कायद्याचें पालन करतां येतें किंवा त्यांचा भंग करतां येतो. पुष्कळ नुकसान किंवा पुष्कळ कल्याण करतां येतें. घटक या नात्यानें सर्व प्रकारचे फायदे मिळाले असल्यामुळें समाजाचें त्याला ऋण असतें. कांहीं कारणांमुळें त्याला तें ऋण फेडतां न आलें तरी त्यानें समाजाला जखम करून आपली कृतघ्नता दर्शवूं नये. राजकीय घटक या नात्यानें, नियंत्रित सरकार आणि त्याचे कायदे यांच्यापासून त्याचें आणि त्याच्या मालमत्तेचें असें रक्षण झालेलें असतें कीं, जेणेंकरून त्याला आपलें रोजचें कर्तव्य शांततेनें पार पाडतां येतें.

याची फेड म्हणून त्यानें संस्थानाला निदान नुकसान तरी करूं नये. आर्थिक घटक या नात्यानें व्यापार, धंदा, उद्योग, यांत मनुष्य दुसऱ्याच्या सहकार्यांवर आणि सद्भावावर सर्वस्वीं अवलंबून असतो. या क्षेत्रांत त्याचें आचरण नैतिक कायद्यांनीं मार्गदर्शित केलें जातें. अर्थात् सत्यवक्तेपणा आणि उदारपणाची त्याच्याकडून परतफेड अपेक्षिली जाते. शेवटीं, मनुष्य कोठल्या तरी प्राचीन अगर पुढारलेल्या संस्कृतीचा घटक असतो. त्याचे विचार, उच्चार व आचार हे त्याच्या जन्मभूमींतील विशिष्ट रूढि आणि कायदे यांच्याप्रमाणें चाललेले असतात. त्या संस्कृतीच्या प्रगतींत आपला भाग देऊन, त्याच्या ऋणांतून तो मुक्त होऊं शकतो.

आतां प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, मनुष्यानें दैवी वा मानवी, सरकारी वा खाजगी, नैतिक वा धार्मिक, सांप्रदायिक वा रूढिमूलक, कायदे कां पाळावेत ? हा प्रश्न आपणाला विश्वनीतीच्या प्रमुख तत्त्वाकडे– सुस्वरतेकडे– नेतो. जगांतील प्रत्येक गोष्टींत, मग ती सूर्योदय–सूर्यास्ताची असो वा मनुष्याच्या जन्ममृत्यूची असो, तींत सुस्वरता दिसते. सुरेलतेच्या विरुद्ध बेसुरता आहे, आणि सर्व कायद्यांचा हेतु बेसुरता नष्ट करून सुस्वरता निर्माण करण्याचा असतो. नैसर्गिक कायद्यांचा भंग झाल्यास, मनुष्याला दुःख सहन करावें लागून त्याचे परिणाम ताबडतोब दिसतात. सरकारी कायद्यांचा भंग केल्यास शिक्षा होते. नैतिक, धार्मिक किंवा सामाजिक कायद्यांचा भंग केल्यास त्याचे परिणाम जरी तात्पुरते अप्रत्यक्ष किंवा अदृश्य वाटले तरी शेवट एकच असतो. कायदेभंग याचा अर्थ सुरेलताभंग, म्हणजे बेसुरता. सर्व बेसुरता ही अनैतिक वागणूक असून ही दुःख आणि तत्सदृश उपाधि निर्माण करते, मग हें दुःख वैयक्तिक असो वा सामाजिक असो.

सार्वत्रिक सुरेलता निर्माण करण्याच्या हेतूनें काया, वाचा आणि मन हीं कशीं नियंत्रित करावीं हें विश्वनीतीच्या योजनेच्या कक्षेंत येतें. विचार, उच्चार आणि आचार हीं ज्या नैतिक दंडकांना आणि ध्येयांना अनुरूप असावींत, त्यांचा विचार आपण केला पाहिजे. या ध्येयांचा विचार प्राचीनांनीं केला असून, त्यांनीं शिकविलेले धडे आजच्या संमिश्र जीवनालाहि उपयोगी पडणारे आहेत. गौतमधर्मसूत्रांत सांगितलेले आठ आत्मगुण हे प्रशंसनीय आहेत. पण सध्यांच्या काळांत चारित्र्यसंवर्धनाकरितां त्या गुणांत शौर्य, निश्चय व उद्योग यांची भर घालावयाला हवी.

अधिक व्यापक आणि सुसंबद्ध अशा गीतेंतहि ही योजना आहे. त्यांत दिलेले चार गुण तार्किक आणि सोप्या रीतीनें सांगतां येतील:—

१ संयम,

२ संस्कारप्रियता,

३ धर्म, आणि

४ विश्वबंधुत्व.

आपणाला दोन प्रकारचीं कर्तव्यें करावयाचीं असतात. आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनांत कित्येक गोष्टी आपणाला करावयाच्या असतात व कित्येक नसतात. अर्थात् तर्कपद्धतीनें चार प्रकारचीं कर्तव्यें आणि चार प्रकारचे सद्गुण ठरतात. आत्मसंयम आणि आत्माविष्कार हे नकारात्मक व होकारात्मक वैयक्तिक सद्गुण होत. न्यायमय कर्तव्य आणि औदार्यमय समाजसेवा हें नकारात्मक व होकारात्मक सामाजिक जीवनाचे सद्गुण होत. आत्मसंयमांत शौर्य, निश्चलता, शुद्धता आणि तप यांचा अंतर्भाव होतो. आत्माविष्कारांत शहाणपण, मोठेपणा, उद्योग, कुशलता, अहिंसा, सत्य आणि संस्कृति यांचा अंतर्भाव होतो. कर्तव्य आणि न्याय यांत उच्च न्याय आणि दुसऱ्याच्या अधिकाराबद्दल आदर यांचा समावेश होतो. समाजसेवा आणि औदार्य हे समानार्थक असून त्यांत सर्व प्रकारच्या दानवृत्तीचा अंतर्भाव होतो.

आपल्या तीन शक्तींचा उपयोग करतांना प्रत्येक मनुष्यानें अशा प्रकारच्या दंडकांशीं सुसंबद्ध आचरण ठेवलें पाहिजे. जर त्यानें तसें केलें तर त्याच्या वैयक्तिक आयुष्यांत अपेक्षित सुरेलता तो उत्पन्न करूं शकेल. सर्व धर्मांत आणि सर्व युगांत वैयक्तिक गुण आणि नैतिक तत्त्वें जीं आढळतात त्यांचा या चार ध्येयांत समावेश होतो. जाति, संप्रदाय, धर्म, वृत्ति यांचा विचार केल्याशिवाय, त्यानेंच पूर्णता मिळविली असें म्हणतां येईल कीं, ज्याचें आचरण हें विश्वनीतींत सांगितलेल्या ऐक्याप्रमाणें असेल आणि ज्याचे विचार, उच्चार आणि आचार यांत सुसंबद्धता असेल.

या कीर्तिमंदिराची योजना, सद्गुणांचा अभ्यास आणि आचरण यांची प्रेरणा देण्याकरितां आणि ज्यांनीं हीं आचरणांत आणून आपल्याला आणि संस्थानाला भूषविलें असेल त्यांच्या स्मरणाकरितां आहे. सद्गुणांची वाढ करा आणि खालील संस्कृत सुभाषित सदैव ध्यानांत ठेवा, हेंच आमचें तुम्हांला शेवटलें प्रेरणात्मक सांगणें:—

**शरीरस्य गुणानां च दूरमत्यन्तमन्तरम् ।**
**शरीरं क्षणविध्वंसि कल्पान्तस्थायिनो गुणाः ॥**

(शरीर आणि गुण यांत महदंतर असतें. शरीर क्षणांत नाहींसें होतें, तर गुण हे कल्पान्तापर्यंत टिकतात.)

या मोठ्या मंदिराच्या कल्पनेंत वा पूर्णतेंत ज्यांनीं भाग घेतला असेल त्यांचें अभिनंदन करून आम्ही त्यांचे आभार मानतों. हें कीर्तिमंदिर उघडतांना आम्हांला वाटणाऱ्या अभिमानांत त्यांनाहि अंशभागी होण्याला कारणें आहेत. विश्वबंधुत्व व शांतता ज्यानें मिळवितां येईल त्या धार्मिक ऐक्याच्या शोधास्तव आणि सुप्रसिद्ध लोकांच्या स्मरणास्तव हें मंदिर आम्ही अर्पण करतों.

६४

**स्थलः**—बडोदें.

**कालः**—ता. २७ फेब्रुवारी १९३६.

**विषयः**—आपणाला हवा असलेला धर्म.

सभ्य स्त्री-पुरुषहो,

या छोट्या प्रवचनांपैकीं पहिलें प्रवचन हिंदु धर्माची उत्क्रांति यावर झालें. कीर्तिमंदिराच्या उद्‌घाटनाच्या वेळीं दिलेल्या दुसऱ्या प्रवचनांत आपण हिंदु धर्मापासून अखिल धर्माच्या रूपरेषेकडे वळून ज्यानें खाजगी आणि वैयक्तिक संबंधांत सुरेलता उत्पन्न होईल आणि विश्वबंधुत्वाला व जागतिक शांततेला मदत होईल अशा प्रकारच्या विश्वनीतीच्या बाह्य रूपाचें दिग्दर्शन करून तें संपविलें.

आज आम्हीं आधुनिक काळांतील व्यवहारी मनुष्याच्या दृष्टिकोनांतून, धर्म आणि नीति या दोन्हींवर बोलण्याचें ठरविलें आहे. स्थूलमानानें जग आणि प्रामुख्यानें हिंदुस्थान यांवर त्यांचा खरा परिणाम काय होतो तो दाखविण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोंत. व्यवहारी शब्दानें आम्ही अशा मनुष्याची कल्पना करीत नाहीं कीं जो आपल्या प्रत्येक विचार, हेतु आणि कार्य यांना कर्कश तर्कांची कसोटी लावीत असेल. समाजांत पाठीच्या कण्याप्रमाणें असणाऱ्या, आणि ज्याच्या मानवतेच्या सद्‌गुणविषयक कल्पनांवर संस्कृति सुप्रतिष्ठित झालेली असते, अशा सामान्य मनुष्याचाच आम्ही विचार करीत आहोंत.

धर्म आणि धार्मिक समजुती यांत सहिष्णुता असण्याविषयीं शंभर वर्षांपासून सांगण्यांत येत असे. त्या सांगण्यांत त्या काळांत कांहींहि जरूरी असली—आणि आजहि त्याची जरूरी नाहीं असें नाहीं— तरी सहिष्णुतेच्या ऐवजीं धर्मांत सहकार्याची मागणी करण्यांत आली असती तर सध्यांच्या पिढीच्या दृष्टीनें तें अधिक चांगलें झालें असतें. समजुतीवांचून सहिष्णुता ही वाटचंद गल्लीप्रमाणें होय. उलट सहकार्यानें समजुतीचा जन्म होतो. समजूत याचा अर्थ उदार मन; आणि उदार मनाची जगाला सध्यां फार आवश्यकता आहे. ही कांहीं नवी भावना नाहीं. कारण जुन्या संस्कृत सुभाषितांत सर्व जगाला कुटुंबाप्रमाणें मानणाऱ्या उदारचरित मनुष्याची स्तुति केली आहे.

**उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ।**

येशु ख्रिस्ताच्या "आपल्याप्रमाणेंच आपल्या शेजाऱ्यावर प्रेम कर" या वचनांत हेंच तत्त्व प्रमुख आहे.

आजच्या तिसऱ्या प्रवचनांत आपणाला तत्त्वज्ञानाच्या गूढ प्रांतांत नेण्याची किंवा ऐतिहासिक समालोचन ऐकवण्याची, ती कितीहि मनोरंजक असली तरी, आमची इच्छा नाहीं. अनेक जातींच्या आणि धर्मांच्या लोकांबरोबर केलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांविषयीं चर्चा, अवलोकन, देशांतर आणि अभ्यास—इत्यादींवर आधारलेले परिपक्व विचार, आपणासमोर मांडण्याची उलट आमची इच्छा आहे. या प्रश्नांत आमच्या मतें एक जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. "आपल्या वैयक्तिक आयुष्यक्रमांत आणि सामाजिक घडामोडींत धर्माकडून आपणाला अशा प्रकारचें मार्गदर्शकत्व मिळूं शकेल काय, कीं ज्यामुळें आपणाला निकडीचे प्रश्न सोडवतां येतील, आणि जग आपण पाहिलें त्यापेक्षां अधिक चांगल्या स्थितींत ठेवतां येईल?" आमची खात्री झाली आहे कीं, आपण असें करूं शकूं.

संमिश्र प्रश्नांनीं दुभंगलेल्या जगांत मनुष्यें, आपल्या वैयक्तिक आणि मानवजातीला त्रास देणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या उलगड्याकरितां, धर्माकडून तर त्याचा निकाल नाहीं का लागणार अशा हेतूनें, धर्माकडे वळत आहेत. आपल्या आयुष्यांतील हें अतिशय महत्त्वाचें व स्वागतार्ह असें वळण होय. कांहीं काळ पसरलेला संशयवाद हा चांगला नाहीं असें दिसतें, आणि भविष्यकाळांत धर्माचें नवें युग पसरेल अशीं चिन्हें दिसत आहेत.

मनुष्याचा स्वाभाविक कल धर्माकडे असतो. आज स्त्री-पुरुष असें विचारीत आहेत कीं, धर्म आपल्या उपयोगी कां पडत नाहीं? त्याचें वजन निरुपयोगी कां ठरत आहे? रशियासारख्या देशांत मोठमोठ्या धर्मांचीं पाळेंमुळें खणून काढण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले जात आहेत, त्या अर्थी कांहीं तरी मुळांतच वाईट आहे. कॅथोलिक आणि प्रॉटेस्टंट यांत उभा विस्तव न जाणाऱ्या आयर्लंडकडे, सेमेटिक लोकांविरुद्ध चळवळ चालविणाऱ्या जर्मनीकडे, धार्मिक अस्थिरता जेथें विचित्र व विविध स्वरूपें घेते त्या अमेरिकेकडे, ते बोट दाखवितात. आपल्या स्वतःच्या देशांत, कीं जेथें मोठमोठ्या धर्मांचा जन्म झाला, एके ठिकाणीं हिंदुमुसलमानांत झगडा, तर दुसऱ्या ठिकाणीं मुसलमान-शीख यांत झगडा, तर तिसरीकडे हिंदु-हिंदूंत झगडा, चाललेला आढळतो. या दूषित ग्रहाचा आणि क्षुद्र वृत्तीचा राष्ट्रीय गोष्टींतहि परिणाम होतो. आणि या सर्वांचा परिणाम जागतिक राजकारणावर स्पष्ट झालेला दिसतो.

ग्रेट ब्रिटनचे मुख्य प्रधान मि. बाल्डविन यांनीं या प्रश्नाची गंभीरता सोप्या शब्दांत नुकतीच व्यक्त केली आहे. येशु ख्रिस्तानें विश्वबंधुत्वाचा उपदेश केल्यानंतर दोन हजार वर्षांनीं देखील शस्त्रास्त्रें जमविण्यांत आणि युद्धाची तयारी

करण्यांत राष्ट्रें गुंतलेलीं पाहून त्यांना खेद वाटला. ही खेदकारक गोष्ट तर खरीच, परंतु मि. बाल्डविन यांनीं ती मिटविण्याचा इलाजहि सुचविला आहे. येशु ख्रिस्तानें शिकविलेला सोपा धडा आपण विसरलों नाहीं का? अनंत सत्याचा उपदेश करणाऱ्या सर्व उपदेशकांच्या उपदेशांत श्रीकृष्ण, बुद्ध, झरथुष्ट्र, महंमद, कनफ्युशियस, मोझेस इत्यादींच्या उपदेशांत हेंच तत्त्व सांगितलेलें आपण विसरलों नाहीं का?

त्यांचे उपदेश शाश्वत धर्मावर, सार्वत्रिकता आणि घरगुतीपणा, प्रामाणिकपणा आणि दयाशील वृत्ति, वास्तववाद आणि ध्येयवाद यावर आधारलेले असत. शतकापूर्वीं ते जितके सत्य आणि उपयुक्त होते तितकेच आजहि आहेत. आपण कोठें चुकलों असलों तर तें त्यांना विसरण्यांत. आपल्या आधुनिक परिस्थितीला कालइतकीं जुनीं आणि जिवंत सत्यें न लावण्यांत, आपण आज चूक करीत आहोंत.

वाईट दानत, अंध श्रद्धा आणि अवनति यांमुळें सत्य झाकलें गेलें आहे. आपल्या उणीवांत आपण संतुष्ट आहोंत. त्या उणीवा दूर करण्यांत आपण आळस करीत आहोंत आणि अशा तऱ्हेनें भावी पिढीकरितां आपण अधार्मिकता, भौतिकवाद आणि बौद्धिक क्रांतीचें बीजारोपण करीत आहोंत. धार्मिक आणि भौतिक प्रगतीच्या प्रयत्नांना खुंटवून टाकणारी असहिष्णुता आणि क्षुद्र वृत्ति हीं चालू ठेवण्याची आपली खटपट आहे. कल्पनांचें पुनरुज्जीवन, जाणती आणि गंभीर श्रद्धा, आणि अखिल मानवजातीसंबंधानें उदार मनोवृत्ति यांची सध्यां आपणाला फार जरूरी आहे. पांचशें वर्षांपूर्वी कबीरानें आपल्या शिष्यांना बंधुत्वाचा उपदेश करतांना सांगितलें कीं, 'सबसे हिलिये, सबसे मिलिये' कारण जे पृथ्वीवरील जीवांना आपल्याप्रमाणेंच मानतात तेच अमृतत्व मिळवितात.

रूढि आणि जीर्ण मतांच्या शिंपल्यांतून बाहेर येऊन आपण आपल्या जुन्या आणि पवित्र श्रद्धेकडे फिरलें पाहिजे. आधुनिक गरजांप्रमाणें आपली वृत्ति बनविली पाहिजे. धर्म हा प्रवर्तक आहे, स्थिर नाहीं; वाढत राहणारी ती क्रिया आहे, एखादें निश्चित तंत्र किंवा पूर्णत्वाला पोंचलेली ती वस्तु नाहीं. बर्कचें सुप्रसिद्ध वचन आपण धर्माला लावूं शकतों. प्रगतींत कोणतीच वस्तु आपल्या मूळच्या स्वरूपांत राहूं शकत नाहीं. लहान मुलांच्या पाळण्यांत मोठ्या मनुष्याला घालून झोके देण्याइतकेंच तें हास्यास्पद आहे.

आत्म्याला स्वातंत्र्य मिळूं द्या, जीवनाला नव्या परिस्थितीशीं सलोखा करूं द्या. या क्रियेपैकीं कापून टाकण्याचा भाग महत्त्वाचा असून, जिवाला कोठें रोग लागला आहे, कोठें मृत्यूचीं चिन्हें दिसत आहेत, हें आपण निर्भयपणें आणि स्पष्टपणें पाहिलें पाहिजे. अलीकडच्या आपल्या अडचणींत, सुधारक आणि वाईट गोष्टींना मारक अशा हिंदु धर्माचा हट्टानें बचाव करणाऱ्या वृत्तीची मुख्य अडचण

आहे. हवामान आणि स्थानिक परिस्थिति यामुळें निर्माण झालेल्या श्रद्धा आणि तंत्र यांना चिकटून राहिल्यामुळें आपले सर्व प्रयत्न खुरटून जातात. पूर्वी असल्या गोष्टींना कांहींहि कारणें असलीं, तरी आज तीं अस्तित्वांत नाहींत.

जगांतील प्रमुख धर्मांनीं प्रतिपादिलेलीं स्थूल तत्त्वें हीं जरी सर्व कालांत आणि सर्व देशांत सत्य असलीं, तरी जुने धर्मग्रंथ हेच शहाणपणाचे आदि अंत होत, हें मानणें चुकीचें होय. अलीकडच्या आपल्या निकडीच्या प्रश्नांना पूर्वीच्या काळांत जोड नसल्यामुळें, या धर्मग्रंथांचें मार्गदर्शकत्व आपणाला मिळत नाहीं आणि मिळालें तरी तें न मिळाल्यासारखें असतें. आधुनिक हिंदुस्थानांत ज्या स्त्रियांच्या शिक्षणाचा आणि उद्धाराचा प्रश्न महत्त्वाचा समजला जातो, त्या स्त्रियांना गीतेंत पुरेसें स्थान नाहीं. आणि आम्हांला मुळींच असें वाटत नाहीं कीं, श्रीकृष्ण जर आज आपणांत असते तर त्यांना ज्या जातिसंस्थेच्या कठोरतेमुळें लक्षावधि लोकांना दास्यांत आणि दुःखांत खितपत पडावें लागतें, ती आवडली असती. निसर्गाच्या आणि अर्थशास्त्राच्या विरुद्ध जातिसंस्था आहे. उलट सामान्य न्यायाप्रमाणें सर्वांना सारख्या संधि मिळावयाला हव्यात. ज्या मदतीचा विनियोग अपुरें संगोपन होणाऱ्या मुलांकरितां, किंवा प्रसूतीपूर्वी आणि प्रसूतीनंतर स्त्रियांकरितां, किंवा दुःखित जनावरांकरितां करतां येईल ती मदत धट्ट्याकट्ट्या संन्याशांना करण्याची कल्पना श्रीकृष्णाला आवडणार नाहीं.

आपल्या लोकांत असलेल्या दानधर्माच्या कार्यांच्या अव्यवस्थित जाळ्याविषयीं आम्ही एक क्षणहि अनुदारपणानें बोलावयाला किंवा तें विसरायला तयार नाहीं. परंतु त्याला वेगळें वळण लागावें असें आम्हांला वाटतें. खरा धर्म अभागी आणि दुःखी लोकांची काळजी घ्यावयाला व त्यांना सुखी करावयाला सांगतो, आणि सर्व लोकांबद्दल सद्भाव बाळगावयाला शिकवितो. हिंदुस्थानांत आपणाला सांघिक वृत्तीची, सर्व मनुष्यांना एखाद्या कार्याकरितां एकत्रित करणाऱ्या शक्तीची फार जरूरी आहे. जाति-संस्थेनें आपणाला विभागिलें आहे. आपणाला संघटित आणि सहकारमूलक तत्त्वाची जरूरी आहे. पश्चिमेंत यांत्रिक सुधारणांनीं स्वार्थी व्यक्तिवाद बळावला तसा येथें बळावूं नये, याची काळजी आपण घेतली पाहिजे. जातीची क्षुद्र वृत्ति कमी करून सांघिक वृत्ति निर्माण करणें कांहीं आपणास अवघड नाहीं. उच्चतर स्वामिभक्ति आणि राष्ट्रीय कल्याण याकडे, तसेंच मानवजातीच्या सुखाकडे, ही वृत्ति लावून दिली पाहिजे. आपणांत असा एकहि नाहीं कीं जो पुढील पारशी तत्त्वांना मान्यता देणार नाहीं: "जो दुसऱ्यांना सुखी करतो तोच सुखी. सद्गुणाचा मोबदला सद्गुण आणि निसर्गाच्या कायद्याच्या विरुद्ध वर्तन केल्यास शिक्षा मिळालीच पाहिजे."

हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती यांना एकत्र येण्याला अनेक प्रकारच्या समाजसेवारूपी खऱ्या धर्मांतच स्थान आहे. कारण समान हेतूंत आणि ध्येयांत, आपल्या जखमा भरून निघतील आणि भेदभाव विसरले जातील. या सर्वांकरितां तुम्हांला प्रमाण आणि दाखला हिंदुस्थानच्या एका महान् शिक्षकांत आणि महान् राजांत सापडेल. एक धार्मिक साम्राज्याचा चक्रवर्ती, आणि दुसरा धार्मिक ध्येयें असलेल्या भौतिक साम्राज्याचा चक्रवर्ती होता. बुद्ध आणि अशोक यांनीं धर्माला मानवी बनविलें आहे. सत्कर्म करणें, पापापासून दूर राहणें, मन आणि अन्तःकरण शुद्ध करणें, हेंच शाश्वत सत्य होय, असें दोघेहि सांगतात. गुरुजनांचा आणि मातापितरांचा आदर करणें, पत्नी आणि पुत्र यांचें रक्षण करणें, गरीब आणि रुग्णाइत यांची शुश्रूषा करणें, हाच खरा धर्म होय, असें दोघे सांगतात. धर्म हा गुप्त सत्यांत किंवा उच्चारलेल्या मंत्रांत नसून, तो मानवजातीच्या कल्याणार्थ केलेल्या सेवेंत, मध्यम मार्गांत आहे, आणि तो सर्वांकरितां आहे, असेंहि दोघांचें सांगणें आहे.

पन्नास वर्षांपूर्वी ज्याला हिंदुस्थान माहीत होता आणि प्रिय होता ते म्हणत, "हिंदु धर्म हा प्रक्षुब्ध सागरासारखा, किनाऱ्यावांचून असणारा, क्षितिज न दिसणारा, अमर्यादित अंध श्रद्धा आणि विचित्र कल्पनाशक्ति यांच्या वाऱ्यांनीं आंदोलन पावणारा, असा आहे." आज अंध श्रद्धा कमी झाली असून, कित्येक श्रद्धाच घालवून बसल्याच्या संकटांत आहेत. परंतु अजूनहि आपल्या धर्मांत अद्भुत व विचित्र असें पुष्कळ आहे. काळाच्या कसोटीला उतरलेल्या प्रमुख तत्त्वांचा आज आपण शोध केला पाहिजे, आणि जुने रीतिरिवाज व समजुती, ज्या बहुजनसमाजाच्या अंध श्रद्धेमुळें फुगल्या आहेत किंवा भिक्षुकवर्गाच्या महत्त्वाकांक्षेमुळें व लोभामुळें उत्पन्नाचें साधन बनविल्या गेल्या आहेत, त्यांच्यावर विधायक टीका केली पाहिजे. हिंदुस्थानांत नवजीवन निर्माण होत आहे यांत शंका नाहीं. राष्ट्रांच्या समुदायांत आपली हक्काची जागा मिळविण्याचा त्यानें निश्चय केला आहे. परंतु त्याचे प्रयत्न सफल होण्यापूर्वी त्याला आत्मप्राप्ति होऊन त्यानें आपलीं बंधनें झुगारून दिलीं पाहिजेत.

आपली प्रगति खुंटविण्यांत, मूर्तिपूजा ही खेदजनक आहे असें आम्हाला वाटतें. प्रतिमापूजनानें ईश्वराविषयीं अनादर व्यक्त केला जाऊन, मूर्ति या केवळ प्रतिमा होत आणि त्या अज्ञजनांच्या साठीं होत ( प्रतिमा स्वल्पबुद्धीनां देवः ), हें कळेनासें होतें. उच्च तत्त्वाकडे नेणारी, परमात्म्याची प्राप्ति करून देणारी, ब्रह्म आणि आत्मा यांचें ऐक्य प्रतिपादन करणारी ( जीवो ब्रह्मैव नापरः ) ती एक पायरी आहे. मानवजातीच्या कल्याणार्थ उपयुक्त सेवा करण्याबद्दल हें तत्त्व प्रेरणा केल्याशिवाय राहणार नाहीं.

अशाच पायावर खऱ्या आणि उज्ज्वल मानवतेची उभारणी होऊं शकेल. स्वतःच्या आयुष्यक्रमांत आणि इतर लोकांशीं ठेवलेल्या आपल्या संबंधांत ईश्वराचें तो प्रतिबिंब पडलेलें दर्शवील. नवा समाज आणि नवें जग यांच्या निर्मितीकरितां, जग ही ईश्वरी नाटकाची रंगभूमि आहे. येथें असत्यावर सत्याचा आणि अंधःकारावर तेजाचा विजय होतो असें समजून, तो प्रयत्न करीत असतो. पारशी, ख्रिस्ती आणि ज्यू यांच्या समाजसेवेंत असल्या वृत्तीचा प्रादुर्भाव आढळतो. आणि तिची शिफारस फक्त हिंदुस्थानालाच नाहीं तर मूल्यमापनाच्या नव्या धोरणाच्या शोधार्थ चाचपडणाऱ्या जगालाहि करतां येईल.

आपले विचार आणि कार्यें हीं नव्या धर्माच्या शोधाकडे लावा, असेंच आम्ही सांगत नाहीं. निःस्वार्थ आणि नैतिक जीवनाची, स्फूर्तीची, उत्साहाची प्रेरणा शोधून काढण्याकरितां आणि मानवी मूल्यमापनाचा फेरतपासणी करण्याकरितां आम्ही आपणाला विनवीत आहोंत. जर धर्म हा स्फूर्तिदायक आणि प्रेरणात्मक बनावयाचा असेल, तर आपणाला त्याची नवी व्याख्या, नवी व्याप्ति ठरविणें जरूर आहे. सत्य आणि प्रामाणिकपणा या साम्राज्याचें जुनें भारतीय ध्येय आपण पुनः सुरू करूं नाहीं का शकणार? चार आश्रम आणि निष्काम कर्म यांत असलेलें तत्त्व पुनः मिळवून तें यांत्रिक युगाला आपणाला नाहीं का लावतां येणार? धार्मिक आणि नैतिक सत्याच्या शोधार्थ आपणाला त्या तत्त्वाची फारच जरूरी आहे. कोठेंहि आपणाला आढळलें तरी सत्य हें सत्यच असतें. धर्मांत शास्त्रीय वृत्ति आणि शास्त्रांत धार्मिक वृत्ति आपणाला हवी आहे. अथेन्स वा जेरुसलेम, काशी वा मक्का यांमध्यें, सर्व देशांच्या वाङ्मयांत, भाषेंत आणि विचारांत--- जेथें जेथें सत्य आढळेल तेथें तेथें आपण शोधूं या.

सर्व धर्म हें अखिल मानवजातीचें धन आहे. ती तिची पुंजी आहे. त्या सर्वांपासून आपण मोकळेपणानें आणि निर्भीडपणानें प्रेरणा मिळविली पाहिजे. श्रीकृष्ण, येशु ख्रिस्त किंवा बुद्ध यांच्या उपदेशांच्या मूळ स्वरूपांत फारच थोडा भेद आहे. त्यांनीं सांगितलेलीं नैतिक सत्यें त्यांच्या मूळच्या साधेपणांत, शेंकडों वर्षांपूर्वीप्रमाणेंच आजहि लागू आहेत. त्या सत्याभोंवतीं मागाहून तयार झालेल्या अनेक रूढींना चिकटून बसण्यांत आपल्या हातून चूक होत आहे. तत्त्वें मुळांत सार्वत्रिक व सर्वकाल टिकणारीं, वेळेवर उपयोगी पडणारीं आणि वेळेच्या बंधनाविरहित, अशीं आहेत. परंतु आपण त्यांना आधुनिक जगांत नीट बसतील अशीं केलीं पाहिजेत. जगाला त्यांची जरूरी आहे. परंतु आपण जुन्या कर्मकांडाचे, आणि दुष्ट रूढींचे दास म्हणून राहूं शकत नाहीं. जुनी प्रथा नाहींशी होते आहे. मूल्यमापनाचें धोरण बदलत आहे. क्षितिजें विस्तृत बनत आहेत. आजच्या संपूर्ण

आणि संमिश्र जीवनांत प्रवेश करीत असतांना भारतवर्षानें सामाजिक आणि वैयक्तिक नीतीची नवी उद्‌घोषणा करण्याची जरूरी आहे.

आधुनिक मनुष्याच्या धर्माचीं मुख्य तत्त्वें आमच्या मतें, माणुसकी, सारखेपणा, समतोलपणा, सेवा आणि नीति-हीं होत. तीं ईश्वराच्या भक्तींत आणि मनुष्याच्या प्रेमांत साठविलीं आहेत. आपल्या धर्मांतील संत आणि इतर धर्मांतील प्रेषित यांनीं शिकविलेलीं आणि आचरणांत आणिलेलीं, हींच तीं ध्येयात्मक जीवनाचीं प्रमुख तत्त्वें होत. पूर्वंदूषित ग्रह आणि बददानत यांपासून अलिप्त, तसेंच सत्याच्या सामर्थ्यानें युक्त, असा याहिपेक्षां सोपा धर्म कां असूं नये ? तो स्पष्ट असावा, गूढ नसावा, क्रियामूलक असावा, निष्क्रिय असूं नये. माणुसकीनें युक्त असावा, अमानुष नसावा, आणि मग पुनर्जात व पुनरुत्स्फूर्त असा भारतवर्ष, पूर्वीप्रमाणेंच अनेक राष्ट्रांना मार्गदर्शक ठरेल.

सर्वांतील उत्तम उत्तम घेत, आणि सर्वांतील नैतिक उपदेशांना सारखेंच महत्त्व देत, चला. आपण सर्व धर्मांचा अभ्यास करूं या. भारतवर्ष आणि समस्त जगत् याच रीतीनें घालविलेला तोल सांभाळूं शकतील. ग्रीक लोकांनीं मनुष्याचा अभ्यास करून सर्व वस्तूंचीं मूल्यें त्यांच्यावरून बांधल्यामुळें तें तत्त्वज्ञान, कला, राजकारण इत्यादींचा शाश्वत ठेवा आपणाकरितां ठेवून गेले. आपला ध्येयवादहि मनुष्यस्वभावाच्या सत्य गोष्टींवरच आधारला गेला पाहिजे. मनुष्याच्या सूक्ष्म अभ्यासावर, त्याच्या हेतूंवर आणि भावनांवर, त्याच्या तऱ्हेवाईकपणावर आणि शहाणपणावर, त्याच्या प्रतिभेवर आणि तर्कशक्तीवर, आपल्या धर्माची आणि सामाजिक सुधारणांची वाढ केली पाहिजे.

मनुष्यांत असलेला चांगुलपणा, महत्कार्यांकरितां स्वार्थत्याग करण्याची त्याची वृत्ति आणि उज्ज्वल रीतीनें जगण्याची त्याची शक्ति हीं आपण पुनः प्राप्त केलीं पाहिजेत. ग्रामपुनर्घटनेच्या अनेक कार्यांवर, कुटुंबाच्या अंतर्गत सुधारणांवर, सामाजिक पुनर्रचनेवर, चांगल्या शहराच्या बांधणीवर केंद्रीभूत करवितां येईल अशा तऱ्हेनें आपण मनुष्यांत असलेल्या गुप्त राष्ट्रप्रेमाला आणि अंधुक ध्येयवादाला चेतना दिली पाहिजे. आहारविषयक भ्रामक कल्पना सोडून देऊन शरीराला पोषक आणि स्वादाला उत्तम अशा प्रकारचें अन्न सेवन करण्याविषयीं आपण मनुष्यमात्राची समजूत घातली पाहिजे. अधिक सुदृढ, आनंदी आणि उत्साहयुक्त जीवन हें आपल्या आयुष्यांतील सर्वसाधारण ध्येय असलें पाहिजे. ग्रीक सुभाषितांत म्हटलें आहे, 'आरोग्य नसेल तर प्रयत्नांना सामर्थ्य पुरें पडणार नाहीं, पैसा निरुपयोगी ठरेल, वक्तृत्व वायां जाईल.' 'आरोग्य हेंच धन,' या आपल्या म्हणींतहि हेंच नैतिक सत्य सांगितलें आहे. शारीरिक, मानसिक आणि

आत्मिक आरोग्य भारतवर्षांत पुनः प्रस्थापित करण्याची जबाबदारी आपणावर आहे. आपल्या मार्गांत असलेल्या अडचणींना आम्ही कमी समजत नाहीं. परंतु सर्व धर्मांतील मूलभूत पावित्र्य आपण मिळविलें, मानवजाति आणि इतिहास यांनीं शिकविलेल्या नैतिक धड्यांचा अभ्यास केला, आणि आपलें जीवन व कार्य त्यांवर अधिष्ठित केलें तर या अडचणी आपणाला उल्लंघितां येतील. तरच विश्वनीति आणि सद्धर्म, विश्वबंधुत्व आणि ईश्वराच्या भक्तीची विस्तृत दृष्टि– यांत भारतवर्षाला आणि जगाला पुनः शांतता आढळेल.

आपल्यापुढील प्रश्नांच्या उलगड्यांकरितां, आचरणानें आणि उपदेशानें आपण सर्वजण मदत करा, अशी आम्ही आपणां सर्वांना कळकळीची विनंति करतों. कारण आमची अशी खात्री आहे कीं, जागतिक सद्भाव आणि समजूत यांचा एकत्रित परिणाम हा परिणामकारक ठरल्यावांचून राहणार नाहीं. आणि ऋग्वेदांतील एका संस्कृत प्रार्थनेची, रोजच्या पोषक विचाराकरितां आम्ही आपणाला शिफारस करतों. गेल्या पांच हजार वर्षांत तिच्यांतील सौंदर्य वा सत्य कमी झालेलें नाहीं:—

जो एक आणि अद्वितीय आहे,
जो जाती, संप्रदाय, रंग इत्यादि भेदांच्या पलीकडे आहे,
जो आपल्या असंख्य गरजा जाणून आपल्या अनंत शक्तींनीं पुऱ्या पाडतो,
जो जगाच्या सुरुवातीला मध्यें आणि शेवटीं असतो,
तो आपणा सर्वांना भ्रातृभाव आणि सद्विचार यांत एकत्रित करो.

## ६५

**स्थलः**—क्वीन्स हॉल, लंडन.

**कालः**—तारीख ३ जुलै १९३६.

**प्रसंगः**—वर्ल्ड फेलोशिप ऑफ फेथ्सच्या दुसऱ्या अधिवेशनांतील प्रास्ताविक भाषण.

डेम इलिझाबेथ कॅडबरी, सर फ्रॅन्सिस यंगहस्बंड, उमराव, आणि सभ्य स्त्री पुरुषहो,

शिकागो येथें भरलेल्या पहिल्या सर्वधर्मपरिषदेंत प्रास्ताविक भाषण करण्याचा आम्हांला जो सन्मान मिळाला होता त्याला तीन वर्षें झालीं. आपल्या अनेक प्रश्नांचा उलगडा सर्व धर्मांत असलेल्या प्रमुख सार्वत्रिक सत्याच्या जोरावर करण्याच्या आपल्या उज्ज्वल कार्यांत, आम्हांला सहभागी करून ही संधि दिल्याबद्दल आम्हांला

अभिमान वाटतो. तीन वर्षांपूर्वी आपण अशा भावनेनें एकत्रित झालों होतों कीं, आपण या तत्त्वांचा व्यावहारिक उपयोग आपल्या आणि समाजाच्या आयुष्यांत केला तर, आपण जग आपल्याकरितां आणि आपल्या बंधुजनांकरितां आहे त्यापेक्षां अधिक सुखी बनवूं शकूं.

असहिष्णुता, पूर्वग्रह आणि लोभ यांनीं विदारलेल्या आणि बुद्धीला कुंठित करून सोडणारे कूट प्रश्न समोर असलेल्या, क्षुब्ध आणि दुःखी जगाकडे जेव्हां आपण आज पाहतों, त्या वेळीं आपण हातीं घेतलेल्या कार्याच्या साशंकतेच्या विचारानें आपण सहजच निराश होतों. तरीहि निश्चयी मनानें आणि उत्कट आशेनें आपण पुढें जाऊं शकतों. सर्व धर्मांचे पुढारी आणि विवेचक आपल्यासमवेत आहेत, आणि जगाचा मोक्ष विश्वबंधुत्वाच्या कल्पनेंत आहे, अशा विचाराच्या प्रत्येक देशांतील लक्षावधि लोकांचे आपण प्रतिनिधि आहोंत.

आपली खात्री असल्याप्रमाणें जर खरोखर श्रद्धा बसत असेल, तर आपलें अन्तिम ध्येय साधण्यांत धर्मांचें कोठें चुकतें तें शोधून काढून, त्यांतील चुका नाहींशा करणें हेंच आपणाला योग्य होय. लोकसमुदायरूपी फार मोठ्या शक्तीला गवसणी घालण्याचें सामर्थ्य धर्मांत असल्यावर त्याचा लोकांवर होणारा परिणाम हा अपरिहार्य आहे. जागतिक सद्भाव आणि समजूत यांचा संघटित परिणाम हा भयंकर असतो, याविषयीं कोणाला शंका असेल असें आम्हांला वाटत नाहीं.

परंतु आपणाला जर यशस्वी व्हावयाचें असेल तर आपण धर्मांचें पृथ-करण करून आजच्या त्याच्या उणीवा शोधून काढण्यांत आपण निर्भीडपणा दाखविला पाहिजे. आजच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संबंधांत जी दोषार्ह स्थानिक असहिष्णुता व पूर्वग्रहदूषितता आढळते, तिचा प्रतिध्वनि धार्मिक कलहांत व द्वेषांत होतो, हें नाकारण्यानें आपला फायदा होणार नाहीं. सर्व पापांचा नायनाट कर-णाऱ्या आत्मिक बलानें ज्या जड भौतिकवादाचें आपण आनंदानें स्थानांतर करूं इच्छितों तो, धार्मिक बेपर्वाई, अज्ञान किंवा पुढारीपणाकरितां केलेली खटपट यांमुळें निर्माण झालेला असतो, हेंहि आपण नाकबूल करूं शकत नाहीं. आणि हें जर खरें असेल तर आपण आज ज्या जगांत राहतों त्यांतील वाईट स्थितीबद्दल येणाऱ्या दोषाचा भागहि आपण स्वीकारला पाहिजे.

सर्व धर्मांत सामान्य असलेल्या श्रद्धांकडे आपण परत फिरलें पाहिजे, आणि त्यांच्यावर अशा विश्वबंधुत्वाच्या धर्मांची उभारणी केली पाहिजे कीं, ज्यांत नुसतीच सहिष्णुता नसल—कारण ती आज अपुरी आहे—तर मानवजातीच्या कल्याणाकरितां सहकार्य करण्याची भावना असेल. मानवजातीला नव्या धर्माकडे फिरण्याविषयीं विनंति न करितां, सर्व धर्मांत असलेल्या प्रमुख श्रद्धांचा विचार

करावयाला सांगितला पाहिजे. या श्रद्धांचें आधुनिक गरजांप्रमाणें आणि शास्त्रांच्या महान् सत्याप्रमाणें महत्त्वमापन केलें पाहिजे.

धार्मिक बंधुत्वाची ही कल्पना नवी आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. सर्व धर्मांच्या आणि धर्म नसलेल्या लोकांच्या परिषदेंत– कीं जेथें महत्त्वाच्या धार्मिक प्रश्नांवर उपयुक्त आणि सद्‌भावयुक्त चर्चा होई-- तेथें महान् हिंदु राजा हर्ष हा अध्यक्ष कसा झाला होता हें बाणानें आपल्या हर्षचरितांत सांगितलें आहे. भारतवर्षाच्या धार्मिक ग्रंथांत, एकाच समुद्राकडे धाव घेणाऱ्या आणि ज्या ज्या देशांतून वाहत असतील त्या त्या देशांतील मातीचा रंग धारण करणाऱ्या निरनिराळ्या नद्यांची उपमा निरनिराळ्या धर्मांना दिलेली आहे. पर्वतावरून वाहणाऱ्या पावसाळ्यांतील जलौघांची किंवा एकाच मातींतून निर्माण झालेल्या विविध भांड्यांची उपमा, निरनिराळ्या धर्मांना उपनिषदांत दिलेली आहे.

महाभारतांत आपणाला विश्वधर्माचा तसेंच विशिष्ट धर्मांचा उल्लेख आढळतो. खऱ्या नैतिक आचरणांत श्रद्धा, विश्वस्नेह, दान आणि सद्भाव यांचा अंतर्भाव विश्वधर्मांत केला असून, जुन्या वेळचे हिंदु राजे आपल्या राज्यांतील विविधधर्मानुयायांना याच विश्वधर्माचीं तत्त्वें पालन करावयाला सांगत असत. आपल्या साम्राज्यांत सर्वत्र शिलाफलकांवर सुप्रसिद्ध सम्राट् अशोकानें याच धर्माचीं तत्त्वें प्रमुख लोकभाषेंत कोरविलीं होतीं, आणि असल्या तत्त्वांच्या प्रसारार्थ आणि आचरणाच्या प्रोत्साहनार्थ त्यानें धर्माधिकारी नेमले होते.

भीति किंवा बळजबरी यांचा अवलंब न करतां नैतिक आणि धार्मिक प्रगतीच्या जोरावर मिळणाऱ्या सुरक्षिततेचा उत्तम आणि टिकाऊ दाखला, भारतवर्षाच्या इतिहासांत मानवजातीच्या कल्याणार्थ केलेल्या ज्याच्या कार्याला तोड नाहीं, त्या सम्राट् अशोकाच्या, दीर्घ आणि शांततामय कारकीर्दीत पहावयाला सापडतो. मागाहूनच्या शतकांत झालेल्या क्रांतीच्या वेळीं या उज्ज्वल उदाहरणाचें अनुकरण झालें नाहीं, ही केवढी वाईट गोष्ट ! तरीहि ज्यांना जरूरी असेल त्यांच्याकरितां अजूनहि त्याचे लेख शाबूत आहेत. आमची अशी इच्छा आहे कीं, अनेक धर्मांच्या आणि अंधःश्रद्धांच्या भारतवर्षांत आमच्या देशबंधूंनीं अशोकाच्या शिकवणीकडे अधिक लक्ष द्यावें आणि समाजाच्या कल्याणार्थ सहानुभूतीनें आणि समजुतीनें वागावें.

इतक्या चांगल्या रीतीनें ज्या तत्त्वांचा स्वीकार आणि प्रचार अशोकानें केला, तीं सर्व धर्मांत आणि नैतिक तत्त्वज्ञानांत असून, सर्वकाल टिकणारीं आहेत. खऱ्या उन्नत आणि विचारी लोकांत, धर्माचा अर्थ धार्मिक भ्रातृभाव आणि विश्वबंधुत्व असाच केला जातो. बौद्ध धर्मांत विश्वस्नेह आणि विश्वदया या गुणांचा उपदेश केला आहे. हिंदु धर्मांत सांगितलें आहे, "शहाणा मनुष्य दुसऱ्याकडे

आत्मीय दृष्टीनें पाहतो." ख्रिस्ती धर्मात सांगितलें आहे, "आपल्या शेजाऱ्यावर स्वतःप्रमाणें प्रेम करा." आपल्या स्वतःच्याच धर्मातील ऐक्यतेच्या प्रसारावर धार्मिक भोंदूकडूनच भर दिला जातो.

दुर्दैवानें पूर्वीचीं साधीं सत्यें हीं कर्मकांडामुळें अंधुक बनलीं असून, आपण क्रियाकर्मांचे आणि पोकळ वचनांचे दास आहोंत, असें आपणाला आढळतें. या प्रकारची आपणाला चीड आली तरी तो समजण्याजोगा आहे. पूर्वीच्या काळीं, कर्मकांड असूनहि विविधश्रद्धावाल्या लोकांना निरनिराळ्या गटांत धर्म एकत्रित करूं शकत असे. लोक जसे एका देशांतून दुसऱ्या देशांत गेले तसा, तेथील लोकांच्या स्वभावभेदाप्रमाणें धार्मिक कर्मकांडांतहि फरक पडूं लागला. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि जागतिक स्थित्यंतराप्रमाणें धर्मातहि बदल झाला. तात्पर्य, इतर अनेक आयुष्यांतील गोष्टींप्रमाणें धर्म हाहि परिस्थिति आणि निसर्ग यांच्या नियमाप्रमाणें बदलणारा आहे.

पॅलेस्टाइनमध्यें येशु ख्रिस्तानें सांगितलेला ख्रिस्ती धर्म हा त्याच्या शिष्यांनीं सांगितलेल्या धर्माहून वेगळा आहे. तसेंच कॅथोलिक आणि प्रॉटेस्टंट देशांत आज प्रसृत असलेला धर्म हा मूळच्या धर्माहूनहि निराळा आहे. बुद्धानें सांगितलेल्या बौद्ध धर्मातहि तो जसा वैदिक धर्मानुयायांमध्यें पसरला आणि मध्य आशिया तसेंच दूरच्या प्राच्य देशांत गेला तसा त्यांत पुष्कळ बदल झाला.

धर्मातील शाश्वत भागापासून अशाश्वत भाग आपणाला वेगळा काढतां येतो. अशाश्वत भाग किंवा परिवर्तनशील भाग हा शब्दांवर, कर्मकांडावर आधारलेला असून, जातीय वृत्तीप्रमाणें, देशकालमानाप्रमाणें, लोकांच्या स्वभावाप्रमाणें आणि त्यांच्या गरजाप्रमाणें नेहमीं बदलत जातो व जात आहे. अपरिवर्तनशील भाग हा अन्यधर्मीय लोकांना बंधुत्वाच्या बंधनांनीं आणि संकुचित वृत्तीच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय भावना– कीं ज्या आधुनिक कालाला शापमूलक आहेत— त्यांना मागें टाकणाऱ्या सर्व धर्मातील सनातन व शाश्वत तत्त्वांनीं एकत्रित करतो.

सर्व धर्मांना सामान्य असलेल्या साध्या तत्त्वांवर आपण आपले प्रयत्न उभारूं या, आणि मनुष्यामनुष्यांत तसेंच राष्ट्राराष्ट्रांत असलेल्या संबंधांत या तत्त्वांना आपलें ध्येय बनवूं या. प्राथमिक शिक्षणाचीं प्रमुख तत्त्वें या दृष्टीनें त्यांना आपल्या मुलांच्या नित्यक्रमांत शिरूं द्या. आजचा मुलगा हा उद्यांचा नागरिक असतो. आणि लहानपणींच शीलसंवर्धन चांगलें होतें. खरें ज्ञान आणि सहानुभूतिमय समजूत हीं जसजशीं पसरतील, तसतशीं आपलीं दुःखें कमी होतील. जुना पंथ बदलत चालला आहे. आणि मूल्यमापनहि झपाट्यानें वेगळें बनत चाललें आहे. परंतु आपले प्रश्न कशाहि स्वरूपाचे असोत, वैयक्तिक असोत वा आंतरराष्ट्रीय असोत, सर्व धर्म ज्यांवर अधिष्ठित

आहेत, अशा प्रमुख तत्त्वांच्या आकलनानें आपणाला फायदा झाल्याविना राहाणार नाहीं. परंतु आपलें कार्य आणि वजन हीं निष्क्रिय स्वरूपाचीं नसावींत, आणि अपयशांनीं तसेंच अडचणींनीं आपला धीर कमी होतां कामा नये. राष्ट्राराष्ट्रांत भ्रातृभाव निर्माण करणें हें सत्कार्य आहे, आणि त्यांच्याकरितां आपण झटलें पाहिजे. नव्या समाजाकरितां आणि नव्या जगाकरितां आपण अविश्रांत मेहनत केली पाहिजे.

आम्ही आमच्या दीर्घायुष्याकडे मागें फिरून पाहतों तेव्हां आमच्या मनांत एक विचार आल्यावांचून राहत नाहीं. सद्भाव, समजूतदारपणा, सहकार्य—यांची आजच्याइतकी निकडीची जरूरी कधींच भासली नव्हती. महान् प्रेषितांनीं विश्वबंधुत्वाचा उपदेश सांगितल्याला अनेक शतकें लोटूनहि, आणि महायुद्धाच्या वणव्यांत लक्षावधि लोक मरून किंवा होरपळून गेल्याला वीस वर्षें झालीं नाहींत तोंच, राष्ट्रांनीं शस्त्रें वाढविण्याची खटपट करून, शांततेच्या प्रयत्नांना नेस्तनाबूद करावें—हें खरोखर आपल्या संस्कृतील काळिमा आणणारें आहे. तरीहि आम्ही आशावादी असून आमची खात्री आहे कीं, शेवटीं पुण्याचा पापावर विजय होणार. सर्व धर्मांतील उत्तमोत्तम घेऊन, त्यांच्या सनातन तत्त्वांवर, मानवजातीच्या निःस्वार्थ सेवेचें व्रत निर्माण करूं या. आपल्या विशिष्ट धर्मानें आपल्या आयुष्याला एक विशिष्ट प्रकारचा रंग प्राप्त होतो. याच्या उलट आपणां सर्वांत देशातीत आणि धर्मातीत असलेल्या सामान्य तत्त्वांमुळें आपणाला आपलीं उच्च ध्येयें साध्य करतां येतील.

धार्मिक भ्रातृभावावर आणि विश्वबंधुत्वाच्या, एकीकरणाच्या, कल्पनेला सुलभ बनविणाऱ्या शाश्वत सत्यावर आपण उपदेशानें आणि आचरणानें भर देण्याचें सुरू ठेवूं या. अडचणी अनेक आहेत व रस्ता लांब आहे; परंतु सद्भाव आणि समजूतदारपणा यांचा उपयोग आपले प्रश्न सोडवितांना जर आपण केला तर ईश्वराच्या विस्तृत कल्पनेंत तसेंच विश्वबंधुत्वाच्या कल्पनेंत जगाला शांततेची पुनः प्राप्ति होईल. संस्कृति आज अंधःकारांत चाचपडत आहे. तिला आपण वळण लावून तिनें घालविलेली किंवा घालविणार असलेली श्रद्धा तिला परत मिळवून देऊं या. आपण हातीं घेतलेलें कार्य उज्ज्वल आहे. अब्राहाम लिंकनच्या वृत्तीनें आपण पुढें जाऊं या : "आपण हातीं घेतलेलें कार्य, कोणाचा द्वेषभाव न धरतां सर्वांशीं दयाशील वृत्ति ठेवून, आणि ईश्वरानें सत्य पाहण्याकरितां दिलेल्या दृष्टीनें सत्याकडे विश्वासपूर्वक पाहत, पूर्ण करूं या."

६६

**स्थलः**—लंडन.

**कालः**—ता. ४ मे १९३७.

**प्रसंगः**—इंडिया हाउसमध्यें 'हिंदुस्थान आणि व्हिक्टोरिया' या विषयावरील व्याख्यानप्रसंगीं.

डॉ. डेव्हिस यांनीं ज्या तऱ्हेनें त्यांच्या विषयाचें प्रतिपादन केलें आहे त्याबद्दल आपण त्यांचें जरूर अभिनंदन केलें पाहिजे. आपल्याजवळील माहिती त्यांनीं सुसंगतवार लावून, ती फारच सोप्या रीतीनें आपल्याला सांगितली आहे. त्यांच्या कित्येक मतांशीं आपण सहमत होणार नाहीं, परंतु तो तूर्तचा मुद्दा नाहीं. उत्तम भाषण केल्याबद्दल ते आभाराला पात्र आहेत, याविषयीं आपणांत ऐक्यमत्य आहे.

ब्रिटिश राजघराण्याशीं गेल्या बासष्ट वर्षांपासून आमचा स्वतःचा संबंध असला, तरी आमच्या घराण्याचा संबंध फार जुना आहे. हा संबंध ड्यूक ऑफ एडिन्बरो हिंदुस्थानांत आले त्या वेळीं जडला. आमच्या पूर्वीच्या राजांपैकीं एकाला त्यांना मुंबईंत भेटण्याचा सुयोग लाभला. ड्यूक ऑफ एडिन्बरो यांना कशा सन्मानानें वागविण्यांत आलें वगैरे सोहळ्याची हकीकत निरनिराळ्या लोकांकडून आम्हांला लहानपणीं समजली होती. अर्थात् हें सर्व आमच्या जन्मापूर्वीच घडलें.

राजघराण्याशीं आमचा प्रथम संबंध १८७५ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत मुंबई मुक्कामीं प्रिन्स ऑफ वेल्स आले असतांना घडला. आम्ही तेव्हां लहान होतों. तरी पण त्या वेळीं पाहिलेल्या ऐश्वर्यमय चित्रांची स्मृति अद्यापि ताजी आहे. उदाहरणार्थ, प्रिन्स ऑफ वेल्स हे बोटींतून उतरून मोठ्या जनसमुदायांतून आपली वाट कसे काढते झाले, हें आम्हांला आठवतें. सुशोभित पोषाक केलेले अधिकारी आणि व्हाइसरॉय यांनीं त्यांचें कसें स्वागत केलें तेंहि आठवतें. रंगीत पोषाक परिधान केलेले, डोकीवर पगड्या घातलेले, गळ्यांत जवाहीर धारण केलेले किती तरी हिंदी राजे व्हाइसरॉयांच्या जवळ उभे राहून समोर दिसणाऱ्या शोभेकडे पाहत ड्यूकसाहेबांच्या भेटीची वाट पाहत होते. आम्हांला वाटतें आम्ही त्या वेळीं तेरा वर्षांचे असूं. तरी पण मानमरातबाविषयीं तंटे उत्पन्न होऊन ते मिटविण्यांत आले, तें आम्हांला स्मरतें.

डयूकसाहेबांची व आमची मुंबईत भेट झाल्यावर ते स्वतः आम्हांला भेटावयाला आमच्या राजवाड्यांत आले आणि भेट म्हणून त्यांनीं आम्हांला दागिने, घड्याळें तपकिरीच्या डब्या वगैरे वस्तु दिल्या. चालीप्रमाणें आम्हांलाहि उलट भेटीदाखल कांहीं वस्तु द्याव्या लागल्या. मुंबईत कांहीं दिवस राहिल्यावर राजपुत्रांनीं बडोद्यास येण्याची इच्छा दर्शविली, आणि त्यांच्या योग्यतेनुरूप सन्मान करण्यासाठीं आम्हांला तांतडीनें बडोद्यास परत यावें लागलें. त्या वेळेची देशाची परिस्थिति पाहतां हें काम दिसतें तितकें सोपें नव्हतें. पाश्चात्यांच्या जीवनाला काय काय वस्तु लागतात याची हल्लींप्रमाणें तेव्हां आम्हांला जाणीव नव्हती. तरी पण, अधिकाऱ्यांनीं आपल्या कामांत शिकस्त केली. एक गोष्ट राजपुत्रांना निःसंशय आवडली व ती म्हणजे डुकराच्या व इतर शिकारीची आम्हीं केलेली व्यवस्था.

आम्हीं उपस्थित असल्याचा यानंतरचा दुसरा प्रसंग म्हणजे दिल्ली दरबारचा. या दरबारांत राणी व्हिक्टोरिया या हिंदुस्थानच्या सम्राज्ञी म्हणून जाहीर केल्या गेल्या. त्या प्रसंगाचीहि आम्हांला पुरेपूर स्मृति आहे. त्या वेळीं राजेरजवाड्यांनीं घातलेले मौल्यवान पोषाक आणि दागदागिने यांची आम्हांला चांगली आठवण आहे. सुदृढ बांध्याचे आणि उमद्या चेहऱ्याचे चांगले सैनिकहि त्या वेळीं हजर होते. आम्हांला वाटतें हिंदी लोकांच्या शरीरसामर्थ्यांत हल्लीं पुष्कळ फरक झालेला आहे. ही गोष्ट खरी आहे कीं खोटी, आणि खरी असल्यास त्याला कारणें कोणतीं, यांविषयीं आमचे मित्र फील्ड-मार्शल सर विल्यम बर्डवुड हेच अधिक चांगलें जाणत असतील.

ज्या उच्चासनावर बसून व्हाइसरॉय लॉर्ड लिटन यांनीं हिंदी राजांना जाहीरनामा वाचून दाखविला तें आम्हांला स्मरतें. त्यांची मुद्रा, वाचण्याची शैली, तसेंच ग्वाल्हेरच्या महाराजांनीं त्यांना दिलेलें उत्तर हें सर्व आम्हांला आठवतें. निझाम सरकार, म्हैसूरचे महाराज आणि आम्ही स्वतः त्या वेळीं लहान मुलें असल्यानें निव्वळ प्रेक्षकांप्रमाणें बघत होतों. तो मोठा प्रसंग होता असें आम्हांला वाटत होतें खरें, पण त्याचें महत्त्व आम्हांस फारसें कळलें नाहीं.

राजघराण्याशीं आमचा तिसऱ्यांदा संबंध आम्ही प्रथम युरोपमध्यें गेलों त्या वेळीं आला. निद्रानाशाच्या विकारानें आम्ही बरींच वर्षें आजारी असतांना १८८७ सालीं हा प्रसंग आला. आम्हांला काय होतें आहे याची कल्पना आमच्या मंडळींना आली नाहीं, आणि आतां आम्हांला वाटतें कीं, त्या दृष्टीनें तपास करण्याचा त्यांनीं प्रयत्नच केला नाहीं. त्या वेळचे मुंबईचे सर्जन जनरल यांनीं आम्हांला पूर्णपणें हवापालट करण्याचा सल्ला दिला. त्या सल्ल्यांतील मर्म आमच्या लोकांना त्या वेळीं कळलें नाहीं.

ज्या वेळीं महाराणी व्हिक्टोरिया यांच्या महोत्सवाला सुरुवात झाली त्या वेळीं आम्ही व्हेनिसमध्यें होतों. या महोत्सवांत भाग घेण्याची आमची तीव्र इच्छा होती. परंतु आमचे शिक्षक मि. इलियट यांनीं असें सुचविलें कीं, आमची प्रकृति बरी नसतांना कष्टदायक प्रवास करून लंडनसारख्या दूर ठिकाणीं जाणें हें योग्य होणार नाहीं.

हा महोत्सव संपल्यावर कांहीं दिवसांनीं आम्हीं आमचा आदर महाराज्ञी-समोर व्यक्त केला. त्या प्रसंगीं विंडसर कॅसलमध्यें, तसेंच महाराज्ञींना प्रिय असलेल्या ऑसबोर्न येथें राहण्याविषयीं आम्हांला आमंत्रण आलें होतें. ज्या सौजन्यानें आमचा, आमच्या कुटुंबाचा, आणि आमच्याबरोबरच्या मंडळींचा महाराणीसाहेबांनीं सन्मान केला, त्याची स्मृति आमच्या मनांत अगदीं ताजी आहे. स्वागत करण्याची त्यांची तऱ्हा हार्दिक, साधी आणि सरळ होती. त्यामुळें त्यांच्याभोंवतीं असलेल्या ऐश्वर्यापेक्षां या सौजन्याचाच आमच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. आमच्या मनांत महाराणी व्हिक्टोरिया यांच्याबद्दल आदर वसत होता, तो त्यांच्याजवळ असलेल्या ऐश्वर्य आणि सत्ता यापेक्षां महनीय चारित्र्य, सार्वत्रिक दयाबुद्धि आणि कर्तव्यप्रेम इत्यादि गुणांमुळेंच होय. महाराणींची व आमची शेवटची भेट, आम्ही हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं १९०० मध्यें झाली. त्या वेळीं त्या जरेनें ग्रस्त होत्या. परंतु थोड्या दिवसांनंतर जेव्हां त्या वारल्या त्या वेळीं सर्वांनाच मोठा धक्का बसून सारें साम्राज्य शोकसागरांत बुडून गेलें.

डॉ. डेव्हिस यांनीं या विषयाचें विवेचन इतकें सुंदर केलें आहे कीं, या आकर्षक विषयासंबंधानें आम्हीं जास्त कांहीं सांगण्याची जरूरी नाहीं. आपल्यासमोर त्यांनीं अत्यंत मनोरंजक व्याख्यान देऊन आपणाला विचार करावयाला लावलें आहे; त्याबद्दल आपल्या सर्वांच्या वतीनें आम्ही त्यांचे आभार मानतों. तसेंच ईस्ट इंडिया ॲसोसिएशन या संस्थेनें अशा तऱ्हेनें संमेलन घडवून आणल्याबद्दल आणि त्या प्रसंगीं आम्हांला अध्यक्षपद दिल्याबद्दल सदरहू संस्थेचे आम्ही आभारी आहोंत.

६७

**स्थलः—लंडन.**

**कालः—ता. ११ मे १९३७.**

**प्रसंगः—बकिंगहॅम राजवाड्यांत सन्मान करण्याच्या प्रसंगीं श्रीमंत महाराजसाहेब यांनीं सम्राटांना वाचून दाखविलेला संदेश.**

आजच्या या संस्मरणीय प्रसंगीं हिंदी संस्थानिकांच्या वतीनें त्यांच्या मनांत असलेले चार शब्द सांगण्याची आम्हांला जी संधि मिळाली, तो एक सन्माननीय अनुग्रह आम्ही समजतों. बादशाही मुकुट आणि तो धारण करणारे बादशहा यांच्याविषयीं आमच्या मनांत असणाऱ्या आदराइतका क्वचित् आदर कोणाच्या मनांत असेल. तसेंच जरूरीच्या प्रसंगीं धावून जाणारे आमच्यासारखे दुसरे फार नसतील.

सम्राटांना आणि दयावंत सम्राज्ञींना त्यांच्या आश्रयाला असलेल्या कोट्यवधि लोकांना सुख मिळवून देण्याच्या प्रयत्नांत यश येवो.

६८

**स्थलः—लंडन.**

**कालः—ता. १४ मे १९३७.**

**प्रसंगः—साम्राज्यपरिषदेमधील भाषण.**

मुख्य प्रधान आणि परिषदेचे सभासदहो,

हिंदुस्थानच्या वतीनें आजच्या या परिषदेंत बोलण्याचा सन्मान आम्हांला मिळाला आहे. राज्यारोहणाच्या समारंभानंतर भरविली जाणारी ही परिषद संस्मरणीय होय. येथें जमलेलीं सर्व राष्ट्रें बादशहांचें सार्वभौमपद मान्य करीत आहेत.

ब्रिटिश कॉमनवेल्थच्या केंद्रस्थानीं गेल्या दोन दिवसांत ऐश्वर्याचें आणि महोत्सवाचें हृदयस्पर्शी असें जें चित्र दिसलें, तसेंच निरनिराळ्या राष्ट्रांचे प्रतिनिधि

जे येथें स्वतंत्रपणें आणि सुव्यवस्थित रीतीनें एकत्रित झाले त्यावरून, एकच गोष्ट सिद्ध झाली ती ही कीं, बादशाही सत्ता गेल्या कित्येक पिढ्यांप्रमाणेंच आजहि प्रिय आहे. कोट्यवधि लोकांच्या आदरानें आणि प्रेमानें ती परिवेष्ठित व संवर्धित केली गेलेली आहे. साम्राज्याच्या एकीचें आणि कृतज्ञतेचें प्रत्यक्ष दिसणारें तें एक चिन्ह आहे.

आमची अशी खात्री आहे कीं, सांप्रतचे बादशहा आपल्या दयावंत महाराज्ञी-समवेत, ब्रिटिश साम्राज्याच्या उत्तमोत्तम संप्रदायांप्रमाणें वागणारे वंशज ठरतील. आजच्या प्रसंगीं हिंदी संस्थानिक आणि हिंदी प्रजेच्या वतीनें आम्ही उभयतां सम्राटांना विनम्रभावानें प्रणाम अर्पण करतों, आणि आमच्या अस्खलनशील स्वामिभक्तीचें आणि प्रीतीचें आश्वासन देतों.

हिंदुस्थानाच्या अंतर्गत व्यवहाराचे प्रश्न आजच्या परिषदेसमोर नाहींत हें खरें. परंतु हिंदुस्थानच्या वतीनें बोलत असतांना त्यांकडे आम्हीं दुर्लक्ष करावें, अशीहि आपली अपेक्षा नसणार. संस्थानांतील तसेंच संस्थानाबाहेरील सार्वजनिक कार्यांशीं गेल्या साठ वर्षांपासूनचा आमचा संबंध आहे. एवढ्या दीर्घ कालावधींत सभोंवार घडणाऱ्या गोष्टींचें सूक्ष्म अवलोकन करून, इतिहासाची गति निश्चित करणाऱ्या मानवी आशा-आकांक्षा आणि विचारप्रवाह यांचें तटस्थ वृत्तीनें मूल्यमापन करण्याचा प्रयत्न आम्हीं केला आहे. हिंदुस्थानांत हे प्रवाह जितक्या जोरानें आज वाहत आहेत तितक्या जोरानें दुसऱ्या कोणत्याहि देशांत वाहत नाहींत. हिंदुस्थानांतील मोठमोठालीं शहरें सामाजिक व औद्योगिक उत्साहानें रसरसत आहेत; पण याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतकऱ्याचें सांप्रदायिक जीवन अनेक कारणांमुळें विदीर्ण झालें नसलें तरी विस्कळलें गेलें आहे. प्रदीर्घ सुप्तावस्थेनंतर तें आतां जागृत होत आहे. सारें हिंदुस्थान आज जीवनरसानें रसरसत आहे, असें म्हटलें असतां ती अत्युक्ति होणार नाहीं. ही जी नवशक्ति निर्माण झाली आहे, ती कोट्यवधि लोकांना कोणत्या ध्येयाकडे नेणार आहे ? यावर आमचें उत्तर असें आहे कीं, राजकीय दृष्ट्या ती शक्ति हिंदुस्थानला ब्रिटिश साम्राज्यां-तर्गत स्वतंत्र घटकत्व मिळवून देईल आणि सामाजिक दृष्ट्या 'सुव्यवस्थेनें परिपूर्ण झालेलें स्वातंत्र्य, आणि स्वातंत्र्यानें परिपूर्ण झालेली सुव्यवस्था'— कीं जी साम्राज्या-च्या एकीकरणाच्या तत्त्वांशीं निगडित आहे, ती प्राप्त करून देईल.

साम्राज्याच्या या ध्येयसिद्धींत हिंदुस्थानला चांगलीच कामगिरी करतां येईल. 'सुव्यवस्था' आणि 'स्वातंत्र्य' यांचा अर्थ कोणतींहि दोन राष्ट्रें एकाच तऱ्हेनें करून, एकाच मार्गानें तीं प्राप्त करून घेत नाहींत. असें असलें तरी विशिष्ट राष्ट्रांच्या प्रतिभेचा परिणाम त्यांच्यावर होऊन त्यांची प्राप्ति अधिक सुंदर

ठरूं शकेल. साम्राज्यापासून जसें हिंदुस्थानला पुष्कळ प्राप्त झालें आहे व होईल, तसेंच हिंदुस्थानपासूनहि साम्राज्याला पुष्कळ मिळवितां येण्याजोगें आहे.

आपण केलेल्या आमच्या हार्दिक सन्मानाबद्दल आपले आभार मानून, तसेंच बादशहांच्या सरकारनें आमचा उत्तम पाहुणचार केल्याबद्दल त्यांचे आभार मानून हें लहानसें भाषण आम्ही संपवितों.

## ६९

**स्थल:**—ऑक्सफोर्ड.

**काल:**—ता. २२ मे १९३७.

**प्रसंग:**—ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी, रॅले क्लबमधील भाषण.

अध्यक्षमहाराज आणि सभ्य गृहस्थहो,

आमच्या सुदैवानें आज आम्हांला अपूर्व अनुभव येत आहेत. मि. चर्चिल यांच्यासारख्या सध्यांच्या काळांतील नाणावलेल्या आणि प्रतिभावान् वक्त्यांच्याच पीठावर आम्ही बसलों आहोंत. दुसरें असें कीं, उदार विचारांचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध असलेल्या आणि हिंदुस्थानला ज्यानें पुष्कळ थोर लोक मिळवून दिले आहेत, अशा ऑक्सफोर्डमध्यें, हिंदुस्थानच्या वतीनें साम्राज्याचें स्वास्थ्य चिंतणारें भाषण आम्हांला प्रथमच करावें लागत आहे.

स्वातंत्र्याच्या प्रमुख कल्पनेवर ब्रिटिश लोकतंत्र किंवा ब्रिटिश संयुक्त राष्ट्र आधारलेलें आहे. या संयुक्त राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य आहे, निदान तें असावें असें आम्ही इच्छितों; त्याचप्रमाणें व्यक्तीच्या पुढें जाऊन प्रत्येक राष्ट्राला स्वातंत्र्य असावें व त्याला आपापल्या प्रतिभेप्रमाणें आणि गरजांप्रमाणें साम्राज्यांत राहून आपली वाढ, उन्नति करून घेण्याची मोकळीक असावी. आजच्या ब्रिटिश साम्राज्याला एक स्वतंत्र राष्ट्रसंघच म्हणावयाला हरकत नाहीं आणि असें असल्यामुळें जागतिक शांतीच्या वृद्ध्यर्थ त्याचा फार उपयोग होण्याजोगा आहे.

लोकतंत्री शासनाविषयींची आजची आपली कल्पना सनातन नसली,तरी लोकतंत्री शासन हें मात्र नेहमीं चालू आहे. त्यांत कित्येक वेळां हळूहळू पण परिस्थितीप्रमाणें फरक होत जातो. भविष्यकाळाकडे पाहिलें असतांना, आम्ही लवकरच थोडक्यांत

दर्शविणार आहोंत त्याप्रमाणें, लोकतंत्री शासनाला उज्ज्वल भविष्यकाळ आहे. लोकतंत्रांत केवळ पाश्चिमात्य मानववंशांचा फायदा होणार आहे असें नाहीं. भिन्न संस्कृतींप्रमाणें वाढलेल्या इतर वंशांना आणि जातींनाहि या लोकतंत्रांत निश्चित स्थान आहे. ग्रीस देशाप्रमाणेंच हिंदुस्थानांतहि लोकतंत्राचीं मूलतत्त्वें प्रचलित व प्रसृत होतीं, असें या देशांत चालू असलेल्या रूढींकडे, संप्रदायांकडे आणि संस्कृतीकडे पाहिलें असतांना वाटतें. अर्थात् सध्यांची निवडणुकीची पद्धति ही नवीन आहे. सांप्रत आढळणारा उत्साहहि नवीन असा आहे. उदारमतवादी राजकारणी पुढाऱ्यांनीं जर असें जाहीर केलें कीं, आमच्या लोकतंत्री शासनांत हिंदुस्थान आणि त्याचीं ध्येयें यांना स्थान आहे, तर आम्हांला वाटतें कीं, आपलें लोकतंत्री शासन हें उत्कृष्ट ध्येय साध्य करूं शकेल.

लोकतंत्री शासनपद्धतीविषयीं ज्या आशा आम्हीं व्यक्त केल्या त्या पूर्ण झाल्या म्हणजे, आम्हांला खात्री आहे कीं, जागतिक शांततारक्षणाच्या कामीं या शासनपद्धतीचा फार उपयोग होईल. युरोप आणि आशिया यांमध्यें खटके उडणें अस्वाभाविक नाहीं, असें सर्वत्र मानण्यांत येतें. पण आम्हांला वाटतें कीं, ब्रिटिश लोकतंत्राचा स्वतंत्र घटक म्हणून हिंदुस्थान समजला गेल्यास, हा खटका मुळीं उडणारच नाहीं. आपणाला आपल्या ध्येयांशीं प्रामाणिक राहावयाचें असल्यास आपण याच मार्गानें प्रगति केली पाहिजे, असें आम्हांला वाटतें. अशा तऱ्हेनें बोलणाऱ्याची गणना ध्येयवाद्यांत होते; पण ध्येयवादाशिवाय मोठालीं साम्राज्यें निर्माण होऊं शकत नाहींत.

ब्रिटिश लोकतंत्राचा स्वतःसिद्ध आणि समाधानी घटक या नात्यानें पूर्व आणि पश्चिम यांमधें होणारा तंटा हिंदुस्थानच परिणामकारक रीतीनें तोडूं शकेल. हिंदुस्थान आणि इंग्लंड या देशांतील पुढारी या दिशेनें प्रयत्न करतील असा आम्हांला भरंवसा वाटतो. या बाबतींत दाखविला जाणारा उतावळेपणा जर घातुक मानण्यांत आला, तर स्वाभाविक प्रगतीची पीछेहाट ही त्यापेक्षांहि घातुक ठरेल. आणि सर्वांत विशेष म्हणजे आपली प्रगतिविरोधी नियंत्रणें ज्या महान् लोकतंत्राचें निरामय चिंतण्याकरितां आम्ही येथें हिंदुस्थानच्या वतीनें उभे आहोंत त्याच्या ध्येयांशीं सुसंगत ठरणार नाहींत.

७०

**स्थल:**—लंडन.

**काल:**—ता. २४ मे १९३७.

**प्रसंग:**—श्रीमंत महाराजसाहेब यांनीं साम्राज्यदिन भोजनाच्या प्रसंगीं केलेलें भाषण.

अध्यक्षमहाराज, लॉर्ड, आणि सभ्य स्त्री-पुरुषहो,

मि. बाल्डविन यांनीं सुचविलेल्या 'निरामया'ला उत्तर देण्याविषयीं आम्हांला जें सांगण्यांत आलें आहे त्यांत आम्ही आमचा सन्मान समजतों. संयुक्त राज्याचें मुख्य प्रधान म्हणून त्यांनीं कित्येक वर्षें काम केलें आहे. हें काम त्यांनीं नुकतेंच सोडलें आहे, हें आपण जाणतच असाल. मुख्य प्रधानकीचा अधिकार यापूर्वींहि मोठ्या मंडळींना मिळालेला आहे. परंतु मि. बाल्डविन यांच्याविषयीं संपूर्ण विश्वास जसा लोकांना वाटतो, तसा पूर्वींच्या मंडळींविषयीं वाटला नाहीं. ब्रिटिश लोकतंत्रांत ज्या लक्षावधि लोकांचा समावेश होतो त्यांचा आदर आणि प्रेम हीं त्यांनीं मिळविलीं आहेत.

लोकतंत्री शासनपद्धति म्हणजे निरनिराळ्या वंशांचें यांत्रिक एकीकरण नव्हे. ती एक सजीव घटना असून, इतर सजीव वस्तूंप्रमाणें बदलणारी व वाढणारी अशी आहे. तिच्या हृदयस्थानीं स्वातंत्र्य आणि सुव्यवस्था हीं दोन तत्त्वें आहेत. ही घटना जर निरर्थक ठरवावयाची नसेल तर तिच्यांत कितीहि बदल झाला तरी, हीं तत्त्वेंच तिला मार्गदर्शक ठरतील. मानवी प्रगतींत असले बदल मानवी सुखाच्या दृष्टीनें जरूरीचे असतात.

लोकांचें सुख, हीच वेगवेगळीं राज्यतंत्रें पारखण्याची कसोटी होय. नव्या राज्यघटनेकडे पाहून भावी पिढ्या असें म्हणूं शकतील का, कीं जरी तींत पुष्कळ गुंतागुंती असल्या, पुष्कळ स्वाभाविक उणीवा असल्या, तरी पृथ्वीच्या पाठीवरील विस्तीर्ण देशांतील प्रचंड लोकसंख्येंत मानवी दर्जा, भ्रातृभाव आणि सुख वाढविण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यांत आला आहे ?

आमच्या देशबांधवांनीं राजकीय प्रगतींत शीघ्रता आणि सर्वव्यापकता पसंत केली असती, हें खरें. पण ही नवी राज्यघटना देखील ब्रिटिश लोकतंत्रांतील स्वतंत्र आणि स्वयंसिद्ध घटकत्वाच्या ध्येयाकडे हिंदुस्थानला खचित नेईल. हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीकडे पाहून भावी पिढ्यांकडून अशा प्रकारचा निकाल दिला जाईल अशी आशा करावयाला हरकत नाहीं. ज्या मोठ्या ब्रिटिश लोकतंत्राचा हिंदुस्थान हा एक घटक आहे, त्याविषयीं आजहि आम्हांला प्रेम वाटतें असें म्हणतां येईल. आजच्या शुभेच्छा-प्रदर्शनप्रसंगीं उत्तर देतांना आम्हांला जो आनंद होतो आहे, त्याचें मूळ या आशेंत आणि खात्रींत आहे.

## ७१

**स्थलः**—लंडन.

**कालः**—ता. ११ जून १९३७.

**प्रसंगः**—ईस्ट इंडिया ॲसोसिएशनतर्फे हिंदी प्रतिनिधींचें स्वागत

अध्यक्षमहाराज आणि मित्रहो,

आजच्या प्रसंगीं आमच्या मनांतील भावना व्यक्त करण्याविषयीं आम्हांला सांगण्यांत येईल असें वाटलें नव्हतें. परंतु अध्यक्षांनीं आमचा इतका गौरवपूर्वक उल्लेख केला आहे कीं, त्यांना नाहीं म्हणणें किंवा योग्य उत्तर देणें आम्हांला कठीण वाटतें. या संघाचे पाहुणे म्हणून आम्ही प्रथमच आलों आहोंत असें नाहीं. या संघाच्या आदरातिथ्याचें आम्ही साभार स्मरण करीत असतों.

आमच्या मतें ईस्ट इंडिया ॲसोसिएशन, तसेंच इतर असल्या संस्था उत्कृष्ट कार्य करीत आहेत. लोकांनीं एकत्र येऊन परस्परांच्या आवडीनिवडी, रीतीभाती, सद्गुण-दुर्गुण यांविषयीं माहिती मिळविणें, हें केव्हांहि चांगलें. या बाबतींत निःपक्ष-पातीपणा आणि न्यायबुद्धि दाखवितां आल्यास परस्परांविषयीं आदरभाव हल्लींपेक्षां वाढेल असा आम्हांला भरंवसा वाटतो.

प्राच्य देशांत बदल होत नाहीं असें समजलें जातें. पण त्यांत झपाट्यानें बदल होत आहे. तुमच्या कित्येक चांगल्या गोष्टींचें आम्ही अनुकरण करीत असल्या-मुळें, यापुढें एकत्र येणें हल्लींपेक्षां सुलभ होईल. हिंदुस्थानांत जातिविषयक प्रश्न आहेत. पण असल्या बऱ्याच गोष्टी हळूहळू नाहींशा होत आहेत. अस्पृश्य मंडळींना

आमच्या घरीं भोजनाला बोलाविलें असतांना, ब्राम्हणांसहित इतरहि वर्णांचे लोक हजर होते. कांहीं वर्षांपूर्वीं ही गोष्ट क्रांतिकारक ठरली असती; पण आतां ती रोजच्या व्यवहारांतली समजली जाते.

आमच्या मुसलमान मित्रांच्या आमंत्रणावरून आम्ही एकदां मशिदींत भोजनाला गेलों होतों. त्या वेळीं आमचे दरबारी व इतरहि मंडळी होती, पण त्यांनीं नाखुषी दर्शविली नाहीं. आमचें उत्तम स्वागत करण्यांत आलें आणि आमचा वेळ मोठ्या मजेंत गेला. या गोष्टीवरून हें कळेल कीं, कांहीं लोक समजतात त्याप्रमाणें धर्मामुळें आमच्यांत भेद उत्पन्न झालेला नाहीं. मुसलमान आणि हिंदु या दोन्ही धर्मांत कित्येक अशीं तत्त्वें आहेत कीं, ज्यांचा स्वीकार कोणीहि करील. नीतिशास्त्रांचीं तत्त्वें आणि प्रेम हीं मानवतेला सर्वसमान आहेत. याचाच विस्तार आणि योग्य प्रसार केल्यास भेदभाव आणि भावनाविषयक गैरसमजुती नाहींशा होऊन भ्रातृभाव आणि मैत्री हीं वाढतील.

आमच्या भाषणाचा उरलेला भाग आम्ही आमचे स्नेही सर झाफरुल्लाखान यांच्याकरितां राखून ठेवतों. ते वकील असून सरावलेले वक्ते असल्यामुळें असल्या प्रसंगाला साजेल असें भाषण ते करूं शकतील. इतकें सांगून आणि आपण केलेल्या स्वागताबद्दल आपले आभार मानून आम्ही आपलें भाषण संपवितों.

## ७२

**स्थल:**—बडोदें.

**काल:**—तारीख १५ डिसेंबर १९३७.

**प्रसंग:**—बडोदा म्युनिसिपालिटीनें महाराजांच्या सन्मानार्थ दिलेला उद्यानोपाहार.

नगरपालिकेचे अध्यक्ष, सभासद आणि सभ्य स्त्री-पुरुषहो,

आज सायंकाळीं आपल्या सर्वांच्या भेटी होण्याचा हा योग आला त्याचा मला आनंद होत आहे. आपलें प्रेमाचें निमंत्रण स्वीकारतांना येथें भाषण करण्याचा माझा इरादा नव्हता; परंतु म्युनिसिपालिटीनें केलेली प्रगति आणि तत्संबंधींच्या आपल्या आकांक्षा याबद्दलचे आपल्या अध्यक्षांचे विचार ऐकल्यावर थोडें बोलावें असा मला मोह झाला आहे.

शहर म्युनिसिपालिटी सावकाश का होईना परंतु एकसारखी प्रगतिच करीत आहे, ही खरोखर समाधानाची गोष्ट आहे. पण इतर राष्ट्रांशीं तुलना केली तर आपण पुष्कळच मागें आहोंत हें मान्य केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. प्रगति ही त्या त्या काळच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते आणि तिला निश्चित अशी मर्यादा नसते; तशी घालतां येत नाहीं ! बाहेरच्या जगांत काय साध्य केलें जात आहे हें तुम्हांस पहावयास मिळेल, तर तुम्ही खरोखर चकित होऊन जाल. बडोद्यामध्यें या बाबतींत तीव्र जिज्ञासा उत्पन्न झाली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. तिला पुरवणी म्हणून भविष्यकाळावर डोळा ठेवून चिकाटीनें आणि निश्चयानें प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, अशी मी सूचना करतों.

'निरोगी शरीर तर निरोगी मन', ही म्हण तुम्हां सर्वांना चांगली परिचयाची आहे. आरोग्य मुख्यत्वेंकरून वातावरण-शुद्धीवर अवलंबून असतें; आणि आरोग्यकर वातावरण हें आपल्या स्वतःबद्दलचें व आपल्या शेजाऱ्यांबद्दलचें कर्तव्य योग्य रीतीनें बजावण्यावर अवलंबून राहतें. अगदीं सदोदित इतरांच्या सुखस्वास्थ्याचा विचार तुमच्या मनांत जागृत ठेवावा आणि क्षुद्र आणि आकुंचित मनोवृत्तीला थारा देऊन मन केव्हांहि विकृत होऊं देऊं नये. आपल्या सभोंवार सर्वत्र स्वच्छता आणि सौंदर्य निर्माण करा; म्हणजे त्या योगें तुम्ही आपल्या स्वतःकरितां आणि शेजाऱ्यांकरितां आरोग्यमय जीवन निर्माण करूं शकाल.

मीं आधींच सांगितलें आहे कीं, अद्यापपर्यंत जें कांहीं तुम्हीं केलें आहे तें इतरत्र केलें जात आहे त्याच्या दशांशाइतकेंहि भरणार नाहीं. स्थानिक स्वराज्या-मध्यें दिसून येणाऱ्या बहुतेक दोषांचें निराकरण करण्याचे दोन मार्ग म्हटले म्हणजे शिक्षण आणि चिकाटी हेच होत. परिश्रमानें त्यांची पाठ धरा म्हणजे कालांतरानें तुम्हांला सन्मान आणि उत्तम यश यांची जोड मिळाल्याशिवाय राहणार नाहीं.

जगांत झपाट्यानें बदल होत आहे आणि जें जें म्हणून नवें दिसेल त्याचें अनुकरण करण्याचा मोह सहजच होईल. परंतु अंधानुकरण करण्याचें तुम्हीं टाळलें पाहिजे. स्वतःच्या मनाचा कौल घ्या, स्वतःच्या परिस्थितीचा विचार करा, आपल्याला चांगलें कोणतें आणि वाईट कोणतें याची शहानिशा करा आणि वाइटाचा त्याग करून चांगल्याचा केव्हांहि हव्यास धरा. नवी पद्धति किंवा नवी सामुग्री स्वीकारण्यापूर्वी असा विवेचक अभ्यास करूनच त्या बाबतींतील निर्णय ठरविले पाहिजेत.

राजा व अधिकारावरील कारभारी हे समाजाचेच आणि समाजांतीलच आहेत. त्यांना एकट्यांनाच समाजाला खेचून नेणें शक्य नाहीं, आणि शासितांनींच जर मना-पासून त्यांच्याशीं सहकार्य केलें नाहीं तर प्रगति सहजच मर्यादित राहील. एकहाती

यशःसिद्धि होणें शक्य नाहीं, सर्वांचेंच अंतःकरणपूर्वक दिलेलें साहाय्य मिळालें पाहिजे. आणि म्हणूनच आरोग्यकर नागरिक-जीवन उत्पन्न करण्यासाठीं आमच्या बरोबरीनें भाग घ्या, असें मला तुम्हां सर्वांनाच विनवावयाचें आहे.

वर्तमानपत्री लिखाणावर विश्वास ठेवतांना काळजी घ्या. दुसरे काय म्हणतात त्याचा अंधपणें स्वीकार करूं नका किंवा त्यामुळें आपला गैरसमज करून घेऊं नका. प्रत्येक गोष्टीचा सारासार विचार करा. मनुष्याला मेंदू दिलेला आहे; तो नसता तर त्याची पुच्छहीन पशूमध्येंच गणना करावी लागली असती ! माणसानें योग्यायोग्य विचार करावयाला, आपल्या स्वतःच्या अडचणी सोडविण्याला आणि आपल्याला कालाच्या पुढच्या रांगेंत–प्रगतिपर पक्षांत, उभें राहण्याला त्या मेंदूचा अवश्य उपयोग केला पाहिजे.

हें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून मीं माझ्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली आणि सर्व नागरिक वैगुण्यें नाहींशीं करण्याचें एकमेव साधन म्हणून शिक्षणावर मीं भिस्त ठेवली. आरोग्यकर नागरिक-जीवन साध्य होण्यासाठीं तुम्हीं सर्वांनीं स्वतःला सुशिक्षित केलें पाहिजे आणि अशा जीवनाकरितां प्रभावी वातावरण निर्माण करण्यासाठीं झटणें आणि त्याबद्दल एकसारखी आस्था बाळगणें, मागणी करणें, हेंच तुमचें कर्तव्य आहे हें तुम्ही ध्यानांत धरलें पाहिजे, असें माझें आग्रहाचें सांगणें आहे. अशा प्रकारचें शिक्षण घेतल्याशिवाय सत्ता पाहिजे म्हणून ओरड करणें आणि राज्यकारभारांत भागी मागणें, हें अगदीं सोपें आहे. परंतु लोककल्याणाची आस्था धरून राज्यकारभार चालविण्याच्या कामीं योग्य आणि कार्यक्षम सहकार्य करण्याची तयारी दाखविणें हें जरी पुष्कळच कठीण असलें तथापि तेंच अधिक उपयुक्त आहे.

ही भव्य इमारत आपल्या मुख्य कचेरीकरितां आपण बांधूं शकलां याबद्दल मी आपलें अभिनंदन करतों. हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि म्युनिसिपालिटीला असलें भव्य मंदिर आहे किंवा नाहीं याची मला शंका आहे; आणि त्याच्या दर्शनामुळें अशाच भव्य यशःसिद्धीकरितां भव्य प्रयत्न करण्याची तुम्हांला स्फूर्ति होत राहील, असा मला विश्वास वाटतो. नागरिकांच्या कल्याणाकरितां आजपर्यंत झालेल्या प्रगतिपर कार्याबद्दलहि मी तुमचें अभिनंदन करतों आणि माझ्या प्रजाजनांचें आर्थिक हितहि उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाईल, अशी आशा करतों.

७३

**स्थल:—बडोदें.**

**काल:—ता. १६ डिसेंबर १९३७.**

**प्रसंग:—श्री. जयसिंहराव लायब्ररीचा हीरक महोत्सव.**

सभ्य स्त्री-पुरुषहो,

प्रस्तुत प्रसंगीं बोलण्याचा माझा बेत नव्हता. परंतु आजच्या विद्वान् व्याख्यात्यांनीं जगांतील ग्रंथालयांबद्दल इतकी मनोरंजक माहिती सांगितल्यानंतर मलाहि दोन शब्द सांगण्याची इच्छा झाली.

आज येथें जें मला दिसलें ह्यावरून पुष्कळ वर्षांपूर्वीची माझी स्मृति स्पष्टपणें जागृत झाली. ही लायब्ररी स्थापन झाली त्या दिवशीची ती जागा आणि तो देखावा माझ्या चांगला लक्षांत आहे. त्या वेळीं आसपास अरुंद, अंधाऱ्या आणि अस्वच्छ गल्ल्या, भिकार आणि अदर्शनीय दुकानें, दुःस्थितींतील घरें, वसाहती आणि देवळें व त्यांतून जाणाऱ्या माणसाला प्राप्त होणारी अनारोग्यकर आणि कंटाळवाणी परिस्थिति, यांचें साम्राज्य होतें. पण आज कसा आनंद्दायक बदल झालेला दिसत आहे! आतां आपलें शहर रुंद, दुतर्फा वृक्षराजींनीं शोभायमान व दिवे लागलेल्या अशा रस्त्यांमुळें दर्शनीय झालें आहे. निरनिराळे बांधकामाचे नमुनेच अशा थाटाच्या भव्य इमारती येथें आहेत. आणि नागरिक जीवनोपयोगी सुखसोईंची समृद्धि झाल्यामुळें आतां तो सर्व देखावा बदलला आहे; एवढेंच नव्हे तर अनेक दृष्टींनीं अधिक सौंदर्ययुक्तहि झाला आहे.

फादर हेरास यांच्या विद्वत्तापूर्ण व्याख्यानांत मला कांहीं उपयुक्त भर घालतां येणें शक्य आहे किंवा नाहीं याबद्दल संशयच आहे. मला आजपर्यंत जें कार्य करतां आलें त्याबद्दल त्यांनीं गौरवपर उल्लेख केला खरा; परंतु माझ्या लोकांच्या कल्याणाच्या उद्देशानें मीं जे प्रयत्न केले त्यांत मला फक्त कांहीं अंशानेंच यश मिळूं शकलें, याची मला जाणीव आहे. आपल्या सर्वांना आयुष्यामध्यें समान संधि किंवा आपलें इच्छित कार्य करण्याला पुरेसा अवसर किंवा उत्तेजन क्वचित्च मिळतें. मर्यादित क्षेत्रांमध्यें जें मला करतां आलें तें सर्व मीं केलें आहे. आणि माझ्या प्रजाजनाकरितां ग्रंथालयाचें जाळेंच मीं निर्माण केलें असून त्यांचा दृष्टिकोण, संस्कार आणि सामान्य ज्ञान यांच्यामध्यें इष्ट असा फरक त्यामुळें घडून आला आहे, हें सांगण्यास मला आनंद वाटतो.

फांदर हेरास यांनीं निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या राष्ट्रांनीं केलेल्या पुस्तकें आणि हस्तलिखितें यांच्या मोठमोठ्या संग्रहांचें उत्तम वर्णन दिलें आहे. या संग्रहांतूनच मानवजातीला प्रकाश आणि सुख देणारा ज्ञानाचा प्रवाह उगम पावला. आपले आजचे विद्वान् व्याख्याते स्पेन देशचे आहेत, असा माझा समज आहे. तेथील राजकीय संकटांमुळें त्या देशांतील ह्या प्राचीन स्मारकांचा आतां विध्वंस होतो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे. ही आपत्ति लवकरच दूर होईल, शांतता प्रस्थापित होण्यास वेळ लागणार नाहीं आणि स्पेनची प्राचीन संस्कृति आणि सुधारणा बिनधोक राखली जाईल, अशी आपण आशा करूं या.

हिंदुस्थानच्या प्राचीन संस्कृतीच्या तेजानें प्राचीनांचें जग उजळलें गेलें, परंतु मध्यंतरीच्या अंधाराच्या व अज्ञानाच्या युगांत हिंदुस्थानची गतकालाची उज्ज्वल परंपरा तुटली आणि भविष्यकालाबद्दल योग्य योजना झाली नाहीं. प्रत्यहीं जग पुढें जात आहे. त्याच्या बरोबरीनें राहावयाचें असेल तर आपण अधिकाधिक ज्ञानाचें अर्जन करून त्याचा शक्य तितका दूरवर प्रसार करणें, अत्यंत महत्त्वाचें आहे.

इतर लोकांशीं संबंध आणला नाहीं आणि त्यांच्या यशःसिद्धीचें ज्ञान आपण करून घेतलें नाहीं तर आपल्याला आपल्या प्रगतीचें योग्य माप घेतां येणार नाहीं; यासाठीं आपण शेजारचे व दूरचे देश पाहिले पाहिजेत. आपलें ज्ञान वाढविण्याचा आणि आपण कोठें आहोंत हें पाहून कोणत्या मार्गानें जाणें इष्ट आहे हें ठरविण्याचा याशिवाय दुसरा कोणताच मार्ग नाहीं. अभ्यासानें आणि वाचनानें अर्थात् नित्याच्या व्यवसायांत उपयोगी असें पुष्कळच व्यावहारिक ज्ञान मिळवितां येतें. आतां अशा प्रकारच्या सर्वच सुधारणा आपल्या हिताच्या असणार नाहींत आणि कांहीं अव्यवहार्यहि असतील हें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु इतरांच्या खरोखरीच्या चांगल्या चालीरीती आणि पद्धति यांचा अभ्यास करून आणि त्यांना आपल्या गरजेप्रमाणें वळण देऊन आपल्याला आपली भवितव्यता सुधारून घेतां येईल, यांत शंका नाहीं.

आपला देश कोणत्या स्थित्यंतरांतून गेला आहे, आणि आपली प्रगति थांबविणारे आणि राष्ट्र या दृष्टीनें आपली वाढ खुंटविणारे दोष कोणते आहेत याबद्दल आपल्या सर्वांनाच थोडीबहुत माहिती आहेच. विलक्षण अज्ञान आणि अस्वाभाविक वर्गभेद हेच माझ्या मतानें आमच्या मागसलेपणाच्या मुळाशीं आहेत. आपल्या ३५ कोटी लोकसंख्येमध्यें निरक्षरांची शेंकडेवारी केवढी मोठी आणि धक्का बसणारी आहे ! तिचा नुसता विचारच आपल्याला कांपरें भरविणारा आणि लाजेनें मान खालीं घालवयास लावणारा आहे. म्हणून आपली पहिली आणि अगदीं प्रमुख गरज म्हटली म्हणजे शिक्षण आणि ज्ञान-प्रसार हीच होय. याच उद्देशानें मीं पुष्कळ शाळा आणि वाचनालयें उघडलेलीं आहेत. त्यांचा भरपूर फायदा घ्या असेंच माझें सर्वांना सांगणें आहे.

तुम्हांला प्रगति करण्याची खरीखुरी कळकळ असेल तर तुम्हांला जबरदस्त प्रयत्न केले पाहिजेत. पाश्चात्य लोकांच्या पद्धतींचा चांगला अभ्यास करा आणि अशा रीतीनें प्राप्त झालेलें ज्ञान तुमच्या दैनिक जीवनक्रमांत आणि तुमचे धार्मिक आणि राजकीय प्रश्न सोडविण्यांत उपयोगांत आणा. धर्मविषयीं दोषपूर्ण कल्पना आणि सिद्धांत एकदांचे टाकून द्या. आणि पारतंत्र्यामुळें संधि आणि स्वातंत्र्य यांच्या अभावापासून उत्पन्न झालेले दुर्गुण आणि दोष यांचाहि त्याग करा. सुसंस्कार आणि आरोग्य यांचा लाभ करून देणाऱ्या सुधारणांचा स्वीकार करण्यास मुळींच कंटाळा करूं नका. याच गोष्टींवर व्यक्ति आणि समाज या दोघांचेंहि सुख आणि भरभराट अवलंबून आहे, हें मीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. अंतःकरणाला उदार कराल तर, आणि ज्ञानप्रसार झाला तर, आपण सर्व एकाच परमेश्वराचीं लेंकरें आहोंत याचा तुम्हांला साक्षात्कार होईल. आणि हें सत्य जेव्हां तुम्हांला पूर्णपणें समजेल तेव्हांच मानवजातीची संपूर्णतया सेवा करतां येईल. हा उद्देश नेहमीं डोळयांसमोर ठेवून आपल्या सामर्थ्यानुसार आपलें कर्तव्य करीत रहा. तुम्हां प्रत्येकाला बळ आहे; परंतु खरें बळ एकींत असतें. तें खरें आणि अभिजात सामर्थ्य मिळवा आणि इतरांशीं साहचर्य करून एकतानतेनें वागा; म्हणजे तुमचें आणि तुमच्या समाजाचेंहि त्यांत हित झाल्याशिवाय राहणार नाहीं आणि प्रगतीचा मार्गहि अव्याहत चालेल.

एकीचें बळ हस्तगत करण्यासाठीं परस्पर अविश्वास, वर्गभेद, आप्पलपोटेपणा आणि अशाच इतर दोषांपासून जन्मणारे आपसांतील विरोध आणि क्षुल्लक मतभेद तुम्हीं सोडले पाहिजेत. कोणत्याहि एका वर्गाला अस्पृश्य समजूं नका. त्यांच्यापुढें आधींच अनेक काळज्या आहेत. वास्तविक त्यांचें कष्ट कमी करून त्यांच्या सुखाची वृद्धि करण्यासाठीं तुम्हीं झटलें पाहिजे. वंश व धर्म, जाती व पंथ यांचे सर्व भेद विसरा. हिंदु, मुसलमान किंवा ख्रिश्चन कोणीहि असा; आपल्या इष्ट सिद्धीकरितां तुम्हां सर्वांना एक राष्ट्र म्हणून एका झेंड्याखालीं जमा झालें पाहिजे.

माझा कैलासवासी पुत्र जयसिंहराव याचें नांव बरेच दिवस या ग्रंथालयाशीं संबद्ध झालेलें आहे. त्याचें हॅरो येथील शिक्षण पुरें झाल्यानंतर त्यानें परिश्रम करण्यांतच भूषण आहे हें तत्त्व शिकावें म्हणून मीं त्याला अमेरिकेंत हॉवर्ड येथें पाठविलें. अशा रीतीनें ज्या तऱ्हेचें उच्च शिक्षण मला स्वतःला घेण्याची इच्छा होती परंतु जें मला आपल्याला माहीत असलेल्या परिस्थितीमुळें लाभलें नाहीं तशा तऱ्हेचें उच्च दर्जाचें उत्तम शिक्षण त्याला मिळालें. मला जें मिळालें नाहीं तें माझ्या मुलांना देण्याचा मीं प्रयत्न केला. ते मिळविलेलें ज्ञान माझ्या प्रजेच्या सुखवृद्धीसाठीं उपयोजितील या आशेनें मीं त्यांना निरनिराळया देशांतील कॉलेजांत पाठविलें; पण माझा उद्देश पूर्णपणें सिद्धीस गेला नाहीं, हेंहि मला कबूल केलें पाहिजे.

मजबद्दल म्हणाल तर जरी मला विद्यापीठांतील शिक्षण घेण्याची संधि मिळाली नाहीं तरी चांगलीं व उपयुक्त पुस्तकें वाचून मिळणारें सर्व ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं मला उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा मीं निष्ठेनें आणि उत्साहानें उपयोग केला. पुस्तकांवरून अभ्यास करून माझ्या प्रजेच्या सेवेसाठीं व त्यांच्या सुखासाठीं मला मिळालेलें ज्ञान मीं उपयोगांत आणलें, माझे सर्वच उद्देश व आकांक्षा सिद्धीस गेल्या असें नाहीं, पण मीं मजकडून करतां येणें शक्य होतें तेवढें सर्व केलें आहे. सभ्य स्त्री पुरुषहो, तुम्ही सर्व माझींच मुलें आहांत अशा दृष्टीनें मी तुम्हांकडे पाहतों आणि तुम्हांला शिक्षण आणि ज्ञान प्राप्त व्हावें अशी माझी मनीषा आहे; त्यांनींच तुमच्या वांच्छा पूर्ण होतील आणि सुखप्राप्ति होईल. सर्व ठिकाणीं माझी हीच आकांक्षा होती. अपयशानें जरी माझें मन बरेच वेळां अस्वस्थ झालें असलें तरी मीं आशा केव्हांच सोडली नाहीं. आपण अनुभवानें शिकतों; आणि प्रत्येक अपयश हें आपल्याला अनुभव आणि ज्ञान यांची जोड करूनच देतें.

तुमच्यापैकीं पुष्कळ लोक युरोप किंवा अन्य परकीय देशांत जातात हें मला माहीत आहे. पण तुमच्यापैकीं कितीजणांना या प्रवासापासून खरा फायदा होतो ? तेथील चांगल्या गोष्टी तुम्हांला क्वचितच पाहावयास मिळतात, असें केव्हां केव्हां मला वाटतें. आणि तुम्ही परत येतांना कित्येक वेळां आपल्याबरोबर अस्पृहणीय अशाहि कित्येक सवयी घेऊन येतां, अशीहि मला भीति वाटते. बरें, जर केवळ सरकारी नोकरी मिळविण्याचें साधन म्हणूनच तुम्ही उच्च शिक्षण घेत असलां किंवा प्रशस्तिपत्रें, पदव्या वगैरेंच्या नांवांनीं तुमचें चित्त आकर्षिलें जात असलें तरीहि तें उच्च शिक्षण व्यर्थ गेलें, असें मला वाटतें. तुम्हीं आपली बुद्धि आणि मनःसामर्थ्य कमाविलें पाहिजे आणि आपल्या देशांतील कलाकौशल्य आणि उद्योगधंदे यांची अंगमेहनतीनें वाढ केली पाहिजे. आम्ही त्या बाबतींत मागें पडलों आहों आणि आपली आर्थिक दुःस्थिति ही त्याला अंशतः जबाबदार आहे. आपण आपल्या वाईट सवयी आणि गुलामी वृत्ति सोडून दिली नाहीं तर नुसत्या ज्ञानाचा आपल्याला फारच थोडा उपयोग होईल. व्यक्ति व समाज यांची सेवा करतां यावी म्हणून ज्ञान-बलानें आपण व्यावहारिक शहाणपण मिळवून प्रगतीच्या आड येणारीं सामाजिक वैगुण्यें देखील आपण धीटपणानें निर्मूल केलीं पाहिजेत. आपल्या वेदांतहि तें अन्न ( ज्ञान ) घ्या आणि भुकेचा ( अज्ञानाचा ) परिहार करा, असेंच सांगितलें आहे. आणि जर गरीब आणि अज्ञ जनांच्या आटोक्यांत तुम्हीं योग्य शिक्षण आणि ज्ञान आणून दिलें आणि अशा रीतीनें सुख आणि स्वावलंबन यांची किल्ली त्यांच्या हातीं मिळवून दिली तर आपला समाज आणि आपला देश संस्कृतीच्या आणि प्रगतीच्या उच्च श्रेणीला चढविल्याचें श्रेय तुम्हाला मिळेल.

७४

**स्थल:**—कलकत्ता.

**काल:**—तारीख २३ डिसेंबर १९३७.

**प्रसंग:**—कलकत्ता संस्कृत कॉलेजमध्यें 'भूपति चक्रवर्ती' ही पदवी महाराजसाहेबांना देण्यांत आली त्या वेळचें भाषण.

श्री. दासगुप्त, विद्वान् पंडितगण आणि प्राध्यापक मंडळीहो,

आपण केलेल्या प्रेमयुक्त भाषणांबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहें. आणि माझ्या उत्तराची थोडीशीच लांबी ही आपण मला वाटणाऱ्या कृतज्ञतेचें माप समजणार नाहीं अशी मला खात्री आहे. आपण संस्कृतमधून बोललां याचाहि मला आनंद वाटतो. कारण आपल्या लोकांत सुधारणा व्हावी आणि त्यांचें आपला इतिहास, परंपरा आणि धर्ममतें यांबद्दलचें ज्ञान वाढावें यासाठीं त्यांच्यामध्यें आपल्या स्वतःच्या भाषेचा प्रसार करण्यास झटलें पाहिजे हें उघड आहे. परंतु माझें स्वतःचें त्याबाबतचें शिक्षण अपुरें असल्यामुळें मला इंग्रजींतूनच बोलणें भाग आहे. इंग्रजी ही भाषा परकी असली तरी तिनेंच आपल्या गतेतिहासाची स्मृति जागृत करणें, आपले दोष दाखविणें आणि भावी प्रगतीची योग्य दिशा सुचविणें इत्यादि अनेक दृष्टींनीं आपल्यावर महदुपकार केले आहेत.

इतर कोणत्याहि गोष्टींपेक्षां इंग्रजी भाषेनें आपली दृष्टि व्यापक करून व आपला दर्जा वाढवून आपल्या जीवनांत उच्च तऱ्हेचें वातावरण निर्माण केलें आहे, हें आपण विसरतां कामा नये. आपली उन्नति कशी करून घ्यावी हा आजच्या हिंदुस्थानापुढील फार महत्त्वाचा प्रश्न आहे. धर्म हा जात्याच उत्तम असूं शकेल. परंतु तुम्हीं त्याचें शास्त्रीय दृष्टीनें अध्ययन केलें नाहीं, आणि आपल्या संस्थांची यथायोग्य व्यवस्था केली नाहीं तर तुमचें भवितव्य मुळींच आशादायक नाहीं. आणखी हेंहि ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, केवळ अगदीं थोड्या माणसांच्या फुटकळ परिश्रमावर, मग तीं थोडीं माणसें कितीहि जबर निष्ठेचीं असोत, धर्माला विसंबून राहतां येणार नाहीं. सर्वच्या सर्व राष्ट्रावर त्याचें बळ अवलंबून आहे; आणि त्यापैकीं बहुसंख्य लोकांना तर आपल्या धर्माच्या खऱ्या स्वरूपाचें शिक्षण मिळालेलें नाहीं; अशी वस्तुस्थिति आहे, याचें आपल्याला विस्मरण होऊं देतां कामा नये.

प्रोफेसरांनीं आपल्या विद्यार्थ्यांना आपला गतकालचा इतिहास आणि परंपरा तेवढीच शिकवून न थांबतां आपले दोष आणि ते सुधारण्याची दिशा यांचेंहि शिक्षण द्यावें. मी युरोप, आफ्रिका, अमेरिका असा त्रिखंड प्रवास करून आलों आहें आणि ज्या देशांत बहुसंख्य प्रजेला धर्मतत्त्वाचें प्राथमिक ज्ञान देखील दिलें जात नाहीं असा देश मला क्वचित्‌च आढळला. हिंदुस्थानच हा या नियमाला अपवाद, एकमेव अपवाद दिसतो. प्राचीन काळीं शेंकडों लोकांना त्यांच्या गुरुजनामार्फत धार्मिक शिक्षण दिलें जात असे; परंतु अलीकडे मात्र धर्मांचीं मूलतत्त्वें देखील स्त्रिया, पुरुष आणि मुलें यांना समजत नाहींत.

तेव्हां तुमच्या छात्रगणाला त्याच्या सामर्थ्यानुसार स्पष्ट आणि सोप्या भाषेंत धर्मतत्त्वें समजावून सांगणें हें तुमचें पवित्र कर्तव्य आहे. ही सेवा तुम्हीं केली तर आपला समाज आणि देश यांची स्थिति सुधारण्यासारखें कांहीं केल्याचें श्रेय तुम्हांला मिळेल. आणि जर तुम्ही तशी सेवा करूं शकला नाहीं तर मग तुमचें स्वतःचें ज्ञान केवढेंहि विस्तृत असलें आणि तुम्हीं मोठमोठे केवढेहि ग्रंथ लिहिले असले तरी तुमचे सर्व परिश्रम आणि उच्च उद्देश फोलच ठरतील.

नैतिक, आर्थिक आणि औद्योगिक दृष्टीनें लोकांची उन्नति होऊन त्यांचा आणि तुमचाहि दर्जा जगामध्यें वाढावा म्हणून तुम्ही लोकांना मूल्यवान् ज्ञान देण्याचा प्रयत्न कराल, अशी मला मनापासून आशा वाटते. आपल्या सर्व कौशल्याचा आणि ज्ञानाचा उपयोग तें सारासार विचाराला धरून आणि व्यावहारिक करण्याकडे करा आणि त्याचा परिपाक मग लोकांना शिकवा.

शेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं, सत्याचाच विजय झाला पाहिजे आणि तुम्हां सर्वांना सत्यानेंच सुखप्राप्ति होईल. माझ्या स्वतःच्या सामर्थ्यानुसार माझ्या प्रजेची स्थिति सुधारून त्यांना सौख्य आणि समृद्धि यांचा लाभ करून देण्यासाठीं मी झटलों आहें. शिक्षणाच्या खडकावर मीं माझी इमारत उभारली आहे आणि माझ्या प्रयत्नांनीं त्यांची प्रगतीच झाली आहे. या ज्ञानामुळेंच मला माझें उत्तम बक्षीस मिळालें आहे. आणि आतां आपण माझें जें हार्दिक स्वागत केलें आणि मजबद्दल आपल्या भाषणांत गोड विचार प्रदर्शित केले त्यांबद्दल आपले पुनः एकदां आभार मानून मी माझें भाषण संपवितों.

७५

**स्थल:**---कलकत्ता.

**काल:**---तारीख ३० डिसेंबर १९३७.

**प्रसंग:**---बेंगाल बुद्धिस्ट ॲसोसिएशनच्या स्वागतपर भाषणाला उत्तर.

प्रो. बरुआ, बेंगाल बुद्धिस्ट ॲसोसिएशनचे सभासद आणि मित्रहो,

या संस्थेला मला भेट देतां आली याबद्दल मला आनंद होतो. आपण माझें प्रेमानें स्वागत केलें त्याबद्दल मी आपला आभारी आहें. बौद्ध धर्माबद्दल मला व्यक्तिशः फार आदर वाटतो; कारण जगांतून दुःख नाहींसें व्हावें आणि मनुष्य मुक्त व्हावा म्हणून त्यानें पुष्कळच खटपट केली आहे.

जगांतील दुसऱ्या अनेक गोष्टींप्रमाणेंच धर्म हा बदलत असतो, आणि नवीन परिस्थितीशीं जमवून घेण्याकरितां तो तसा बदलावा हें इष्टच आहे. धर्म काय किंवा दुसरी कोणतीहि संस्था काय, जर तिच्यांत बदलण्याची क्षमता नसेल तर तिची क्रमशः अवनति आणि अंतीं नाश हीं ठेवलेलींच आहेत, असें समजावें. धर्म हा माणसाकरितां आहे, मनुष्य हा धर्माकरितां नाहीं. जर धर्मानें मनुष्याची उन्नति होत नसेल आणि त्याचें उच्च उद्दिष्ट सिद्धीस जात नसेल तर तो सोडून देणेंच अधिक चांगलें. आणि तो सोडून देऊन त्याच्या जागीं नवा, मानवसमाजाच्या गरजा अधिक क्षमतेनें भागविणारा, कर्मकांड व निरुपयोगी शुष्क आचार यांपासून मुक्त आणि नव्या परिस्थितीशीं जुळणारा असा अजी नवीनच धर्म निर्माण करणें केव्हांहि श्रेयस्करच ठरेल.

सधन, सुसंस्कृत आणि सुविद्य लोक फारच थोडे असतात. आणि तरीहि सामान्य लोक सुशिक्षित व्हावे आणि उन्नत व्हावे यासाठीं त्यांना नैतिक शिक्षण देण्याचे मार्ग आपण शोधले पाहिजेत. निरनिराळे धर्म निरनिराळ्या दुय्यम महत्त्वाच्या गोष्टींवरच भर देत असल्यामुळें त्यांत निष्कारण भेदभाव दिसतात. आपल्याला, धर्माला अभिप्रेत असलेल्या निरनिराळ्या ध्येयांची वास्तविक एकी पाहिजे आहे. आणि सत्य हें एकच असल्यामुळें अशी एकी शक्यहि आहे. अशासाठीं आपण सर्व धर्मांचा तौलनिक दृष्टया अभ्यास केला पाहिजे, त्यांतील प्रत्येकाच्या गुणदोषांचें शास्त्रीय निःपक्षपातानें पृथक्करण केलें पाहिजे आणि त्यांच्या खऱ्या मूल्याबद्दल योग्य तो निर्णय दिला पाहिजे.

हिंदुस्थानच्या इतिहासांत बौद्ध धर्मानें मोठें कार्य केलें आहे. मानवजातीच्या इतिहासांतहि त्याचें स्थान मोठें आहे. कारण त्यानें इतर कोणापेक्षांहि मानवी मनांतून गैरसमज दूर करण्याची, दुराग्रह नाश करण्याची आणि इतरांबद्दल प्रेम बाळगून जीवनाचा व्यापक विचार करण्याबद्दलची शिकवण देण्याची फार मोठी कामगिरी केली आहे. आपण ह्या धर्माचें पुनरुज्जीवन करण्याचें जें काम अंगावर घेतलें आहे त्यांत आपल्याला माझी संपूर्ण सहानुभूति आहे. भगवान् बुद्ध ही केवळ हिंदुस्थानांतीलच नव्हे तर सर्व जगांतील मोठी व्यक्ति आहे. कारण त्यानें मानवतेची फारच मोठी सेवा केली आहे.

बौद्ध धर्म हा एका काळीं हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ धर्म होता. त्याच्या इतिहासाचें सिंहावलोकन करून त्याच्या अवनतीच्या कारणांचें आपण पृथक्करण केलें तर आपल्याला असें आढळून येईल कीं, त्यांतील पुरोहित आणि महंत हे मिळणाऱ्या मोबदल्यांत समाजाला योग्य सेवेची भरपाई न करतांच त्याच्याकडून मिळणाऱ्या भिक्षेवरच राहूं लागले. पुरोहित झाले म्हणून त्यांना देखील स्वतःकरितां आणि इतरांकरतां देखील पुरेंसें काम न करतांच दुसऱ्यांच्या दानधर्मावर स्वतःचें पोषण करण्याचा अधिकार केव्हांहि नाहींच !

सरतें शेवटीं मला आपल्याला आग्रहानें असें सुचवावयाचें आहे कीं, प्रत्येक लहान घर, प्रत्येक छोटें कुटुंब हें नीतीचा खराखुरा झरा झाला पाहिजे—तेथून उत्तरोत्तर वाढणाऱ्या कक्षेमध्यें नीतीचा प्रसार झाला पाहिजे. सत्कृत्यानें सत्कृत्य वाढतें आणि सर्व समाजावर सुपरिणाम होतात. माझें स्वागत केल्याबद्दल मी आपले फिरून एकदां आभार मानतों. आणि आपल्या संस्थेचे प्रचारक आमच्या संस्थानाकडे आपण पाठविल्यास मी त्यांचा यथायोग्य परामर्श घेईन, आणि बौद्ध धर्माचीं खरीं तत्त्वें जनतेंत पसरावीं म्हणून मला शक्य असेल तें सर्व प्रकारचें साहाय्य त्यांना देईन, असें याच वेळीं आश्वासनहि देऊन ठेवतों.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्रं. ........ नं.
ता. ........
ठाणे.

## ७६

**स्थल:**—कुचबिहार.

**काल:**—ता. ३ जानेवारी १९३८.

**प्रसंग:**—कुचबिहार राजवाड्यामध्यें महाराजसाहेबांच्या सन्मानार्थ झालेली मेजवानी.

महाराज आणि सभ्य गृहस्थहो,

माझें आरोग्यचिंतन करतांना मजबद्दल जे गौरवपर उद्गार काढले त्याबद्दल मी आभारी आहें. कित्येक वर्षांपासून कुचबिहारला भेट देण्याचें मी योजीत होतों, परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आणि कार्यबाहुल्यामुळें माझी सदिच्छा आजपर्यंत सिद्धीस गेली नव्हती.

या वेळेला मात्र मीं न चुकण्याचें ठरविलें आणि कलकत्त्याला येतांच, थोडा वेळ का होईना, पण इतकी लांबलेली भेट या वेळीं देण्याचा निश्चय मीं पार पाडला आहे. असल्याच आणखी पुष्कळ भेटी मला देतां याव्यात अशी माझी इच्छा आहे–आणि कदाचित् शेवटीं माझा तुम्हांला कंटाळाहि येऊं लागेल !

कुचबिहार संस्थानाची माहिती मला महाराजांचे आजोबा आणि आजी यांच्या कालपासूनची आहे. आपल्या आजीबाई या मोठ्या आभिजात, सुस्वभावी आणि मनमिळाऊ आचरणाच्या होत्या. आपले आजोबा हे उंच, देखणे आणि सुदृढ बांध्याचे, उदार मनाचे आणि प्रगतिपर असून उत्तम खेळाडूहि होते. आपले वडील आणि त्यांचे बंधु यांचीहि मला त्यांच्या बाळपणापासूनची माहिती आहे. अशा रीतीनें कुचबिहारशीं माझे संबंध नवे नसून फार पूर्वीपासूनचे आहेत.

आपलें संस्थान पाहून मला खरोखर आनंद झाला. तें प्रगतिपर असल्याची त्याची ख्याति आहे आणि ती टिकविणें आणि कालाबरोबर प्रगति करून तींत अधिकाधिक भर घालण्यास झटणें हें तुमचें कर्तव्य आहे. तुमचा अधिकारीवर्ग चलाख, कर्तबगार आणि आपण व आपलें संस्थान यांबद्दल निष्ठा बाळगणारा आहे, याचाहि माझ्या मनावर चांगला ठसा उमटला आहे.

महाराणी साहेब आणि मी स्वतः—दोघांनाहि आपल्याकडे आल्यानें फार आनंद झाला आहे आणि आपण प्रेमळपणानें जें आमचें स्वागत केलें त्याबद्दल मी आपले पुनः एकदां आभार मानतों.

७७

**स्थलः**—कुचबिहार.

**कालः**—तारीख ४ जानेवारी १९३८.

**प्रसंगः**—लॅन्सडाउन हॉलमध्यें साहित्यसभेमार्फत स्वागत.

खानसाहेब अमरनित उल्ला अहमद, आणि सभ्य स्त्री-पुरुषहो,

तुमची सभा जुनीं हस्तलिखितें प्रकाशांत आणण्याची महत्त्वाची कामगिरी करीत आहे, तेव्हां आज सायंकाळीं येथें येण्यानें मला आनंद झाला आहे. .या हस्तलिखितांपैकीं कांहीं येथील प्राचीन काळच्या राज्यकर्त्यांनीं लिहिलेलीं आहेत, हें ऐकून मला समाधान वाटलें. अगदीं प्राचीन काळीं हल्लींसारखा शिक्षणाचा प्रसार झाला नसला तरी तें फक्त मध्यमवर्गापुरतेंच मर्यादित झालें होतें असें नसून त्याहून वरच्या समाजाच्या थरापर्यंतहि तें पोंहोचलें होतें असें तुम्हांला आढळेल. तुमच्या स्वतःच्या पूर्वीच्या राज्यकर्त्यांचें उदाहरण तुमच्यासमोर आहेच. हिंदुस्थानच्या इतिहासांतहि असलीं आणखी अनेक उदहारणें आहेत. आणि आणखी उदाहरणांची जरूरच असली तर मी फक्त एक, सुप्रसिद्ध श्रीहर्षाचें उदाहरण सांगितलें म्हणजे पुरें.

हल्लींच्या लोकशाहीच्या युगांत तर ज्ञान हें कोणत्याहि एका किंवा अनेक वर्गाच्या गटाची मिरास न राहतां सर्वत्र फैलावेल, अशी आपण काळजी घेतली पाहिजे. सर्वसाधारण जनतेच्या तें आटोक्यांत आलें पाहिजे. आपल्या समाजापैकीं अगदीं अल्पसा भागहि जरी अशिक्षित किंवा अडाणी राहिला तरीहि त्यामुळें प्रगत वर्गाचें नुकसान होईल, एवढेंच नव्हे तर सर्व राष्ट्राचीच वाढ खुंटेल, हें आपण ध्यानांत धरलें पाहिजे.

याकरितां ज्ञानाचें संशोधन करून तें देशाच्या सुधारणेसाठीं आणि सामान्यजनतेच्या हितासाठीं एकजात सर्वांनाच प्राप्त करून द्यावें, असा आपला उद्देश असला पाहिजे. त्या दृष्टीनें कस लावून पाहिला तर तुमची संस्था महत्त्वाचें कार्य करीत आहे याबद्दल मला शंका नाहीं. आणि आजच्याप्रमाणेंच माझें नांव आपल्या परिश्रमांशीं संबद्ध व्हावें हा मी मोठ्या मानाचा आणि सुखाचा प्रसंग समजतों. आजच्या आपल्या अंतःकरणपूर्वक स्वागताबद्दल मी आपले आभार मानतों. आणि मी जेव्हां पुनः कुचबिहारकडे येईन तेव्हां आपलें आणखी वाढलेलें काम मला पाहायला मिळेल अशी आशा बाळगतों.

७८

**स्थलः**—कुचबिहार.

**कालः**—तारीख ५ जानेवारी १९३८.

**प्रसंगः**—जितेन्द्रनारायण हॉस्पिटलमधील 'महाराजा गायकवाड एक्स रे वॉर्ड' च्या पायाचा दगड बसविणें.

महाराजसाहेब, कुचबिहार कौन्सिलचे उपाध्यक्ष, आणि सभ्य स्त्री-पुरुषहो,

आजच्या प्रसंगाला मला हजर राहतां आलें आणि हा पायाचा दगड चांगला घातला गेल्याचें जाहीर करण्याचा मान मिळाला, ही मला मोठी आनंदाची गोष्ट वाटते.

राजाला नानाविध कर्तव्यें पार पाडावयाचीं असतात, त्यांपैकीं वैद्यकीय साहाय्य देण्याची व्यवस्था हें साहजिक महत्त्वाचें आहे. आरोग्याची चांगली काळजी घेतली गेली नाहीं तर मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या लायक असे चांगले नागरिक तयार होणें अशक्य आहे. आपल्या या शाखेच्या कारभाराचें जें मीं निरीक्षण केलें त्यावरून आपल्या अगदीं आजतागायत संघटनेचा माझ्या मनावर चांगला परिणाम झाला आहे. यापूर्वीच्या राज्यकर्त्यांनीं आपआपलें काम उत्तम रीतीनें बजावलें असून हल्लींच्या महाराणीसाहेबांचाहि प्रस्तुत प्रगतीमध्यें थोडाथोडका हात नाहीं. आपले महाराज, माझे नातू, हे सर्व क्षेत्रांमध्यें वाढ करण्याला उत्तेजन देतील अशी अर्थात् मला खात्री वाटते.

शास्त्राची प्रत्यहीं प्रगति होत आहे आणि वैद्यकीय सल्ल्यालाच राज्यांतील उत्पन्नाचा बराच वांटा मिळावा हें अगदीं स्वाभाविक आहे. माझा स्वतःचा या-संबंधींचा अनुभव असा आहे कीं, आपण मागें कितीहि केलें आणि भविष्यकाळाची केवढीहि तरतूद केली तरी ती अपुरीच पडते आणि मग लोक आणखी सोई करण्याबद्दल मागणी करतात ! अशा रीतीनें उत्पन्न होणारे प्रश्न योग्य काळीं कसे सोडवावयाचे हा प्रश्न जरी भावी कारभाऱ्यांवर सोपविला तथापि एका गोष्टीबद्दल मला संशय नाहीं; आणि ती गोष्ट ही कीं, कोणत्याहि संस्थानाला त्याच्या प्रजेचें सहकार्य न मिळेल तर त्याला फारशी प्रगति करतां येणार नाहीं.

तुमच्या या रुग्णालयांत सर्व प्रकारच्या आधुनिक साधनसामग्रीची योजना आहे हें पाहून मला फारच आनंद झाला. या रुग्णालयाच्या इमारतीला आणि आंतील सामग्रीसाठीं आपल्या महाराणीसाहेबांनीं आपल्या खासगींतून बरीच रक्कम

दिली आहे हें ऐकून तर माझें समाधान द्विगुणित झालें. यापेक्षां राज्यकर्त्यांना अभिनंदनीय असें दुसरें कोणतें असणार? त्यांनीं आपल्या संपत्तीचा जो हा सदुपयोग केला त्याबद्दल त्यांना फार मोठें श्रेय दिलें पाहिजे. मनुष्याच्या आधिव्याधि हलक्या करणें आणि मनुष्यमात्राची स्थिति सुधारण्याकरितां झटणें हे उद्देश केवळ राजा-महाराजांनींच आपल्या अंतःकरणांत जिव्हाळ्यानें वागवावे असें नसून आपल्यापैकीं प्रत्येकाचेंहि तेंच ध्येय असलें पाहिजे. सर्वांचें सुख आणि प्रगति हीं साध्य करण्यासाठीं परस्परांना साहाय्य करण्याचा हा एवढाच एक मार्ग आहे. आणि आतां शेवट करतांना अशी आशा करूं या कीं, ही संस्था आणि तिचें मोठें कार्य दिवसेंदिवस अधिकाधिक भरभराटीला येवो!

## ७९

**स्थलः**—बडोदें.

**कालः**—ता. २२ जानेवारी १९३८.

**प्रसंगः**—हिंदुस्थान, ब्रह्मदेश, सीलोन आणि अफगाणिस्थान यांच्या पांचव्या रोटरी कॉन्फरन्सचें उद्घाटन.

रोटेरिअन डिस्ट्रिक्ट गव्हर्नर, बरोडा रोटरी क्लबचे अध्यक्ष आणि रोटेरिअन मंडळीहो,

माझ्या राजधानींत आपलें मनःपूर्वक स्वागत करण्याचा आज मला मान मिळत आहे. तुमचा हल्लींचा विभाग निश्चित झाल्यानंतर आपली ही दुसरीच परिषद् भरत आहे असें मला समजलें आहे. आणि रोटरी चळवळींत बडोद्याचा प्रवेश अगदीं नव्यानेंच झाला असल्यामुळें आपलें तात्पुरतें केंद्र होण्याचा जो मान बडोद्याला इतक्यांतच मिळला आहे त्याबद्दल साहजिकच आम्हांला अधिक आनंद वाटत आहे. एक वर्षापूर्वी आपली परिषद् मद्रास येथें भरली होती. तेथें उपलब्ध असलेल्या सर्वच सुखसोयी आम्ही कदाचित् तुम्हांला देऊं शकणार नाहीं. तथापि येथें आपल्याला केवळ मनापासूनचा पाहुणचारच नव्हे तर आपलें कार्य आणि विचारविनिमय यामध्यें हृदयस्फूर्त सहानुभूतिहि मिळेल, अशी मी आपल्याला खात्री देतों.

रोटरी चळवळींचें कार्य मला कित्येक वर्षांपासून माहीत आहे. तथापि त्याच्याशीं माझा संबंध फक्त पांच वर्षांपूर्वी आला, आणि तोहि एका सुखकर योगायोगानें. १९३३ मध्यें वर्ल्ड फेलोशिप ऑफ फेथ्स परिषदेचा अध्यक्ष होण्यासाठीं म्हणून मी

शिकागोला गेलों होतों. वर्ल्ड फेलोशिप ऑफ फेथ्स ही एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे. सर्व धर्मांना सामान्य असलेल्या मूलभूत अशा तत्त्वांवर भर देऊन वैयक्तिक आणि आंतरराष्ट्रीय संबंध त्यांच्यावरच आधारावे आणि सहिष्णुता, सद्बुद्धि आणि सहकार्य या भावनांच्या साहाय्यानें मनुष्यामनुष्यांतील बंधुभाव वाढवावा, असें त्याचें ध्येय आहे. त्या प्रसंगीं शिकागो येथील रोटरीचें जन्मस्थान पाहण्यासाठीं मला नेण्यांत आलें. शिकागो येथील फक्त चौघा अमेरिकन व्यापाऱ्यांनीं प्रथम ही चळवळ चालू केली. आतां ती सर्व जगभर पसरली आहे आणि तिच्या वाढीमुळेंच आज तुम्ही या ठिकाणीं एकत्र जमला आहां.

सद्गृहस्थहो, आज आपल्याला असें आढळून येतें कीं, गैरविश्वास व गैरसमज यांच्या प्राचुर्यामुळें आपलें जग विद्रूप झालें आहे. हे अडथळे दूर करण्याच्या ध्येयानें प्रेरित झालेल्या कोणत्याहि संघटनेचे उद्देश आणि कार्य आपण अंतःकरण-पूर्वक मान्य कराल याची मला शंका नाहीं. परंतु कांहींना संघटित धर्मभावनेच्या विद्यमानें तें कार्य करावें असें वाटतें, तर तुम्हांला तेंच कार्य वैयक्तिक सेवेनें साधावें असें वाटतें. तुमच्या घटनेप्रमाणें तुमचें कार्य किंवा विचार यांमध्यें धर्माला स्थान नाहीं. आणि सर्व पंथ आणि वंश यांना आपल्यामध्यें सामील होऊन सत्कार्य कर-ण्यास चांगली संधि मिळते. सर्व प्रस्थापित धर्म आणि तत्त्वज्ञानपरंपरा यांमध्यें आपल्या मनुष्यबांधवांची सेवा अगदीं अंगभूतच आहे. धर्मवेड आणि दुराग्रह यांच्यामुळें कित्येक शतकेंपर्यंत हें साधें सत्य लुप्त झालें होतें. आतां आत्मनिरपेक्ष सेवाधर्माचें, जोरकस वैयक्तिक निष्ठा म्हणून,—आणि माझ्या मतें हेंच धर्माचें खरें तत्त्व आहे— पुनरुज्जीवन करून रोटरी चळवळीनें मोठें महत्त्वाचें कार्य केलें आहे.

रोटरीमुळें प्रत्येक सभासदाला इतर वंश, पंथ, धंदा आणि उद्योग यांतील लोकांच्या गांठीभेटी होण्याची संधी वारंवार मिळते. आणि हाच या सेवाध्येय-सिद्धीचा अत्युत्तम मार्ग होय. आज कित्येक वर्षें, जबाबदार राज्यशासक अगर प्रवासी म्हणूनहि निरनिराळ्या दर्जांचीं आणि मतांचीं माणसें मला भेटल्यामुळें त्यांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करून त्यांच्या अनुभवापासून लाभ मिळण्याची संधि मला सुदैवानें अनेक वेळां मिळाली आहे. ही सवयच मीं हेतुपूर्वक मला लावून घेतली आहे, आणि अशा संधि माझ्या दृष्टीनें अत्यंत मूल्यवान् ठरल्या आहेत, हें मीं तुम्हांस सांगितलें पाहिजे असें नाहीं. कारण अशा गांठीभेटींतून परस्परांबद्दल योग्य ज्ञानाचा उदय होऊं शकतो. आणि असें ज्ञान न झालें तर परस्परांबद्दल आवड आणि आदरबुद्धि वाढणेंच शक्य नाहीं.

योग्य समज, परस्परांबद्दलची आवड आणि आदरभाव या तीन गोष्टींचा आजच्या जगांत अत्यंत अभाव आहे. त्याचा परिणाम म्हणून व्यक्तींच्या आणि राष्ट्रांच्या आत्म्यावर स्वार्थी आणि संकुचित दृष्टीचें आवरण पडलें आहे आणि बहु-

संख्याकांच्या कल्याणासाठीं आणि सुखासाठीं सर्वांनीं झटण्याऐवजीं सर्वत्रच सत्ते-साठीं झगडा चाललेला दिसतो—मग त्यामध्यें कोणालाहि आणि कितीहि का क्लेश पडेनात! परस्परांबद्दल आदर, सहिष्णुता आणि समज यांच्या अभावामुळें हिंदुस्थानचें पुष्कळच नुकसान झालें आहे आणि अजूनहि होत आहे. जातिभेद आणि धर्म हे दोन प्रगतीच्या मार्गांतील मोठे अडथळे आहेत. धर्मविषयक संकुचित दृष्टीमुळें जुन्या जखमा भरून येण्याऐवजीं नव्याच उत्पन्न होतात आणि जातिभेदामुळें एकाच वंशांतील माणसांतील परस्पर संबंधाला प्रत्यवाय येतो व परस्परांची माहिती मिळवून मदत देण्याला विरोध होतो, असाच पक्का अनुभव आहे. सद्गृहस्थहो, आपल्या समाजाला हानिकारक असणारा हा अस्पृश्यतेचा कलंक दूर करण्याचा तुम्ही चिकाटीनें प्रयत्न कराल तर खात्रीनें हिंदुस्थानचा धन्यवाद मिळवाल.

आपले अंतस्थ दोष केवढेहि मोठे असले तरी बाहेरच्या जगांतील वैषम्यां-पुढें ते फिकेच पडतांना दिसतात. आज आंतरराष्ट्रीय संबंधामध्यें सर्वत्र, इतरांबद्दल प्रदर्शित होणारी सदिच्छा केवळ तोंडापुरती असून प्रत्यक्ष वागतांना सर्वसाधारण नीतिनियमांशीं सर्वथा विसंगत असेंच बेछूट वर्तन अगदीं बेफिकिरीनें केलें जातें. वास्तविक मनुष्य हा स्वभावतःच दुष्ट असण्यापेक्षां सदय असतो, दुःखापेक्षां सुखाकडेच अधिक झुकत असतो. परंतु जेव्हां राष्ट्राराष्ट्रांत युद्धें होतात आणि वातावरण परस्परां-बद्दल केलेल्या कटु दोषारोपांनीं भरून जातें आणि समृद्धीच्या मध्येंच दारिद्र्याचा प्रादुर्भाव होतो. तेव्हां जगांत खरोखरच कांहीं तरी भयंकर चुकतें आहे, हें उघडच आहे. त्या वेळीं आपल्यापैकीं उत्तम गुण दडपले जातात आणि शांतता, अविरोध आणि सौमनस्य यांकडे निसर्गतः झुकता असणारा आपला कल प्रतिरुद्ध होतो, हें खरें नाहीं काय? आपले हीन विकार वरचढ होऊन मित्रत्व ही जीवनांतील अत्यंत मोठी देणगी होय हें आपण विसरावें, हा मुख्यत्वेंकरून आपलाच दोष नाहीं काय? आपण समाजाच्या पुनर्घटनेकडे हळूहळू जात आहोंत आणि शेवटीं चांगुलपणाचा जय होऊन सुख व उत्कर्ष हीं प्राप्त होतील, असा मला विश्वास वाटतो. परंतु भवितव्यतेच्या यशाकरितां आपण व्यक्तिशः आपलें सर्वस्व देत आहोंत कीं नाहीं, हा प्रश्न आपण आपल्यालाच विचारण्यासारखा आहे.

या परिषदेंत शंभराच्यावर रोटरी क्लबांचे प्रतिनिधि आलेले आहेत, असें समजतें. सद्गृहस्थहो, मोठ्या विस्तृत क्षेत्रांतील लहान-मोठ्या अनेक केंद्रांतून आपण आलां आहां. त्यांपैकीं कित्येक परस्परापासून चार चार हजार मैल दूर असून त्यांच्या संस्कृति, भाषा, हितसंबंध आणि दृष्टिकोन हेहि परस्परांपासून भिन्न आहेत. मनुष्यजातीची सेवा करण्याचें जें तुमचें ध्येय आहे, त्यांत तुम्हांला एकीकृत करण्या-चें सामर्थ्य आहे; आणि सार्वजनिक हिताकरितां सत्कृत्य करण्याचें ज्ञान हेंच तुमचें एकमेव पारितोषिक आहे! याच उद्देशानें जगाच्या इतर भागांतहि विभागशः

परिषदा भरवितात यांत शंका नाहीं. फक्त रोटेरिअनच नव्हे तर जगांतील प्रत्येक मनुष्य अशा रीतीनें या ध्येयावरील विश्वासानें प्रेरित होऊन तत्पोषक आचराचा आपआपल्या सामर्थ्यानुसार काहीं अंश देईल तर केवढें अनिवार्य सामर्थ्य उत्पन्न होईल, याचा एक क्षणभर विचार करा. आपलें हें जग त्या योगानें आजच्या-पेक्षां फार निराळें होईल!

आपल्या ब्रीदवाक्यांत नमूद केलेल्या ध्येयासंबंधीं विचार करतांना जॉन मोर्लेचें एक अप्रसिद्ध वाक्य मला आठवलें. तो एकदां असें म्हणाला कीं, "कोणाहि व्यक्तीला आश्चर्यकारक वाटेल इतकें कल्याण करतां येईल, मात्र त्याचें श्रेय कोणाला मिळतें याची त्यानें फिकीर करतां कामा नये." आपण सर्वांनीं अंतः-करणांत बाळगावें असें हें वाक्य आहे आणि रोटरीच्या चळवळींत त्याचें बळ उघडच दिसून येतें. माझ्या समजुतीप्रमाणें ज्या ज्या क्षेत्रांत एखाद्या सभासदाचें वजन मोठें असतें आणि सेवेकरितां बराच अवसर असतो, तेथें तेथें त्या सभा-सदाच्या वैयक्तिक परिश्रमाच्या फायदा घेऊन, परस्परांत अधिक सहानुभूति आणि सर्वसाधारण हितसाधनाकरितां अधिक परिश्रम निर्माण करणें हा या चळवळीचा मुख्य प्रयत्न असतो. हें काम किती व्यापक आहे यावर भर देण्याचें अर्थात् कारण नाहीं. परंतु या पृथ्वीतलावर सौमनस्य उत्पन्न करण्यासाठीं आपण शक्यतों प्रयत्न अवश्य केला पाहिजे.

आपल्या सर्वांच्याच अंतःकरणांत वास करीत असलेल्या उद्देशांना उत्तेजन देण्यासाठीं मी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल आपल्या अध्यक्षांमार्फत उच्चार करण्या-चा चांगुलपणा तुम्हीं दाखविला. आपला वर्गनिविष्ट सभासद अगर आपल्या चळवळींतील कार्यकर्ता सभासद अशा नात्यानें मी आपल्याला आज बोलूं शकत नाहीं हें खरें आहे. पण मी अंतःकरणाचा रोटेरिअन आहे आणि आचरणांत देखील मी रोटेरिअन असल्याचा हक्क मला सांगतां येईल, असा मला विश्वास वाटतो. कोणाहि राजाला किंवा अधिकारावर असलेल्या कोणाहि व्यक्तीला आपल्या अधिकारांतील लोकांच्या हिताला स्वतःला वाहून घेण्यापेक्षां दुसरें अधिक श्रेष्ठ ध्येय असूं शकेल, असें मला वाटत नाहीं. आणि गेलीं कित्येक वर्षें रोटेरिअनांनीं आपल्यापुढें ठेवलेल्या ध्येयानुसार प्रयत्न करण्याचा हा मान आणि जबाबदारी मजवर पडलेली आहे.

ह्या परिषदेचें उद्‌घाटन करण्यासाठीं मला बोलावून तुम्हीं जो माझा सन्मान केला त्याची मला चांगलीच जाणीव आहे, आणि आपल्या या परिषदेमध्यें माझें स्वागत करतांना आपण जे प्रेमळपणाचे उद्गार काढले त्याबद्दल मी आपले पुनः एकदां आभार मानतों. आपला विचारविनिमय यशस्वी होईल आणि येथून

जातांना आपण आपल्याबरोबर आपल्या येथील मुक्कामाविषयीं फक्त सुखद संस्मृति घेऊन जाल, अशी मला आशा आहे. आतां ही परिषद चालू झाली असें जाहीर करण्यास मला आनंद वाटतो.

## ८०

**स्थलः—कोडिनार.**

**कालः—तारीख १४ फेब्रुवारी १९३८.**

**प्रसंगः—प्राची रोड कोडिनार रेल्वेचें उद्‌घाटन.**

सभ्य स्त्री-पुरुषहो,

माझ्या प्रकृतीमुळें मला माझ्या संस्थानच्या सरहद्दीवरील भागांना वारंवार भेट देतां येत नाहीं याचें मला नेहमींच वाईट वाटतें. यामुळें या महत्त्वाच्या प्रसंगीं मला आपल्याकडे येतां आलें याचा मला खरोखरच आनंद होत आहे. तुम्हीं माझें मनापासून स्वागत केलें याबद्दल आणि तुमच्या वतीनें स्टेट-रेल्वेज्‌चे मॅनेजर आणि डिस्ट्रिक्ट बोर्डाचे अध्यक्ष यांनीं जे गौरवपर उद्गार काढले त्यांबद्दल मी आपले आभार मानतों. ही योजना पुरी झाल्यानें तुम्हांला जो अभिमान वाटतो आणि तिच्यामुळें तुमच्या तालुक्याची भरभराट होईल असा जो तुम्हांला विश्वास वाटतो त्या दोहोंतहि मी आपल्या सर्वांशीं सहमत आहें. तुमच्या गरजा आणि हितसंबंध यांचा विचार नेहमींच माझ्या मनांत असतो, याबद्दल तुम्हीं खात्री बाळगावी.

आधुनिक शास्त्रानें वाहतुकीच्या साधनांचा वेग आणि प्रकार इतके वाढविले आहेत कीं, पूर्वीच्या पिढीच्या लोकांना जी प्रगति अत्यंत त्वरेची वाटली असती तीच नव्या पिढीला अत्यंत मंदपणाची वाटण्याचा संभव आहे. शिवाय सर्व सरकारांना आज किती गोष्टी कराव्या लागतात याची त्यांना जाणीव नसते. वाहतुकीची व्यवस्था ही बाब कितीहि महत्त्वाची असली तरी इतर लोकोपयोगी बाबीं-बरोबरच आणि एकाच तिजोरींतून तिचीहि तरतूद व्हावयाची असते. इतर संस्थानांप्रमाणें बडोदें संस्थानावरहि ही मर्यादा पडते. असें असूनहि आमचेकडील रेल्वे रस्त्यांचें प्रमाण हिंदुस्थानच्या कोणत्याहि भागाशीं तुलना केली असतां कमी पडूं नये इतकें आहे, याचें कोणालाहि समाधानच वाटलें पाहिजे.

मीं संस्थानचा कारभार प्रथम हातीं घेतला त्या वेळचीं परिस्थिति तुम्हीं विचारांत घेतली तर अगदीं आरंभीचा माझा उत्साह रेल्वेबद्दलच कां होता आणि अजूनहि तो तसाच कां टिकला आहे याची तुम्हांला सहज कल्पना येईल. सन १८७५ त बडोद्यांत एक फक्त एकोणीस मैल लांबीची लहानशी रेल्वे लाईन आणि नांव घेण्यासारखे अगदीं थोडे गाडीरस्ते होते. बडोद्याचा मुलूख तुटक असल्यामुळें सलग मुलखांतल्याप्रमाणें त्यांत रस्ते करतां येईनात; कित्येक मुलखांत सामानसुमान उपलब्ध झालें तरी रस्ते बांधणेंच अशक्य होतें आणि एकंदरींत द्रव्यसाहाय्यच अगदीं मर्यादित असल्यामुळें त्यावरील सर्व मागण्या भागविण्यासाठीं त्याची काळजीनें संचणी करणें अवश्य होतें.

बडोद्याचा मुलूख खुला व्हावा हें अत्यंत महत्त्वाचें होतें. आणि संस्थानच्या एकंदर गरजा आणि मर्यादित साधनें यांची वजावाट करून मीं शेवटीं रेल्वेवर भर देण्याचें ठरविलें. मात्र देशाची रचना अनुकूल असली, येणारा सर्व खर्च आटोक्यांतला असला आणि केलेल्या खर्चांवर योग्य मोबदला मिळण्याची आशा असली तरच ती रेल्वे हातांत घेण्यांत येत असे. ह्या शेवटच्या अटींवर मात्र तितका कडक कटाक्ष ठेवतां येणें अशक्य होतें. कारण रेल्वे हें जरी मुख्यत्वेंकरून व्यापारी खातें असलें तरी केवळ नफ्यावरच त्याची किंमत मोजणें बरोबर नाहीं. रेल्वेरस्ते व्यापारधंद्यांच्या आणि प्रवासाच्या सोईकरितांच असतात. परंतु दळवळणाला व नव्या कल्पनांना उत्तेजन देऊन आणि दृष्टिकोन व्यापक करून ते अशा तऱ्हेचें सांस्कृतिक मूल्य उत्पन्न करितात कीं, जें केवळ द्रव्यदृष्टीच्या आढाव्यांत नमूद करतां येणार नाहीं.

माझें प्रारंभीचें रेलवेबद्दलचें धोरण अशा तऱ्हेच्या विचारांनीं प्रेरित झालेलें होतें, आणि यद्यपि आधुनिक परिस्थितीला अनुरूप असे त्यांत कांहीं फेरबदल करावे लागले असले, तरी मूलतत्त्वें बहुतांशीं तशींच राहिलीं आहेत. त्या आरंभीच्या काळांत आम्हांला आलेल्या अडचणी, केलेल्या चुका आणि वेळोवेळीं शिकावे आणि विसरावेहि लागलेले धडे यांबद्दल विशेष सांगण्याचें कारण नाहीं. संथपणें एकसारखी प्रगतिच झाली एवढें सांगितलें म्हणजे पुरें. पहिल्या पंधरा वर्षांत शंभर मैल रेल्वे तयार झाली आणि आज आमची सर्व रेल्वे ७०० मैलांहून अधिक लांबीची आहे.

रेल्वेच्या बाबतींत हल्लीं बडोद्याची कशी सुस्थिति आहे, हें नेहमींच ध्यानांत घेतलें जातें असें नाहीं. परंतु बडोदें संस्थानच्या क्षेत्रफळाच्या मानानें विचार केला असतां उत्तर हिंदुस्थानांत जें रेल्वेचें प्रमाण पडतें त्याच्या पांचपटींनीं बडोद्याचें प्रमाण पडतें, ही गोष्ट आंकड्यांनीं सिद्ध होणारी आहे. साहजिकपणेंच याला पुष्कळ खर्च लागला. परंतु कोणत्याहि दृष्टीनें एकदां रेल्वे बांधणें अवश्य किंवा इष्ट वाटलें तर मग खर्चाची अडचण त्याच्या आड येऊं दिलेली नाहीं. माझ्या हीरक-

महोत्सवाच्या प्रसंगीं महत्त्वाच्या सर्व योजना जवळजवळ पुऱ्या होत आल्याबद्दल मी बोललों होतों; आणि आज ह्या रेल्वेचें उद्‌घाटन झालें म्हणजे संस्थानच्या बहुतेक भागांत आतां पुरेशा रेल्वे झाल्या आहेत असें म्हणणें शक्य होईल.

रेल्वेच्या बाबतींतील आपलें उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीनें जरी आपली निश्चयानें प्रगति होत असली तथापि तेवढ्यामुळें यापुढें प्रयत्न शिथिल केले तरी चालतील किंवा मिळालेल्या यशावर संतुष्ट होऊन आपल्याला राहतां येईल, असें समजूं नये. वाहतुकीच्या एकंदर रस्त्यांपासून रेल्वेची फारकत करतां येणार नाहीं. आणि कांहीं काळ गेल्यानंतर आणि अनुभवानें प्रत्ययास आल्यामुळें, कराव्या लागलेल्या धोरणांतील बदलाबदलीचा मीं यापूर्वीच उल्लेख केला आहे. उदाहरणार्थ, कित्येक क्षेत्रांमध्यें मालमसाला उपलब्ध नव्हता आणि बाहेरून आणावयाचा तर त्यासाठीं लागणारा खर्चहि परवडण्यासारखा नव्हता; अशा ठिकाणीं रेल्वेमुळेंच रस्ते बांधण्याचें काम अधिक सोपें झालें. मोटारींची वाढ झाल्यामुळें त्यांच्यासाठीं म्हणून आणि रेल्वेला पोषक म्हणून अधिक लांबीचे आणि अधिक चांगले रस्ते बांधविण्याची गरज उत्पन्न झाली. कांहीं ठिकाणीं रस्ते आणि मोटारी यांची वाढ झाल्यामुळें अस्तित्वांत असलेल्या रेल्वेंना जरूर नसतांना देखील स्पर्धा उत्पन्न होऊन त्यांत नुकसान आलें. आणि त्यामुळें रेल्वे आणि इतर रस्ते यांच्या वाढीमध्यें थोडी संगति आणण्यासाठीं प्रत्येकाबद्दलच्या आंखलेल्या धोरणांत कालांतरानें थोडाफार फरकहि करावा लागला.

गुजराथच्या बहुतेक भागांत अजूनहि रस्ते बांधण्याचें काम कष्टाचें आणि खर्चाचें असून ते दुरुस्त राखण्याला खर्चहि फार येतो. पण केवळ तेवढ्या कारणामुळेंच बांधणीचें काम मंदगतीवर टाकण्यांत आलेलें नाहीं. कारण व्यापारी किंवा संस्कृति-विषयक उपयोगाच्या दृष्टीनें विचार करतां रेल्वे व रस्ते यांत तसा फारसा फरक नाहीं. आणि बऱ्याच अंशीं ते एकमेकांना पूरकच होतील आणि त्यांची परस्परांत स्पर्धा लागणार नाहीं असाच आम्हीं प्रयत्न केला आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, १८७५ पासून रेल्वेची वाढ जितक्या झपाट्यानें झाली आहे तितक्याच झपाट्यानें रस्त्यांची लांबीहि लक्ष वेधण्याइतपत वाढली आहे. अविश्वसनीय आणि दुर्लक्षित अशा पूर्वीच्या अल्पलांबीच्या रस्त्यांच्या जागीं आतां आपल्या संस्थानांत चांगल्या व दुरुस्त राखलेल्या अशा एक हजार मैल लांबीच्या सडका उपयोगांत आहेत. शहरांतील क्षेत्रांत असलेले रस्ते आणि हंगामी व स्थानिक महत्त्वाचे रस्ते स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांनीं बांधलेले व राखलेले असतात; त्यांचा हिशोब या गणतींत धरलेला नाहींच. ते याशिवाय निराळेच आहेत.

मागपासूनचें माझें रेल्वेबद्दलचें धोरण आणि सर्वसाधारण दळणवळणाच्या

साधनांशीं त्याचा संबंध यांबद्दल आतांपर्यंत मीं थोडक्यांत खुलासा केला. त्याप्रमाणें नेहमींच निर्वेध अमल झाला आहे असें नाहीं. कित्येक वेळां आपल्या मानव्याच्या सामर्थ्यमर्यादेमुळें तर इतर वेळां आमच्या आटोक्याच्या बाहेरच्या कित्येक कारणांमुळें त्यामध्यें व्यत्यय आले. परंतु एकंदर विचार करतांना आमचें उद्दिष्ट हळूहळू पण निश्चयानें यशस्वी झालें आहे. परंतु भविष्यकाळाबद्दलचें काय? मोठमोठ्या नव्या रेल्वे बांधण्याबद्दलच पाहावयाचें म्हटलें तर, माझा साठ वर्षांचा कार्यक्रम पुरा झाला असें समजण्यास हरकत नाहीं. आणखी नव्या योजना अंगावर घेणें शक्य आहे हें नाकबूल करतां यावयाचें नाहीं. परंतु सध्यां तरी आपण झालें तें पक्कें करण्याचें, आहे त्यांत सुधारणा करण्याचें, आजतागायतपणा आणण्याचें आणि आपल्या रेल्वेवर उपलब्ध असलेल्या सुखसोयी शक्यतों पूर्णत्वास नेण्याचेंच धोरण अंगीकारलें पाहिजे. आणि या तऱ्हेच्या कामामध्यें आज उत्साह आणि कार्यकर्तृत्व या दोहोंनाहि अमर्याद अवसर आहे.

म्हणजे आतां असें घडलें आहे कीं, इतक्या वर्षांपूर्वीं बडोद्यामध्यें जे बेत हळूहळू अमलांत येऊं लागले होते ते आज कोडिनारमध्यें पूर्ण झाले— आतां कोडिनार हें पूर्वीसारखें तुटक राहिलेलें नाहीं. टपाल खातें, तार खातें, टेलिफोन, तुमचे मुख्य रस्ते आणि आतां रेल्वे या सर्वांच्या योगानें आतां जग अगदीं जवळ आलेलें आहे. बिनतारी संदेशयंत्रांनीं तुमच्या सुखसोयींत लवकरच भर पडेल आणि त्यानंतर विमानें तुमच्या मदतीला येतील हेंहि खास. अशा रीतीनें आधुनिक सुधारणांमुळें ज्या संधि तुम्हांला मिळत आहेत त्यांचा जोमानें उपयोग करण्याची तुम्हीं आणि बडोदा संस्थानांतील सर्वांनींच महत्त्वाकांक्षा धरावी. मीं जें जें कांहीं करण्याची खटपट केली त्याचें बक्षीस तुमच्या सुखाची आणि समृद्धीची वाढ झाली म्हणजेच मला मिळेल. आणि आतां ही रेल्वे उघडल्याचें जाहीर करतांना मी या रेल्वे बांधण्याच्या कामीं ज्यांचा ज्यांचा संबंध आला त्या सर्वांचे आभार मानतों. याच वेळीं गेल्या कित्येक वर्षेंपर्यंत या कामीं ज्यांनीं साहाय्य दिलें त्यांहि सर्वांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करतों.

८१

**स्थलः—बडोदें.**

**कालः—ता. २३ फेब्रुवारी १९३८.**

**विषयः—राजसेवकांचीं कर्तव्यें.**

### उपदेशाचें कारण

सन १९२८ मध्यें तारीख २० मार्च रोजीं खानगी खात्यांतील कामकाज कसें करावें याविषयीं मीं तुम्हांला उपदेशपर दोन शब्द सांगितले होते. तुमचें काम सुधारावें, तुमच्यांत आणि यजमानांत गैरसमजुतीचे प्रसंग सहसा न यावे आणि तुम्हांस व यजमानास एकमेकांच्या अडीअडचणी कळून तुम्हीं आपलें काम चांगल्या रीतीनें करण्यास शक्तिमान् व्हावें, या हेतूनें आजहि मी तुम्हांस मागील वेळेप्रमाणेंच थोडासा उपदेश करणार आहें. अर्थात् सर्वच गोष्टी सांगत बसणें शक्य नाहीं. आणि कदाचित् तें शक्य असलें तरी, त्यांतील कांहीं गोष्टी तुमच्यापैकीं कित्येकांना समजण्यास कठीण जातील.

### खानगी खात्याचें महत्त्व

प्रत्येक मनुष्याला तो गरीब असो कीं श्रीमंत असो समाजांत ठराविक दर्जा असतो. आपआपल्या दर्जाप्रमाणें प्रत्येकाला कौटुंबिक, सामाजिक व लौकिक अशीं निरनिराळ्या प्रकारचीं कर्तव्यें करावयाचीं असतात. सामान्य माणसास तीं स्वतःच करावीं लागतात. मध्यम वर्गांतील माणसें थोड्याशा नोकरांच्या मदतीनें हीं कर्तव्यें करतात, तर राजाला राज्यकारभाराचीं अनेक महत्वाचीं कामें असल्यानें हीं कर्तव्यें स्वतः करणें शक्य नसतें. एवढेंच नाहीं तर त्यासाठीं राजाला सुव्यवस्थित अशा खानगीसारख्या खात्याची जरूर भासते. अशा खात्यास महाराजांच्या गृहव्यवस्थेचें काम करावयाचें असल्यानें राज्यकारभारांत या खात्याचें अतिशय महत्त्व असतें. राजकुटुंबांतील मंडळींच्या सुखसोयी व विशेषतः महाराजांचें शारीरिक व मानसिक स्वास्थ्य संभाळणें हें या खात्याचें मुख्य ध्येय होय. महाराजांची गृहव्यवस्था उत्तम रीतीनें चालवून त्यांना प्रजाहितांचीं कामें करण्यास भरपूर वेळ मिळूं देणें, हें खानगी खात्याचें मुख्य कर्तव्य होय. हें कर्तव्य पार पाडण्यासाठीं खानगी खात्यांत निरनिराळ्या प्रकारच्या कामांसाठीं एकंदर अठरा कारखाने आहेत. या कारखान्यांनीं आपआपलीं कामें बिनबोभाट व समंजसपणें करून महाराजांच्या सुखसोयी व त्यांचा लौकिक संभाळण्याचें काम करावयाचें असतें.

यावरून खानगी खात्यांतील नोकरांचें महत्त्व किती आहे, हें तुमच्या ध्यानीं येईल. प्रत्येक नोकर हा आपआपल्या कामाचा कर्ता-करविता आहे. अर्थात् प्रत्येक नोकराचें महत्त्व आपआपल्या प्रमाणांत अतिशय आहे हें विसरून चालणार नाहीं.

**खानगीची रचना**

खानगी खात्याचा कारभार चालविण्याकरितां खानगी कारभारी हे खात्याचे मुख्य अधिकारी म्हणून नेमण्यांत आले आहेत. त्यांचे मदतीस नायब खानगी कारभारी व चिटणीस असे दोन अंमलदार आहेत. खेरीज, दरएक कारखान्यावर एक एक कारखानदार असून त्याच्या मदतीस इतर नोकर आहेत. कारखानदार हा आपआपल्या कारखान्याच्या कामाकाजासाठीं पूर्ण जबाबदार असून खानगी कारभारी हे खात्याचे अधिकारी या नात्यानें सामान्यतः जबाबदार आहेत.

**नोकरांस आवश्यक गुण**

आपणांभोंवतीं नजर फेकली तर आपणाला एकंदर प्राणिमात्रांत जीवनकलह चाललेला आढळून येईल. यांत आपणांस टिकाव धरून आपली व आपल्या देशाची प्रगति करून घ्यावयाची असेल तर आपण अवश्य तीं साधनें मिळविलीं पाहिजेत. मनुष्याची प्रगति अथवा अवनति त्याच्या गुणावगुणावर अवलंबून असते. प्रगतीस आवश्यक असे गुण तुमच्यांत असतील तरच तुमची अथवा देशाची प्रगति होऊं शकेल. तुम्हांला तुमच्या कामकाजांत प्रगति करण्यासाठीं कोणत्या गुणांची आवश्यकता आहे तें मी तुम्हांस सांगतों:—

(१) लक्षपूर्वक काम करणें,
(२) चौकस दृष्टि ठेवणें,
(३) खऱ्याखोट्याचें ज्ञान,
(४) स्वयंस्फूर्ति,
(५) आशावादीपणा,
(६) इच्छाशक्ति,
(७) निश्चितपणा,
(८) संघटनशक्ति,
(९) आत्मविश्वास,
(१०) नैतिक धैर्य,
(११) महत्त्वाकांक्षा,
(१२) आत्मसंयमन,
(१३) प्रसंगावधान,

(१४) स्मरणशक्ति,
(१५) संभाषणशक्ति, आणि
(१६) भाषणशक्ति.

हे गुण तुम्हीं प्राप्त करून घेतले तर तुम्ही आपलें काम उत्तम रीतीनें करूं शकाल. या गुणांपैकीं तुमच्या अंगीं कांहीं गुण असले तरी त्याबरोबरच तुमच्यांत अवगुणहि असतील तर तुमची प्रगति, किंबहुना तुमचें कामकाजहि पाहिजे तितक्या लवकर व चांगलें होऊं शकणार नाहीं. याकरितां गुण मिळविण्याचा प्रयत्न करीत असतांना तुम्हीं आपल्यामधील अवगुणांची हकालपट्टी केली पाहिजे. आतां या प्रकारचे तुमच्या प्रगतीस अडथळा करणारे अथवा तुमचें कामकाज बिघडविणारे अवगुण कोणते आहेत ते सांगतों:—

(१) विसराळूपणा,
(२) निराश होणें,
(३) मनाचा कमकुवतपणा,
(४) निरुत्साह,
(५) कल्पनाशक्ति नसणें,
(६) अनिश्चितपणा,
(७) पद्धतशीरपणा नसणें, आणि
(८) स्वतःस हलकें समजणें.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, नोकरवर्ग चांगल्या आचरणाचा, चांगल्या स्वभावाचा, सुशिक्षित, व्यवहारदक्ष, काम लवकर करणारा, थोडें व पटेल असें बोलणारा, कोणाची भीडभाड न ठेवणारा, अहंकार नसलेला, मत्सररहित, नम्रतेनें काम करणारा व आपल्या वर्तनानें इतरांना अनुकरणीय होणारा, असा असला पाहिजे.

**नोकरांचें ध्येय**

सामान्य मनुष्य स्वतःचें कौटुंबिक व इतर व्यवहार कळकळीनें व फार काळजीनें पाहतो. नोकरांनीं तितक्याच अथवा त्याहीपेक्षां जास्त कळकळीनें व काळजीनें महाराजांच्या गृहव्यवस्थेचीं कामें केलीं पाहिजेत. अर्थात् तसें करण्यासाठीं त्यांनीं आपआपल्या कामांशीं एकरूप झालें पाहिजे. महाराजांच्या सुखसोयी हें मुख्य ध्येय समजून त्यापुढें इतर गोष्टींची पर्वा नोकरांनीं करतां कामा नये. आपल्या कामाशीं एकरूप कसें व्हावें याविषयीं मारुतीची गोष्ट तुमच्या स्मरणांत असेलच. एकदां रामानें मारुतीच्या एकनिष्ठ सेवेवर खुष होऊन त्यास रत्नांचा हार बक्षीस दिला. त्या हाराच्या किंमतीकडे लक्ष न देतां त्यांत आपला मालक राम आहे कीं नाहीं तें पाहण्यासाठीं मारुतीनें तो हार दांतांनीं फोडून त्याचा चुरा केला आणि

त्यांत राम न सापडल्यानें तो फेकून दिला. ही दंतकथा असली तरी नोकरानें मालकाविषयीं एकनिष्ठ भक्ति ठेवावी हें त्यांतील सार घेण्यासारखें आहे.

**उत्कंठित होणें मन।**
**तेचि खूण सेवकाची॥**

यांत तुकारामानें म्हटल्याप्रमाणें तुम्हांला आपल्या कामाविषयीं उत्सुकता किंवा उत्कंठा लागली पाहिजे; आणि अशा रीतीनें तुम्हीं आपआपलें काम काळजीपूर्वक व समजुतीनें केलें तरच तुम्हीं आपलें कर्तव्य केलें, असें म्हणतां येईल.

**साधनें**

कोणाहि नोकरास आपल्या मालकाची नोकरी उत्तम प्रकारें करण्यासाठीं त्यास जीं जीं कामें करावयाचीं असतील त्यांचें पूर्ण ज्ञान, अशीं कामें करण्याकरितां आवश्यक शिक्षण, शिस्त, नियमांची माहिती इत्यादि गोष्टींची जरूर असते. अर्थात् या सर्व बाबतींचें ज्ञान नोकरानें प्रथम करून घेतलें पाहिजे. कारण त्यांपैकीं जरी एका गोष्टीचें ज्ञान नसलें तरी नोकराच्या कामकाजांत कमतरता येण्यासारखी असते. कामकाजाचें ज्ञान हें जसें आवश्यक तसेंच नोकराला आपल्या कामाविषयीं आवड व कामाचा सराव यांची जरूरी आहे. वास्तविक, व्यवहारांतील दरेक कामांत मनुष्याला पूर्ण यश प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर त्यानें आपल्या कामांत आवड ठेवून कामाविषयींचें ज्ञान मिळविलें पाहिजे आणि असें ज्ञान मिळविल्यावर तें कायम ठेवण्यासाठीं त्याचा सराव ठेवला पाहिजे. कांहीं नोकर आपल्या कामांत बिलकुल उत्साह बाळगीत नाहींत अथवा शक्य तितक्या नेटानें कामें करीत नाहींत. अर्थात् उत्साहाशिवाय त्यांनीं केलेलें काम चांगलें होत नाहीं. तसेंच आपल्या कामाविषयींचें ज्ञान नोकरांनीं न मिळविलें तर त्यांच्याकडून वारंवार चुका होऊन यजमानास निष्कारण त्रास होतो. एवढेंच नव्हे तर अशा नोकरांस नोकरींत ठेविण्याचा हेतूहि पार पडत नाहीं. उदा०— बंगलेवाल्याचें काम करणाऱ्यास महाराजांच्या लिहिण्याच्या टेबलावर एकंदर काय काय वस्तु लागतात व त्या टेबलावर कशा रीतीनें मांडाव्या, याचें ज्ञान नसेल तर त्याचा यजमानास कांहींच उपयोग न होऊन, उलट त्याला निष्कारण तकलीफ मात्र होते. अर्थात् नोकराला आपल्या कार्याविषयीं आवड व पूर्ण ज्ञान हीं पाहिजेत. त्याचप्रमाणें त्यानें "वपराती कुंचा हमेशां उजळी रहे," या गुजराथी म्हणीप्रमाणें आपल्या कामाचा सराव किंवा अभ्यास चालू ठेविला पाहिजे. तसें न केलें तर नोकराच्या ज्ञानांत कमीपणा येऊन, त्यास आपलें कर्तव्य पाहिजे तितक्या चांगल्या रीतीनें करतां येत नाहीं. उदाहरणार्थ, घोड्यावर बसण्याची नोकरी करणारा नोकर एक-दोन महिने घोड्यावर न बसला तर, त्या काळानंतर घोडा कदाचित् आपल्या धन्याची ओळख विसरून त्यास सुखानें बसूं देणार नाहीं किंवा नोकरहि घोड्यास आपल्या कह्यांत ठेवूं शकणार नाहीं. तसेंच, गवईलोक आपल्या गाण्याची

रोज तालीम न करतील तर त्यांच्या आवाजांत कमीपणा येऊन ऐकणाराचें मन पाहिजे त्याप्रमाणें ते आनंदित करूं शकणार नाहींत. सारांश, आपल्या कामकाजास जरूर अशा सर्व बाबतींचें ज्ञान मिळवून कोणतेंहि काम असो तें आवडीनें व आस्थापूर्वक करण्याची सवय ठेविली पाहिजे. अशा रीतीनें काम करण्याची नोकरांना एकदां सवय लागली म्हणजे मोठमोठीं कामें हातीं घेऊन तीं पार पाडण्याची त्यांच्या अंगीं शक्ति येईल.

**श्रमविभाग व साध्य**

महाराजांचें आरोग्य, मनःस्वास्थ्य व लौकिक हीं संभाळण्याकरितां खानगींतील निरनिराळ्या कारखान्यांना श्रमविभागाच्या तत्त्वावर कामें वांटून देण्यांत आलीं आहेत. त्याचा हेतु एवढाच कीं, एकाच मनुष्याला जास्त काम न पडतां इच्छित कार्य लवकर व सुरळीत व्हावें. अर्थात् महाराजांच्या सुखसोयी हें ध्येय असून तें साधण्याकरितांच केवळ निरनिराळ्या हुद्द्यांचे नोकर नेमण्यांत आलेले असतात, हें नोकरलोक पदोपदीं विसरतात. यजमानाचें सुख हें जें अखेरचें ध्येय तें बाजूला राहून लोक आपआपल्या कामाचेंच बंड माजवितात. व्यवहारांतहि पुष्कळ वेळां असाच अनुभव येतो कीं, मनुष्य आपलें ध्येय विसरून साधनालाच महत्त्व देत बसतो. देव भावाचा भुकेला असून त्याची कोणत्याहि प्रकारें भक्ति केली असतां ती त्याला आवडते. परंतु अनुभव असा आहे कीं, खरी भक्ति बाजूस राहून लोक औपचारिक व दिखाऊ गोष्टींचेंच स्तोम माजवितात. दगडाच्या मूर्तीची सेवा करण्यामध्यें, नैवेद्यसमर्पणाच्या वेळीं नारळ फोडून आंतील खोबरें स्वतः भक्षण करून मूर्तीच्या वांट्यास अखेर नरोटीच येते. मूर्ति निर्जीव असल्यामुळें अर्थात् त्याबद्दल तक्रार होणें शक्य नाहीं. परंतु तीच दांभिक वृत्ति सजीव प्राण्यांसंबंधीं दाखविली तर तिचा स्वीकार कसा होईल, हें विस्तारानें सांगणें अनावश्यक आहे. अर्थात् "ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्।" या न्यायानें जशास तसेंच घडून अशा सेवेची परिपूर्ति शिक्षेमध्येंच होणें हें यथायोग्य होय. महाराजांच्या सुखाकरितां नोकर नेमण्यांत येतात. अर्थात् महाराजांना सुख न होऊन उलट गैरसोय होऊं लागली तर अशा नोकरांचा कवडीचाहि उपयोग नाहीं, असेंच म्हणावें लागतें. हुजरे, परिवेषक, नाईक, चोपदार, बंगलेवाले इत्यादि निरनिराळ्या हुद्द्यांचे नोकर महाराजांच्या तैनातींत असतात. अर्थात् महाराजांच्या सुखसोयी हें या सर्वांचें आद्य कर्तव्य होय. परंतु हे नोकर महाराजांच्या तैनातीपेक्षां आपापल्या कामासच महत्त्व देतात व आपल्यापुरतें पाहतात. आपल्या स्वतःच्या ठरीव कामाखेरीज इतर काम अडीअडचणीच्या वेळींहि करण्याची तत्परता त्यांच्यांत दिसून येत नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. त्यांचें अस्तित्व त्यांच्या ठराविक नोकरीकरितांच नसून वास्तविक महाराजांच्या एकंदर सुखसोयीसाठीं आहे, हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. अशी

भावना नोकरांनीं न ठेवल्यानें मालकाची कशी गैरसोय होते याचीं माझ्या अनुभवांतील कांहीं उदाहरणें तुम्हांस सांगतों. एकदां महाराज विलायतेहून आले. त्याच दिवशीं राजवाड्यांत आल्याबरोबर त्यांनीं हुजऱ्याजवळ पिण्यास पाणी मागितलें. हुजऱ्यानें कोठारांत कळवून पाणी आणण्यास सांगितलें. कोठाऱ्यानें त्यास कळविलें कीं, महाराजांना पाणी देण्याचें काम तुमचें आहे. त्यावर हुजऱ्यानें कोठाऱ्यास उलट कळविलें कीं, हें काम माझें नसून तुमचेंच आहे. याचा परिणाम असा झाला कीं, महाराजांना अर्धा तासपावेतों प्यावयास पाणी मिळालें नाहीं! तसेंच, एकदां महाराज चहा पीत असतां दुसऱ्या एका गृहस्थांसाठीं निराळें टेबल आणण्यास परिवेषकास महाराजांनीं सांगितलें. वास्तविक हें काम अगदीं सोपें असून त्यास सहज करतां येण्यासारखें होतें. परंतु महाराजांचें सुख व त्यांची सोय हें आपलें मुख्य कर्तव्य असल्याची त्यास जाणीव नसल्यानें, त्यानें तें काम आपलें नसून बंगलेवाल्याचें आहे असें सांगितलें. अर्थात् असा जबाब देण्याबद्दल त्या परिवेषकाला नोकरींतून कमी करावें लागलें. त्यावरून कोणीकडूनहि मालकास सुख व्हावें हें ध्येय विसरून कामें केल्यानें मालकाची कशी गैरसोय होते तें तुम्हांस कळून येईल. मालकाचें सुख हें ध्येय प्राप्त करण्यासाठीं ध्येयाची जाणीव ठेवून त्याप्रमाणें नोकरांनीं कामें केलीं पाहिजेत. आपल्या वरिष्ठांच्या आज्ञा बजावितांना त्या आज्ञा मालकाचें सुख डोळ्यांसमोर ठेवून समंजसपणें बजाविल्या पाहिजेत हें नोकरलोक कसें विसरतात, त्याचें एक उदाहरण मला आठवतें तें येथें सांगतों. राजवाड्यांत एकदां भोजनाचा कार्यक्रम होता. त्या वेळीं महाराज व इतर मंडळी यांच्यासाठीं खुर्च्या लावण्यांत येऊन त्या व्यवस्थेंत फिरवाफिरव न करण्याबद्दल सरबंगलेवाल्याकडून बंगलेवाल्यांना बजाविण्यांत आलें होतें. पुढें ही खुर्च्यांची व्यवस्था महाराजांना सोईची नसल्याचें दिसून आल्यावर वास्तविक त्या व्यवस्थेंत तात्काल फेरबदल करावयास पाहिजे होता. परंतु सरबंगलेवाले याच्या हुकुमासुळें खुर्च्यांची फिरवाफिरव करण्यास बंगलेवाले चटकन् तयार होईनात. यावरून लहान-मोठे सर्व नोकर आपापल्या वरिष्ठांच्या आज्ञा आंधळेपणानें पाळण्यांत दंग राहून यजमानाचें सुख हें जें आपल्या कार्याचें मुख्य ध्येय तें कसें विसरतात, तें कळून येईल. नोकरलोक आपलीं कामें केवळ यंत्राप्रमाणें करतात, असें पुष्कळदां आढळून येतें. आपणास कराव्या लागणाऱ्या कामामध्यें बुद्धि वापरून त्यासंबंधींची पूर्ण माहिती ते मिळवीत नाहींत. त्यामुळें यजमानांस अशा नोकरांचा पाहिजे तितका उपयोग होऊं शकत नाहीं. एकदां महाराजांनीं त्यांच्या स्नानगृहांतील स्नानपात्रांत ( Bath-tub ) नळ सोडला असतां त्यांत गरम पाणी किती वेळानें येतें आणि अशा पाण्यानें स्नानपात्र भरण्यास किती वेळ लागतो असा प्रश्न त्या कामावरील स्नापकास विचारला. या स्नापकाची नोकरी वीस वर्षें होऊन त्यानें वीस वर्षें हेंच काम केलें होतें. तथापि महाराजांच्या या प्रश्नास 'मला माहिती नाहीं' असें त्यानें उत्तर दिलें! या सर्व गोष्टींचें कारण एवढेंच दिसतें कीं, नोकर-

लोक आपल्या कर्तव्याचें पूर्ण ज्ञान मिळवीत नसून कोणीकडूनहि महाराजांचें काम सहकार्यानें व समंजसपणें करावयाचें हें ध्येय ते विसरतात. कामाची वांटणी सोई-करतां करण्यांत येते; नोकरांची जबाबदारी कमी करण्यासाठीं नव्हे. सोन्याचे निरनिराळ्या प्रकारचे अलंकार तयार करून त्यांना निरनिराळीं नांवें देण्यांत आलीं असलीं, तरी त्यांत सोनें ही एकच मूलभूत वस्तु असते. तद्वत् राजसेवेसाठीं निर-निराळ्या हुद्द्यांचे नोकर असून त्यांचीं कामें निरनिराळ्या प्रकारचीं असलीं तरी त्या सर्वांचें धोरण व ध्येय राजसौख्य हें एकच असलें पाहिजे हें सांगावयास नकोच.

**संघटना व सहसंघटना**

महाराजांचें स्वास्थ्य व लौकिक संभाळणें हें खानगी खात्याचें मुख्य ध्येय होय. तें प्राप्त करण्यासाठीं खानगींतील सर्व प्रकारच्या हुद्द्यांच्या नोकरांनीं एकमेकांस मदत केली पाहिजे. "एकमेकां सहाय करूं । अवघे धरूं सुपंथ॥" या वचनाप्रमाणें एकमेकांस आनंदानें मदत करून आपआपलें कर्तव्य शक्य तितक्या चांगल्या प्रकारें करण्यास नोकरांनीं झटलें पाहिजे. खानगी कारभारी हे खानगीच्या एकंदर कारभाराकरितां जबाबदार आहेत. परंतु तसें असलें तरी तुमच्या साहाय्यावांचून ते एकटे कोणतेंहि महत्त्वाचें काम करूं शकणार नाहींत. खानगी खात्यांतील कारखाने व नोकर हे एकाच शरीराचे निरनिराळे अवयव आहेत. अर्थात् यांतील एक अवयव जर बधिर होऊन कामास निरुपयोगी झाला, तर तेवढ्यापुरतें तें शरीरयंत्र विस्कळित झाल्यावांचून राहणार नाहीं. शरीरांतील डोळे, हात, पाय इत्यादि सर्व अवयव शाबूत राहून ते एकसारखे काम करतील, तरच मनुष्याला आपले रोजचे व्यवहार चांगल्या रीतीनें करतां येतील. अर्थात् यांतील एका अवयवांत जर कमीपणा असेल, तर तितक्या प्रमाणांत मनुष्याला कामकाजास अडथळे येतील. त्याचप्रमाणें नोकर जर आपल्या कामास लायक नसेल, तर त्या मानानें त्या कारखान्याचें काम बिघडल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच महाराजांसन्निध काम करणाऱ्या नोकरांपैकीं दरएकजण आपल्या कामांत व महाराज सांगतील तें काम करण्यांत तत्पर असला पाहिजे; कारण त्यास सांगितलेलें काम जर कदाचित् तो विसरला तर त्याचा परिणाम फार दूरवर पोंहोचून त्याच्या विसराळूपणामुळें पुष्कळ लोकांना गैरसोय होते. यासाठीं खानगींतील व विशेषतः महाराजांसन्निध काम करणाऱ्यांनीं अत्यंत लक्ष राखिलें पाहिजे. राजवाड्यां-तील नोकर पगारानें लहान असला तरी कामाच्या परिणामाचा विचार करतां अशा नोकराच्या कामाचें महत्त्व अतिशय आहे. एखादा यांत्रिक कारखाना तुम्हांपैकीं पुष्कळांनीं पाहिला असेल. तेथील एखाद्या मोठ्या यंत्रांत लहानमोठीं अशीं अनेक चाकें असतात. तीं पाहतांक्षणीं तुम्हांला असें वाटेल कीं, या यंत्रांत इतकीं हीं लहानमोठीं चाकें कशाला आणि त्यांतील एकदोन चाकें गळून पडलीं तरी कोणास समजणार आहे? परंतु ही समजूत खोटी आहे. त्या यंत्रांतील मोठ्या चाकाइतकेंच

अत्यंत लहान चाकासहि महत्त्व आहे. एखादें लहानसें चाक जरी नादुरुस्त झालें तरी कुशल इंजिनियर तें चटकन् शोधून काढतो व प्रथम दुरुस्त करतो. कारण या एका चाकाच्या मजबुतीवर त्याचें सर्व यंत्र अवलंबून असतें. याचप्रमाणें खात्याच्या कारभारांत एखाद्या लहान नोकरानेंहि थोडीशी जरी चूक केली तरी एकंदर खात्यास त्याची जाणीव झाल्याखेरीज राहत नाहीं. दरएक नोकर, मग तो कितीहि कनिष्ठ असो, खात्यांतील एक महत्त्वाचा घटक आहे. अर्थात् खात्याच्या कारभारांत अशा नोकराच्या कामाचें महत्त्व आहे. कार्याचें महत्त्व व परिणाम लक्षांत घेतां नोकरांनीं हा कनिष्ठ, हा वरिष्ठ असा भेद बाळगणें उचित नव्हे. संघटना व सहसंघटना या दोहोंचेंहि महत्त्व विसरून चालणार नाहीं. एका कारखान्यांतील निरनिराळ्या नोकरांत संघटन अथवा सहकार्य असेल तरच त्या कारखान्याचीं कामें सुरळीतपणें होऊं शकतील. दरएक कारखान्याच्या घटनेंत निरनिराळ्या नोकरांचीं कामें ठरविण्यांत आलेलीं असतात. परंतु प्रसंगविशेषीं कोणी नोकर नोकरीवर न आला तर त्याचें कामहि आपल्या ठरीव कामाउपरान्त करण्याचा इतर नोकरांस प्रसंग येतो. अर्थात् सर्वांनीं मिळून कारखान्यांचीं कामें बिनतक्रार, काळजीपूर्वक व समंजसपणें केलीं तरच त्या कारखान्यांत संघटन आहे असें म्हणतां येईल. खानगीच्या कारखान्यांतील कांहीं कामें एका व्यक्तीनें, तर कांहीं कामें व्यक्तींच्या समुदायानें करण्याचीं असतात. एका नोकराच्या चुकीचे परिणामहि जसें सर्वांना भोगावे लागतात, तद्वत् सामुदायिक कार्यांतहि एखाद्या नोकराच्या हलगर्जीपणामुळें कार्यांचा नाश होण्याचा संभव असतो. याला आपण फरासखान्याकडील तंबू लावण्याचें उदाहरण घेऊं. एखादा मोठा तंबू लावण्यासाठीं निदान दहाबारा नोकरांची जरूर असते. त्यांपैकीं कोणी तंबूच्या रशा ओढतात, तर कोणी मेखा मारतात. तसेंच तंबूमध्यें कोणी खुर्च्या, कोणी कोच लावतात, तर कोणी बिछायत करतात. अशा रीतीनें नोकरांचा समुदाय कर्तव्यदक्ष राहिल्यानें तंबू लावण्याची व्यवस्था होते. परंतु समजा, यांतील एखादा नोकर कामचुकारपणा किंवा हलगर्जीपणा करून तंबूच्या मेखा जमिनींत बरोबर न रोवील तर त्यामुळें कदाचित् तंबू खालीं पडण्याचा प्रसंग येईल. यावरून यःकश्चित् मेखा मारण्याचें कामहि किती महत्त्वाचें आहे, हें ध्यानीं येईल. अशा नोकरांचें काम दिसावयास क्षुल्लक असलें तरी तें महत्त्वाचें असतें.

"कांकरे कांकरे पाळ बंधाय; ने टीपे टीपे सरोवर भराय ॥"

म्हणजे, थोडी थोडी माती एकत्र करण्यानें मोठी पाळ बांधतां येऊन त्या योगें पाण्याचा मोठा प्रवाहहि अडवितां येईल, व थेंब थेंब पाणी जर एकसारखें टाकीत गेलें तर सरोवरहि भरून जाईल—अशा अर्थाच्या या गुजराती सुभाषिताप्रमाणें लहान लहान कामें एकत्र करूनच मोठें काम होत असतें, हें तुमच्या सहज लक्षांत येईल. मात्र सामुदायिक कार्यांत प्रत्येक नोकरास आपल्या गटांतील इतर नोकरांच्या कर्तव्यमर्यादेची जाणीव

असेल, तर काम चांगलें व लवकर होईल. आतां, कारखान्यांतील नोकरांत जसें संघटन अवश्य तसेंच निरनिराळ्या कारखान्यांमध्यें सहसंघटनेची जरूरी आहे. आपण खात्याचा एक महत्त्वाचा घटक आहों अशी दरएक कारखान्याची भावना असली पाहिजे. खानगी खातें हें महाराजांच्या मनोरंजनाकरितां एक तंतुवाद्य कल्पिलें तर खानगीचें कारखाने हे जणूं त्या वाद्यांतील निरनिराळ्या तारा होत. अर्थात् या तारांमधून सुरेल संगीत निघालें तरच तें तंतुवाद्य वाजविणारा निष्णात असें म्हणतां येईल. सुरेल संगीत निर्माण होण्यास तंतुवाद्याच्या सर्व तारा एकसारख्या सुरेल आवाजांत वाजणें जसें आवश्यक, तसेंच खानगी खात्याचें ध्येय जें यजमानसुख तें प्राप्त करण्यासाठीं निरनिराळ्या कारखान्यांमध्यें सहसंघटना असणें जरूरीचें आहे. संघटना अथवा सहसंघटना यांचें महत्त्व अतिशय आहे. यजमानाच्या घरीं सर्व सेवा सारख्याच आहेत. तुमचा पेषा कोणताहि असो, तुम्हीं आपआपल्या पेषाचें काम व सहकार्याचें तत्त्व ओळखून प्रसंगविशेषीं इतर पेषाचेंहि काम तत्परतेनें व समंजसपणें केलें, तरच तुम्हीं आपलें कर्तव्य केलें असें म्हणतां येईल. यजमानाचें काम करण्यानें पर्यायानें तुम्ही आपलेंच काम करीत असतां हें विसरूं नका.

### कर्तव्यांचें पूर्ण ज्ञान

प्रत्यहीं जगाचें पाऊल पुढें पडत असून नानाविध सुधारणा व घडामोडी जगांत चालू आहेत. त्यांच्याकडे सतत नजर ठेवून, दरएक नोकरानें, आपआपल्या कारखान्याचीं कामें सुरळीत चालून त्यांत उत्तरोत्तर कशी सुधारणा होत जाईल, त्याची खंत बाळगिली पाहिजे. यासाठीं, प्रथम त्यानें आपल्या कारखान्याच्या काम-काजाच्या स्वरूपाचा सांगोपांग अभ्यास केला पाहिजे. कारण, त्याशिवाय त्यास आपल्या हाताखालील नोकरांत स्वतःविषयीं विश्वास उत्पन्न करून त्यांच्याकडून झडपीनें व बिनचूक कामें करवून घेतां येणार नाहींत. 'आधीं केलें, मग सांगितलें' या समर्थांच्या वचनाप्रमाणें त्याचा बाणा पाहिजे. केवळ आलेल्या कागदावर सही करण्यानें अंमलदारानें आपलें कर्तव्य केलेंसें होत नाहीं. तर दरएक नोकरानें आपणांस कराव्या लागणाऱ्या एकंदर कर्तव्यांचें ज्ञान करून घेऊन तत्संबंधींची पूर्ण माहिती मिळविली पाहिजे.

### राजपुत्रादिकांच्या संगोपनाचें ज्ञान

राजवाड्यांतील नोकरांचा राजपुत्रादींशींहि संबंध येत असतो. अर्थात् राज-कुमारांचें संगोपन कसें करावें, त्यांना शिक्षण कसे द्यावें व त्यांच्या मनांत स्वतःच्या बडेजावासंबंधींच्या विपरित कल्पना भरवून दिल्यानें कसे वाईट परिणाम होतात, त्याची अंगत नोकरांना माहिती असणें अवश्य आहे. तसेंच, आपल्या सहवासांत येणाऱ्या माणसांच्या स्वभावाची पारख चट्‌कन कशी करावी व अशा मंडळांतून

चांगलीं व वाईट माणसें कशीं निवडावीं, याचें ज्ञान राजकुमारादिकांना असणें अत्यावश्यक आहे. कारण, अशा माहितीच्या अभावीं त्यांना व्यवहारांत पदोपदीं फसण्याचा प्रसंग येऊन, त्यामुळें आयुष्यांत त्यांना बरेंच नुकसान भोगण्याचा प्रसंग येतो. अर्थात् अशा प्रकारचें ज्ञान राजपुत्रादिकांना करून देण्यासाठीं असें ज्ञान प्रथम नजीकच्या मंडळींना असणें खास जरूरीचें आहे. परंतु, त्यांना या गोष्टीचें ज्ञान नसतें ही खेदाची गोष्ट होय. भावी आयुष्यामध्यें स्वतःवर पडणाऱ्या जबाबदारीकरितां राजपुत्रांना क्रमशः कशा प्रकारें तयार करावें, याची या मंडळींना बरोबर कल्पनाहि नसते. अर्थातच अशा मंडळीकडे राजपुत्रांच्या संगोपनाचें महत्त्वाचें काम सोंपविलें गेलें म्हणजे काय परिणाम होणार, हें सांगणें नकोच. केवळ खुशामत करून, आपली स्वतःची चंगळ करून घेण्याकडे अशा लोकांची प्रवृत्ति असते. नजीकच्या मंडळीमधील इष्टानिष्ट, बरेंवाईट व आरंभीं कडू पण परिणामीं मधुर, अशा गोष्टींची पूर्ण कल्पना नसल्यानें राजपुत्रादिकांना व्यवहारज्ञानाची यथार्थ कल्पना न येतां, स्वतःच्या बडेजावाच्या खोट्या गोष्टींचाच त्यांच्या मनावर पगडा बसतो. अर्थात् त्याचा अनिष्ट परिणाम त्यांना व इतरांना पुढें जन्मभर भोगावा लागतो. सामान्य स्थितींतल्या मुलांना आसमंतात् फिरून एकंदर वातावरण निरीक्षण करण्याच्या मुबलक संधि मिळतात. राजपुत्राच्या किंवा राजाच्या विवक्षित परिस्थितीमुळें हें वातावरण लाभणें त्यांना अशक्य असतें. त्यांच्याभोंवतीं गुरफटून राहणारी थोडीशी मंडळी हीच त्यांचें सर्व जग बनून राहतें. अर्थात् या मंडळींच्या व्यक्तिविषयक गुणावगुणांचा ठसा त्यांच्या मनांवर उमटल्याशिवाय राहत नाहीं. वास्तविक ज्ञान ही कोणाची एकट्याची मिरास नसून तें मिळविण्यासाठीं सर्वांना सारख्याच तऱ्हेची संधि मिळावयास पाहिजे. अशा परिस्थितींत राजपुत्रादिकांना योग्य ज्ञान प्राप्त होण्यासाठीं त्यांच्याजवळ राहणाऱ्या मंडळींची निवड किती काळजीपूर्वक व सारासार विचार करून झाली पाहिजे, हें सहज समजण्यासारखें आहे. खरोखर, देशाचें कल्याण करण्याचें असेल तर लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनीं समंजस दृष्टि ठेविली पाहिजे.

**अंगत नोकरांतील अज्ञान**

तक्रार करण्याच्या उद्देशानें नव्हे, परंतु ओघानेंच आलें म्हणून सांगतों. माझ्या लहानपणीं मजभोंवतीं जी मंडळी होती त्यांपैकीं कांहीं गतानुगतिक होती म्हणा, किंवा त्यांनीं या बाबतींत जितकी समंजसपणें काळजी घ्यावयास हवी होती तितकी घेतली नाहीं म्हणून म्हणा, त्यांनीं खरा धर्म कोणता, दान कोणास व कसें द्यावें, काय खावें, काय प्यावें, शरीराचा सांभाळ कसा करावा वगैरे गोष्टी चांगल्या रीतीनें शिकविल्या नाहींत. तसेंच त्या वेळच्या मंडळींत आपुलकीच्या भावनेनें पाहणारी व समंजस, कळकळीची मंडळी फार थोडी होती. या मंडळींना आणि

ना. ..........
ठाणे.



त्या काळीं लोकांनाहि आहारशास्त्राचें म्हणजे शरीरास पोषक असा आहार कोणता, साध्या पण पौष्टिक आहाराचे फायदे, तसेंच चमचमीत आणि तळीव पदार्थांपासून शरीरावर होणारे दुष्परिणाम इत्यादि गोष्टींचें ज्ञान यथातथाच असे. एवढेंच नव्हे तर असे अनिष्ट पदार्थ खाणें हें मोठेपणाचें व शिष्टाचाराचें लक्षण समजलें जात असे. त्यामुळें मसाल्याचे रसरसलेले असे पुष्कळ वातुळ, तिखट पण स्वादिष्ट पदार्थ माझ्या दररोज खाण्यांत येत. अर्थात् असे पदार्थ यजमानास खावयास देण्यानें इतर मंडळींना तूपसाखरेची चोरी करण्यास अनायासें संधि मिळत असे, ही गोष्ट वेगळी. परंतु यावरून जी मंडळी चांगली होती व ज्यांनीं माझ्या हिताकडे लक्ष दिलें होतें त्यांच्या उपकाराची मला जाणीव नाहीं असें मात्र समजूं नये.

**समंजस काटकसर**

मनुष्यप्राण्यास परमेश्वरानें बुद्धि दिली असून तिचा बरोबर उपयोग करण्याकरितां तो जबाबदार आहे. कोणतेंहि हलकें काम केल्यानें मनुष्यास हलकेपणा येत नाहीं. मानापमान हा माणसाच्या लहानमोठ्या हुद्द्यावर अवलंबून नसतो. आपलें प्राप्त कर्तव्य, मग तें कोणतेंहि असो, उत्तम रीतीनें पार पाडण्यावरच मनुष्याची योग्यता अवलंबून असते. परिस्थित्यनुसार मोठ्या हुद्दयाच्या माणसास लहान काम करण्याचा व लहान माणसास मोठ्या हुद्द्याचें काम करण्याचा अशा रीतीनें अरसपरस प्रसंग येतो. परंतु एवढ्यावरून या माणसाची योग्यता कमी अगर जास्ती लेखणें शहाणपणाचें नव्हे. याच तत्त्वाचें ज्ञान नोकरांमध्यें सदैव जागृत राहावें व कार्याचें महत्त्व लक्षांत घेऊन नोकरांचा लहानमोठा हा भेद विसरून जावा या उद्देशानें, तसेंच, लहान नोकरांनाहि मोठें काम करण्याची संधि मिळून उत्तेजन मिळावें या हेतूनें मीं कांहीं नोकरांना मानकऱ्यांच्या जागा दिल्या. त्यांना मोठा पगार दिला व दरबारी मंडळींत त्यांचीं नांवें घालून त्यांचा सामाजिक दर्जाहि वाढविण्याचा प्रयत्न केला. पण या प्रयत्नांत जसें फळ यावें तसें आलें नाहीं, याचा मला खेद वाटतो. महाराजांच्या सुखसोयी पाहणें हें या लोकांचें काम होतें. परंतु व्यवहारज्ञानाच्या अभावीं तें त्यांच्याकडून समाधानकारक रीतीनें होत नसे. या ठिकाणीं मला एक गोष्ट आठवते ती अशी : मी एकवीस वर्षांचा असतांना एकदां प्रांतांत दौऱ्यावर गेलों होतों. तेव्हां या मंडळींपैकीं कांहीं नोकरांनीं बोभाटा होऊं नये व महाराज कोणत्या वेळीं काय मागतील त्याचा नेम नाहीं म्हणून माझे सोळाव्या वर्षांचे कपडे व पादत्राणहि प्रांतस्वारींत नेलीं होतीं. कोणत्या वेळीं महाराजांना काय वस्तु लागतात त्याचें अज्ञान या लोकांत असतें. परंतु महाराजांकडून कदाचित् होणाऱ्या बोभाट्याच्या खोट्या सबबीखालीं नोकरलोक आपलें अज्ञान झाकण्याचा प्रयत्न करतात व अप्रत्यक्षपणें यजमानास कमीपणा आणतात. अशा रीतीनें बोभाट्याचा आव आणून पैच्या ठिकाणीं रुपया खर्च करणें हें

समंजसपणाचें मानतां येणार नाहीं. या पद्धतीनें आपण आपले व्यवहार करूं लागलों तर काय परिणाम होईल हें वर्णन करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. 'आयजीच्या जिवावर बायजी उदार,' असें न करतां जणूं आपलेंच घर आहे असें समजून सर्व प्रकारचे खर्च काटकसरीनें केले पाहिजेत हें लक्षांत ठेवा.

**मत्सर व अज्ञान यांचा परिणाम**

महाराजांच्या सन्निध काम करणाऱ्या लोकांमध्यें मत्सर, हेवा, असूया व अज्ञान यांमुळें एकमेकांसंबंधीं अदेखाई फार असल्यास त्यांच्याकडून यजमानाच्या सुखदुःखाचा विचार बेताबातानेंच होणार हें उघड आहे. सर्वांनीं मिळून सहकार्यानें आपआपलीं कामें करून महाराजांच्या सुखसोयी पाहण्याकडे अशा लोकांचें अर्थात्च दुर्लक्ष होतें. एकमेकांचा मत्सर करून व छिद्रान्वेषी बुद्धीनें दुसऱ्याचें उणें केव्हां दिसतें हें पाहण्याकडेच त्यांचा विशेष कल असतो. यजमानाचें सुख हें मुख्य ध्येय असून तें साधण्याकरितां आपण आहोंत याची जाणीव न ठेवतां आपला स्वार्थ कसा साधतां येईल याकडेच त्यांचें सर्व लक्ष असतें; मत्सर, अज्ञान इत्यादिकांचा काय परिणाम होतो हें सविस्तर सांगण्याची आवश्यकता नाहीं. या दुर्गुणांमुळें मोठमोठ्या राष्ट्रांची व विशेषतः हिंदुस्थानची पायमल्ली होऊन त्यास परावलंबीपणा आला आहे.

**सत्संगति**

महाराजांसन्निध काम करणाऱ्यांनीं निर्व्यसनी राहिलें पाहिजे. कोणतेंहि दुर्व्यसन वाईटच. व्यसनामुळें मनुष्य आपलें कर्तव्य विसरतो, व त्यामुळें त्याचें, त्याच्या कुटुंबाचें व त्याच्या सहवासांत येणाऱ्या सर्वांचें फार नुकसान होतें; यासाठीं तुम्ही निर्व्यसनी राहा. शक्य तितकें निर्व्यसनी राहण्यानें मनुष्याची बुद्धि वाढून त्याची कार्यक्षमताहि वाढते. व्यसनाधीन मनुष्य साधारणतः कोणतेंहि महत्त्वाचें काम करण्यास नालायक बनतो. याकरितां तुम्हीं स्वतः व्यसनी न होतां व्यसनी लोकांच्या संगतीपासूनहि दूर रहा. कारण मनुष्यावर संगतीचा फार परिणाम होत असतो. एवढेंच नव्हे तर मनुष्याची परीक्षा ज्या माणसाशीं त्याची संगत असते त्याच्यावरूनच करण्यांत येते. तेव्हां नेहमीं चांगली संगत ठेवून व्यसनी लोकांच्या नादीं न लागतां तुम्ही निर्व्यसनी, सच्छील, सुस्वभावी व सद्विवेकी होण्याचा प्रयत्न करा. जितकें कामाचें महत्त्व किंवा उपयुक्तता जास्त तितकी या गुणांची आवश्यकता जास्त, हें नेहमीं ध्यानांत ठेवा.

लंडे गुंडे हिरसे तट्टू
यांची संगत धरूं नको।

ढोंगी चंगी बटकी सटकी
यांच्या मेळ्यांत बसूं नको।

नरदेहासी येऊन प्राण्या
दुष्ट वासना धरूं नको॥

या अनंतफंदीनें लिहिलेल्या कटावाचें खास मनन करण्यासारखें आहे.

**निरीक्षणशक्ति व स्पष्टोक्तीचा अभाव**

आपल्या लोकांत निरीक्षणशक्तीचा अभाव दिसून येतो. यदाकदाचित् कांहीं गोष्टी उमगल्याच आणि तत्संबंधीं विचार मनांत घोळत असले तरी ते बोलून दाखविण्याची हिंमत नसल्यामुळें किंवा ते विचार समजाविण्याच्या शक्तीच्या अभावामुळें त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. याप्रमाणें विचारांची परिस्फुटता न झाल्यामुळें यजमानांस त्यांच्या अंतस्थ विचाराबद्दल केवळ तर्कावर विसंबून राहावें लागतें. मनमोकळेपणानें विचारविनिमय न झाल्यामुळें परिणामीं यजमानास अशा लोकांकडून मिळावी तितकी मदत मिळत नाहीं. अर्थातच अशा परिस्थितीमुळें सर्वांगीण प्रगति करणें किती दुर्घट होऊन बसतें हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

**स्वच्छतेचें महत्त्व**

स्वच्छतेचें महत्त्व दरएक नोकरानें ओळखिलें पाहिजे. स्वच्छता ठेविल्यानें मनुष्य सांसर्गिक रोगांपासून दूर राहून त्यास निरोगी राहतां येतें. स्वच्छता व आरोग्य यांचा निकट संबंध आहे. "Cleanliness is next to godliness," या इंग्रजी अथवा 'हात फिरे, तेथें लक्ष्मी फिरे,' या मराठी वाक्यांत स्वच्छतेचें महत्त्व सुंदर रीतीनें वर्णिलें आहे.

दरएक व्यक्तीनें तसेंच नोकरानें आपल्या व आपल्या यजमानाच्या वस्तु स्वच्छ ठेवण्याकडे लक्ष ठेवावें. कांहीं नोकरांना खोलींतच कोठें तरी थुंकण्याची वाईट सवय असते. तुमच्या घरांत काय किंवा राजवाड्यांत काय जेथें स्वच्छता असेल तेथें आरोग्य व आनंद नेहमीं वास करीत असतो. कांहीं नोकर आपलें शरीर व आपला पोषाक स्वच्छ व नीटनेटका ठेवण्याकडे दुर्लक्ष करतात, हें अयोग्य होय. त्यांच्या अशा वाईट सवयींमुळें त्यांचें स्वतःचें व त्यांच्या धन्याचेंहि फार नुकसान होतें, हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. पाकगृह, बंगला, फरासखाना यांतील किंबहुना दरएक कारखान्यांतील प्रत्येक नोकरानें आपआपलें शरीर, पोषाक तसेंच आपल्या ताब्यांत राहणाऱ्या वस्तु व पदार्थ कमालीचे स्वच्छ ठेविले पाहिजेत.

**सुधारणा सुचवाव्यात**

राज्याचा व दरबारचा इतमाम चालविणारे कारखाने राज्याच्या इभ्रतीस साजेसे व आवश्यक तितके प्रमाणशीर असले पाहिजेत. वैभव व थाटमाट हीं योग्य प्रमाणांत केलीं तर राजाच्या थोरपणास व सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें उपयोगी आहेत इतकेंच नव्हे, तर आवश्यकहि आहेत. म्हणून राजकुटुंबांतील खाशांकडून घडून येणारे सामाजिक व्यवहार व शिष्टाचार यांची खानगी खात्यानें चांगली माहिती मिळवून ते दुसऱ्यांस शिकवावे. जुन्या काळापासून चालत येणाऱ्या व्यवहारांमुळें होणारे नफे किंवा तोटे यांचें साधकबाधक प्रमाणानें परिशीलन केल्याशिवाय तें एकदम सोडून देणें योग्य नाहीं. दुसऱ्या राज्यांत, संस्थानांत व इतर ठिकाणीं काय काय महत्त्वाच्या गोष्टी घडतात व काय काय सुधारणा होतात त्यांचें नोकरांनीं हमेश निरीक्षण करीत असावें व त्यांतील ज्या बाबती आपल्या येथें फायदेशीर व उपयोगी पडतील त्या दाखल करण्याविषयीं सुचवावें.

**सुधारणा कशी असावी**

सुधारणा करावयाची ती सभंजस, विधायक, काटकसरीची, योग्य, प्रमाणशीर, उपयुक्त व शाश्वत स्वरूपाची असली पाहिजे. मात्र 'जुनें तितकें सोनें' या म्हणी-प्रमाणें केवळ जुन्यास, किंवा 'नवें तें हवें' असें म्हणून केवळ नव्यास, योग्यायोग्यतेचा विचार केल्याशिवाय चिकटून बसूं नये. सुधारणा कशा स्वरूपाच्या असाव्यात, याविषयीं मी माझींच दोन-चार उदाहरणें देऊन तुम्हांस सांगतों; म्हणजे त्यावरून तुम्हांस स्पष्ट रीतीनें कळून येईल. खानगींतील प्रत्येक कारखान्यांतील बहुतेक प्रत्येक बाबतींत मीं सुधारणा व योग्य वाटले असे फेरफार केले आहेत.

**प्रसाधनगृह**

पूर्वी प्रसाधनगृहांत कपडे इत्यादि सामान कसें तरी व कोठें तरी अव्यवस्थित रीतीनें ठेवण्यांत येत असे. त्यामुळें एखादी वस्तु चट्कन् न सापडून निष्कारण वेळ जात असे. त्या काळीं प्रसाधनगृहांतील व्यवस्थेची नोकरांना कल्पनाच नव्हती. लोक अज्ञानी असल्यामुळें कोणत्या रंगाचा कपडा केव्हां घालावा व कोणता रंग कोठें खुलून दिसतो याचें त्यांना ज्ञान नसे. खमीस, कोट, विजार इत्यादि कपडे कोणत्या तऱ्हेचे व रंगाचे आणि ते केव्हां घालावे याची त्यांना माहिती नव्हती. नोकरांमध्यें एखादाच जाणणारा व विवेकी असे; बाकीचे गतानुगतिक असत. त्यामुळें प्रसाधनगृहांतील सामानाची बरदास्तहि चांगली राहत नसे. तसेंच प्रसाधन-गृहांत असतांना जर प्यावयास पाणी लागलें तर तें तेथें ठेवण्यांत येत नसल्यानें कोठारांतून मागवावें लागे. हें सुधारण्याकरितां कपडे इत्यादि सामान ठेवण्याची पद्धति व त्याकरितां आवश्यक साहित्य पुरवून कामकाजासंबंधीं धोरणें घालून दिलीं.

**बंगला खातें**

राजवाड्यांतील फर्निचर-सामान स्वच्छ व सुशोभित आहे कीं नाहीं हें कोणी पाहत नसे. एवढेंच नव्हे तर राजवाड्यांत फर्निचर कोणत्या पद्धतीचें व कसें असावें त्याची नोकरांना नीटशी कल्पनाहि नव्हती. अर्थात् योग्य ज्ञानाच्या अभावीं फर्निचर-सामान स्वच्छ व नीटनेटकें ठेवण्याकडे नोकरांचें दुर्लक्ष होत असल्यास नवल नाहीं. हें सुधारण्याकरितां व पाश्चात्य धर्तीवर आपल्या लोकांना फर्निचर तयार करण्याची व तें सुव्यवस्थित ठेवण्याची कला यावी या उद्देशानें कांहीं विद्यार्थ्यांना युरोपांत शिक्षण घेण्यासाठीं पाठविलें; व ते शिकून आल्यानंतर त्यांच्याकडे बंगला खात्यास लागणारें फर्निचर-सामान मागविणें व राजवाडे शृंगारणें इत्यादि काम दिलें. मात्र त्यामुळें अशा लोकांच्या ज्ञानाचा फायदा घेऊन बडोद्यांत पाश्चात्य धर्तीवर फर्निचर तयार करण्याचे कारखाने व उद्योगधंदे सुरू करण्याचें कार्य होऊं शकलें नाहीं. याखेरीज सजावट करण्यांत तज्ज्ञ असे युरोपियन लोकहि नोकरीस ठेवून राजवाडे सजावटीसंबंधींच्या जरूर त्या सुधारणा घडवून आणल्या आणि त्यांच्याकडून तुम्हांस या बाबतचें शिक्षण देवविलें.

**पाकगृह व प्रवासीगृह**

पाश्चात्य सूपशास्त्राचें शिक्षण घेण्यासाठीं चार-पांच विद्यार्थि युरोपांत पाठवून त्यांच्याकडून पाश्चात्य व एतद्देशीय सूपशास्त्रावर पुस्तकें तयार करविलीं. तसेंच, पदार्थ तयार करण्यास लागणाऱ्या वस्तूंची प्रमाणवारी ठरवून रुक्के करण्याची पद्धति सुरू केली. या पुस्तकांचा आज तुम्हांस तुमच्या नोकरींत पुष्कळ उपयोग होत आहे. बडोद्यांत बाहेरगांवांहून येणाऱ्या प्रतिष्ठित गृहस्थांच्या खानपानाच्या सोईसाठीं येथें आधुनिक पद्धतीवर हॉटेल नसल्यानें त्यांची फार गैरसोय होत असे. ही उणीव दूर करण्यासाठीं व हॉटेलचा धंदा येथें निघावा म्हणून युरोपांतील हॉटेलच्या पद्धतीवर "बडोदा होटेल" नांवाची संस्था काढली.

**दानधर्म**

पूर्वीं दानधर्म व देवस्थानें यांकडे वाजवीपेक्षां फाजील खर्च होत असे. आपल्याकडील समजुतीप्रमाणें दानधर्म हे राजाचें व राज्याचेंहि भूषण होत. त्यामुळें राजाच्या अंगीं असलेल्या उदात्त गुणांची सहज साक्ष पटते. तथापि अशा धर्मादाय संस्था, त्यांच्या संस्थापकांचा हेतु, त्यांची कालमानानुसार असणारी आवश्यकता व त्यांचा होत असलेला प्रत्यक्ष उपयोग, यांचा विवेकबुद्धीनें विचार करावयास पाहिजे. तसें न करतां केवळ लौकिक लालसेनें किंवा अंधःश्रद्धेनें अशा धर्मादाय संस्था चालू ठेवणें किंवा त्यांत इष्ट असेहि फेरफार न करणें, हें समंजसपणाचें नाहीं. दानधर्म हा 'देशे काले च पात्रे च' या तीन गोष्टी लक्षांत घेऊन करावयास पाहिजे. ज्या

दानधर्मांपासून चिरकालीन फलप्राप्ति होते व दारिद्र्य, आळस इत्यादि हानिकारक गुणांची वाढ न होतां त्यांचें निरसन होण्यास जो कारणीभूत होतो तोच योग्य दानधर्म होय. मोठमोठे जलाशय बांधणें, औषधालयें स्थापणें अथवा ज्ञानाजर्नाच्या कामीं मदत करणें अशा बाबतींसाठीं होणारा दानधर्म उच्च प्रकारचा होय. याच धोरणानें देवघरांत अंधःश्रद्धा व वेडगळ समजुती यांच्या आधारावर होत असलेले विधि व आचार कांहीं अंशीं बंद केले असून, फक्त लौकिक व व्यवहारिक दृष्ट्या योग्य असे आचार व विधि चालू ठेविले आहेत. यांत देखील अद्याप सुधारणा करण्यास बरीच जागा आहे. सर्वांस धर्म पाहिजे आहे; मात्र तो नैतिक असून ऐदीपणास उत्तेजन देणारा नसला पाहिजे.

### प्रश्नावलि व नमुने

खानगी हिशेबी कचेरींत तसेंच खानगींतील दरएक कारखान्यांत काम कमी होऊन तें करण्यास सुलभ जावें या हेतूनें प्रश्नावलि व नमुने ठरवून देण्यांत आले. वास्तविक पाहतां या बाबती तुम्हीं होऊन सुचवावयास पाहिजेत. पण त्याऐवजीं मला स्वतःला हें काम करावें लागतें हें उचित म्हणतां येईल काय? तुमच्यामध्यें स्वतःच्या कामाविषयीं आवड व कळकळ असेल तर अशा सुधारणा तुम्हांस देखील सुचतील. तुम्हांमध्यें स्वतः होऊन सूचना करणारे लोक विरळा. किंबहुना नाहीं म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. रात्रंदिवस तुम्हीच काम करणारे असल्यामुळें खऱ्या सुधारणा तुम्हींच सुचविल्या पाहिजेत. कारण तें तुमचेंच काम आहे. असें जर तुम्हीं केलें तरच तुम्हीं आपल्या ज्ञानाचा सदुपयोग केला असें म्हणतां येईल.

### शिक्षणाची आवश्यकता

पुष्कळांची अशी समजूत आहे कीं, नोकरीमध्यें नोकराला आपल्या कामकाजासंबंधीं आनुभविक शिक्षण देण्याची जरूरी नाहीं. कारण त्यांचें म्हणणें असें कीं, कामाला काम शिकवितें; परंतु हा समज चुकीचा आहे. नोकराचा कोणताहि पेषा असो त्याला त्याच्या पेषाचें शिक्षण न देऊन भागणार नाहीं. शिक्षित नोकर इतर नोकरापेक्षां सहस्रपटींनीं अधिक चांगलें काम करूं शकेल. बुद्धि, ज्ञान व सुसंस्कृत मन असणाऱ्या नोकराची जरूर सर्वत्र भासते. अशिक्षित नोकरास जी गोष्ट अवघड वाटते तीच शिक्षित नोकरास सुलभ वाटते.

### शिक्षणाचे प्रकार

शिक्षण दोन प्रकारचें असतें. एक पुस्तकी व दुसरें आनुभविक. नोकरांना या दोन्ही तऱ्हेचें शिक्षण अत्यावश्यक आहे. जसें केवळ पुस्तकी शिक्षणाचा नोकर उत्तम काम करूं शकणार नाहीं, तद्वत् केवळ प्रत्यक्ष काम केलेला नोकरहि विशेष

उपयुक्त होणार नाहीं. केवळ प्रत्यक्ष काम करूनच माहिती मिळविली असून ज्यांना पुस्तकी माहिती मुळींच नाहीं असे नोकर एकाच ठराविक पद्धतीनें कामें करतात. त्यांना तत्त्व माहीत नसल्यानें आपल्या कामांत ते सुधारणा करूं शकत नाहींत, किंवा दुरुस्त्या सुचवूं शकत नाहींत. 'बाबावाक्यं प्रमाणम्।' या म्हणी-प्रमाणें त्यांचीं कामें अंधःश्रद्धेनें चालतात. तेव्हां पुस्तकी ज्ञान व आनुभविक ज्ञान या दोहोंमुळें नोकर आपल्या कामांत प्रवीण होत असल्यामुळें त्याला या दोन्ही प्रकारच्या ज्ञानाची जरूर आहे.

**शिक्षणाचे फायदे**

पुस्तकी व आनुभविक या दोन्ही प्रकारच्या शिक्षणानें नोकरांची कार्यक्षमता व बुद्धि वाढून त्यांस आपलें काम उत्तम रीतीनें करण्याची ताकद येते. अशा प्रकारें शिक्षण मिळालेला नोकर आपलीं कामें स्वयंस्फूर्तीनें करूं शकतो. 'असें कर, तसें कर' याप्रमाणें मालकाला त्यास दरएक वेळां सांगावें लागत नाहीं. कारण प्रत्येक बारीकसारीक गोष्ट सांगण्याचा कोणालाहि साहजिकच कंटाळा येतो. पूर्वीं स्वारी फिरावयास जात असे त्या वेळीं बरोबर पुष्कळसे स्वार नेण्यांत येत. परंतु त्यांना क्षुल्लक गोष्टी नेहमीं सांगाव्या लागत असत. म्हणून स्वारांची संख्या कमी केली व थोडे स्वार ठेवून पाहिले. तरी देखील 'उजवीकडे चला, डावीकडे किंवा समोर चला' अशा प्रकारें सांगण्याची तकलीफ आम्हांसच घ्यावी लागत असे. अर्थात् ही भगभग नको व स्वार नको असें म्हणून स्वार काढून टाकावे लागले. राजकारणा-सारखीं महत्त्वाचीं व भानगडीच्या प्रश्नांचीं कामें करून मनास थोडी विश्रांति मिळावी म्हणून शुद्ध हवेंत मनःशांतीसाठीं फिरावयास जावयाचें, परंतु तेथें देखील या क्षुल्लक गोष्टी सांगण्याची पाळी यावी, ही स्थिति किती खेदजनक आहे त्याची तुम्हीच कल्पना करा. यजमान थकलेभागले आहेत तेव्हां त्यांचा शीण उतरून त्यांचें मन उल्हसित व्हावें अशा प्रकारची काळजी न घेतां एखाद्या निर्विकार यंत्राप्रमाणें त्यांना लेखणें किती हीनपणाचें आहे, त्याचा विचार करा. अशा रीतीनें जेथें एकंदर समाजच अज्ञानी, सहानुभूतिरहित व विवेकशून्य आहे, तेथें चांगले लोक किती उत्पन्न होतील व झाले तरी त्यांच्याकडून महत्त्वाचें कार्य कसें होऊं शकेल, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. समाजाचा व सभोंवतालच्या एकंदर परिस्थितीचा परिणाम त्यांच्यावर हटकून होणारच. नालायक समाजामधून नालायकांचीच जास्त प्रमाणांत उत्पत्ति व्हावयाची, यांत शंका नाहीं. व्यक्ति सुधारल्या तरच देशहि सुधारेल. समाजांत हलगर्जीपणानें वागणारे ज्ञानहीन, व्यसनी, ऐदी व ऐतखाऊ अशा पुष्कळ व्यक्ति असल्यास अर्थात् त्यांची प्रजाहि तशीच व्हावयाची. यास्तव तुम्हीं दरएकानें सद्गुणी व चांगले होण्याचा प्रयत्न करून व दुसऱ्यांसहि चांगली शिकवण देऊन आपला चांगुलपणा कायम ठेवावा. तुम्हीं स्वतः चांगले

होण्यासाठीं व चांगलीं कामें करण्यासाठीं प्रत्यक्ष कामाचें धोरण व उद्देश काय तें समजून घेऊन कामें केलीं पाहिजेत. कोणतेंहि काम कां, कसें, कशाकरितां, कोणी व केव्हां केलें पाहिजे याची जाणीव असेल तर चुका फारच कमी होतील. 'योगः कर्मसु कौशलम्।' म्हणजे 'कुशलतेनें कर्म करणें म्हणजेच योग' या गीतावचनांत सांगितल्याप्रमाणें तुम्हीं आपआपलीं कामें बुद्धि वापरून व कुशलतेनें केलीं म्हणजे त्यांतच तुमचें श्रेय आहे.

### शिस्तीची आवश्यकता

नोकराला आपलीं कामें उत्तम प्रकारें करण्यास ज्याप्रमाणें शिक्षणाची आवश्यकता आहे तद्वत् त्यानें शिस्त पाळणेंहि जरूरीचें आहे. ठराविक पद्धतीनें, ठराविक गोष्ट, ठराविक वेळीं, एका व्यक्तीनें नव्हे—नोकरांच्या समुदायानें अथवा समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें करणें व दुसऱ्यास शक्य तितकी कमी तकलीफ देऊन सर्वांची सोय व हित वाढेल अशा रीतीनें ती करणें, यासच 'शिस्त' म्हणतात. आपण सर्व शिस्तीनें राहतों म्हणूनच आपले सर्वांचे व्यवहार सुरळीत चालले आहेत. समजा, दहा नोकर मिळून एखादें काम करीत आहेत त्यांपैकीं दरएकजण जर स्वच्छंदानें काम करील तर तें काम कदाचित् मुळींच होऊं शकणार नाहीं. प्रेमानें प्रेम वाढतें, त्याप्रमाणें शिस्तीनें शिस्त वाढते. शिस्तीनें मनुष्याच्या स्वभावांत करारीपणा येतो व आपलें ध्येय लवकर साध्य होतें.

### नियमांची आवश्यकता

कर्तव्यांचें पूर्ण ज्ञान, शिक्षण, शिस्त, यांप्रमाणेंच नोकराला आपापल्या कर्तव्यासंबंधींच्या नियमांची पूर्ण माहिती पाहिजे. कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें त्याची स्पष्टता नियमांत केलेली असते. नियम जर नसतील तर सर्वत्र अव्यवस्था व गोंधळ माजून जाईल. कोणत्याहि वेळचा समाज घेतला तर त्यांत जीवनकलह चाललेला आढळून येतो. अशा कलहांत व्यक्ति व समाज यांच्या सुस्थितीकरितां नियमांची आवश्यकता असते. व्यक्ति अगर समाज बंधनरहित व स्वेच्छेनुसार आचरण करील तर सर्वत्र अनवस्था होईल. प्रत्येक व्यक्तीस स्वातंत्र्य जरूर असलें पाहिजे. स्वातंत्र्याशिवाय व्यक्तीची काय किंवा राष्ट्राची काय केव्हांहि प्रगति होणें शक्य नाहीं. परंतु हें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, स्वातंत्र्य म्हणजे बेलगामी व निरर्गल आचार नव्हे. वास्तविक अनियंत्रित समाजांत नियंत्रित समाजापेक्षां सुखाचें व स्वातंत्र्याचें प्रमाण कमीच असतें. कारण इतरांकडून आपणांस नुकसान होईल कीं काय अशी भीति दरएक व्यक्तीस वाटते. निर्बंधामुळें जितकें स्वातंत्र्य कमी होतें त्यापेक्षां निर्बंधाच्या अभावीं आपापसांतील मारामाऱ्या व कलह यांच्यामुळें स्वातंत्र्याचा अधिक नाश होतो. बंधनापलीकडे जाणें हा समाजांतील दुर्वृत्त लोकांचा प्रकृतिधर्मच असल्यानें

अशांच्या नियंत्रणाकरितां समाजांत निर्बंध असणें अपरिहार्य आहे. दरएक खात्याकरितां व खात्यांतील निरनिराळ्या बाबतींसंबंधीं निर्बंध व नियम केले आहेत. इतकें जरी असलें तरी प्रत्येक बारीकसारीक बाबतींत निर्बंध येईलच असें नाहीं व समंजस मनुष्यें असल्यास तशी आवश्यकताहि नाहीं. जितके लोक जास्त अज्ञानी तितकी नियमांची संख्या अधिक व जितकीं माणसें जास्त समंजस तितके नियम कमी.

### निर्बंध किंवा नियम कसे असावेत

निर्बंध अगर नियम हे चालू पिढीकरितांच केवळ नसून ते भावी पिढीच्या हितावर व भविष्यकाळीं येणाऱ्या परिस्थितीवर नजर ठेवून आणि जुनीं तत्त्वें जीं हितकारक असतील तीं कायम ठेवून समाजाच्या प्रगतीकरितां करण्याचे असतात. निर्बंधांचें ध्येय 'पुढें चला' असें असलें पाहिजे. निर्बंध अगतिमान (stationary) अथवा कुंठितगति (stagnant) नसून प्रगतिपर असले पाहिजेत. दरएक व्यक्ति व जात मिळून एकंदर समाज प्रगतीच्या शिखरावर चढावा अशी आपली आकांक्षा असून, त्याप्रमाणें परिस्थित्यनुसार निर्बंधांतहि सुधारणा होत गेली पाहिजे.

### निर्बंध-नियमांची पूर्ण माहिती

प्रजेला राज्यकर्त्यानें पुष्कळ सुधारणा प्राप्त करून दिल्या तरी त्यांचें महत्त्व कळून त्यांचा उपयोग करून घेणें हें प्रजेवर व अंमलदारांवर अवलंबून आहे. निर्बंध-नियमांप्रमाणें निरनिराळ्या बाबतींसंबंधींचीं कामें कोणत्या पद्धतीनें व रीतीनें करावीं तें मीं वेळोवेळीं ठरवून दिलें आहे, कीं जेणेंकरून नोकरांच्या वेळेची बचत होऊन त्यांच्याकडून अधिक चांगलें काम व्हावें. कोणतीहि राज्य संस्था चिरस्थायी होण्यास ती कोणत्या तत्त्वावर चालविली आहे याचें ज्ञान चालू व भावी अमलदारांना असणें इष्ट आहे. तसेंच तत्त्वें समजल्यावरहि समाजाच्या परिस्थितीप्रमाणें त्या तत्त्वांना मूर्त स्वरूप देण्याचें व एखाद्या गुंतागुंतीच्या अगर नवीनच उद्भवणाऱ्या प्रश्नासंबंधीं महाराजांकडे धाव न घेतां दूरदर्शीपणानें निर्बंध-नियमांत सुधारणा करण्याचें काम अमलदारांचेंच असल्यानें त्यांना निर्बंधांच्या सर्वसामान्य तत्त्वांची व धोरणांची माहिती असणें अत्यावश्यक आहे. तसेंच नोकराला आपलें कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें याचें पूर्ण ज्ञान होण्यास त्यास निर्बंध-नियमांची पूर्ण माहिती असणें अवश्य आहे. मनुष्य कोणत्याहि पेषाचा असो, त्याला आपापल्या धंद्यासंबंधींच्या नियमांची व धोरणांची माहिती असल्याशिवाय त्याचें चालावयाचें नाहीं. अर्जुनालाहि आपल्या कर्तव्याची शंका वाटूं लागली त्या वेळीं कृष्णानें त्यास " तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ । " असें सांगून हाच उपदेश केला आहे. याकरितां आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें करण्यासाठीं तुम्हीं निर्बंध-नियमांची पूर्ण माहिती मिळविली पाहिजे व त्यांत उणीवा असतील त्या दुरुस्त करून घेण्यास समंजस रीतीनें झटलें पाहिजे.

**निर्बंधांची अंमलबजावणी**

राज्यघटना ठरवून त्यांतील निरनिराळ्या घटकांकरितां निर्बंध केले तरी त्यांचें पालन अथवा अंमलबजावणी योग्य रीतीनें न झाली, तर राज्यकारभार अथवा खात्याचा कारभार उत्तम रीतीनें चालविण्याची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. जसें निर्बंध करणें हें आवश्यक व महत्त्वाचें तितकेंच किंबहुना त्याहीपेक्षां निर्बंधांची अंमलबजावणी समंजस व नीट रीतीनें होणें अधिक महत्त्वाचें आहे. कारागिराजवळ हत्यारें वगैरे साधनें असलीं तरी त्यांस तीं कुशलतेनें वापरतां आलीं पाहिजेत. तद्वत् निर्बंधांची अंमलबजावणी करण्यासाठीं ते काय धोरणानें केले आहेत त्याची नोकरांनीं माहिती करून घेतली पाहिजे. निर्बंधांत किंवा हुकुमांत पूर्ण माहितीच्या अभावीं खाम्या असतील किंवा अपूर्तता असेल तर त्यांचा अक्षरशः अंमल न करतां समंजसपणें व राजनिष्ठापूर्वक अंमल केला पाहिजे. निर्बंधांचा किंवा हुकुमांचा अर्थ करतांना शब्दाला चिकटून न राहतां तर्कपद्धतीनें त्यांतील हेतु लक्षांत घेऊन कामें केलीं पाहिजेत. पद्धति अगर रीत यांना विशेष महत्त्व देऊन मुख्य तत्त्वाकडे दुर्लक्ष करणें उचित नाहीं. तत्त्व अगर साध्य हें मुख्य असून तें प्राप्त करण्याचे मार्ग भिन्न भिन्न असूं शकतील. रस्किन या इंग्रजी ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं, मनुष्यानें कोणतेंहि काम करण्यापूर्वी दूरदर्शीपणानें विचार केला पाहिजे. कारण अविचारानें व आंधळेपणानें काम केल्यास त्याच्या कामांत दोष उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहींत. म्हणून तुम्हीं आपलें काम करतांना बुद्धि वापरली पाहिजे. गतानुगतिकाप्रमाणें काम करीत गेल्यास तुमच्याकडून चुका खात्रीनें घडतील.

दुसरें असें कीं, निर्बंधांची अंमलबजावणी करतांना व्यक्तिविषयक स्वार्थामुळें पक्षपात होत नाहीं याकडे खास लक्ष देणें जरूर आहे. मेहेरबानी दाखविण्याकरितां किंवा मानसिक दौर्बल्यामुळें निर्बंधांचें कांटेकोरपणानें व पक्षपातरहित आचरण होऊं शकत नाहीं. आणि त्यामुळें राज्यकारभारांत असंतोष माजण्याचा संभव असतो. नोकरांनीं नियमांची किंवा हुकुमांची अंमलबजावणी करतांना अयोग्य भय अगर मनोदौर्बल्य दाखविणें हा एक मोठा दोष आहे. तसें करणें, विचार करण्याच्या शक्तीचा अभाव व अज्ञान दर्शवितें. कोणतेंहि काम निःस्पृहतेनें व निर्भयतेनें केल्याशिवाय चांगलें होत नाहीं. तिसरें असें कीं, स्वतःचा अगर दुसऱ्याचा फायदा करून देण्याकरितां निर्बंधांचा अगर राजाज्ञेचा सरकारहिताविरुद्ध अर्थ करून त्यांचा अंमल करणें म्हणजे एक प्रकारचा गुन्हा करणें होय. सरकारहित सांभाळण्यासाठीं नोकर नेमण्यांत येत असल्यानें त्यांच्या सरकारहिताविरुद्ध वर्तनानें त्यांना नोकरींत ठेवण्याचा हेतु पार पडत नाहीं. "सेवकें करावें स्वामिचें वचन। त्यांसी हुंजूपण कामा नये॥" या तुकारामाच्या उक्तीप्रमाणें निर्बंध व राजाज्ञा यांची यथायोग्य व तात्काल अंमलबजावणी हा सुराज्याचा आधारस्तंभ होय.

### निर्बंध-उल्लंघनाबद्दल शिक्षा

प्रजेच्या संरक्षणाकरितां व हिताकरितां राजसत्तेकडून निबंन्ध केले जातात आणि त्यामुळें राजाला प्रजेचें नियमन करतां येतें. राजा अगर वरिष्ठ सत्ता नसली तर देशांत ज्याप्रमाणें अराजकता माजते त्याचप्रमाणें निर्बन्धरहित देशांत बलवान् लोक दुर्बलांना पीडा करतात. अर्थांतच निर्बन्ध प्रजेकडून किंवा नोकरांकडून पाळले न गेले तर निर्बन्ध असून नसल्यासारखें होत. निर्बन्ध करण्याचें काम जसें राजाचें तसेंच त्यांचें अखिल प्रजाजनांकडून पालन होतें किंवा नाहीं हें पाहणें व तसें होत नसल्यास प्रजेला अगर नोकरवर्गाला त्याप्रमाणें पालन करण्यास भाग पाडणें हेंहि त्याकडे ओघानेंच येतें. निर्बन्धांचें उल्लंघन झाल्यास प्रजेची सुस्थिति राहाणें अथवा नोकरवर्गाकडून बरोबर कामें होणें शक्य नसल्यानें निर्बन्धांचें उल्लंघन करणारांस, तसेंच शिस्त मोडणारांस दण्ड अथवा शासन करणें, हें क्रमप्राप्तच आहे. उदाहरणार्थ, नवीन इमारत बांधल्यावर तिची जोपासना व योग्य सांभाळ करणें हें ओघानेंच प्राप्त होतें; नाहीं तर योग्य जोपासनेच्या अभावीं ती इमारत थोड्या काळांत ढासळल्याशिवाय राहणार नाहीं.

### शिक्षेचा हेतु

पूर्वीच्या ग्रंथांत स्मृतिकारांनीं दण्डाला (शासनाला) विशेष महत्त्व दिल्याची वर्णनें सापडतात त्यांचेंहि हेंच कारण आहे. दण्डाची भीति हीच प्रजेला काय अथवा नोकरवर्गाला काय ताब्यांत ठेवून तिचें रक्षण करूं शकते. मनु म्हणतो,

**सर्वो दण्डजितो लोको दुर्लभोऽहि शुचिर्नरः ।**
**दण्डस्य हि भयात्सर्वं जगद्भोगाय कल्पते ॥**

म्हणजे पवित्र व सदाचरणी लोक या जगांत फारच थोडे असून प्रजा ही दण्डाच्या भीतीनेंच नीतिनियमांचें पालन करीत असल्यानें दुर्वृत्त लोकांचें नियमन करण्यास दण्डाची जरूरी आहे.

### शिक्षेचे प्रकार

कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत तीन प्रकारचे दण्ड सांगितले आहेत. हे तीन प्रकार म्हणजे तीक्ष्ण दण्ड, मृदु दण्ड आणि यथार्थ दण्ड होत. यांपैकीं प्रथमच्या दण्डामुळें लोक राजाचा त्याग करतात, तर दुसऱ्या प्रकारच्या दण्डानें प्रजेंत राजाबद्दल आदर राहत नाहीं. तिसऱ्या प्रकारच्या दण्डामुळें मात्र प्रजेचें योग्य नियमन होतें. यथार्थ दण्ड म्हणजे गुन्ह्याच्या स्वरूपाप्रमाणें शिक्षा करणें होय.

### शिक्षेचें तत्त्व

साधारण लोकसमाज पाहिला असतां, शारीरिक शिक्षा ही गुन्हेगाराचें पारिपत्य होण्यासाठीं व नुकसानफेड ही आर्थिक नुकसानीच्या भरपाईसाठीं असते,

अशी समजूत आढळते. समाज बुद्धीनें परिणत नव्हता त्या काळीं याप्रमाणें विशेषसा भेद नव्हता. 'जशास तसें' या न्यायानें ज्या प्रकारची इजा गुन्हेगारानें केली असेल तसलीच इजा गुन्हेगारास झाली म्हणजे दुखापत झालेल्या माणसाचें नुकसान भरून आलें, असें त्या वेळीं समजत असत. फौजदारी कायद्यामुळें दुहेरी फायदा होतो. एक तर त्यामुळें लोकांवर वचक बसून अपराधाचा प्रतिबंध होतो; आणि दुसरा झालेल्या अपराधाचें परिमार्जन होतें. 'पुष्कळांचें पुष्कळ हित', या हितवादाच्या दृष्टीनें पाहतां शिक्षा झालेल्या माणसास जें दुःख होतें तें अनिष्ट होय. परंतु तसें असलें तरी तें कायदेशीर म्हणावयाचें तें एवढ्याचकरितां कीं, त्यामुळें त्यापेक्षां मोठ्या अनिष्ट गोष्टींचा प्रतिकार व्हावा. अपराधाचें परिमार्जन हें निर्बंधांचें जरी अंशतः साध्य असलें तरी अखेर साध्य भावी अपायांचा प्रतिकार हेंच होय.

### शिक्षेचें स्वरूप

शिक्षेची योजना करतांना ठरीव शिक्षेपेक्षां कमी शिक्षा होऊं न देणें हें जसें महत्त्वाचें आहे, तसेंच अपराध्यास फाजील शिक्षा होऊं न देणें हेंहि तितकेंच महत्त्वाचें आहे. तेव्हां शिक्षेची वांटणी अशी करावी कीं, जो गुन्हा अधिक अपायकारक त्यास अधिक शिक्षा झाली पाहिजे. शिक्षा करण्याचें साध्य गुन्हेगाराचा सूड उगविण्याचा नसून अपराधाचा प्रतिबंध व्हावा हें होय. अर्थात् अपराधाचा प्रतिबंध होण्यांत कमतरता येण्यासारखी नसेल अशा वेळीं हितवादाच्या दृष्टीनें पाहतां गुन्हेगारांत प्रत्यक्ष दुःख जितकें कमी होईल तितकें बरें, हें उघड आहे. ठरीव शिक्षेपेक्षां सारासार विचारानें गुन्हेगारांस कमी शिक्षा करण्याचा अधिकार कायद्यांत देण्यांत आलेला असतो, तो या हितवादाच्या तत्त्वास अनुसरूनच होय. तेव्हां शिक्षा हें साध्य नसून 'पुष्कळांचें पुष्कळ हित' साधण्याचें तें साधन आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवून शिक्षा फर्माविली पाहिजे.

### उत्तेजन व शिक्षा

अपराधाबद्दल प्रजेला आणि सेवेंत कमतरता झाल्यास नोकराला शासन करण्यासंबंधींचीं धोरणें तुम्हांस सांगितलीं. त्याचप्रमाणें आतां प्रजाजनांपैकीं कोणी अथवा एखाद्या नोकरानें अनुक्रमें प्रजाहिताचें व राजसेवेचें चांगलें काम केल्यास त्यास बक्षीस व बहुमान इत्यादि देऊन उत्तेजन दिलें पाहिजे. उत्तेजन दिल्यानें मनुष्याची कार्यशक्ति वाढत असते. अंमलदारांनीं आपल्या हाताखालील लोकांच्या कामांत लक्ष घालून त्यांना चांगलें काम करण्याकडे प्रवृत्त केलें पाहिजे.

### राजसेवेचें ध्येय

राजा हा शासनपद्धतीचा केन्द्र असल्यानें राजाच्या मनाची सुस्थिति, शरीराचें आरोग्य, लौकिक, वैभव आणि इभ्रत हीं कायम ठेविणें हें राजा व प्रजा या उभय-

तांनाहि हितकारक असतें. 'राजाने सुख तो रैयतने सुख', ही म्हण ध्यानांत बाळगून प्रत्येक नोकरानें काम करते वेळीं असा विचार केला पाहिजे कीं, जेणेंकरून महाराजांचें मनःस्वास्थ्य, आरोग्य किंवा लौकिक यांपैकीं एकाहि गोष्टीस उणीव येतां कामा नये. या सर्व गोष्टींवर राज्यकारभार अवलंबून आहे अशा उच्च भावनेनें काम करणें, हें राजनिष्ठेचें निदर्शक होय. तसेंच महाराजांचा वेळ बहुमूल्य असून व्यक्तीच्या श्रमास यत्ता आहे हा विचार करून, महाराजांना जितकी कमी तकलीफ पडेल तितकी कमी देण्याचा प्रत्येक नोकरानें प्रयत्न करावयास पाहिजे. महाराजांना कितीहि लोककल्याण करण्याची इच्छा असली तरी ती इच्छा नोकरांच्या मदतीशिवाय सफल होऊं शकत नाहीं. जगांत आज वैभवाच्या शिखरावर जीं राष्ट्रें पोंहोचलीं आहेत, तेथें असेच काम करणारे लोक आढळून येतील. साधक अथवा नोकरवर्गानें उच्च भावनेनें आपलें काम करणें ही राष्ट्राची खरी संपत्ति होय.

### सेवापरीक्षा

आतां सेवेमध्यें उत्तम सेवा कोणती व वाईट सेवा कोणती हें जाणणें आवश्यक होय. नीतिदृष्ट्या सर्व सेवा सारख्याच असून ज्या सेवेनें आपल्या यजमानाच्या सुखांत भर पडेल ती सेवा उत्तम, व ज्यामुळें यजमानाच्या सुखांत कमतरता येऊन त्याच्या लौकिकास कमीपणा येईल ती सेवा वाईट होय. ज्याप्रमाणें सोन्याची परीक्षा त्यास तोलून, कसोटीवर घासून, तोडून आणि तापवून करण्यांत येते तद्वत् नोकराची परीक्षा त्याचें शिक्षण, शील, कुल व कार्यक्षमता या चार गोष्टींवरून होते.

### निःस्वार्थ सेवा

सेवेचें मोल पैशानें मोजतां कामा नये. केवळ द्रव्यानें मोजण्यांत येणारी सेवा हीन सेवा होय. किंबहुना सेवेची किंमत पैशामध्यें अचूक रीतीनें करणें कठीण काम आहे. सर्वांची कार्यक्षमता सारखी नसते ही गोष्ट सर्वसाधारण मनुष्य विसरतो. त्यामुळें भलतीच अपेक्षा त्याच्याकडून होते. सेवेचें मोल करणाऱ्यास योग्यायोग्यतेचा विचार करूनच तिची किंमत ठरविण्याची असल्यामुळें दरएकाच्या कपोलकल्पित अपेक्षा पुऱ्या करणें तत्त्वतः देखील शक्य नसतें. म्हणून मनुष्यानें निष्काम कर्म करावें, या हिंदु तत्त्वज्ञानाचा खरा अर्थ समजून तुम्हीं सेवासक्ति ठेविली पाहिजे. शिवाय दुसरें असें कीं, तुमच्या निरनिराळ्या कामांचा इत्थंभूत प्रत्यक्ष अनुभव व माहिती एकट्या यजमानांस कशी असूं शकणार? अर्थातच अशा रीतीनें प्रत्यक्ष अनुभव व माहिती यांच्या अभावीं नोकराच्या कामाच्या महत्त्वाचें मोजमाप तंतोतंत करणें यजमानास शक्य नसतें. तेव्हां केवळ तर्कानें व इतरांकडून दिल्या जाणाऱ्या माहितीवर अवलंबून राहूनच अशा गोष्टींचा निर्णय द्यावा लागतो. निःस्वार्थपणें केलेली कोणतीहि उत्तम सेवा फुकट जात नाहीं. काम हेतुपूर्वक असावें, परंतु त्यांत स्वार्थ नसावा.

**सेवेचें महत्त्व**

सेवाधर्माची महती फार मोठी आहे. थोड्या विचारांतीं प्राणिमात्राचें ध्येय सेवाच आहे हें तुम्हांस दिसून येईल. सर्व दुनियेचीं कामें सेवाधर्मानेंच होत आहेत हें लक्षांत ठेवून सेवाधर्मांत अमोघ शक्ति आहे हें तुम्ही ओळखा; व त्याचें पूर्णपणें पालन करण्यास शिका.

" सहनाववतु सह नौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै ।
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥ "

म्हणजे, आपण सर्वजण मिळून आपलें रक्षण करूं, सर्वं मिळून भोजन करूं, व आपण एकमेकांचा द्वेष करणार नाहीं, हा औपनिषदिक महामंत्र तुम्ही सदैव नजरे-समोर ठेवून सहकार्यानें व समंजसपणानें आपआपलीं कर्तव्यें करीत जा. म्हणजे आपणां सर्वजणांस सुखानें व आनंदानें आपला काळ घालवितां येऊन, देशकल्याण व राष्ट्रकल्याण साधतां येईल.

**उपसंहार**

हें भाषण तयार करण्यास मला जितका वेळ पाहिजे होता तितका वेळ मिळाला नाहीं. त्यामुळें त्यांत कांहीं उणीवा राहिल्या असल्यास त्याबद्दल दरगुजार करालच. मीं सांगितल्यापेक्षां जास्त सुधारणा केल्यास किंवा सुचविल्यास मला त्यापासून अधिक आनंद होईल. मनुष्य गरीब असला तरी त्याच्यांत कांहीं सद्‌गुण नाहींत असें मानणें चुकीचें आहे. यजमान व उपरी यांनींहि आपणांस सर्व समजतें किंवा आपणच सर्वज्ञ असून इतरांना कांहीं समजत नाहीं, असें मानणें सर्वथैव चुकीचें आहे. लहान असो किंवा मोठा असो, परस्परांनीं एकमेकांच्या गुणांचें ग्रहण करणें व त्याचा लाभ एकमेकांस देणें यांतच खरा पुरुषार्थ किंवा पुण्य आहे. दुनियेमधील इतिहास पाहिला तर प्रथम लहान असलेलीं माणसें कर्तव्यपरायणतेनें उच्च पदास पोंहोचल्याचें आढळून येईल. मनुष्याच्या कर्तबगारीवर सर्व अवलंबून आहे. करणी केली तर नराचा नारायण होतो, नाहीं तर नराचा पशु बनतो, हें आपण प्रत्यहीं पाहत असतों. कर्तबगारी दिसली, गुण दिसले कीं त्यास मोठा म्हणविणाऱ्यानें योग्य अवसर दिला पाहिजे, हें विशेषतः उपरी अधिकाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें. सर्व कांहीं स्वतःच्या कर्तबगारीवर अवलंबून आहे.

" उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥

हा गीतेंतील उपदेश अवश्य लक्षांत ठेवा.

८२

**स्थल:—नवसारी.**

**काल:—ता. ४ मार्च १९३८.**

**प्रसंग:—नवसारी कॉटन ॲण्ड सिल्क मिल्सचें उद्घाटन.**

सभ्य स्त्री-पुरुषहो,

आज आपण माझें मनापासून स्वागत केल्याबद्दल आणि माझ्या प्रजेचें कल्याण व उत्कर्ष व्हावा म्हणून मीं केलेल्या प्रयत्नांबद्दल आपण जो माझा गौरव केला त्याबद्दल मी आपला आभारी आहें. नवसारी कॉटन ॲंड सिल्क मिल्सचें उद्घाटन करण्यासाठीं आपण दिलेलें निमंत्रण स्वीकारतां आल्यानें मला अत्यंत समाधान वाटत आहे. या गिरणीनें माझ्या संस्थानांतील एका महत्त्वाच्या केंद्र-स्थानीं नवीन जीवन आणि नवीन उत्कर्षमार्ग उत्पन्न होणार आहेत.

भरभराटींतील उद्योगधंदे ज्या देशांत नाहींत त्या देशाची नेहमींच कुचंबणा होते. हिंदुस्थानला शेती अर्थातच जिव्हाळ्याची व महत्त्वाची आहे; परंतु हंगामी परिस्थितीवर अवलंबून असणारी अर्थव्यवस्था ही नेहमींच अनिश्चित असली पाहिजे, हें उघड आहे. आर्थिक सुस्थितीसाठीं शेती आणि उद्योगधंदे यांमध्यें योग्य तोल राखला गेला पाहिजे. सुमारें चाळीस वर्षांपूर्वी अहमदाबाद येथें बोलतांना मीं त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या उभयतांमधील विषमतेकडे लक्ष वेधून उद्योगीकरणा-च्या आवश्यकतेचें आग्रहानें प्रतिपादन केलें होतें. खरें म्हटलें तर, कृषि आणि उद्योग यांमध्यें पाहिजे त्या तऱ्हेचें प्रमाण अजून साध्य झालेलें नाहीं; परंतु आपण योग्य दिशेनें चाललों आहों— हेतुपूर्वक प्रगति करीत आहोंत आणि थोडेबहुत आणि चांगल्या प्रकारचें यश मिळवीत आहोंत, यांत शंका नाहीं.

हिंदुस्थानांत आज नवीन चैतन्य संचरलें आहे; सर्व वर्गांमध्यें उद्योगीकरणा-बद्दल एक प्रकारचा आवेश भरून राहिला आहे. दुसरें असें कीं, पूर्वीप्रमाणें आतां आपले तरुण बाहेरदेशीं केवळ वाङ्मयीन अभ्यासाकरितां अगर ठराविक पांढरपेशावृत्तीच्या उद्योगाकरितां किंवा सरकारी नोकरी मिळविण्याच्या उद्देशानें जात नाहींत. आतां यांत्रिक किंवा तत्सम अभ्यासाकरितांच जाणारांची संख्या वाढत आहे. ते परत येतांना आपल्याबरोबर प्रावीण्य, धाडसी वृत्ति आणि व्यापक दृष्टि घेऊन येतात. हिंदुस्थानांतलें भांडवलहि आतां उद्योगधंद्यांत घालण्याची बुद्धि वाढत

आहे. या बाबतींत देखील महायुद्धापूर्वीची आणि आतांची परिस्थिति यांमध्यें जमीन-अस्मानाचा फरक पडला आहे.

**नवीन प्रयत्नांना संरक्षण**

हिंदुस्थान सरकारनें तारतम्यानें कांहीं उद्योगधंद्यांना संरक्षण देण्याचें धोरण अंगीकारलें आहे, हीहि याला पोषक ठरलेली महत्त्वाची गोष्ट आहे. नवीन औद्योगिक प्रयत्नांना यामुळें बळकटी येण्याची संधि मिळाली आहे. आरंभीं मदत देऊन देखील ज्या धंद्यांना पुढेंमागें कायम स्थिरता येण्याचा संभवच नाहीं अशा धंद्यांना अशा प्रकारचें संरक्षणाचें धोरण लागू करणें समर्थनीय नाहीं, हेंहि त्याबरोबरच लक्षांत घेतलें पाहिजे. अशा धंद्यांना मदत देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे गिऱ्हाइकांवर अन्यायानें कर लादण्यासारखें होईल.

**शेतीची क्रय-शक्ति**

एका मूलभूत मुद्द्यावर या ठिकाणीं बराच जोर दिला पाहिजे. हिंदुस्थानांतील लक्षावधि शेतकरी आणि मजूर यांची आर्थिक परिस्थिति सुधारल्याशिवाय हिंदुस्थानांत औद्योगिक प्रगति होणें शक्य नाहीं. कारण कारखान्यांत निर्माण होणाऱ्या वस्तूंना येणारी मागणी ही मुख्यत्वेंकरून त्यांच्या क्रय-शक्तीवर अवलंबून आहे. यासाठीं उद्योगधंदेवादी लोकांनीं सर्व बाजूंनीं खेड्यांतील जीवनाची पुनर्घटना करण्याच्या सर्व कार्यक्रमांना मनापासून पाठिंबा दिला पाहिजे. असें करण्यानें ते एका दृष्टीनें आपलें स्वतःचेंच अप्रत्यक्षपणें हित करतील.

**बडोद्याच्या धोरणाचा पाया**

मी आतां माझ्या स्वतःच्या संस्थानांतील धोरण आणि अनुभव यांकडे वळतों. आणि संस्थानच्या धोरणांतील अगदीं आरंभीच्या अनुभवाबद्दल सांगून मी तुम्हांला कंटाळा आणीत नाहीं. गुजराथ आणि काठेवाड या उभय भागांत इतस्ततः मुलूख विखुरलेला असल्यामुळें येणाऱ्या अडचणींचाहि पाढा मी तुमच्यापुढें वाचणार नाहीं. आम्ही काय शिकलों आहोंत तेवढेंच तुम्हांला सांगतों. सामान्यतः बोलावयाचें तर आमचा असा विश्वास आहे कीं, खासगी मालकी हेंच अनुपान औद्योगिक धोरणाला पोषक म्हणून चांगलें उपयोगी पडतें. मात्र सरकारकडून मिळण्यासारख्या—सोयीचें औद्योगिक क्षेत्र, वाहतुकीच्या आणि विजेच्या शक्तीच्या वगैरे— सवलतींनीं त्यांना साहाय्य व उत्तेजन मिळालें पाहिजे. यापेक्षांहि अर्थात् सुव्यवस्थित सरकार, संरक्षण आणि स्वातंत्र्य यांचें अधिक महत्त्व आहे. 'कायद्याचें सरकार' म्हणतात त्यांत या गोष्टींचा समावेश होतो; नेमस्त आणि स्थिर असें करांचें प्रमाण याहि गोष्टीची अर्थात् तितकीच आवश्यकता असते.

त. ठा गं.

**सर होमी मेथा यांचें अभिनंदन**

आतां लवकरच सर होमी मेथा यांनीं स्थापन केलेली आणि अगदीं आजतागायत यंत्रसामुग्रीनें सज्ज असलेली ही नवी गिरणी प्रत्यक्ष पाहण्याची संधि आपल्याला मिळणार आहे. सर होमी हे आपल्या संस्थानला परकी नाहींत. आणि नऊ वर्षांपूर्वी त्यांनीं आपल्या गिरण्या बिलिमोरा येथें उघडून धंदेवाईक बुद्धिमत्ता आणि परिश्रम यांनीं काय साध्य करतां येतें हें त्यांनीं दाखवून दिलें आहे. त्यांच्या गिरण्या झाल्यापासून अर्थातच बिलिमोरा येथें सतत काम मिळण्याची सोय झाल्यामुळें सर्वत्र समृद्धि झाली आहे. त्यांच्या कुशल नेतृत्वाखालीं दि नवसारी कॉटन अँड सिल्क मिल्सनाहि तसेंच यश लाभेल याची मला खात्री वाटते. सर होमी मेथा यांचें कर्तृत्व आणि उद्योगशीलता पाहून त्यांच्या गुणांबद्दल गौरवार्थ म्हणून मी त्यांना नुकताच एक बहुमान अर्पण केला आहे, याची आपल्याला माहिती आहेच. अशा तज्ज्ञांच्या शहाणपणाच्या सल्ल्याची मला नेहमींच गरज वाटते आणि त्यांचें मला नेहमीं सहकार्य लाभेल अशी मी आशा करतों. आतां मी ही गिरणी उघडल्याचें जाहीर करतों. आणि सर होमी, तुमचें आणि तुमच्याशीं या नव्या धाडसाच्या कामीं सहकारी असणाऱ्या मंडळींचें अभिनंदन करून, मी आपल्याला असें आश्वासन देतों कीं, माझ्या सरकारचें आपल्या गिरणीकडे नेहमींच लक्ष राहील. तुम्हांला सर्व प्रकारें यश येवो, असें मी चिंतितों.

## ८३

**स्थल:**—लंडन.

**काल:**—ता. ११ एप्रिल १९३८.

**प्रसंग:**—'हिंदुस्थान आणि फार ईस्टमधील प्रसंग' या विषयावर मि. एड्विन हावर्ड यांचें 'ईस्ट इंडियन ॲसोसिएशन'पुढें झालेलें व्याख्यान.

सर जॉन अँडरसन, मि. हावर्ड, आणि सभ्य स्त्री-पुरुषहो,

या वेळीं चार शब्द बोलण्याची मला विनंति करण्यांत आली आहे, परंतु मला कांहीं विशेष सुचत नाहीं हें मला कबूल केलें पाहिजे. आजचा विषय केवळ मला अगदीं नवा आहे; एवढेंच नव्हे तर तो फार वादग्रस्त असून शिवाय

महत्त्वाचाहि आहे. चीन आणि हिंदुस्थान यांचा संबंध फार पुरातन आहे, यांत शंका नाहीं. पुष्कळच कल्पना, धर्मसमजुती आणि अभिरुचीच्या कित्येक बाबी देखील त्याच्या आमच्यांत समान आहेत. आणि हिंदुस्थानांतील स्त्रिया ज्या तऱ्हेचीं वस्त्रें नेसतात तीं चिनांतील स्त्रियांच्या वस्त्रासारखींच असतात, हें उदाहरण केवळ यदृच्छायोगाचें आहे, असें म्हणतां येणार नाहीं.

राजकारणांतील प्रश्नासबंधीं माझ्या देशाबद्दल मला एवढेंच बोलावेंसें वाटतें कीं, संधि मिळाली तर, आतांच्यापेक्षां देखील हिंदुस्थान आपला राज्यकारभार खासच अधिक चांगला चालवून दाखवील. राज्यकारभाराचा प्रश्न हा बहुतांशीं अनुभव आणि शिक्षण यांचा आहे. हल्लीं हिंदुस्थानचा राज्यकारभार सुशिक्षित वर्गाच्या हातांत आहे. परंतु ब्रिटिश सरकारनें आजपर्यंत त्यांची इतकी बारकाईनें काळजी घेऊन देखील सामान्य लोकांना नवीन कल्पनांचा नुसता स्पर्श देखील झालेला नाहीं !

एखाद्या राष्ट्रांत अगर वंशांत बदल घडवून आणावयाचा असेल तर आपणाला खेड्यांकडे, कुटुंबांकडे आणि कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीकडे देखील गेलें पाहिजे. त्यांना योग्य तऱ्हेनें शिक्षण द्या, जीवनाकडे पाहण्याची विशेष दृष्टि शिकवा, आणि सर्वांत जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्या आर्थिक गरजा भागवा. असें केलें म्हणजे बहुतकरून अधिक स्वावलंबन, अधिक आस्था आणि सुधारणेसाठीं अधिक प्रयत्न करण्याची तयारी आपल्याला दिसूं शकेल. आर्थिक परिस्थिति सुधारणें हा हिंदुस्थानांत मौलिक महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि त्यासाठीं आपल्याला बाहेरच्या जगाशीं संबंध आणला पाहिजे. प्रगतीची दिशा कशी कशी चालली आहे तीं पाहिली पाहिजे आणि शेवटीं आपणालाहि इतर देशांच्या उपयोगी पडतां यावें म्हणून आज आपल्याला बाहेर देशांतून आणून हिंदुस्थानांत कोणत्या गोष्टी चालू करणें फायदेशीर आहे, याचा अभ्यास केला पाहिजे.

पूर्वी जातिभेद होते तर आतां सर्वत्र राष्ट्रीयत्वामुळें भेद पडलेले आहेत. प्रत्येक राष्ट्र आपल्या स्वतःला शक्यतों परिपूर्ण आणि शक्य तितकें स्वावलंबी करण्याचें प्रयत्न करतें आणि अशा रीतीनें भेदभिन्नतेचा नियम अधिकाधिक तीव्रतेनें चालू राहतो. जगांत थोडी अधिक सहानुभूति, थोडा अधिक सदयपणा आणि सहकार्य, आणि सर्व मानवजातीच्या कल्याणार्थ थोडा अधिक चिकाटीचा प्रयत्न असता तर असे कित्येक महत्त्वाचे प्रश्न आहेत, कीं ज्यांच्या बाबतींत आपण एकजुटीनें मनुष्य-जातीच्या हितार्थ, जात किंवा पंथ यांच्या निर्बंधाशिवाय झगडूं शकलों असतों. ही गोष्ट सिद्ध होण्यासाठीं, जुलमाखालीं चिरडलेलें किंवा फक्त अंशतःच स्वतंत्र अशीं

जीं राष्ट्रें आहेत त्यांना, हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकार देत आहे त्याप्रमाणें अधिक स्वातंत्र्याचें दान केलें पाहिजे.

मात्र ब्रिटिशांनीं आजपर्यंत जेवढें केलें आहे तेवढ्यावरच त्यांचें समाधान होणार नाहीं, अशी मला आशा आहे. त्यापेक्षां किती तरी अधिक त्यांना करतां येण्यासारखें राहिलें आहे. आणि तें त्यांनीं कानडा किंवा ऑस्ट्रेलिया यांच्याकरितां जें केलें आहे त्यापेक्षां किमपिहि कमी असणें शक्य नाहीं असें मला वाटतें. जर तें त्या धोरणाचा अवलंब करतील तर हिंदुस्थान त्वरेनें प्रगति करील, त्याचा आत्मविश्वास वाढेल आणि तो आपल्या लोकांमध्यें अधिक स्वाभिमान उत्पन्न करूं शकेल, असें आपल्याला आढळेल. तसें न होईल तर कारभारामध्यें प्रामाणिकपणा राहणार नाहीं. हिंदुस्थानला स्वातंत्र्य पाहिजे आहे आणि तें स्वातंत्र्य त्याला शहाणपणानें, योग्य तऱ्हेनें आणि त्वरेनें दिलें जावें, हेंच उचित आहे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५८५९७

# सूची

## खंड तिसरा


अ

अखिल भारतीय शारीरिक सामने, ६७
अटलाद्रा-पाद्रा रस्ता, ७९
अडालजा (मि.), १४५, १४९
अद्‌भुतवाद, ११८
अनंतफंदी, २११
अन्न, ७७, १६२
अब्राहम लिंकन, १६७
अमलदार–नमुनेदार, ६२
अर्जुन, २१७
अशोक, १२१, १४६, १६०, १६५
अस्पृश्यता, १३२, १९३
अहिंसा, ११७

आ

ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी, १७३
आगगाडी, २, १२; रेल्वे पहा
आठ आर्य मार्ग, १२१
आतर कॉलेजीय खेळ, १००
आंतरराष्ट्रीय संबंध, १९३
आत्माराम मास्तर, ५७
आपटे (श्री.), ५७
आफ्रिका छात्रवास, १०२
आयुर्मर्यादा, ३१
आरमारी वर्चस्व–ग्रेट ब्रिटनचें, १
आरोग्य, १६२, १७८
आर्थिक स्थिति–सुधारणा, ८२
आर्यकन्या महाविद्यालय, ८३, १०२
आशावाद, ३८, ७८
आहारशास्त्र, ८८

इ

इंग्लंड–कारभार, ३
इंग्लिश–दुय्यम भाषा, ८५
इंडिया हाउस, १६८
इंदु-विजय कंपनी, १८
इलियट (मि.), १७०

ई

ईस्ट इंडिया ॲसोसिएशन, ९२, १७६, २२५

उ

उखाजीराव गायकवाड, ४
उजमशी पितांबर (शेठ), ४४
उद्योगधंदे, २२३–२३४

ऋ

ऋग्वेद, १६३

ए

एकनाथ, २५
एक भाषा, १५, ५५
एक राष्ट्र, ८२
एकीचें बळ, १८२

एकेश्वर अवतारवाद, ११८
एड्विन हॉवर्ड ( मि. ), २२५

औ

औंधचे चीफसाहेब, १२७

अं

अंडरसन, सर जॉन, २२५
अंत्यजोद्धार, ५७
अंबिका नदी–पूल, १४५

क

कॅडबरी, डेम इलिझाबेथ, १६३
कडवा पाटीदार, १०७;–छात्रालय, १०७
कनफ्यूशिअस, १५८
कबीर, १५८
करमरकर ( श्री. ), १०८
कर्तव्य–पूर्ण ज्ञान, २०७
कर्म, ११६
कलकत्ता संस्कृत कॉलेज, १८४
कला, ७९
काजी ( मे. ), ३५
काठी–परिषद्, ३०;–समाज, ३०, ३३, ३४
काम–माहिती, आस्था, शास्त्र आणि कलादृष्टि, ५९;–चुकारपणा, ६१
कायदे–कां पाळावे, १५४; –भंग, १५४
काया–निरोगी ठेवणें, १५३
कारेली बाग ( बडोदें ), ५६
काल–अनंतत्व, १५१
काळे ( रा. ), ८७–८
किताब–देण्यांतील हेतु, ६
किलाचंद देवचंद ( शेठ ), ४३, ४४
कीर्तिमंदिर, १५०;–संस्थानच्या उपकारकर्त्यांचें स्मृतिमंदिर, १५०; –योजना, १५५
कीर्तिकर ( कर्नल ), १४, १५
कुचबिहार, संस्थान, १८८
कुडाळकर, ( कै. रा. ), १९
कृष्ण, १२१, १५८–९, १६१, २१७
केळकर, नरसिंह चिंतामण, ४५
कोडिनार, १९८
कोंबड्या पाळणें–धंदा, १२६
कौटिल्य, २१९

ख

खंडेराव महाराज ( कै. श्री. ), १११–२ –पुतळा, १०८;–कारकीर्द, १०९,
खाद्यवस्तु—प्रदर्शन, ८७
खानगी कारभारी, २०५
खानगी—खातें, ५८;—नोकर, ५८; –खात्याचें महत्त्व १९९;–रचना, २००
खानसाहेब अमरनि उल्ला अहमद, १८९
खासेराव जाधव ( रा. ), २४, २६–७
खिचडी, ५५
खेडीं—त्यांकडे लक्ष, १०६; – त्यांतील प्रश्न, १२३; ग्राम पहा
खेळ—संग्रह, ९६;–महत्त्व, १००
खोटी इभ्रत, ६१
ख्रिस्ती, १६१;—धर्म, १६६

ग

गणपतराव गायकवाड, २६
गरबा, ९५, १०३
गायकवाड–अवचितराव, ८;–घराण्याचा ब्रिटिश सरकारशीं संबंध, १६८–७०
गॉल, १४६
गीता, ११३–२०, २२२
गुजराथ, १०६. गुजराथी साहित्य-संमेलन, १५, ४६
गुणकर्म, २९
गुप्ते ( श्री. ), ९९

गृहव्यवस्था, ८९
गृहशास्त्र, ७५,-६; -प्रदर्शन, ६५; -विषयक अर्थशास्त्र, ७६
गोपाळदास ( रा. ), ३७-८
गोयागेट कॉलनी ( बडोदें ), १३८
गौतम धर्मसूत्र, १५४
ग्रंथ-प्रकाशन, १९;-उपयुक्त, ४६; -स्वतंत्ररचना ४७;-प्रसार ४८
ग्राम-जीवन प्रदर्शन, १२३, १२७; -पुनर्घटना, १२७; -पंचायती, १३१;-पुस्तकालयें, १३१; ग्रामोद्धार-योजना १३२
ग्रीस, १६२
ग्वाल्हेर महाराजा, १६९

घ

घोरपडे, नरसिंगराव, ८

च

चंदावरकर, सर नारायण, २२
चर्चिल ( मि. ), १७३
चाकोरीचा अभ्यासक्रम, ८५
चार आश्रम, १६१
चारित्र्यसंवर्धन, १५४
चार्वाक, ११०
चिमणाबाई स्त्री-समाज, ८१
चैतन्य, ११७

छ

छोटू महाराज, १६

ज

जनता—सुधारलेली, ३६; —कल्याण, ६५
जपानी— कवाईत, १०३; —लोक, २९
जयसिंहराव, १८२; —लायब्ररी, १८०
जसदन समारंभ, १४४
जागतिक धर्मपरिषद्, ११२
जातकें, १२१
जाति—भेद, ९, ३३, १९३; -निष्ठता १३५; —संस्था, १५९
जॉन मोर्ले, १९४
जितेंद्रनारायण हॉस्पिटल, १९०
जुम्मादादा व्यायाम शाळा, ५४, ८२
ज्युबिलीबाग ( बडोदें ), २८
ज्यू, १६१

झ

झरथुष्ट्र, १५८

ट

टोस्ट, २, ४९, ५२
ट्रान्सपोर्ट पेजंट, १३८
ट्रिनिटी हाउस ( लंडन ), १

ड

डेव्हिस ( डॉ. ), १६८, १७०
डोसला, ११०
ड्यूक ऑफ एडिंबरो, १

त

तलाव, १२
तळवळकर ( श्री. ), ७६
तुकाराम, २५, २०२
तुळसीभाई ( रा. ), ३९

द

दत्त ( श्री. ), ९४-६
दयानंद, स्वामी, १०२
दांडेकर ( श्री. ), ५३
दानधर्म, १५९, २१३
दासगुप्त ( श्री. ), १८४
देवकुळें, ११०
देव-अस्तित्व, १५१
देशी भाषा-विश्वविद्यालयांत प्रवेश, १४

देसाई बंधु, ६६

ध

धनवंत ( लेडी ), ८३

धम्मपदें, १२१

धर्म, ९८, १५०, १६६, १८६;—सुधारणा, २५; –बंधनें, ३४; –पंथ, १०२;–आणि नीति, १५६ –सहिष्णुता, १५६; –सहकार्य, १५६; –प्रवृत्ति, १५७; –खरा, १५९–६०; –ग्रंथानें मार्गदर्शन, १५९; –मुख्य तत्त्वें, १६२; धार्मिक कायदा, १५१; धार्मिक बंधुत्व, १६५; धार्मिक शिक्षण, १८५

धारासभा, १३९–४०

न

नगरवाढ, १०५

नटराजन, ( श्री. ), ४८

नवसरी, १४४–५;–कॉटन अँड सिल्क मिल्स, २२३, २२५

नागरिक जीवन–आरोग्यकर, १७९

नाच, ९५

नानजीभाई ( शेठ ), १०२

नानावटी ( श्री. ), १२७–८

निझाम सरकार, १६९

निर्बंध-नियम, २१७; –अंमलबजावणी, २१८;–उल्लंघनाबद्दल शिक्षा, २१९

निर्वाण, १२२

निष्काम कर्म, १६१

नीडहॅम ( मिस् ),१०३–४

नीति–प्रसार, १८७; नैतिक व आर्थिक संबंध, ९२; नैतिक शिक्षण, १८६

नोकर–त्यांची सूज, ७;–त्यांस आवश्यक गुण, २००;–त्यांचें ध्येय, २०१;–त्यांचें अज्ञान, २०८;–समंजस काटकसरीचें शिक्षण, २०९;–त्यांच्यांतील मत्सर व अज्ञान, २१०; –त्यांना सत्संगति २१०;–त्यांच्यांत निरीक्षणशक्ति व स्पष्टोक्ति, २११;–स्वच्छता, २११; –त्यांच्याकडून सूचना,२१२;–शिक्षण, २१४–५;–त्यांना नियमांची माहिती, २१७;–राजसेवा, २२०

नोकरी–क्षुद्र ध्येय, ८५

न्याय-खात्याची परिषद ५३;–दान ५३

न्याहालचंद लल्लूचंद ( शेठ ), ४४

न्यू स्कूल ( पुणें ), ९

प

पडदा पद्धत, २३

पदवीधर, ८८

परदेशगमन, १२, ३९;–बहिष्कार, १७

पवार–आनंदराव, ५;—घराणें, ५

पाक-क्रिया, ७७;–शास्त्र, ८९; –गृह, २१३

पाटण, ४२,–जनरल हॉस्पिटल, ४४

पाण्यासाठीं बांधकामें, ४१–२

पारशी, ८२, १४४, १४९, १६१; –तत्त्वें, १५९

पार्लमेंट, १७

पितृपूजा, १११; पितृसंस्मरणाचे प्रकार, ११०; श्राद्ध पहा.

पुतळे–उभारण्याची प्रथा, ११०

पुस्तकालय, १९, २०, ४५, १३९; –वॉशिंग्टनचें, ३७; –संस्था, ३८; –प्रदर्शन १३९

पेटलाद, ३९

पेढी ( बँक ), १०; –शेतकरी, ३५; –शास्त्र, १२८

पोटजातींचें एकीकरण, १५, १०८

पोवाडे, ९५

पोषाक, ६३
प्रतापसिंह महाराज, २६
प्रदर्शनें, ३५; –त्यांचें कार्य, ७६; –सतत भरणारीं फिरतीं, १२६
प्रवास-फायदे २३, १८३; प्रवासी-गृह, २१३
प्रसाधन-गृह, २१२
प्राची रोड-कोडिनार रेल्वे, १९५
प्रिन्स ऑफ वेल्स, १६८
प्रेषित, १६२, १६७
प्रौढ लोकांना ज्ञान, १३१
प्लेटो, ११८

फ

फडणवीस, माधवराव रामचंद्र, ५
फणींद्रनाथ, ४८
फत्तेसिंहराव युवराज, ८
फाकडे, सरदार मुगुटराव ज्योत्याजीराव शिंदे, ५
फादर हेरास, १८१
फुलांचें प्रदर्शन,
फेडरेशन, १३५
फॅशनेबल फॅड्स, ५५
फ्रेंड्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी, १०५

ब

बंगला खातें, २१३
बडोदा–मिल असोसिएशन, १४१; –होटेल, २१३
बडोदें–संस्थान कारभार, १;–राज्य १३; –सुव्यवस्थित सरकार, ५०;–कॉलेज, ६८, १४१; –कॉलेजचा पाया, ६८, ७०, १४१; –हायस्कूल, ९९; –वाढ १०७;युनिव्हर्सिटी, १४३;–संस्थानांतील रस्ते, १४८;–रेल्वे, १४८,१९६; म्युनिसिपालिटी, १७७; –संस्थानांतील शेती–उद्योगधंदे, २२४
बरुआ ( प्रो. ), १८६
बरो ( प्रि. ), ६८, ७५, १००
बर्क, १५८
बर्डवुड, सर विल्यम, १६९
बर्शी, ११०
बादशहा, १७२
बापूजी देसाई ( कै. ), ६६; –सायन्स लॅबोरेटरी हॉल, ६६
बाल-शिक्षण, ९०;–संमेलन, ९०
बाल्डविन ( मि. ) १५७–८, १७५
बिरला ( शेठ ) , ५६
बिलिमोरा, २२५
बुद्ध, १६, १२२, १५८, १६०–१,१६६; –मूर्ति, २८; –उपदेशाचें सार, २९; –उच्च गुण, ३०;–अनुयायी, ३०; –शिकवण १२०
बेंगॉल बुद्धिस्ट असोसिएशन, १८६
बोनबोक ( मि. ) , ४२
बोर्डन ( मि. ) , १९
बौद्ध धर्म, २९-३०, १२१, १६५, १८६–७;–धर्मातील तीन रत्नें, १२०; –धर्माचें सार, १२२;–कालीन रस्ते, १४७
ब्रिटिश साम्राज्य ३, १७३; –साम्राज्य व वसाहती, ३; –कॉमनवेल्थ, १७१

भ

भक्ति, ११६
भाऊ शिंदे, १०९
भाटवडेकर, सर भालचंद्र, १८,२०–१
भाटे ( प्रो. ) ५४–५
भांडारकर ( डॉ. ), ८–९
भाद्रण,४०;–कन्याशाळा, ३९
भाषा, १४

भेदभाव, १०१
भोजन, १७७

म

मट्टूभाई कांटावाला ( श्री. ), ८४
मध्यममार्ग, ११९–२०
मन, १५२
मनु, २१९
मराठा–शिक्षण परिषद २४;–समाज, २४, २६, २७
मराठी साहित्य-संमेलन, १४, ४५
महंमद, १५८
महाभारत, १५१, १६५
महायुद्ध, १३३
महाराज मिल ( बडोदें ), १०
महाराजसाहेब–सफरी, ३, २२;–जन्मोत्सव दरबार, ४, ६;–रौप्य-महोत्सव, ११; कारभारांतील सुधारणा, ११;–प्रजाशिक्षणासाठीं प्रयत्न २०;-देशी भाषांत ग्रंथ तयार करण्याचे प्रयत्न, ४६;–संदेश, १३०, १७१;–स्वतः अभ्यास १८३
महाराजा गायकवाड एक्स रे वॉर्ड, १९०
महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळा, ८४
महाराणीसाहेब ( श्री. सौ. ), २३, ५२, ५६, ८४, ८६, १३७, १८८
महाराणी हायस्कूल फॉर गर्ल्स, १०३
महाराष्ट्री, १७२
मागासलेपणा, १८१
मॉंटेग्यू-चेल्म्सफोर्ड सुधारणा, १३३
माणिकलाल देसाई ( सुभे ), ३५
माधवराव, सर टी, ८८
मानकरी, ६
मानवी मूल्यमापन, १६१
मार्टिन लूथर, २५
मॉर्सिअर ( मि. ), ७९–८१
मुनशी ( रा. ), १४१, १४३
मुंबई–मराठी ग्रंथसंग्रहालय, २१;–ग्रंथसंपादक मंडळ, १८;–हिंदु क्लब, २२
मूर्तिपूजा, १६०
मेकॅडो, १७
मेयर, लॉर्ड, १–२
मेयर, ( डॉ. ), ४३
मेहसाणा–वॉटर वर्क्स, ४०;–सुधराई खातें, ४०
मोझेस, १५८
मोरसिए ( मि. ) ९१, १४९
मोक्ष, १२०;–तीन मार्ग, ११५
म्युनिसिपालिटी, १७
म्हसके ( रा. ), २६
म्हैसूरचे महाराज, १६९

य

यंगहस्बंड, सर फ्रॅन्सिस, १६३
यूनिअन ऑफ वेस्ट अँड ईस्ट, ९४
येशू ख्रिस्त, १५७–८, १६१, १६६

र

रस्ते, १४६;–बांधणें, १४७, १९७;–चांगलें ठेवणें, १४९
राजपुत्र–त्यांचें संगोपन, २०७
राजभक्ति, ६४
राजसेवक–कर्तव्यें, १९९
राजसेवा, २२०
राजा आणि प्रजा १२९
राज्य–घटनाविषयक महत्त्वाकांक्षा, १३३;–कर्ते यांचीं कर्तव्यें, १४२; राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव, १३०
राधाकुमुद मुकर्जी, ४८

रामदास, २५, ४८, १११
राष्ट्रीय लायब्ररी, २०
रीडिंग–लॉर्ड, ४९, ५२;–लेडी ४९, ५१–५२
रीतीभाती, ६३
रूढि–जुलूम, ३३
रेडिओ, १२६
रेडीमनी, सर कावसजी जहांगीर, ६६
रेल्वे, ८०, १४७
रोटरी कॉन्फरन्स, १९१
रोमन, १४६

ल

लंडन, ३
लॅमिंग्टन, लॉर्ड, ९३
लालशंकर ( श्री. ), १०
लिटन, लॉर्ड, १६९
लिनालिथगो, लॉर्ड, ९३
लेखनकला, २१
लोकगीतें, ९५–९६
लोक-शिक्षण, ४५; –कल्याण, ५०;–शाही, ७३;–युक्तिवाद, १२९;–मत, १४३;–तंत्रीशासन १७३–७५

व

वर्तमानपत्रें, १९
वर्ल्ड फेलोशिप ऑफ फेथ्स, १६३, १९१
वाकनीस ( रा. ), १९
वाजसूरवाला ( श्री. ), ३४
वास्तुशास्त्र, ११२
वाहतूक, १४६,–साधनें १४६–४८, १९५
विठ्ठलदास चतुर्भुज ( रा. ), ४४
विद्या–व्याख्या, महिमा, ९;–अर्थ १२
विलिंग्डन– लॉर्ड, १३३–३४; –लेडी, १३३, १३६
विशालदेव, ११२
विश्व–नीति, १५३–५५;–बंधुत्व, १५७, १६४, १६७;–धर्म १६५
वृक्षवर्धन, ९२
वेअर–कर्नल, १०२, १२७;–मिसेस, १०३,१२७
वेडरबर्न, सर विल्यम, २२
वेदोक्त प्रकरण, १८
वैद्य, चिं. वि., १६, ४८
वैद्यकीय–संस्था, ४३;–साहाय्य, १९०
व्रतचारी चळवळ, ९४
व्यक्ति–सुधारणा,६१;–विकास, १४२–४३; –वाद, १५९
व्यापारशास्त्र, १०
व्हिक्टोरिया राणी, १६८–७०

श

शंकराचार्य १६–१७,४५
शंभूसिंह राजे, माळेगांवकर, २४
शरीरसंपत्ति, २८
शाक्य मुनि–बुद्ध पहा
शांतता, १६३, १६७
शारीरिक शिक्षण, ६७
शास्त्र–प्रगति, ७१; शास्त्रीय विषयांचा अभ्यास, ७१
शिंतो, ११०
शितोळे, ३५–६
शिंदे सरकार, २६
शिवाजीमहाराज, २५–६
शिष्टाचार, ६३, ९१
शिक्षण–सक्तीचें, १२, २८, ४५, ७०, १३०,–संस्था, उच्च, ३९;–मातृभाषेतून, ४७;–प्रसार, ६८;–उच्च, ६९, ७३; –सामानसुमानाचें, ७८; –पद्धति; ८४; –मातृभाषेतून देणारें

कॉलेज, ८५;–पुस्तकी ९७
शिक्षा–प्रकार, तत्त्व, २१९;–स्वरूप, २२०
शेक्सपियर, ४२
शेतकरी, १२२;–त्यांच्या आर्थिक प्रश्नांचा विचार, १३१
शेती, ३६;–उद्योगधंदे प्रदर्शन, ३५; सुधारणा, ३६, १०८; –क्रयशक्ति, २२४
श्रद्धा, १५८, १६४
श्रमविभाग, २०३
श्राद्ध, ११०
श्रावणमास दक्षिणा, ५५

स

सगीत, ९५
संघटना, २०५;–व सहसंघटना, २०५
संत, १६२
सत्य, १८५;–शोध, १२०
सद्भाव, १६३–५, १६७
संपतराव गायकवाड, ७, २४, २६
संभाजी, १११
सभ्यपणा, ६२
समजुबा देसाई ( सौ. ), ८२
समजूत, १६३–४, १६७
समाज, १६;–सुधारणा, २२;–सेवा, ७३, १५५, १६०;–ऋण, १५३
सयाजीराव महाराज, मोठे, ८
सयाजी सरोवर, ४१
सयाजी हीरकोत्सव सेतु, १४९
सरकारी–मदत, ८६; –कायदे, १५१
सरदार, ८
सर्वधर्म परिषद, १६३
संस्कृत भाषा, १५
संस्कृति – प्रगति, १५४
संस्थान–प्रगति, १३४; – आकांक्षा, १३६
सहकार्य ५६, ६०
सहसंघटना, ६०
सांघिक वृत्ति, १५९
साधकवर्ग, ६५
साधुसंत, २६
साने ( रा. ), ८७
सामाजिक–सुधारणा, ९७; –रूढि – विध्वंसक कायदे, १३१; –अन्याय, १४२
साम्राज्य, १७३; – विषयक संस्थानी निष्ठा, ५०; – परिषद, १७१;– दिनभोजन, १७५
सायन्स इन्स्टिटयूट, ७१
सार्वजनिक पुस्तकालय, ३७. पुस्तकालय पहा.
सांस्कृतिक ऐक्य, ९७
साहित्य सभा, १८९
सिद्धराज, ११२
सिस्मोग्राफ, ३१
सुख—प्राप्ति, ३०–३१; –प्राप्तींतील अडचणी, ३१
सुधराई खातें, ४१
सुधारणा, १६;–सामाजिक, १६;–अंमल-बजावणी, १८;–विरोधी गोष्टी, ३२, –मार्ग, १२४
सुधाळकर ( श्री. ), ६७
सुराज्य, १०६
सुव्यवस्था, १७२
सूपशास्त्र–पाकशास्त्र पहा;–पुस्तकें, २१३
सेंट पॉल, ११८
सेंट्रल लायब्ररी, १३९
सेठना, सर फिरोज, १४४

सेवा–धर्म, ६४, १२६, १९२;–परीक्षा, २२१; –निःस्वार्थ, २२१; –महत्त्व, २२२
सोनगड–व्यारा, ४१
सोमण ( प्रो. ), ९६–७
सोयाबीन, ८७
सौमनस्य, १९४
स्काउट–रॅली, १३८;- फायदे, १३८
स्ट्रॉंग ( मिसेस ), ८९
स्थानिक स्वराज्य, ३६, १७८. म्युनिसिपालिटी पहा.
स्पर्शास्पर्श, ३४
स्पेन–प्राचीन संस्कृति, १८१
स्त्री–दर्जा, ५६;–जागृति, ८१,–शिक्षण, २३, ३९, १३७; गीत-नृत्य-शिक्षण, ९४; –पुरुषसंबंध, १०४; –स्वातंत्र्य, १०४–सुधारणा, १३७
स्वयंपाक–सुधारणा, ८८; पाकशास्त्र पहा.
स्वातंत्र्य, १७२–३;–व सुव्यवस्था, १७५
स्वामी नारायण ( रा. ), १०७
स्वार्थत्याग, ४६
स्वावलंबीपणा, ३५

ह

हर्ष, १८९
हस्तलिखितें, १८९
हरगोविंददास ( श्री. ), १०
हिंदविजय जिमखाना, ६७
हिंदी– भाषा, ४४, ४७; –संस्थानें, ५१ –राष्ट्र, ९४
हिंदु धर्म, १६०, १६५; –पुनर्घटना, ९६;–उत्क्रांति, ११२–३;–सुधारक, ११९
हिंदु संस्कृति, ९७
हिंदुस्थान, ९४, १७२, १७४;–सरकार, ४; –राज्यघटनेंत बदल, ९३; देशाचें दारिद्र, १०५;–राष्ट्रीय वृत्तीचें बीजारोपण, १३३; –जबाबदार स्वराज्य १३३; –अंतर्गत व्यवहाराचे प्रश्न, १७२; –प्राचीन संस्कृति, १८१;–शेती-उद्योग-धंदे, २२३; –सरकार, २२४;–उद्योगधंद्यांना संरक्षण, २२४; –चीनशीं संबंध, २२६;–राज्यकारभार, २२६;–स्वातंत्र्य, २२७
हीरकमहोत्सव, १३७,१९७–ट्रस्ट, १३०
होमी मेथा, सर, २२५

क्ष

क्षत्रिय, २५

ज्ञ

ज्ञान, २१, ११६;–त्याचा योग्य उपयोग, ३६; –दोन शाखा, ७२; –प्रसार, १३९, १८१; –सर्वांगीण, २०२
ज्ञानबाई प्रसूतिगृह, ४३.

REFBK-0005851

# वाद-विवेचन-माला

संपादकः— पां. वा. गाडगीळ

या मालेंत चालू विचार-प्रवाहावर एकंदर दहा पुस्तकें प्रसिद्ध व्हावयाचीं आहेत. मालेच्या लेखक-वर्गांत आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, कॉ. गोरे, कॉ. फडके इत्यादि असून प्रत्येक पुस्तकाची किंमत फक्त ८ आणे आहे; पण मालेच्या दहाहि पुस्तकांची आज आगाऊ वर्गणी पोस्टेजसुद्धां फक्त ४ रुपये. एका पुस्तकाकरतां १० आण्यांचीं तिकिटें पाठवावींत.

**आजपर्यंत प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें :**

**सुलभ समाजवाद** (श्री. पां. वा. गाडगीळ) किं. ८ आणे.
**फॅसिझम** ( ,, ,, ,, ) किं. ८ आणे.
**साम्राज्यशाही** (कॉ. गोरे) किं. ८ आणे.

## दोन स्वतंत्र सामाजिक कादंबऱ्या

**ऊर्मिला**
ले. श्री. आनंदीबाई जयवंत
किंमत २ रुपये

**मलबार हिल**
ले. मामा वरेरकर
किंमत २॥ रुपये

प्रकाशक : यशवंत गोपाळ जोशी, ६२३/१५ सदाशिव, पुणें २.